म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा । वा / १
दा. क्र. ६२८६

IRBK-0106286
IRBK-0106286

ठा. क. ६२५८

शरत्-साहित्य-माला – २४

# गृहदाह

[पूर्वार्ध]

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम २९१५८
विभाग ...
क्रमांक ७३०८
नों. दि. ३१३१५९
वाचनालय शाखा

★

: लेखक :
डॉ. शरच्चन्द्र चटर्जी

: अनुवादक :
भा. वि. वरेरकर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
दा. क्र. ६२५८ नों. दि.
वि. ...

IRBK-0106286
IRBK-0106286

...स्था, मुंबई ४.

: प्रकाशक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
नवभारत प्रकाशन-संस्था,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

❀

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

जानेवारी १९५७

❀

: मुद्रक :
रघुनाथ दिपाजी देसाई,
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,
६, केळेवाडी, गिरगांव, मुंबई ४.

# प्र स्ता व ना

प्रस्तुत कादंबरी ‘भारतवर्ष’ मासिकाच्या १९१७ ते १९२० सालच्या तीन वर्षांच्या अंकांत क्रमशः प्रसिद्ध झाली होती. २० मार्च १९२० रोजीं ती पुस्तकरूपानें प्रसिद्ध झाली.

शरद्बाबूंच्या वाङ्मयांत या कादंबरीचें स्थान फार उच्च दर्जाचें आहे असें समजलें जातें. वंगीय समाजाच्या दृष्टीनें या कादंबरींतील प्रसंग कितपत वास्तव स्वरूपाचे आहेत, याबद्दल मराठी वाचकाला क्षणभर शंका आल्यावांचून राहणार नाहीं.

मुंबईत जो ‘प्रार्थना समाज’ अस्तित्वांत आला तो राजा राममोहन रॉय यांच्या ‘ब्रह्मसमाजा’च्या अनुकरणानें आला असेंच जरी म्हणतां येत नसलें, तरी मुंबईचा ‘प्रार्थना समाज’ हें बंगालच्या ‘ब्रह्मसमाजा’चें धाकटें भावंड होतें असें म्हणायला हरकत नाहीं. तरीपण या दोन समाजांच्या अस्तित्वामुळें सर्व-साधारण हिंदू समाजावर झालेला या दोन्ही प्रांतांतला परिणाम अगदींच वेगळ्या स्वरूपाचा होता. बंगालमधील ‘ब्रह्मसमाजी’ हे बंगालच्या सनातनी समाजाच्या दृष्टीनें सर्वस्वीं बहिष्कृत होते, ‘म्लेंच्छ’ समजले जात होते—खिस्ती आणि ‘ब्रह्मसमाजी’ हे एकच आहेत असा बंगाल्यांत जसा समज होता तसा मुंबईच्या ‘प्रार्थना समाजियांच्या’ बाबतींत नव्हता. संख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर ब्रह्मसमाजियांची संख्या मुंबईच्या प्रार्थनासमाजियांपेक्षां कितीतरी पटीनें मोठी होती आणि त्यांच्याबाहुल्यामुळेंच भेदाभेदाची ही तीव्रता बंगाल्यांत आत्यंतिकतेनें जाणवत होती. याच परिस्थितीचा आश्रय करून शरद्बाबूंनीं या कथानकाचा पाया घातला आहे.

पायावर जी इमारत उभारली गेली आहे ती मात्र नुसती ‘ब्रह्मसमाजी’ आणि सनातनी या दोन समाजांतील दोषांच्या भिंतीपुरती मर्यादित राहिलेली नाहीं. सुशिक्षित आणि सुसंस्कृत समाजांतील नव्या जाणिवेनें भारलेल्या तरुणांच्या

व्यक्तिमत्वांत जे संघर्ष निर्माण झाले होते त्यांचेंच चित्र या कादंबरींत चित्रित केलेलें आहे.

महिमसारखा एक उदारहृदयी पण आत्मप्रवण तरुण आणि सुरेशसरखा तितकाच — किंबहुना त्याहीपेक्षां जास्त उदारहृदयी—पण भावनाविवातेनें उच्छृंखल वृत्तीनें वागणारा तरूण, या दोन तरुणांच्या आकर्षणांत अचलेसारख्या सत्प्रवृत्त आणि सालस तरुणीच्या आयुष्याचें जें मातेरें झालें आहे त्याचें सूक्ष्म मनोविश्लेषणात्मक असें अत्यंत हृदयविदारक चित्र या कादंबरींत रेखाटलें गेलें आहे. संपूर्ण कादंबरी हातीं असल्याशिवाय या कथेचीं मूल्यें पूर्ण स्वरूपांत दवतां येणार नाहींत.

हाजी कासम वाडी, मुंबई नं. ७.
१ ऑगस्ट १९४८

भा. वि. वरेरकर

अनुक्रम २८५७० ... ९३८ ३७१३१५

# गृहदाह

## १

सुरेश हा महिमचा परममित्र होता. दोघेही एकाच वेळीं एफ्. ए. पास झाले तेव्हां सुरेश मेडिकल कॉलेजांत गेला आणि महिम मात्र आपल्या पूर्वीच्या सिटी कॉलेजांतच टिकून राहिला.

सुरेश रागारागानें म्हणे, " महिम, मी पुन्हां पुन्हां तुला सांगतोंय, कीं बी. ए., एम्. ए. होण्यांत कांहीं अर्थ नाहीं. अजूनही वेळ आहे. तूं मेडिकल कॉलेजांतच येणं अवश्य आहे. "

महिम हंसून म्हणाला, " येणं आवश्यक आहे खरं, पण खर्चाचा तर विचार केला पाहिजे ! "

" तुला झेपणार नाहीं इतका का तो खर्च फाजील आहे ? शिवाय तुझी स्कॉलर्शिप तर आहे ना ? "

महिम हंसला आणि उगीच राहिला.

सुरेश उतावीळ होऊन म्हणाला, " नाहीं नाहीं, हंसायची गोष्ट नव्हे महिम, आतां वेळ घालवण्यांत अर्थ नाहीं. तुला सांगून ठेवतोंय, इतक्यांत ॲडमिशन मिळवलीच पाह्यजे. खर्चाबिर्चाचा विचार करूं मागाहून. "

महिम म्हणाला, " ठीक आहे. "

सुरेश म्हणाला, " असं पहा महिम, तुझं कोणतं ' ठीक आहे ' खरं अन् कोणतं खोटं तें अजूनपर्यंत मला कधींच उमगलं नाहीं, पण एक काय तें निश्चित ठरवून घ्यायला असं बाटेनं जातांना जमायचं नाहीं. कॉलेजांत जायला उशीर होईल मला. पण काय वाटेल तें होवो, उद्यां परवांपर्यंत हें प्रकरण तडीला लावल्यावांचून मी राह्यचा नाहीं. उद्यां सकाळीं घरींच रहा. मी येणार आहें. " असें म्हणून सुरेश घाईघाईनें आपल्या कॉलेजच्या बाजूकडे वळला.

पंधरा दिवस निघून गेले. कुठें गेला महिम आणि कुठें गेली त्याची मेडिकल

कॉलेजची ॲडमिशन ! एके दिवशीं रविवारीं दुपारच्या वेळीं सारा गांव पालथा घातल्यावर सुरेशला एका मोडक्या तोडक्या विद्यार्थ्यांच्या बोर्डिंगचा पत्ता लागला. तिथें तो आला तो सरळ वर गेला. एका कोंदट काळोख्या खोलींत जमिनीवर फाटकी चटई टाकून सहा सात आसामी जेवायला बसलेले असल्याचें त्याला दिसून आलें. अचानक मित्र समोर दिसतांच महिम वर पाहून म्हणाला, " एकाएकीं बिऱ्हाड बदलावं लागल्यामुळं तुला कळवतां आलं नाहीं. हा पत्ता कसा लागला तुला ? "

त्याच्या प्रश्नाचें उत्तर न देतां सुरेश धप्कन् एका खाटेवर बसला आणि जेवीत असलेल्या विद्यार्थ्यांच्या ताटांतल्या जिनसांकडे निरखून पाहूं लागला. भल्या मोठ्या तांदुळाचा भात, डाळ म्हणून कसलें तरी पाणी, कसली तरी उकडलेली पालेभाजी आणि कसलीं तरी मुळें उकडून केलेली भाजी आणि त्याच्या शेजारीं भाजून काळ्या पडलेल्या तांबड्या भोपळ्याच्या दोन काचऱ्या—दहीं नाहीं, दूध नाहीं, कसलीही मिठाई नाहीं, एका माशाचा तुकडासुद्धां कुणाच्या पानांत नव्हता.

सर्वांच्याबरोबर महिम एव्हढेंसुद्धां वाईट न वाटतां मोठ्या आवडीनें मिटक्या मारून जेवीत होता. तें दृश्य पाहातां पाहातां सुरेशचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले. कसेंबसें तोंड फिरवून डोळे पुसून तो उभा राहिला. अगदीं एव्हढ्याशा कारणानें सुद्धां त्याच्या डोळ्यांना टच्कन् पाणी येत असे.

जेवण झाल्याबरोबर महिम आपल्या मित्राला घेऊन आपल्या छोट्याशा बिछान्यावर येऊन बसला तेव्हां सुरेश गहिंवरून म्हणाला, " पुन्हां पुन्हां तुझा हा आचरटपणा सहन करणं मला अशक्य झालंय महिम. "

महिम अगदीं सीध्या वृत्तीनें म्हणाला, " म्हणजे काय ? "

सुरेश म्हणाला, " म्हणजे हेंच—असलं हें घाणेरडं घर या शहरांत असेल अन् असल्या या ओंगळ जेवणाचा घांस कुठला माणूस तोंडीं घालत असेल हें प्रत्यक्ष पाहलं नसतं तर मला खरं वाटलं नसतं. तें कांहीं असो, ही जागा तुला सांपडली कुठं. अन् तुझं तें जुनं घर — किती का वाईट असेना तें, याची त्याची तुलनाच व्हायची नाहीं, तें सोडलंस काय म्हणून ? "

मित्राचे ते शब्द मित्राच्या अंतःकरणाला झोंबले. नित्याचा निर्विकार गंभीरपणा राखणें महिमला अशक्य झालें. तो ओशाळून म्हणाला, “ सुरेश, आमच्या गांवचं आमचं घर तूं बघितलं नाहींस. तें पाह्यलं असतंस म्हणजे या घरीं राहाणं मला कां कठीण वाटत नाहीं तें तुला कळलं असतं. अन् जेवणाचं म्हणशील, तर इतर चार गृहस्थाघरचीं मुलं जें जेवण आवडीनं खातात तें मलाच कां आवडूं नये ? ”

सुरेश तिरमिरीला येऊन म्हणाला, “ हा ‘ कां ’ चा प्रश्न नव्हे. संसारांत बऱ्यावाईट गोष्टी असायच्याच. बरं तें बरं वाटतं. वाईट तें वाईट वाटतं, त्यांत मुळींच संशय नाहीं; पण एव्हढ्या हालांत येऊन पडायची तुला जरूरीच काय पडली तें कळलं पाह्यजे मला. ”

महिम मुकाट्यानें हळुहळू हंसत राहिला—बोलला नाहीं.

सुरेश म्हणाला, “ जरुरी तुझ्याजवळ ! मला ती नको कळायला. मला हवंय तें तुला इथून उचलून घेऊन जायला ! आतांच गाडी आणतों अन् तुझं हें सारं सामानसुमान घेऊन जातों आमच्या घरीं. तुला इथंच टाकून गेलों तर माझ्या डोळ्यांना झोंप यायची नाहीं. बोलाव तुझ्या या बोर्डिंगच्या नोकराला अन् एक गाडी आणायला सांग. ” असें म्हणून महिमला बिछान्यावरून ओढून काढून सुरेश स्वतः त्याचा बिछाना गुंडाळूं लागला.

महिमनें त्याच्याशीं ओढाताण करायचा प्रयत्न केला नाहीं. तो शांत गंभीरपणें म्हणाला, “ असा वेडेपणा करूं नकोस सुरेश. ”

सुरेश एकदम वर पाहून म्हणाला, “ वेडेपणा कसला ? तूं येणार नाहींस ? ”

“ नाहीं. ”

“ कां नाहीं ? मी काय तुझा कुणीच नाहे ? माझ्या घरीं यायला तुला कमीपणा वाटतो ? ”

“ नाहीं. ”

“ मग ? ”

महिम म्हणाला, “ सुरेश, तूं माझा दोस्त—असा दोस्त दुसरा कुणीच नाहीं माझा—या जगांत असे दोस्त किती असतील कोण जाणे ? नुसत्या शरीराच्या

आरामासाठीं एव्हढ्या दिवसांची ही आपली दोस्ती गमावून बसण्याइतका मी मूर्ख आहें, असं का तुला वाटलं ?"

सुरेश म्हणाला, "ही दोस्ती कांहीं तुझी एकट्याचीच नव्हे महिम, त्यांत माझीही भागी आहे. ती गमावणं म्हणजे केव्हढं मोठं नुकसान आहे तें मला सांगतां सुद्धां यायचं नाहीं. मी इतका का खुळा आहें ? एव्हढा सावधपणा राखल्याशिवाय अन् आंकडेमोडी केल्याशिवाय जर ही दोस्ती टिकून रहात नसेल तर ती जाईना का चुलींत ? शरीराचं स्वास्थ्य देखील झिडकारून टाकण्याइतकं का तिचं मोल जास्त आहे ?"

महिम हंसून म्हणाला, "नाही. मी हरलों. पण मी एक गोष्ट तुला निश्चितपणें सागतों सुरेश, कीं तुला जें वाटलंय, कीं मी हट्टानं स्वतःचे हाल करून घेतोंय, तें मात्र खरं नव्हे."

सुरेश म्हणाला, "बरं आहे. ठरलं, तें खरं नव्हे ! त्याचं कारणही नको मला कळायला. पण खर्चाला जपायचं हाच जर तुझा उद्देश असेल तर आमच्या घरींच येऊन राहा ना ! मग तर तुझा तो उद्देश वाया जायचा नाहीं !"

मान हालवून महिम थोडक्यांत म्हणाला, "सध्यां राहूं दे सुरेश, खरोखरच हाल होताहेत असं वाटलं तर तुला अवश्य कळवीन."

एकदां ठरलेल्या निश्चयापासून महिमला वळवणें असाध्य होतें हें सुरेशला माहित होतें. जास्त आग्रह न करतां म्हणूनच तो एक प्रकारें रागारागानें निघून गेला. पण आपल्या मित्राची राहाण्याखाण्याची ती व्यवस्था प्रत्यक्ष डोळ्यानें पाहिल्यामुळें त्याच्या मनाला टोंचण्या लागून राहिल्या होत्या.

सुरेश हा श्रीमंताचा मुलगा होता. महिमवर त्याचें निष्कपट प्रेम होतें. आपल्या मित्रासाठीं आपला कांहींतरी हातभार लागावा अशी त्याची अंतःकरणापासून इच्छा होती. पण हा वेळपर्यंत कोणत्याही प्रकारें त्याची मदत घ्यायला महिमला भाग पाडणें त्याला अशक्य झालें होतें. आजही तसेंच झालें.

## २

सुमारें पांच वर्षांनी याच दोन मित्रांची अशाच प्रकारें चर्चा चालली होती.

"तुझ्यावर माझी केव्हढी श्रद्धा होती महिम, तें सांगतां यायचं नाहीं."

" सांग म्हणून मी तरी कुठं मागं लागलोंय तुझ्या सुरेश ? "

" ती श्रद्धा यापुढं टिकणार नाहींशी दिसते. "

" नाहीं टिकली तर मी तुला शिक्षा करीन अशी तंबी तर कधीं दिली नाहीं मी ! "

" तूं कपटाचरण करशील असं तुझ्या एखाद्या बड्या शत्रूनं सुद्धां म्हटलं नसतं. "

" जें शत्रूला साधत नाहीं तें मित्रालाही साधणार नाहीं, असं कांहीं दर्शन-शास्त्रानं ठरवलेलं नाहीं ! "

" छे छे ! शेवटीं एका ब्राह्म पोरीच्या पकडींत गेलास ना ? काय पाह्यलंस तूं असं तिथं ? खप्पड चेहरा, बुकं पाठ करतां करतां सुकून गेलेला देह, एक थेंब रक्तसुद्धां नाहीं देहांत, जरा लोटून दिलं तर अर्धी हाडं कोसळून पडतील ! आवाजसुद्धां असा चीं चीं करणारा—ऐकल्यावर कांटा उभा राहातो आंगावर ! "

" असं आहे खरं ! "

" असं पहा महिम, ब्राह्म लोकांची पोरगी ज्यानीं कधीं पाह्यली नसेल असल्या तुझ्या खेड्यांतल्या लोकांची थट्टा कर हवी तर ! कुणी बाईमाणूस इंग्रजींत पत्राचा पत्ता लिहिते एव्हढं नुसतं पाह्यलं तरी जे थक्क होऊन जातात – अशी कुणी रस्त्यानं जाऊं लागली तर तिला मोठ्या अदबीनं वाट देतात देवदेवता समजून डोक्यावर घेऊन नाचूं लागतात, अशा तुझ्या गांवढळांना हवं तर तूं थक्क करून टाक. मी कांहीं खेड्यांत वाढलेला नाहीं. माझ्या डोळ्यांत इतक्या लौकर धूळ टाकणं कांहीं जमायचं नाहीं तुला. "

" मी तुला शपथपूर्वक सांगतों सुरेश, तुम्हां शहरीं लोकांच्या डोळ्यांत धूळ टाकण्याइतकी दुष्ट वासना कांहीं मला झालेली नाहीं. मी तिला आपली माझ्या खेड्यांतच नेऊन ठेवीन. त्याला तर तुझी हरकत नाहीं ? "

सुरेश रागारागानें उठून बोलूं लागला. " हरकत नाहीं ? आहे—शंभर, हजार, लाख, कोटी वेळां हरकत आहे माझी ! या जगांतल्या श्रेष्ठ जातींत जन्म घेतलेला हिंदू संतान तूं, एका बायकोच्या मोहापायीं काय जात बुडवणार आहेस ? एकदां तिचे कटमोजे अन् तलम साड्या काढून घेऊन आमच्या गृहलक्ष्मीसारखं

साधं लुगडं तिच्या आंगावर चढवून पहा—धुंदी उतरते कीं नाहीं तुझी ती ! तसल्या त्या निर्जीव लाकडी बाहुलीचं रूप पाहून तुझा नशा उतरतो कीं नाहीं तें पहा ! काय आहे तिथं ? काय येतंय तिला ? नुसते गळपट्टेच हवे असतील तर या कलकत्त्यांत दर्ज्यांचीं दुकानं काय थोडीं आहेत ? पत्रावर पत्ता लिहिण्यासाठीं तुला एखाद्या ब्राह्म पोरीच्या दारीं धरणं धरून बसायला नको ! वेळींप्रसंगीं ती काय वांटणार आहे, घाटणार आहे, कीं घांसभर भात रांधून वाढणार आहे ? आजारी पडलास तर ती का तुझी सेवा करणार आहे ? तें शिकवलंय का कुणी तिला ? ईश्वर करो अन् तसं न घडो, पण तूं असा प्रसंगांत सांपडलेला दिसतांच ती जर तुला टाकून पळून गेली नाहीं, तर माझं ' सुरेश ' नांव बदलून वाटेल तें नांव दे मला. मला वाईट वाटायचं नाहीं. ”

महिम यावर कांहीं बोलला नाहीं. सुरेश पुन्हां बोलत होता, “ महिम, तुला माहित आहे, कीं मी तुझ्या कल्याणाचीच काळजी वाहातोंय. तुझं अकल्याण व्हावं असं चुकून सुद्धां मला वाटायचं नाहीं. किती तरी ब्राह्म महिला मी पाहिल्या आहेत. त्यांत एखाद दुसरी तशी बरीही दिसली असेल, पण आम्हां हिन्दूंच्या घरच्या मुलींच्या तोडीला का त्या येणार आहेत ? लग्नासाठीं इतका घाईला आला होतास तर मला कां सांगितलं नाहींस ? ठीक आहे. व्हायचं तें होऊन गेलं. आतां यापुढें तिकडे जाऊं नकोस. मी अगदीं वचन देतों तुला – एक महिन्याच्या आंत अशी मुलगी शोधून काढून आणतों, कीं तिच्या सोबतींत उभ्या आयुष्यांत तुला कधीं दुःखाचा लवलेशही बाधणार नाहीं. तेव्हढ्या मुदतींत जर माझ्याकरवीं कांहीं झालं नाहीं तर मग तुला वाटेल तें कर – तिच्याच पदकमलावर लोटांगणं घेतलींस तरी मी नको म्हणणार नाहीं. पण माझ्या मित्राची अब्रू सांभाळण्यासाठीं एव्हढा एक महिना धीर धर, बोल कबूल ? ”

महिम पूर्वीप्रमाणेंच स्वस्थ राहिला. हो ना कांहींच बोलला नाहीं. आपलें बरें व्हावें म्हणून आपला मित्र किती भडकला आहे, त्याच्या अंतःकरणाला ही गोष्ट किती लागून राहिली आहे याची त्याला पूर्ण कल्पना आली.

सुरेश म्हणाला, “ तुला आठवतं ना महिम, ब्राह्म नसून सुद्धां तूं

ब्राह्ममंदिरांत ये जा सुरू केलीस त्यावेळीं मी पुन्हां पुन्हां तुला हरकत नाहीं कां घेतली ? या एव्हढ्या मोठ्या कलकत्त्यांत तुला एकसुद्धां हिंदू मंदीर नाहीं का सांपडलं ? असलं हें ढोंग करायची काय जरूर होती तुला ? तुझ्या या चुकीमुळं तूं केव्हां ना केव्हां तरी अशा ऐखाद्या पेंचांत येणार असं मला वाटलंच होतं. ”

या वेळीं महिम थोडासा हंसला आणि म्हणाला, “ तूं सांगितलं होतंस खरं, पण मी जात होतों तो कांहीं ढोंगापायीं नव्हे. पण तुला एकच गोष्ट विचारतों सुरेश, तूं स्वतः देवच मानीत नाहींस तिथं हिंदूच्या देवाची आवड तुला कां ? मी ब्राह्ममंदिरांत गेलों कीं हिंदू मंदिरांत गेलों, त्यांत तुझं काय बिघडतं ? ”

सुरेश चिरडीला येऊन म्हणाला, “ जें मुळींच नाहीं तें मी मानीत नाहीं. ईश्वर नाहीं, देवदेवता सब झूट—पण जें आहे तें कांहीं मी धुडकावून लावीत नाहीं. समाजावर माझी श्रद्धा आहे, माणसाची मी पूजा करतों—माणसाची सेवा करणं हेंच मनुष्यजन्माचं मोठं सार्थक असं मी मानतों. हिंदूच्या समाजांत मी जन्म घेतला आहे, तेव्हां हिंदू समाजाचं रक्षण करणं हें माझं कर्तव्य आहे. तूं ब्राह्मांशीं लग्नसंबंध जोडावा आणि ब्राह्म लोकांचं दल वाढवावं, असं माझा प्राण गेला तरी मी तुला करूं देणार नाहीं. केदार मुखर्जीच्या मुलीशीं लग्न करायचं तूं वचन का दिलं आहेस ? ”

“ नाहीं. ज्याला वचन म्हणतात, असं कांहीं मी मुळींच दिलेलं नाहीं. ”

“ दिलं नाहींस ना ? छान ! तर मग आतां मुकाट्यानं बैस. या महिन्यांतच मी आतां तुझं लग्न लावून टाकतों. ”

“ लग्नासाठीं मी इतका पागल झालोंय असं तुला कुणी सांगितलं ? तूं सुद्धां आतां स्वस्थ बैस ना ! यापुढं दुसऱ्या कुणाबरोबरही माझं लग्न होणं अशक्य आहे. ”

“ कां अशक्य आहे ? काय केलं आहेस ? त्या ब्रह्मेच्या प्रेमांत का सांपडलायस ? ”

“ तसंही म्हण हवं तर ! पण कुणाही सभ्य महिलेच्या बाबतींत तितक्याच सभ्यपणानं बोलत जा सुरेश. ”

अनुक्रम २९१८८
विभाग ललित वाङ्मय

" सभ्यपणानं मला बोलतां येतं. तें मला कुणी शिकवायला नको !—या सभ्य महिलेचं वय काय आहे तें विचारूं का मी ? "

" मला माहित नाहीं. "

" माहित नाहीं ? वीस, पंचवीस, तीस, चाळीस—कीं याहीपेक्षां जास्त ?—कांहींसुद्धां माहित नाहीं ? "

" नाहीं. "

" तुझ्यापेक्षां लहान कीं मोठी—तें सुद्धां नाहीं का माहित ? "

" नाहीं. "

" तुला ज्याअर्थी तिनं असं पकडींत धरलंय त्याअर्थी ती अगदींच कोवळी पोर नसेल असं म्हटलं, तर कांहीं चूक व्हायची नाही ! कसं ? "

" नाहीं. तुझ्या बाबतींत कांहींच चुकायचं नाहीं !—पण असं पहा सुरेश, मला आतां थोडं काम आहे. बाहेर गेलं पाहिजे. "

सुरेश म्हणाला, " ठीक आहे. मलाही सध्यां कांहीं काम नाहीं—दोघेही जाऊं बरोबर. "

दोघेही मित्र बाहेर रस्त्यावर आले. बराच वेळपर्यंत ते मुकाट्यानें चालले होते. थोड्या वेळानें सुरेश म्हणाला, " आज मी जाणूनबुजून तुला टाकून बोललों हें उघड करून सांगायची कांहीं जरूरी नाहीं. "

महिम म्हणाला, " अर्थात नाहीं. "

सुरेश तसाच संथपणें म्हणाला, " कां टाकून बोललों महिम ? "

महिम हंसला. तो म्हणाला, " तें जसं तूं सांगितल्याशिवाय मला कळलं, तसंच हें सुद्धां कांहीं मला उघड करून सांगायला नको. "

त्याचा एक हात सुरेशच्या हातांत होता. मोठ्या प्रेमानें सुरेशनें तो हळूच दाबून म्हटलें, " नाहीं महिम, तुला मुद्दाम कांहीं सांगायचं नाहीं मला. बाकीचे सारे माझ्याबद्दल गैरसमज करून घेतील, पण तूं घ्यायचा नाहींस. तरीपण मी तुला आज अगदीं तुझ्या तोंडावर सांगतोंय, मी तुझ्यावर जेव्हढं प्रेम ठेवतों त्याच्या अर्ध्यानं सुद्धां तुला कांहीं वाटत नाहीं. तुला पटो कीं न पटो. पण तुला एव्हढासुद्धां त्रास झालेला मला पाहावत नाहीं. लहानपणीं

या बाबतींत आपण किती झगडे केले आहेत त्याची एकदां आठवण कर. आतां एव्हढा काल गेल्यानंतर जिच्यासाठीं मला सुद्धां टाकायला तूं तयार झालायस महिम, तिच्या सहवासांत तूं सुखी होशील असं मला पटलं असतं तर मी माझं दुःख हंसतमुखानं सहन केलं असतं. एक शब्दसुद्धां बोललों नसतों. "

महिम म्हणाला, " तिच्या सहवासांत मी कदाचित सुखीही होणार नाहीं. पण तुला टाकून देईन हें कशावरून ठरवलंस ? "

" तूं मला टाकून दे कीं नको देऊं, मी तुझा संबंध सोडणार. "

" कां ? तुझा कदाचित् मी ब्राह्म मित्रही असलों असतों. "

" नाहीं, मुळींच नाहीं. ब्राह्म म्हटले कीं माझ्या डोळ्यांत सलतात. माझा एकही मित्र ब्राह्म नाहीं. "

" कां डोळ्यांत सलतात ? "

" त्याचीं अनेक कारणं आहेत. त्यांतलं एक हें—आमचा समाज वाईट म्हणून जे आम्हांला सोडून गेले आहेत त्यांना बरे म्हणून जवळ करायला मी मुळींच तयार नाहीं. आमच्या समाजावर माझी किती ममता आहे तें तुला ाहित आहेच. त्या आमच्या समाजाला ज्यांनीं देशाच्या, परदेशाच्या आणि वींच्यासमोर टाकाऊ म्हणून ठरवायला सुरवात केली आहे, त्यांचा चांगुलपणा ंच्याकडेच राहो—ते आमचे शत्रू आहेत. "

महिम मनांतल्यामनांत असहिष्णु झाला होता. तो म्हणाला, " आतां मी य करावं असं तुझं म्हणणं आहे ? "

सुरेश म्हणाला, " एव्हढा वेळ तेंच सांगत होतों की. "

" बरं बरं, पुन्हां एकदां सांग. "

" या बाईचा मोह वाटेल तें करून तूं तोडून टाकला पाह्यजेस. निदान एक महिनाभर तरी तिला तूं भेटूं नकोस. "

" पण तेव्हढ्या वेळांत जर नाहीं मोह गेला तर ? नुसत्या मोहापेक्षां विशेष असं कांहीं असलं तर ? "

सुरेश क्षणभर विचार करून म्हणाला, " तें मला कांहीं कळत नाहीं महिम, तुझ्यासाठीं माझा जीव तळमळतोय एव्हढंच मी जाणतों. अन्

त्याहिपेक्षां जास्त तळमळतोंय तो आपल्या समाजासाठीं. लहानपणीं तुला देवी आल्या होत्या तेव्हांची एकदां आठवण करून पहा—मुंगेरला गंगेंत होडी बुडाली त्यावेळीं दोघेही मरणार होतों—विसरलेल्या गोष्टींची आठवण देतोंय त्याची मला क्षमा कर. यापेक्षां जास्त कांहीं मला बोलायचं नाहीं. मी चाललों." असें म्हणून सुरेश चट्कन उठून पाठ फिरवून घाईघाईनें चालता झाला.

## ३

सुरेशच्या देहांत जसा एका दृष्टीनें असाधारण जोर होता, तसेंच दुसऱ्य दृष्टीनें त्याचें अंतःकरण तितकेंच स्नेहशील होतें. परिचित असो, कीं अपरि चित असो, कुणाच्याही दुःखाकष्टाची गोष्ट ऐकली कीं त्याला एकदम र कोसळे. लहानपणीं त्यानें कधीं कीडमुंगीला सुद्धां मारलें नव्हतें. जैनमारवाड्य अनुकरण करून कितीतरी दिवस तो खिसाभर रवा आणि साखर घेऊ शाळा चुकवून झाडाझाडाखालून फिरत मुंग्यांना खायला घालीत अ मांसमासे खायचें त्यानें किती वेळ सोडलें आणि किती वेळ धरलें त्या गणतीच नव्हती. ज्याच्याबद्दल त्याला लोभ वाटे त्याच्यासाठीं काय करावें आ न करावें असें त्याला होऊन जात असे.

शाळेंत असतांना महिम हा साऱ्या वर्गांत एक सालस मुलगा हं त्याच्या आंगांतले कपडे फाटके तुटके असत, पायांतल्या वहाणा जुन्यापुरा शरीर रोडावलेलें, चेहरा केंविलवाणा—हें पाहून पहिल्यानें सुरेशचें त्याच्याकडे ओढ घेऊं लागलें. अगदीं थोडक्याच दिवसांत दोघांची द इतक्या वावटळीच्या वेगानें जमून गेली, कीं तो शाळेंतल्या विद्यार्थ्यांच्या मोठा विषय बनून राहिला. परीक्षेंत महिमला छात्रवृत्ती मिळाली. त्य रुपयांच्या आधारावर कलकत्त्याला येऊन गांवच्या एका वाण्याच्या राहून तो शाळेंत जाऊं लागला. आपल्या मित्रानें आपल्या घरीं येऊन म्हणून सुरेशनें अनेक प्रकारें प्रयत्न करून पाहिले पण कांहीं के त्याच्या म्हणण्याला कबूल झाला नाहीं. केव्हां अर्धपोटीं तर केव्हां उ राहून महिमनें entrance परीक्षा देण्यापर्यंत मजल गांठली. यानंतरची पूर्वीच्या प्रकरणांत आली आहे.

त्या दिवसापासून सुमारें आठवडाभर महिमची भेट न झाल्यामुळें सुरेश याच्या राहात्या जागीं येऊन हजर झाला. कसल्यातरी सणांसाठीं त्या दिवशीं शाळाकॉलेजें बंद होतीं. त्या घरीं आल्यावर सुरेशला कळून आलें, कीं सकाळींच महिम जो कुठें बाहेर गेला होता तो अजूनही आला नव्हता. रजेचा दिवस असल्यामुळें पटलडांग्याला केदार मुखर्जींच्या घरींच तो गेला असला पाहिजे असा सुरेशनें समज करून घेतला.

लहानपणापासूनच्या दोस्तीची चाड एका सामान्य स्त्रीच्या मोहासाठीं झिडकारून तो निर्लज्जपणानें पुरते सात दिवससुद्धां थांबू शकला नाहीं—सरळ निघून गेला – त्याच्याबद्दल सुरेशच्या हृदयांत एकदम आग भडकल्याप्रमाणें द्वेषाचा प्रादुर्भाव झाला. एव्हढासुद्धां विचार न करतां तो गाडींत बसला आणि सरळ पटलडांग्याला गाडी हांकायचा कोचमनला त्यानें हुकूम फर्मावला. तो आपल्याशींच म्हणूं लागला, "अरे मूर्खा! अरे कृतघ्ना! एका स्त्रीसाठीं जो तुझा जीव एव्हढा गुंतून गेलाय, तो जीव आज असणार होता कुठं? स्वतःचा प्राण धोक्यांत घालून दोनदोन वेळ तुला वांचवलं कुणी? त्याची एव्हढी सुद्धां कदर वाटत नाही का रे तुला?"

केदार मुखर्जींचें घर असलेली गल्ली सुरेशला माहीत होती. एकदोघांना विचारून गाडी मुक्कामावर येऊन पोंचली. गाडींतून उतरल्यावर सुरेशनें नोकराला विचारून घेतलें आणि तो सरळ वर माडींतल्या दिवाणखान्यांत येऊन पोंचला.

जमिनीवर तक्याला टेकून एक वृद्ध गृहस्थ वर्तमानपत्र वाचीत बसले होते. त्यानीं वर पहातांच नमस्कार करून सुरेशनें आपला परिचय करून देत म्हटलें, "माझं नांव श्रीसुरेशचंद्र बंद्योपाध्याय. मी महिमचा बाळमित्र."

चष्मा बंद करून त्या वृद्ध गृहस्थांनीं त्याला नमस्कार करून म्हटलें, "बसावं."

सुरेश बसला आणि म्हणाला, "महिमच्या बिऱ्हाडीं गेलों होतों, तिथं कळलं कीं तो इकडे आलाय—तेव्हां म्हटलं, यांतच आपलाही परिचय व्हायचा सुयोग येईल असा विचार करून आलों."

वृद्ध गृहस्थ म्हणाले, " आपण आलांत हें आमचं मोठं भाग्य ! पण महिम गेल्या दहाबारा दिवसांत या बाजूला फिरकला सुद्धां नाहीं. आम्हांला सुद्धां आज सकाळपासून त्याची काळजी वाटत होती म्हटलं, त्याची प्रकृति कशी आहे कोण जाणे ! "

सुरेशला मनांतल्या मनांत जरा आश्चर्यच वाटलें. तो म्हणाला, " पण त्याच्य घरच्या लोकांनीं सांगितलं "

वृद्ध गृहथ म्हणाले, " दुसऱ्या कुठं तरी गेले असतील कदाचित. कुठं का असेना पण खुशाल आहे हें ऐकून निश्चिंत झालोंय. "

येत असतांना वाटेंत सुरेश मनांतल्या मनांत जे भडक बेत करीत होता ते म्हाताऱ्याच्या समोर आल्यावर टिकून राहिले नाहींत. म्हाताऱ्याची शांत मुद्रा आणि गंभीरपणें बोलण्याची नाजुक पद्धति पाहून त्याच्या मनाचा भडका बऱ्याच प्रमाणांत थंडावत गेला. तरी पण तो आपलें कर्तव्य विसरला नव्हता. कितीही चांगला असला तरी हा ब्राह्म - ही खूणगांठ मनाशीं बांधून तो स्वतःची उच्छृंखल वृत्ती टिकवून धरायचा प्रयत्न करीत होता. या लोकांचे हे शिष्टाचार कृत्रिम— अशाच प्रकारें भोळ्या माणसांना झुलवून हे लोक आपल्या गोटांत ओढायचा प्रयत्न करतात—अर्थात असल्या या शिकारी लोकांच्या समोर कोणत्याही प्रकारें आपल्या मनावरचा ताबा सुटूं देतां नये—कार्यावरची नजर ढळूं देतां नये—काय वाटेल तें करून यांच्या पकडींतून आपल्या मित्राला सोडवलें पाहिजे—हा एकच विचार त्याच्या मनांत घोळत होता.

कामाची गोष्ट काढायला त्यानें सुरवात केली. तो म्हणाला, " महिम माझा बालपणापासूनचा मित्र. त्याच्यासारखा दुसरा कुणीही मित्र मला लाभला नाहीं. आपण अनुमती दिली तर त्याच्या बाबतींत एक दोन गोष्टी बोलेन म्हणतों. "

थोडेसें हंसून ते वृद्ध गृहस्थ म्हणाले, " खुशाल बोला. त्यांच्या तोंडून मी आपलं नांव ऐकलंय. "

सुरेश म्हणाला, " महिमच्या बरोबर आपल्या मुलीचं लग्न व्हायचं नक्की ठरलंय का ? "

वृद्ध गृहस्थ म्हणाले, " हो, एक प्रकारें नक्कीच झाल्यासारखं आहे म्हणायचं. "

सुरेश म्हणाला, " महिम कांहीं आपल्यांतला नव्हे—ब्राह्मसमाजी नव्हे—तरीसुद्धां हा संबंध घडून येणार आहे का ? "

वृद्ध गृहस्थ यावर कांहीं बोलले नाहींत. सुरेश म्हणाला, " बरं—तें सध्यां राहूं . पण त्याची परिस्थिति कशी आहे, स्त्रीपुत्राचा प्रतिपाळ करण्याचं सामर्थ्य ाला आहे कीं नाहीं, खेड्यांतल्या हिंदू समाजाशीं विरोध आला असतां मोडक्या डक्या घरांत संसार थाटायला आपली मुलगी तयार आहे कीं नाहीं, तयार सली तर महिम कोणती योजना करणार आहे, या साऱ्या गोष्टींचा आपण विचार करून पाह्यलाय का ? "

म्हातारे केदार मुखर्जी एकदम सरळ होऊन उठून बसले. ते म्हणाले, " म्हणजे ! या सगळ्या भानगडी मी कधीं ऐकल्याच नाहींत. या बाबतींत महिम केव्हांही कांहींच कसा बोलला नाहीं ? "

सुरेश म्हणाला, " पण मी मात्र या साऱ्या गोष्टींचा चांगला विचार करून पाह्यलाय. माहिमला सांगून पाहिलं अन् आज या साऱ्या अप्रिय गोष्टींची चर्चा करण्यासाठींच मुद्दाम आपल्याकडे आलोंय. आपल्या मुलीच्या बाबतींत काय तें आपण ठरवावं. पण माझा जीवजान दोस्त ही जबाबदारी उचलतांना त्या भारा-खालीं चेंगरून जाऊन जमीनदोस्त होईल—आणि मी केव्हांही तसं कांहीं घडूं णार नाहीं. "

गोरामोरा चेहरा करून केदारबाबू म्हणाले, " आपण म्हणतां काय सुरेशबाबू ? "

" बाबा ! "—एक सतरा अठरा वर्षांची मुलगी तितक्यांत आंत आली आणि आपल्या बापाजवळ एक अपरिचित तरुण गृहस्थ बसला आहे असें पाहून स्तब्ध होऊन थांबली.

" कोण ? अचला ? ये बाळ, ये बैस. लाजायचं काय मुली, हे आपल्या महिमचे मोठे दोस्त आहेत. "

ती मुलगी चारदोन पावलें पुढें आली आणि दोन्ही हात जोडून तिनें सुरेशला नमस्कार केला. सुरेशला दिसून आलें, कीं तिचा वर्ण सावळा असला तरी उजळ होता. आंगकाठी सडपातळ होती, नाक, तोंड गाल अन् जिवणी अगदीं रेखीव

त्याहिपेक्षां जास्त तळमळतोंय तो आपल्या समाजासाठीं. लहानपणीं तुला देवी आल्या होत्या तेव्हांची एकदां आठवण करून पहा—मुंगेरला गंगेंत होडी बुडाली त्यावेळीं दोघेही मरणार होतों—विसरलेल्या गोष्टींची आठवण देतोंय त्याची मला क्षमा कर. यापेक्षां जास्त कांहीं मला बोलायचं नाहीं. मी चाललों.” असें म्हणून सुरेश चट्‌कन उठून पाठ फिरवून घाईघाईनें चालता झाला.

## ३

सुरेशच्या देहांत जसा एका दृष्टीनें असाधारण जोर होता, तसेंच दुसऱ्या दृष्टीनें त्याचें अंतःकरण तितकेंच स्नेहशील होतें. परिचित असो, कीं अपरिचित असो, कुणाच्याही दुःखाकष्टाची गोष्ट ऐकली कीं त्याला एकदम रडं कोसळे. लहानपणीं त्यानें कधीं कीडमुंगीला सुद्धां मारलें नव्हतें. जैनमारवाड्यांचें अनुकरण करून कितीतरी दिवस तो खिसाभर रवा आणि साखर घेऊन, शाळा चुकवून झाडाझाडाखालून फिरत मुंग्यांना खायला घालीत असे. मांसमासे खायचें त्यानें किती वेळ सोडलें आणि किती वेळ धरलें त्याची गणतीच नव्हती. ज्याच्याबद्दल त्याला लोभ वाटे त्याच्यासाठीं काय करावें आ[illegible] न करावें असें त्याला होऊन जात असे.

शाळेंत असतांना महिम हा साऱ्या वर्गांत एक सालस मुलगा हो[illegible] त्याच्या आंगांतले कपडे फाटके तुटके असत, पायांतल्या वहाणा जुन्यापुराण[illegible] शरीर रोडावलेलें, चेहरा केंविलवाणा—हें पाहून पहिल्यानें सुरेशचें [illegible] त्याच्याकडे ओढ घेऊं लागलें. अगदीं थोडक्याच दिवसांत दोघांची दोस्त[illegible] इतक्या वावटळीच्या वेगानें जमून गेली, कीं तो शाळेंतल्या विद्यार्थ्यांच्या चर्चेच[illegible] मोठा विषय बनून राहिला. परीक्षेंत महिमला छात्रवृत्ती मिळाली. त्या चा[illegible] रुपयांच्या आधारावर कलकत्त्याला येऊन गांवच्या एका वाण्याच्या दुका[illegible] राहून तो शाळेंत जाऊं लागला. आपल्या मित्रानें आपल्या घरीं येऊन रहा[illegible] म्हणून सुरेशनें अनेक प्रकारें प्रयत्न करून पाहिले पण कांहीं केल्या [illegible] त्याच्या म्हणण्याला कबूल झाला नाहीं. केव्हां अर्धपोटीं तर केव्हां उपासप[illegible] राहून महिमनें entrance परीक्षा देण्यापर्यंत मजल गांठली. यानंतरची हकि[illegible] पूर्वींच्या प्रकरणांत आली आहे.

त्या दिवसापासून सुमारें आठवडाभर महिमची भेट न झाल्यामुळें सुरेश त्याच्या राहात्या जागीं येऊन हजर झाला. कसल्यातरी सणांसाठीं त्या दिवशीं शाळाकॉलेजें बंद होतीं. त्या घरीं आल्यावर सुरेशला कळून आलें, कीं सकाळींच महिम जो कुठें बाहेर गेला होता तो अजूनही आला नव्हता. रजेचा दिवस असल्यामुळें पटलडांग्याला केदार मुखर्जींच्या घरींच तो गेला असला पाहिजे असा सुरेशनें समज करून घेतला.

लहानपणापासूनच्या दोस्तीची चाड एका सामान्य स्त्रीच्या मोहासाठीं झिडकारून तो निर्लज्जपणानें पुरते सात दिवससुद्धां थांबू शकला नाहीं—सरळ निघून गेला – त्याच्याबद्दल सुरेशच्या हृदयांत एकदम आग भडकल्याप्रमाणें द्वेषाचा प्रादुर्भाव झाला. एव्हढासुद्धां विचार न करतां तो गाडींत बसला आणि सरळ पटलडांग्याला गाडी हांकायचा कोचमनला त्यानें हुकूम फर्मावला. तो आपल्याशींच म्हणूं लागला, "अरे मूर्खा! अरे कृतघ्ना! एका स्त्रीसाठीं जो तुझा जीव एव्हढा गुंतून गेलाय, तो जीव आज असणार होता कुठं? स्वतःचा प्राण धोक्यांत घालून दोनदोन वेळ तुला वांचवलं कुणी? त्याची एव्हढी सुद्धां कदर वाटत नाही का रे तुला?"

केदार मुखर्जींचें घर असलेली गल्ली सुरेशला माहीत होती. एकदोघांना विचारून गाडी मुक्कामावर येऊन पोंचली. गाडींतून उतरल्यावर सुरेशनें नोकराला विचारून घेतलें आणि तो सरळ वर माडींतल्या दिवाणखान्यांत येऊन पोंचला.

जमिनीवर तक्याला टेकून एक वृद्ध गृहस्थ वर्तमानपत्र वाचीत बसले होते. त्यानीं वर पहातांच नमस्कार करून सुरेशनें आपला परिचय करून देत म्हटलें, "माझं नांव श्रीसुरेशचंद्र बंद्योपाध्याय. मी महिमचा बाळमित्र."

चष्मा बंद करून त्या वृद्ध गृहस्थांनीं त्याला नमस्कार करून म्हटलें, "बसावं."

सुरेश बसला आणि म्हणाला, "महिमच्या बिऱ्हाडीं गेलों होतों, तिथं कळलं कीं तो इकडे आलाय—तेव्हां म्हटलं, यांतच आपलाही परिचय व्हायचा सुयोग येईल असा विचार करून आलों."

त्याहिपेक्षां जास्त तळमळतोंय तो आपल्या समाजासाठीं. लहानपणीं तुला देवी आल्या होत्या तेव्हांची एकदां आठवण करून पहा—मुंगेरला गंगेंत होडी बुडाली त्यावेळीं दोघेही मरणार होतों—विसरलेल्या गोष्टींची आठवण देतोंय त्याची मला क्षमा कर. यापेक्षां जास्त कांहीं मला बोलायचं नाहीं. मी चाललों." असें म्हणून सुरेश चट्कन उठून पाठ फिरवून घाईघाईनें चालता झाला.

## ३

सुरेशच्या देहांत जसा एका दृष्टीनें असाधारण जोर होता, तसेंच दुसऱ्या दृष्टीनें त्याचें अंतःकरण तितकेंच स्नेहशील होतें. परिचित असो, कीं अपरिचित असो, कुणाच्याही दुःखाकष्टाची गोष्ट ऐकली कीं त्याला एकदम रडूं कोसळे. लहानपणीं त्यानें कधीं कीडमुंगीला सुद्धां मारलें नव्हतें. जैनमारवाड्यांचें अनुकरण करून कितीतरी दिवस तो खिसाभर रवा आणि साखर घेऊन शाळा चुकवून झाडाझाडाखालून फिरत मुंग्यांना खायला घालीत असे. मांसमासे खायचें त्यानें किती वेळ सोडलें आणि किती वेळ धरलें त्याची गणतीच नव्हती. ज्याच्याबद्दल त्याला लोभ वाटे त्याच्यासाठीं काय करावें आ[णि] न करावें असें त्याला होऊन जात असे.

शाळेंत असतांना महिम हा साऱ्या वर्गात एक सालस मुलगा हो[ता] त्याच्या आंगांतले कपडे फाटके तुटके असत, पायांतल्या वहाणा जुन्यापुराण[्या] शरीर रोडावलेलें, चेहरा केंविल्वाणा—हें पाहून पहिल्यानें सुरेशचें [मन] त्याच्याकडे ओढ घेऊं लागलें. अगदीं थोडक्याच दिवसांत दोघांची दोस्[ती] इतक्या वावटळीच्या वेगानें जमून गेली, कीं तो शाळेंतल्या विद्यार्थ्यांच्या चर्चेच[ा] मोठा विषय बनून राहिला. परीक्षेंत महिमला छात्रवृत्ती मिळाली. त्या चा[र] रुपयांच्या आधारावर कलकत्त्याला येऊन गांवच्या एका वाण्याच्या दुका[नांत] राहून तो शाळेंत जाऊं लागला. आपल्या मित्रानें आपल्या घरीं येऊन रहा[वें] म्हणून सुरेशनें अनेक प्रकारें प्रयत्न करून पाहिले पण कांहीं केल्या [तो] त्याच्या म्हणण्याला कबूल झाला नाहीं. केव्हां अर्धपोटीं तर केव्हां उपास[पोटीं] राहून महिमनें entrance परीक्षा देण्यापर्यंत मजल गांठली. यानंतरची हकि[गत] पूर्वीच्या प्रकरणांत आली आहे.

त्या दिवसापासून सुमारें आठवडाभर महिमची भेट न झाल्यामुळें सुरेश त्याच्या राहात्या जागीं येऊन हजर झाला. कसल्यातरी सणांसाठीं त्या दिवशीं शाळाकॉलेजें बंद होतीं. त्या घरीं आल्यावर सुरेशला कळून आलें, कीं सकाळींच महिम जो कुठें बाहेर गेला होता तो अजूनही आला नव्हता. रजेचा दिवस असल्यामुळें पटलडांग्याला केदार मुखर्जींच्या घरींच तो गेला असला पाहिजे असा सुरेशनें समज करून घेतला.

लहानपणापासूनच्या दोस्तीची चाड एका सामान्य स्त्रीच्या मोहासाठीं झिडकारून तो निर्लज्जपणानें पुरते सात दिवससुद्धां थांबूं शकला नाहीं— सरळ निघून गेला – त्याच्याबद्दल सुरेशच्या हृदयांत एकदम आग भडकल्याप्रमाणें द्वेषाचा प्रादुर्भाव झाला. एव्हढासुद्धां विचार न करतां तो गाडींत बसला आणि सरळ पटलडांग्याला गाडी हांकायचा कोचमनला त्यानें हुकूम फर्मावला. तो आपल्याशींच म्हणूं लागला, "अरे मूर्खा! अरे कृतघ्ना! एका स्त्रीसाठीं जो तुझा जीव एव्हढा गुंतून गेलाय, तो जीव आज असणार होता कुठं? स्वतःचा प्राण धोक्यांत घालून दोनदोन वेळ तुला वांचवलं कुणी? त्याची एव्हढी सुद्धां कदर वाटत नाही का रे तुला?"

केदार मुखर्जींचें घर असलेली गल्ली सुरेशला माहीत होती. एकदोघांना विचारून गाडी मुक्कामावर येऊन पोंचली. गाडींतून उतरल्यावर सुरेशनें नोकराला विचारून घेतलें आणि तो सरळ वर माडींतल्या दिवाणखान्यांत येऊन पोंचला.

जमिनीवर तक्याला टेकून एक वृद्ध गृहस्थ वर्तमानपत्र वाचीत बसले होते. त्यानीं वर पहातांच नमस्कार करून सुरेशनें आपला परिचय करून देत म्हटलें, "माझं नांव श्रीसुरेशचंद्र बंद्योपाध्याय. मी महिमचा बालमित्र."

चष्मा बंद करून त्या वृद्ध गृहस्थांनीं त्याला नमस्कार करून म्हटलें, "बसावं."

सुरेश बसला आणि म्हणाला, "महिमच्या बिऱ्हाडीं गेलों होतों, तिथं कळलं कीं तो इकडे आलाय—तेव्हां म्हटलं, यांतच आपलाही परिचय व्हायचा सुयोग येईल असा विचार करून आलों."

वृद्ध गृहस्थ म्हणाले, “ आपण आलांत हें आमचं मोठं भाग्य ! पण महिम गेल्या दहाबारा दिवसांत या बाजूला फिरकला सुद्धां नाहीं. आम्हांला सुद्धां आज सकाळपासून त्याची काळजी वाटत होती म्हटलं, त्याची प्रकृति कशी आहे कोण जाणे ! ”

सुरेशला मनांतल्या मनांत जरा आश्चर्यच वाटलें. तो म्हणाला, “ पण त्याच्य घरच्या लोकांनीं सांगितलं ”

वृद्ध गृहथ म्हणाले, “ दुसऱ्या कुठं तरी गेले असतील कदाचित. कुठं का असेना पण खुशाल आहे हें ऐकून निश्चिंत झालोंय. ”

येत असतांना वाटेंत सुरेश मनांतल्या मनांत जे भडक बेत करीत होता ते म्हाताऱ्याच्या समोर आल्यावर टिकून राहिले नाहींत. म्हाताऱ्याची शांत मुद्रा आणि गंभीरपणें बोलण्याची नाजुक पद्धति पाहून त्याच्या मनाचा भडका बऱ्याच प्रमाणांत थंडावत गेला. तरी पण तो आपलें कर्तव्य विसरला नव्हता. कितीही चांगला असला तरी हा ब्राह्म - ही खूणगांठ मनाशीं बांधून तो स्वतःची उच्छृंखल वृत्ती टिकवून धरायचा प्रयत्न करीत होता. या लोकांचे हे शिष्टाचार कृत्रिम—अशाच प्रकारें भोळ्या माणसांना झुलवून हे लोक आपल्या गोटांत ओढायचा प्रयत्न करतात—अर्थात असल्या या शिकारी लोकांच्या समोर कोणत्याही प्रकारें आपल्या मनावरचा ताबा सुटूं देतां नये—कार्यावरची नजर ढळूं देतां नये—काय वाटेल तें करून यांच्या पकडींतून आपल्या मित्राला सोडवलें पाहिजे—हा एकच विचार त्याच्या मनांत घोळत होता.

कामाची गोष्ट काढायला त्यानें सुरवात केली. तो म्हणाला, “ महिम माझा बालपणापासूनचा मित्र. त्याच्यासारखा दुसरा कुणीही मित्र मला लाभला नाहीं. आपण अनुमती दिली तर त्याच्या बाबतींत एक दोन गोष्टी बोलेन म्हणतों. ”

थोडेसें हंसून ते वृद्ध गृहस्थ म्हणाले, “ खुशाल बोला. त्यांच्या तोंडून मी आपलं नांव ऐकलंय. ”

सुरेश म्हणाला, “ महिमच्या बरोबर आपल्या मुलीचं लग्न व्हायचं नक्की ठरलंय का ? ”

वृद्ध गृहस्थ म्हणाले, “ हो, एक प्रकारें नक्कीच झाल्यासारखं आहे म्हणायचं. ”

सुरेश म्हणाला, " महिम कांहीं आपल्यांतला नव्हे—ब्राह्मसमाजी नव्हे—तरीसुद्धां हा संबंध घडून येणार आहे का ? "

वृद्ध गृहस्थ यावर कांहीं बोलले नाहींत. सुरेश म्हणाला, " बरं—तें सध्यां राहूं . पण त्याची परिस्थिति कशी आहे, स्त्रीपुत्राचा प्रतिपाळ करण्याचं सामर्थ्य ाला आहे कीं नाहीं, खेड्यांतल्या हिंदू समाजाशीं विरोध आला असतां मोडक्या डक्या घरांत संसार थाटायला आपली मुलगी तयार आहे कीं नाहीं, तयार सली तर महिम कोणती योजना करणार आहे, या साऱ्या गोष्टींचा आपण विचार करून पाह्यलाय का ? "

म्हातारे केदार मुखर्जी एकदम सरळ होऊन उठून बसले. ते म्हणाले, " म्हणजे ! या सगळ्या भानगडी मी कधीं ऐकल्याच नाहींत. या बाबतींत महिम केव्हांही कांहींच कसा बोलला नाहीं ? "

सुरेश म्हणाला, " पण मी मात्र या साऱ्या गोष्टींचा चांगला विचार करून पाह्यलाय. माहिमला सांगून पाहिलं अन् आज या साऱ्या अप्रिय गोष्टींची चर्चा करण्यासाठींच मुद्दाम आपल्याकडे आलोंय. आपल्या मुलीच्या बाबतींत काय तें आपण ठरवावं. पण माझा जीवजान दोस्त ही जबाबदारी उचलतांना त्या भाराखालीं चेंगरून जाऊन जमीनदोस्त होईल—आणि मी केव्हांही तसं कांहीं घडूं णार नाहीं. "

गोरामोरा चेहरा करून केदारबाबू म्हणाले, " आपण म्हणतां काय सुरेशबाबू ?"

" बाबा ! "—एक सतरा अठरा वर्षांची मुलगी तितक्यांत आंत आली आणि आपल्या बापाजवळ एक अपरिचित तरुण गृहस्थ बसला आहे असें पाहून स्तब्ध होऊन थांबली.

" कोण ? अचला ? ये बाळ, ये बैस. लाजायचं काय मुली, हे आपल्या महिमचे मोठे दोस्त आहेत. "

ती मुलगी चारदोन पावलें पुढें आली आणि दोन्ही हात जोडून तिनें सुरेशला नमस्कार केला. सुरेशला दिसून आलें, कीं तिचा वर्ण सावळा असला तरी उजळ होता. आंगकाठी सडपातळ होती, नाक, तोंड गाल अन् जिवणी अगदीं रेखीव

होती. कपाळ प्रशस्त होतें—एकंदरींत तिच्या चेहऱ्याचा डौल मोठा सुंदर आणि नाजुक होता. डोळ्यांत स्थिरबुद्धीची चमक होती.

नमस्कार करून ती थोडेंसें अंतर ठेवून बसली. तिच्या चेहऱ्याकडे पाहातांच सुरेश एका निमिषार्धांत मुग्ध होऊन गेला.

तिचा बाप बोलूं लागला, " ही महिमची भानगड ऐकलीस मुली ? तो कां येत नाहीं म्हणून आम्हीं काळजीनं सुकून गेलों होतों. आतां हें ऐक. हे त्याचे परम-मित्र म्हणून तर एव्हढी तसदी घेऊन सांगायला आले—नाहींतर काय झालं असतं सांग ना ? तो एव्हढा विश्वास घातकी, एव्हढा मिथ्यावादी आहे हें कसं कळलं असतं ? खेड्यांत म्हणे त्याची एक तेव्हढी मोडकी तोडकी झोंपडी आहे स्वतःलाच जिथं जाड्या तांदळाचा भात सुद्धां मिळणं मुष्कील, तिथं तुला तो कसा पोसणार ? अंः भारीच भयंकर ! अशा माणसाच्या मनांतसुद्धां एव्हढं विष होतं अंः ! "

त्याचें भाषण ऐकून अचलेचा चेहरा गोरामोरा झाला— पण त्याचवेळीं सुरेशचा चेहरा देखील काळवंडून निघाला. दगडाच्या पुतळीसारखा एक शब्द सुद्धां न बोलतां तो त्या मुलीच्या तोंडाकडे पहात स्तब्धपणें बसून राहिला होता.

## ४

सुरेशला एकदां वाटलें, कीं आपण सांगितलेलें निष्ठूर सत्य अचलेच्या हृदयाला विशेष प्रकारें भेदून गेलें असावें. पण तिच्या बापानें मात्र तिकडे एव्हढें सुद्धां लक्ष दिलें नाहीं. इतकेंच नव्हे, तर उलट मुलीला इंगित करून तो बोलूं लागला, " सुरेशबाबू, आपण खऱ्या मित्राचं कर्तव्य बजावण्यासाठीं आलांत—चुकून सुद्धां आम्ही या बाबतींत अविश्वास दाखविणार नाहीं. अप्रिय असो कीं कठोर असो. हें खऱ्या प्रेमाचं लक्षण आहे. आजारी असलेल्या मुलाला आई ज्यावेळीं जेवूं देत नाहीं त्यावेळीं तें तिचं करणं कठोर नाहीं का वाटत ? तरीपण तें तिला करणं भागच असतं. खरं सांगतों सुरेशबाबू. महिम अशा रीतीनं आम्हांला फसवील असं मला स्वप्नांत सुद्धां वाटलं नसतं. सुमारें दोन वर्षांपूर्वी समाजांत त्याची माझी गांठ पडली. त्याच्या वागणुकीमुळें माझा लोभ जडला अन् मी स्वतः त्याला मानानं घरीं बोलावून आणून अचलेची नी त्याची ओळख

दिली. त्याचं बक्षीस त्यानं असं का द्यायचं ? उभ्या आयुष्यांत कुणी माझी अशी फसवणूक केली नव्हती !—" असें बोलून केदारबाबू अंतःकरणांतील आवेगाच्या भरांत उठून खोलींत येरझाऱ्या घालूं लागले.

सुरेश आणि अचला दोघेंही खालीं मान घालून मुकाट्यानें बसून राहिलीं होतीं. येरझारा घालीत असतांना एकदम मधेंच थांबून केदारबाबू आपल्या मुलीला उद्देशून म्हणाले, " नाहीं. अचला, पोरी, हें चालायचं नाहीं.—मुळींच चालायचं नाहीं. सुरेशबाबू, इतर गोष्टीपेक्षां कर्तव्याला जागून मित्रकार्य करण्यासाठीं जसे तुम्ही आलांत, तसाच मीही कर्तव्यावर नजर ठेवून पित्याचं काम बजावणार आहें. अचलेबरोबर महिमचा संबंध जितका दूरवर गेला आहे, त्याला अनुसरून पुरेसा पुरावा मिळाल्याशिवाय आमच्या घराचा दरवाजा त्याला बंद करणं योग्य व्हायचं नाहीं. म्हणूनच मी म्हणतों, पुरावा पाह्यजे. आपण तसं मनाला लावून घेऊं नका सुरेशबाबू ! तुमच्या शब्दावर मी विश्वास ठेवित नाहीं असं समजूं नका—पण हें माझं कर्तव्य आहे. कसं अचला ? कांहींतरी पुरावा हवा म्हणणं योग्य आहे कीं नाहीं ? "

दोघेंही तशींच मुकाट्यानें बसून राहिलीं होतीं. योग्य किंवा अयोग्य असें कोणतेंच मत त्यांनीं प्रदर्शित केलें नाहीं.

कांहीं वेळ वाट पाहून केदारबाबू म्हणाले, " हा पुरावा द्यायची जबाबदारी आपल्यावर आहे सुरेशबाबू. महिमची कौटुंबिक परिस्थिती कशी आहे हें कळणं तर दूरच राहो, कुठल्या गांवीं त्याचं घर आहे हें सुद्धां आम्हांला माहित नाहीं—"

बाहेर विकासबाबू आले आहेत असें नोकरानें येऊन सांगितलें. तें ऐकून केदारबाबू नाइलाजानें उठले. ते म्हणाले, " आज तर ते येणार नव्हते ! बरं, सांग त्यांना मी आलों म्हणून—" निघत असतांना फिरून थांबून ते म्हणाले, " पांच मिनिटं मला माफ करा सुरेशबाबू. या माणसाला निरोप देऊन येतों. आलाच आहे त्याअर्थीं टाळणं बरं नव्हे. अचला, पोरी, सुरेशबाबू म्हणजे माझे मोठे स्नेही आहेत असं समज बरं का. जें कांहीं तुला विचारायचं असेल तें विचारून घे. मीं हा आलोंच. " असें म्हणून ते खालीं निघून गेले.

त्यावेळीं एक क्षणभरच एकमेकांच्या डोळ्याला डोळा देऊन दोघांनींही माना खालीं घातल्या. सुरेश कांहीं वेळपर्यंत तसाच न बोलतां बसून राहिला होता. नंतर तो हळूच म्हणाला, " आम्ही दोघेही बाळपणापासूनचे मित्र, पण त्याच्या या वागणुकीमुळं आपणांसमोर मान खालीं घालायचा प्रसंग माझ्यावर आलाय. "

अचला शांतपणें म्हणाली, " त्यांच्यासाठीं आपल्याला कांहीं शरम वाटायला नको. "

सुरेश म्हणाला, " म्हणतां काय आपण ? असलं हें कपटी वर्तन—ही लबाड वागणूक पाहून देखील जर मला शरम वाटली नाहीं तर मी त्याचा मित्र कसला ? मला शरम वाटायची नाहीं तर वाटणार कुणाला ? त्याचवेळीं माझ्या ध्यानांत आलं पाह्यजे होतं, कीं ज्याअर्थीं माझ्यापासून सारं कांहीं तो लपवून ठेवीत होता त्याअर्थीं आंत कांहींतरी मोठीच गल्लत होती खास ! "

अचला म्हणाली, " आम्ही ब्राह्मसमाजी लोक - अन् आपण तर या आमच्या समाजांतल्या लोकांशीं कसलाच संबंध न ठेवणारे—म्हणूनच मला वाटतं, त्यांनी आपल्याकडे आमच्याबद्दल उल्लेख केला नसावा. "

तें तिचें भाषण सुरेशला आवडलें नाहीं. आपल्यासमोर अचला इतक्या निधडेपणानें महिमच्या दोषावर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करील असें त्याला वाटलें नव्हतें. अगदीं कोरडेपणानें त्यानें विचारलें, " महिमनंच आपल्याला असं सांगितलंय वाटतं ? "

अचला म्हणाली, " हो. तेच एकदां असं बोलले होते. "

सुरेश उद्गारला, " माझी खोड तुम्हांला कळवायला तो विसरला नाहीं म्हणायचा ! "

अचला उगीच थोडीशी हंसली आणि म्हणाली, " यांत खोड कसली आलीय ? साऱ्या माणसांच्या आवडीनिवडी कांहीं एकाच प्रकारच्या नसतात. आपला संबंध तोडून टाकून जे निघून गेले आहेत, त्यांच्याबद्दल आपलं मत बिघडलं असलं, तर मी कांहीं तो आपला दोष म्हणणार नाहीं. "

हें तिचें उत्तर सुरेशला आवडेल असेंच होतें. दुसऱ्या कुणाच्या तोंडून

दा. क्र. .............. नों दि ..............
वि. ..............

त्यानें तें ऐकलें असतें तर त्यानें उडीच मारली असती, पण या जपून बोलणाऱ्या तरुण ब्राह्म महिलेच्या तोंडून ब्राह्म समाजाबद्दल असलेल्या आपल्या या विरोधाचा उल्लेख ऐकून आज त्याला मुळींच आनंद झाला नाहीं.

वस्तुतः या साऱ्या मतभेदाची मीमांसा कळून घेण्यासाठीं कांहीं त्यानें बोलणें केलें नव्हतें. उलट महिमच्या तोंडून आपल्या बाकीच्या गुणदोषांचें विवरण तिच्या कानीं गेलें आहे कीं काय हेंच तिच्याकडून कळावें अशी त्याची इच्छा होती. त्याचा प्रच्छन्न उद्देश अचलेच्या ध्यानीं आला नसावा, म्हणूनच सरळ सरळ उत्तर देऊन ती स्वस्थ बसून राहिली.

सुरेश नाराज होऊन म्हणाला, "आपल्या लोकांच्या बाबतींत माझा सामाजिक विद्वेष आहे कीं नाहीं त्याची चर्चा महिम खुशाल करो ! पण त्याच्यावर माझा एव्हढासुद्धां राग नाहीं हें मी जें सांगतोंय त्याबद्दल मात्र आपण शंका घेऊं नका. त्या दिवशीं त्यानं माझ्याकडून खरी हकिकत छपवून ठेवली नसती तर मी सुद्धां त्याच्या कौटुंबिक परिस्थितीची छाननी इथं येऊन केली नसती."

सुरेशच्या डोळ्याला डोळा लावून अचला निश्चयात्मक वाणीनें म्हणाली. "पण ते केव्हांच खोटं बोलत नाहींत !"

आतां मात्र सुरेशला आश्चर्याचा धक्का बसला. एका स्त्रीच्या तोंडून अशा प्रकारें शांतपणें आणि निश्चयात्मक स्वरूपांत आपल्याला प्रत्युत्तर मिळेल असें त्याला कांहीं केल्या वाटलें नव्हतें. पण हा परिणाम एक क्षणभरच टिकला. उभ्या जन्मांत संयमानें वागायची संवय त्याला कधींच नव्हती. लगेच तो स्वतःला विसरून आडदांडपणें म्हणाला, "मला माफ करा. किती झालं तरी तो माझा बालमित्र आहे. आपल्यापेक्षां मी त्याला जास्त चांगला ओळखतों. इथं स्वतः संबंध जोडून घेऊन स्पष्टपणें कांहीं न सांगणं म्हणजे सत्यवादीपणा नव्हे."

अचला तितक्याच शांतपणें म्हणाली, "त्यानीं होऊन कांहीं हा संबंध घडवून आणलेला नाहीं !"

सुरेश म्हणाला, "आपले बाबा तर असंच म्हणाले! तें एक राहूंदे.

स्वतःची कठीण परिस्थिति आपल्यापासून लपवून ठेवणंःम्हणजेही कांहीं सत्यप्रियता नव्हे! दुसऱ्या कुणाकडे नाहीं तरी आपल्याकडे आपली स्त्रीपुत्रांचा प्रतिपाळ करण्याची अक्षमता त्यानं निष्कपटानं सांगून टाकली पाहिजे होती —"

यावर अचला कांहीं बोलला नाहीं. सुरेश तसाच बोलत होता. "आपण त्याच्या दोषांवर असं पांघरूण घालतांहा, पण आपणच सांगा, ही सारी हकिकत पूर्वींच कळली असती तर आपण त्याला असंच जवळ येऊं दिलं असतं का?"

अचला तशीच स्वस्थ बसून राहिली होती. तिच्याकडून कोणत्याच प्रकारें प्रत्युत्तर येत नाहीं असें पाहून अधिकच वर्दळीवर येऊन म्हणाला, "या कलकत्ता शहरांत आपल्याला घेऊन राहाणं आपल्याला शक्य नाहीं. तसंच आपला तसा उद्देशही नाहीं, असं त्यानं स्वतःच्या तोंडानं माझ्यासमोर कबूल केलंय. त्याच्या त्या कोंदट गांवढ्या गावांत पूर्णपणें विरोधी असलेल्या हिंदू समाजांत आपल्याला एका मोडक्या तोडक्या झोंपडींत बेछूट घेऊन वसवाट करायचं आपण ठरवलंय असं त्यानं आपल्याला सांगायला नको होतं का? एव्हढे हाल काढायची आपली तयारी आहे कीं नाहीं, हें विचारून घ्यायची त्याला जरूरीच का वाटली नाहीं?—" असें म्हणून त्यानें उत्तराच्या अपेक्षेनें तिच्या नजरेला नजर दिली तेव्हां अचला मान खालीं घालून विचारांत पडलेली असल्याचें त्याला दिसून आलें. कांहींच उत्तर न मिळाल्यामुळें सुरेशला वाटलें, कीं आपलें काम झालें. तो म्हणाला, "असं पाहा, आपल्याला मी आतां खरं खरं तें सांगतों. माझ्या मित्राला संकटांतून सोडयायचा संकल्प करूनच आज आलों होतों. तो पेचांत पडूं नये एव्हढाच काय तो माझा उद्देश होता. पण आतां मला वाटतंय, कीं त्याला वांचवण्यापेक्षां आपल्याला वांचवण्याची जबाबदारी माझ्यावर जास्त आलीय. कारण त्यानं संकट ओढवून घेतलंय तें आपखुषीनं—पण आपण उडी घेतांहा ती काळोखांत! आत्तांच आपल्या बाबांनी मला सांगितलं पुरावा आणून द्यायला. त्यावेळीं मला वाटलं होतं, कीं स्वतःच्या मित्राविरुद्ध काम करायचा भार आपण कसा घ्यावा? पण आतां मात्र मला वाटतंय, कीं हें काम मला केलंच पाहिजे. नाहीं केलं तर ती चूक होईल माझी."

अचला म्हणाली, “ पण त्यांना हें कळलं तर दुःख नाहीं का व्हायचं त्यांना ? ”

सुरेश म्हणाला, “ त्याला उपाय नाहीं. जो माणूस एखाद्या गुन्हेगारासारखा दुसऱ्याची अशी फसवणूक करतो तो माझा मित्र असला तरीही त्याच्या सुखदुःखाची पर्वा करायची मला जरुरी वाटत नाहीं. पण मोठं संकट आहे तें हेंच, कीं त्याच्या गावाचं नांवसुद्धां मला माहित नाहीं. तें कुठूनतरी कळलं तर उद्यां सकाळींच तिकडे जाऊन सारा पुरावा गोळा करून आणून आपल्या बाबांसमोर हजर करीन अन् मित्राच्या पापाचं प्रायश्चित् करीन. ”

अचला म्हणाली, “ एव्हढी तसदी कशाला घेतां आपण ? बाबांनाच सांगा ना. कुणातरी विश्वासू माणसाकडून तुम्हींच सारी खबर काढून आणा असं सांगा ना त्यांना. चोवीस परगण्यांतलं राजपूर गांव कांहीं फारसं दूर नाहीं. ”

सुरेश चकित होऊन म्हणाला, “ राजपूर ! म्हणजे गावाचं नांवसुद्धां आपल्याला माहित आहे वाटतं ? आणखी काय माहित आहे ? ”

अचला अगदीं सहजपणें म्हणाली, “ आपण जेवढं कांहीं सांगितलं तेव्हढंच मला माहित आहे. राजपूरच्या उत्तरपाड्यांत एक छोटंसं घर आहे त्यांचं. घराला तीनच खोल्या आहेत. बाहेर चंडिमंडप आहे. त्यांत गांवची शाळा भरते. ”

सुरेशनें विचारलें, “ अन् महिमची कौटुंबिक परिस्थिति ? ”

अचला म्हणाली, “ त्या बाबतींतही आपण जें सांगितलं तेंच कळलंय मला. थोडीबहुत जमीन आहे, तिच्या उत्पन्नावर कसाबसा उदर्निर्वाह होईल एव्हढंच ! ”

सुरेश म्हणाला, “ तर मग आपल्याला सारं कांहीं माहित आहे म्हणायचं ! ”

अचला म्हणाली, “ माहित आहे तें एव्हढंच. कारण एक दिवशीं मी एव्हढंच त्यांना विचारलं होतं. अन् ते केव्हांही खोटं बोलत नाहींत हें आपण जाणतांच ! ”

सुरेशचा चेहरा काळवंडून गेला. तो म्हणाला, “ आपण सारं कांहीं जाणतां त्याअर्थीं आपल्याला सावध करावं म्हणून मी जो आलों तो फुकटच म्हणायचा !

आतां कळलं, आपल्याला फसवायचं नव्हतं त्याला ! ”

अचला म्हणाली, मला थोडंबहुत माहित आहे खरं, पण आपण जे आलां होतां तें कांहीं मला सांगण्यासाठीं नव्हे—ज्यांना सांगायला आलां होतां त्यांना अजून कांहींच माहित नाहीं ! पण तुम्हीं सांगत असाल तर मला जेव्हढं कांहीं माहित आहे तेव्हढं मी बाबांना सांगेन. ”

उदासवाणा होऊन सुरेश म्हणाला, “ आपल्याला वाटेल तसं करा. पण आतां मला मात्र महिमकडे जाऊन सारी हकिकत सांगून त्यांची क्षमा मागितल्याशिवाय समाधान वाटायचं नाहीं. ”

अचलेनें विचारलें, “ तसं कांहीं करायची जरुरीच आहे का ? ”

सुरेश पुन्हां उसळून उठला आणि म्हणाला, जरूरी नाहीं कशी ? नकळत कां होईना, पण आज मी त्याच्यावर जे हे खोटे दोषारोप केले तो माझ्याकरवीं केव्हढा मोठा गुन्हा घडलाय त्याची कल्पना येत नाहीं का आपल्याला ? त्याला खोटा, लबाड, लुच्चा म्हणायचं देखील मी ठेवलं नाहीं. या साऱ्या गोष्टी त्याच्या-समोर कबूल केल्याशिवाय कसं समाधान वाटेल मला ? ”

क्षणभर स्वस्थ राहून अचला शांतपणें म्हणाली, “ यावर मी म्हणतें, कीं असं कांहींच करायला नको सुरेशबाबू. मनांतल्यामनांत क्षमा मागण्यापेक्षां उघडउघड क्षमा मागणं हें साऱ्याच वेळीं सर्व दृष्टीनं सार्थ ठरतं असं कांहीं मला वाटत नाहीं. त्यांना हें कळलं तर दुःख होईल असं जर आपल्याला पटलंय तर उघड करून सांगण्यांत काय फायदा ? ही आजची आपली हकिगत त्यांना सांगू नये म्हणून मी बाबांनाही बाजावून ठेवीन. ”

सुरेश म्हणाला, “ बरं आहे !—” क्षणभर अचलेल्या तोंडाकडे मुकाट्यानें पाहून घेऊन तो म्हणाला, “ कोणत्याही कारणानं महिमला एव्हढंसुद्धां वाईट वाटूं नये म्हणून आपण खबरदारी घेतां एव्हढी गोष्ट मात्र माझ्या चांगलीच लक्षांत आली. ठीक आहे. होऊन जाऊं द्या. मी कांहींच बोलत नाहीं त्याच्याकडे. आज त्याच्याबद्दल मला जें कांहीं वाटतंय तें सुद्धां आतां मी बोलून दाखवणार नाहीं. पण एक गोष्ट विचारल्याशिवाय मात्र मला आपला निरोप घेतां यायचा नाहीं. ”

स्निग्ध दृष्टीनें त्याच्याकडे पहात अचला म्हणाली, " ठीक आहे, विचारा. "

सुरेश म्हणाला, " त्याची क्षमा मागायची नाहीं हें तर एक ठरलंच. पण आपली मात्र क्षमा मागतों. मला क्षमा करा. " असें म्हणून त्यानें दोन्ही हात जोडले.

" छे ! छे ! काय करतां हें ? " असें म्हणून अचलेनें पहातां पहातां त्याचे दोन्ही हात धरले आणि तितक्याच झटकन सोडून दिले. ती म्हणाली, " हें काय विलक्षण बोलतांहां आपण ! "

बोलतां बोलतां तिचा चेहरा लाजेनें लालीलाल होऊन गेला.

सुरेशच्या सर्वांगावर थरारून रोमांच उभे राहिले. तिच्या हाताचा तो विलक्षण स्पर्श, सलज्ज मुद्रेवरची ती असामान्य छटा दिसून येतांच त्याचक्षणीं तो बेभान होऊन गेला. खालीं मान घालून बसलेल्या अचलेच्या चेहऱ्याकडे स्तब्धपणें कांहीं वेळ तो पहात राहिला होता. शेवटीं मनाचा हिय्या करून तो म्हणाला, " नाहीं, त्यांत कांहीं चुकलं नाहीं. माझ्याकरवीं होणाऱ्या हजारों चुकांत कांहीं बिनचुक झालं असेल तर तें हेंच. आपण क्षमा केली असं म्हटलं कीं माझ्या मनांतलं सारं किल्मिष धुवून पुसून नाहींसं होईल. "

अचला काकुळतीला येऊन म्हणाली, " आपण असं कांहीं बोलूं नका. ज्यांना दोन वेळ आपण मृत्यूच्या दाढेंतून सोडवलं—"

" हेंही सांगितलं का त्यानं ? "

" हो ! आपल्यासारखा जिवाभावाचा दुसरा कुठला मित्र आहे त्यांना ? "

" नाहीं.—मला वाटतं, आपल्याखेरीज दुसरा कुणी नाहीं. आणि म्हणूनच आम्ही दोघेही—"

अचलेच्या चेहऱ्यावर पुन्हां एकदां लालीची छटा झळकून गेली. ती म्हणाली, " हो मित्रच आपण त्यांना मरणाच्या वाटेवरून परत फिरवलंय म्हणूनच त्यांच्या बाबतींत आपण कसेही वागलां तरी मला तें चुकीचं वाटायचं नाहीं. आपण मनाला कांहीं लावून घेऊं नका, कीं संकोच शरमही वाटूं देऊं नका. क्षमा केली असा शब्द उच्चारला म्हणजे जर आपल्याला समाधान वाटत असेल तर मी

तसंही म्हटलं असतं. पण ते शब्द माझ्या जिभेवर अडकताहेत. ”

“—ठीक आहे ! जरूर नाहीं ! ” असें म्हणून सुरेश उभा राहिला आणि म्हणाला, “ आपल्या बाबांची भेट झाली नाहीं. ते गर्दींत आहेत वाटतं. पुन्हां केव्हांतरी महिमबरोबर येईन देखील. नमस्कार ! ”

अचला थोडीशी हंसली आणि म्हणाली, “ नमस्कार. पण त्यांच्याच बरोबर आलं पाह्यजे असंच कांहीं नाहीं. ”

“ खरं म्हणतां ? ”

“ अगदीं खरं म्हणतें. ”

“ मोठं भाग्य आहे माझं ! ” असें म्हणून सुरेश पुन्हां एकदां नमस्कार करून बाहेर निघून गेला.

## ५

सुरेश बाहेर आला त्यावेळीं नशा चढल्याप्रमाणें त्याचा देह आणि मन हीं दोन्हीही डळमळत होतीं. आकाशांतला उन्हाचा तडाखा ओसरत आला होता. गाडी रिकामीच पाठवून देऊन तो पायींपायींच जायला निघाला. कलकत्त्यांतल्या बेसुमार गर्दींतल्या राजरस्त्यांत घुसून पूर्णपणें मग्न होऊन आल्या परिस्थितीचा विचार करावा अशी त्याची इच्छा होती.

अचलेचा चेहरा, अंगयष्टी, सारें कांही आरंभापासून शेवटपर्यंत जेव्हां तो पुन्हां पुन्हां आठवून पाहूं लागला त्यावेळीं तिच्यासमोर आपण अगदींच क्षुल्लक ठरतों असें त्याला वाटूं लागलें.

तिच्या चेहऱ्यावर सौंदर्याचें अलौकिकत्त्व नव्हतें. बोलण्यांत आणि चाल-चलणुकींत ज्ञानाची किंवा विद्वत्तेची असामान्य अशी झळक कुठेंच दिसून येत नव्हती. तरीही यापूर्वी आपल्या नजरेला कधींही आली नाहीं अशी एक विलक्षण व्यक्ती आज आपण पाहून आलों, एव्हढा एकच विचार त्याच्या मनांत येत होता. वाटेनें चालत असतांना प्रत्येक क्षणाला हा एकच प्रश्न त्याच्यासमोर उभा राहात होता,—हें आश्चर्य वाटलें तें कशामुळें ? आज आपल्या मनावर एव्हढा थक्क होण्याजोगा परिणाम झाला ?

जिला पाहिल्यामुळें आपल्या ठिकाणीं क्षुद्रत्वाची भावना उत्पन्न होऊन

अंतःकरणांत एक प्रकारच्या अपरिज्ञात सार्थकतेचा प्रादुर्भाव झाला आहे असें कोणतें वैशिष्ठ्य या तरुणीच्या ठायीं आज दिसून आलें ? या स्त्रीबद्दल कोणत्याही प्रकारचा खराखरा परिचय अजूनही आपल्याला झालेला नाहीं, तरीही तिचा दर्जा केव्हढा मोठा, ती किती श्रेष्ठ, तिचा लाभ होणें म्हणजे कुणाही पुरुषाला कसें भाग्याचें वाटेल, ही कल्पना एकवारही आपल्या मनांत उत्पन्न कां झाली नाहीं ?

विचार करतां करतां चटकन एका क्षणाला त्याच्या विचारसरणीवर योग्य जागीं आघात झाला. त्याला वाटलें, शिक्षण, ज्ञान आणि वयाच्या दृष्टीनें ही स्त्री आपल्यापेक्षां लहान असली तरीही घटकाभऱ्याच्या संभाषणांत तिनें आपल्याला जें पराजित केलें तें केवळ तिच्या असाधारण संयमाच्या बळामुळेंच. त्याचमुळें ती शांत असूनही इतकी दृढनिश्चयी, इतकें कळत असूनही इतकी अबोल !

महिमच्या बाबतींत तो जेव्हां स्वतः मोठेपणाचा आव आणून सारखा बडबडत होता त्यावेळीं ही स्त्री खालीं मान घालून ऐकत होती, सहन करीत होती, पण एक क्षणभर सुद्धां तिचें मन त्यामुळें चळलें नाहीं, तिनें वितंडवाद घातला नाहीं कीं कोणत्याही प्रकारची चर्चा करून स्वतःकडे कमीपणा घेतला नाहीं. प्रत्येक क्षणाला ती मन मारून बसली होती, अंग चोरून राहिली होती, तरीही तिला साऱ्या गोष्टी माहित होत्या. महिमवर तिचें किती प्रेम होतें तें तिनें कळूं दिलें नव्हतें खरें, पण त्याच्यावर तिची जी श्रद्धा होती ती यत्किंचितही कमी झाली नव्हती हें मात्र तिनें अगदीं संक्षेपानें जाणवून दिलें.

हि विद्या ती महिमकडून शिकली आणि तीही चांगल्या प्रकारें शिकली आहे, हें तो पुन्हां पुन्हां स्वतःला जाणवून घेऊं लागला. लहानपणापासून संयमाची आपल्या ठिकाणीं उणीव आहे याची जाणीव असल्यामुळें, दुसऱ्याच्या ठिकाणीं या वृत्तीचें प्राचुर्य असल्याचें दिसून येतांच त्याच्या सुशिक्षित आणि सभ्य अंतःकरणांत आपोआप गौरवाची भावना उत्पन्न झाली आणि त्यापुढें मान झुकवण्यांत त्याला धन्यता वाटूं लागली.

अनेक रस्ते, गल्ल्या फिरतां फिरतां सुरेश थकला आणि संध्याकाळ झाल्यावर घरीं आला. आंत शिरून पाहातो तों महिम डोळ्यावर हात घेऊन एका कोचावर पडून राहिलेला आहे असें दिसून येतांच तो चकित झाला. तो आलेला पाहातांच महिम उठून बसला आणि म्हणाला, " ये सुरेश. "

" अरेच्या ! तूं ! " असें म्हणून सुरेश एक बैठक ओढून घेऊन बसला.

महिम असाच केव्हांतरी येत असे. अर्थात् तो आला म्हणजे सुरेश देखील त्याचें स्वागत थोड्याशा अधिक प्रमाणांतच करीत असे. आज मात्र त्याच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाहीं हें पाहून महिमला आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, " मी इथं परत आलों आणि कळलं, कीं तूं बाहेर गेलायस. तेव्हां म्हटलं – "

" कीं एकदां भेट देण्याची कृपा करावी. असंच ना ? किती दिवसांनी आलास तें आठवतं का ? "

महिम हंसून म्हणाला, " हो आठवतं. पण वेळच झाला नाहीं–" बोलतांना त्याची नजर सुरेशच्या चेहऱ्याकडे गेली. गॅसच्या प्रकाशांत त्याची मुद्रा जितकी कठोर तितकीच उदासवाणी झाल्याचें दिसून आल्यामुळें त्याला खूष करण्याच्या उद्देशानें तो मोठ्या प्रेमळपणानें म्हणाला, " तुला राग येणं साहजिक आहे. मी हजार वेळ कबूल करतों — पण खरोखरच मला वेळ झाला नाहीं. आजकाल अभ्यासावर जोर द्यावा लागतो आहे शिवाय सकाळ संध्याकाळ एकदोन शिकवण्याही आहेत—"

" पुन्हां शिकवण्या पत्करल्यायस वाटतं ? "

सरळ उत्तर द्यायचें टाळून महिमनेंच उलट त्याला विचारलें, " माझा तपास करीत होतास, तो काय तसंच जरुरीचं काम होतं म्हणून का ? "

सुरेश म्हणाला. " हो. आज तूं आला नसतास तर उद्यां मी पुन्हां येणारच होतों तुझ्याकडे. "

कारण कळावें म्हणून महिम जिज्ञासू मुद्रेनें त्याच्याकडे पाहात राहिला. सुरेश बराच वेळपर्यंत त्याच्या पायांतल्या जोड्याकडे पाहात राहिला होता. तो म्हणाला, " अलीकडे तूं केदारबाबूंच्या घरीं गेला नव्हतास वाटतं ? "

महिम म्हणाला, " नाहीं. "

" कां गेला नाहींस ? माझ्यामुळं ? ठीक आहे. तें माझं वचन मी मागं घेतों. आतां तूं खुशाल जा तिकडे. "

महिम हंसला आणि म्हणाला, " तिकडे जाणार नाहीं म्हणून प्रतिज्ञा केल्याचं कांहीं मला आठवत नाहीं. "

सुरेश म्हणाला, " नाहीं ना ? ठीक आहे. तरी पण माझ्यामुळं अडचण बाधत असेल तर माझ्यातर्फे मी तुझी सोडवणूक करतों. "

" हा अनुग्रह कीं निग्रह सुरेश ? "

" तुला काय वाटतं महिम ? "

" सदोदित जें वाटतं तेंच. "

सुरेश म्हणाला, " म्हणजे माझी लहर—असंच ना ? ठीक आहे. तुला वाटेल तो समज करून घे. त्याला माझी हरकत नाहीं. मात्र मी जी तुला मनाई केली होती ती आज मागं घेतों. "

" पण त्याचं कारण मी विचारूं का ? "

" तूं विचारलंस म्हणून उत्तर द्यायला माझ्या लहरीला कारण कसलं ? "

महिम क्षणभर थांबून गंभीर होऊन म्हणाला, " पण सुरेश, तुझ्या लहरी-सरशीं सारं जग अडून रहावं किंवा चालू व्हावं असं म्हटलंस तर तें ठीक होईल खरं, पण असं होत नाहीं हें तितकंच खरं. जिथं तुझा विरोध नसेल तिथं कदाचित् माझाच विरोध असेल. "

" म्हणजे काय ? "

" म्हणजे हेंच, – तूं त्या दिवशीं ब्राह्म महिलांच्या बाबतींत जें काहीं बोललास त्याच्यावर मी विचार करीत होतों. तसंच त्या दिवशीं एक महिन्याच्या आंत दुसरं स्थळ पाहून ठरवून टाकतों असंही म्हणाला होतास,—तें बोलला होतास तेंही बरं केलं होतंस,—त्याचं काय झालं पुढं ? "

सुरेशनें वर नजर करून पाहिलें. गंभीरपणाच्या पडद्याआडून महिम आपली टिंगल करतो आहे असें त्याला वाटलें. तोही गंभीर होऊन म्हणाला. " मी विचार करून पाह्यला महिम, लग्न जुळवायचा हा धंदा माझा नव्हे -- "

नंतर तो हंसून म्हणाला, " आतां थट्टा राहूं दे. इतके दिवस माझा शब्द राखलास त्याबद्दल तुला हजार धन्यवाद. पण आतां ज्याअर्थी माझा हुकूम सुटलाय त्याअर्थी उद्यां सकाळीं एक वेळ तिकडे जाशील ना ? "

" नाहीं उद्यां सकाळीं मी घरीं जातोंय. "

" केव्हां येणार आहेस ? "

" दहापंधरा दिवस लागतील—कदाचित महिनाभर देखील लागेल. "

सुरेशनें एकदम पुढें झुकून महिमचा उजवा हात आपल्या हातीं धरून म्हटलें, " यापुढं असा अतिप्रसंग करूं नकोस महिम. उद्यां एकदां जाच तिकडे. ते लोक कदाचित् तुझी वाट पहात असतील—" बोलत असतांना त्याचा आवाज कांपरा झाला होता.

महिमच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. सुरेशची ही आकस्मिक उत्कंठा, कांपरा आवाज, काकुळतीची विनवणी आणि विशेषेंकरून ब्राह्म महिलेबद्दल सन्मानपूर्वक केलेला उल्लेख ऐकून त्याचा जीव कळवळून आला. कांहीं वेळ आपल्या मित्राच्या तोंडाकडे एकसारखी नजर लावून पाहून घेतल्यावर त्यानं विचारलें, " कोण माझी वाट बघतंय सुरेश ? केदारबाबूंची मुलगी ? "

सुरेश स्वतःचें मन सावरून घेऊन म्हणाला, " कदाचित तीच वाट पहात असेल ! "

पुन्हां महिम कांहीं वेळ सुरेशच्या तोंडाकडे पाहात राहिला. या मधल्या मुदतींत सुरेश बोलल्याशिवाय एका ब्राह्मणाच्या घरीं जाऊन आपली ओळख करून देऊन येईल, हा संशय सुद्धां त्याच्या मनांत आला नाहीं. कांहीं वेळ उगीच बसून नंतर तो म्हणाला, " नाहीं सुरेश, मी हरलों. तुझी आजची लहर अंदाजणं माझ्या शक्तीपलीकडचं आहे. ब्राह्म मुलगी वाट पाहात बसली असेल, असे उद्गार तुझ्या तोंडून निघणं माझ्या दृष्टीनं तरी अशक्य. "

सुरेश म्हणाला, " ठीक आहे. केव्हांतरी एकदां या गोष्टीचा उलगडा करीन. पण आधीं तूं सांग, उद्यां सकाळीं भेटायला जाणार आहेस ना ? "

" नाहीं. उद्यां जाणं तर अशक्यच. उद्यां सकाळच्या गाडीनं मला गेलं पाहिजे. "

" दहा पांच मिनिटांसाठीं सुद्धां नाहीं जातां यायचं ? "

" नाहीं, तेंही शक्य नाहीं. पण तुला आज झालं आहे तरी काय तें सांगशील ? "

" सांगेन असंच केव्हांतरी. आज नाहीं. बरं, मी जाऊन तुझी खबर देऊन येऊं का ? "

महिमला अधिकच आश्चर्य वाटलें. तो म्हणाला, " हो, पण एव्हढी कांहीं त्याची जरूरी नाहीं. "

सुरेश म्हणाला, " जरूरी नसेल –जरूरी म्हणजेच कांहीं सारं नव्हे ! मी नांव सांगितलं तर ओळखतील ? "

" एकजण तरी निश्चित ओळखील. "

सुरेश म्हणाला, " तेवढं झालं तरी बस्स्. तुझा मित्र म्हणून ओळखतील ना मला ? "

महिम म्हणाला, " हो. "

थोडेसें हंसण्याचा प्रयत्न करीत सुरेश म्हणाला, " अन् ओळखतील--तो तुझा एक भयंकर ब्राह्मद्वेषी हिंदू मित्र म्हणून होय ना ? "

महिम म्हणाला, " पण ती तर तुझी अभिमानाची मुख्य बाब आहे. "

सुरेश म्हणाला, " तें खरं आहे —" असें म्हणून कांहीं वेळ तो जमिनीकडे नजर लावून पहात राहिला. एकदम उठून तो म्हणाला, " आज मला फार झोंप येतेय. मी चाल्लों झोंपायला ! " असें म्हणून तो विचुकपणें बाहेर निघून गेला.

## ६

सुरेशला मनांतल्यामनांत निश्चितपणें वाटत होतें, की महिमनें ती गोष्ट कशीही उडवून दिली असली तरी, तो आपण केलेली विनंती हिशेबांत न घेतां इतक्या दिवसांत अचलेला मुळीं भेटलाच नसावा. ते दोघेही एकमेकांचे दोस्त होते खरे पण हा वेळपर्यंत महिमनें एका ब्राह्म मुलीसमोर आपल्या बालमित्राची बदनामी केली नसेल असें सुरेशला जर कुणी सांगितलें असतें तर त्याची छाती अभिमानानें दहा हात फुलून निघाली असती. आज मात्र एकांतांत या गोष्टीवर

विचार करीत असतांना त्याला एव्हढा सुद्धां आनंद झाला नाहीं. एकच गोष्ट त्याच्या मनांत येत होती,—केव्हांना केव्हां तरी गप्पागोष्टी करतांना किंवा थट्टा-मस्करी करतांना सारी हकिगत विकृत स्वरूपांत अचलेच्या कानीं जाईल आणि त्यावेळीं सुखाच्या क्षणांत रुळत असतांना तिला आपल्या नवऱ्याच्या या नादान मित्राच्या निष्फळ मत्सराचें इंगित शोधूनही सांपडणार नाहीं—इतकेंच नव्हे तर ती मितभाषणी असल्यामुळें सहज थट्टेनें म्हणून सुद्धां या बाबतींत त्याला कांहीं विचारणार सुद्धां नाहीं. कदाचित—मनांतल्यामनांत हंसून ती म्हणेल, दोस्तीच्या फाजील अभिमानामुळें या माणसानें काय निष्कारण उलाढाल केली ही ! उगीच जिवाला त्रास करून घेऊन कशाला जळून पिंचून मरतो आहे हा ?

सारी रात्र त्याला चांगलीशी झोंप लागली नाहीं. जेव्हां जेव्हां तो जागा होई तेव्हां तेव्हां ही एकच काळजी त्याच्या मनाला डांचून राही. आणि त्याचें मन म्हणे,—दुसऱ्याच्यासाठीं एव्हढी डोकेंफोड करून घेण्याचा हा तुझा रोग कधीं बरा होणार आहे सुरेश ?

सकाळीं तो उठला त्यावेळीं दुसऱ्या कोणत्याच गोष्टीकडे त्याचें मन लागेना. दिवस वर येतांच गाडी करून तो तडक केदारबाबूंच्या घरीं येऊन पोंचला. नोकरानें सांगितलें, कीं कांहीं कामासाठीं बाबू अलिपूरच्या अदालतींत गेले आहेत, यायला निदान तीनचार तास तरी लागतील.

निघतां निघतां सुरेशनें विचारलें, “ दोघेंही गेलीं आहेत का ? ”

नोकराला त्या प्रश्नाचा अर्थ कळला नाहीं. तो मान हालवून म्हणाला, “ तें मला माहित नाहीं बाबू. ”

सुरेशला पेंच पडला. घरधनी घरीं नसतांना त्याच्या तरुण मुलीच्या बाबतींत कोणताही प्रश्न करणें, हें ब्राह्म कुटुंबाच्या शिरस्त्याला साजेसें आहे कीं नाहीं याचा त्याला अंदाज येईना. आणि त्याला भेटायचें होतें तें त्या मुलीला. थोडावेळ विचार करून तो म्हणाला, “ तुझ्या बाबूंना परत यायला कदाचित फार वेळ लागणार नाहीं. मी घटकाभर वाट पाहतों. ”

नोकरानें सुरेशला बैठकघरांत आणून बसवलें आणि म्हटलें, “ ताईसाहेब घरांत आहेत, त्यांना खबर देऊं का ? ”

उत्तरासाठीं वाट पाहात तो थांबला होता. अचला या गृहस्थासमोर येऊन बाहेर बसते हें काल त्यानें पाहिलें होतें. मनांत येणारी उत्कंठा शक्य तितकी दाबण्याचा प्रयत्न करीत सुरेश निस्पृहपणें म्हणाला, "त्यांना खबर द्यायची म्हणतोस ? बरं बरं, दे. ते येईपर्यंत त्यांच्याचबरोबर बोलत बसेन क्षणभर."

नोकर निघून गेला आणि थोड्याच वेळांत अचला मागल्या दरवाजाचा पडदा सरकवून आंत आली, तेव्हां सुरेश एकदम उठून उभा राहून म्हणाला, "महिम तर आपल्या गांवीं निघून गेला. तुम्हांला येऊन भेटण्यासाठीं मी त्याला इतक्या काकुळतीनं विनवलं, पण त्यानं कांहीं कानीं घेतलं नाहीं. असं काय घडलं—"

अचलेचा चेहरा एकदम पांढराफटक पडला—तरीही नमस्कार करून ती एक खुर्ची ओढून घेऊन बसली आणि शांतपणें म्हणाली, "गांवीं जाणं तितकंच जरूरीचं असेल कदाचित्. तिकडे कुणी आजारी बिजारी तर नाहीं ?"

तिनें नमस्कार केलेला पाहातांच सुरेश ओशाळला. त्यानेंहि तिला नमस्कार केला. आपण निष्कारण दाखविलेल्या उतावीळपणाशीं अचलेच्या शांत आणि गंभीर शब्दांची त्यानें तुलना करून पाहिली त्यावेळीं त्याचा जीव अगदींच शरमिंदा होऊन गेला. आवाज शक्य तितका सहज आणि स्वाभाविक करून घेऊन तो म्हणाला, "जरूरी कितीहि असो—निदान दोन मिनिटं तुम्हांला भेटून निरोप घेऊन जायला येत नव्हतं का त्याला ? आणि केव्हां येणार आहे परत त्याचाहि ठावठिकाणा नाहीं ! आणि तुम्हींच सांगा, कुणाच्या आजाराच्या काळजीसाठीं जातो म्हणावं तर दुसरं आहे कोण त्याच्या घरीं ? मी मेलों असतों तरी अशा प्रकारें निघून गेलों नसतों."

अचलेच्या मुद्रेवरून सलज्ज हंसण्याची नाजुकशी छटा झळकून गेली. ती म्हणाली, आपलं तसं कुणी नाहीं म्हणून आपण हें असं म्हणतां. पण तसं कुणी असतं तर अगदीं त्यांच्याचप्रमाणें असेच निघून गेलां असतां—अगदीं खात्री आहे माझी."

खुर्चीच्या हातावर जोरानें थाप मारून सुरेश म्हणाला, "मुळींच नाहीं.



अनुक्रम २८९८८
विभाग [illegible]

आपण मला ओळखत नाहीं म्हणून असं बोलतांहां. नीट ओळख पटली असती तर असं बोललां नसतां."

अचला म्हणाली, "बरं बरं. यापुढं आतां ओळख पटवून घ्यायचा प्रयत्न करीन! अन् तसं कुणी असलं तर कळेलही मला, असंच ना?"

सुरेश म्हणाला, "अर्थात्. शिवाय असं पहा, महिमसारखा मी आपल्या मित्रांपासून कोणतीही गोष्ट छपवून ठेवीत नाहीं—तशी छपवणं मला योग्य वाटत नाहीं—" असें म्हणून तो एकदम उत्तेजित होऊन म्हणाला, "आपण म्हणतांहां, कुणी तसं असलं तर कळेल म्हणून—पण मी सांगतों, कीं आपल्याला न कळवतां, आपली संमति न घेतां, असलं कांहीं घडायचंच नाहीं मुळीं. मी आपल्याला महिमपासून वेगळं करून पाहूंच शकत नाहीं मुळीं. माझ्या लेखीं तुम्ही दोघेही अभिन्न आहां."

अचला क्षणभर लाजली आणि हंसत हंसत म्हणाली, "बरं बरं. त्यावेळचं त्यावेळीं पाहूं. पण आपली ही कसोटी लागायची सुसंधी येईपर्यंत मी आपल्या मित्राला दोषी ठरवणार नाहीं सुरेशबाबू."

सुरेश एकदम गंभीर होऊन म्हणाला, "जशी आपली मर्जी. पण माझी कसोटी लागायची ती सुसंधी या जन्मीं येईल कीं नाहीं याचीच शंका आहे मला. सध्यां तें राहूं दे. आज इतक्या लवकर मी आपल्याकडे कां आलोंय माहित आहे? काल सारी रात्र मला झोंप लागली नाहीं—आज आलों नसतों तर आजही रात्रभर तळमळावं लागलं असतं. माझ्या हातून अनेक अपराध घडले आहेत—त्याबद्दल आज एकेकाचा हिशेब करून मी कबुली देणार आहें. म्हणूनच आलोंय मी."

त्याच्या बेफाट विरोधी वृत्तीचा अचलेला परिचय होता. म्हणूनच साशंकपणें ती उगीच बसून राहिली. सुरेश बोलत होता, "—काल संध्याकाळीं घरीं गेलों अन् पहातों तों महिम तिथें बसला होता. म्हटलं, बरं झालं. आपल्याला बहुधा माहित आहेच—ब्राह्म लोक माझ्या दृष्टीनं—अर्थात् तें असं आहे, ब्राह्म समाजाच्या बाबतींत माझं मन तितकंसं चांगलं नाहीं."

अचला मान हालवून म्हणाली, "हो, तें मला माहित आहे."

सुरेश तसाच बोलत होता, "—माहित असणारच. पण आपण हेंही विसरूं नका, कीं त्यावेळीं आपली माझी गांठ पडली नव्हती. त्यावेळीं, निदान एक महिनाभर महिमनं इथं येऊं नये असं मी त्याच्याकडून वचन घेतलं होतं. कां तें माहीत आहे ?"

अचला पुन्हां मान हालवून म्हणाली, "नाहीं. तरी पण मला वाटतं, आपल्याला वाटलं असेल कीं कोणतीही गोष्ट विसरायला पुरुष माणसाला एक महिना पुरेसा होतो म्हणून. त्यापेक्षां जास्त वेळ लागणं योग्य नव्हे."

तिनें मारलेला हा फटका सहन करून सुरेश म्हणाला, "मी मूळचाच बेअकली आहे. कदाचित् असंच कांहीं वाटलं असेल मला. त्याशिवाय आणखी एक जबरदस्त कट मी आपल्या विरोधापायीं केला होता. या एक महिन्याच्या मुदतींत चांगलंसं स्थळ पाहून महिमचं लग्न करून टाकायचं अशी मी शपथ घेतली होती. कांहींना कांहीं तरी करून त्याला अडकवून ठेवायचं एव्हढंच. माझ्या एका मित्रानं एका स्त्रीच्या मोहांत सांपडून आपला समाज टाकून बाहेर जाऊं नये एव्हढीच माझी इच्छा होती."

अटकलेला श्वास सोडून अचला म्हणाली, "बरं मग पुढं ?"

तिच्या पांढऱ्याफटक पडलेल्या चेहऱ्याकडे पाहून सुरेश थोडासा हंसला आणि म्हणाला, "आतां पुढं कांहीं भीति नाहीं. तो तसला पापी विचार मी आतां सोडून दिलाय. तीच कबुली देऊन जायला मी आलोंय. जायच्या पूर्वी आपल्याला भेटून जा असं मी त्याला परोपरीनं सांगितलं. पूर्वी जाऊं नको म्हटलं, तेव्हां त्यानं माझं ऐकलं होतं – पण काल जा म्हटलं तें मात्र ऐकलें नाहीं त्यानं. आपली भेट घेतल्याशिवाय काल तो कलकत्ता सोडून निघून गेला."

अचलेनें विचारलें, "जायचं कांहीं कारण सांगितलं का ?"

सुरेश म्हणाला, "नाहीं. 'जरूरीचं काम आहे' एव्हढंच !"

आणखी एक सुस्कारा सोडून अचला आपल्याशींच पुटपुटली, "जरूरी ! जरूरी ! केव्हांही पहा, त्यांच्या तोंडी हाच शब्द. सदासर्वदा या जरूरींतच गुंतून पडलेले !"

सुरेश म्हणाला, "एक पत्र लिहून तरी आपल्याला कळवायचं."

अचला हळूच म्हणाली, “ नाहीं. ते कधींच पत्र लिहीत नाहींत. ”

सुरेश क्षणभर खालीं पाहात उगी राहिला आणि नंतर वर नजर करून म्हणाला, “ जरूरी कसली तेंही सांगत नाहीं. त्याचं सुखदुःख, बरंवाईट सारं कांहीं त्याचं त्याच्यापुरतं. अगदींच स्वार्थी. कुणाला कोणत्याच बाबतींत वाटेकरी करीत नाहीं. याचपायीं लहानपणापासून त्यानं किती त्रास दिलाय मला त्याला सीमाच नाहीं. अगदीं निर्दय ! दिवसामागून दिवस उपास करी—त्यावेळीं मला माझं खाणं जेवण विषवत् होऊन जाई, पण माझ्याकडे पाहून देखील माझ्या-कडचं कांहीं सुद्धां घेतलं नाहीं त्यानं. मला भीति वाटते ती हीच, कीं ज्या या दगडानं मला कधीं सुख लागूं दिलं नाहीं त्याच्यापायीं आपल्याला तरी सुख मिळेल कीं नाहीं कोण जाणें ! ” बोलतां बोलतां एकाएकीं त्याचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले. चटकन डोळे पुसून घेऊन बळेंच हंसायचा प्रयत्न करीत तो म्हणाला, “ असं पहा, बाहेरून दिसायला मी मोठा तगडा दिसतों, पण आंतून अगदींच दुबळा आहें. महिम मात्र याच्या अगदीं उलट. तरीपण आम्हां दोघांचं जें स्नेहाचं नातं आहे, तसलं नातं या जगांत अगदींच दुर्मिळ. ”

अचला खालीं मान घालून हळूंच म्हणाली, “ तें मला माहित आहे सुरेशबाबू ! अन् हेंही माहीत आहे, कीं या तुमच्या स्नेहांत आजपर्यंत कधीं अंतराय आलेला नाहीं. ”

लहानपणच्या साऱ्या आठवणी सुरेशच्या हृदयांत जाग्या झाल्या. गंहिवरल्या आवाजानें तो म्हणाला, “ आपल्याला माहितच आहे त्याअर्थी मला एव्हढी भिक्षा घाला, कीं नकळत मी आपल्याशीं जें शत्रुत्व केलं त्या अपराधाची जाणीव माझ्या हृदयाला यापुढं तरी टोंचू नये. ”

अंतःकरणांतील आवेगामुळें त्याचा गळा दाटून आला. त्याची ही व्याकुळ मनस्थिती पाहून अचलेचें अंतःकरणही हेलावूं लागलें. डोळ्यांत येणारीं आसवें त्याला दिसूं नयेत म्हणून तिनें तोंड फिरवलें त्यावेळीं तिचा बाप दारांत उभा असल्याचें तिला दिसून आलें.

केदारबाबू सुरेशला पाहातांच खूष होऊन म्हणाले, “ अरे वा ! सुरेशबाबू ! ”

सुरेशनें उठून उभें राहून त्यांना नमस्कार केला.

केदारबाबूंनीं बैठकीवर बसायच्या पूर्वींच विचारलें, " महिमची काय खबर ? कुठंच भेटत नाहीं. "

सुरेश म्हणाला, " अतीशय जरूरीच्या कामासाठीं महिम आज सकाळच्या गाडीनं गावीं निघून गेला. तेंच सांगायला मी आलों होतों. "

केदारबाबू आश्चर्यचकित होऊन म्हणाले, " गावीं निघून गेला ? " ते अधिकच भडकून म्हणाले, " तो गावीं जावो, राहो, कीं काय वाटेल तें करो. मला त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं. पण बाबा सुरेश, तूं मात्र वेळ मिळाला कीं या घरचं मूल समजून येतजात रहा. मोठा आनंद होईल मला. अन् तुझा तो खोडसाळ बंधुराज या घरीं तोंड न दाखवील तर बरं. भेटला तर त्याला म्हणावं, कसली शरम वाटत नसली तरी इथं अपमान होईल एव्हढी तरी भीती बाळग म्हणावं ! "

सुरेश मान खालीं घालून बसला होता. त्याला काय वाटलें असेल त्याची कल्पना येऊन केदारबाबू उत्साहानें म्हणाले, " नाहीं नाहीं सुरेश, या बाबतींत तुला कांहीं लाज वाटायला नको. उलट कर्तव्यपालनाचा गौरवच वाटला पाह्यजे तुला. या संकटापासून तूं आम्हांला बचावलंस त्याबद्दल आम्हांला केव्हढी कृतज्ञता वाटतेय तें नाहीं तुला कळायचं—"

मुलीकडे वळून ते म्हणाले, " कालपासून मला हेंच मोठं आश्चर्य वाटतंय अचला, कीं सुरेशसारख्या मुलाची अन् याची मैत्री जुळली तरी कशी ?—अन् ती इतके दिवस टिकून तरी कशी राह्यली ?—" क्षणभर थांबून ते म्हणाले, " आमच्यासारख्या दोन साध्याभोळ्या माणसांना फसवण्यांत कांहीं मोठा पुरुषार्थ नाहीं—तें त्याला जमलं—पण आश्चर्य आहे तें हें, कीं हा माणूस वास्तविक कसा आहे, कोण आहे, एव्हढा सुद्धां तपास करायची बुद्धि माझ्यासारख्या वयस्क माणसाला सुद्धां होऊं नये ! आश्चर्य आहे ! "

सुरेश कांहीं बोलला नाहीं इतकेंच नव्हे तर केदारबाबूकडे त्यानें वर नजर करून पाहिलें सुद्धां नाहीं. क्षणभर वाट पाहून केदारबाबूंनीं आपल्या पोशाखाकडे नजर फेंकली आणि म्हटलें, " बऱ्याच गोष्टी विचारायच्या आहेत बाबा. जरा बैस. इतक्यांत मी हे कपडे बदलून येतों. "

ते जायला निघत होते तोंच सुरेश म्हणाला, " मला उशीर होतोय. आज जातों. पुन्हां असाच केव्हांतरी येईन. " असें म्हणून तो घाईघाईनें उठला आणि कसाबसा नमस्कार करून त्यांच्याच बरोबर बाहेर पडला.

पण दुसऱ्याच दिवशीं सकाळीं पुन्हा तो आला आणि त्याच्या दुसऱ्या दिवशींही अगदीं त्याच वेळीं त्याच्या गाडीचा आवाज खालून ऐकू आला.

त्यानंतरच्या दिवशीं पुन्हां ज्यावेळीं त्याच्या गाडीचा आवाज ऐकूं आला त्यावेळीं बराच उशीर झाला होता. बापाच्या स्नानभोजनाची ताकीद देऊन अचला उठून जात होती पण तिचें जाणें घडलें नाहीं. आनंदानें सुरेशचें स्वागत करून तिनें गप्पागोष्टी सुरू केल्या.

इकडल्या तिकडल्या गोष्टी झाल्यानंतर केदारबाबूंचें लक्ष सुरेशकडे गेलें. त्यांनीं पाहिलें तों त्याचे माथ्याचे केस विस्कटलेले होते, ते एकदम म्हणाले, " अजून तुमचं स्नान भोजन झालं नाहीं वाटतं सुरेशबाबू ? "

सुरेश हंसून म्हणाला, " माझं जेवण जरा उशीराच होत असतं—"

त्याचें भाषण कानीं न घेतां केदारबाबू मारे गडबड करीत उठून म्हणाले, " आं ! अजून स्नान भोजन झालं नाहीं ? हें पहा आतां एक मिनिटसुद्धां वेळ लागायचा नाहीं सुरेश, इथंच स्नान कर अन् दोन घांस खाऊन घे. अचला, पोरी, जरा घाई कर. बारा वाजून गेले पहा. अरे कोण आहे रे तिकडे—" वगैरे वगैरे आरडा ओरड करीत ते स्वतःच बाहेर निघून गेले.

अचला हा वेळपर्यंत स्वस्थ उभी राहिली होती. अजूनही ती कोणत्याच प्रकारची घाई करायला निघाली नव्हती. बाप निघून गेला असें पहातांच ती हळूच म्हणाली, " आमच्या घरचं जेवण चालेल का आपल्याला ? "

सुरेश कांहीं वेळपर्यंत अचलेच्या तोंडाकडे रोखून पहात राहिला आणि म्हणाला, " आपल्याला काय वाटतं ? "

" आपण ब्राह्म लोकांच्या घरीं कधीं जेवणार नाहीं. "

" खरं आहे तें. पण आपल्या हातचं जेवण मला चालेल. "

क्षणभर थांबून तो म्हणाला, " मी थट्टा करतोंय असं वाटलं असेल तुम्हांला, पण तसं मुळींच नाहीं. आपण स्वतः वाढलं तर खरोखरच मी जेवीन—" असें म्हणून तो तिच्याकडे पहात राहिला.

येत असलेलें हसू दिसूं नये म्हणून अचलेनें मान खालीं घातली. ती म्हणाली, " खरोखरच मला वाटलं, कीं आपण थट्टा करतांहांत. कालपर्यंत ज्यांच्या घरचं जेवण तुम्हांला निषिद्ध होतं, आज त्यांच्याचपैकीं एका माणसाच्या विटाळाचं जेवण घ्यायची प्रवृत्ति आपल्याला कां व्हावी तेंच मला कळत नाहीं. "

सुरेश ओशाळला. व्यथित होऊन तो म्हणाला, " एव्हढा वेळ विचार करून शेवटीं हेंच का ठरवलंत ? आपल्या हातच्या जेवणाची मला किळस आहे असं का आपल्याला वाटलं ? "

अचला म्हणाली, " तसं वाटणं अगदीं स्वाभाविक आहे सुरेशबाबू. उच्च शिक्षण मिळालेल्या आपल्यासारख्या सद्गृहस्थानं इतक्या दिवसाचे दृढ होऊन गेलेले सामाजिक संस्कार एकाएकीं धुडकावून लावावे, हें कसं कुणाला खरं वाटेल ? "

सुरेश म्हणाला, " नाहीं. एकाएकीं नव्हे—पण ' कारण नसतां ' असं कां वाटलं तुम्हांला ? कदाचित् कारणही असेल—" असें म्हणून अशा कांहीं चमत्कारिक रीतीनें तिच्याकडे पहात राहिला, कीं तें पाहून अचलेच्या तोंडीं येणारें उत्तर तिथल्यातिथेंच विरून गेलें.

आपलें बोलणें सुरेशला लागून राहिलें, हें त्याच्या चर्येवरूनच तिला दिसून आलें होतें. त्याबद्दल तिला एक प्रकारचा खंवचट आनंदही वाटला होता. पण त्याच्यावर झालेल्या त्या परिणामामुळें एका क्षणांत त्याची मुद्रा इतकी उतरून जाईल, एव्हढी शुष्क होईल, अशी तिला कल्पनाही नव्हती कीं तशी तिची इच्छाही नव्हती. ही गोष्ट उलट तिच्याच मनाला लागली आणि बोलणें थट्टेवारी नेण्यासाठीं बळेंबळेंच हंसून ती म्हणाली, " आतां आपणच पहा, आपल्यासारखीं माणसं —"

सुरेश म्हणाला, " हो. वहावत जातात ! " त्याचा आवाज कांपरा झाला होता. तो म्हणाला, " एकाच दिवसांत असं आपण म्हटलंत, पण एकाच दिवसाच्या भूकंपामुळं अर्धी दुनिया रसातळाला जाते हें माहित आहे ना आपल्याला ? एक दिवस म्हणजे कांहीं कमी नव्हे !—" असें म्हणून तो सारखा तिच्याकडे पहात राहिला.

अचला घाबरीघुबरी झाली. सुरेशच्या चेहऱ्यावर एक प्रकारची शुष्क छाया आली होती, त्याचा चेहरा गोरामोरा झाला होता. कपाळावरच्या शिरा तरारून उभ्या राहिल्या होत्या, दोन्ही डोळे नुसते जळतजळत होते—जणू काय तो झडप घालून धरायलाच उठला होता !

आधींच उन्हाळ्याचा कडाका, त्यांतून हा वेळपर्यंत स्नान-भोजन न झालेलें. गेल्या रात्रीं एव्हढीं सुद्धां झोंप न आलेली -- त्याच्या पायाखालची जमीन सुद्धां अकस्मात हादरूं लागली. तारवटलेल्या डोळ्यांनीं तिच्याकडे पहात तो म्हणाला, " ब्राह्मांचा मला किळस येतो कीं नाहीं याचं उत्तर मी ब्राह्मांना देईन. पण माझ्यालेखीं आपला दर्जा त्यांच्यापेक्षां कितीतरी वरचा आहे—"

त्याची ही बेफाम अवस्था पाहून अचला भेदरून लटपटूं लागली. तो विषय कसाबसा दाबून टाकण्याच्या उद्देशानें ती भीतभीत म्हणाली, " नोकराला — "

तिचें तें तोंडांतल्या तोंडांतलें पुटपुटणें भडकलेल्या सुरेशच्या आवाजाखालीं दबून गेलें. तो तसाच उत्तेजित होऊन बोलत होता, " नुसता दोन दिवसांचा परिचय ! खरं आहे तें ! पण तुला माहित आहे अचला, दिवस, घंटा, मिनिटांनीं महिमला मापतां येईल – सुरेशला नाहीं. तो स्थलकालातीत आहे. तूं धरणीकंप पाह्यला आहेस ? पृथ्वीला ग्रासून टाकणारा तो—"

व्याधाला घाबरलेल्या हरिणीप्रमाणें अचला पहातां पहातां उठून उभी राहिली. ' आधीं आपल्या स्नानाची तयारी—' असें म्हणून ती पुढें पाऊल टाकते न टाकते तोंच सुरेश एकदम तिच्यासमोर आला आणि बेफामपणें त्यानें तिचा उजवा हात धरून ओढला. अशा प्रकारचें उन्मत्त आणि आकस्मिक आकर्षण सहन करणें स्त्रीजातीच्या शक्तीपलीकडचें होतें. त्याच्या त्या ओढीबरोबर ती एकदम कोसळून त्याच्या आंगावर पडली. यावेळीं तिची वृत्ती भीति आणि आश्चर्य याच्या पलीकडे गेली होती. ' आईग ! ' हे केविलवाणे शब्द तिच्या थरथरणाऱ्या ओठांबाहेर पडतात न पडतात तोंच सुरेशनें तिचे दोन्ही हात धरून तिला कडकडून आपल्या हृदयाशीं कवटाळलें आणि हांक मारली, " अचला ! "

अचला नजर वर करून मूर्च्छित मंत्रमुग्धासारखी त्याच्याकडे पहात राहिली होती. क्षणभर सुरेशच्या तोंडांतूनही शब्द बाहेर आला नाहीं. कसल्यातरी असामान्य जळजळीत पिपासेनें त्याचे ओठ सारखे थरथरत जणू काय ठिणग्यावर ठिणग्या उधळीत होते.

अशा स्थितींत कांहीं वेळ सुरेश अचलेचे दोन्ही हात आपल्या हृदयाशीं कवटाळून धरून भडभडून बोलत होता, " अचला, या हृदयांत उठलेल्या या या धरणीकंपाचे हे धडधडणारे ठोके आपल्या हातांनीं नीट पारखून घे. या हृदयांत कसलं भयंकर थैमान सुरू झालं आहे तें एकदां पाहून घे. पृथ्वीवर होणाऱ्या धरणीकंपापेक्षां हें कमी का आहे ? या पृथ्वीवर अशी कोणती जात आहे, कोणता धर्म आहे, असे कोणते मतभेद आहेत, कीं या धडक्यासरशीं ते सारे बुडून रसातळाला जाणार नाहींत ! सांगना अचला. "

" सोडा मला—बाबा येताहेत—" असें म्हणून त्याच्या हातून आपली सोडवणूक करून घेऊन अचला शांतपणें आपल्या जागीं जाऊन बसली. इतक्यांतच केदारबाबू घाईघाईनें आंत आले आणि म्हणाले, " हा बेटा गडी मधूनमधून कुठं निघून जातो त्याचा पत्ताच नाहीं. अचला,—बाळ — हें काय ग ? प्रकृति बिघडली आहे कीं काय तुझी ? चेहरा असा एकदम उतरलेला—"

अचलेनें कसें बसें हंसायचा थोडासा प्रयत्न केला आणि म्हटलें, " प्रकृति कशाला बिघडेल बाबा ? "

" मग डोकं दुखतंय कीं काय ? हा असा उन्हाचा कडाका—"

" छे. कांहीं नाहीं. अगदीं चांगली आहें मी बाबा. कांहीं झालं नाहीं मला."

केदारबाबू निश्चिंत होऊन म्हणाले, " मग ठीक आहे. तुझा चेहरा पाहून मी उगीच घाबरलों. तरी पण असं पहा, तूं जरा स्वतः एकदां जाऊन—"

अचला म्हणाली, " त्याची काळजी नको बाबा. एका मिनिटांत मी सारी व्यवस्था करतें. पण ही मी आत्तांच सुरेशबाबूंना विचारीत होतें, कीं आमच्या घरीं स्नानभोजन करायला त्यांना कांहीं हरकत नाहीं ना ? "

केदारबाबू चकित होऊन म्हणाले, " हरकत कशाची ? नाहीं नाहीं सुरेश,

मी तुला एकदांच सांगून टाकलंय—एकदां मी तुला घरचा मुलगा म्हणून म्हटलंय तें म्हटलंय. हें घर म्हणजे तुझं स्वतःचं घर—" मुलीकडे पाहून ते मोठ्या अभिमानानें म्हणाले, "तसं जर नसतं अचला, तर आमच्या बचावासाठीं भगवंतानं त्यांना कां पाठवलं असतं? पण आतां जास्त उशीर लावणं बरें नव्हे बाबा! चल ये माझ्याबरोबर, मी तुला न्हाणीघर दाखवून देतों."

पण केदारबाबू आल्यापासून सुरेशनें जी एकदां मान खालीं घातली ती वर करण्याचें सामर्थ्य कांहीं त्याला झालें नाहीं.

अचला म्हणाली, "उगीच त्यांना आग्रह कां करतां बाबा? ब्राह्मांच्या घरीं जेवायला त्यांचा तसाच कांहीं विरोध असेल कदाचित्! जाणूनबुजून मना-विरुद्ध असं कुठं जेवल्यानं प्रकृती बिघडायची कदाचित्!"

केदारबाबूंना एकाएकीं मोठा पेंच पडला. सुरेश हा बड्या घरचा मुलगा होता—स्वतःचा मालक होता. स्वतःच्या गाडींतून तो हिंडतफिरत असे. त्याला खायला जेवायला घालून आपलासा करून घ्यायचा हा त्यांचा डाव.

एकाएकीं त्यांची नजर सुरेशकडे गेली. तो खालीं मान घालून बसला होता. तें पाहून ते आश्चर्यचकित होऊन दचकले आणि म्हणाले, "आं! हें काय झालंय सुरेश? तोंड अगदीं सुकून गेलंय—एकदम काळवंडून गेलंय! चल चल लौकर डोक्यावर दोन तांबे ओतून घ्यायला. आतां एव्हढा सुद्धां वेळ घालवूं नको!" असें म्हणून एक प्रकारें जबरदस्तीनें त्याचा हात धरून ते त्याला ओढीत घेऊन गेले.

## ७

जेवणखाण झाल्यावर केदारबाबूंनीं त्या तसल्या उन्हांतून सुरेशला जाऊं दिलें नाहीं. विश्रांती घेण्याच्या नांवाखालीं सारी दुपारभर त्यानीं त्याला एका खोलींत कैद करून ठेवलें. डोळे झांकून कोचावर तो पडून राहिला होता, पण कांहीं केल्या त्याला झोंप लागली नाहीं. बाहेर मध्यान्हीचा सूर्य आकाशांत जळजळत होता, तर आंत असंयमामुळें उत्पन्न झालेली आत्मग्लानी त्याहीपेक्षां जास्त भयंकर रीतीनें सुरेशच्या हृदयांत सळसळून उठली होती.

अशा प्रकारें सारा दिवस आंतून बाहेरून जळतपिचत असतांना अर्धमेला होऊन ज्यावेळीं त्यानें उठून बसून समोरची खिडकी उघडली त्यावेळीं दिवस खालीं जाऊं लागला होता. केदारबाबू प्रसन्न मुद्रेनें आंत येऊन बळेबळेंच एक मोठा सुस्कारा टाकून म्हणाले, " अं: पाह्यलंसना कसा उकाडा होतोय सुरेश ? माझ्या या एवढ्या आयुष्यांत असा उकाडा कलकत्त्यांत कधीं पाह्यला नव्हता. बरं, झोंपबीप लागली का थोडीशी ! "

सुरेश म्हणाला, " नाहीं. दिवसा मला कधीं झोंप येत नाहीं. "

केदारबाबू लगेच म्हणाले, " अन् येणं बरंहि नव्हे. प्रकृति भयंकर बिघडते त्यामुळं. तरीही तीनचार वेळ मी उठून उठून पाह्यलं, पंखावाला पंखा ओढतोय कीं नाहीं. असले सैतान असतात हे लोक कीं तुमचा डोळा जरासा लागेल त्याच क्षणाला तोही डोळे मिटून घेईल. बरं बरं, जरा आराम वाटला ना ? मला वाटलंच तेव्हां, कीं या उन्हांतून बाहेर गेलं तर वांचणं सुद्धां कठीण. "

यावर सुरेश कांहीं बोलला नाहीं. खोलींतील एकेक खिडकी उघडून टाकून केदारबाबू एक खुर्ची ओढून घेऊन म्हणाले, " मी असं म्हणतों सुरेश, आतां आडपडदा ठेवायची कांहीं जरूर नाहीं. सारं कांहीं उघडउघड करून महिमला एक पत्र लिहून टाकतों कसं ? "

तो प्रश्न ऐकून सुरेशला पाठीवर जोरानें चाबकाचा फटकारा बसल्यासारखें वाटलें. तो एकदम चमकला असें पाहून केदारबाबू म्हणाले, " कठोर कर्तव्य कशा रीतीनं बजावायचं त्याचे धडे एव्हढ्या दिवसांनीं तूंच मला दिलेस. आतां तुला पिछेहाट घेऊन चालायचं नाहीं बाबा. "

त्यांचें म्हणणें योग्यच होतें. कांहीं वेळ विचार करून सुरेश म्हणाला, " पण या बाबतींत आपल्या मुलीचंही मत घ्यायला हवं. "

केदारबाबू थोडेसे हंसून म्हणाले, " हवं तर काय ! "

" अगदीं उघड करून पत्र लिहावं असंच म्हणते का ती ? "

त्या प्रश्नाचें सरळ उत्तर न देतां केदारबाबू म्हणाले, " तसंच तर काय ! असल्या बाबतींत समोरासमोर सवाल जबाब करणं उभयपक्षींही थोडंसं कठीणच. ती आतां सज्ञान झालीय, तिला रीतसर शिक्षणही मिळालंय,—वेळ आहे तोंवर

साऱ्या गोष्टी निवटून घेतल्या नाहींत तर हें वेड भलतीकडे जाऊन पोंचेल, एव्हढं तिला कळतंय. तेव्हां म्हणतों, कीं आज रात्रींच हें काम उरकून टाकीन."

सुरेश ओशाळून म्हणाला, " आजच एव्हढी घाई कां ? दोन दिवस विचार करून मग काय तें करणं बरं ! "

केदारबाबू म्हणाले, " यांत आतां विचार कसला करायचा ? त्याच्या हातीं मुलगी देतां येत नाहीं हें तर निश्चितच ! त्याअर्थी आतां हें अवघड काम जितक्या लौकर संपवून टाकतां येईल तेव्हढं बरं ! "

सुरेशनें विचारलें, " माझा उल्लेख करायची जरूरी आहे का ? "

केदारबाबू हंसून म्हणाले, " एव्हढा म्हातारा झालों तरी सुद्धां इतकी अक्कल मला नाहीं कीं काय ? तुझं नांव केव्हांच कुणी काढायचा नाहीं. "

सुरेशच्या हृदयांतून सुटकेचा एक सुस्कारा बाहेर पडला. यावर कांहीं न बोलतां तो तसाच स्तब्ध बसून राहिला. तो सुस्कारा केदारबाबूंच्या नजरेला आल्यावांचून राहिला नाहीं. आतांपर्यंतच्या सुरेशच्या वागणुकीवरून त्यांनीं मनांतल्यामनांत कांहीं अंदाज बांधले होते. ते खरे कीं खोटे याची कसोटी लावून पहाण्यासाठीं त्यानीं काळोखांत एक ढेकूळ फेकलें. ते म्हणाले, " फार मोठे उपकार केलेयस तूं आमच्यावर, बाबा. पण याहीपेक्षां आणखी थोड्या जास्त उपकाराची आम्ही दोघं तुझ्याकडून अपेक्षा करतों आहोंत. आम्ही ब्राह्म खरे, पण ते तसले ब्राह्म नव्हे आम्ही ! अन् माझी मुलगी तर आपल्या आई-सारखीच मनाची हिंदूच राहिली आहे. आमची ही ब्राह्मगिरी तिला मुळींच आवडत नाहीं. "

सुरेश अचंबित होऊन त्यांच्याकडे पहात राहिला. त्याची ती अबोल उत्सुकता ध्यानीं आल्यामुळें केदारबाबू म्हणाले, " तसं पाहिलं तर मुलीला कांहीं जन्मभर कुंवार ठेवतां येत नाहीं. या बाबतींत मी पूर्णपणें तुम्हां हिंदुच्याच मताचा आहें. ही एक सोयरीक जशी तूं मोडून टाकलीस सुरेश, तशीच आतां दुसरी तूंच जुळवून दिली पाहिजेस बाबा. "

सुरेश म्हणाला, " अगदीं जीव तोडून मी प्रयत्न करीन त्या बाबतींत. "

त्याच्या मुद्रेवरून अंदाज घेत केदारबाबू संदिग्धपणें म्हणाले, " या प्रकरणीं समाजांत भयंकर खळबळ उडेल तें मला दिसतंयच. होईल तितक्या लौकर

अचलेचं एकदां लग्न करून टाकून हें प्रकरण मिटवून टाकायला हवं. पण एक मोठी अडचण आहे सुरेश—" असें म्हणून एकवेळ त्यांनीं दरवाजाबाहेर नजर टाकली आणि सुरेशच्या अगदीं जवळ सरकून येऊन आवाज खालीं आणून ते म्हणाले, " रूपगुणानं स्थळ चांगलं असलं तरी हिंदूच्या रीतीप्रमाणं मुलीला धरून आणून उभी तर करतां येत नाहीं ! ज्या एका विशेष प्रकारच्या आचार-विचारांत ती वाढलीय त्याला अनुसरूनच तिची संमति घेतल्यावांचून कांहींच करतां येत नाहीं. पण जोंपर्यंत उभयतांमधें कांहींतरी थोडंबहुत जमलं नाहीं तोंवर ती केव्हांही सम्मति द्यायची नाहीं – कळलं ना सुरेश ? "

त्यांचें हें भाषण चाललें असतांना सुरेशचें चित्त भलतीकडेच वाहवलें होतें. अशा प्रकारें प्रेमाबद्दल अस्पष्ट उल्लेख त्यानीं केल्यामुळें त्याला एक नवीनच धक्का बसला होता आणि त्यामुळें तो सुन्न झाला होता. दुपारच्या वेळीं घडलेला प्रसंग त्याला आठवला. उच्छृंखलपणानें प्रेमाचें प्रदर्शन करण्याचा तो ओंगळवाणा प्रयोग करतांना आपल्या हातून जें अवचट वर्तन घडलें त्याची आठवण झाल्या-मुळें लाजेनें लाल होण्याऐवजीं त्याचा चेहरा एकदम काळाठिक्कर पडला. सकाळपासूनचें एक वर्तमानपत्र त्याच्या पायतळीं जमिनीवर पडून राहिलें होतें तें उचलून घेऊन त्यांतलें जाहिरातीचें पान तो नीट निरखून पहात बसला.

केदारबाबूंना तें दिसून आलें. आकस्मिक बदललेल्या त्याच्या या वृत्तीचा त्यानीं अगदींच उलटा अर्थ करून घेतला आणि त्यामुळें ते मनापासून आनंदून रोमांचित झाले. हीच वेळ आहे असें समजून त्यानीं हात टाकायला सुरवात केली. ते म्हणाले, " मला अगदीं याच गोष्टीचं मोठं आश्चर्य वाटत असतं सुरेश, तें हेंच, कां कोण जाणे, जन्मभर एखाद्या माणसाचा सहवास असूनही त्याच्यावर एव्हढा सुद्धां विश्वास बसत नाहीं, अन् घटका दोन घटकांच्या सहवासांत सुद्धां एखाद्या माणसाच्या हातीं आपलं सर्वस्व सोपवून बसायलाही संकोच वाटत नाहीं. असं वाटतं, दोन घटकांची नव्हे—जन्मजन्मांतरीची ओळख— जशी ही तुझी — तसं पाह्यलं तर हा किती दिवसांचा परिचय ?—"

अगदीं याचवेळीं अचला आंत आली. सुरेशनें एक क्षणभरच नजर वर करून तिच्याकडे पाहिलें आणि पुन्हा वर्तमानपत्र वाचायला सुरवात केली.

" बाबा, आतां तुम्हांला चहा हवा कीं कोको ? "

" मी कोकोच घेईन बाळ. "

" आपण चहाच घेणारना सुरेशबाबू ? "

वर्तमानपत्रावर तशीच नजर ठेवून सुरेश पुटपुटला, " मला चहाच द्या. "

" आपल्याला साखर कमी लागते ना ? "

" नाहीं ! इतर चारचौघांप्रमाणेंच मलाही चालेल. "

अचला निघून गेली. मधेंच तुटलेल्या विषयाचा धागा जोडीत केदारबाबू म्हणाले, " आतां हेंच पहा सुरेश, या माझ्या पोरीच्यापायीं या म्हातारपणांत मी मोठ्या पेचांत पडलोंय. कांहींच छपवून ठेवलं नाहीं मी तुझ्यापासून. तसं पाह्यलं तर आपल्या अडीअडचणीच्या गोष्टी सहसा कुणी दुसऱ्याकडे बोलून दाखवीत असतो का ? एव्हढे निकटचे आप्तमित्र असतांना देखील त्यांच्याकडे जें कधीं बोललों नाहीं तें तुझ्याकडे उघडउघड बोलून दाखवायला कां मला संकोच वाटला नाहीं ? याला तसंच कांहीं कारण आहे असं नाहीं का वाटत तुला ? "

सुरेश आश्चर्यचकित होऊन नुसता पहात राहिला होता. केदारबाबू बोलत होते, " हा सारा देवाघरचा खेळ ! कसं छपवून ठेवायचं ? शक्य आहे का तें ? गत्यंतरच नाहीं बोलल्यावांचून ! " असें म्हणून त्यानीं खुर्चीच्या हातावर थाप मारली.

एव्हढी विस्तृत प्रस्तावना झाल्यावरही मुलीच्या बाबतींत ते कोणत्या प्रकारें पेचांत आणि संकटांत पडले होते याचा अंदाज कांहीं सुरेशला झाला नाहीं. केदारबाबू नंतर आपल्या एकंदर व्यवहाराबद्दल सविस्तर वर्णन करून सांगूं लागले आपला order supply चा व्यवसाय केवळ फसवणूक आणि कृतघ्नतेच्या पायीं कशा प्रकारें जळून खाक झाला, तरीही धीर धरून आपण कसे टिकून राहिलों, कर्जाचा बोजा सारखा वाढत जात असतांना देखील एकुलत्या एक कन्येच्या शिक्षणासाठीं खर्च करायला आपण कसें मागेंपुढें पाहिलें नाहीं, ही हकिगत त्यानीं सांगून टाकली.

ते म्हणाले, " चारपांच डिक्रया बजावल्या जातील या भीतीनं अन्नदेखील विषासारखं वाटत होतं. किरकोळ देण्याच्या तगाद्यामुळं जीव सळो कीं पळो सा

झाला होता, तरीही तोंड उघडून कुणालाही कांहींच सांगितलं नाहीं आणि तसं पाह्यलं तर अगदीं सहज हातोहात पैसे टेकायचं सामर्थ्य असलेले मित्र होते माझे."

क्षणभर थांबून थोडासा विचार करून ते म्हणाले, "पण तुझ्याकडे हें सारं कांहीं सांगितलं—एव्हढं सुद्धां मागं ठेवलं नाहीं कीं संकोच बाळगला नाहीं. हा देवाचाच आदेश नव्हे का ?" असें म्हणून मोठ्या भक्तिभावानें दोन्ही हात जोडून मस्तकाजवळ नेऊन नमस्कार केला.

सुरेश देव मानीत नव्हता. अर्थात् म्हाताऱ्याच्या या भक्तीच्या उद्रेकाला त्यानें जोड दिली नाहीं. उलट तें पाहून त्याला कसेसेंच वाटलें. त्यानें गंभीरपणानें विचारलें, "किती देणं आहे आपलं ?"

केदारबाबू म्हणाले, "देणं ? माझा धंदा उभा असता तर कुणी म्हटलं असतं याला देणें म्हणून ? फार फार तर होईल तीनचार हजार—" पुढें ते काहीं बोलणार तोंच नोकराच्या हातीं चहाचा सरंजाम आणि स्वतःच्या हातीं फराळाच्या जिनसांची थाळी घेऊन अचला आंत आली.

गरमगरम कोकोचा एक लहानसा घोंट घेऊन अस्पष्टशी मिटकी मारून पेला टेबलावर ठेवून केदारबाबू म्हणाले, "हें पहा सुरेश, देवाची कृपा आहे माझ्यावर मी अगदीं सारखा पहात आलोंय—भगवंतानं मला कधींच दगा दिला नाहीं. महिमकडे बोलावं म्हणून वाटत असतांना सुद्धां कां बोललों नाहीं—देवानं जणुं काय माझ्या तोंडावर हातच ठेवला—इतक्या दिवसांनी हें आतां पटलं—" असें म्हणून त्यानीं पुन्हां एकदां ईश्वराच्या या अपार दयेची जाणीव होऊन मस्तकाला हात लावून नमस्कार केला.

हातच्या चहाच्या पेल्यावर असलेली नजर न वळवतां सुरेश म्हणाला, "या रकमेची केव्हां जरूरी आहे आपल्याला ?"

तोंडचा कोकोचा पेला खालीं ठेवून केदारबाबू म्हणाले, "जरूरी माझी नव्हे बरं सुरेश, जरूरी तुझी !" असें म्हणून त्यानीं मोठमोठ्यानें हंसायला सुरवात केली.

हें कोडें न उलगडल्यामुळें सुरेश नजर वर करून त्यांच्याकडे पहात होता, अचलाही जिज्ञासु मुद्रेनें बापाच्या तोंडाकडे पहात राहिली होती.

एकदां आपल्या मुलीच्या तोंडाकडे आणि एकदां आपल्या सुरेशच्या तोंडाकडे नजर फेंकून केदारबाबू म्हणाले, " यांत कांहीं मोठंसं कोडं नाहीं. घर मी उरावर घेऊन जात नाहीं. गेलं तर तुमचंच जाईल. अन् राहिलं तर तुम्हां उभयतांचंच राहील—" असें म्हणून ते नाजुकनाजुक हसूं लागले.

दोघांची नजरानजर झाली आणि त्याचक्षणीं दोघांनीही शरमिंद्या मुद्रेनें माना खालीं घातल्या.

दोन पेले कोको घशाखालीं उतरल्यावर केदारबाबूंना एक जरूरीचें पत्र लिहायची आठवण झाली. ते चटकन् उठून उभे राहून म्हणाले, " आज तुझ्या जेवणखाणाची मोठी गैरसोय झाली सुरेश —उद्यां दुपारीं जेवायचं इथंच—" असें आमंत्रण देऊन पश्चिमेकडचा दरवाजा उघडून ते आपल्या खोलींत निघून गेले.

उघडलेल्या दरवाजांतून मावळत्या सूर्याच्या किरणाची लहानशी झळक सुरेशच्या चेहऱ्यावर पडली. त्यानें मान वळवून पाहिलें तों अचला टक लावून त्याच्याकडे पहात आहे असें त्याला दिसून आलें—तिचीही नजर खालीं गेली.

चारदोन मिनिटें मोठ्या घड्याळ्यांतल्या टक्टक् होणाऱ्या आवाजाखेरीज त्या जागीं सारी स्तब्धता पसरली होती.

## ८

त्या स्तब्धतेचा भंग केला सुरेशनें. तो उद्गारला, " एकदम एक भानगड करून बसलों ! "

अचला कांहीं बोलली नाहीं.

सुरेश पुन्हां म्हणाला, " मी एखादा राक्षस आहें असेंच वाटेल आपल्याला. माझ्यासमोर एकटं बसायला आपल्याला धीर होत नाहीं—नाहीं ? " असें म्हणून तो उकळीवर उकळी आणून हंसूं लागला. तरीही अचलेनें वर पाहिलें नाहीं. तिनें तसें पाहिलें असतें तर तिला दिसून आलें असतें, कीं सुरेशच्या या हंसूं आणण्याच्या निष्फळ प्रयत्नाच्या पायीं त्याचा तोच शरमिंदा होत असल्याचा पुरावा त्याच्या चेहऱ्यावर दिसून येत होता.

पुन्हां त्या खोलींत निस्तब्धता पसरली. पुन्हां भींतीवरचें तेंच घड्याळ तसेंच टक्टक् करीत त्या स्तब्धतेचें मोजमाप घेत होतें. तो मुकाटपणा जेव्हां अगदीं असह्य होऊन गेला तेव्हां थोड्या वेळानें सुरेश उठून ताठरून बसला आणि म्हणाला, " असं पहा, जें व्हायचें तें होऊन गेलं. आतां शरम वाटायला सुद्धां मला जागा राहिलेली नाहीं. बराच उशीर झाला—मी आतां येतों. पण जायच्या पूर्वी माझ्या एकदोन प्रश्नांचीं उत्तरं ऐकून जाईन म्हणतों. विचारूं ? "

अचलेनें वर पाहिलें. तिची नजर केविलवाणी झाली होती. ती म्हणाली, " विचारा "

सुरेश क्षणभर थांबून म्हणाला, " आपल्या बाबांचं देणं फेडून टाकण्यासाठीं उद्यांपरवां एकदां येणार आहें, त्यावेळीं आपली भेट होईलच असं नाहीं. मला कळायला हवं तें हें, कीं आपणां दोघांच्या बाबतींत त्यांचा अभिप्राय काय आहे तें माहित आहे का आपल्याला ? "

अचला म्हणाली, " उघड करून त्यानीं कांहींच सांगितलं नाहीं मला. "

सुरेश म्हणाला, " मलाही नाहीं, तरीपण माझी खात्री आहे, त्यानीं आमचं —पण मला वाटतं त्या गोष्टीला आपली कबुली नाहीं मिळायची ! "

अचला म्हणाली, " नाहीं. "

" केव्हांही नाहीं ? "

नजर खालीं घालून अचला म्हणाली, " नाहीं. "

" पण महिमची आशा सुटली तर ? "

अचला निश्चयाच्या स्वरानें म्हणाली, " ती आशा तर नाहींच. "

सुरेशनें विचारलें, " म्हणजे तरीही नाहीं ? "

अचलेनें वर पाहिलें नाहीं. पण तितक्याच दृढनिश्चयाच्या स्वरानें तिनें उत्तर दिलें, " नाहीं, तरीही नाहीं. "

सुरेशनें कोचावर आंग टाकून एक मोठा सुस्कारा सोडला. तो म्हणाला " जाऊं दे. एका गोष्टीचं निराकरण झालं ! सुटलों !—" असें म्हणून क्षणभर तो उगीच राहिला. दुसऱ्याच क्षणाला पुन्हा सरळ बसून तो म्हणाला, " पण मला मोठी मुष्कील पडलीय ती ही, कीं असं असलं तर आपल्या बाबांचं देणं फिटणार कसं ? "

असें म्हणून तो क्षणभर उगीच राहिला. दुसऱ्याच क्षणाला पुन्हा सरळ बसून तो म्हणाला, " पण मला मोठी मुष्कील पडलीय ती ही, कीं असं असलं तर आपल्या बाबांचं देणं फिटणार कसं ? "

अचलेनें घाबऱ्याघुबऱ्या वर पाहिलें आणि अत्यंत संकोचानें म्हटलें, " असं असलं तर मग तें फेडतां यायचं नाहीं का आपल्याला ? "

" फेडतां यायचं नाहीं ! कां नाहीं ? " असा प्रश्न करून सुरेश बावरलेल्या तीक्ष्ण दृष्टीनें तिच्याकडे पहात राहिला.

त्या त्याच्या नजरेसमोर अचलेनें पुन्हां मान खालीं घातली.

उत्तरासाठीं कांहीं वेळपर्यंत वाट पाहून सुरेश हंसला. पण यावेळच्या त्याच्या हंसण्यांत खुलेपणा नव्हता—कृत्रिमताही नव्हती. तो म्हणाला, " असं पहा, आपली ओळख पटेपर्यंत माझी आपल्याशीं जी वागणुक झाली तिला कुणीही सभ्यपणाची वागणुक म्हटलं नसतं हें मलासुद्धां माहित आहे. पण मी इतका हल्कट नाहीं. आपल्या बाबांना मी हे पैसे लांच म्हणून देत नाहीं. त्यांच्या संकटकालीं माझ्याकडून त्यांना मदद व्हावी एव्हढीच माझी इच्छा. अर्थात् आपल्या मतामतावर कांहीं हें माझं देणं विसंबून राहिलेलं नाहीं. प्रश्न आहे तो त्यानीं ही मदद घेण्याचा. हें कळल्यावर ते घेतील कीं नाहीं याचाच विचार करतोंय मी. जरा बसा. या बाबतींत आपण थोडी चर्चा करूं. "

अचलेनें वर पाहून म्हटलें, " बोला. "

सुरेश बोलूं लागला, " सुदैवानं मी विपुल संपत्तीचा मालक आहें आणि पैशाअडक्यावर माझा तेव्हढासा लोभही नाहीं. तीनचार हजार रुपये मला सहज उडवून देतां येतील—अन् आपल्याला सौख्य होत असेल तर याहीपेक्षां जास्त देईन मी. तें जाऊ दे. आतां प्रश्न आहे तो हा, कीं आपल्या बाबांचा असा समज आहे कीं हे पैसे फेडावे लागायचे नाहींत—एक प्रकारें ते आपोआपच फिटल्यासारखे होतील. कळलं ना ? "

अचला मान हालवून पुटपुटली, " हो. "

सुरेश बोलत होता, " स्पष्ट बोलतोंय म्हणून राग मानूं नका. पैशाची त्यांना निकड आहे हें मला कळून चुकलंय—पण हे घेतलेले पैसे फेडायचं

म. ग्रं. सं. ठाणे, ग्रंथालय ...
दा. क्र. ........ नों दि ........
वि. ........

सामर्थ्य त्यांना नाहीं. माझ्यातर्फे बोलायचं तर ते फेडण्याबद्दल माझाही आग्रह नाहीं—ठीक आहे. हें तर सहज होऊन जाईल. परवांच्या या बाबतींत तुम्हांला जें कांहीं वाटतंय तें परवांच्या दिवसापर्यंत त्यांच्याशीं बोलूं नका. कसं ? आहे कबूल ? ”

अचला तशीच मान खालीं घालून बसली होती. सुरेश म्हणाला, पैशाच्या लोभानं आपण कबुली दिली नाहीं यामुळंच आपल्याबद्दलची माझी श्रद्धा वाढली आहे. अशी कबुली दिली असती तर कदाचित शेवटीं घाबरून मी पिछेहाट घेतली असती. मी काय करीन नी काय न करीन याचा नेमच नाहीं. मी चाल्लों—” असें म्हणून सुरेश उभा राहिला आणि थोडेंसें हंसून म्हणाला, “ मला बोलायला तोंड नाहीं—तरीपण जायच्या वेळीं माझं एकच मागणं आहे, कीं माझ्या चुकांकडे आपण फारसं लक्ष देऊं नका—” थोडासा मागेंपुढें करून तो म्हणाला, “ नमस्कार. खराब गोष्टीचा बोजा जहाजावर चढवून घेऊन मी तुमचा निरोप घेतोंय. पण वास्तविक मी तसा कांहीं नरपिशाच्च नाहीं. जाऊं दे—विश्वास ठेवायला जर मी जागाच ठेवली नाहीं तर बोलायचं तरी कशाला ? ” असें म्हणून दोन्ही हात जोडून नमस्कार करून सुरेश घाईघाईनें बाहेर निघून गेला.

हळूहळू जिन्यावर वाजत असलेलीं त्याचीं पावलें ऐकूं येईनाशीं झाल्याचें अचलेच्या ध्यानीं आलें, त्यावेळीं कांहीं कारण नसतांना एकाएकीं तिच्या डोळ्यांवाटे आसवें पाझरूं लागलीं.

आंत येत येत केदारबाबूंनीं हांक मारली. “ सुरेश ! ”

अचला घाईघाईनें डोळे पुसून घेऊन म्हणाली, “ आत्तांच निघून गेले ते. ”

केदारबाबू आश्चर्यचकित होऊन म्हणाले, “ म्हणजे ? मला भेटल्याशिवाय कसे गेले ? उद्यां त्यांना इथं जेवायला बोलावलंय त्याची आठवण दिलीस का जातांना ? ”

अचला ओशाळून म्हणाली, “ माझ्या ध्यानांतच राहिलं नाहीं बाबा. ”

“ ध्यानांतच राह्यलं नाहीं ? छान ! ” असें म्हणून केदारबाबू जवळच्या एका खुर्चीवर ताठ होऊन बसले. मुलीचा बदललेला आवाज जाणवल्यामुळें त्यांच्या

मनांत थोडासा खटका वाजला होता खरा, पण संध्याकाळच्या अंधुक प्रकाशांत तिचा चेहरा चांगलासा न दिसल्यामुळें तो परिणाम टिकून राहिला नाहीं. ते म्हणाले, "या म्हातारपणीं स्वतः जिथं पाह्यलं नाहीं तिथं कांहींना कांहीं तरी गल्लत ही होतेच. हें बरं नव्हे. आतां जाऊन नोकराबरोबर एक चिठ्ठी लिहून पाठवतों. सुरेशच्या घरचा पत्ता माहित आहे तुला ? - " असें म्हणून ते जायला निघाले.

"मला माहित नाहीं बाबा."

"तोही माहित नाहीं ? आतां काय म्हणावं !" असें म्हणून ते पुन्हां मट्कन् खुर्चीवर बसले.

पण लगेच पुन्हां उठून रुक्षपणें म्हणाले, "तुला स्वतःच आपले हातपाय तोडून घ्यायचे असतील तर खुशाल घे पोरी. पण मला त्यांत गुंतवूं नकोस. छान ! एका शब्दासरशी एव्हढी रक्कम द्यायला जो माणूस तयार झाला त्या माणसाचं महत्त्व काय एव्हढं तरी एकदां ध्यानांत घ्यायचं ? त्याच्या घरचा पत्ता तरी नाहीं का विचारून घ्यायचा ? वय वाढतां वाढतां काय असं होतंय तुला अचला ?" असें म्हणून त्यांनीं एक मोठा सुस्कारा सोडला.

कर्जाखालीं चेंगरून संकटांत पडलेला आपला बाप ज्या साऱ्या खोट्या आणि ओंगळ प्रकारानें स्वतःच बचाव करण्याचा प्रयत्न करीत होता, तें सारें अचलेला दिसून येत होतें. हे प्रकार तिचा मर्मभेद करीत होते पण ती मुकाट्यानें सहन करीत होती. म्हणूनच याही वेळीं तिनें त्यांच्या या चिडीच्या उद्गारावर कांहींच उत्तर दिलें नाहीं.

आपल्या भाषणामुळें तिला शरम वाटली, पश्चात्ताप झाला अशी निश्चित कल्पना करून केदारबाबूही खूष झाले.

खोलींत दिवा लावून नोकर निघून गेला. केदारबाबू मायेच्या भाषेनें तिला डिंवचीत होते, "महिमच्या बाबतींत सुद्धां तूं कधीं कांहीं चौकशी केली नाहींस. ठीक ! झालं तें बरं झालं ! ईश्वर जें कांहीं करतो तें आपल्या बऱ्याकरतांच करतो. पण सुरेशच्या बाबतींत मात्र असं कांहीं होणं बरं नाहीं. पाह्यलंस ना ? देवानंच स्वतः हात धरून त्याला नाहीं का हें घर दाखवून दिलं ?"

अचलेनें वर पाहिलें आणि विचारलें, "सुरेशबाबूंकडून तुम्ही पैसे कर्जाऊ घेणार आहांत का बाबा ?"

केदारबाबूंच्या भगवद्भक्तीला एकाएकीं बाध आला. ते अस्वस्थ झाले आणि मुलीकडे वळून म्हणाले, " हो !—नाहीं, तसे कर्जाऊच कांहीं नव्हेत. समजलीस वरं मुली ? सुरेश मोठा छान मुलगा आहे. या काळांत अशा प्रकारचा सच्छील मुलगा लाखांत एखादाच दिसायचा. कर्जापायीं आमचं घर जाऊं नये एव्हढंच त्यांला वाटतंय. राह्यलं तर तें तुम्हां लोकांनाचा मिळेल—आतां माझे किती दिवस राह्यलेयत ?—तुला समजलं ना मुली ? "

अचलेनें उत्तर दिलें नाहीं. केदारबाबू उत्साहित होऊन बोलत होते,— " तुला माहित आहे ना, केव्हांही मला सरळसरळ बोलणं आवडतं. ओठीं एक अन् पोटीं एक, असं नाहीं व्हायचं माझ्याकडून. म्हणूनच मी अगदीं स्पष्ट बोलून टाकलं, – एव्हढं सारं कळून आल्यावर मुलीला महिमच्या हातीं देण्यापेक्षां तिला विहिरींत लोटून देईन. सुरेशला देखील तसंच वाटतं. त्याअर्थी आतां बोललंच पाह्यजे, कीं त्याच्या मित्राबरोबर ठरलेल्या लग्नाची एवढी वाच्यता झालेली असल्यामुळें तें नुसतं मोडून टाकलं म्हणून भागणार नाहीं,—दुसरीकडे कुठंतरी जोडलं पाह्यजे – नाहींतर समाजांत तोंड दाखवायला जागा रहायची नाहीं ! पण तूं कांहीं म्हण, मुलगा म्हणजे मुलगा आहे हा सुरेश ! म्हणूनच मी त्या मंगलमय परमेश्वराला पुन्हां पुन्हां प्रणाम करतोंय. "

बापाचा प्रणामविधी निर्विघ्नपणें परिपूर्ण झाला असें पाहून अचला थंडपणें म्हणाली, " त्यांच्याकडून एव्हढी मोठी रक्कम नाहीं घेतली तर नाहीं का चालायचं बाबा ? "

केदारबाबू चकित झाले. ते म्हणाले, " नाहीं घेतली तर ! वा ! छान ! "

" पण ती फेडणं शक्य नाहीं आपल्याला. "

" फेडायची गोष्ट कांहीं सुरेश – " ते उद्विग्न झाले, त्यांना संशय आला, अर्थात् तें वाक्य कांहीं पुरें झालें नाहीं. त्यांचा चेहरा पांढराफटक पडला, तें पाहून अचलेच्याही मनावर त्याचा परिणाम झाला.

ती एकदम म्हणाली, " परवां येऊन पैसे देऊन जातों असं ते म्हणाले होते."

" अन् फेडायची बाब – "

" नाहीं, तें कांहीं बोलला नाहीं तो. "

" कांहीं रोखाबिखा करून द्यायचं–– "

" नाहीं-तशी मुळींच त्यांची इच्छा नाहीं. "

" अगदीं तेंच ! " असें म्हणून म्हाताऱ्यानें समाधानाचा एक सुस्कारा सोडला आणि खुर्चीवर रेलून डोळे मिटून दोन्ही पाय समोरच्या टेबलावर ठेवले. आनंदानें त्यांचें सर्वांग क्षणभर शिथिल झाल्यासारखें दिसून आलें.

कांहीं वेळपर्यंत ते असेच पडून राहिले होते. नंतर पाय खालीं घेऊन उत्साह-भरानें ते म्हणाले, " आतां तूंच विचार करून पहा पोरी, कुठून हें काय झालं ! सर्वशक्तिमान् परमेश्वराचा हात यांत स्पष्ट दिसत नाहीं का तुला ?— " अचला मुकाट्यानें त्यांच्या तोंडाकडे पहात राहिली होती, तिच्या उत्तराची अपेक्षा न करतां ते बोलत होते, " अगदीं समोरसमोर दिसतंय मला—ही केवळ त्याची कृपा. तुला काय सांगूं पोरी, गेलीं दोन वर्षं एक रात्र सुद्धां मला कधीं झोंप आली नाहीं—सारखी हांक घालतोंय देवाला. सुरेशला पाहिल्याबरोबरच मला पटलं, कीं गेल्या जन्मीं तो माझ्या पोटचा गोळा होता ! "

अचला मुकाट्यानें बसून राहिली होती. बापाची सांसारिक परिस्थिति चांगली नाहीं हें तिला माहित होतें, पण तिची मजल आंतून एव्हढी दूर गेली होती याची तिला कल्पना नव्हती. सारखीं दोन वर्षं ईश्वराची एकाग्र आराधना केल्या-मुळें त्या मंगलमयाच्या आशीर्वादानें त्यांचें संकट अकस्मात् ओसरलें खरें, पण आपल्यावर आलेलें संकट मात्र त्याहीपेक्षां भयंकर आणि भानगडीचें होऊन गेलें आहे असें तिला वाटलें. सुरेशकडून पैसे घेण्याच्या बाबतींत तिनें आपल्या मनाशीं थोड्या वेळापूर्वी जो संकल्प केला होता तो आतां मोडल्यावांचून गत्यंतर नव्हतें. त्या बाबतींत एव्हढासुद्धां अडथळा करणें आतां मुष्किलीचें होतें. कांहीं कां होईना, त्याचे पैसे आतां घ्यायलाच हवे होते.

संध्याकाळच्या उपासनेसाठीं केदारबाबू उठून निघून गेले. झालेल्या प्रकाराच्या बाबतींत आरंभापासून शेवटापर्यंत चिकित्सा करून विचार करण्याच्या उद्देशानें अचला तिथेंच स्तब्ध बसून राहिली.

हे दोघेही मित्र एकाएकीं तिच्या जीवनांत अशा एका सांध्यावर, अशा विलक्षण रीतीनें येऊन जोडीनें उभे राहिले होते, कीं त्यांपैकीं एकाला आज 'जा' म्हणून निरोप द्यायचा प्रसंग आला होता यांत एव्हढीसुद्धां शंका नव्हती . पण कुणाला ? कोण तो ? महिमचा तिच्यावर असंदिग्ध विश्वास होता. कर्तव्याच्या कोणत्या आकर्षणामुळें कोण जाणे, तो निश्चित आणि निरुद्वेग होऊन बसला होता. त्याची शांत आणि गंभीर मुद्रा आठवतांच अचलेचे डोळे एकाएकीं पाण्यानें भरून आले. त्याचा कांहींच अपराध नव्हता—पण जा म्हणतांच तो मुकाट्यानें निघून गेला असता—उभ्या आयुष्यांत कोणतेंही कारण काढून किंवा निमित्त करून तो पुन्हां तिच्या वाटेला आला नसता. अचलेला अगदीं उघड उघड दिसून येत होतें, कीं या निरोप देण्याच्या अकल्पित प्रसंगाच्या वेळीं त्याचें निश्चल गांभीर्य एक तिळभर सुद्धां ढळणार नाहीं, कुणालाही तो दोष देणार नाहीं, कदाचित् असें कां झालें म्हणून सुद्धां विचारून घेण्याचा प्रयत्न करणार नाहीं—कदाचित् आकस्मिक आश्चर्यामुळें अंतःकरणाला होणाऱ्या वेदनेची एखादी अस्पष्टशी रेषा त्याच्या मुद्रेवर दिसून येईल,—पण तिच्या-खेरीज ती कुणाच्या नजरेला सुद्धां येणार नाहीं.

त्यानंतर एके दिवशीं सुरेशचें लग्न झाल्याची बातमी त्याच्या कानीं जाईल. ती ऐकतांच त्या क्षणाला बेसावधपणें कदाचित् त्याच्या तोंडून एखादा सुस्कारा निघून जाईल—कदाचित् उगीच थोडेंसें हंसून टाकून तो आपल्या कामाला लागेल !

या साऱ्या प्रसंगाचीं कल्पनाचित्रें नजरेसमोर उभीं करतांना त्या निर्जन जागीं तिचा सारा चेहरा लाजेनें आणि शरमेनें लालीलाल होऊन गेला.

## ९

दहाबारा दिवस निघून गेले. केदारबाबूंची वृत्ति पाहिली म्हणजे असें वाटे, कीं तारुण्यांत सुद्धां ते इतक्या उत्साहानें वावरत नसावे. आज संध्याकाळीं बायॉस्कोप पाहून परततांना गोलदिघीच्या जवळपास येतांच ते एकदम गाडींतून उतरायच्या तयारीनें म्हणाले, " सुरेश, मी इथूनच समाजांत पायीपायीं जाईन.

तुम्ही घरीं जा—" असें म्हणून ते हातांतली काठी फिरवीत भरभरा चालते झाले. तें पाहून सुरेश म्हणाला, " तुझ्या बाबांची प्रकृति आजकाल बरीच चांगली असल्याचं दिसतं. "

त्याच बाजूकडे पाहून अचला म्हणाली, " हो. आपल्याच कृपेनं. "

गाडीनें वळण घेतलें त्यावेळीं ते दृष्टीआड झाले. अचलेचा उजवा हात आपल्या हातीं ओढून घेऊन सुरेश म्हणाला, " तूं असं बोललीस कीं माझ्या मनाला फार लागतं. म्हणूनच का पुन्हां पुन्हां असं बोलतेस अचला ?

अचला उदासपणें थोडीशी हंसून म्हणाली, " एव्हढ्या मोठ्या उपकाराची विस्मृती होईल म्हणूनच जेव्हां तेव्हां आठवण करतें. आपल्या मनाला लागावें म्हणून नव्हे. "

तिचा हात उगीच थोडासा दाबून सुरेश म्हणाला, " त्याचमुळं तर तें माझ्या मनाला जास्तच लागतं. "

" कां ? "

" या उपकाराच्या जाणिवेची आठवण जागवूनच तूं आपल्या मनाला उभें ठेवते आहेस हें मला चांगलं कळतंय. त्याखेरीज दुसरा कांहींच आधार नाहीं तुला. खरं कीं नाहीं सांग पाहूं ? "

" आणि नाहीं सांगितलं तर ? "

" सांगायचं नसलं तर सांगूं नकोस. पण मला तूं 'तूं, तुम्हीं' असं कधीं म्हणणारच नाहींस का ? "

अचलेचा चेहरा एकदम पडला. खालीं मान घालून ती हळूच म्हणाली, " केव्हांतरी एकदां म्हणायला हवं तसं तें माहितच आहे आपल्याला. "

तिचा चेहरा उतरलेला पाहून सुरेशनें एक सुस्कारा सोडला. तो म्हणाला, " असं आहे ना ? मग तशी सुरवात चार दिवस आधींच केली तर काय बिघडलं ? "

अचलेनें उत्तर दिलें नाहीं. मन ठिकाणावर नसल्यासारखी ती रस्त्याकडे पहात राहिली होती. एक मिनिटभर थांबून सुरेश एकदम म्हणाला, " मला वाटतं महिमला सारं कांहीं कळलंय ! "

अचलेनें दचकून मान वळवली. हा वेळपर्यंत तिचा एक हात त्याच्या हातांतच होता. तो ओढून घेऊन तिनें विचारलें, " हें कसं कळलं आपल्याला ? " बोलतांना तिचा आवाज बावरल्यासारखा झाल्याचें कानीं आल्यामुळें सुरेशला तें जाणवलें. तो म्हणाला, "नाहींतर इतक्यांत तो आला असता. त्याला जाऊन पंधरासोळा दिवस झाले की. "

अचला म्हणाली, " आजचा दिवस धरून एकोणीस झाले. बरं, बाबांनीं त्यांना पत्रबित्र तर लिहिलं नाहीं ? कळलंय का आपल्याला ? "

सुरेश थोडक्यांत म्हणाला, " नाहीं —माहित नाहीं. "

गांवाहून ते परत आल्याचं तरी कळलंय का आपल्याला ? "

" नाहीं—तेंही माहित नाहीं. "

अचला सारखी गाडीबाहेर नजर लावून राहिली होती. ती हळूच म्हणाली, "असंच असेल तर बाबांनीं चौकशी करून एक पत्र पाठवून सारी हकिगत त्यांना कळवायला हवी होती. एकदम एक दिवशीं ते येऊन हजर झाले तर ? "

पुन्हा कांहीं वेळ दोघेंही मुकाट्यानें बसलीं होतीं. तिचा शिथिल हात पुन्हां एकदां आपल्या हातीं घेऊन तो हळूच बोलूं लागला, " जेव्हां हें माझ्या ध्यानीं येतं, कीं माझ्याबद्दल तुझ्या मनांत केव्हां आदरबुद्धी सुद्धां उत्पन्न व्हायची नाहीं, तेव्हां मला फार दुःख होतं अचला. पैशाच्या जोरावर मी तुला हिसकावून घेतली असंच सदोदित तुला वाटणार. माझी चूक झालीय ही. "

अचलेनें एकदम मान वळवली आणि त्याला थांबवून म्हटलें, " आपण असं कांहीं बोलूं नका. मी तुम्हांला एव्हढा सुद्धां दोष देत नाहीं—" जरा थांबून ती म्हणाली, "जगांत जिकडेतिकडे पैशाचाच जोर चालतो हें तर सर्वांनाच कळतं. पण आपण कांहीं त्या जोरावर अधिकार गाजवला नाहीं. कदाचित् बाबांना हें कळत नसेल—पण सारं कांहीं कळून सवरून मी जर आपल्याबद्दल अनादर बाळगला तर मला नरकांत सुद्धां जागा मिळायची नाहीं. "

कुणी एव्हढेंसें जरी कळवळून बोललें तरी सुरेश एकदम गळून जात असे. अचलेच्या या एव्हढ्याशा गोड बोलांमुळें त्याच्या डोळ्यांना एकदम पाणी आलें.

तें पाणी त्यानें अचलेचे दोन्ही हात आपल्या हातीं धरून त्या हातांनीं पुसून घेतलें आणि म्हटलें, " या दोषाचं, या चुकीचं मोल मी कमी मानतों असं समजूं नकोस. पण मी अगदीं दुबळा आहें—भारीच दुबळा आहें ! असला आघात महिम सहन करील–पण त्यानं माझं काळीज फाटून जाईल—" असें म्हणून बसलेला धक्का सावरून घेऊन तो गंहिवरल्या आवाजानें म्हणाला,—" तूं माझी नव्हेस, दुसऱ्या कुणाची तरी आहेस अशी कल्पना सुद्धां माझ्यानं करवत नांहीं. तूं माझी होणार नाहींस असं नुसतं मनांत आलं तरी सुद्धां मझ्या पाया-खालची माती ढासळूं लागते. "

रस्त्यावरची गॅासची बत्ती तेवत होती. गाडी त्यांच्या गल्लींत वळल्यावर त्या बत्तीचा झळझळीत प्रकाश जेव्हां सुरेशच्या चेहऱ्यावर पडला तेव्हां त्याचे डोळे पाण्यानें भरून आले असल्याचें अचलेला दिसून आलें. क्षणभऱ्याच्या भाव-विवशतेनें सुद्धां आजवर तिच्या हातून जी गोष्ट घडली नव्हती ती यावेळीं अक-स्मात होऊन गेली. पुढें झुकून तिनें आपल्या हातांनीं त्याचे डोळे पुसले आणि म्हटलें, " मी केव्हांही बांबांची अवज्ञा केली नाहीं—अन् त्यांनीं तर मला तुमच्या हातीं दिली आहे. "

सुरेशनें अचलेचा तो हात पकडून आपल्या तोंडाजवळ नेला आणि त्याचें पुन्हांपुन्हां चुंबन घेतघेत तो म्हणाला, " सर्वांपेक्षां हेंच मोठं बक्षीस मिळालं मला अचला. यापेक्षां आणखी कांहीं नको मला. पण एव्हढ्या मिळकतीपासून तरी मला दुरावूं देऊं नकोस. "

गाडी घरासमोर येऊन थांबली. दार उघडून सईस बाजूला सरला. सुरेश आधीं स्वतः उतरला आणि अचलेचा हात धरून तो तिला काळजीपूर्वक गाडी-खालीं उतरून घेतो आहे तोंच त्यांची नजर एकाचवेळीं समोर गेली. समोरच महिम उभा होता. त्या नजरानजरेसरशीं तीं दोघेंही एका क्षणांत दग-डाच्या पुतळीसारखीं गोठून गेलीं.

दुसऱ्याच क्षणाला अचलेनें अगदीं अस्पष्टशी केविलवाणी किंकाळी फोडल्या-सारखा आवाज केला आणि एकदम आपला हात सोडवून घेऊन ती मागें हटली.

महिम आश्चर्यानें हतबुद्ध होऊन म्हणाला, " तूं इथं सुरेश ? "

सुरेशच्या तोंडातून पहिल्यानें शब्द बाहेर निघाला नाहीं. एक मोठा आवंढा गिळून पांढऱ्या पडलेल्या चेहऱ्यावर बळेंच कोरडें हंसू आणून तो म्हणाला, "वा! महिम का! पाह्यलंच नाहीं मी. काय भानगड आहे ही? केव्हां आलास?"—असें म्हणून तो जवळ आला आणि हंसण्याचें ढोंग करून हातवारे करीत अचलेला म्हणाला, "छान गंमत केली माझी आपल्या बाबांनी! ते गेले समाजांत. अन् पोंचवायचा भार टाकला या गरीबावर. एकापरीनं बरं झालं—नाहींतर महिमची अशी गांठ पडली नसती. इतके दिवस गांवीं करीत होतास तरी काय?"

महिम म्हणाला, "काम होतं." तो इतका आश्चर्यचकित झाला होता कीं अचलेला एक नमस्कार करायचें सुद्धां त्याला सुचलें नाहीं.

सुरेश त्याला एक ढुसणी देऊन म्हणाला, "विलक्षण माणूस आहेस बुवा. इकडे आम्ही काळजीनें मरतों आहों अन् तुझ्याकडून एक बोटभर चिठ्ठीसुद्धां नाहीं! उभा काय राह्यलास? चल ना वर." असें म्हणून बळेंबळेंच तो त्याला धरून ओढून वर घेऊन गेला. पण बैठकखान्यांत ज्यावेळीं तीं सारीं येऊन बसलीं त्यावेळीं अगदीं अचानक त्याची अस्वाभाविक प्रगल्भता तिथल्या-तिथें विरून गेली. गॅसच्या दिव्याच्या झगझगीत प्रकाशांत त्याचा चेहरा काळा-ठिक्कर पडला. एकदोन मिनिटें कुणीच कांहीं बोललें नाहीं.

एकदां आपल्या मित्राकडे आणि एकदां अचलेकडे शून्य दृष्टीनें पाहून महिमनें कोरड्या भाषेंत विचारलें, "सारीं खुशाल?"

अचलेनें मानेनेंच होकार दिला पण नजर करून पाहिलें नाहीं. महिम म्हणाला, "भयंकर आश्चर्यचकित होऊन गेलोंय मी—पण तुमची अन् सुरेशची ओळख झाली कशी?"

अचलेनें नजर वर करून पाहून अस्वस्थ होऊन म्हटलें, "बाबांचं चार हजार रुपये देणं यानीं फेडून टाकलं."

तिच्या त्या मुद्रेकडे पहातांच महिमच्या तोंडून एव्हढेच शब्द कसेबसे बाहेर पडले, "बरं मग पुढं?"

"पुढं काय तें बाबांना विचारा!" असें म्हणूनच अचला घाईघाईनें बाहेर निघून गेली.

महिम कांहीं वेळ तसाच बसून राहिला होता. शेवटीं आपल्या मित्राकडे वळून त्यानें विचारलें, " काय भानगड आहे सुरेश ? "

सुरेशनें उर्मटपणानें उत्तर दिलें, " पैसा म्हणजेच कांहीं तुझ्यासारखा माझा जीवप्राण नाहीं ! कुणी गृहस्थमाणूस संकटांत सांपडला, त्यानं मदत मागितली, मी दिली—बस्स ! एव्हढंच ! उद्यां त्यांनीं ती रक्कम नाहीं फेडली तर तो कांहीं माझा दोष नाहीं. तरी सुद्धां मला दोष ठेवायचाच असेल तुला तर शंभर वेळ ठेव—माझी कांहीं हरकत नाहीं. "

आपल्या मित्राचें हें असंबद्ध भाषण आणि तें बोलतांना त्यानें आणलेला आचरटपणाचा आव पाहून महिम खरोखरच वेड्यासारखा पहात राहिला. शेवटीं तो म्हणाला, " उगीच मी तुला काय म्हणून दोषी ठरवायला जाईन ? तुझा उद्देशच मला कळत नाहीं सुरेश. कृपाकरून जरा उघड करून सांगशील का ? कळूं दे की मला काय तें. "

सुरेश तशाच रूक्ष मुद्रेनें म्हणाला, " आणखी उघड करून काय सांगायचं ? अन् सांगायला असं आहे काय ? "

महिम म्हणाला, " आहे तर ! ज्या दिवशीं मी घरीं गेलों त्या दिवसापर्यंत यांची तुझी ओळख नव्हती. इतक्यांत तुम्हां सर्वांचा एव्हढा घरोबा वाढला तरी कसा ? आणि एका ब्राह्म कुटुंबाच्या संकटकालीं त्यांना चार हजार रुपये देण्या-इतकी एव्हढी मनाची उदारता तुझ्याठायीं आली कुठून ? निदान एव्हढं जरी मला समजावून दिलंस तरी मी समाधान मानीन सुरेश. "

सुरेश म्हणाला, " तें होऊन जाईल, पण सध्यां मला गप्पा मारायला वेळ नाहीं. आतां गेलंच पाहिजे नाहींतर असं कर, केदारबाबूंनाच विचार. सारं कांहीं सांगण्यासाठीं तुझी वाटच पहात राहिलेयत. "

" तेंच बरं ! " असें म्हणून महिम उठून उभा राहिला आणि म्हणाला, " हें सारं कांहीं कळून घ्यायची फार जिज्ञासा होती मला पण ते येईपर्यंत वाट पाहिला मला वेळ नाहीं. मी चाललों – "

सुरेश स्वस्थ बसून राहिला होता—तो कांहींच बोलला नाहीं.

महिम बाहेर आला तेव्हां त्याला दिसून आलें, कीं समोरच्या रेलिंगला

टेकून याच बाजूकडे पहात अचला काळोखांत उभी होती. पण ती पुढें आली नाहीं, कीं बोलायलाही सरसावली नाहीं, असें पाहून तोही मुकाट्यानें जिना उतरून खालीं निघून गेला.

## १०

कांहीं अतिशय जरूरी असलेलीं औषधें खरेदी करण्यासाठीं महिम कल्कत्याला आला होता. अर्थात् रात्रीच्याच गाडीनें तो गावीं निघून गेला. सुरेशनें चौकशी केली त्यावेळीं महिम आपल्या बिऱ्हाडीं आला नव्हता असें त्याला कळून आलें.-तीनचार दिवसांनंतर तिसऱ्या प्रहरीं केदारबाबूंच्या बैठकखान्यांत याच विषयाची चर्चा सुरू होती.

केदारबाबूंना अलीकडे बायॉस्कोपचें वेड लागलें होतें. चहा घेऊन होतांच बाहेर पडायचें असें ठरलें होतें. सुरेशची गाडी उभी होती—इतक्यांत अकस्मात् एखाद्या खलग्रहासारखा महिम येऊन दाराशीं उभा राहिला. सर्वांनीं त्याच्याकडे पाहिलें आणि सर्वांचीच मुद्रा एकदम पालटली.

केदारबाबूंनीं विरस मुद्रेनें बळेंबळेंच हंसायचा प्रयत्न करीत त्याचें स्वागत केलें, "ये महिम. सारीं खुशाल ?"

महिमनें नमस्कार केला आणि तो आंत आला. इतके दिवस गांवीं राहिल्याचें कारण विचारलें तेव्हां, 'तसेंच जरूरीचें काम होतें' असें त्यानें उत्तर दिलें. टेबलावर पडलेलें एक वर्तमानपत्र हातीं घेऊन सुरेश तें वाचूं लागला. शेजारच्या चौकीवरचें शिलाईचें सामान उचलून घेऊन अचला विणूं लागली. अर्थात् पुढें भाषण सुरू झालें तें केदारबाबूंबरोबर.

अचला एकदम मधेंच उठली आणि बाहेर जाऊन तशीच एका मिनिट-भऱ्यानें परत येऊन आपल्या जागीं बसली. कांहीं वेळानें वर टांगलेला पंखा हळूहळू चालू झाला. एकदम वारा सुरू झालेला पाहून केदारबाबू खूप होऊन म्हणाले, "बरं झालं ! बेट्या पंखेवाल्याला एव्हढ्या वेळानं आमची दया आली."

सुरेशनें वांकडी नजर करून हळूच निरखून पाहिलें तेव्हां महिमच्या कपाळावर घामाचे थेंब चमकत असल्याचें त्याला दिसून आलें. अचला कां

महिम कांहीं वेळ तसाच बसून राहिला होता. शेवटीं आपल्या मित्राकडे वळून त्यानें विचारलें, " काय भानगड आहे सुरेश ? "

सुरेशनें उर्मटपणानें उत्तर दिलें, " पैसा म्हणजेच कांहीं तुझ्यासारखा माझा जीवप्राण नाहीं ! कुणी गृहस्थमाणूस संकटांत सांपडला, त्यानं मदत मागितली, मी दिली—बस्स ! एव्हढंच ! उद्यां त्यांनीं ती रक्कम नाहीं फेडली तर तो कांहीं माझा दोष नाहीं. तरी सुद्धां मला दोष ठेवायचाच असेल तुला तर शंभर वेळ ठेव—माझी कांहीं हरकत नाहीं. "

आपल्या मित्राचें हें असंबद्ध भाषण आणि तें बोलतांना त्यानें आणलेला आचरटपणाचा आव पाहून महिम खरोखरच वेड्यासारखा पहात राहिला. शेवटीं तो म्हणाला, " उगीच मी तुला काय म्हणून दोषी ठरवायला जाईन ? तुझा उद्देशच मला कळत नाहीं सुरेश. कृपाकरून जरा उघड करून सांगशील का ? कळूं दे की मला काय तें. "

सुरेश तशाच रूक्ष मुद्रेनें म्हणाला, " आणखी उघड करून काय सांगायचं ? अन् सांगायला असं आहे काय ? "

महिम म्हणाला, " आहे तर ! ज्या दिवशीं मी घरीं गेलों त्या दिवसापर्यंत यांची तुझी ओळख नव्हती. इतक्यांत तुम्हां सर्वांचा एव्हढा घरोबा वाढला तरी कसा ? आणि एका ब्राह्म कुटुंबाच्या संकटकालीं त्यांना चार हजार रुपये देण्याइतकी एव्हढी मनाची उदारता तुझ्याठायीं आली कुठून ? निदान एव्हढं जरी मला समजावून दिलंस तरी मी समाधान मानीन सुरेश. "

सुरेश म्हणाला, " तें होऊन जाईल, पण सध्यां मला गप्पा मारायला वेळ नाहीं. आतां गेलंच पाह्यजे नाहींतर असं कर, केदारबाबूंनाच विचार. सारं कांहीं सांगण्यासाठीं तुझी वाटच पहात राह्यलेयत. "

" तेंच बरं ! " असें म्हणून महिम उठून उभा राहिला आणि म्हणाला, " हें सारं कांहीं कळून घ्यायची फार जिज्ञासा होती मला पण ते येईपर्यंत वाट पाह्यला मला वेळ नाहीं. मी चाललों – "

सुरेश स्वस्थ बसून राहिला होता—तो कांहींच बोलला नाहीं.

महिम बाहेर आला तेव्हां त्याला दिसून आलें, कीं समोरच्या रेलिंगला

टेकून याच बाजूकडे पहात अचला काळोखांत उभी होती. पण ती पुढें आली नाहीं, कीं बोलायलाही सरसावली नाहीं, असें पाहून तोही मुकाट्यानें जिना उतरून खालीं निघून गेला.

## १०

कांहीं अतिशय जरूरी असलेलीं औषधें खरेदी करण्यासाठीं महिम कल्कत्त्याला आला होता. अर्थात् रात्रीच्याच गाडीनें तो गावीं निघून गेला. सुरेशनें चौकशी केली त्यावेळीं महिम आपल्या बिऱ्हाडीं आला नव्हता असें त्याला कळून आलें.–तीनचार दिवसांनंतर तिसऱ्या प्रहरीं केदारबाबूंच्या बैठकखान्यांत याच विषयाची चर्चा सुरू होती.

केदारबाबूंना अलीकडे बायॉस्कोपचें वेड लागलें होतें. चहा घेऊन होतांच बाहेर पडायचें असें ठरलें होतें. सुरेशची गाडी उभी होती—इतक्यांत अकस्मात् एखाद्या खलग्रहासारखा महिम येऊन दाराशीं उभा राहिला. सर्वांनीं त्याच्याकडे पाहिलें आणि सर्वांचीच मुद्रा एकदम पालटली.

केदारबाबूंनीं विरस मुद्रेनें बळेंबळेंच हंसायचा प्रयत्न करीत त्याचें स्वागत केलें, "ये महिम. सारीं खुशाल?"

महिमनें नमस्कार केला आणि तो आंत आला. इतके दिवस गांवीं राहिल्याचें कारण विचारलें तेव्हां, 'तसेंच जरूरीचें काम होतें' असें त्यानें उत्तर दिलें. टेबलावर पडलेलें एक वर्तमानपत्र हातीं घेऊन सुरेश तें वाचूं लागला. शेजारच्या चौकीवरचें शिलाईचें सामान उचलून घेऊन अचला विणूं लागली. अर्थात् पुढें भाषण सुरू झालें तें केदारबाबूंबरोबर.

अचला एकदम मधेंच उठली आणि बाहेर जाऊन तशीच एका मिनिटभऱ्यानें परत येऊन आपल्या जागीं बसली. कांहीं वेळानें वर टांगलेला पंखा हळूहळू चालू झाला. एकदम वारा सुरू झालेला पाहून केदारबाबू खूष होऊन म्हणाले, "बरं झालं! बेट्या पंखेवाल्याला एव्हढ्या वेळानं आमची दया आली."

सुरेशनें वांकडी नजर करून हळूच निरखून पाहिलें तेव्हां महिमच्या कपाळावर घामाचे थेंब चमकत असल्याचें त्याला दिसून आलें. अचला कां

महिम कांहीं वेळ तसाच बसून राहिला होता. शेवटीं आपल्या मित्राकडे वळून त्यानें विचारलें, “ काय भानगड आहे सुरेश ? ”

सुरेशनें उर्मटपणानें उत्तर दिलें, “ पैसा म्हणजेच कांहीं तुझ्यासारखा माझा जीवप्राण नाहीं ! कुणी गृहस्थमाणूस संकटांत सांपडला, त्यानं मदत मागितली, मी दिली—बस्स ! एव्हढंच ! उद्यां त्यांनीं ती रक्कम नाहीं फेडली तर तो कांहीं माझा दोष नाहीं. तरी सुद्धां मला दोष ठेवायचाच असेल तुला तर शंभर वेळ ठेव—माझी कांहीं हरकत नाहीं. ”

आपल्या मित्राचें हें असंबद्ध भाषण आणि तें बोलतांना त्यानें आणलेला आचरटपणाचा आव पाहून महिम खरोखरच वेड्यासारखा पहात राहिला. शेवटीं तो म्हणाला, “ उगीच मी तुला काय म्हणून दोषी ठरवायला जाईन ? तुझा उद्देशच मला कळत नाहीं सुरेश. कृपाकरून जरा उघड करून सांगशील का ? कळूं दे की मला काय तें. ”

सुरेश तशाच रूक्ष मुद्रेनें म्हणाला, “ आणखी उघड करून काय सांगायचं ? अन् सांगायला असं आहे काय ? ”

महिम म्हणाला, “ आहे तर ! ज्या दिवशीं मी घरीं गेलों त्या दिवसापर्यंत यांची तुझी ओळख नव्हती. इतक्यांत तुम्हां सर्वांचा एव्हढा घरोबा वाढला तरी कसा ? आणि एका ब्राह्म कुटुंबाच्या संकटकालीं त्यांना चार हजार रुपये देण्याइतकी एव्हढी मनाची उदारता तुझ्याठायीं आली कुठून ? निदान एव्हढं जरी मला समजावून दिलंस तरी मी समाधान मानीन सुरेश. ”

सुरेश म्हणाला, “ तें होऊन जाईल, पण सध्यां मला गप्पा मारायला वेळ नाहीं. आतां गेलंच पाहिजे नाहींतर असं कर, केदारबाबूंनाच विचार. सारं कांहीं सांगण्यासाठीं तुझी वाटच पहात राहिलेयत. ”

“ तेंच बरं ! ” असें म्हणून महिम उठून उभा राहिला आणि म्हणाला, “ हें सारं कांहीं कळून घ्यायची फार जिज्ञासा होती मला पण ते येईपर्यंत वाट पाहिला मला वेळ नाहीं. मी चाललों – ”

सुरेश स्वस्थ बसून राहिला होता—तो कांहींच बोलला नाहीं.

महिम बाहेर आला तेव्हां त्याला दिसून आलें, कीं समोरच्या रेलिंगला

टेकून याच बाजूकडे पहात अचला काळोखांत उभी होती. पण ती पुढें आली नाहीं, कीं बोलायलाही सरसावली नाहीं, असें पाहून तोही मुकाट्यानें जिना उतरून खालीं निघून गेला.

## १०

कांहीं अतिशय जरूरी असलेलीं औषधें खरेदी करण्यासाठीं महिम कल्कत्त्याला आला होता. अर्थात् रात्रीच्याच गाडीनें तो गावीं निघून गेला. सुरेशनें चौकशी केली त्यावेळीं महिम आपल्या बिऱ्हाडीं आला नव्हता असें त्याला कळून आलें.– तीनचार दिवसांनंतर तिसऱ्या प्रहरीं केदारबाबूंच्या बैठकखान्यांत याच विषयाची चर्चा सुरू होती.

केदारबाबूंना अलीकडे बायॉस्कोपचें वेड लागलें होतें. चहा घेऊन होतांच बाहेर पडायचें असें ठरलें होतें. सुरेशची गाडी उभी होती—इतक्यांत अकस्मात् एखाद्या खलग्रहासारखा महिम येऊन दाराशीं उभा राहिला. सर्वांनीं त्याच्याकडे पाहिलें आणि सर्वांचीच मुद्रा एकदम पालटली.

केदारबाबूंनीं विरस मुद्रेनें बळेंबळेंच हंसायचा प्रयत्न करीत त्याचें स्वागत केलें, “ ये महिम. सारीं खुशाल ? ”

महिमनें नमस्कार केला आणि तो आंत आला. इतके दिवस गांवीं राहिल्याचें कारण विचारलें तेव्हां, ‘ तसेंच जरूरीचें काम होतें ’ असें त्यानें उत्तर दिलें. टेबलावर पडलेलें एक वर्तमानपत्र हातीं घेऊन सुरेश तें वाचूं लागला. शेजारच्या चौकीवरचें शिलाईचें सामान उचलून घेऊन अचला विणूं लागली. अर्थात् पुढें भाषण सुरू झालें तें केदारबाबूंबरोबर.

अचला एकदम मधेंच उठली आणि बाहेर जाऊन तशीच एका मिनिट-भऱ्यानें परत येऊन आपल्या जागीं बसली. कांहीं वेळानें वर टांगलेला पंखा हळूहळू चालू झाला. एकदम वारा सुरू झालेला पाहून केदारबाबू खूष होऊन म्हणाले, “ बरं झालं ! बेट्या पंखेवाल्याला एव्हढ्या वेळानं आमची दया आली.”

सुरेशनें वांकडी नजर करून हळूच निरखून पाहिलें तेव्हां महिमच्या कपाळावर घामाचे थेंब चमकत असल्याचें त्याला दिसून आलें. अचला कां

उठून गेली, एकाएकीं पंख्येवाल्याला कां निष्कारण दया आली, याचें सारें इंगित विजेच्या वेगानें ध्यानीं आल्यामुळें, केदारबाबू ज्या वाऱ्यामुळें खूष झाले त्याच वाऱ्यामुळें सुरेशच्या सर्वांगाचा भडका उडाला. चटकन खिशांतलें घड्याळ काढून तें उघडून पहात तो म्हणाला, " पांच वाजून गेले. आतां उशीर करून चालायचं नाहीं केदारबाबू. "

चाललेलें भाषण बंद करून केदारबाबूंनी चहासाठीं हाकाहाकी करायला सुरवात केली त्यावेळीं चहाचा सारा सरंजाम घेऊन नोकर हजर झाला. शिलाईचें सामान बाजूला ठेवून अचलेनें दोन पेले चहा तयार केला आणि एक पेला सुरेशपुढें आणि दुसरा बापाच्यासमोर आणून ठेवला तेव्हां त्यांनीं विचारलें, " तूं घेत नाहींस का बाळ ? "

अचला नकार देत म्हणाली, " नाहीं बाबा, भारी उकाडा होतोय. "

तितक्यांत त्यांची नजर महिमकडे गेली, त्यावेळीं ते धडपडून म्हणाले, " हें काय ? महिमला दिला नाहींस ? तुला चहा नको का महिम ? "

महिमच्या तोंडून उत्तर यायच्यापूर्वींच अचला महिमकडे वळून त्याच्याकडे पहात अगदीं स्वाभाविकपणें म्हणाली, " नाहीं. या अशा उकाड्यांत चहा घेण्यांत अर्थ नाहीं. शिवाय असा अवेळीं चहा त्यांना सोसत नाहीं. "

छातीवर पडलेला भलामोठा बोजा कुणीतरी मंत्राबरोबर फुंकून उडवला असें महिमला वाटलें. त्याच्यानें कांहीं बोलवलें नाहीं. आश्चर्यचकित होऊन डोळे तारवटून तो नुसता पहात राहिला. अचला म्हणाली, " जरा थांबा. मी लाईमज्यूस घालून सरबत तयार करून आणतें. " असें म्हणून त्याच्या संमतीची वाट न पहातां ती तिथून निघून गेली. सुरेश दुसरीकडे तोंड फिरवून कळसूत्री बाहुलीप्रमाणें हळुहळू चहा घेत होता खरा, पण त्याला त्या चहाच्या प्रत्येक घोटासरशीं तोंडांत विषाच्या कडवटपणाची जाणीव होत होती.

चहा घेऊन होतांच घाईघाईनें कपडे करून केदारबाबू आंत आले त्यावेळीं अचला पूर्वींच्याच जागीं बसून एकचित्तानें शिलाई करीत असल्याचें त्यांना दिसून आलें. आश्चर्यचकित होऊन त्यानीं गडबडीनें विचारलें, " अजून शिलाई करीत बसलीयस का ? जायची तयारी केली नाहींस वाटतं ? "

अचलेनें वर पाहून शांतपणें म्हटलें, " मी येत नाहीं बाबा. "

" येत नाहीं ? हें काय बोलणं झालं ? "

" नाहीं बाबा, आज तुम्हींच जा. मला बरं वाटत नाहीं. " असें म्हणून ती उगीच थोडीशी हंसली.

सुरेश चिडला होता, रागवलाही होता. पण राग आंतल्याआंत दाबून तो म्हणाला, " चला केदारबाबू, आज आपणच जाऊं. कदाचित खरोखरच तिची प्रकृती बरी नसेल. उगीच कशाला तिला त्रास देतां ? "

तो मनांतून रागवला होता हें केदारबाबूंनीं त्याच्याकडे पाहिलें त्याक्षणींच त्यांच्या ध्यानीं आलें. ते मुलीला म्हणाले, " काय झालंय तुझी प्रकृती बिघडायला ?"

अचला म्हणाली, " नाहीं बाबा, प्रकृती तशी कांहीं बिघडली नाहीं, तशी मी बरी आहें. "

सुरेश महिमकडे पाठ करून उभा राहिलेला होता त्यामुळें त्याचा चेहरा त्याला दिसला नाहीं. तो म्हणाला, " चला. आपण आतां जाऊं केदारबाबू. तसं कांहीं-तरी घरींच काम असेल तिला — उगीच सक्ती करायची काय जरूरी ? "

केदारबाबूंनीं कडकावून विचारलें, " घरीं काम आहे का तुला ? "

अचलेनें मान हालवून सांगितलें, " नाहीं. "

केदारबाबू एकदम ओरडून म्हणाले, " चल म्हणतोंय ना — हट्टी, बेफाम कार्टी कुठली ! "

अचलेच्या हातची शिलाई गळून खालीं पडली. स्तंभीत होऊन तिनें एव्हढाले मोठे डोळे करून पहिल्यानें सुरेशकडे आणि नंतर आपल्या बापाकडे पाहिलें— आणि एकदम पाठ फिरवून ती घाईघाईनें निघून गेली.

सुरेश काळवंडून म्हणाला, " साऱ्याच बाबतींत आपली जबरदस्ती ! पण मला आतां थांबायला वेळ नाहीं — मला आतां जायला परवानगी द्या. "

केदारबाबूंना आपल्या त्या असभ्य वर्तनाची मनांतल्यामनांत लाज वाटली होती.—पण सुरेशच्या उद्गारांमुळें त्यांचा राग भडकला—पण त्यांनीं तो राग काढला महिमवर. तो बिचारा अत्यंत संकोचित होऊन अस्वस्थपणें जायला निघत होता त्याला केदारबाबू म्हणाले, " तुझं कांहीं काम आहे का महिम ? "

मन आवरून महिम उठून उभा राहिला आणि म्हणाला, " नाहीं. "

केदारबाबू निघायची तयारी करीत म्हणाले, " तर मग आज आम्हीं जरा घाईत आहों. पुन्हां केव्हां तरी आलास तर—"

महिम म्हणाला, " बरं आहे. पण यायची कांहीं विशेष जरूरी आहे का ? "

सुरेशला ऐकवण्यासाठीं केदारबाबू म्हणाले, " माझं स्वतःचं कांहींच काम नाहीं, पण तुला यावंसं वाटलं तर ये—एकदोन बाबतींत बोलून टाकतां येईल. "

तिघेही बाहेर निघाले. खालीं आल्यावर महिमकडे ढुंकूनसुद्धां न पहातां केदारबाबूंना बरोबर घेऊन सुरेश गाडींत बसला. कोचमननें गाडी चालू केली.

महिम थोडीशी वाट चालून पुढें जात आहे तोंच मागून त्याच्या नांवानें हांक मारलेली ऐकूं आली. तो थांबून पाहूं लागला. मागून केदारबाबूंचा नोकर येत होता. धापा टाकीतटाकीत तो बिचारा महिमकडे आला आणि त्यानें एक कागदाचा कपटा त्याच्याहातीं दिला. त्या कागदावर पेन्सिलीनें नुसता एकच शब्द लिहिला होता—' अचला '—

नोकर म्हणाला, " आपल्याला फिरून बोलावलंय. "

तो मागें फिरून आला आणि जिन्यावर पाऊल ठेवीत आहे तोंच अचला समोर उभी असल्याचें त्याला दिसून आलें. तांबडेलाल झालेल्या तिच्या डोळ्यांच्या पापण्या अजूनही ओल्या होत्या.

जवळ येतांच ती म्हणाली, " तुम्ही मला या तुमच्या कसाई दोस्ताच्या हातीं माझा हलाल करण्यासाठीं का ठेवून गेलां होतां ? तुमच्याशीं जो एव्हढा कृतघ्न होतो त्याच्या हातीं मला सोपवून काय म्हणून तुम्ही निघून गेलांत ? " असें म्हणून ती एकदम रडूं लागली.

महिम स्तब्ध होऊन उभा राहिला होता.

एकदोन मिनिटांनीं पदरानें डोळे पुसून घेऊन अचला म्हणाली, " आतां लाज धरून राह्यची वेळ राहिली नाहीं. पाहूं तुमचा उजवा हात - " असें म्हणून तिनें महिमचा उजवा हात ओढून घेऊन आपल्या बोटांतली आंगठी काढून घेऊन ती त्याच्या बोटांत चढवीत म्हटलें, " माझा मनावरचा ताबा

आतां सुटलाय. यापुढं जें करायचं असेल तें तुम्ही करा." असें म्हणून ती एकदम त्याच्या पायाजवळ वांकली आणि एक नमस्कार करून सरळ आंत निघून गेली.

महिम स्वतः बरेंवाईट असें कांहींच बोलला नाहीं. बराच वेळपर्यंत रेलिंगवर भार देऊन तो मुकाट्यानें उभा राहिला होता.

तो जिना उतरला आणि बाहेर निघून गेला.

## ११

संध्याकाळीं खालीं मान घालून महिम हळूहळू आपल्या बिऱ्हाडाचा मार्ग आक्रमीत होता. त्यावेळीं त्याच्या चेहेऱ्याकडे कुणीं पाहिलें असतें तर अगदीं याचवेळीं त्याचा सारा जीव यातनेनें तळमळत बाहेर येण्यासाठीं हृदयाच्या तळाला जीवतोड करून खड्डा खणीत होता. हें कुणाच्याही ध्यानीं येणें कठीण गेलें असतें. कशा रीतीनें सुरेशचा आणि त्यांचा एव्हढा घरोबा जमला, वगैरे गोष्टींचा बारीकसारीक इतिहास जरी अजून त्याला कळला नव्हता तरीही अस्सल परिस्थिती मात्र त्याला कळल्यावांचून राहिली नव्हती.

सुरेशलाही त्यानें लहानपणापासून वेगवेगळ्या स्वरूपांत पाहिलें होतें. योगायोगानें ज्याचा लोभ जडेल त्याच्यासाठीं वाटेल तो त्याग करण्याची त्याची केव्हांही तयारी असे. पैशाची तर गोष्टच नको—केव्हांही तो पैशाबद्दल बेफिकिर असे. मुंगेरला असतांना एके दिवशीं त्यानें आपल्यासाठीं स्वतःचा प्राणही धोक्यांत घातला होता, तोच आज दुसऱ्या एका व्यक्तीच्या अनावर प्रेमानें आपल्याकडे ढुंकून देखील पहात नाहींसा झाला तर त्याला दोष कसला द्यायचा ? अर्थात् हे सगळे प्रकार म्हणजे एक मर्मांतीक दुर्घटनेचे परिपाक आहेत अशी कल्पना करून त्यानें कुणालाही विशेष रीतीनें दोषी ठरवलें नाहीं.

पण या ज्या एव्हढ्या विरोधी आणि प्रचंड शक्ती एकाएकीं जाग्या झाल्या होत्या त्यांना दडपून टाकून अचला पुन्हां आपल्याकडे येईल असें मात्र त्याला वाटलें नव्हतें. म्हणूनच तिचें शेवटचें भाषण ऐकून आणि शेवटचें आचरण पाहून क्षणभर मन अस्थिर होण्यापलीकडे महिमला खरोखरी कोणत्याच प्रकारचें समाधान वाटलें नाहीं.

त्या आंगठीकडे वारंवार पहात असतांना त्याला मुळींच सांत्वना लाभली नाहीं. इकडे तर या प्रकरणाचा शेवटचा निकाल लागणें अवश्य होतें. उगीच अंदाज करून स्वतःची फसवणूक करून घेण्यांत कांहीं अर्थ नव्हता. काय होईल तें होवो, या प्रकरणीं एकदा शेवट लावून घ्यायचाच असा निश्चित संकल्प मनाशीं करून तो आपल्या त्या गरीब दुबळ्यांच्या बोर्डिंगांत रात्रीं आठ वाजतां येऊन पोंचला.

दुसऱ्या दिवशीं दुपार उलटल्यावर तो केदारबाबूंच्या घरीं आला त्यावेळीं कुठेंतरी आमंत्रण असल्यामुळें ते बाहेर गेले असल्याचें त्याला कळलें. त्याच्या दुसऱ्या दिवशींही कुणाची भेट झाली नाहीं. सारी मंडळी बायॉस्कोप पहायला गेली आहे, परत यायला रात्र होईल असें नोकरानें सांगितलें. सारी मंडळी म्हणजे कोण याचा अंदाज करायला महिमला मुद्दाम विचारावें लागलें नाहीं.

मानापमानाचा प्रश्न केव्हढा कां मोठा असेना, पुन्हांपुन्हां सारखे दोन दिवस येऊन जाणें त्याच्यासारख्या माणसाच्या दृष्टीनें फार कठीण होतें. पण हातांतली आंगठी त्याला घरीं स्वस्थ बसूं देत नव्हती. पुन्हां दुसऱ्या दिवशीं तिनें त्याला खेचून घालवून दिलें.

आज मात्र त्याला कळून आलें, कीं बाबू घरीं आहेत—वर चहा घेत बसले आहेत.

महिम दाराशीं आलेला पहातांच केदारबाबूंनीं त्याच्याकडे पाहून गंभीरपणानें नुसतें म्हटलें, “ये महिम.” महिमनेंही हात उचलून मुकाट्यानें नमस्कार केला.

पलीकडे उघड्या खिडकीच्या खालीं एका कोचावर अचला आणि सुरेश जवळ जवळ बसलीं होतीं. अचलेच्या मांडीवर एक भलें मोठें चित्रांचें आल्बम होतें आणि तीं दोघेंही त्यांतलीं चित्रें पहात होतीं. सुरेशनें एक क्षणभरच नजर वर करून त्याच्याकडे पाहून पुन्हां चित्रें पहायला सुरवात केली, पण अचलेनें मात्र नजर सुद्धां वर केली नाहीं. तिनें मान खालीं घातली होती त्यामुळें तिचा चेहरा दिसला नाहीं. पण ज्या प्रकारें ती अतीशय लक्ष लावून पुस्तकांतलीं चित्रें पहाण्यांत रंगून गेली होती त्यावरून बापाचा आवाज आणि आगंतुकाची चाहूल तिच्या कानीं गेली नसावी अशी कल्पना करणें विसंगत ठरलें नसतें.

आंत येतांच महिम एक खुर्ची ओढून घेऊन बसला. बराच वेळपर्यंत केदारबाबू त्याच्याशीं एकही शब्द न बोलतां चहाचा एकेक घोट घेत बसले होते. पेला खालीं झाला त्यावेळीं मुकाट्यानें बसणें अशक्य झालें असें पाहून पेला बाजूला ठेवून ते म्हणाले, "तर मग हल्लीं तुझं काय चाललंय ? तुमच्या कायद्याच्या परीक्षेचा रिझल्ट लागायला महिनाभर अवकाश आहे वाटतं ?"

महिम नुसता उद्गारला, "हो."

केदरबाबू म्हणाले, "समज पास देखील झालास—तूं पास होशील यांत शंकाच नाहीं—पण कांहीं दिवस प्रॅक्टीस करून चार पैसे केल्याशिवाय कांहीं कुठं लक्ष लागायचं नाहीं ! कसं सुरेश, महिमची गृहस्थिती तेव्हढीशी चांगली नाहीं असं ऐकलंय मी."

यावर सुरेश कांहीं बोलला नाहीं. महिम थोडासा हंसला आणि म्हणाला, "प्रॅक्टीस केली कीं हातीं पैसा येईल याची तरी कुठं खात्री आहे ?"

केदारबाबू मान हालवीत म्हणाले, "नाहीं—तें खरं आहे ! सारं ईश्वराच्या हातीं. पण प्रयत्नांतीं असाध्य कांहींच नाहीं. आमच्या शास्त्रकारांनीं म्हटलंच आहे, 'पुरुषसिंह,'—तूं तसा पुरुषसिंह व्हायला हवंस. दुसऱ्या कुठंसुद्धां लक्ष देतां कामा नयेस. नुसती प्रगती अन् प्रगती ! त्यानंतर मग संसार थाटायचा,—मग काय वाटेल तें करा, त्याला दोष नाहीं—तसं न झालं तर मात्र महत्पाप—" असें म्हणून त्यानीं एकदां सुरेशकडे पाहिलें आणि म्हटलें, "कसं सुरेश ? अन्नवस्त्राची सोय झाली पाहिजे. मुलाबाळांच्या शिक्षणाची जर सोय झाली नाहीं—या पायीं तुम्हीं हिंदू लोक आपला सत्यानाश करून घेतांहांत. आम्ही ब्राह्मसमाजी लोकांनी जर तुम्हां लोकांना योग्य मार्ग दाखवून दिला नाहीं तर या सुसंस्कृत जगांत आम्हाला तोंड दाखवायला सुद्धां जागा राहाणार नाहीं. खरं कीं नाहीं ? कसं सुरेश ?"

सुरेश पूर्वीप्रमाणेंच मुकाट्यानें बसला होता. महिम आंतल्या आंत खवळून उठला होता. तो म्हणाला, "आपला उपदेश मी हृदयांत बाळगीन. पण तुम्ही मला हीच चर्चा करायला का बोलावलं होतं ?"

त्याचा उद्देश केदारबाबूंच्या ध्यानीं आला. ते म्हणाले, " नाहीं. एव्हढंच कांहीं नव्हे. आणखीही थोडंसं बोलायचं आहे. पण—" असें म्हणून त्यांनीं कोचाकडे नजर फेंकली.

सुरेश उठून उभा राहिला आणि म्हणाला, " तर मग आम्हीं जरा त्या पलीकडच्या खोलींत बसतों.—" असें म्हणून त्यानें अचलेच्या मांडीवरचें आल्बम उचलून हातीं घेतलें.

त्याच्या या सूचक वर्तनाचा अचलेवर कांहींच परिणाम झाला नाहीं. ती तशीच बसून राहिली होती. ती उठून जाण्याचें लक्षण मुळींच दिसलें नाहीं. तें पाहून केदारबाबू म्हणाले, " तुम्ही उभयतां जरा त्या पलीकडच्या खोलींत जाऊन बसा पाहूं बाळ. मला महिमशीं कांहीं बोलायचंय. "

अचलेनें नजर वर करून बापाच्या तोंडाकडे पाहून एव्हढेंच म्हटलें, " मी इथंच आहे बाबा. "

सुरेश म्हणाला, " ठीक ! छान ! तर मग मीच जातों ! " असें म्हणून हातांतलें आल्बम अचलेच्या मांडीवर फेकून एक प्रकारें रागारागानेंच तो पाय आपटीत बाहेर निघून गेला.

मुलीच्या अवज्ञेमुळें केदारबाबूंना बरें वाटलें नाहीं, असें त्यांच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसून येत होतें. पण ते जिद्दीला पेटले नाहींत. ते कांहीं वेळ रुसल्या-सारखे मुकाट्यानें बसून राहिले होते. नंतर ते म्हणाले, " महिम मला तुझा राग आला आहे अशी कल्पना करून घेऊं नकोस—उलट तुझ्याबद्दल मला खरोखरच मोठा आदर वाटतो—म्हणूनच मित्र या नात्यानं तुला मी सल्ला देतों, कीं एखादी जबाबदारी शिरावर घेऊन स्वतःला संकटांत पाडून घेऊं नकोस. आधीं स्वतःची उन्नती करून घे, कर्तेपणा दाखव, त्यानंतर जबाबदारी घ्यायला तुला भरपूर अवसर मिळेल. "

महिमनें तोंड वळवून एकदां अचलेकडे पाहिलें. तिनें चटकन आपली नजर खालीं वळवली असें पाहून तिच्या बापाकडे पाहून महिम म्हणाला, " आपली आज्ञा मला शिरोधार्य आहे, पण आपल्या मुलीचीही तशीच इच्छा आहे का ? "

केदारबाबू एकदम म्हणाले, " अर्थात ! " क्षणभर स्तब्ध राहून ते म्हणाले, " निदान एवढं तरी निश्चित, कीं सारं कांहीं कळून सवरून तुमच्या हातीं मुलगी देणं मला शक्य नाहीं. "

महिम शांतपणें म्हणाला, " इंग्रज लोकांची एक चाल आहे, कीं अशा परिस्थितींत एकमेकांची वाट पहात दोघंहीं रहात असतात. आपला उद्देश तसाच आहे का ? "

केदारबाबू एकदम भडकून उठले. ते म्हणाले, " असं पहा महिम, तुझ्या कडून शपथा घेववण्यासाठीं तुला कांहीं मी इथं बोलावलं नाहीं. तूं आमच्याशीं ज्या प्रकारचं वर्तन केलं आहेस तसं दुसऱ्या कुठं झालं असतं तर त्या बापानं कुरुक्षेत्र माजवलं असतं, पण मी अगदीं शांतिप्रिय माणूस आहे. तंटाभांडण मला मुळींच आवडत नाहीं. म्हणूनच शक्य तितक्या गोड भाषेंत मी माझा मनोदय तुला सांगितला. मग तूं वाट पहात रहावं कीं राहूं नये, साहेब लोक काय करतात अन् काय न करतात असल्या वाटाघाटीची जरूरी मला तरी दिसत नाहीं. शिवाय असं पहा, आम्हीं इंग्रज नव्हे—बंगाली आहों. आमची मुलगी वाढलेली दिसली कीं आमच्या आईबापांच्या डोळ्याला झोंप शिवत नाहीं कीं तोंडाला अन्नपाणी रुचत नाहीं—हें काय तुला माहित नाहीं ? "

महिमचा चेहरा एकदम लालीलाल झाला. पण आत्मसंयमन करून तो शांतपणें म्हणाला, " आपण एव्हढं अकांडतांडव करावं असं माझ्या हातून काय घडलं आहे. तें मला विचारायचं नाहीं; मला केवळ आपल्या मुलीच्या तोंडून एकदां ऐकायचं आहे, कीं तिचंही मत असंच आहे कीं काय ? " असें म्हणून तो उठला आणि अचलेच्या समोर जाऊन उभा राहून म्हणाला, " कसं ? हेंच का ? "

अचलेनें वर पाहिलें नाहीं कीं तोंडांतून शब्दही काढला नाहीं.

मनांतून येत असलेला उमाळा बळेंबळेंच आवरून तो म्हणाला, " एकांतांत तुझं मत कळून घ्यावं, सरळसरळ विचारून घ्यावं, असं करायला मला अवसर मिळाला नाहीं—त्याची मला क्षमा कर. त्या दिवशीं संध्याकाळीं मनाच्या उद्वेगासरशीं तूं जें कांहीं करून गेलीस, त्याबद्दलही तुझी कैफियत मला नको

आहे. नुसतं एकदांच सांग, ही आंगठी तुला परत घ्यायची आहे ?"

सुरेश वावटळीसारखा आंत आला आणि म्हणाला, "मला माफ करा केदारबाबू, आतां मला एक मिनिटसुद्धां राहतां येत नाहीं इथं."

तिघेंही त्याच्याकडे चकित होऊन पहात राहिलीं होतीं. केदारबाबूंनी विचारलें, "कां ?"

सुरेश नाटकी थाटाचे हातवारे करून बोलूं लागला, "नाहीं नाहीं. ही चूक अगदीं अक्षम्य आहे. माझा जिवाभावाचा दोस्त आज प्लेगनें मरायला टेकलेला अन् मी सारं विसरून इथं फुकट वेळ घालवतोंय !"

केदारबाबू घाबऱ्याघुबऱ्या म्हणाले, "म्हणतोस काय सुरेश, प्लेग ? तिथं जाणार तूं ?"

सुरेश हंसून म्हणाला, "अर्थात् ! यापूर्वीच मला गेलं पाह्यजे होतं."

केदारबाबू अत्यंत साशंक होऊन म्हणाले, "पण प्लेग ना ! ते कुणी असे विशेष लाग्याबांध्याचे-नात्याचे –"

सुरेश म्हणाला, "नात्याचे ? त्याहूनही फार मोठा बरं केदारबाबू—" महिमकडे वळून तो आतां पहिल्यानेंच बोलला. तो म्हणाला, "आपल्या निशीथला काल रात्रींच प्लेगनं झपाटलंय. वांचायची कांहीं आशा नाहीं. तुला सुद्धां मी सांगितलं पाह्यजे होतं—येतोस पाह्यला ?"

निशीथ कोण तें कांहीं महिमला आठवेना. तो म्हणाला, "कुठला निशीथ ?"

"कुठला निशीथ ? म्हणतोस काय महिम ? इतक्यांतच आपल्या निशीथला विसरलास ? साऱ्या सेकंड इयरचा अभ्यास ज्याच्याबरोबर केलास त्याला या संकटाच्या वेळीं विसरलास ?—" असें म्हणून तो मागें वळला आणि अचलेकडे पाहून खवचटपणें म्हणाला "नाहींच आठवायचं ! प्लेग ना !"

सुरेशचा चिमटा मुकाट्यानें सहन करून महिमनें विचारलें. "भवानीपूरहून येत असे का तो ?"

तोंड वेंगाडून सुरेश म्हणाला, "हो हो. तोच. पण इतक्यांत विसरुन जायला निशीथ काय असे दहापांच नव्हते ! येतोयस का ?"

महिमला अंधुकशी आठवण आली. तो म्हणाला, “ निशीथ कुठं रहातो हल्लीं ? ”

सुरेश म्हणाला, “ आणखी कुठं—स्वतःच्या घरीं–भवानीपूरला. यावेळीं त्याला भेटायला जाणं अवश्य आहे असं नाहीं का तुला वाटत ? मी डॉक्टर आहें. मला गेलंच पाहिजे. आणि एव्हढी महत्त्वाची दोस्तीची आठवण जर नाहींशी झाली नसेल तर तुला देखील माझ्याबरोबर आलं पाहिजे. तुमचं काय बोलणं चाललं होतं तें पुरं झालं का केदारबाबू ? निदान घटकाभऱ्यासाठीं तरी याला जरा मोकळा कराल का ? ”

ही खोंच कुणाला उद्देशून आहे तें नीटसें ध्यानीं न आल्यामुळें केदारबाबू उद्विग्न मुद्रेनें एकदां महिमकडे आणि एकदां आपल्या मुलीच्या तोंडाकडे पहात राहिले. बडा माणूस असलेला आपला हा भावी जांवई केव्हां कुणाच्या विरुद्ध होऊन बसेल, त्याची कल्पना या क्षणापर्यंत म्हाताऱ्याला आली नव्हती. त्यांच्या तोंडून एकही शब्द बाहेर निघेना. महिम सुद्धां हतबुद्ध होऊन नुसता पहात राहिला होता.

पहातां पहातां अचलेचा चेहरा लालीलाल झाला. ती एकेक पाऊल टाकीत आली, हातचें पुस्तक समोरच्या टेबलावर ठेवून एव्हढ्या वेळानें बोलूं लागली. ती म्हणाली, “ तुम्ही डॉक्टर, तुम्हांला तर गेलंच पाहिजे, पण यांच्या वकिलीच्या पुस्तकांत कांहीं प्लेगची चिकित्सा लिहिलेली नाहीं. त्यांनीं कां जावं सांगा ना ? ”

अगदीं अनपेक्षित अशा या प्रश्नामुळें सुरेश थक्क होऊन गेला. पण लगेच मन सांवरून म्हणाला, “ मी तिकडे जातों आहें तो कांहीं डॉक्टरी करायला नव्हे. त्याला कांहीं डॉक्टरांचा अभाव नाहीं. मित्राच्या शुश्रुषेसाठीं जातोंय मी. मैत्रीचं मोल मी स्वतःच्या जिवापेक्षां जास्त मानतों. ”

अचलेच्या चेहऱ्यावर एक प्रकारच्या कठोर हास्याची चुणूक सहज निसटून गेली. ती म्हणाली, “ सारींच माणसं तुमच्यासारखीं मोठ्या मनाचीं असलीं पाहिजेत असं का तुमचं म्हणणं आहे ? एवढ्या मोठ्या मैत्रीची जाणीव त्यांच्याठायीं नसली तर मला कांहीं त्याबद्दल लाज वाटायची नाहीं. तें कसं का असेना, त्या जागीं मी त्यांना मुळींच जाऊं देणार नाहीं. ”

सुरेशचा चेहरा काळाठिक्कर पडला. केदारबाबू साशंक होऊन गेले. ते घाबरून म्हणाले, " तूं हें काय भलतंच बोलतेयस अचला? सुरेशसारखा-खरंच तर-निशीथबाबूंसारखा—"

अचला त्यांना थांबवून म्हणाली, " निशीथबाबूंची तर पहिल्यानं त्यांना नीटशी आठवण सुद्धां झाली नव्हती. शिवाय हे आहेत डॉक्टर. यांनी खुशाल जावं-पण काय म्हणून यांनी दुसऱ्या माणसाला उगीच आपल्याबरोबर ओढावं?"

फटका बसला कीं सुरेशला मागलें-पुढलें ध्यान रहात नसे. टेबलावर जोरानें मूठ आपटून तोंडाला येईल तें तो मोठमोठ्यानें बोलूं लागला, " मी भेकड नाहीं-मला जिवाची पर्वा नाहीं—" महिमकडे बोट करून तो म्हणाला, " या निमकहराम माणसाला विचार, कीं मरतां-मरतां याला मी वाचवला होता कीं नाहीं!"

अचला चिडून म्हणाली, " निमकहराम हे का? खरं आहे! पण एकदां ज्याला वाचवायचं, लगेच दुसऱ्यांदां लहर आली म्हणून त्याचा खून का करायचा?"

केदारबाबू बावरल्यासारखे बोलूं लागले, " थांब ना अचला—थांब ना सुरेश—हें काय चालवलंय तुम्ही?"

तारवटलेल्या डोळ्यांनी केदारबाबूंकडे पहात सुरेश म्हणाला, " प्लेगच्या जागीं मी गेलों तर हिला चालतं! महिमचा जीव म्हणजेच काय तो जीव—अन् माझा जीव म्हणजे कांहींच नव्हे! पाह्यलंत ना आपण?"

शरमेनें आणि क्षोभानें अचलेला रडूं कोसळलें. ती भरल्या गळ्यानें म्हणाली, " खुशाल यांनी आपला जीव द्यावा. मी नको म्हणणार नाहीं—पण नको म्हणायचा जिथं मला पूर्ण अधिकार आहे तिथं मी आड आल्यावांचून कशी राहीन? कांहीं झालं तरी मी त्यांना तसल्या जागीं जाऊं द्यायची नाहीं!" असें म्हणून ती जायला निघाली असें पाहून केदारबाबू मोठ्यानें ओरडले, " कुठं चाललीस अचला?"

अचला थबकून उभी राहिली आणि म्हणाली, " नाहीं बाबा, रात्रंदिवस हा छळ आतां मला सहन होत नाहीं. जी गोष्ट अगदीं अशक्य आहे, प्राण गेला तरी जी कबूल करायला मला धीर होणार नाहीं, तिच्याच बाबतींत तुम्ही मला

सारखी टोंचणी लावली आहे—" असें म्हणून रडण्याचा येत असलेला उमाळा मोठ्या कष्टानें दाबीत दाबीत ती झपाट्यानें तिथून निघून गेली.

म्हातारे केदारबाबू बुद्धिभ्रष्टासारखे क्षणभर तिच्याकडे पहात होते. शेवटीं ते पुन्हांपुन्हां उद्गारूं लागले, " सारा पोरांचा बाजार ! सारा पोरांचा बाजार ! आतां काय म्हणावं याला ! "

## १२

यानंतर एक महिना गेला. केदारबाबूंनीं कबुली दिली. येत्या रविवारीं महिमबरोबर अचलेचें लग्न व्हायचें निश्चित झालें. त्या दिवशीं सुरेश ज्या प्रकारचा धिंगाणा घालून गेला होता त्यामुळें केदारबाबूंचें मन साशंक झालें होतें. त्या अप्रस्तुतपणाचें महत्त्व ध्यानीं घेऊन कांहीं त्यानीं शेवटीं महिमच्या लग्नाला संमती दिली होती असें नव्हे, सुरेश तितक्यांत जो कुठें नापत्ता झाला होता त्याचा इतक्या दिवसांत मागमूस सुद्धां लागला नव्हता. त्याच रात्रीं तो पश्चिमेकडे कुठें-तरी निघून गेला होता असें कळलें. केव्हां परतणार तेंही कुणाला सांगतां येईना.

त्या दिवशीं रडें आवरीत अचला जेव्हां निघून गेली त्यावेळीं बराच वेळपर्यंत तिघेहीजण तोंड लांब करून बसले होते. त्यावेळीं पहिल्यानें बोलला होता तो सुरेश. केदारबाबूंकडे पाहून त्यानें विचारलें, " आपली हरकत नसेल तर मी आपल्या मुलीला एकदोन प्रश्न विचारणार आहे. "

केदारबाबू अस्वस्थ होऊन म्हणाले होते, " हें काय बोलणं झालं ? मी कशाला हरकत घेईन सुरेश ? हीं तुम्हीं सारीं घरचीं मुलं—"

" तर मग तिला एकदां हांक मारा. मला आतां जास्त वेळ नाहीं. "

त्याच्या मुद्रेवर झालेला परिणाम आणि त्याच्या आवाजांतील अस्वाभाविक गांभीर्य ध्यानीं येऊन केदारबाबूंच्या मनाची खळबळ उडाली. पण बळेंबळेंच थोडेसें हंसून, पुन्हां तो पूर्वीचा धागा धरून ते म्हणाले होते, " सारा पोरांचा बाजार ! पण थोडंसं सावरून नाहीं घेतलं तर—कळलं ना सुरेश ?—हा सार प्लेगबीगचा उल्लेख केला कीं—किती झालं तरी बायकांची जात—ऐकतांच एकदम घाबरतात—तुला कळलं ना बाबा ?—"

कोणत्याही प्रकारचा बुद्धिवाद ऐकून घेण्याइतकी सुरेशची मनःस्थिती त्यावेळीं

जाग्यावर नव्हती. तो उतावीळ होऊन म्हणाला, " खरंच केदारबाबू, मला आतां वाट पहायला मुळींच वेळ नाहीं. "

" तें खरं आहे! तें खरं आहे! कोण आहे रे तिकडे ? " असें म्हणत म्हणत हांक मारीत जात असतां केदारबाबूंनीं महिमकडे वाकड्या नजरेनें पाहिलें. महिम उठला आणि एक नमस्कार करून मुकाट्यानं बाहेर निघून गेला.

स्वतः जाऊन केदारबाबूंनीं अचलेला बोलावून आणलें त्यावेळीं सायंकाळच्या सूर्याचे तांबडे किरण पश्चिमेकडच्या खिडकीदरवाजांतून येऊन साऱ्या घरभर विखुरले होते. त्या प्रकाशांत झळकून दिसणारी त्या तरुणीची सडपातळ देहयष्टी दिसतांच एक क्षणभर सुरेशच्या विक्षुब्ध मनावर कसल्यातरी मोहाचे रोमांच उभे राहिले पण तो परिणाम फार वेळ टिकून राहिला नाहीं. तिच्या चेहऱ्याकडे नजर जातांच ती भावना एका क्षणार्धांत विरघळून गेली.

तरीही त्या दृश्यावरून डोळे काढून घेणें त्याला शक्य झालें नाहीं. डोळ्याचें पातें सुद्धां न लववतां तो तिच्याकडे पहात स्तब्ध बसला होता. अचलेच्या चेहऱ्यावर जो प्रकाश पडला होता तो आकाशांतल्या किरणांचा नव्हता. बाहेरचीं किरणें समोरच्या भिंतीवर पडून परावर्तन झालेली तांबूस रंगाची प्रकाशाची छटा तिच्या चेहऱ्यावर पडल्यामुळें सुरेशच्या नजरेला ती एखाद्या ब्रांझ मूर्तीसारखी दिसली. त्याला स्पष्ट दिसून आलें, कीं कसल्यातरी कठोर वितृष्णेमुळें या स्त्रीचें सारें माधुर्य, सारी कोमलता साफ नाहींशी होऊन गेली असून, चेहऱ्यावरच्या प्रत्येक रेषेंत न ढळणारी दृढता धातूप्रमाणें कठोर झालेली दिसून येत होती. इतक्यांत केदारबाबूंनी सोडलेल्या एक मोठ्या सुस्काऱ्याच्या धक्क्यानें त्याची चमक भंग पावली आणि तो सरळ होऊन बसला.

केदारबाबूंनीं आणखी एकदां आपलं जुनें धोरण प्रदर्शित करीत म्हटलें, " हा सारा वेड्यांचा बाजार! कुणाला कशा रीतीनं काय सांगावं तेंच मला कळत नाहींसं झालं आहे--"

सुरेश अचलेला उद्देशून अत्यंत गंभीरपणानें म्हणाला, " आपण जें सांगून टाकलं तेंच निश्चित समजायचं का ? "

अचला मान हालवून म्हणाली, " हो. "

" त्यांत कांहीं बदल व्हायचा संभवच नाहीं का ? "

अचला पुन्हां मान हालवून म्हणाली, " नाहीं. "

उसळलेल्या रक्ताच्या एका झळकेमुळें सुरेशचा सारा चेहरा पेटून गेल्यासारखा झालेला दिसला—तरीही आवाज ताब्यांत ठेवून तो म्हणाला, " माझ्या जीवाचं सुद्धां मोल नाहीं असं म्हटल त्याच वेळीं मला कळायला पाहिजे होतं. माझ्या हृदयांत यावेळीं आग पेटली आहे—" क्षणभर थांबून तो म्हणाला, " बरं, मी असं विचारतों, मीच आपली पहिली शिकार, कीं अशाच प्रकारें अनेक आपल्या पकडींत येऊन स्वतःची मुंडी मुरगळून घेऊन गेले आहेत ? "

आश्चर्यानें अचलेचे दोन्ही डोळे तारवटले गेले. केदारबाबूंकडे वळून सुरेश म्हणाला, " बापलेकींनीं कट करून शिकार धरायचा व्यवसाय विलायतेंत नवा नाहीं असं मी ऐकलंय —पण मी तुम्हांला हें सांगून ठेवतों केदारबाबू, कीं आपल्याला एक दिवशीं तुरुंग पहावा लागेल ! "

केदारबाबू ओरडून म्हणाले, " हें तूं काय बोलतोयस सुरेश ? "

सुरेश तितक्याच निर्धारानें म्हणाला, " गप्प बसा केदारबाबू, हा नाटकी अभिनय आतां फार झाला-जुना होऊन गेला-मी आतां त्याला फसणार नाहीं. माझे पैसे गेले ते जाऊं देत, त्याच्या बदल्यांत मला चांगले धडे मिळाले – पण आतां झालं हें पुरे झालं. "

अचला रडकुंडीला येऊन म्हणाली, " त्यांचे पैसे तुम्ही कां घेतले बाबा ? "

केदारबाबू वेड्यासारखे कोरा कागद शोधीत इकडेतिकडे धुंडाळूं लागले. शेवटीं एक जुना वर्तमानपत्राचा कपटा मिळाला तोच रागारागानें हातीं घेऊन ते ओरडून म्हणाले, " या क्षणीं मी वचनचिट्ठी लिहून देतों--"

सुरेश म्हणाला, " राहूं दे. पुरे झालं. आतां लेखालेखी बस्स झाली. आपण कसे फेडणार आहांत. ते पैसे तें मला चांगलं माहित आहे--पण या एवढयाशा पैशांसाठीं तुम्हांला कोर्टांत खेंचून तुमच्यासमोर उभं राहायला नकोय मला. "

उत्तर देण्यासाठीं केदारबाबूंचे ओठ सारखे हालत होते पण त्यांच्या तोंडांतून एकही शब्द बाहेर आला नाहीं.

सुरेशनें अचलेकडे पुन्हां वळून पाहिलें. तिचा पांढराफटक झालेला चेहरा आणि भरून आलेले डोळे पाहूनही त्याला एव्हढीसुद्धां दया आली नाहीं. उलट त्याच्या अंतरांतली आग अधिकच भडकली. पैशाची निष्ठुरतेनें तो बोलूं लागला, " असं काय आहे अभिमान बाळगण्याजोगं तुझ्यापाशीं ? तुझा हा चेहरा, काटकी-सारखा हा देह, चामडीचा हा असला रंग ! तरी सुद्धां भाळलों होतों--भाळलों होतों तो काय तुझ्या रूपाला ? भ्रम आहे तुझा ! "

बापाच्या समक्ष निर्लज्जपणानें केलेला आपला हा पाणउतारा पाहून अचलेनें कळवळून येऊन दोन्ही हातांनी आपलें तोंड झांकून घेतलें आणि कोचावर आंग टाकून दिलें.

सुरेश उठून उभा राहिला आणि म्हणाला, " ब्राह्म म्हटले कीं तें माझ्या डोळ्यांत सलत होते. त्यांच्या सावलीचा सुद्धां मला किळस येत होता. त्या तुमच्या घरांत पाऊल टाकतांच आजन्माचे संस्कार, इतक्या दिवसांची द्वेषाची भावना एका क्षणांत धुवूनपुसून गेली, तेव्हांच मला कळायला हवं होतं, की ही सारी जादूविद्या. आतां माझं काय व्हायचं असेल तें होवो, पण जायच्या वेळीं आपणां सर्वांना हजार धन्यवाद दिल्याशिवाय मला जाता यायचं नाहीं. धन्यवाद अचला ! "

अचलेनें तोंड वर केलें नाहीं. भरल्या गळ्यानें ती तशीच म्हणाली, " यांना गप्प रहायला सांगा बाबा. झाडाखालीं पडायचा प्रसंग आला तरी बेहेत्तर पण यांच्याकडून घेतलंय तें आधीं देऊन टाका--"

सुरेश उठून उभा राहिला आणि म्हणाला, " झाडाखालीं ? एक दिवस तो सुद्धां आधार मिळायचा नाहीं--सांगून ठेवतोंय-- पण तसा प्रसंग येईल त्यावेळीं माझी आठवण करा !—" असें म्हणून प्रत्युत्तराची अपेक्षा न करतां तो झपाट्यासरशीं बाहेर निघून गेला.

केदारबाबू कांहीं वेळपर्यंत ताठ होऊन बसले होते, शेवटीं एक मोठा सुस्कारा सोडून ते उद्गारले, " अं: ! काय भयंकर माणूस ! हें आधीं कळतं तर या माणसाला मी या घरांत पाऊल कां टाकूं दिलं असतं ? "

बापाचे उद्गार अचलेच्या कानीं गेले पण ती कांहीं बोलली नाहीं. तशीच पडल्या जागीं ती रडून घेत होती.

अशाच प्रकारें बराच वेळ पर्यंत ती मुकाट्यानें आसवें गाळीत राहिली होती. जवळच बसलेले केदारबाबू तें सारें पहात होते. पण सांत्वनाचा एक शब्द बोलायचें सुद्धां त्यांना साहस झालें नाहीं.

संध्याकाळचा काळोख पडला आणि नोकर येऊन गॅस पेटवूं लागला आहे असें पहातांच अचला मुकाट्यानें उठून आपल्या खोलींत गेली.

पण महिमला यांतलें कांहींच कळलें नाहीं. केदारबाबूंनी एके दिवशीं अगदीं सहजगत्या आपल्या मुलीबरोबर त्याचें लग्न लावून देण्याची इच्छा ज्या दिवशीं प्रदर्शित केली त्या दिवशीं कांहीं वेळपर्यंत तो अस्वस्थपणें स्थब्ध होऊन राहिला. अनेक प्रकारच्या अनेक गोष्टी, अनेक संशय त्याच्या मनांत आले खरे, पण त्याच्या सुदैवाचें मूळ कारण म्हणजे सुरेशच, हें त्याच्या कल्पनेंत सुद्धां आलें नाहीं. अचलेविषयींचा स्नेह, प्रेम आणि कृतज्ञतेनें त्याचें अंतकरण भरून आलें. पण पहिल्यापासूनच तो अबोल प्रकृतीचा माणूस होता. मनाचा आवेग हुरळून प्रदर्शित करणें त्याला शक्यच नव्हतें. त्यानें तसें कांहीं केलें असतें तर लोकांच्या दृष्टीनें तें वर्तन त्याच्या स्वभावधर्माच्या विरुद्ध आणि अनपेक्षित असें दिसलें असतें.

त्या दिवशीं संध्याकाळीं एकांतांत केदारबाबूंबरोबर या बाबतींत थोडा वेळ चार-दोन शब्द बोलल्यावर ज्यावेळीं तो घरीं जायला निघाला, त्यावेळीं नित्याच्या वहिवाटीप्रमाणें अचलेला भेटून तिला एक लहानसा नमस्कार करून जाणें सुद्धां त्याच्याकरवीं घडलें नाहीं. तसें पाहिलें तर केदारबाबूंनीच हा विषय काढला होता. संमति देणें, तिथिनिश्चय करणें वगैरे सारें कांहीं त्यांनीं एकट्यानेंच केलें होतें-पण हें सारें नाइलाज होऊनच त्याच्याकरवीं घडलें होतें, त्यामुळें त्यांच्या भाषणांत आनंदाचें किंवा उत्साहाचें एव्हढें सुद्धां लक्षण दिसून आलें नव्हतें.

तरीही दिवसांवर दिवस गेले आणि हळूहळू लग्नाचा दिवस जवळ येऊन ठेपला.

परवांच्या दिवशीं लग्न-पण मुलीच्या लग्नाच्या बाबतींत कोणत्याही प्रकारचें

अवडंबर करायचें नाहीं असें त्यानीं ठरवलें होतें. तरीही हें सारें मंगलकार्य मुकाट्यानें उरकून घेण्याची व्यवस्था करण्यांत कोणतीही उणीव राहूं देण्यांत आली नव्हती.

आज तिसऱ्या प्रहरीं नित्याप्रमाणें ते चहा घेत बसले होते. जवळच कोचावर शिलाईकाम करीत अचला बसली होती. कित्येक दिवस अनेक प्रकारच्या अडचणींत जात असतां आज इतक्या दिवसांनीं तिचें मन समाधानाचा अनुभव घेत होतें आणि त्याचा थोडासा आभास तिच्या उदासवाण्या चेहऱ्यावर पांढुरक्या चांदण्याच्या प्रकाशासारखा उजळून उठला होता. चहा घेत बसलेल्या केदारबाबूंचें लक्ष मधून मधून तिच्याकडे जात होतें.

भांडण करून सुरेश निघून गेला तेव्हांपासून ते मन मारून दिवस काढीत होते. तो पुन्हां आला तर काय करील आणि काय न करील याचीही एक काळजी त्यांना डांचत होती. त्याचप्रमाणें या बाबतींत आपलें कर्तव्य काय,—वचनचिठ्ठी लिहून द्यावी कीं दुसऱ्या कुठून तरी पैसे काढून त्याचें देणें फेडून टाकावें,—कीं सारीच जबाबदारी महिमवर टाकून स्वस्थ बसावें—यांतलें काय करावें हें सारखा विचार करून सुद्धां त्यांना निश्चितपणें ठरवतां येत नव्हतें.

आणि कांहींतरी करणें आतां अवश्यच झालें होतें. सुरेश नापत्ता झाला आहे म्हणून तेवढ्यावरच विसंबून राहून सदासर्वकाळ चालायचें नाहीं, किंवा आपल्या मुलीप्रमाणें स्वतःच्याच रंगांत दंग होऊन डोळे झांकून राहिल्यानेंही या प्रसंगांतून पार पडतां येणार नाहीं, हें त्यांना रोमरोमांतून कळून चुकलें होतें. प्रेमभंग झालेला तो तरुण एके दिवशीं भडकून उठेल, परत येऊन चोंहीकडे या गोष्टीचा आरडाओरडा करीत दंगा माजवील, – कोणत्याही प्रकारची पावती दिली नसली तरी ती रक्कम चेकनें दिली असल्यामुळें कोर्टांत नाशाबीत झाली नसती याचा फायदा घेईल, या गोष्टीवर विचार करतां करतां ते अगदीं मेटाकुटीस आले होते.

मुलीबरोबर या बाबतींत चर्चा करून कांहीं ठरवून घेण्याचें धैर्य त्यांना होत नव्हतें. तिच्या समोर सुरेशच्या नांवाचा उल्लेख करायला सुद्धां त्यांना भीती वाटे. यावेळीं अचलेची ती शांत आणि सौम्य अशी मुद्रा पहात असतांना

त्यांचें मन खळबळून उठलें आणि त्यांना केवळ एव्हढेंच वाटूं लागलें, कीं ही मुलगी म्हणजेच आपल्या साऱ्या दुःखाचें मूळ !—केव्हढी चांगली संधी आली होती ! आणि पुढल्या भविष्यकाळांत आपण किती सुखाला लागलों असतों !

ज्या निर्दय मुलीनें, बाप वारंवार नकोनको म्हणत असतांही त्याच्या सुखदुःखाकडे एव्हढेंसुद्धां लक्ष दिलें नाहीं, आलेली सुसंधी कोसळून घातली, त्या स्वार्थपर पोटच्या गोळ्याच्या विरुद्ध त्यांचा प्रच्छन्न क्रोध जेव्हांतेव्हां एकाच प्रकारचा शाप देत आला होता, कीं एकदां कृतकर्मांचीं फळें हिला भोगूं दे— एकदां ही रडत रडत येऊन म्हणू दे. बाबा, तुमची अवज्ञा केल्याचं प्रायश्चित् मला मिळालं. '

स्थळ या दृष्टीनें सुरेश हा महिमपेक्षां असंख्य पटीनें जास्त वांछनीय होता. हा विश्वास त्यांच्या मनांत इतका खिळून गेला होता, कीं त्याचा संबंध तुटल्या मुळें आपलें सर्वस्वी नुकसान झालें असें त्यांना वाटत होतें. तसें पाहिल तर त्यांना सुरेशचा आलेला राग मनापासून नव्हता. एव्हढें अकांडतांडव केल्यावर सुद्धां आज पुन्हां त्याच्याशीं समेट करण्याचा मार्ग जर दिसला असता तर ठरलेलें लग्न मोडून टाकायला यत्किंचितही माघार घेतली नसती.

पण याला कांहीं उपाय नव्हता—अचलेसमोर तसा ओझरता उल्लेख करणें सुद्धां अशक्य होतें.

शिलाई करतांकरतां अचलेनें मधेंच वर पाहिलें आणि विचारलें, " सुरेश-बाबूंची ही हकिकत वाचलीत का बाबा ? "

अचलेच्या तोंडीं सुरेशचें नांव ! केदारबाबू दचकून पाहूं लागले. स्वतःच्या कानावर त्यांचा विश्वास बसेना. सकाळचें वर्तमानपत्र टेबलावर पडलें होतें तें उचलून घेऊन अचलेनें पुन्हां तोच प्रश्न केला. केदारबाबूं सकाळीं वर्तमान-पत्रावर नजर टाकली होती खरी, पण इतर बातम्या वाचीत असतांना त्यांचें तिकडे लक्ष गेलें नव्हतें. ते म्हणाले, " कोण सुरेश ? "

वर्तमानपत्रांतील ती बातमी शोधीत शोधीत अचला म्हणाली, " मला वाटतं हे आपलेच सुरेशबाबू. "

आश्चर्यचकित होऊन टवकारून पहात केदारबाबू उद्गारले, सुरेशबाबू ? काय केलं त्यानं ? कुठंय तो ? "

अचलेनें उठून वर्तमानपत्रांतील तो मजकूर बापाला दाखवून दिला आणि म्हटलें, " वाचून पहा ना बाबा. "

चष्म्यासाठीं खिसे चांचपीत केदारबाबू म्हणाले, " चष्मा तिकडे त्या खोलींत राह्यला वाटतं, तूंच वाचून दाखव ना पोरी. काय आहे बातमी ? "

अचलेनें वाचून दाखवलें—फैजाबादच्या एका बातमीदारानें लिहिलें होतें,— त्या दिवशीं त्या शहरच्या गरीब लोकांच्या वस्तीस भयंकर आग लागली होती. आधींच प्लेग, त्यांतून हें संकट कोसळल्यामुळें लोकांच्या हालअपेष्टांस पारावार राहिला नव्हता. गेले कांहीं दिवस सुरेश नांवाचा एक तरूण स्वतःचे पैसे खर्च करून आणि त्याचप्रमाणें स्वतःचा देह झिजवून औषधपाणी देऊन रोग्यांची सेवा करीत होता. आग लागली त्यावेळीं तो आगीच्या जागीं आला. आजारी पडलेली एक बाई त्या जळत्या घरांत अडकून पडली आहे आणि तिला सोड-वायला कुणी गेलें नाहीं असें त्याला दिसून आलें—

बातमीदारानें पुढें असें लिहिलें होतें, कीं त्या बाईचा जीव बचावण्यासाठीं या अत्यंत साहसी अशा बंगाली तरुणानें स्वतःच्या प्राणाचीं पर्वा न करतां जळत्या आगींत उडी घेऊन—वगैरे – वगैरे.

वाचन संपलें. केदारबाबू बराच वेळपर्यंत स्तब्ध राहून नंतर एक मोठा सुस्कार सोडून म्हणाले, " पण हा आपलाच सुरेश, असंच का वाटतं तुला ? "

अचला शांतपणें म्हणाली, " हो बाबा. हे आपलेच सुरेशबाबू ! "

केदारबाबू पुन्हां एकदां दचकले. अगदीं नकळत अचलेच्या तोंडून ' आपले ' असा उल्लेख येऊन त्याच्यावर बराचसा जोर दिल्यामुळेंही कदाचित् ते तसे दचकले असावे. कदाचित् केवळ एक प्रकारच्या निश्चितपणानें त्याच्यावर असलेला विश्वास जाणवल्यामुळेंही केदारबाबूंच्या हृदयावर जो परिणाम झाला त्याचाही हा प्रतिध्वनी असेल. बुडतां माणूस एखादी काडी आधार घ्यायला कवटाळण्यासाठीं जसे दोन हात पसरतो त्याचप्रमाणें तो म्हातारा मुलीच्या तोंडून निघालेल्या त्या शब्दाचा काडीचा आधार कवटाळून धरीत असावा. तो एकच शब्द त्याच्या कानाकानांतून नुसत्या पातेलवणीसरशी इतका

गाजला, कीं अशक्याची शक्यता दर्शवणारीं दारें उघडल्याची त्यांना जाणीव झाली. आज इतक्या दिवसांनीं त्यांच्या मुद्रेवर अकस्मात् आशेचा आनंद उजळून उठला. ते म्हणाले, " बरं बरं पोरी, तुला नाहीं का आठवत—"

बाप बोलत असतांना थांबला असें पाहून अचला त्याच्या तोंडाकडे पाहून म्हणाली, " काय आठवत नाहीं बाबा ? "

केदारबाबू सावधपणानें विषयाचा उपक्रम करण्यासाठीं तोंडीं आलेले शब्द तसेच दाबून म्हणाले, " तुला आठवत नाहीं का, कीं आमच्याशीं सुरेशनें जें वर्तन केलं— तुला नाहीं का वाटत, कीं त्याला आतां चांगलाच पश्चात्ताप झाला असेल म्हणून ? "

अचलेनें लगेच म्हटलें, " अगदीं तसंच वाटतं मला बाबा. "

सारखी जोरजोरानें मान हालवीत केदारबाबू म्हणाले, " तसंच ! अगदीं तसंच ! शंभर वेळ तसंच ! तसं नसतं तर तो असा पळून गेला नसता—कुठल्या-तरी एका क्षुल्लक बाईला बचावण्यासाठीं त्यानं अशी आगींत उडी घेतली नसती. माझी अगदीं खात्री आहे, कीं केवळ पश्चात्तापानं पोळल्यामुळेंच तो अशा प्रकारें जीव टाकायला गेला असावा. खरं कीं नाहीं सांग पोरी ? "

अचलेनें बापाच्या प्रश्नाचें सरळ उत्तर द्यायचें टाळण्यासाठीं म्हटलें, " दुसऱ्याला वांचवण्यासाठीं अशाच प्रकारें त्यानीं आपले प्राण एकदां संकटांत घातले होते असं मी ऐकलं होतं. "

हें उत्तर केदारबाबूंना तितकेसें आवडलें नाहीं. ते म्हणाले, " ती गोष्ट वेगळी आहे अचला ! अन् हें तर प्रत्यक्ष आगींत उडी घेणं ! या दोहोंतला फरक नाहीं दिसत का तुला ? "

अचलेनें प्रतिवाद केला नाहीं. ती म्हणाली, " तें खरं, पण जीं मोठ्या हृदयाचीं माणसं आहेत त्यांना कोणत्याही परिस्थितींत हें आपलं संकट आणि हें दुसऱ्याचं संकट हें ध्यानांतच येत नाहीं – "

केदारबाबू उत्साहानें उसळून उठले. मोठ्या आवेशानें ते म्हणाले, " ठीक ठीक ! तेंच तर तुला म्हणतोंय अचला. फार मोठा माणूस आहे हा ! फार मोठ्या दिलाचा ! दुसऱ्या कुणाची तुलना होईल का त्याच्याबरोबर ? एव्हढे लोक

आहेत, पण कोण कुणाला पांच पांच हजार रुपये असे एका शब्दासरशी उडवून देतोय सांग पाहूं? म्हणूनच म्हणतों, कीं त्यानं ही उडी घेतली ती कोणत्याही कारणानं असो, मोठ्या दुःखानं घेतलीय यांत शंकाच नाहीं—अगदीं शपथेवर सांगतों तुला."

पण शपथेची कांहींच जरूरी नव्हती. या प्रकाराचें सत्यस्वरूप जितकें अचलेला कळत होतें त्यांतलें एक शतांशसुद्धां त्यांना कळत नव्हतें. तरीपण तिला उत्तर देतां येईना. क्षणभर आलेली शरमेची छाया आपल्या मुद्रेवर उठावून दिसेल या भीतीनें चट्कन मान खालीं घालून बसून राहिली.

पण म्हाताऱ्याच्या आशाळभूत दृष्टीला ती तिची अवस्था दिसून आल्यावांचून राहिली नाहीं. ते रोमांचित अंतःकरणानें म्हणाले, "माणूस कांहीं देवता नव्हे—माणूस तो माणूस. त्याच्याठायीं गुणदोष हे असायचेच. क्षणभर आलेल्या दुबळेपणामुळें उत्पन्न झालेल्या उत्तेजनाला कांहीं त्याचा स्वभाव म्हणून चालायचं नाहीं. इतर लोक काय वाटेल तें म्हणोत अचला, पण आम्ही सुद्धां जर याच गोष्टीला त्याचा दोष आहे म्हणून नांव ठेवलं, तर त्या लोकांत नी आमच्यांत फरक तो काय राहिला? मोठीं माणसं पुष्कळ आहेत, पण असा दाता कोण आहे? काय लिहलंय तिथं तें पुन्हां एकदां वाच पाहूं. आगींतून तिला सही-सलामत बाहेर काढून आणली! वा! खरोखरच मोठा माणूस! अशांना देवतां म्हणायचं नाहीं तर म्हणायचं कुणाला!" असें म्हणून त्यानीं एक मोठा सुस्कारा सोडला.

अचला तशीच मान खालीं घालून निरुत्तर होऊन बसली होती.

केदारबाबू क्षणभर स्तब्ध होऊन बसले होते ते एकदम मधेंच म्हणाले, "ठीक. एक तार करून आपल्याला त्यांची खबर काढायला नको का? अशा संकटाच्यावेळीं राग धरून बसून कसं चालेल?"

आतां मात्र अचलेनें वर नजर करून पाहिलें आणि म्हटलें, "पण त्यांचा पत्ता आपल्याला कुठं माहित आहे बाबा?

केदारबाबू म्हणाले, "पत्ता होय! अग त्या फैजाबाद शहरांत आज त्या सुरेशला ओळखत नाहीं असा कोण राह्यलाय? फार राग आला होता मला

त्याचा. पण आतां कांहीं म्हटल्या कांहीं मुद्धां माझ्या मनांत राह्यल नाहीं. आत्तांच्या आत्तां त्याला एक तार कर पाहूं. केव्हां त्याची खबर मिळेल असं मला झालंय. ”

“ आत्तां तार करतें बाबा. ” असें म्हणून ती तारेचा कागद आणण्यासाठीं बाहेर जायला निघाली होती ती एकदम सुरेशच्या समोरच आली.

अंतःकरणांतलें दुःख सहन करतांना माणसाला जो थकवा येतो त्याच्या-पायीं माणसाची मुद्रा इतकी शुष्क, इतकी निस्तेज होऊन जात असेल असें अचलेला कधीं वाटलें नव्हतें, म्हणूनच त्याला पहातांच ती एकदम दचकली.

क्षणभर कुणाच्याच तोंडून एकही शब्द बाहेर आला नाहीं. त्यानंतर बोलली ती तीच. ती म्हणाली, “ बाबा आहेत आंत. आंत यावं. फैजाबादहून केव्हां आलां ? प्रकृती बरी आहे ना ? ”

अगदीं नकळत आपल्या आवाजांत आपुलकीची भावना केव्हढ्या केविलवाण्या स्वरूपांत प्रकट झाली होती तें जरी तिला कळलें नाहीं, तरी तें सुरेशच्या ध्यानीं येऊन तो मात्र एकदम कोसळला--तरीही गेल्या कांहीं दिवसांत मिळालेले धडे तो विसरला नव्हता. एकदम तिच्या पायाशीं लोळण घ्यावी, आपण केलेल्या अनेक अपराधांबद्दल तिची क्षमा मागावी आणि सारें कांहीं धुवूनपुसून टाकून घ्यावें असें अगदीं उत्कटतेनें वाटत असतांनासुद्धां मोठ्या प्रयासानें मन आवरून तो गंभीरपणें म्हणाला, “ मी फैजाबादला होतों हें कसं कळलं तुम्हांला ? ”

तितक्याच प्रेमळपणानें अचला म्हणाली, “ हें आत्तांच वर्तमानपत्रांत वाचलं तेव्हां बाबांनीं मला तार करायला सांगितलं. आपली खबर कळण्यासाठीं ते फार उतावीळ झालेयत. या—एकदां त्यांना बघून घेऊं दे तुम्हांला. ” असें म्हणून ती मागें फिरायला निघत होती तोंच सुरेश उद्गारला, “ ते क्षमा करतील, पण, अचला, तूं क्षमा करशील का मला ? ”

अचलेच्या जिवणीच्या आसपास हंसण्याची रेषा उमटून गेली. ती म्हणाली- “ त्याची जरूरीच नाहीं मुळीं. मी कधींच आपल्यावर रागावलें नव्हतें. या-- आंत या. ”

## १३

महिमच्या पत्रांतून लग्नाची बातमी कळल्यामुळें आपण घाईघाईनें आलों असें सुरेशनें ज्यावेळीं सांगितलें त्यावेळीं केदारबाबू ओशाळून अस्वस्थ झाले खरे, पण अचलेच्या मुद्रेवर कोणताच बदल झालेला दिसून आला नाहीं.

सुरेश म्हणाला, " महिमच्या लग्नाला मी न येऊन कसं होईल ? नाहींतर आणखी थोडे दिवस हॉस्पिटलांतच राहिलों असतों तर बरं झालं असतं. "

केदारबाबूंनीं उत्कंठित होऊन विचारलें, " हॉस्पिटल कां सुरेश ? तसं कांहीं—"

सुरेश म्हणाला, " नाहीं ! तसं कांहीं विशेष नाहीं. तरी पण प्रकृति तितकीशी बरी नव्हती. "

केदारबाबू अस्थिर होऊन म्हणाले, " त्यासाठींच भगवंताला शतकोटी प्रणाम ! अचलेनं जेव्हां वर्तमानपत्रांतली तुमची अलौकीक हकिकत मला ऐकवली सुरेश, काय सांगूं तुम्हाला—आनंदानं अन् अभिमानानं माझ्या डोळ्यांतून आसवांच्या धारा लागल्या. मी आपल्याशींच म्हटलं, ' हे ईश्वरा केव्हढा मी धन्य ! अशा माणसाचा मित्र मी ना ! ' " असें म्हणून त्यानीं दोन्ही हात जोडून मस्तकाला लावून नमस्कार केला. थोडावेळ थांबून ते म्हणाले, " असं जरी मी म्हणतोंय, तरी असा वारंवार आपला जीव धोक्यांत घालणं बरं का ? एक सामान्य जीव वाचवायच्या पायीं एव्हढा मोठा महत्प्राण जर खर्ची पडला असता तर जगाची केव्हढी तरी मोठी नुकसानी नसती का झाली ? "

" नुकसानी काय व्हायची ? " असें म्हणून सुरेशनें लाजून दुसरीकडे तोंड फिरविलें, त्यावेळीं दिसून आलें, कीं हा वेळपर्यंत अचला त्याच्या तोंडाकडे सारखी टक लावून पहात होती आतां तिची नजर खालीं गेली.

केदारबाबू पुन्हां पुन्हां म्हणूं लागले, " असं म्हणणं योग्य नव्हे. कारण आपुलकीच्या जागीं असले उद्गार किती जाणवतात तें सांगतां यायचं नाहीं. "

सुरेश हंसू लागला. तो म्हणाला, " आपुलकीचा म्हणायला मला कुणीच

नाहीं केदारबाबू. आपली म्हणायला आहे अशी एक माझी आत्त्या,—मी गेलों तर तीच एक रडेल माझ्यासाठीं. ”

त्याच्या तोंडावर हंसू होतें तरीही, त्याच आपलें म्हणायला कुणी नाहीं हें ऐकतांच केदारबाबूंचे कोरडे डोळे ओलावले. ते म्हणाले, “ नुसती तुमची आत्त्याच रडेल असं कां म्हणतोस सुरेश ? तसं नव्हे रे बाबा. या म्हाताऱ्याचं दुःख सुद्धां कांहीं कमी व्हायचं नाहीं. ते जाऊं दे. निदान मी जितके दिवस जिवन्त आहें तोंवर स्वतःची जरा काळजी घे सुरेश–एवढीच काकुळती आहे माझी. ”

घड्याळांत रात्रीचे दहा वाजले. सुरेश घरीं जायला निघाला. एकदम हात जोडून तो म्हणाला, ‘ माझी एक प्रार्थना आहे केदरबाबू, महिमचं लग्न आमच्याच घरीं व्हायचं हें तर ठरलंच आहे. अन् तेंही परवां. उद्यां रात्रीं या गरिबाच्या घरीं एकदां पायधूळ झाडली पाहिजे तुम्ही,–नाहींतर मला तुम्ही क्षमा केली आहे असं नाहीं पटायचं. बोला, देणार ना हें माझं मागणं ? ” असें म्हणून त्यानें एकदम खालीं वांकून केदारबाबूंच्या पायाला हात लावला.

केदारबाबूंनीं बळेंबळें त्याला दूर केलें. एकाएकीं तो असा काकुळतीला आलेला पाहून ते अस्वस्थ झाले. पाटीवरचा भाजलेला भाग बँडेज केलेला होता, तो सुरेशनें शालीनें झांकून घेतला होता. या ओढाओढीच्या वेळीं तें बँडेज बाजूला सरकलें, त्यावेळीं उघडी झालेली जखम पाहून म्हातारा घाबरून ओरडला. ताडकन् उठून अचलेनें बँडेज सावरून धरलें आणि म्हटलें, “ भिऊं नका, मी पुन्हा बांधतें तें ! ” असें म्हणून तिनें त्याला कोचावर बसवलें आणि काळजीपूर्वक ती तें बँडेज बांधू लागली.

केदारबाबू धपकन् खुर्चीत बसले. त्यानीं डोळे मिटले होते. किती वेळ पर्यन्त तरी त्यांनीं मुळींच हालचाल केली नाहीं. कोचाच्या मागल्या बाजूला उभें राहून पाटीवर दोन्ही हात टेकून अचला मुकाट्यानें बँडेज बांधत होती. पाहतां पाहतां तिचे डोळे भरून आले आणि मोत्याचा सर तुटल्याप्रमाणें तिच्या डोळ्यांतलीं असावें टप्टप् खालीं पडूं लागलीं.

सुरेशला यापैकीं कांहींच दिसत नव्हतें–तिकडे त्याचें लक्षही नव्हतें. तो नुसता डोळे झांकून बसला होता आणि आपल्या अत्यंत प्रेमाच्या जीवाचा हात लागत असल्याच्या आनंदांत रोमांचीत होऊन राहिला होता.

डोळ्यांतलीं आसवें कशींबशीं पुसून घेऊन अचला एकदां हळूच म्हणाली, " आज तुम्हीं एक शपथ घेतली पाहिजे माझ्यापाशीं. "

सुरेशचा ध्यानभंग झाला. त्यानें चकित होऊन तसेंच हळू विचारलें, " कसली शपथ ? "

" अशा प्रकारें आपला जीव आपण धोक्यांत घालायचा नाहीं. "

" पण मी कांहीं मुद्दाम जीव द्यायला जात नाहीं. कुणाचं संकट पाहिलं कीं माझं भान राहात नाहीं—लहानपणापासून हाच माझा स्वभाव आहे अचला.

अचला यावर कांहीं बोलली नाही, पण त्याचवेळीं दाबून टाकलेला एक सुस्कारा तिनें बाहेर सोडला तो सुरेशच्या कानीं आला. बँडेज बांधून झाल्यावर तो उठून उभा राहिला आणि म्हणाला, " मात्र उद्यां या गरीबाच्या घरीं एकदां पायधूळ धाडायची-! " त्याचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले होते. पण त्याच्या आवाजावर मात्र त्याचा परिणाम झाला नव्हता.

अचलेनें खालच्या मानेनेंच म्हटलें, " कबूल ! "

केदारबाबूंना नमस्कार करून सुरेश हंसत म्हणाला, " पहा, माझी निराशा करायची नाहीं बरं !—" असें म्हणून अचलेल्या तोंडाकडे एकदां पाहून केलेल्या मागणीची अबोल द्विरुक्ती करून तो बाहेर निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं ठरल्यावेळीं सुरेशची गाडी येऊन त्यांच्या दाराशीं हजर झाली. केदारबाबू तयारींतच होते, ते मुलीला घेऊन तसेंच निघाले.

सुरेशच्या वाड्याच्या फाटकांत प्रवेश करतांच केदारबाबू थक्क होऊन गेले. तो बडा माणूस होता हें जरी त्यांना माहित होतें तरी तो किती बडा होता याचा अंदाज करणें आजवर त्यांना कठीण गेलें होतें. आज मात्र त्यांना त्यांच्या बडे-पणाची पूर्ण कल्पना आली.

सुरेशनें त्यांचें स्वागत करून हंसत हंसत म्हटलें, " महिमचा हट्ट अजूनही मोडतां आला नाहीं केदारबाबू. उद्यां दुपारच्या पूर्वी या घरीं यायला तो मुळींच कबूल नाहीं. "

केदारबाबू यावर कांहींच बोलले नाहींत. तिघेही दिवाणखान्यांत आले

त्यावेळीं एक प्रौढ बाई दाराआडून पुढें आली आणि अचलेचा हात धरून तिला आंत घेऊन गेली.

त्या खोलींत गालिचा अंथरलेला होता त्यावर अचलेला मोठ्या आदरानें बसवून घेऊन आपली ओळख करून देत ती म्हणाली, " आतां यापुढं मी तुझी सासू बरं कां सुनबाई ! मी महिमची आत्त्या. "

अचलेनें नमस्कार करून तिची पायधूळ घेतली आणि अचंबितपणें तिच्या तोंडाकडे पाहात ती म्हणाली, " तुम्हीं इथं केव्हां आलांत ? "

महिमला एक आत्त्या आहे हें तिला माहित नव्हतें. तिच्या चकित होण्याच्या कारणाचा अंदाज येऊन ती बाई हंसत म्हणाली, " मी इथंच असतें मुली. मी सुरेशची आत्त्या-अन् महीम तर मला परका नाहीं, तेव्हां मी त्याचीही आत्त्याच. "

तिचा स्वाभाविक गोड आवाज आणि कनवाळुपणा पाहून अचलेचें हृदय भावनेच्या भरानें भरून आलें. तिला आई नव्हती, त्या उणीवेची भरपाई करण्याजोगी नात्याची कुणी बाईही नव्हती. तिला कळूं लागल्यापासून तिच्या बापाखेरीज जिव्हाळ्याचें असें दुसरें माणूस तिला माहित नव्हतें. या उणीवेमुळें तिच्या हृदयांतील केव्हढी जागा रिकामी पडून राहिली होती याची यावेळीं तिला स्पष्ट-स्पष्ट जाणीव झाली—परक्याच्या घरीं, परक्याच्या आप्तानें तिला ' सूनबाई ' म्हणून प्रेमानें हांक मारली त्याचवेळीं तिला त्या उणीवेची आठवण झाली. अगदींच नव्या अशा संबोधनानें हांक मारल्यामुळें पहिल्यानें ती लाजली होती पण त्या हांकेंतला गौरव आणि माधुर्य तिच्या हृदयाच्या तळाला इतकें जाणवलें, कीं त्याचे पडसाद तिला सारखे ऐकूं येत होते.

बोलतां बोलतां दोघांच्याही भाषणाला चांगलाच रंग भरला. अचला लाजत लाजत म्हणाली, " बरं आत्त्याबाई, तुम्हीं मला अगदीं जवळ बसवून घेतलं ! कसं झालं हें ? ब्राह्म म्हणून मला तुम्हीं कांहीं दूर केलं नाहीं. "

आत्त्याबाईनें एकदम तिच्या ओठांना बोट लावून मुका घेऊन म्हटलें, " मी तुला दूर कशी करीन पोरी ? "

थोडेसें हंसून ती म्हणाली, " आम्ही हिंदू घरच्या मुली इतक्या का मूर्ख आहोत ? इतक्या का हीन आहोंत ? केवळ धर्ममतं निराळीं म्हणून तुझ्यासारख्या

डोळ्यांतलीं आसवें कशींबशीं पुसून घेऊन अचला एकदां हळूच म्हणाली, " आज तुम्हीं एक शपथ घेतली पाहिजे माझ्यापाशीं. "

सुरेशचा ध्यानभंग झाला. त्यानें चकित होऊन तसेंच हळू विचारलें, " कसली शपथ ? "

" अशा प्रकारें आपला जीव आपण धोक्यांत घालायचा नाहीं. "

" पण मी कांहीं मुद्दाम जीव द्यायला जात नाहीं. कुणाचं संकट पाहिलं कीं माझं भान राहात नाहीं—लहानपणापासून हाच माझा स्वभाव आहे अचला.

अचला यावर कांहीं बोलली नाही, पण त्याचवेळीं दाबून टाकलेला एक सुस्कारा तिनें बाहेर सोडला तो सुरेशच्या कानीं आला. बँडेज बांधून झाल्यावर तो उठून उभा राहिला आणि म्हणाला, " मात्र उद्यां या गरीबाच्या घरीं एकदां पायधूळ धाडायची-! " त्याचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून आले होते. पण त्याच्या आवाजावर मात्र त्याचा परिणाम झाला नव्हता.

अचलेनें खालच्या मानेनेंच म्हटलें, " कबूल ! "

केदारबाबूंना नमस्कार करून सुरेश हंसत म्हणाला, " पहा, माझी निराशा करायची नाहीं बरं !—" असें म्हणून अचलेच्या तोंडाकडे एकदां पाहून केलेल्या मागणीची अबोल द्विरुक्ती करून तो बाहेर निघून गेला.

दुसऱ्या दिवशीं ठरल्यावेळीं सुरेशची गाडी येऊन त्यांच्या दाराशीं हजर झाली. केदारबाबू तयारींतच होते, ते मुलीला घेऊन तसेंच निघाले.

सुरेशच्या वाड्याच्या फाटकांत प्रवेश करतांच केदारबाबू थक्क होऊन गेले. तो बडा माणूस होता हें जरी त्यांना माहित होतें तरी तो किती बडा होता याचा अंदाज करणें आजवर त्यांना कठीण गेलें होतें. आज मात्र त्यांना त्यांच्या बडेपणाची पूर्ण कल्पना आली.

सुरेशनें त्यांचें स्वागत करून हंसत हंसत म्हटलें, " महिमचा हट्ट अजूनही मोडतां आला नाहीं केदारबाबू. उद्यां दुपारच्या पूर्वी या घरीं यायला तो मुळींच कबूल नाहीं. "

केदारबाबू यावर कांहींच बोलले नाहींत. तिघेही दिवाणखान्यांत आले

त्यावेळीं एक प्रौढ बाई दाराआडून पुढें आली आणि अचलेचा हात धरून तिला आंत घेऊन गेली.

त्या खोलींत गालिचा अंथरलेला होता त्यावर अचलेला मोठ्या आदरानें बसवून घेऊन आपली ओळख करून देत ती म्हणाली, "आतां यापुढं मी तुझी सासू बरं कां सुनबाई ! मी महिमची आत्या."

अचलेनें नमस्कार करून तिची पायधूळ घेतली आणि अचंबितपणें तिच्या तोंडाकडे पाहात ती म्हणाली, "तुम्हीं इथं केव्हां आलांत ?"

महिमला एक आत्या आहे हें तिला माहित नव्हतें. तिच्या चकित होण्याच्या कारणाचा अंदाज येऊन ती बाई हंसत म्हणाली, "मी इथंच असतें मुली. मी सुरेशची आत्या-अन् महीम तर मला परका नाहीं, तेव्हां मी त्याचीही आत्याच."

तिचा स्वाभाविक गोड आवाज आणि कनवाळुपणा पाहून अचलेचें हृदय भावनेच्या भरानें भरून आलें. तिला आई नव्हती, त्या उणीवेची भरपाई करण्याजोगी नात्याची कुणी बाईही नव्हती. तिला कळूं लागल्यापासून तिच्या बापाखेरीज जिव्हाळ्याचें असें दुसरें माणूस तिला माहित नव्हतें. या उणीवेमुळें तिच्या हृदयांतील केव्हढी जागा रिकामी पडून राहिली होती याची यावेळीं तिला स्पष्ट-स्पष्ट जाणीव झाली—परक्याच्या घरीं, परक्याच्या आप्तानें तिला 'सूनबाई' म्हणून प्रेमानें हांक मारली त्याचवेळीं तिला त्या उणीवेची आठवण झाली. अगदींच नव्या अशा संबोधनानें हांक मारल्यामुळें पहिल्यानें ती लाजली होती पण त्या हांकेंतला गौरव आणि माधुर्य तिच्या हृदयाच्या तळाला इतकें जाणवलें, कीं त्याचे पडसाद तिला सारखे ऐकूं येत होते.

बोलतां बोलतां दोघांच्याही भाषणाला चांगलाच रंग भरला. अचला लाजत लाजत म्हणाली, "बरं आत्याबाई, तुम्हीं मला अगदीं जवळ बसवून घेतलं ! कसं झालं हें ? ब्राह्म म्हणून मला तुम्हीं कांहीं दूर केलं नाहीं."

आत्याबाईनें एकदम तिच्या ओठांना बोट लावून मुका घेऊन म्हटलें, "मी तुला दूर कशी करीन पोरी ?"

थोडेसें हंसून ती म्हणाली, "आम्ही हिंदू घरच्या मुली इतक्या का मूर्ख आहोंत ! इतक्या का हीन आहोंत ? केवळ धर्ममतं निराळीं म्हणून तुझ्यासारख्या

मुलीला जवळ बसवून घ्यायला मला संकोच कसा वाटेल मुली ? मग दूर करण्याची गोष्ट तर दूरच राहिली ! ”

अचला अतिशय ओशाळून म्हणाली, “ मला क्षमा करा आत्याबाई. मला हें माहित नव्हतं. आमच्या समाजाबाहेरच्या कुणाही बायकांशीं माझा केव्हांच संबंध आला नव्हता. हिंदू बायका आमचा तिटकारा करतात, इतकंच नव्हे, आमची शिवाशिव झाली तर आंघोळ करतात, असं मी नुसतं ऐकलं होतं—”

आत्याबाई म्हणाली, “ तो तिटकारा नव्हे मुली, तो एक आचार आहे. आमचं बाहेरचं आचरण पाहून तुम्हां लोकांचा बहुधा असाच गैरसमज होत असतो. पण खरं सांगतें मुली, आम्ही खरोखर कुणाचाच तिटकारा कधीं करीत नाहीं. आमच्या गांवांतल्या घरीं माझी कुणबी आजीबाई आहे, तिच्यावर माझा जीव किती गुंतलेला असतो तें सांगतांसुद्धां यायचं नाहीं—”

थोडा वेळ थांबून ती म्हणाली, “ बरं, तुला एक गोष्ट विचारतें मुली, तुला कां असं वाटलं ? सुरेशच्या तोंडून ऐकल्यामुळं, कीं आज मला प्रत्यक्ष पाहिल्यामुळं ?”

सुरेशचा उल्लेख ऐकतांच अचला हळूच म्हणाली, “ बरेच दिवसांपूर्वी ते असं कांहीं म्हणाले होते खरं ! ”

आत्याबाई म्हणाली, “ त्याचा स्वभावच आहे तसा. मनांत कांहीं आलं कीं मग उपाय नाहीं—चोहींकडे बडबडत फिरेल. तो कधींच ब्राह्म समाजांत मिसळत नाहीं. पण उगीच त्यांच्या विरुद्ध बोलत असतो. याचमुळें महिम-बरोबर कित्येक दिवस त्याचा झगडा सुरू झाला होता. तसं पाहिलं तर तो माझ्याकडेसच लहानाचा मोठा झालाय—तेव्हां मला सांगतां येईल, कीं तो कधींच कुणाचा द्वेष करीत नाहीं, ती त्याची वृत्तीच नाहीं. आतां हेंच पहा मुली, तुला पाहिल्या दिवसापासून तो—”

पण तिचें वाक्य पुरें झालें. नाहीं अचलेच्या तोंडाकडे नजर जातांच ती मधल्यामधेंच थांबली. आपल्या बाबतींत या आत्याबाईला किती गोष्टी कळल्या आहेत याचा अचलेला तितकासा अंदाज आलेला नसला, तरीही तिला ती गोष्ट मुळींच माहीत नसावी असें नव्हे, असें अचलेला वाटलें. क्षणभर दोघीही मुकाट बसल्या होत्या. आपल्याच मनांत शरमून अचलेनें विषयांतर करण्याचा प्रयत्न केला.

तिनें विचारलें, "आत्याबाई, तर मग तुम्हींच का सुरेशबाबूंना लहानाचं मोठं केलं ?"

आत्याबाई गहिंवर येऊन म्हणाली, "होय मुली, माझ्याच हातीं तो माणसांत आला. वयाच्या सहाव्या वर्षीं त्याचे आईबाप गमावले. अजूनही माझं तें काम संपलेलं नांहीं. अजूनही तो बोजा माझ्या माथ्यावरून खालीं उतरला नाहीं. कुणाचंही दुःख, कष्ट, संकट त्याच्यानं पहावत नाहीं. जिवावर उदार होऊन तो अशावेळीं संकटांत उडी घेतो. त्यामुळें रात्रंदिवस भीतीनं माझा जीव कसा आकसून जातोय तें तुला सांगता यायचं नाहीं मुली."

अचलेनें हळूच विचारलें, "फैजाबादची हकिगत कळली ?"

आत्याबाई मान हालवून म्हणाली, "ऐकली तर काय मुली ! म्हणूनच मी देवाला रोज म्हणतें, देवा, मी जोंवर जिवन्त आहें तोंवर कांहीं बरंवाईट मला दिसूं देऊं नकोस. माथ्यावर पाय देऊन मला रसातळाला नेऊन टाकूं नकोस. तें मला मुळींच सहन व्हायचं नाहीं. बोलतां बोलतां तिचा गळा भरून आला. मातृस्नेहानें ओथंबलेली तिच्या तोंडची ती काकुळतीची प्रार्थना ऐकून अचलेचे डोळे पाण्यानें भरून आले. ती केविलवाणेपणानें म्हणाली, "तुम्ही कां त्यांना बंदी करीत नाहीं आत्याबाई ?"

डोळ्यांतल्या पाण्यांतून हंसत आत्याबाई म्हणाली, "बंदी ? माझ्या बंदीनं काय होणार आहे मुली ? जिच्या बंदीचा खराखरा परिणाम होईल अशीच कुणीतरी एक आज कित्येक वर्षं मी शोधतेंय. पण तें कांहीं अशातशा मुलीचं काम नव्हे. याला ताब्यांत ठेवील अशी मुलगी देवानंच दाखवून द्यायला हवी. मला कुठून मिळेल ती ?"

अचला कांहीं वेळ उगीच राहिली होती. नंतर तिनें विचारलें, "तुमच्या मनाजोगती मुलगी कुठंच का आढळत नाहीं ?"

आत्याबाई म्हणाली, "आत्तांच तुला सांगितलं ना मी, देवानं दिल्या-शिवाय केव्हांही मिळायची नाहीं असली मुलगी. सुरेश या बाबतींत मुळींच लक्ष देत नसे. एके दिवशीं तो येऊन म्हणाला, 'आत्याबाई, आतां मात्र एक सून आणून तुझ्यासमोर हजर करतों.' त्या दिवशीं माझ्या आनंदाला पारावार राहिला

नव्हता. मनांतल्या मनांत मी आशीर्वाद दिला अन् म्हटलं, तुझ्या तोंडी साखर पडो ! घरची सून घेऊन मुलगा येतोय असं कधीं होईल म्हणून मी वाट पाहातेंय. मी किती म्हटलं त्याला, कीं एक दिवस मला घेऊन जा तिकडे, मी पाहून येतें, पण त्यानं कांहीं ऐकलं नाहीं. नुसता हंसून म्हणाला, 'तिथिनिश्चय ठरवीन त्याच दिवशीं आशीर्वाद द्यायला तुला घेऊन जाईन.' त्यानंतर कांहीं दिवसांनीं येऊन नुसता म्हणाला, 'तें कांहीं जुळलं नाहीं आत्त्याबाई. मी रात्रीच्या गाडीनं पश्चिमेला चाललोंय.' काय जुळलं नाहीं तें मी किती किती प्रकारें विचारलं पण त्यानं सरळ उत्तर कांहीं दिलं नाहीं. त्याच रात्रीं तो निघून गेला. मी आपल्याशींच म्हटलं, नुसत्या माझ्या मुलाची इच्छा असली म्हणूनच कांहीं होईल असं नाहीं—त्या मुलीचीसुद्धां जन्मजन्मांतरींची तपश्चर्या असायला हवी ना ? तुला काय वाटतं मुली ?"

अचलेनें मान खालीं घातली. ही मुलगी कोण तें आत्त्याबाईला अजून कळलेलें नाहीं हें आतां तिला कळून आलें. मनावरचा भार उतरला असें एकदां तिला वाटलें. पण हा भार टाकणारा धोंडा सहसा दूर सरकत नाहीं, हृदयाचे ओरखाडे काढून रगडून नंतरच तो दूर होतो, हें त्याच क्षणाला तिला पटल्या-वांचून राहिलें नाहीं.

जेवणाची तयारी झाली तेव्हां आत्त्याबाईनें अचलेला वेगळा पाट मांडून बसवलें होतें. नंतर तिनें घरांतील प्रत्येक खोली, प्रत्येक सामानसुमान, फिरफिरून दाखवून दिलें आणि सहसा एक सुस्कारा सोडून म्हटलें, "मुली, देवाच्या दयेनं इथं कसलाच अभाव नाहीं, पण हें झालंय लक्ष्मीशिवाय वैकुंठ ! म्हणूनच मधून मधून माझ्या डोळ्यांना पाणी आल्यावांचून राहात नाहीं सूनबाई !"

बाहेर केदारबाबू जायला निघाले आहेत असें नोकरानें सांगितलें. अचलेनें आत्त्याबाईच्या पायाला प्रणाम केला त्यावेळीं तिनें तिचा हात धरला आणि अगदीं एक क्षणभरच मागें पुढें करून नंतर ती हळूच म्हणाली, "तुला एकच गोष्ट विचारतें—तुझी हरकत नसली तर !"

अचला तिच्या तोंडाकडे पाहून नुसती थोडीशी हंसली.

आत्त्याबाई म्हणाली, "तुझी अन् महिमची सारी हकिकत सुरेशनं मला

सांगितली. त्याच्याचकडून मला कळलं, कीं महिम गरीब आहे म्हणून या संबंधाला तुझ्या बाबांचा विरोध होता. केवळ तुझ्यासाठीं म्हणून—"

अचला मान खालीं खालून हळूच म्हणाली, "तें खरं आहे आत्याबाई !

आत्याबाई एकदम उल्हासून आली आणि तिचे दोन्ही हात घट्ट धरून म्हणाली, "असं पाहिजे मुली ! माणूस एकदां आवडला म्हणजे त्याच्यापुढं पैसा अडका, धनदौलत यांची कसली प्रतिष्ठा ! तूं एवढी सुद्धां शंका धरू नको मनांत. मी महिमला चांगलाच ओळखतें. तो असाच मुलगा आहे - त्याच्यासाठीं हाल-अपेष्टा काढल्यास तर देवाच्या दयेनं तें सारं कांहीं सार्थकीं लागेल. एवढ्या मोठ्या प्रेमाची देव उपेक्षा करणार नाहीं याची मी तुला खात्री देतें."

अचलेनें पुन्हां एकदां खालीं वाकून तिची पायधूळ घेतली.

आत्या बाईनें तिच्या हनुवटीला हात लावून तिचा मुका घेतला आणि म्हटलें, "अशीच एखादी सून आणून हा संसार थाटतां आला असता मला-!"

सुरेशनें दोघांनाही गाडींत बसवून मुकाट्यानें नमस्कार करून निरोप दिला. तो परत फिरत असतां कंदिलाचा उजेड त्याच्या तोंडावर पडला होता तिकडे अचलेची नजर गेली. ती कसली मुद्रा होती तें एक देवच जाणे—पण तिला जो गहिंवरून उमाळा आला तो गळ्यापर्यंत उसळून आला. गाडी दौडत रस्त्यावरून निघाली होती. रस्त्यावरची रहदारी आतां विरळ होत आली होती. तिकडे पाहात असतांना तिला वाटलें, कीं एव्हढा वेळपर्यंत आपण एक भलें मोठें स्वप्नच पाहिलें ! तें सुखाचें होतें कीं दुःखाचें होतें ठरवणें मोठें कठीण होतें. केदारबाबू अजूनपर्यंत कांहींच बोलले नव्हते. सुरेशाच्या ऐश्वर्याचा थाट पाहून त्यांचें मस्तक सुन्न झालें असावें. एकदम एक मोठा सुस्कारा सोडून ते उद्गारले, "हो ! मोठा माणूस आहे खरा !"

मुलीकडून या बाबतींत कांहीं दुजोरा मिळाल्याचें दिसून आलें नाहीं, त्यामुळें पुढें बोलायला त्यांना उत्साह नसावा. घरीं जाईपर्यंत ते वाटेंत उगीच होते.

गाडी येऊन ज्यावेळीं दाराजवळ उभी राहिली त्यावेळीं कोचमन दरवाजा उघडून बाजूला उभा राहिला, त्यावेळींही आणखी एकदां त्यांची चमक मोडली.

पुन्हां एकदां एक सुस्कारा सोडून ते पुटपुटले, " सुरेशला आम्हीं कुणी ओळखलं नाहीं. एक देव माणूस आहे हा ! "

## १४

आज अचलेचें लग्न होतें. गर्दींत एक क्षणभरच सुरेश केव्हां तरी दिसून गेला. त्यानंतर तो जो कुठें नाहींसा झाला त्याचा केदारबाबूंच्या घरीं सारी रात्रभर सुद्धां पत्ता लागला नाहीं.

लग्नसमारंभ उरकला. एकदोन दिवस अचलेच्या मनाची खळबळ उडाली होती. सुरेशच्या घरीं आत्याबाईबरोबर झालेलीं बोलणीं तिच्या मनांत सारखीं घोळत होतीं—आज त्यांचें निराकरण झालें.

महिमचा गंभीरपणा अजूनही तसाच टिकून राहिला होता. कोणत्याही प्रकारच्या बऱ्यावाईट परिणामाची छाया त्याच्या चेहऱ्यावर दिसून येत नव्हती. तरीही शुभदृष्टीच्या वेळीं त्याची मुद्रा पाहून अचलेचें हृदय आनंदानें आणि माधुर्यानें भरून आलें. मनांतल्या मनांत नवऱ्याच्या पायावर मस्तक ठेवून ती म्हणाली, ' आतां मी भीत नाहीं पतिदेवा. कुठंही कोणत्याही परिस्थितींत तुमच्या सांगातीं राहिलें तर तोच माझा स्वर्ग ! आजपासून तुमची झोंपडी हाच माझा राजवाडा ! '

ती सासुरवाडीला जायला निघाली त्यावेळीं सदऱ्याच्या बाहीनें डोळे पुसून केदारबाबू म्हणाले, " तुला माझा आशीर्वाद आहे मुली. नवऱ्याच्या सोबतींत दुःख दारिद्र्य भोगावं लागलं तरी जीवनाच्या यात्रेंत कर्तव्याच्या मार्गावर निर्विघ्नपणें पुढं पाऊल टाक. ईश्वर तुमचं कल्याण करो ! " असें म्हणून ते तसेंच डोळे पुशीत शेजारच्या खोलींत निघून गेले.

त्यानंतर श्रावण महिन्यांत एका ढगाळलेल्या दुपारीं, वरून थांबलेल्या पावसाच्या नंतरचें आकाश आणि खालीं कोंदट, चिखलानें डबडबलेल्या गांवठी पायवाटेवरून निघालेल्या डोलींतून अचला एके दिवशीं आपल्या नवऱ्याच्या घरीं आली. पण या रस्त्यावरून येत असतांना नवविवाहाचें अर्धें अधिक सौंदर्य नाहींसें होऊं लागलें होतें.

खेडेगांवचा तिला परिचय होता काय तो छापील पुस्तकांच्या द्वारें ! त्या परिचयांत दुःखदारिद्र्याच्या बरोबरच हजार प्रकारें वर्णन केलेल्या ओळींओळींतल्या काव्यात्मक कल्पनेचें सौंदर्य भरलेलें होतें ! डोलींतून उतरून ती घरांत आली आणि चारी दिशांना ज्यावेळीं तिनें नजर फेकली त्यावेळीं तिला दिसून आलें, कीं अंतःकरणाला कवित्वाचा एव्हढा सुद्धां पुरावा पटण्याजोगी परिस्थिती तिथें कुठेंही दिसत नव्हती. तिच्या कल्पनेंतलें खेडें, प्रत्यक्ष सृष्टींतल्या या आनंदहीन, निर्जन, शेणामातीनें सारवलेल्या, काळोख्या ठेंगणे दरवाजे, ठेंगण्या खिडक्या असलेलें,—वर कळकीचें आढें आणि मोडकीतोडकी माची अन् तुटकीं कौलें यांनीं शोभलेलें तें घर दिसून येईल, असें तिला स्वप्नांत सुद्धां वाटलें नव्हतें. या असल्या घरांत आतां सारें आयुष्य काढायचें, ही कल्पना मनांत येतांच तिच्या हृदयानें ठाव सोडला. नवऱ्याचा सहवास, विवाहाचा आनंद वगैरे साऱ्या कल्पना एका क्षणांत मायाबाजारासारख्या पाहातां पाहातां विरघळून गेल्या. घरीं सासू-सासरे, नणंद वगैरे कुणीच नव्हतें, दूरच्या नात्याची कुणीतरी एक आजीबाई शेजारच्या गांवांतून तिच्या स्वागतासाठीं मुद्दाम होऊन आली होती. लग्नाचे जे कांहीं सोपस्कार आणि सजावट तिच्या दृष्टीनें पाहिजे होती ती न दिसल्यामुळें ती थक्क होऊन नुसती पाहात राहिली—शेवटीं वधूचा हात धरून तिनें तिला घरांत आणून बसविलें. शेजारपाजारच्या ज्या बायका नवी सून पाहाण्यासाठीं धांवत आल्या होत्या त्या अचलेला पाहतांच तिच्या वयाचा अंदाज करून एकमेकींच्या कानाला लागूं लागल्या, एकमेकींना चिमटे घेऊं लागल्या आणि जायच्यावेळीं ‘ब्राह्म, म्लेंम्छ वगैरे जे कांहीं चारदोन गोड गोड उद्गार त्यांनीं काढले ते अचलेच्या कानीं गेल्यावांचून राहिले नाहींत.

थोड्याच वेळांत गांवभर डांगोरा वाजला—महिमनें म्लेंच्छाच्या मुलीशीं लग्न करून तिला घरीं आणलें ही गोष्ट अगदीं खरी खरी आहे ! लग्नाच्या पूर्वी अशीच कांहींतरी कंडी पिकल्यामुळें गांवांत चर्चा सुरू झाली होती. आतां नवरीला प्रत्यक्ष पाहिल्याबरोबर कुणालाही संशयाला जागा राहिली नाहीं. सर्वत्रांना ती गोष्ट सोळा आणे पटली.

शेजारणी निघून गेल्यावर आजीबाई येऊन अचलेला म्हणाल्या, “ नातसुने

पुन्हां एकदां एक सुस्कारा सोडून ते पुटपुटले, “ सुरेशला आम्हीं कुणी ओळखलं नाहीं. एक देव माणूस आहे हा ! ”

## १४

आज अचलेचें लग्न होतें. गर्दींत एक क्षणभरच सुरेश केव्हां तरी दिसून गेला. त्यानंतर तो जो कुठें नाहींसा झाला त्याचा केदारबाबूंच्या घरीं सारी रात्र-भर सुद्धां पत्ता लागला नाहीं.

लग्नसमारंभ उरकला. एकदोन दिवस अचलेच्या मनाची खळबळ उडाली होती. सुरेशच्या घरीं आत्याबाईबरोबर झालेलीं बोलणीं तिच्या मनांत सारखीं घोळत होतीं—आज त्यांचें निराकरण झालें.

महिमचा गंभीरपणा अजूनही तसाच टिकून राहिला होता. कोणत्याही प्रकारच्या बऱ्यावाईट परिणामाची छाया त्याच्या चेहऱ्यावर दिसून येत नव्हती. तरीही शुभदृष्टीच्या वेळीं त्याची मुद्रा पाहून अचलेचें हृदय आनंदानें आणि माधुर्यानें भरून आलें. मनांतल्या मनांत नवऱ्याच्या पायावर मस्तक ठेवून ती म्हणाली, ‘ आतां मी भीत नाहीं पतिदेवा. कुठंही कोणत्याही परिस्थितींत तुमच्या सांगातीं राहिलें तर तोच माझा स्वर्ग ! आजपासून तुमची झोंपडी हाच माझा राजवाडा ! ’

ती सासुरवाडीला जायला निघाली त्यावेळीं सदऱ्याच्या बाहीनें डोळे पुसून केदारबाबू म्हणाले, “ तुला माझा आशीर्वाद आहे मुली. नवऱ्याच्या सोबतींत दुःख दारिद्र्य भोगावं लागलं तरी जीवनाच्या यात्रेंत कर्तव्याच्या मार्गावर निर्विघ्नपणें पुढं पाऊल टाक. ईश्वर तुमचं कल्याण करो ! ” असें म्हणून ते तसेंच डोळे पुशीत शेजारच्या खोलींत निघून गेले.

त्यानंतर श्रावण महिन्यांत एका ढगाळलेल्या दुपारीं, वरून थांबलेल्या पावसाच्या नंतरचें आकाश आणि खालीं कोंदट, चिखलानें डबडबलेल्या गांवठी पायवाटेवरून निघालेल्या डोलींतून अचला एके दिवशीं आपल्या नवऱ्याच्या घरीं आली. पण या रस्त्यावरून येत असतांना नवविवाहाचें अर्धें अधिक सौंदर्य नाहींसें होऊं लागलें होतें.

खेडेगांवचा तिला परिचय होता काय तो छापील पुस्तकांच्या द्वारें ! त्या परिचयांत दुःखदारिद्र्याच्या बरोबरच हजार प्रकारें वर्णन केलेल्या ओळींओळींतल्या काव्यात्मक कल्पनेचें सौंदर्य भरलेलें होतें ! डोलींतून उतरून ती घरांत आली आणि चारी दिशांना ज्यावेळीं तिनें नजर फेकली त्यावेळीं तिला दिसून आलें, कीं अंतःकरणाला कवित्वाचा एव्हढा सुद्धां पुरावा पटण्याजोगी परिस्थिती तिथें कुठेंही दिसत नव्हती. तिच्या कल्पनेंतलें खेडें, प्रत्यक्ष सृष्टींतल्या या आनंदहीन, निर्जन, शेणामातीनें सारवलेल्या, काळोख्या ठेंगणे दरवाजे, ठेंगण्या खिडक्या असलेलें,—वर कळकीचें आढें आणि मोडकीतोडकी माची अन् तुटकीं कौलें यांनीं शोभलेलें तें घर दिसून येईल, असें तिला स्वप्नांत सुद्धां वाटलें नव्हतें. या असल्या घरांत आतां सारें आयुष्य काढायचें, ही कल्पना मनांत येतांच तिच्या हृदयानें ठाव सोडला. नवऱ्याचा सहवास, विवाहाचा आनंद वगैरे साऱ्या कल्पना एका क्षणांत मायाबाजारासारख्या पाहातां पाहातां विरघळून गेल्या. घरीं सासू-सासरे, नणंद वगैरे कुणीच नव्हतें, दूरच्या नात्याची कुणीतरी एक आजीबाई शेजारच्या गांवांतून तिच्या स्वागतासाठीं मुद्दाम होऊन आली होती. लग्नाचे जे कांहीं सोपस्कार आणि सजावट तिच्या दृष्टीनें पाहिजे होती ती न दिसल्यामुळें ती थक्क होऊन नुसती पाहात राहिली—शेवटीं वधूचा हात धरून तिनें तिला घरांत आणून बसविलें. शेजारपाजारच्या ज्या बायका नवी सून पाहाण्यासाठीं धांवत आल्या होत्या त्या अचलेला पाहतांच तिच्या वयाचा अंदाज करून एकमेकींच्या कानाला लागूं लागल्या, एकमेकींना चिमटे घेऊं लागल्या आणि जायच्यावेळीं 'ब्राह्म, म्लेंम्छ वगैरे जे कांहीं चारदोन गोड गोड उद्गार त्यांनीं काढले ते अचलेच्या कानीं गेल्यावांचून राहिले नाहींत.

थोड्याच वेळांत गांवभर डांगोरा वाजला—महिमनें म्लेंच्छाच्या मुलीशीं लग्न करून तिला घरीं आणलें ही गोष्ट अगदीं खरी खरी आहे ! लग्नाच्या पूर्वी अशीच कांहींतरी कंडी पिकल्यामुळें गांवांत चर्चा सुरू झाली होती. आतां नवरीला प्रत्यक्ष पाहिल्याबरोबर कुणालाही संशयाला जागा राहिली नाहीं. सर्वत्रांना ती गोष्ट सोळा आणे पटली.

शेजारणी निघून गेल्यावर आजीबाई येऊन अचलेला म्हणाल्या, " नातसुने

मी थातां येतें तर. खूप लांब गेलं पाहिजे मला—अन् गेल्यावांचून गत्यंतर नाहीं—एव्हढीशी नात आहे घरीं—" वगैरे वगैरे बोलत होकार नकाराला संधी सुद्धां न देतां ती पाहातां पहातां निघून गेली. केवळ पूर्वीचा लागाबांधा ध्यानांत घेऊन ती अजूनपर्यंत राहिली होती—तें राहाणें तिला कठीण जात होतें. हें अचलेला कळून चुकलें होतें.

तसें पाहिलें तर आजीबाईची कांहींच चूक नव्हती. हें प्रकरण असेंच कांहींतरी आहे असें आधींच कळलें असतें तर ती या बाजूला फिरकली सुद्धां नसती. खेडयांत राहाणारीं माणसें जर कोणत्या एकाद्या गोष्टीला भीत असतील तर तीं या असल्याच. या प्रकाराला न भिणारीं माणसें खेडयाच्या इतिहासांत अत्यंत दुर्मिळ.

आजीबाई अंतर्धान पावल्यावर घरचा यदू गडी. सैंपाकी भटजी आणि कलकत्त्याहून बरोबर आलेली अचलेच्या माहेरची मोलकरीण 'हरीची आई' यांच्या खेरीज त्या लग्नघरीं एक सुद्धां माणूस शिल्लक राहिलें नाहीं. पावसाची सर यापूर्वी थांबली होती ती पुन्हां हळुहळू एकेक थेंब सुरू झाली होती. हरीची आई तिच्याजवळ येऊन म्हणाली, "असलं घर कधीं बघितलं नव्हतं ताई ! कुठंच कुणी नाहीं—"

अचला खालीं मान घालून स्तब्धपणें बसली होती ती नुसती विचूकपणें 'हूं' म्हणाली.

हरीची आई पुन्हां म्हणाली, "जांवईबाबूही कुठं दिसत नाहींत ! एकदां तोंड दाखवून जे कुठं गेले—"

अचलेनें यावरही कांहीं उत्तर दिलें नाहीं.

पण या वनाजंगलानें वेढलेल्या गांवांत हरीच्या आईचं मन कितीही घाबरून गेलें तरी अचलेला आश्वासन देणें तिचें कर्तव्य होतें. तिनेंच अचलेला लहानाची मोठी केली होती. तिला धीर यावा म्हणून ती म्हणाली, "भीतेस काय अशी ? इथं आपण कांहीं पाण्यांत येऊन पडलों नाहीं ! ते आले म्हणजे सारं कांहीं ठीक होऊन जाईल. तोंवर ट्रंक उघडून कपडे काढून एकदां कपडे बदलून घे पाहूं !"

"सध्यां राहूं दे हरीची आई—" असें म्हणून अचला तशीच खालीं

मान घालून लाकडी पुतळीसारखी बसून राहिली. जीवनांतला सारा स्वादसुगंध तिच्या अंतःकरणांतून नाहींसा झाला होता.

पाऊस वाढत होता. झडीच्या त्या वाढत्या वेगाबरोबर दिवसाच्या शेवटाचा अंधुक प्रकाश केव्हां मालवला, श्रावणांतलें भरगच्च ढगांनीं झाकाळलेलें आकाश भेदून दरिद्री खेड्यांतली संध्याकाळ केव्हां घनदाट झाली, तें कांहीं कळलें नाहीं. केवळ आनंदाची एव्हढी सुद्धां जाणीव होत नसलेल्या त्या कोंदट घरांत कोपऱ्या कोपऱ्यांतून काळोखाचे थर एकावर एक रचले जाऊं लागले. यदूनें येऊन हरीकेन कंदील पेटवून खोलींत ठेवला. हरीच्या आईनें विचारलें, "जांवईबुवा कुठं आहेत रे ?"

"कोण जाणे !" असें म्हणून यदू जायला निघत होता. त्याच्या संक्षिप्त उत्तरानें हरीच्या आईनें साशंक होऊन म्हटलें, "असं काय झालं आहे ? बाहेर ते नाहींत वाटतं ?"

"नाहीं." असें म्हणून यदू निघून गेला. नव्या आलेल्या मंडळींवर तो फारसा खूष नव्हता असें दिसून आलें. हरीची आई अतिशय घाबरून गेली आणि अचलेच्या जवळ येऊन भेदरल्या भाषेनें म्हणाली, "हें एकंदर प्रकरण मला कांहीं ठीकसं दिसत नाहीं ताई ! दाराला कडी लावून घेऊं का ?"

अचला आश्चर्यानें म्हणाली, "कडी कशाला लावायची ?"

हरीची आई लहानपणींच गांव टाकून कलकत्त्याला आली होती. पुन्हां कधींच गांवीं गेली नव्हती. खेडेगांवच्या चोरादरोडेखोरांच्या गोष्टींची आठवण तेव्हढी शिल्लक राहून तिच्या बाकी साऱ्या आठवणी अंधुक होऊन गेल्या होत्या. बाहेरच्या काळोखाकडे एकवार नजर फेकून ती अचलेला खेटून बसून हळूच म्हणाली, "हें खेडेगांव, काय होईल कुणी सांगावं ताई !" बोलतां बोलतां तिच्या सर्वांगावर कांटा उभा राहिला.

अगदीं याच क्षणाला अंगणांतून हांक आली, "आजीबाई कुठं आहेत हो ?" एक वीस एकवीस वर्षांची सडपातळ बाई बोलत बोलत आंत येऊन म्हणाली, "आधीं एक नमस्कार करून घेतें अन् मग हे कपडे बदलतें!—" असें म्हणून ती आंत आली आणि अचलेच्या पायाजवळ डोकें टेकून तिनें प्रणाम केला.

हातीं कंदील घेऊन तिनें अचलेच्या तोंडाजवळ धरला आणि क्षणभर तिचा चेहरा नीट निरखून पाहून तिनें ओरडून हांक मारली, " दादा ! अरे दादा—"

गांवीं येतांच याच बाईला आणण्यासाठीं महिम गेला होता. पलिकडल्या खोलींतून त्यानें जबाब दिला, " काय ग मृणाल—"

" जरा इकडे ये म्हणतें ना—"

दाराबाहेर उभा राहून महिम म्हणाला, " काय ग ? "

पुन्हां एकदां कंदील अचलेच्या तोंडाजवळ धरून एकदां नीट पाहून घेऊन मृणाल म्हणाली, " नाहीं – शेवटीं तूंच जिंकलंस दादा. माझ्याशीं लग्न केलं असतंस तर फुकट फसला असतास. "

महिम बाहेरूनच तिला जरब देऊन म्हणाला, " अजून सुद्धां माझं ऐकत नाहींस ना मृणाल ? पुन्हां तसलीच ती थट्टा ! माझं ऐकायचं नाहीं असंच का ठरवलंयस तूं ? "

" वा ! थट्टा कशी ?—अचलेकडे पाहून एकदां खुद्कन् हंसून ती म्हणाली. " अगबाई ग ! धन्य या वहिनीची ! थट्टा नव्हं बरं !—बरं, बरं, तुझ्या ह्या पतिराजालाच विचार, कीं एकदां यानं मलाच पसंत केली होती कीं नाहीं तें ! "

महिम म्हणाला, " तूं मर बडबडत ! मी बाहेर चाललों—"

मृणाल म्हणाली, " मग जा ना, कुणी धरून ठेवलंय तुला ? " अचलेच्या हनुवटीला हात लावून मोठ्या प्रेमानें तिचा गालगुच्चा घेऊन ती म्हणाली, " हें पहा वहिनी, मत्सर कसा वाटायचा नाहीं ? या घरची गृहिणी होणार होतें मी ! जळलं मेलं माझ्या आईचं तोंड तें – कसला मंत्र तिनं दादाच्या कानीं फुंकला,— मला पाहातांच दादाचा कपाळशूळ उठूं लागला. नाहींतर–अरे यदू, घोषाल महाशय गेले कुठं ? "

यदू म्हणाला, " तळ्यावर हात धूत आहेत. "

" आं ! या काळोखांत तळ्यावर ? " मृणालचा हंसता चेहरा एकदम काळजीनें कोमेजला. ती घाबरून म्हणाली, " यदू, जरा दिवा घेऊन जा बाबा तळ्यावर. म्हातारं माणूस, काळोखांत पाय घसरून हातपाय मोडायचा एखादा–"

तशीच अचलेच्या तोंडाकडे पाहून ती लाजत हंसत म्हणाली, " काय

पूर्वकर्म होतं ग बाई, कुठल्या एका बहाद्दर म्हाताऱ्याच्या गळ्यांत धरून बांधली मला. त्याची सेवा करतां करतां अन् त्याला संभाळतां संभाळतां माझा जीव जात चाललाय ! बरं, बरं, आधीं हे कपडे बदलून येतें आणि मग बोलतें. पण सवत समजून अढी धरून बसायचं नाहीं बरं का माझ्याजवळ ! सांगून ठेवतें. नाहींतर असं पाहा, माझ्या त्या म्हाताऱ्याला आपण दोघी वांटून घेऊं—" असें म्हणून हंसण्याच्या कल्लोळानें सारें घर उजळून टाकीत ती घाईघाईनें निघून गेली.

असल्या प्रकारच्या थट्टामस्करीचा अचलेला केव्हांही परिचय नव्हता, त्यामुळें तिला हें सारें भाषण इतकें कुरुचिपूर्ण आणि ओंगळवाणें वाटलें, कीं शरमेनें तिचा जीव अर्धमेला होऊन गेला. एव्हढी मोठी निलाजरी प्रगल्भता कुणा स्त्रीच्या ठायीं असेल असें तिला वाटलें सुद्धां नव्हतें, म्हणूनच जन्मापासून परिचित असलेल्या तिच्या शिक्षण आणि संस्काराच्या कल्पनेवर मृणालच्या या रसिकतेचा जबरदस्त आघात झाला. तरीही तिला वाटत होतें, कीं ही आल्यामुळें आपल्या या हद्दपारीची वेदना निम्मेशिम्मे कमी झाली. ही कोण, कुठून आली, हिचा आणि महिमचा संबंध कसला, हें जाणून घेण्यासाठीं अचला अतिशय उत्सुक झाली होती.

हरीची आई म्हणाली, " ही कोण ग ताई ? मोठी गमती माणूस दिसते. "

अचला मान हलवून म्हणाली, " हो. "

भिजलेले कपडे बदलून मृणाल पुन्हां तिथें आली अन् म्हणाली, " नुसती थट्टामस्करी करून गेलें, पण अजूनही माझी ओळख कांहीं दिली नाहीं तुला. अन् ओळख तरी द्यायची कसली ? तुझा जो वर होता तो होता माझ्या आईचा बाप. मी लहानपणापासून त्याला दादा म्हणून हांक मारीत असे " असें म्हणून ती क्षणभर थांबून पुन्हां म्हणाली, " माझे बाबा अन् तुझे सासरे हे दोघे जिवाभावाचे दोस्त होते. एके दिवशीं गाडीखालीं सांपडून माझ्या बाबांचा हात मोडला अन् नोकरी गेली. तेव्हांपासून तुझ्या सासऱ्यानें आपल्या घरीं आम्हाला आसरा दिला. त्यानंतर बऱ्याच दिवसांनीं माझा जन्म झाला. दादा तेव्हां आठ वर्षांचा होता. तो जन्मला तेव्हांच त्याची आई मेली होती. त्याच्यापेक्षां मोठे दोन मुलगे

डिप्थेरियानें आधींच मरण पावले होते. त्यामुळं इथं आल्यापासून माझी आईच या घरचा कारभार पाहात होती. त्यानंतर बाबा वारले अन् आम्हीही याच घरीं राहून गेलों. त्यानंतर तुझे सासरे वारले तरीही आम्हीं इथंच राहिलों होतों. गेल्या पांच वर्षांपूर्वी पलाशीच्या घोषालाच्या घरीं माझं लग्न करून देऊन दादांनीं मला दूर केलं. आई हयात असती तर कदाचित् कांहीं बदल झाला असता."

"सुनबाई इथंच आहे का रे?" असें म्हणत एक गौरवर्ण म्हातारा दाराजवळ येऊन उभा राहिला.

मृणाल म्हणाली, "यावं यावं." अचलेकडे पाहून गालांतल्या गालांत हंसून ती म्हणाली, "हे माझे कारभारी बरं आजीबाई. आतां तूंच सांग या बहादर म्हाताऱ्याजवळ मी बायको म्हणून शोभतें का? या जन्मापुरतं तरी सारं रूप यौवन मातीमोल झालं, नाहीं का ग बाई?"

अचला काय उत्तर देणार होती? तिनें शरमून मान खालीं घातली.

त्या गृहस्थाचें नांव होतें भवानी घोषाल. तो हंसून म्हणाला, तिचं काय ऐकतां तुम्हीं? काय वाटेल तें बोलते! येतां जातां नुसती थट्टा—खेळणं करून ठेवलंय मला. तसं पाहिलं तर माझं वय फार तर बावन्न किंवा त्रे—"

"बोलूं नका, बोलूं नका–" मृणाल म्हणाली, "या दादानं कसं माझं वैर साधलंय तें त्या एका देवालाच माहित. चोहींकडून मातीमोल करून टाकलंय मला! या म्हाताऱ्याच्या हातीं मला देण्यापेक्षां हातपाय बांधून मला तळ्यांत बुडवलं असतं तर चांगलं झालं नसतं का आजीबाई? अगदीं खरं खरं सांगा!"

अचला तशीच गोरीमोरी होऊन मुकाट्यानें राहिली होती.

घोषाल हळुहळू आंत आला. लाजेनें खालीं मान घालून बसलेल्या अचलेच्या तोंडाकडे कांहीं वेळ पाहून सहसा एक मोठा समाधानाचा सुस्कारा सोडून तो म्हणाला, "सुटलों एकदांचा. या टवळीचा अभिमान जमीनदोस्त झाला. मोठा दिमाख होता हिला आपल्या रूपाचा! हें नाक वर करून चालत होती—आपल्या पत्नीकडे पाहून तो म्हणाला, "कसं? झाली ना आतां शोभा? या जंगलांत आजवर कोल्हा राजा होऊन बसला होता, शहरचं माणूस कसं असतं तें आतां पहाना डोळे उघडून."

२०१८८९९

मृणाल म्हणाली, " तेंच तर काय ! पण माझा अभिमान ज्या बाबतींत आहे तिथं मला शह देण्याची कुणाची ताकद आहे ? " असें म्हणून तिनें चोरट्या नजरेनें आपल्या नवऱ्याकडे ज्या वृत्तीनें पाहिलें ती तिची वृत्ती अचलेच्या चटकन् नजरेला आली.

घोषाल हंसून म्हणाला, " ऐकलंस ना सुनबाई ? जरा सावध राहा बरं का. या दोघांचं जें मेतकूट आहे त्यामुळं काय होईल अन् काय न होईल हें सांगतां यायचं नाहीं. मी हा असा बहाद्दर बुड्ढा—असलों काय अन् नसलों काय, दोन्ही सारखींच ! अगदीं संभाळून वाग बरं,—त्या म्हाताऱ्या हितचिंतकाची सल्ला आहे ही. "

" मृणाल, सारी रात्र थट्टाच का करीत बसणार आहेस ? " महिम म्हणाला

" तर मग काय करूं दादा ? "

" एकदां सैंपाकघराकडे पाहायचं नाहीं का ? "

मृणाल ताडकन् उठून म्हणाली, " कशी विसरलें मी दादा. मला शोधायला जायच्यापूर्वीं आधीं एकादा सैपाकी शोधायला हवा होतास तूं. बरं, बरं, तुम्ही आतां जा बाहेर. आम्हीं कामाला लागतों. "

महिमनें विचारलें, " आम्हीं कोण ? "

मृणाल म्हणाली, " मी आणि आजीबाई—" अचलेला उद्देशून ती म्हणाली, " ज्या अर्थी मी आलेंय, त्याअर्थी संसाराचा सारा चार्ज तुझ्या पदरीं समजाऊन बांधल्याशिवाय मी जायची नाहीं वहिनी. "

महिम आणि भवानी बाहेर निघून गेले.

मृणाल अचलेला उद्देशून म्हणाली, " आम्ही दोन दिवस आधींच आलं पाहिजे होतं. पण माझ्या सासूचा दमा चाळवला होता, कांहीं केल्या घराबाहेर पडतां येईना. बरं. तूं एकदां कपडे बदलून घे पाहूं. मी आत्तां येऊन तुला घेऊन जातें. " असें म्हणून मृणाल सैपाकघराकडे वळली.

त्यावेळीं पाऊस थांबला होता. ढगं दूर होऊन नवमीच्या चंद्राचें चांदणें स्वच्छ होऊन दिसूं लागलें होतें.

सैंपाकाची सारी तयारी करून मृणाल अचलेजवळ येऊन बसली. तिचा

हात आपल्या हातांत घेऊन ती म्हणाली, " आजीबाई म्हणण्यापेक्षां वहिनी म्हणणं बरं—खरं कीं नाहीं वहिनी ?—"

अचला हळूच म्हणाली, " हो. "

मृणाल म्हणाली, " नात्यानं तूं मोठी असलीस तरी वयानं मी वडील आहें. म्हणून मला वाटतं कीं तूं मला मृणालआक्का म्हणावं !-कसं ? "

अचला म्हणाली, " कबूल. "

मृणाल म्हणाली, " आज तुला एकदां सैपाकघर दाखवून आणतें. पण उद्यां कोठीच्या चाव्या तुझ्या पदराला बांधून द्यायला हव्यात मला ! कसं ? "

अचला म्हणाली, " चाव्या कशाला हव्या आहेत मला ? "

मृणाल हंसून म्हणाली, " कशाला ? अगबाई ! हें काय बोलणं झालं ? कोठी म्हणजे इतकी का टाकाऊ वस्तू आहे वहिनी, म्हणून तूं म्हणतेयस,—चाव्या कशाला हव्या आहेत ? कोठी म्हणजे गृहिणीच्या राजत्वाची राजधानी ! "

अचला म्हणाली, " असेना का राजधानी, मला तो लोभ नाहीं. लोभ आहे तो तुझ्यावर. अशी लवकर तुला सोडायची नाहीं मी मृणालआक्का. "

दोन्ही हात पसरून अचलेला कवटाळून मृणाल म्हणाली, " सवतीला झाडू मारून घालवून द्यायची, ती घरीं ठेवूं पहातेयस. ही कसली ग तुझी अक्कल वहिनी ? "

अचला गंभीर होऊन म्हणाली, " तुझी ही थट्टा कांहीं मला पटत नाहीं बरं, या इकडे सारींच का अशा थट्टेच्या भाषेंत बोलत असतात ? "

मृणाल खुदखुदून हंसून म्हणाली, " नाहीं ग आजीबाई, नाहीं ! हें एक मलाच जमतं. सर्वांनाच एवढी अक्कल मिळालीय कुठं ? "

अचला म्हणाली, " अक्कल असली तरीही आमच्या तोंडून तसं कांहीं बाहेर यायचं नाहीं बाई. कुठलीहि सभ्य बाई असली भाषा तोंडून काढील, असं आमच्या कलकत्त्याच्या समाजांतल्या कुणाच्या कल्पनेंत सुद्धां यायचं नाहीं. "

मृणाल मुळींच ओशाळली नाहीं. उलट बळेंबळेंच अचलेला कवटाळून धरून ती म्हणाली, " तुमच्या शहरच्या किती बायकांना असं माझ्यासारखं कवटाळून धरतां येतं तें सांग ना वहिनी ? सर्वांना वाटतं, कीं आपल्याला सारीं

कामं येतील. पण येतात का तशीं ? हीच आतां तुला मी सारखी पाहातेंय, अन् यावेळीं मला वाटतंय, मला बहिण नव्हती, ती एक छोटी बहीण मिळाली. नुसतं बोलायचं म्हणून बोलत नाहीं मी, उभ्या आयुष्यांत मला याचा पुरावा आणून द्यायला हवा हें ध्यानांत ठेव; इथं मात्र थट्टामस्करी चालायची नाहीं. ”

अचला एक सुशिक्षित मुलगी होती. खेडेगांवच्या या विरोधी समाजांत आपलें पुढचें आयुष्य कशाप्रकारें जाणार आहे तें तिला या घरांत पाऊल टाकतांच कळून चुकलें होतें. म्हणून मृणालनें सुचविलेला हा सुयोग तिनें सहज झिडकारला नाहीं. थट्टेची भाषा गंभीर करून ती म्हणाली, “ मृणालआक्का, खरोखरच पुढल्या साऱ्या आयुष्यांत याचा पुरावा दाखवून देशील मला ? ”

मृणाल म्हणाली, “ आम्हीं कांही शहरच्या बायका नव्हे ग बाई. द्यायलाच हवा हा पुरावा ! तुझ्या गळ्याला हात लावून असं जें बोललें तें आतां मेलें तरी बदलतां यायचं नाहीं मला ! ”

या बाबतींत अधिक वाटाघाट न करतां अचलेनें विषय बदलला. ती हंसून म्हणाली, “ लवकर पळून जायचं नाहीं – तें सुद्धां आत्तांच सांगून टाकतें. ”

मृणाल एकदम हंसून म्हणाली, “ भोळीशी सांपडलें म्हणून एकेक फांस घालूं पाहातेयस का वहिनी ? तें तर मी आधींच सांगून टाकलंय—मी चार्ज समजावून दिल्याखेरीज कांहीं जायची नाहीं. ”

अचला म्हणाली, “ चार्ज समजून घ्यायचा माझा मुळींच अधिकार नाहीं. ”

मृणाल म्हणाली, “ तेंच होईल तेव्हां जाईन, पण घर टाकून फार दिवस राहणं मला शक्य नाहीं ग बाई ! माहित आहे ना तुला, केव्हढ्या मोठ्या संसाराचा बोजा माझ्या माथ्यावर आहे तो ? ”

अचला मान हालवून म्हणाली, “ नाहीं, मला माहित नाहीं ! ”

मृणाल आश्चर्यचकीत होऊन म्हणाली, “ दादानं माझी हकिकत यापूर्वी तुला सांगितली नाहीं वाटतं ? ”

अचला म्हणाली, “ नाहीं, कधींही नाहीं. इथल्या घरदारासंबंधींची सारी हकिकत मला सांगितली त्यांनीं, पण सर्वांच्या आधीं जें सांगायचं, ती तुझीच हकिकत अजून मला सांगितली नाहीं. त्याचंच भारी आश्चर्य वाटतंय मला मृणालआक्का ! ”

मृणाल विचुकपणें म्हणाली, " असं तर खरंच ! " अचला कांहीं वेळ उगीच राहिली होती. नंतर ती हळूच हंसत हंसत म्हणाली, " तुझ्याबरोबर ह्यांचं लग्न व्हायचं पहिल्यानं बोलणं निघालं होतं वाटतं ? "

मृणाल तेव्हांही विचुकपणें कसला तरी विचार करीत होती. ती म्हणाली, " हो. "

अचला म्हणाली, " मग कां झालं नाहीं ? झालं असतं तर बरं झालं असतं. "

एव्हढ्या वेळानंतर तिचें भाषण मृणालच्या कानांत शिरून हृदयावर आदळलें. नजर वर करून अचलेकडे पाहून ती म्हणाली, " व्हायचंच नव्हतं तें, म्हणून झालं नाहीं. "

तरीही अचलेनें प्रश्न केला, " काय अडचण होती व्हायला ? तुझं त्याचं खरोखरीच कसलंच नातं तर नव्हतं ! शिवाय लहानपणापासून जें प्रेम उत्पन्न होतं त्याची उपेक्षा करणं बरं नव्हे, नव्हे का ? "

तिच्या प्रश्नाचें धोरण ध्यानीं येऊन मृणाल दचकली. क्षणभर अचलेच्या तोंडाकडे टक लावून पाहून ती म्हणाली, " हें सारं कसलं काय उकरून काढतेयस तूं वहिनी ? लहानपणींचीं प्रेमाचीं सारीं प्रकरणं शेवटीं अशींच संपतात, असं का तुला वाटतं ? लग्न होणं हें माणसाच्या हातीं का असतं ? नुसत्या या जन्माचा नव्हे वहिनी, हा संबंध असतो जन्मजन्मांतराचा. चिरकाल मीच ज्यांची दासी. त्यांच्या हातीं देवानं मला देऊन टाकलं. इथं माणसाच्या इच्छेचा प्रश्नच नाहीं मुळीं ! "

अचला ओशाळून म्हणाली, " तें सारं खरं आहे मृणालआक्का—म्हणूनच मी विचारीत होतें—"

तिच्या तोंडचें वाक्य पुरें झालें नाहीं. लाजेनें तिचा चेहरा लालीलाल झाला. मृणालला तें दिसून आल्यावांचून राहिलें नाहीं. अचलेचा हात मोठ्या प्रेमानें आपल्या मुठींत धरून ती म्हणाली, " वहिनी, नुकतंच कुठं तुझं लग्न झालंय, नुकताच तुला नवरा मिळालाय, पण गेलीं पांच वर्षं मी नवऱ्याची सेवा करतेंय. माझं एक बोलणं नीट ध्यानांत ठेव. बाई ग, स्वतःच्या बुद्धीच्या जोरावर नवऱ्याच्या असल्या

गोष्टी उकलून काढायचा कधींही प्रयत्न करूं नकोस. या बाबतींत स्वतः फसलेलं पुरवलं, पण जिंकण्यांत लाभ नाहीं. ”

यदू बाहेरून म्हणाला, “ आक्का, बाबूच्या जेवणाची जागा तयार झाली आहे. ”

“ बरं बरं. चल. मी आलेंच ! ” असें म्हणून मृणालनें एकाएकीं दोन्ही हात पुढें करून अचलेचें तोंड जवळ ओढून घेऊन तिचा एक मुका घेतला आणि ती तशीच निघून गेली.

## १५

“ अग ए वहिनी ! ”

शेजारच्या खोलींतून अचला घाईघाईनें त्या खोलींत आली. मृणालनें कमरेला पदर खोंचला होता. एक छोटें कपाट एकट्यानेंच ओढीत सरळ उभे करायचा प्रयत्न ती करीत होती. अचला आंत येतांच रागाचा मोठा आव आणून ती ओरडत उठली, “ अग ए दळभद्रे पोरी, तूं नबाबासारखी हातपाय जोडून बसून राहिली आहेस अन् तुझं शेजघर का मी सजवायचं ? घे ती केरसुणी हातांत अन् हा कोपरा झाडून काढ चांगला. ”

बोलत असतांना हंसें आवरणें अशक्य झाल्यामुळें ती खो खो करून हंसत सुटली.

तिची आरडाओरड ऐकून हरीची आई तिच्या पाठोपाठ येत होती. ती म्हणाली, “ तुझं सारं कांहीं न्यारंच अक्का. आमच्या घरीं तिकडे किती गडी आहेत, मोलकरणी आहेत,—आमच्या ताईला का कधीं हातीं केरसुणी घ्यायची संवय आहे ? खेडेगांवच्या पोरीसारखं सारं घर झाडून काढणं कसं जमेल तिला ? मी काढतें केर. ” असें म्हणून ती केरसुणी उचलायला जात होती, तोंच मृणाल रागाचा खोटा आव आणून तिला धमकावून म्हणाली, “ एव्हढी वकिली करायला निघालीस, ती ह्या तुझ्या ताईला माझ्यापेक्षां जास्त ओळखतेयस का तूं ? ” असें म्हणून अचलेच्या हातीं बळेंच केरसुणी देऊन ती हंसून हरीच्या आईला म्हणाली “ अग बये, मनांत आणलं तर तुझी ताई जीं कामं करील तीं या खेड्यांतल्या

सत्त्याऐंशी पोरींना सुद्धां साधायचीं नाहींत." ती अचलेला म्हणाली, "चल ग वहिनी, ही एव्हढी जागा चटकन् झाडून काढ पाहूं!"

अचला केरसुणी हातीं घेऊन म्हणाली, "मृणालआक्का, तुला जादूविद्या येते — नाहीं?"

मृणाल म्हणाली, "का ग बाई असं म्हणतेस?"

अचला म्हणाली, "नाहींतर ही सारी खोली झाडून काढायला मी केरसुणी हातीं घेतली ही तुझी जादू नव्हे तर दुसरं काय?"

मृणाल म्हणाली, "तूं नाहीं तर कोण घेणार ग? तुझं घर झाडन काढायला शेजारच्या गांवची पदीची मावशी का येणार आहे? घे ती. उगीच वेळ घालवूं नकोस. उशीर होतोय्."

अचला काम करीत करीत हंसून म्हणाली, "स्वतः घडीभर स्वस्थ बसत नाहीं, मलाही सारखी राबवून मारतेयस! खरं सांगते मृणालआक्का, या पांच सहा दिवसांत मला जसं राबवलंयस, तसं चहाच्या मळ्याच्या मालकांनीं आपल्या कुलींना सुद्धां राबवलं नसेल!"

मृणालजवळ आली आणि तिच्या गालावर हळूच एक चापटी मारून म्हणाली, "असं का? घरदार पाहिलं कीं वाटतं घरांत जणूं लक्ष्मीच अवतरलीय! याला राबणं म्हणतेस का वहिनी? ज्या दिवशीं घरदार, नवरा, मुलंबाळं याच्यांत गुंतून जेवायला सुद्धां तुला फुरसत मिळायची नाहीं, त्या दिवशीं बायकांच्या जातींत जन्म घेतल्याचं सार्थक होईल. देवाला हात जोडून सांगतें मी, तो दिवस तुझ्या वांट्याला लौकर येवो. हें कसलं आलं आहे राबणं ग वहिनी!" असें म्हणून ती हंसायचा प्रयत्न करूं लागली पण तिचे ओठ थरथर कापूं लागले.

हरीची आई एकदम भक करून रडूं लागली. रडत रडत म्हणाली, "हाच आशीर्वाद दे आक्का—अगदीं हाच आशीर्वाद दे!" तिला अचलेच्या आईची आठवण आली होती-ती साध्वी अगदींच अवेळीं स्वर्गवासी झाली होती, त्यावेळीं आपल्या या एवढ्याशा मुलीला तिनें हरीच्या आईच्या हातींच सोंपवलें होतें. तीच मुलगी आतां मोठी होऊन नवऱ्याचा संसार थाटायला आली होती.

मृणाल तिला धमकावून म्हणाली, " मर एकदांची ! अभद्र सटवी कुठली ! रडायला काय झालं ? "

डोळे पुशीत पुशीत हरीची आई म्हणाली, " हौस आहे म्हणून का रडतेंय आक्का ? तुझं बोलणं ऐकलं तेव्हां रडं आवरेनासंच झालं मला. अगदीं शपथेवर सांगतेंय, कीं तूं आली नसतीस तर या घरांत आमची एक रात्र देखील कशी गेली असती कोण जाणे. "

मृणाल या घरीं येऊन आतां सहा दिवस झाले होते. आल्या घटकेपासून घरादारापासून सुरवात करून साऱ्या माणसांपर्यंतचे चेहरे बदलून टाकायच्या कामाला तिनें सुरवात केली होती. पण तिच्या थट्टामस्करीच्या उसळींतून सारीं कामें होत असल्यामुळें अचलेला एक प्रकारें त्याचा त्रासच होत होता. कारण मृणालच्या कामकाजांत, आचारव्यवहारांत एव्हढी मोठी स्वाभाविक आपुलकी होती, कीं तिच्याआड खुशाल उभें राहून अचलेला आपल्या नव्या जीवनांतील अनोळखी कौटुंबिकतेची ओळख करून घ्यायची सवड मिळत होती, पण यापेक्षांही एक तशीच महत्त्वाची गोष्ट चांगली उघड उघड समजावून घ्यायला अचलेला जी जिज्ञासा उत्पन्न झाली होती, ती खुद्द मृणालच्या बाबतींत. तिच्या अंगावर सोन्याचा एक फुटका मणीसुद्धां नव्हता. त्यावरून तिची कौटुंबिक परिस्थिती मुळींच चांगली नाहीं हें कळून येत होतें. तिचा म्हातारा नवरा प्रकृतीनें थकला होता. कोणत्याही दृष्टीनें त्याचा कांहीं उपयोग आहे असें अचलेला वाटलें नाहीं. त्याशिवाय घरांत राबणुकीला तर अन्तच नव्हता. जराजीर्ण झालेली सासू रोज मरायची वाट पाहात होती. सकारण अकारण ती तिला सारखी बोलून छळीत होती, ही गोष्ट तिला मृणालच्या तोंडूनच कळून आली होती. या बाईला आपल्या जीवनाच्या यात्रेंतल्या मार्गावर जरा विश्रांति घ्यायला कोण सुद्धां फुरसत देत नव्हतें. हृदयांतल्या सुखदुःखाच्या वृत्तीखेरीज तिला बाहेरून दुसऱ्या कोणत्याच प्रकारचें अस्तित्व नव्हतें. या खुळ्या गांवढळ बाईची भावना होती ती अशी.

प्रत्येक घडीला तिच्याबरोबर राहाण्याची संधि मिळाल्यामुळें तिला कळून चुकलें होतें. चिखलांत जन्म घेऊन सुद्धां कमलाचें पान जसें मळकट होण्यापलीकडे गेलेलें असतें, अगदीं त्याचप्रमाणें ही लिहिणें वाचणें न शिकलेली,

दरीद्री खेड्यांतली गृहलक्ष्मी, संसारांतल्या साऱ्या दुःखदारिद्र्याच्या मांडीवर अहोरात्र लोळत असतांनाही साऱ्या वेदना आणि यातना अगदीं सहजासहजीं उधळून लावून वावरत होती. तिच्या देहाला थकवा नव्हता, तशीच तिच्या तोंडाची बकवाही सारखी सुरू असे. अर्थात् अचलेला ती या साऱ्या अनभ्यस्त कामांत सारखी ओढून घेऊन फिरवीत होती. अचलेला जें शिक्षण मिळालें होतें त्या शिक्षणाचा आणि संस्काराचा या कामाशीं कांहीं मेळ नव्हता तरीही न बोलतां तोंड फिरवून स्वस्थ राहाणें म्हणजे अचलेला अत्यंत शरमेचें वाटूं लागलें होतें.

स्वतःच्या दुर्भाग्याच्या गोष्टी काढण्यासाठीं एक क्षणाची फुरसत ती स्वतःला देत नव्हती. सारा दिवस ती काम करीत, हंसत खेळत, गप्पागोष्टी करीत साऱ्या उणीवेची भरपाई करून घेत होती.

म्हणूनच ती पुन्हां आपल्या सासरीं जाणार आहे ह्या गोष्टीचें इंगित जेव्हां अचलेच्या ध्यानांत येई, त्यावेळीं तिला वाटे, या मोडक्या तोडक्या घराच्या खिडक्या, दरवाजे–भिंतीसकट सारें घर मृणालआक्का निघून जातांच डोळ्यासमोर पत्त्यांच्या घरासारखें कोसळून पडेल—आणि मग इथें एक क्षणभर तरी राहायचें कुणाच्या आधारावर ?

एके दिवशीं संध्याकाळीं अचला तिला म्हणाली, " रोज जायचं जायचं म्हणतेस मृणालआक्का, माहेरीं आलेली मुलगी इतक्या लवकर का जात असते परत ? तें चालायचं नाहीं. मी कलकत्त्याला पुन्हां जाईपर्यंत तूं सुद्धां इथंच राहिलं पाहिजेस. "

मृणाल म्हणाली, " काय करूं ग बाई ? ती माझी थेरडी सासू–नाहीं स्वतः मरत कीं नाहीं मला मरूं देत ! एक क्षणभर सुद्धां नाहीं सोडीत मला ती. मी म्हणतेंय, म्हातारे, मर कीं एकदांची. तुझ्या मुलाचीच आतां साठी उलटायला झालीय—शेवटीं त्यालाच खाऊन मग का जाणार आहेस ? ही एव्हढी जी रात्रंदिवस खोकत असतेस, तो तुझा श्वास कसा एकदम अटकून जात नाहीं ? "

अचला हंसूं लागली. ती म्हणाली, " तूं डोळ्यांत सलतेस वाटतं तिच्या ? "

मृणाल उद्गारली, " अगदीं दोन्ही डोळ्यांत ! मी दृष्टीसमोर नको तिला. "

अचला म्हणाली, " आणि तुला ? "

मृणाल म्हणाली, “ मलाही नको ती. थेरडीला गंगेच्या घाटावर पोंचवून आल्यावर सव्वा रुपयाचा सत्यनारायण करीन म्हणून नवस करून ठेवलाय मी !”

अचला मान हालवीत म्हणाली, “ हें मात्र मला पटत नाहीं मृणालआक्का. तूं म्हणतेस म्हणून ऐकून घ्यायचं. पण या जगांत तूं कुणाचा द्वेष करीत असशील असं मला तरी वाटतच नाहीं. कदाचित् सर्वांपेक्षां ह्या म्हातारीवरच तुझी जास्त माया असेल. ”

मृणाल हंसत हंसत म्हणाली, “ सर्वांपेक्षां जास्त माया होय ? असेल देखील ! ” असें म्हणून अचलेचा एक गालगुच्चा घेऊन ती आपल्या कामाला निघून गेली.

जातें जातें म्हणत म्हणत पुन्हां मृणालचे असेच कांहीं दिवस गेले. एक दिवशीं चट्‌कन अचलेच्या ध्यानीं आलें, कीं जाण्याच्या बाबतींत ती तोंडानें जेव्हढी तंबी देत होती तेव्हढी कामाच्या बाबतींत ती मागें येत नव्हती. खरोखरच ती जाण्यासाठीं तितकीशी उतावीळ झालेली नसावी. इतके दिवस आड राहून जगाचा जो मुखवटा तिनें ओळखून घेतला होता त्याच्या आवरणाच्या बाहेर आल्यामुळें तो मुखवटा आतां तिच्या नजरेसमोर टिकून राहिला नव्हता. या घरीं ती आल्यापासून आपल्या नवऱ्याबरोबर थट्टामस्करी करीत असल्याचें जेव्हां ती पाही तेव्हां तिच्या हृदयांत धडकी भरे—पण आतां मधून मधून तिला सुया टोचल्यासारखें वाटूं लागलें होतें. यांत कांहीं अर्थ नाहीं, थट्टेपलीकडे यांत दुसरें कांहींच नाहीं—मनाला लावून घेण्याजोगा असा तिचा कोणताच उद्देश नाहीं, आपलेंच मन मोठें अशुद्ध, असें म्हणून स्वतःला शिक्षा लावायचा ती जितका जितका प्रयत्न करूं लागली, तितकाच कुठूनतरी तिची इच्छा नसतांना सुद्धां संशयाचा विपरीत उद्भव हृदयांत निर्माण होऊन, तोंड वेंगाडून तिला भेडसावूं लागला होता.

महिमचा स्वभावसिद्ध गंभीरपणा ओढूनताणून आणलेला आहे असें तिला वाटूं लागलें होतें. ती आपल्या मनाशीं असा कुतर्क करूं लागली—मुळांत जर कांहीं नाहीं तर थट्टेचें उत्तर थट्टेनें देण्यांत दोष कसला ? थट्टेथट्टेत ज्याला उत्तर देतां येत नाहीं त्या माणसानें निदान हंसतमुखानें त्या थट्टेचें कौतुक तरी केलें

पाहिजे होतें. आणि इकडे तर तिला स्पष्ट दिसून येत होतें, कीं मृणालनें थट्टा-मस्करी करायला सुरवात केली, कीं महिम लाजेनें तोंड लपविण्यासाठीं कसाबसा पळ काढीत असे. त्यामुळें कुठेंतरी कांहीं एक प्रच्छन्न स्वरूपाची भावना आहे, अशी मनांत येणारी कल्पना तिला दूर करतां येत नव्हती.

मृणालबरोबर जोडीनें कामकाज करतां करतां शंभर वेळ तिच्या मनांत येई, कीं आपण स्वतः जातीनें बायको असतांना, अंतःकरणांत उत्पन्न होणारी मत्सराची वेदना जाणवत असतांनाही ती कोणत्या तरी रीतीनें जर आपल्याला टाकून देतां येत नाहीं, तर एका घरांत एके जागीं इतका वेळपर्यंत सहवासांत राहाणाऱ्या कुठल्याही पुरुषाला त्या स्त्रीबद्दल प्रेमाची भावना वाटल्यावांचून कशी राहील ?

मृणाल आल्यापासून सैंपाकाच्या कामाचा बोजा आतां सैंपाकी भटजीवर राहिला नव्हता हें अचलेला माहीत होतें. यावेळींही तो रिकामपणानें इकडे तिकडे भटकत होता पण अचलेचें लक्ष होतें तें एकाच गोष्टीवर. मृणाल स्वतःच्या हातानें रांधून महीमला खाऊं घालण्यासाठीं नुसता जीव टाकीत होती. आज सकाळीं अचला एकदम म्हणाली, " मृणालआक्का, आज तुला रजा. "

मृणालला तिच्या भाषणाचा अर्थ कळला नाहीं. ती म्हणाली, " कसली ग रजा वहिनी ? "

अचला म्हणाली, " सैंपाकाची. आज मी सैंपाक करणार. "

मृणाल थक्क होऊन म्हणाली, " नशीब माझं ! तूं अन् सैंपाक करणार ? "

अचला म्हणाली, " वा ! मला येत नाहीं वाटतं सैंपाक ? घरीं मी कितीतरी वेळ सैंपाक केला आहे. तें कांहीं नाहीं मृणालआक्का, आज मी सैंपक करणारच."

तिचा तो आग्रह पाहून मृणालचा चेहरा उतरला. ती म्हणाली, " असं कधीं झाल्यं ! मी इथं असतांना असं काय संकट आल्यं म्हणून तूं सैंपाक-घरांतल्या धुरांड्यांत तोंड खुपसायला निघालीयस ग बाई ? "

तिच्या मुद्रेवरचा परिणाम ध्यानीं येऊन अचला हट्टाला पेटून म्हणाली, " तर मग सैंपाकी भटजी असतांना तू तरी काय म्हणून एव्हढी खाटतेयस ? यावेळीं मी सैंपाक करणारच. "

ती अशी हट्टाला कां पेटली होती त्याची कल्पना मृणालला होईना. हंसू आवरल्यासारखें दाखवीत खोट्या रागाचा आव आणून माना वेळावीत ती म्हणाली, " वा ग पठ्ठे ! माझ्या हातांतली एक एक सत्ता तूं हिसकावून घेऊं पाहातेस होय ? आधींच सारं घेऊन गेली आहेस, दोन दिवस दोन घांस खायला घालतें तें सुद्धां तुला पाहावत नाहीं होय ? आतां हा सवतीमत्सर सुरू झाला आहे वाटतं ? "

अचलेच्या हृदयांत पुन्हां विलक्षण धडधड सुरू झाली. मृणालच्या शेवटच्या उद्गाराचा फटका तिला चांगलाच जाणवला. मत्सराची जखम पुन्हां दुखावली गेली. ती एकदम गंभीर होऊन एकच शब्दांत बोलून गेली, " नाहीं. आज मीच रांधणार ! "

अचला खरोखरच चिडली आहे असें एव्हढ्या वेळानें मृणालच्या ध्यानीं आलें. म्हणूनच जास्त वाद न घालतां ती ओशाळवाण्या मुद्रेनें क्षणभर स्तब्ध राहून म्हणाली, " बरं, बरं ! तर मग तूंच कर सैंपाक. चल आतां, कुठं काय आहे तें मी तुला दाखवून देतें. "

महिम अजूनपर्यंत घरींच होता हें दोघींनाही माहीत नव्हतें. एकदम तो समोर आला त्यावेळीं दोघीही ओशाळून गेल्या.

महिम अचलेला उद्देशून संथपणें म्हणाला, " मृणाल इथं आहे तोंवर तिलाच करूं दे कीं सैंपाक. "

मृणाल एव्हढे आढेवेढे कां घेत होती तें महिमला माहीत होतें. पण ती गोष्ट उघड बोलून दाखवितां येत नव्हती.

अचला अधिकच भडकून उठली पण आलेला राग दाबून ती नुसतीच म्हणाली, " नाहीं. मीच जातें सैंपाकघरांत. " असें म्हणून पुढल्या वादाला अवसर न देतां ती तडक निघून गेली.

अचला हट्टानें सैंपाक करायला गेली होती. इतर कुणापेक्षांही ती सैंपाकाच्या कामीं उणी होती असें नव्हे. पण आज तिचें लक्ष सैंपाकाकडे लागत नव्हतें. गेल्या कांहीं दिवसांत घडलेल्या हकिकती मनांत घोळवतां घोळवतां त्या तिला सारख्या कचकच टोचत होत्या. तिला वाटूं लागलें होतें कीं कदाचित् खरोखरच

महिमचें तिच्यावर तेव्हढेंसें प्रेमच नसावें. लग्नाच्यापूर्वी थोडेच दिवस सुरेशच्या बाबतींत जो झगडा निर्माण झाला होता, त्या साऱ्या गोष्टी घोळून घोळून तिच्या मनांत येऊं लागल्या. आज तिला खरोखरच वाटूं लागलें, कीं महिम तिच्या बाबतींत पहिल्यापासूनच उदासीन असावा—एव्हढेंच नव्हे, बापाच्या इच्छेनुसार पूर्वीचा संबंध ज्यावेळीं एकदम तुटायचा प्रसंग आला होता त्यावेळी देखील महिमच्या मनावर एवढासुद्धां परिणाम झाला नव्हता. आज त्या गोष्टी आठवतांना तिला हें स्पष्टपणें जाणवलें.

इथें आल्यापासून मृणाल आणि अचला बरोबरच जेवायला बसत. दुपारीं हरीच्या आईला बोलावण्यासाठीं पाठवून ती मृणालची वाट पाहात बसली होती. हरीची आई येऊन म्हणाली, " मृणालआक्काला जरा ताप आल्यासारखं वाटतंय. ती आज जेवायचं नाहीं म्हणतेय. "

अचला कांहीं सुद्धां न बोलतां मृणालच्या खोलींत आली. मृणाल डोळे झांकून बिछान्यांत पडली होती. अचला म्हणाली, " जेवायला चल मृणालआक्का ! "

मृणालनें डोळे उघडून तिच्याकडे पाहिलें आणि उगीच थोडेंसें हंसून म्हटलें, " तूंच जेव वहिनी. मला बरं वाटत नाहीं. "

अचला कोरड्या भाषेंत म्हणाली, " काय झालंय ? ताप आलाय ? "

मृणाल म्हणाली, " असं वाटतंय मला, आज उपास केला कीं बरं वाटेल. "

अचलेनें खालीं वांकून मृणालच्या कपाळाला हात लावून पाहून म्हटलें, " मी एव्हढी भोळी नाहीं मृणालआक्का. चल जेवायला. "

मृणाल म्हणाली, " अगदीं शपथेवर सांगतें वहिनी, मला जेवण जायचं नाहीं. कां उगीच स्वतः बोलवायला यायचा त्रास घतलास ? नाहीं तर चल, मी येऊन तिथं तुझ्यासमोर बसतें. '

अचला कठोर होऊन म्हणाली, " एका उपासपोटीं माणसाला समोर बसवून घेऊन स्वतः जेवायचं शिक्षण मला कुणी दिलं नाहीं मृणालआक्का ! "

तरीही हंसायचा प्रयत्न करीत मृणाल म्हणाली, " पण त्या माणसाला मुळीं जेवणच जात नसलं तर ? "

अचला तशाच प्रकारें म्हणाली, " जेवण कां जात नाहीं तें सांग ना

आधीं ! तुला ताप आला नाहीं, राग आला आहे. स्वतः उपाशीं राहून मला अद्दल घडवावी अशीच जर तुझी इच्छा असेल तर मला स्पष्टपणें सांग, मी तुला त्रास देणार नाहीं. ”

मृणाल एकदम उठून बसली आणि भावनेच्या भरांत चट्कन् बोलून गेली, “ नवऱ्याची शपथ घेऊन मी तुला सांगतें वहिनी, मला एव्हढा सुद्धां राग आलेला नाहीं. पण जेवतां येणं शक्यच नाहीं मला. चल ताई, मी तुला जवळ घेऊन भरवतें चल. ”

अचला म्हणाली, “ तर मग तापबीप नाहींच कांहीं – नुसतं ढोंग ना तें ? ”

मृणाल उगीच राहिली. अचला स्वतःही कांहीं वेळ स्तब्ध राहिली होती. एक सुस्कारा सोडून ती शांतपणें म्हणाली, “ आतां मला कळलं, पण पहिल्यानंच जर तूं तोंड उघडून मला सांगितलं असतंस मृणालआक्का, कीं माझा विटाळ झालेलं अन्न तुला तोंडीं घालतां येत नाहीं, तर असा उगीचच आग्रह करून मी तुला त्रास दिला नसता, अन् नोकरचाकरांसमोर स्वतःची अशी फजितीही करून घेतली नसती ! झालं तें गेलं—आतां मला माफ करा — पण दुधाला तर विटाळ नाहीं ? एक वाटी दूध आणतें अन् यदूला सांगून दुकानांतून थोडे संदेश आणवतें – कसं ? चालेल ना ? ”

पहिल्यानें मृणाल कांहीं सुचेनासें होऊन स्तब्ध राहिली. राहिलेली ती वृत्ति निघून गेल्यावरही बराच वेळपर्यंत ती कांहीं बोलली नाहीं. खालीं मान घालून मुकाट्यानें बसून राहिली.

अचला पुन्हां खिजवून म्हणाली, “ काय ठरलं ? ”

पदरानें डोळे पुसून मृणाल हळूच म्हणाली, “ सध्यां राहू दे. ”

अचला आणखी कांहींवेळ तशीच चूपचाप उभी राहिली होती, नंतर ती आस्ते आस्ते निघून गेली.

मृणालनें वर पाहिलें नाहीं, कीं तोंडांतून शब्दही काढला नाहीं. म्हाताऱ्या सासूसाठीं तिला सैंपाक करावा लागे, ती सासू कडक सोवळें पाळणारी होती. ही गोष्ट तिच्या कानीं गेली, तर ती आपल्या हातच्या पाण्याला सुद्धां शिवणार नाहीं, ही गोष्ट केवळ तिच्या मानी स्वभावामुळें तिनें अचलेकडे बोलून दाखवली नाहीं.

अचला सैंपाकघरांत गेली आणि तिथलीं कामें उरकल्यावर हात धुवून आपल्या खोलींत जाऊन बिछान्यावर आडवी झाली. आपल्या हातचें अन्न घ्यायला मृणाल तयार नव्हती ती केवळ आपल्याबद्दलच्यां तिटकाऱ्यामुळें – असें जें तिला कोणत्याही कारणानें कां असेना—वाटत होतें तें खरें नव्हतें. ही जाणीव असून देखील आज ती गोष्ट तिच्या मनाला लागून राहिली. तें खरें वाटलें असतें तरीही अचलेनें उघडपणें बोलून दाखवलें नसतें, आज ज्या सकाळची सुरवात कलहानें झाली, त्याचीच मध्यान्ह देखील देवाच्या इच्छेनें शिजवलेलें अन्न कुणाच्याही तोंडीं न जातां उलटणार, हें दोघींनाही कळून चुकलें.

तिसऱ्या प्रहरीं बैलगाडी येऊन दारांत उभी राहिली. मृणाल अचलेच्या खोलींत येऊन म्हणाली, " नमस्कार करायला आलेंय वहिनी. मी घरीं निघालेंय. जेव्हां वाटेल त्यावेळीं मला हांक घाल, मी पुन्हां येऊन हजर होईन—"

क्षणभर थांबून ती म्हणाली, " जायच्यावेळीं सुद्धां एक शब्द तरी नाहीं का बोलणार तूं ? " असें म्हणून क्षणभर ती उत्सुकतेनें पाहात राहिली.

पण अचला एक शब्दही बोलली नाहीं. मान खालीं घालून ती तशीच बसून राहिली. तिच्या खोलींतून बाहेर येतांच महिम घरांत येत असल्याचें मृणालला दिसून आलें. ती म्हणाली, ' जरा थांब ना दादा, तुलाही एक नमस्कार करून घेतें. "

महिम म्हणाला, " जेवल्याशिवाय घरीं जायला निघालीस मृणाल ? नाहीं तर रात्रीं राहून उद्यां सकाळीं जाईनास ! "

मृणाल उगीच थोडीशी हंसून म्हणाली, " नाहीं दादा, यदूनं गाडी आणलीय. आज जातेंच आतां. पुन्हां केव्हांतरी येईन. " असें म्हणून गळ्यांत पदर घेऊन नमस्कार करून तिनें त्याची पायधूळ घेतली. ती म्हणाली, " माझी शपथ आहे तुला दादा, पुन्हां मला बोलवून घ्यायला विसरूं नकोस भाई. "

आज महिम हंसत सुटला. तो म्हणाला, " अग भद्रकपाळे, तुझा हा स्वभाव कधीं जायचाच नाहीं का ग ? "

" मेल्यावर जाईल – आधीं नाहीं ! " असें म्हणून मृणाल हंसत हंसत गाडींत जाऊन बसली.

मृणाल इतक्या अचानकपणें निघून जाईल असें अचलेला वाटलें सुद्धां नव्हतें. मृणाल स्वतः जेवली नाहीं व आपणांलाही तिनें जेवूं दिलें नाहीं. या तिच्या अपराधाबद्दल तिला काय शिक्षा द्यावी याचा विचार अचला एकटीच आपल्या खोलींत बसून करीत होती. जें माणूस लोभ धरतें—प्रेम करतें त्याची हेटाळणी करायची, यापेक्षां दुसरी मोठी शिक्षाच नाहीं. ही कानगोष्ट तें प्रेमच सांगतें. हीच शिक्षा मृणालला द्यायची, असें मनांत ठरवून अचला स्वस्थ बसली होती. ती ब्राह्मणाची मुलगी होती म्हणूनच मृणाल तिचा तिटकारा करीत होती, असे टोमणे तिला वारंवार देऊन सूड उगवून घ्यायचा, असें जें अचलेनें ठरवलें होतें, तें सारें फुकट गेलें.

मृणाल उपासपोटीं निरोप घेऊन घर सोडून गेली असें पाहून तिचे डोळे पाण्यानें भरून आले होते, पण मृणालच्या तोंडावरचें तें इवलेंसें हंसू पाहातांच कडक उन्हानें पाणी उडून जातें त्याप्रमाणें तिचीं आसवें वाळून नाहींशीं झालीं. दरवाजाआड उभी राहून ती त्या दोघांचे निरोप घेण्याचें जें काम चाललें होतें तें सारें लक्ष देऊन पाहात स्तब्ध होऊन जळजळत राहिली होती.

थोड्याच वेळानें महिम जेव्हां आंत आला त्यावेळीं तिचें सारें स्वाभाविक धैर्य पूर्णपणें नाहींसें झालें होतें—तरीही जन्मापासून मिळालेल्या शिक्षण आणि संस्कारामुळें क्षुद्रपणा दाखवण्याचें काम तिच्याकरवीं घडलें नाहीं. मोठ्या कष्टानें आत्मसंयमन करून कठोरपणानें हंसत ती म्हणाली, “ खरं म्हणायचं म्हणजे, शहरच्या माणसानं खेड्यांत येऊन वस्ती करण्यासारखी दुसरी विटंबना नाहीं-ना ? ”

महीमनें आपल्या पत्नीच्या तोंडाकडे पाहिलें. कांहीं वेळ उगीच राहून तो म्हणाला, “ तुझी स्वतःची गोष्ट बोलतेयस वाटतं ? पहिल्यानं तुला नाना प्रकारचा त्रास होणार हें मला कळलं होतं, पण मृणालबरोबर तुझं जमायचं नाहीं असं मला कधींच वाटलं नव्हतं. आजवर कधींच तिचा कुणाशीं झगडा झालेला नाहीं.”

अचला म्हणाली, “ गांवच्या साऱ्या लोकांबरोबर मी नुसती झगडत राहिलेंय, असं कुणी सांगितलं तुम्हाला ? ”

महिम संथपणें म्हणाला, “ सारा दिवस तूं जेवली नाहींस—जाऊं दे. सध्यां त्या गोष्टीच नको. ”

अचला अधिकच भडकून उठून म्हणाली, “ मृणालताई सुद्धां सारा दिवस कांहीं न खातां गांवीं गेली—पण तिच्याबरोबर चांगलं हंसत हंसत बोलायला तुम्हांला कांहीं संकोच वाटला नाहीं ! ”

महिम अचंबित होऊन म्हणाला, “ हें तूं काय बोलतेयस अचला ? ”

अचला म्हणाली, “ मी हेंच बोलतेंय, माझा असा अपमान केल्याखेरीज तुमच्यानं राहवलं नाहीं, असा कोणता अपराध मी केलाय तुमचा ? ”

महीमनें हतबुद्ध होऊन पुन्हां तोच प्रश्न केला, “ म्हणतेस तरी काय ? या तुझ्या बोलण्याचा अर्थ काय ? ”

अचला अकस्मात आवाज चढवून म्हणाली, “ अर्थ हाच, कीं माझ्या कोणत्या अपराधासाठीं तुम्हीं माझा असा अपमान केला ? मी काय केलंय तुमचं ?”

महिम कळवळून म्हणाला, “ मी तुझा अपमान केला ? ”

अचला म्हणाली, “ हो, तुम्हीं ! ”

महिम नाकारून म्हणाला, “ खोटी गोष्ट ! ”

अचला कांहीं वेळ स्तंभित होऊन राहिली होती. नंतर आवाज खालीं आणून ती म्हणाली, “ केव्हांही मी खोटं बोलत नाहीं. सध्यां तें राहूं दे, पण मला असं सांगा, सत्यावादीपणाचा जर तुम्हांला खराखुरा अभिमान असेल तर मी विचारीन त्या प्रश्नाचं खरंखुरं उत्तर द्याल ? ”

महिम उत्सुक नजरेनें तिच्याकडे नुसता पाहात राहिला.

अचलेनें प्रश्न केला, “ मृणालताई आज जातांना ज्या प्रकारें वागली, त्याला तुमच्या या खेड्यांत अपमान करणं म्हणत नाहींत कां ? ”

महिम म्हणाला, “ पण त्यांत मला कां गुंतवतेस ? ”

अचला म्हणाली, “ तें सांगतें मग, पण आधीं सांगा त्याला काय म्हणतात इथं ? ”

महिम म्हणाला, “ बरं—तसंच म्हटलं तरी चालेल—”

अचला त्याला थांबवून म्हणाली, “ जरी तरी नकोय मला. सरळ उत्तर द्या. ”

महिम म्हणाला, “ हो, खेड्यांतले लोक सुद्धां त्याला अपमानच म्हणतात. ”

अचला म्हणाली, " म्हणतात ना? तर मग जाणून बुजून तुम्हींच हा सारा अपमान केलाय माझा. तुम्हांला पक्कं माहीत होतं, कीं माझ्या हातचं अन्न ती कधीं खाणार नाहीं. होय ना?—" असें म्हणून ती डोळ्याचें पातें सुद्धां न हालवतां महिमच्या डोळ्याला डोळा भिडवून जळजळत्या नजरेनें त्याच्या हृदयाचा ठाव घेत होती. महिम सुन्न होऊन नुसता पाहात राहिला होता. त्याच्या तोंडून एक शब्द सुद्धां बाहेर आला नाहीं.

अगदीं याचवेळीं बाहेरून सुरेशची हांक ऐकूं आली, " महिम! आहेस का आंत?"

## १६

" हें काय—सुरेश? तूं! ये, ये, आंत घरांत ये ना. सारीं खुशाल?"

महिमचे हे स्वागताचे बोल पुरे होण्यापूर्वींच सुरेश येऊन त्याच्यासमोर उभा राहिला. हातांतील ग्लॅडस्टन बॅग खालीं ठेवून तो म्हणाला, " हो, खुशाल! पण तूं असा एकटाचसा कां उभा? अचला एकाएकीं सचला होऊन अंतर्धान पावली काय म्हणून? तिच्या तोंडच्या शब्दांमुळंच! वळणावरून मला या घराचा पत्ता लागला."

वस्तुतः अचलेचे शेवटचे शब्द रागाच्या भरांत थोडेसे मोठ्यानेंच बाहेर पडले होते. सुरेशनें ते दारांत आल्याबरोबरच ऐकले होते.

सुरेश म्हणाला, " पाहिलंस महिम, विदुषी बायको मिळाल्याचे फायदे पाहिलेस? येऊन फारसे दिवस सुद्धां झाले नाहींत तोंच खेडेगांवच्या बोलीची पद्धतसुद्धां तिनें इतकी बेमालूम उचलली, कीं खेडेगांवच्या कुठल्याच बाईला त्यांत खोड काढतां यायची नाहीं."

महिमचा चेहरा कानापर्यंत लालीलाल झाला. दाराकडे पाहून अचलेला उद्देशून सुरेश म्हणाला, " अगदीं अवेळीं येऊन जोडप्याच्या भाषणाचा रसभंग केला, त्याची मला क्षमा करा वहिनी! चालतां चालतां पाय खिळखिळे होऊन गेले–मोठ्या छान जागीं घर बांधलंस बाबा–, चल, चल, कलकत्त्याला चल."

" चला!" असें म्हणून महिमनें त्याला बाहेर माजघरांत नेऊन बसवलें.

सुरेश म्हणाला, " वहिनी माझ्यासमोर बाहेर यायची सुद्धां नाहीं वाटतं ? एकदम पडदानशीन ? "

महिमच्या तोंडून उत्तर यायच्यापूर्वीच शेजारचा दरवाजा उघडून अचला आंत आली. तिच्या मुद्रेवर कलहाचें एव्हढें सुद्धां लक्षण नव्हतें. नमस्कार करून मोठ्या प्रसन्न मुद्रेनें ती म्हणाली, " भाग्य आमचं ! कल्पनासुद्धां नव्हती ? पण असे अचानक कसे आलांत ? "

तिच्या प्रसन्न हंसतमुखावर सुखसौभाग्याचा पूर्ण विकास दिसत असलेला पाहून सुरेशच्या हृदयांत मत्सराची आग पेटली. हात उचलून नमस्कार करून तो म्हणाला, " असं अकस्मात येणं योग्य झालं नाहीं असं आतां वाटतंय खरं—पण कसलं भांडण चाललं होतं. Their first difference चार दिवस येऊन राहिलां नाहींत—इतक्यांतच मतभेद सुरू झाले होय ? कसले ? "

अचला तशीच हंसतमुखानें म्हणाली, " कसले म्हणून कळले म्हणजे तुम्ही खूष व्हाल ? शेवटचे का ? तर मग तसंच म्हणायला हवं आम्हांला—अतिथीचं मन दुखावतां नये ! "

सुरेशची मुद्रा गंभीर झाली. तो म्हणाला, " कोण म्हणतो नाहीं म्हणून ? अतिथीचा सत्कार म्हणजेच गृहिणीचं अस्सल काम—तिची ओळख पटायची ती तिथंच ना ? "

अचला हंसत हंसत म्हणाली, " गृहच नाहीं तिथं गृहिणी कुठली ? आम्हां गरिबांच्या या खोपटांत आजची रात्र तुम्हीं कशी काढणार याचीच काळजी पडलीय मला. कळून सवरून हे हाल पत्करले अन् आलां — धन्य आहे तुमची ! "

नवऱ्याच्या तोंडाकडे पाहून ती म्हणाली, " नयनबाबूंच्या मार्फत चंद्रबाबूंच्या घरीं आजच्या रात्रीपुरती यांची झोपायची व्यवस्था नाहीं का व्हायची ? दगडी घर आहे त्यांचं—दिवाणखानाही आहे तिथं—तेव्हढाच कमी त्रास. "

सौजन्याच्या आवरणाखालीं श्लेषाच्या भाषेनें हे जे सारे प्रच्छन्न घातप्रतिघात चालू झाले होते ते पाहून महिम अत्यंत अस्वस्थ झाला होता. हें भाषण कसा

रीतीनें थांबून धरावें हें त्याला सुचत नव्हतें. अशा वेळीं सुरेश स्वतःच त्याच्या साह्याला धांवून आला. एकदम हात जोडून तो म्हणाला, " माझी चूक झाली वहिनी. आधीं थोडा चहा द्या. तो घेतों अन् माझ्या अंगांत जरा जोर आला कीं मग नयनबाबूला सांगा, श्रवणबाबूला सांगा अन् चंद्रबाबूच्या दगडी घरांत माझी झोपायची व्यवस्था करायची शिफारस केलेली ऐकायला माझी कबुली आहे. तूं कांहींही म्हण महिम, खरोखरच या बाबतींत एव्हढी कळकळ वाटत असेल तर मोठी खुषीची गोष्ट आहे म्हणायची ! "

महिमच्या वतीनें अचलेनेंच त्याला उत्तर दिलें. ती हंसून म्हणाली, " खुषी वाटणं न वाटणं हें ज्याच्या त्याच्या हातीं असतं. पण ही माझ्या सासऱ्याची वस्तु – इथं आपुलकी वाटायच्या ऐवजीं गव्हर्नरच्या राजवाड्याबद्दल आपुलकी वाटते म्हटलं तर तें होईल धडधडीत खोटं. जाऊं दे, आधीं जरा अंगांत ताकद येऊं दे, मग बोलूं काय बोलायचं तें. चहाला पाणी ठेवायला सांगून मी आत्तांच आलेंय. पांच मिनिटांच्या आंत चहा करून आणून देतें, तोंवर तोंड बन्द करून थोडी विश्रांति घ्या. " असें म्हणून ती हंसत हंसत निघून गेली.

ती निघून जातांच सुरेशच्या हृदयांतली आग अधिकच भडकली. आपण सदाचेच दुबळे आहों, चंचल बुद्धीचे आहों हें त्याचें त्याला माहीत होतें. त्याबद्दल त्याला शरमही वाटत नव्हती. लहानपणीं त्याचे दोस्त महिमबरोबर त्याची तुलना करून त्याला ' हुलहुल्या ' म्हणून ज्यावेळीं नांवें ठेवीत, त्यावेळीं तो मनांतल्या मनांत खूष होऊन म्हणे, कीं आपल्या संकल्पांत जोर नाहीं, प्रवृत्तीबरोबर वाहात जायची आपली वृत्ती आहे—असें जरी असलें तरी आपलें हृदय मोठें आहे, तें केव्हांही क्षुद्रपणाचें काम करणार नाहीं. आय पाहून व्यय करण्याची वृत्ति त्याचे ठायीं नव्हती. दान करतांना पात्रापात्रतेचा विचार तो कधींच करीत नसे. मनांत आलें कीं अंगावरचें वस्त्रसुद्धां काढून देऊन निघून यायला तो मागें घेत नसे–मग तें कोणत्याही कारणानें आणि कुणालाही का असेना.

पण सुरेश कुणाचा द्वेष करतो, किंवा स्वार्थासाठीं कोणतेंही अनुचित काम

तो करतो असें कुणालाही म्हणतां आलें नसतें. अर्थात् जन्मापासून सहृदयतेच्या बाबतींत अगदींच दुबळा म्हणून ज्याची बदनामी झाली होती आणि ती खरी असल्याचें ज्याला स्वतःलाही पटत होतें, तोच सुरेश, अचलेच्या बाबतींत एकदम एवढ्या कठोर संयमाचा पुरावा आपल्याला देतां आला असें पाहतांच, स्वतःच्या ठायीं ही अज्ञात शक्ति असल्याचा प्रत्यय येऊन अंतर्यामीं गर्वानें फुलून निघाला.

अचलेचें लग्न झाल्यानंतर तो एकदोन दिवसांतच स्वतःला नांवें ठेवूं लागला.—आपण शक्तिहीन किंवा दुबळे नाहीं, आपण प्रवृत्तिचे दास नाहीं, इतकेंच नव्हे, तर जरूर वाटली तर हृदयांतल्या साऱ्या प्रवृत्ति मुळासकट उपटून काढून फेंकून टाकण्याचें सामर्थ्य आपल्याठायीं आहे—मैत्री म्हणजे काय आणि मित्राच्या सुखासाठीं एकजण केव्हढा त्याग करूं शकतो, हें त्या मित्राला आणि मित्रपत्नीलाही कळून घेऊं द्या.

पण कोणत्याही खोट्या प्रकारानें कोणताही खड्डा फार वेळपर्यंत बुजवला जात नाहीं. त्याचा आत्मसंयम खरा नव्हता. ती आत्मप्रतारणा होती. अर्थात् पुरता एक आठवडा लोटला नाहीं तोंच या खोट्या संयमाचा मोह त्याच्या अफाट हृदयांतून हळुहळू ओसरत चालला आणि त्यानें त्याची वृत्ति संकुचित करीत आणली. त्याचें मन त्याला वारंवार विचारीत होतें, या स्वार्थत्यागांतून मिळालें काय ? ही वृत्ति त्याला दिली कुणी ? कोणत्या आधारावर आतां आपल्याला यापुढें उभें राहातां येईल ? त्याची आत्या म्हणाली, “ बाबारे आतां तूं एक बायको घरीं घेऊन ये. म्हणजे तिच्याकरवीं मी हा संसार थाटून देईन. ”

एके दिवशीं समाजाच्या दारोठ्यावर केदारबाबूंची भेट झाली त्यावेळीं ते उघड उघड म्हणाले होते, “ झालं तें कांहीं बरं झालं नाहीं. महिमच्या बरोबर मुलीचं लग्न लावून द्यायची माझी मुळींच इच्छा नव्हती—तूंच कुठं तरी नापत्ता झाल्यामुळं शेवटीं मी संमिती दिली. ”

घरीं आल्यावर त्याच्या मनांत ही गोष्ट अभिशापासारखी सळसळून जागी झाली—या लग्नामुळें कुणालाही सुख लाभतां नये. स्वतःच्या परिस्थितीची अटकळ

न केल्याच्या गुन्ह्याबद्दल आपल्या मित्राला चांगलीच अद्दल घडावी. स्वतःची चूक कळून येऊन अचला सुद्धां पश्चात्तापानें जळून पिचून मरावी.

त्याला असें वाटत होतें तरीही त्याचें मन क्षुद्र नव्हतें. दुसऱ्याचें अकल्याण व्हावें अशी इच्छा करण्याबद्दल कितीतरी वेळ तो स्वतःलाच दोष देऊं लागे–पण झालेला त्रास आणि प्रतारणा यामुळें दुखावलेलें त्याचें हृदय कांहीं केल्या त्याच्या ताब्यांत राहात नसे. एखाद्या हट्टवादी मुलाप्रमाणें तो सदोदित तेंच तेंच विचार पुन्हां पुन्हां मनांत घोळवीत राही.

अशा प्रकारें कसाबसा एक महिना काढल्यावर एके दिवशीं त्याची जिज्ञासा अनावर झाली आणि शेवटीं हातीं बॅग घेऊन तो महिमच्या घरीं येऊन पोहोंचला.

मित्राच्या तोंडाकडे पाहून सुरेश म्हणाला, " माझं बोलणं कितपत खरं होतं तें आतां तुला पटलं ना महीम ? "

महिमनें विचारलें, " कुठलं बोलणं ? "

सुरेश बुद्धुकाचा आव आणून म्हणाला, " खेड्यांत मी राहिलों नाहीं खरा, पण मला यांचं सारं कांहीं माहित आहे. गांवच्या लोकांबरोबर, समाजाबरोबर, इथं चांगलाच विरोध माजेल असं मी त्यावेळींच तुला नव्हतं का सांगितलं ? "

महिम अगदीं साहाजिकपणें म्हणाला, " कोण म्हणतो असं ? तसा कांहींच विरोध माजला नाहीं इथं. "

" आणखी विरोध तो कसला ? तुझ्या घरीं येऊन कुणी जेवला का ? हा काय थोडा पाणउतारा झाला तुझा ? "

" मी बोलावलंच नाहीं जेवायला कुणाला. "

बोलावलं नाहीं ? बरं, गांवजेवणाचं आमंत्रण मला कां दिलं नाहींस महिम ? "

" गांवजेवण घातलंच नाहीं तेव्हां बोलावणार कसा ? "

सुरेश चकीत होऊन म्हणाला, " गांवजेवण घातलं नाहीं ? अं ! तुमचं हें पुन्हां—पण अशा रीतीनं तूं हें संकट किती दिवस टाळणार आहेस महिम ? अडीअडचणी आहेत, मुलाबाळांचीं कार्यं व्हायचीं आहेत—संसार थाटून बसलं कीं मग नसतं काय ? मी म्हणतों—"

यदूच्या हातीं चहाचा सरंजाम आणि स्वतःच्या हातीं थाळींत थोडी मिठाई घेऊन अचला आंत आली. सुरेशचें शेवटचें भाषण तिच्या कानीं गेलें होतें, पण तिच्या मुद्रेवरून सुरेशला तसा कांहीं अंदाज करतां आला नाहीं.

दोन्ही मित्रांनीं बसून फराळ केला आणि चहा घेतला. तें होतांच महिम खांद्यावर उपरणें टाकून उठून उभा राहिला. गांवचा जमीदार मुसलमान होता. त्याच्या मुलाला महिम इंग्रजी शिकवित असे. जमीदार साहेब स्वतः शिकलेले नसले तरी त्यांचा स्वभाव उदार होता आणि महिमबद्दल ते चांगलाच लोभ धरीत असत. याचमुळें गांवच्या लोकांकडून अजूनही त्यांना कोणत्याच प्रकारचा उपद्रव झाला नव्हता.

अचला म्हणाली, "आज शिकवायला गेलां नाहीं तर नाहीं का चालायच ?"

महिम म्हणाला, "कां ?"

अचलेच्या मनाचा जोर आणि अंतराचा निर्मळपणा कितीही मोठा असेना, सुरेशबरोबर मधल्या काळांत तिचा ज्या प्रकारचा संबंध आला होता त्यामुळें त्याच्या या आकस्मित येण्याच्या पायीं कुठल्याही स्त्रीला संकोच वाटल्यावांचून राहिला नसता. सुरेशला ती चांगलीच ओळखत होती. त्याचें हृदय कितीही मोठें असलें तरी त्या हृदयाच्या झोंकावर त्याचा कोणत्याच प्रकारचा काबू नसे— एव्हढेंच काय, पण तिला त्याची भीतीही वाटे. या संध्याकाळच्या वेळीं आपल्याला त्याच्याबरोबर एकटी टाकून महिम जायला निघाला आहे हें पाहून ती अस्वस्थ झाली. पण बाहेर आपली मनःस्थिती एव्हढी सुद्धां दिसू न देतां ती हंसून म्हणाली, "वाः ! असं कधीं झालंय ! पाव्हण्याला एकटा टाकून—"

महिम म्हणाला, "मी गेलों म्हणून कांहीं पाहुणचारांत उणीव येत नाहीं. शिवाय तूं तर आहेस—"

अचला संकोचून म्हणाली, "पण मला कांहीं इथं बसून राहातां यायचं नाहीं—" सुरेशकडे पाहून ती म्हणाली, "आमचे भटजी असे पक्के सैंपाकी आहेत, कीं सारखं समोर उभं राहिलं नाहीं तर अन्न तोंडांत सुद्धां घालवणार नाहीं. मी म्हणतेंय, तुम्ही तसंच—"

महिम म्हणाला, " नाहीं, तें होणं नाहीं. दोन घंट्याची बाब—" असें म्हणून त्यानें खोलीच्या कोपऱ्यांतील लाठी उचलून हातीं घेतली.

एकवार ठरलेल्या कामांत उगीच बदल करायची महिमला संवय नव्हती हें माहित असतांना क्षुल्लक कारण काढून वारंवार त्याची अडवणूक करायची अचलेला लाज वाटली—त्यांतून ही गोष्ट सुरेशच्या ध्यानीं आली तर शरमेनें जीव टाकावा लागेल हीही भीती होतीच.

महिम बाहेर निघून गेला. सुरेश अचलेला उद्देशून हंसून म्हणाला, " कशाला उगाच असा कमीपणा घेतलास ? मला पहिल्यापासून माहित आहे, कीं कुणाचं सांगणं ऐकणारा तो माणूसच नव्हे. तूं असं कर, कसलं तरी एक पुस्तक मला आणून दे अन् आपल्या कामाला जा—सहज माझा वळ जाईल. "

खरोखरच महिम केव्हांही तिची कोणतीही मागणी कधींच मान्य करीत नव्हता, म्हणून त्याचे हे उद्गार अचलेला जाणवले. असेना का हा त्याचा मोठ्यांतला मोठा गुण ! तरी पण सुरेशच्या तोंडून आपल्या नवऱ्याच्या या आजन्म कर्तव्यनिष्ठचा परिचय ऐकून आज तिला त्यानें केलेली उपेक्षा अपमानास्पद वाटली. जास्त कांहीं न बोलतां ती स्वतःच्या खोलींत गेली आणि यदूच्या हातीं एक बंगाली पुस्तक पाठवून देऊन तिनें सैंपाकघरांत प्रवेश केला. रात्रीं झोपायला जायच्या वेळीं महिमनें तिला विचारलें, " इथं किती दिवस राहाणार तें सुरेशनें सांगितलं का तुला ? "

अचला आज सारा दिवस कोणत्या ना कोणत्या कारणामुळें नवऱ्यावर रागावलेली होती, त्यामुळें असें विचारण्यांत कांहींतरी कुचकट कल्पना आहे असा समज करून घेऊन तिला संताप आला. तिनें कठोरपणानें विचारलें, " म्हणजे काय ? "

महिम थक्क झाला. त्यानें विचारलें होतें तें सीध्या भावनेनें—त्यांत कांहीं कुत्सतपणा नव्हता. आतांपर्यंत ते दोघेही जरी बोलत बसले होते तरी मित्राला हा प्रश्न करायचा त्याला संकोच वाटला होता आणि सुरेश स्वतःही कांहीं बोलला नव्हता. त्याला वाटलें होतें, सुरेशनें अचलेकडे तसें कांहीं सांगितलें असेल खास.

महिम कांहीं बोलत नाहीं असें पाहून अचला स्वतःच म्हणाली, " याचा

अर्थ एव्हढा सरळ आहे, कीं तो तुम्ही विचारायला नको होता. सुरेशबाबू कांहींतरी बेत करून इथं आले आहे अन् तो बेत केव्हां कसा पार पाडायचा तें मला माहित आहे असं तुम्हांला वाटतं, होय ना ? "

महिम आणखी कांहींवेळपर्यंत गप्प बसून राहिला. नंतर शांतपणें म्हणाला, " मला कांहींच वाटत नाहीं. मृणाल तशाप्रकारें गेली त्यामुळं तुझं मन आज थाऱ्यावर नाहीं. कोणतीही गोष्ट सरळपणें समजून घ्यायची तुझी मनःस्थिती नाहीं. आतां झोंप. उद्यां काय तें बोलूं. " असें म्हणून तो आपल्या बिछान्यावर आडवा झाला आणि पाठ फिरवून झोंपेच्या तयारीला लागला.

अचला बिछान्यावर पडली खरी पण कांहीं केल्या तिला झोंप येत नव्हती. तिच्या मनांत सारा दिवस जी एक खळबळ सारखी डांचत राहिली होती, कोणत्या तरी प्रकारें भांडून तांडून ती बाहेर गेली असती तर ती स्वस्थ झाली असती. पण अशा प्रकारें तिचें तोंड बंद केलें गेल्यामुळें ती आंतल्या आंत पिचत राहिली. भाषण मधेंच बंद केलें त्यावेळीं एकादी अशिक्षित स्त्री असती तर तिनें मुद्दाम भांडण उकरून काढलें असतें. पण तशा प्रकारची क्षुद्र वृत्ति दाखवणें तिला शक्य नव्हतें. कल्पनेनें नवऱ्याला प्रतिवादी म्हणून उभा करून तिनें नुसती जळजळीत प्रश्नोत्तरमाला मनांतल्या मनांत सुरू केली आणि स्वतःला शक्य तितकी दुखापत करून मध्यान्ह रात्र उलटून जाईपर्यंत ती बिछान्यावर तडफडत राहिली.

थोड्या उशीरांच झोपमोड झाली तेव्हां ती धडपडत उठून बाहेर आली. पाहाते तों हातीं किटली घेऊन यदू सैपाकघराकडे चालला होता. त्याला हांक मारून तिनें विचारलें, " बाबू कांहीं सांगून गेले का रे यदू ? "

यदू म्हणाला, " एक प्रहरांत येतों म्हणून सांगून गेले. "

महिम दररोज पहांटे उठून स्वतःच्या शेतावर जात असे. परत यायला केव्हां केव्हां दुपार सुद्धां होत असे.

अचलेनें विचारलें, " पाहुणे उठले का ? "

यदू म्हणाला, " उठले तर ! त्यांनींच तर चहा तयार करायला सांगितलं मला. "

अचलेनें घाईघाईनें हातपाय धुऊन कपडे बदलले. बाहेर येऊन पाहाते तों सुरेश केव्हांचा तयार होऊन बसला होता. खोलीच्या सार्‍या खिडक्या त्यानें उघडल्या होत्या. उघड्या दरवाजासमोर एक खुर्ची टाकून तो कालचेंच पुस्तक वाचीत होता. अचलेची चाहूल लागतांच सुरेशनें हातचें पुस्तक बाजूला केलें.

अचलेच्या चेहर्‍यावर रात्रींच्या जागरणाचीं चिन्हें स्पष्ट उमटलीं होतीं. तिचे डोळे काळवंडले होते, कपाळ फिकट झालें होतें, ओठ कोमेजले होते—जसजसा तो पाहूं लागला तसतसे त्याचे डोळे मत्सराच्या आगीनें पेट घेऊं लागले—पण कांही केल्या त्याची दृष्टी तिच्यावरून हालेना.

त्याच्या पाहाण्याच्या विलक्षण ढबीमुळें अचला चकीत झाली. तिला कांहींच अंदाज येईना. ती म्हणाली, " केव्हां उठलां ? मला उठायला आज जरा उशीर झाला. "

" दिसतंच आहे ! " असें म्हणून सुरेशनें हळुहळू मान हालवली.

समोरच्या भिंतीवर एक जुनापुराणा आरसा टांगलेला होता – अगदीं त्याच-वेळीं अचलेची दृष्टी त्या आरशाकडे गेली, तेव्हां सुरेशच्या त्या पाहाण्याच्या ढबीचें कारण लगेच तिच्या लक्षांत आलें. स्वतःची अवकळा पाहून ती लाजेनें अर्धमेली झाली. हें तोंड कसें लपवावें, कुठें लपवावें, सुरेशला झालेल्या खोट्या कल्पनेचें कसें निराकरण करावें याचा अंदाज न आल्यामुळें ती घाईघाईनें बाहेर जायला निघाली. " आधीं आपल्याला चहा घेऊन येतें. " असें म्हणत म्हणत ती तिथून निघून गेली.

सुरेश कांहींच बोलला नाहीं. नुसता एक मोठा सुस्कारा सोडून शून्य दृष्टीनें तो अधांतरीं पाहात स्तब्धपणें बसून राहिला होता.

सुमारें दहा मिनिटांनीं चहाचा सरंजाम घेऊन अचला जेव्हां पुढें आली त्यावेळीं सुरेशनें स्वतःला सांवरून घेतलें होतें.

चहा घेतां घेतां सुरेश म्हणाला, " हें काय ? तूं चहा घेतला नाहींस. "

अचला हंसून म्हणाली, " आतां मी चहा घेत नाहीं ! "

" कां घेत नाहीं ? "

आवडेनासा झालाय. शिवाय इथली हवा जरा गरमच आहे त्यामुळं

चहा घेतला तर झोंप येत नाहीं. काल सारी रात्र कशी ती झोंपच आली नाहीं—" ती हंसून म्हणाली, " एक रात्र झोप आली नाहीं तर अशी अवकळा येते माणसाला, कीं लोकांसमोर तोंड दाखवणं देखील कठीण होतं. " असें म्हणून ती ओशाळल्या मुद्रेनें हंसू लागली.

कांहीं वेळ थांबून सुरेश म्हणाला, " पण चहाची संवय तुला पहिल्यापासून आहे—चहा घे म्हणून महिम नाहीं का तुला आग्रह करीत ? "

अचला हंसून म्हणाली, " आग्रह केला तरी ऐकणार कोण ? तसं पाहिलं तर चहा म्हणजे कांहीं अशी जिन्नस नव्हे, कीं घेतल्याशिवाय चालायचं नाहीं. "

सुरेशला स्पष्ट दिसून आलें, कीं तें तिचें हांसणें कोरडें होतें. पुन्हां कांहीं वेळ थांबून तो म्हणाला, " तुला माहित आहे, प्रस्तावना करून बोलायची मला संवय नाहीं. मला जमत नाहीं. पण मी एकदोन गोष्टी सरळ सरळ विचारल्या तर तुला राग नाहीं ना यायचा ? "

अचला हंसतमुखानें म्हणाली, " आतां ऐका—राग कशाला येईल ? "

सुरेश म्हणाला, " तर मग मी असं विचारतों, तूं इथं सुखांत आहेस का ? "

अचलेचा हंसता चेहरा गोरामोरा झाला. ती म्हणाली, " असला प्रश्न आपण विचारूं नये.

" कां विचारूं नये ? "

अचला मान हलवून म्हणाली, " नयेच ! मी सुखांत नाहीं असं आपल्या मनांत आलं हीच चूक ! "

सुरेश खिन्नपणें हंसून म्हणाला, " मन काय काय चूक आणि काय काय बरोबर याचा विचार करून समज करून घेत असतं अचला ? एक दोन महिन्यांपूर्वी अशी भावना धरणं मला उचित होतं, एव्हढंच नव्हे, तर तसा अधिकार मला होता. आज दोन महिन्यानीं तो सारा अधिकार नाहींसा झालाय–झाला न झाला सारखाच—ती तक्रार मी करीत नाहीं—यावेळीं खरं काय तेव्हढंच हवंय मला. येईपर्यंत एकदां मला वाटे, कीं मी जिंकली—एकदां वाटे, कीं मी हरलों. मला काय वाटतं तें तुला कळत नाहीं असं नाहीं एकवार खरोखर काय आहे तें सांग ना अचला !—काय आहे ? "

अनिवार आंसवांचा फवारा तिच्या कंठापर्यंत फेसाळून आला होता. पण सारा जीव टाकून तिनें तो दाबला आणि म्हटलें, " मी खुशाल आहें. "

सुरेश हळूच म्हणाला, ठीक आहे. "

यानंतर कांहींवेळपर्यंत काय बोलावें तें कुणालाच सुचेना. सुरेश अकस्मात् चमकल्यासारखें करून म्हणाला, " आणखी एक गोष्ट तुझ्यासाठीं मी किती दुःख सोसलंय याची तुला कधीं—"

अचला दोन्ही कानांत बोटें घालून म्हणाली, " माफ करा—असली चर्चा नको. "

उघड्या दरवाजासमोर दोन्ही हात पसरून धरून जाऊं पाहाणाऱ्या अचलेचा रस्ता अडवून सुरेश म्हणाला, " नाहीं. माफ करणं शक्य नाहीं. माझं म्हणणं तूं ऐकलंच पाहिजेस. "

त्याच्या नजरेंत तीच चमक होती—ती चमक आठवली तेव्हां आज सुद्धां अचला शहारून उठली. एक पाय मागें घेऊन ती घाबरून म्हणाली, " ठीक आहे. बोला—"

सुरेश म्हणाला, " भिऊं नकोस. मी तुझ्या अंगावर हात टाकणार नाहीं. अजून तेव्हढा भानावर आहें मीं. " असें म्हणून तो खुर्चीवर जाऊन बसला आणि म्हणाला, " माझं एक सांगणं तूं ऐकलं पाहीजेस. माझं,—तुझ्यावरचा सारा अधिकार मी हरवून बसलोंय, पण तुला माझ्यावर सर्व प्रकारचा अधिकार गाजवतां येईल. "

अचला त्याला थांबवून म्हणाली, " त्यांत मला कांहीं लाभ नाहीं—"

बोलतां बोलतां तिला असें दिसून आलें, कीं तिचा तो लहानसा उद्गार सुरेशला फटका बसल्यासारखा लागलासा वाटला. सुरेश गोरामोरा झाला होता पण त्याचवेळीं तिला स्वतःलाही वाटलें, कीं पश्चात्तापाचा फटका तितक्याच जोरानें तिच्यावरही बसला होता.

क्षणभर थांबून ती शांतपणें म्हणाली, " सुरेशबाबू, असल्या या गोष्टी बोलणं जसं तुम्हांला उचित नाहीं तसंच मी ऐकणंही पाप आहे. या साऱ्या गोष्टी काढून तुम्ही कां मला दुःख देतां ? "

तिच्या नजरेला नजर भिडवून सुरेश म्हणाला, " तुला दुःख होतं अचला ? "

अचलेच्या तोंडून चटकन् निघून गेलें, " मी काय दगड आहें सुरेशबाबू ? "

सुरेशनें आपली नजर अचलेच्या नजरेवरून हालवली नाहीं. पण अचलेचे दोन्ही डोळे मात्र खालीं पाहूं लागले.

सुरेश म्हणाला, " बस्स ! जन्मभर हाच आधार मला होईल अचला. यापेक्षां अधिक मला कांहीं नको—" असें म्हणून तो क्षणभर थांबून पुन्हां म्हणाला, " तूं जर दगड नाहींस तर या माझ्या शेवटच्या विनवणीपासून मला वंचित करूं नकोस. तुझ्या सुखाचा भार तुला वाटेल त्याच्यावर राहो, पण तुझ्या हातून ज्याअर्थी मला नुसतं दुःखच लाभलंय, त्याअर्थी तुझ्या दुःखाचा बोजा मात्र माझ्याकडेसच राहूं दे, एवढाच वर मी मागतों—एवढीच भिक्षा मला दे ! "

बोलत असतांना त्याचा कंठ सद्गदित झाला होता. गेल्या रात्रीपासून सांचलेल्या साऱ्या वेदना अचलेच्या इच्छेविरूद्ध तिच्या डोळ्यांवाटे पाझरून सारख्या वाहूं लागल्या होत्या.

अगदीं याच वेळीं बाहेर वहाणांचा आवाज ऐकूं आला आणि त्याचक्षणीं आंत येतां येतां महिम म्हणाला, " कायरे सुरेश, चहाबिहा घेतलास कीं नाहीं ? "

सुरेशला एकदम बोलतां येईना. मान खालीं घालून धोतराच्या सोग्यानें त्यानें कसेबसे आपले डोळे पुसले. तोंडावर पदर ओढून अचला झपाट्यानें महिमच्या अंगावरून निघून गेली. महिम मात्र एक पाऊल उंबरठ्यांत आणि एक उंबरठ्याबाहेर ठेवून हतबुद्ध होऊन उभा राहिला होता.

## १७

मन सांवरून घेऊन महिम आंत आला आणि एक खुर्ची ओढून घेऊन बसला.

ज्या अवस्थेंत माणसाचें मन कसलाही संकोच न धरतां अगदीं हातोहात असत्याची निर्मिती करूं शकतें, त्याच अवस्थेंत सुरेश यावेळीं होता. चटकन् हातांनीं डोळे पुसून तो लाजवटपणानें हंसला. मोकळ्या मनानें त्यानें कबूल केलें, कीं आपण सध्यां खरोखरच मोठ्या दुबळ्या मनःस्थितींत आहोंत, तरीही महिमनें

त्या बाबतींत मुळींच उद्वेग दाखवला नाहीं. एव्हढेंच नव्हे, तर त्याचें कारण सुद्धां विचारलें नाहीं.

सुरेश त्यावेळीं आपली कैफियत आपणच देऊं लागला. तो म्हणाला, " कुणी कांहीं म्हणो महिम, मी तुला ठांसून सांगतों, कीं कुणाच्या डोळ्याला पाणी आलेलं पाहिलं कीं माझे स्वतःचे डोळेसुद्धां पाझरतात. मला तें आवडत नाहीं. मी गेलों नसतों तर केदारबाबू कांहीं केल्या बचावले नसते. पण तो म्हातारा आहे मोठा बदमिजाजी रे महिम ! एकुलती एक मुलगी, पण तिला सुद्धां खबर दिली नाहीं. तुमचं लग्न झाल्यापासून हा गृहस्थ जो नाउमेद झाला आहे, तो अजून थाऱ्यावर आला नाहीं. मी म्हटलं, जें व्हायचं तें होऊन गेलं—"

महिमनें विचारलें, " चहा मिळाला का ? "

सुरेश म्हणाला, " हो मिळाला. पण बाप जर असा वागूं लागला तर कुणाच्या डोळ्यांतून पाणी येणार नाहीं ? जातीच्या पुरुषाला सुद्धां जिथं सहन व्हायचं नाहीं तिथं ही तर स्त्रीजात ! "

महिम म्हणाला, " ते खरं आहे ! रात्रीं तुझी झोपायची कांहीं गैरसोय नाहीं ना झाली ?—झोप चांगली आली ना सुरेश ? नवी जागा—"

सुरेश म्हणाला, " नाहीं, नाहीं, नव्या जागीं झोप यायला मला कांहीं अडथळा होत नाहीं. एका कुशीवर झोपलों होतों सारी रात्र बरं महिम ! केदार-बाबूंनीं आपल्या आजारीपणाची खबर तुला सुद्धां दिली नाहीं—काय म्हणावं या माणसाला ! केव्हढं आश्चर्य हें ! "

महिम अगदीं साहजिकपणें म्हणाला, " आश्चर्य तर खरंच ! " असें म्हणून तो थोडासा हंसला आणि म्हणाला, " आतां जरा तोंडबिंड धुऊन बाहेर चक्कर मारायला येतोस ? जा पाहूं आतां—जरा चटपट उरकून घे बाबा. एका तास-भऱ्यांत मला निघालं पाहिजे बाहेर. अजून माझा सकाळचा उद्योगसुद्धां उरक-लेला नाहीं. "

सुरेश हातांतलें पुस्तक वाचण्यासाठीं सरसावून म्हणाला, " ही गोष्ट आवडलीय मला—एव्हढी पुरी करतों. "

" मग वाच. एक दोन तासांत मी चक्कर मारून येतों. " असें म्हणून तो उठून चालता झाला.

त्याची पाठ फिरतांच सुरेशनें नजर वर करून पाहिलें. त्याला वाटलें, कुठल्या तरी अदृश्य हातानें एका क्षणांत त्याच्या साऱ्या तोंडावर जणूं काजळ माखलें होतें.

ज्या दारानें महिम बाहेर गेला, त्या खुल्या दरवाजाकडे सारखी टक लावून पहात सुरेश कष्टी होऊन बसला होता. पण त्याच्या हृदयाच्या अंतर्यामांतून त्यानें केलेल्या अयाचित कैफियतीची निष्फलता त्याच्या सर्वांगाला तडाख्याचे दंश केल्याप्रमाणें आंतून जाणवत होती.

त्या दोन्ही मित्रांचें भाषण दाराच्या आड राहून अचला कान देऊन ऐकत होती. कपडे बदलण्यासाठीं महिम आपल्या खोलींत गेल्याबरोबर ती दार लोटून आंत गेली. महिमनें तिच्याकडे पाहिलें तेव्हां अचलेनें अगदीं नित्याच्या आवाजांत सरळ सरळ विचारलें, " माझ्या बाबांनीं असा काय भयंकर गुन्हा केलाय तुमचा ? "

एकदम अशा प्रकारचा प्रश्न आल्यामुळें, त्याचा उद्देश न कळून महिम जिज्ञासू मुद्रेनें तिच्याकडे नुसता पाहात राहिला.

अचलेनें पुन्हां विचारलें, " मी काय विचारलं तें कळलं नाहीं वाटतं ? "

महिम म्हणाला, " नाहीं ! बोलणं प्रिय नसलं तरी स्पष्ट होतं खरं — पण त्याचा अर्थ कळणं मात्र फार कठीण होतं — निदान मला तरी ! "

आंतून येणारी रागाची उकळी यथाशक्ति आवरून अचला म्हणाली, " या दोहोंतलं कुठलंही कठीण नाहीं तुम्हांला—कठीण आहे तें कबूल करणं ! सुरेशबाबूला तुम्हीं आपणहून जें सांगितलं तें मला सांगायला मात्र तुम्हाला वेळ झाला नाहीं ! आज मी तुम्हांला अगदीं स्पष्ट स्पष्ट विचारतें, बाबा एवढे भयंकर आजारी असतांना त्यांची खबर मला द्यावी असं तुम्हांला न वाटण्याइतके तुमच्या लेखीं ते तुच्छ झाले का ? का तुम्हांला सांगणं आवश्य वाटलं नाहीं ? "

महिम म्हणाला, " अवश्य वाटतं पण जिथं ज्याची जरूरी नाहीं तिथं मी काय करावं असं तुला वाटतं ? "

अचला म्हणाली, " कुठं जरूरी नाहीं म्हणतां ? "

महिम क्षणभर आपल्या पत्नीच्या चेहऱ्याकडे मुकाट्यानें पाहून घेऊन कठोरपणानें म्हणाला, “ आतां हें जसं सुरेशला वाटलं नाहीं तसं ! अन् तूंही आतां उगीच रागाला येऊन माझ्या तोंडून नसते कठोर शब्द बाहेर यायला लावलेस तसं ! जाऊं दे–आतां पुरे–ज्या पाण्याच्या तळाला चिखल असतो तें पाणी घुसळणं माझ्या बुद्धीला पटत नाहीं ! ”

एव्हढेंच बोलून महिम बाहेर जात होता तोंच अचला झटक्यासरशीं त्याच्यासमोर आली आणि तिनें त्याचा रस्ता अडवला. क्षणभर तिनें आपले ओठ जोरानें चावून घेतले—जणूं काय अचानक मिळालेल्या दुःसह आघातामुळें मोठ्यानें ओरडावें असें वाटायची प्रवृत्ति ती जीव टाकून आंवरीत होती ! त्यानंतर ती म्हणाली, “ तुम्हांला बाहेर तसंच कांहीं जरूरीचं काम आहे का ? दोन मिनिटं थांबतां नाहीं का यायचं ? ”

महिम म्हणाला, “ थांबतों. ”

अचला म्हणाली, “ तर मग एकदां काय तें स्पष्ट होऊन जाऊं द्या. पाणी जेव्हां ओसरून जातं तेव्हांच खालच्या चिखलाचा पत्ता लागतो—होय ना ? ”

महिम मान हलवून म्हणाला, “ हो. ”

अचला म्हणाली, “ उगीच पाणी घुसळून उठवणं मला सुद्धां पसंत नाहीं. पण तेव्हढ्यासाठीं चिखल काढून टाकायचा प्रयत्न न करणं बरं का ? एकदां केव्हां तरी घुसळलं पाहिजेच ना--मग घुसळाना ! --एकदांची या चिखलापासून खरीखुरी सुटका तरी होऊन दे ! कसं ? ”

महिम कठोरपणानें म्हणाला, “ माझी हरकत नाहीं—पण त्यापेक्षां जास्त जरूरीचीं कामं सध्यां खोळंबून राहिलीं आहेत. यावेळीं वेळ व्हायचा नाहीं. ”

अचला अगदीं तशीच कठोरपणानें म्हणाली, “ तुमचीं हीं जास्त जरूरीचीं कामं संपलीं म्हणजे तरी फुरसत मिळेल ना ? ठीक, तोंपर्यंत मी वाट पाहातें. ” असें म्हणून त्याची वाट सोडून ती बाजूला उभी राहिली.

महिम खोलींतून बाहेर निघून गेला. तो समोर दिसत होता तोंपर्यंत ती ताठरून उभी राहिली होती. त्यानंतर तिनें दार बंद करून घेतलें.

सुमारें एका तासानें सुरेशला स्नानाला जायला सांगण्यासाठीं म्हणून ती

जेव्हां बाहेर आली, त्यावेळीं तिच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे पाहातांच सुरेशला वस्तुस्थितीची कल्पना आली. इतक्यांत महिमबरोबर तिचा खात्रीनें कांहींतरी खटका उडाला आहे, असा अंदाज येऊन सुरेशला मनांतल्या मनांत फार संकोच वाटला, पण प्रश्न करून तसें विचारण्याचें धैर्य झालें नाहीं.

अचला मुकाट्यानें पाहात उभी राहिली होती. तिनें विचारलें, " हें काय चाललंय ? "

सुरेश काल वापरलेले कपडे गोळा करून बॅगेंत भरीत होता. तो म्हणाला, " एकाला गाडी आहे—जरा आधींच बांधाबांध करून घेतों. "

अचला थोडीशी चकित होऊन म्हणाली, " आजच जाणार का तुम्ही ? "

सुरेश वर न पाहातां म्हणाला, " हो. "

अचला म्हणाली, " कां तें सांगा ना ! "

सुरेश तशाच खालच्या मानेनें म्हणाला, " या पुढं कशाला राह्यचं ? तुला पाह्यला म्हणून आलों होतों-पाहिलं-आतां निघालों. "

अचला क्षणभर स्तब्ध राहून म्हणाली, " तर मग आतां बाजूला व्हा, हीं असलीं कामं तुमचीं नव्हेत—बायकांचीं कामं आहेत हीं. मी सारं सामान गोळा करून भरून देतें–" असें म्हणून ती पुढें सरसावली तेव्हां सुरेश व्यग्र होऊन म्हणाला, " नको, नको, तुम्हाला कशाला त्रास–तसं कांहीं नाहीं–हें काम अगदीं–"

पण त्याचें तें वाक्य पुरें होण्याच्या पूर्वींच अचलेनें बॅग त्याच्या समोरून ओढून घेतली आणि सारे जिन्नस काढून टाकले. घड्या केलेले कपडे पुन्हां चांगल्या घड्या करून ती बॅगेंत भरूं लागली. सुरेश जवळच उभा राहून संकोचानें पुन्हां पुन्हां म्हणत होता, " कांहीं जरूरी नव्हती–मी सुद्धां स्वतः–" वगैरे वगैरे.

अचलेनें बराच वेळपर्यंत त्याला कांहीं उत्तर दिलें नाहीं. हातचें काम करीत करीत ती म्हणाली, " आपली बहीण किंवा बायको असती तर तिनंच ही बॅग भरली असती. तुम्हांला भरूं दिली नसती. पण तुम्हांला भीति वाटतेय ती तुमचे दोस्त येऊन हें पाहातील याची—होय ना ? मग त्यांत काय बिघडलं ? बायकांचींच कामं आहेत हीं ! "

सुरेश कांहीं न बोलतां उभा राहिला होता. आत्तांच महिमबरोबर त्याचें जें कांहीं भाषण झालें होतें तें अचलेला मुळींच कळलें नव्हतें—अर्थात् ती गोष्ट काढून उगाच त्याला दुःख देण्याचें तिला धैर्य झालें नाहीं. शिवाय महिम येऊन स्वतः हें सारें पाहील याचीही भीति होतीच.

बॅग व्यवस्थित रीतीनें भरून झाल्यावर अचला म्हणाली, " बाबांच्या आजारीपणाची गोष्ट काढलीच नसती तर बरं झालं असतं. त्यामुळं झाली काय ती नुसती हेटाळणी—त्यांनीं हिशेबांत सुद्धां घेतली नाहीं ती गोष्ट. "

सुरेश चकित होऊन म्हणाला, " तुला काय म्हणाला महिम ? "

सरळ उत्तर न देतां समोरचा दरवाजा डोळ्यानेंच दाखवून अचला म्हणाली, " इथं उभं राहून मी स्वतःच ऐकलं सारं ! "

सुरेश ओशाळून म्हणाला, " त्या बाबतींत मी तुझी माफी मागतों अचला. "

अचला वर पाहून म्हणाली, " कां ? "

पश्चात्तापाच्या वाणीनें सुरेश म्हणाला, " कां तें तूंच सांगून टाकलंयस. माझ्या स्वतःच्या चुकीमुळं दोघांचीही माझ्या करवीं हेटाळणी झालीय–म्हणूनच मी मुद्दाम तुझी क्षमा मागतोंय अचला ! "

अचलेनें वर नजर करून त्याच्याकडे पाहिलें. एकाएकीं तिची सारी मुद्रा आंतल्या आवेगाच्या जोरासरशीं उसळून उठली. ती म्हणाली, " तुम्हीं जें कांहीं केलंय सुरेशबाबू, तें सारं माझ्याचसाठीं ना ? माझी लाज झांकण्यासाठींच तर तुम्हांला शरमिंदं व्हावं लागलंय. तरी सुद्धां तुम्हीं माझी माफी मागावी एवढी लाज वाटतेय ? जें केलंत तें ठीकच केलंत. "

सुरेश आश्चर्यचकित होऊन हतबुद्ध झाल्याप्रमाणें तिच्या तोंडाकडे पाहूं लागला त्यावेळीं अचलेला कळून चुकलें, कीं तिचें भाषण त्याला नीटसें कळलें नाहीं. म्हणून ती एक क्षण वाट पाहून म्हणाली, " तुम्हीं आजच जाणार ना सुरेशबाबू ? इथं तुम्हांला कांही ओशाळेपणा वाटला असेल तर तो माझीच लाज झांकण्यासाठीं. तुमच्या स्वतःच्या दृष्टीनं तुम्हाला कसलीच जरूरी नव्हती अन् असं पाहा, हें घर कांहीं नुसतं आपल्या एकट्या मित्राचंच नव्हे—या घरावर

माझासुद्धां कांही अधिकार आहे. त्या अधिकाराच्या जोरावर आज मी तुम्हांला सांगतें, कीं आणखी कांहीं दिवस तरी माझा पाहुणचार घेऊन मग जा."

तिचें धैर्य पाहून सुरेश थक्क होऊन गेला. त्याचें मन मागेंपुढें होत होतें. कांहीं तरी उत्तर द्यावें म्हणून तो तोंड उघडणार तोंच महिम आपलें काम उरकून घरांत येत असल्याचें त्याला दिसून आलें.

अचला बॅग समोर ठेवून दाराकडे पाठ करून खालीं जमिनीवर बसली होती. महिम आल्याचें न कळल्यामुळें ती तसेंच आणखी कांहीं बोलून टाकील या भीतीनें तो घाबरून म्हणाला, "आलास का महिम? उरकलीं का तुझीं सारीं कामं?"

"हो. उरकलीं—" असें म्हणून महिम आंत आला तेव्हां अचला तशी बसल्याचें पाहून तो म्हणाला, "हें काय चाललंय?"

अचलेनें मान वळवून पाहिलें. त्याच्या प्रश्नाचें उत्तर न देतां पूर्वीच्या भाषणाचें सूत्र धरून ती सुरेशला उद्देशून म्हणाली, "तुम्ही तर माझे एक मित्र - नुसते मित्रच कां, आमच्यासाठीं तुम्ही जें केलंय त्यामुळं जिव्हाळ्याचं नातं जोडलंय तुम्हीं. तुम्हीं असे जर अचानक निघून गेलां तर मला किती वाईट वाटेल याची कल्पना नाहीं तुम्हांला. कांहीं झालं तरी आज मी तुम्हांला जाऊं देणार नहीं."

सुरेश कोरडें हंसू आणून म्हणाला, "आतां ऐक महीम. तुला भेटायला आलों होतों - आतां भेटलों—बस्स! या जंगलांत मला निरर्थक अडकवून ठेवण्यांत तुम्हांला काय फायदा? अन् हे कष्ट सहन करण्यांत मला तरी काय फायदा?"

महिम संथपणें म्हणाला, "मला वाटतं रागारागानं तूं निघाला होतास अन् तें कांहीं हिला पटलं नाहीं."

अचला चिडून म्हणाली, "अन् तुम्हांला पटलं वाटतं?"

महिम म्हणाला, "माझा प्रश्नच नाहीं इथं."

सुरेश मनांतल्या मनांत अत्यंत उत्कंठित झाला होता. कांहीं तरी करून ही अप्रिय चर्चा थांबवण्याच्या उद्देशानें तो प्रफुल्लतेचा आव आणून हंसून म्हणाला,

" हा कसला रे खोटा अपवाद ! मी कशाला रागावणार ? छान माणसं दिसतां तुम्हीं ! बरं, बरं, तुम्ही खूष होत असाल तर आणखी एकदोन दिवस राहून मग जाईन. वहिनी, बॅगेंत कपडे भरायची जरूरी नाहीं आतां. ते बाहेर काढून ठेवा. आतां चल महिम. आज तुझ्या विहिरीवर जाऊनच स्नान करूं—घरीं गेलों कीं एक बाटली क्किनाईन गिळीन हवं तर. "

" चल. " असें म्हणून कपडे काढून ठेवण्यासाठीं महिम खोलीबाहेर गेला.

## १८

नवा जोडा पायाला लागला म्हणजे ती असह्य कळ सहन करून माणूस कांहींच होत नाहीं असें दाखवण्याचें जसें ढोंग करतो, त्याचप्रमाणें सुरेश तो सारा दिवस हंसून खेळून काढीत होता. पण ज्या दुसऱ्या एका व्यक्तीला ही जखम मुकाट्यानें सहन करावी लागत होती तिला तें साधत नव्हतें. इकडे नवऱ्याचा कधींही न ढळणारा गंभीरपणा, तर तिकडे त्याचा चमत्कारिक ढोंगीपणा आणि आचरटपणा पाहून तिला संतापानें डोकें फोडून घ्यावें असें वाटत होतें. अंतःकरणाच्या द्वारें त्याची ओळख पटवून घेण्याचें अजून तिला साधलें नव्हतें तरी बुद्धीच्या द्वारें तिनें त्याला ओळखलें होतें. तिला स्पष्ट दिसून आलें होतें, कीं या चतुर, बुद्धिमान आणि मितभाषी माणसासमोर नाटकी आव आणण्यांत कांहीं अर्थ नव्हता. तें पटल्यामुळें प्रत्येक क्षणाला शरमेची काळिमा तिच्या मुद्रेवर ओसंडून दिसूं लागली होती. सकाळीं एकदां बाहेर जाऊन आल्यानंतर महिम पुन्हां घराबाहेर गेला नाहीं, अर्थात् सकाळच्या वेळच्या आमटीभातापासून सुरवात करून तो रात्रीं नुसत्या पुऱ्या खाऊन होईपर्यंत तिचा सारा वेळ अशाच मनःस्थितींत गेला.

रात्रीं बराच वेळपर्यंत अचला बिछान्यावर तडफडत पडली होती. ती हळूच म्हणाली, " सारी रात्र दिवा तेवत राहिला तर माणसाला झोंप येत नाहीं—एव्हढी सुद्धां दयेची अपेक्षा मी करूं नये का तुमच्याकडून ? "

तिचा तो केविलवाणा आवाज ऐकून महिम दचकून उठला आणि घाई-घाईनें वात बारीक करून म्हणाला, " चुकलों बरं—माफ कर मला — " असें

म्हणून दिवा मालवून तो बिछान्यावर येऊन पडला. तिची ही मागणी पुरी केल्याबद्दल तिनें त्याला धन्यवाद दिले नाहींत, दिवा मालवला म्हणून तिला झोंप यायलाही मदत झाली नाहीं, उलट जसजसा वेळ जाऊं लागला तसतशी त्या मुकाट काळोखांत तिच्या अंतरीची व्यथा प्रत्येक क्षणाला अधिकाधिक दुःसह होऊं लागली.

तें दुःख सहन करणें अशक्य झाल्यामुळें तिनें हळूच त्याला विचारलें, "कळून असो कीं नकळून असो, माणसाच्या हातून घडलेल्या चुकीचं प्रायश्चित्त मिळाल्यावांचून रहात नाहीं हें खरं का ?"

महिम अगदीं स्वाभाविक भाषेंत म्हणाला, "जाणक लोक असं म्हणतात खरं !"

अचला कांहीं वेळपर्यंत तशीच स्तब्ध राहिली होती. ती पुन्हां म्हणाली, "तर मग आपण दोघांनींही जी चूक केली आहे—जिचे दुष्परिणाम पहिल्यापासूनच सुरूं झाले आहेत, त्याचा शेवट कसा काय होणार आहे याचा अंदाज आहे का तुम्हांला ?"

महिम म्हणाला, "नाहीं."

अचला म्हणाली, "मलाही होत नाहीं. पण विचार करकरून मला एव्हढंच दिसून आलंय, कीं सारं कांहीं सोडून दिलं तरी पुरुष माणूस म्हणून, या दुःखाचा मोठा बोजा पुरुषानंच उचलावा हेंच योग्य !"

महिम म्हणाला, "आणखी थोडासा विचार करून पाहिलं असतंस तर तुला दिसलं असतं, कीं त्यामुळं स्त्रीचा बोजा कांहीं एक तिळभर सुद्धां हलका होत नाहीं. पण हा पुरुष कोण ? मी कीं सुरेश ?"

अचला शहारून उठली. त्या काळोखांत सुद्धां महिमला तें जाणवलें.

पुन्हां कांहीं वेळ स्वस्थ राहून अचला म्हणाली, "एक दिवस धडधडीत तुम्ही माझ्या तोंडासमोर माझा अपमान करायची सुरवात कराल याची कल्पना मला होती. आणखीही वाटत होतं, कीं या प्रकाराला एकदां सुरवात झाली कीं त्याचा शेवट कुठवर जाईल हेंही कुणाला सांगतां यायचं नाहीं. पण माझ्याकरवीं झगडा करणं व्हायचं नाहीं, कीं नुसतं लग्न झालंय म्हणून झगडा करीत राहून तुमचा संसार चालवीत राहणंही व्हायचं नाहीं. उद्यां होवो कीं परवां होवो,

मी पुन्हां बाबांच्या तिकडे जाणार."

महिम म्हणाला, "तुझ्या बाबांना आश्चर्य वाटेल मात्र."

अचला म्हणाली, "नाहीं, त्यांना अंदाज होता. मला सावध करायचा ते सारखा प्रयत्न करीत होते. याचा परिणाम केव्हांही चांगला व्हायचा नाहीं असं त्यांना वाटत होतं. कलकत्त्याला चाललं असतं,—पण या खेडेगांवच्या हवेंत नात्यागोत्याच्या माणसांना टाकून केवळ बायकोला घेऊन राहाणं फार दिवस निभायचं नाहीं, असं त्यांना वाटत होतं, म्हणूनच त्यांना आश्चर्य वाटायचं नाहीं."

महिम म्हणाला, "मग त्यांचा निषेध तूं कां मानला नाहींस ?"

आंतून उसळून येणारा उमाळा आवरायचा जिवापाड प्रयत्न करून अचला म्हणाली, "मला वाटत होतं कीं नकळत तुम्हीं कोणतीही गोष्ट करणार नाहीं."

"ती कल्पना आतां ढासळली का ?"

"हो."

"म्हणून भागीचा कारभार यापुढं सुध्या रीतीनं निभावणार नाहीं म्हणून दुकान उठवून पुन्हां घरीं जावं असं वाटतंय होय ?

"हो."

क्षणभर थांबून महिम म्हणाला, "मग जा तर. पण हा सारा नुसता व्यवहार आहे असंच समजून चालत असशील तर माझ्या मताशीं तुझीं मतं जमायचीं नाहींत—पण ही गोष्ट सुद्धां विसरूं नकोस, कीं नुसता व्यवहार कळायला सुद्धां चांगलाच वेळ लागतो. कधीं काळीं ही चूक तुझ्या ध्यानीं आली तर मला सांगून पाठव, मी येऊन तुला घेऊन येईन."

अचलेच्या डोळ्यांतून एक टीप खालीं गळून पडलें. तें हातानें पुसून टाकून आवाज ताब्यांत येईपर्यंत थांबून ती म्हणाली, "माणूस कांहीं पुन्हां पुन्हां चूक करीत नाहीं. मला वाटतं, ती तसदी घ्यायची जरूरी पडणार नाहीं तुम्हांला."

महिम म्हणाला, "कांहीं गोष्टी आधीं सांगतां येत नाहींत म्हणूनच त्यांना भवितव्य म्हणतात. या भवितव्याची भावना भविष्यकालासाठीं राखून ठेवून आज मला क्षमा कर. यापेक्षां जास्त बडबड माझ्याकडून व्हायची नाहीं."

अचलेला तो फटका चांगलाच जाणवला. ती म्हणाली, "माजी थट्टा करतां

आहांत वाटतं ? तसं असेल तर ती चूक होत आहे तुमची. मी खरोखरच उद्यां परवां निघून जाणार आहें."

महिम म्हणाला, " अन् खरोखरच मला तुला जाऊं द्यावंसं वाटत नाहीं."

अचला एकदम भडकल्यासारखें करून म्हणाली, " माझ्या मर्जीविरुद्ध तुम्हीं सक्तीनं मला डांबून ठेवणार का इथं ? तें व्हायचं नाहीं कधीं तुमच्याकडून. कळलं ?"

महिम अत्यंत शांतपणें म्हणाला, " ठीक आहे. आज रात्रींच तर जात नाहींस ! उद्यां परवां जेव्हां केव्हां जायला निघशील त्यावेळीं या गोष्टीची चर्चा करतां येईल. खूब वेळ आहे अजून. आज एवढ्यावरच पुरे -" असें म्हणून माथ्या-खालची उशी बदलून घेऊन त्यानें तो प्रसंग बळेंच दडपून टाकला आणि तो निश्चिंतपणें थोड्याच वेळांत झोंपी गेला.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं चहा घेत असतांना सुरेशनें विचारलें, " शेताची पाहाणी करण्याकरितां रोजच्यासारखा महिम आज सुद्धां पहाटे निघून गेला वाटतं ?"

अचला म्हणाली, " पृथ्वी उलथी पालथी झाली तरी त्यांच्या नित्यक्रमांत बदल व्हायचा नाहीं."

तोंडाजवळचा चहाचा पेला खालीं ठेवून सुरेश म्हणाला, " एका अर्थी माझ्यापेक्षां ही वृत्ति फार बरी. स्प्रिंग जोंपर्यंत गुंडाळलेली आहे तोंपर्यंतच बाकीचीं चाकं फिरत राहातात. त्याच्या कामांत अशीच एक गति आहे."

अचला म्हणाली, " हें यांत्रिक जीवन तुम्हांला बरं वाटतं का ?"

सुरेश मान हलवून म्हणाला, " वाटतं एवढ्याचसाठीं, कीं तें सामर्थ्य माझ्या शक्तीपलिकडचं आहे. दुबळा असण्यांत केव्हढा दोष आहे हें मला कळतं म्हणूनच ज्याची बुद्धि निश्चल आहे त्याची प्रशंसा केल्यावांचून माझ्यानं राहवत नाहीं. पण आज मला रजा दे—मी आज घरीं जातों"

अचला लागलीच कबूल झाली आणि म्हणाली, ' जा. मी उद्यां जाईन."

सुरेश आश्चर्यचकित होऊन म्हणाला, " तूं कुठं जाणार उद्यां ?"

" कलकत्त्याला."

“ एकदम कलकत्त्याला कां ? काल तर तुझा असा कांहीं बेत नव्हता ! ”

“ बाबा आजारी आहेत – त्यांना एकदां भेटून येईन. ”

सुरेशच्या मुद्रेवर उद्वेगाची छाया पडली. तो म्हणाला, “ आजारी बापाला एकाएकीं भेटायला जावं असं वाटलं तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. पण भीति आहे ती ही, कीं मागनं माझ्यासाठीं देखील अशीच रागारागी करून—”

अचलेनें ह्याचें उत्तर दिलें नाहीं. यदू समोरून जात होता त्याला हांक मारून सुरेश म्हणाला, “ तुझे बाबू शेतावरून आले का रे परत ? ”

यदू म्हणाला, “ आज सकाळीं ते मुळीं बाहेर गेलेच नाहींत. आपल्या खोलींत झोपलेयत. ”

अचला घाईघाईनें गेली आणि दाराबाहेरूनच डोकावून पाहते तों, महिम एका खुर्चीवर आडवा होऊन टेबलावर पाय टाकून झोंपी गेला होता, असें तिला दिसून आलें. रात्रीं झोंप लागली नाहीं म्हणून तिची भरपाई अशा रीतीनें करून घेणें कांहीं विलक्षण नव्हे. पण आपला नवरा दिवसाचीं रोजचीं कामें बंद ठेवून असा अवेळीं झोपला आहे, हें जेव्हां अचलेनें स्वतःच्या डोळ्यानें पाहिलें, तेव्हां तिच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं.

पाऊल न वाजवतां ती खोलींत गेली आणि त्याच्या तोंडाकडे पाहात राहिली. समोरच्या उघड्या खिडकींतून सकाळच्या भरपूर प्रकाशाचीं किरणें त्याच्या निद्रामग्न तोंडावर पडलीं होतीं. यापूर्वी नजरेला कधींच न आलेला असा एक नवाच प्रकार अकस्मात् तिच्या डोळ्याला दिसून आला. आज तिला दिसून आलें, त्याच्या चेहऱ्यावर असमाधानाचें एक सूक्ष्म जाळें पसरलें होतें. कपाळावर बऱ्याचशा रेषा उमटल्या होत्या. एक वर्षापूर्वी त्या तिथें नव्हत्या. तिला वाटलें, त्याच्या साऱ्या चेहऱ्यावर कसल्या तरी गुप्त दुःखाची थकलेली आणि गांजलेली अशी कळा उमटली होती.

ती पाऊल न वाजवतां आली होती तशीच मुकाट्यानें जाणार होती, पण पिकदाणीला पाय लागून जो आवाज झाला त्यामुळें महिमनें डोळे उघडून पाहिलें. अचला कावरीबावरी होऊन म्हणाली, “ या वेळींसे झोपलांत ? प्रकृति बिघडली नाहीं ना ? ”

महिम डोळे चोळीत उठून बसला आणि म्हणाला, "कोण जाणे-प्रकृति बिघडली नाहीं तरच आश्चर्य !"

पुन्हां कांहींच प्रश्न न करतां अचला खोलींतून बाहेर निघून गेली.

जेवणखाण झाल्यावर सुरेश निघायच्या तयारीला लागला होता. महिम जवळच एका खुर्चीवर बसून त्याच्याशीं बोलत होता. अचला दाराजवळ आली आणि प्रस्तावना न करतां म्हणाली, "उद्यां मी जातेंय. जमलं तर बाबांना एकदां भेटून येईन म्हणतेंय."

आश्चर्य प्रदर्शित करून सुरेश म्हणाला, "असं का !" असें म्हणून महिम-कडे वळून त्यानें विचारलें "वहिनीला तूं उद्यांच कलकत्त्याला पाठवतोयस का महिम ?"

बायकोच्या त्या गळेपडूपणामुळे महिम आंतून भडकून उठला पण चेहऱ्या-वरची मुद्रा प्रसन्न ठेवून तो थोडासा हंसून म्हणाला, "तशी कांही हरकत नाहीं. पण आमच्या या खेडेगांवांत शहरच्या गृहस्थाच्या घरचीं नाटकं करायची रीत नाहीं ! उद्यांच कशाला, आज सुद्धां तुझ्याबरोबर पाठवलं असतं तिला."

सुरेशचा चेहरा शरमेनें लाल झाला. अचलेच्या तें लगेच लक्षांत आलें तेव्हां बळेंच हंसून ती म्हणाली, "सुरेशबाबू, आमच्या शहरांत 'माहेर' म्हटलं कीं लाजायची कांहीं जरूरी नसते. आजारी आईबापांना पाहायला जायची रीत जर खेडेगांवांत नसेल, तर मी म्हणतें, आमच्या शहरचीं नाटकं खूप चांगलीं. आजचा दिवस तुम्हीं थांबा ना उद्यां आपण बरोबर जाऊं."

तिच्या ह्या उघड उघड बेमुर्वतपणामुळें सुरेशचा चेहरा गोरामोरा झाला. खालीं मान घालून तो बोलूं लागला, "नाहीं, नाहीं, आज आतां थांबतां यायचं नाहीं मला वहिनी. तुला वाटलं तर तूं उद्यां जा—मी मात्र आजच जाणार." बोलतां बोलतां उसळत्या भावनेच्या भरांत तो हातांत बॅग घेऊन एकदम उठून उभा राहिला.

त्याचा तो आवेश पाहून अचलेचा उद्देश मुळांतूनच उपटल्यासारखा झाला. ती एकदम काकुळतीला येऊन म्हणाली, "अजूनही गाडीला बराच वेळ आहे सुरेशबाबू ! इतक्यांत जाऊं नका. जरा थांबा. माझे दोन शब्द कृपा करून

अनुक्रम

ऐकून जा. " तिच्या आवाजांतली ती केविलवाणी काकुळती पाहून दोघेही एकाच वेळीं दचकून उठले. दुसऱ्या कुठेंही लक्ष न देतां अचला म्हणाली, " तुमच्या कसल्याच कामीं उपयोगी पडलें नाहीं मी सुरेशबाबू, पण प्रसंगीं तुमच्याखेरीज मला कुणाचा आधार नाहीं. तुम्हीं बाबांना जाऊन सांगा, यांनीं मला बंदींत ठेवलंय. कुठंच जाऊं देत नाहींत -- इथं मी मरून जाईन. सुरेशबाबू, तुम्हीं मला आपल्या बरोबर घेऊन जा. ज्याच्यावर माझं प्रेम नाहीं त्याचा संसार करण्यासाठीं मला तुम्हीं इथं टाकून जाऊं नका. "

महिम कळवळल्यासारखा होऊन मुकाट्यानें पाहात राहिला होता. सुरेश मागें वळून उभा राहिला आणि दोन्ही डोळे वटारून आवाज चढवून म्हणाला, " तुला कळतं ना महिम, कीं ही आहे ब्राह्म महिला. ही तुझी बायको झाली म्हणून हिच्यावर पाशवी सत्ता चालवायचा तुला अधिकार नाहीं. "

महिम कांहीं वेळपर्यंत सुन्न होऊन गेला होता. मन थाऱ्यावर ठेवून तो आपल्या बायकोला म्हणाला, " कोणत्या गोष्टीसाठीं तूं काय करते आहेस याचा एकदां विचार करून पाहा अचला—" तो सुरेशला म्हणाला, " पशू म्हण कीं माणूस म्हण, मी कुणावरही कसलीच सत्ता कधीं गाजवली नाहीं !--बरं तर सुरेश, शक्य असेल तर आजचा दिवस रहा आणि उद्यां हिला बरोबर घेऊन जा. मी स्वतः बरोबर येऊन उद्यां तुम्हांला गाडीवर चढवून देईन—म्हणजे गांवच्या लोकांनाही उगीच चर्चा करायला जागा मिळणार नाहीं—" जरा थांबून तो म्हणाला, " थोडं काम आहे मला, मी जातों. जाणं ज्याअर्थीं राहिलंय सुरेश, त्याअर्थीं आतां कपडे काढून ठेव ना ! एक तासाच्या आंत येतों " असें म्हणून तो खोलींतून बाहेर निघून गेला. अचला लाकडी पुतळीसारखी दाराला धरून उभी राहिली होती तशीच राहिली होती. सुरेश थोडा वेळपर्यंत मान खालीं घालून बसला होता. एकदम मोठमोठ्यानें हंसत सुटला आणि म्हणाला, " वा रे वा ! छान झाला अभिनय एका अंकाचा ! तूंही कांहीं वाईट नाटक केलं नाहींस अन् मी तर काय एकदम तरबेज ! त्याच्याच घरांत, त्याच्याच बायकोसाठीं त्याच्यावरच डोळे वटारून गेलों – यापेक्षां काय पाहिजे आणखी ? अन् माझा दोस्त, माझं गोड तोंड पाहून, थोडंसं हंसून मला वाहवा देऊन निघून गेला. मी

पैज मारून सांगतों तुला अचला, कुठंतरी आड जाऊन हो हो करून पोटभर हंसून घेण्यासाठीं त्यानं कामाचं नुसतं ढोंग केलं. जाऊं दे. एक आरसा जरा आण पाहूं वहिनी, माझा चेहरा कसा दिसतोय तें एकदां पाहून घेऊं दे !"

त्यानें अचलेकडे पाहिलें. अचलेचा चेहरा पांढरा फटफटीत झाला होता. तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. नुसता एक मोठा सुस्कारा सोडून ती संथपणें निघून गेली.

## १९

ज्या बिछान्याला स्पर्श करायला सुद्धां अचलेला आज शिसारी आली असती, तो बिछाना वेळींच तयार करण्यासाठीं ती संध्याकाळच्या वेळीं खोलींत गेली, त्यावेळीं तिचें मन कुठें होतें आणि कोणत्या परिस्थितींत होतें, तें मानसशास्त्र जाणणाऱ्या महापंडिताला सुद्धां सांगतां आलें नसतें.

कळसूत्री बाहुलीप्रमाणें नित्याच्या संवयीचीं कामें करून ती बाहेर जाऊं लागली असतां शेजारच्या टेबलाकडे अकस्मात् तिची नजर गेली. ब्लॉटींगच्या पॅडवर पडलेली एक लहानशी चिठ्ठी तिनें पाहातां पाहातां वाचून घेतली. नुसती एकच ओळ. वार नाहीं, तारीख नाहीं मृणालनें लिहिलें होतें, "दादा रे ! काय करीत आहेस, परवांपासून तुझी वाट पाहातां पाहातां तुझ्या मृणालचे दोन्ही डोळे आंधळे होत आले रे !"

बराच वेळपर्यंत अचलेच्या डोळ्याचें पातें सुद्धां लवलें नाहीं. दगडी मूर्तीच्या डोळ्यासारखी तिची न चळती दृष्टि सारखी त्या एका ओळीवर खिळून राहिली होती. तें पत्र केव्हांचें, केव्हां आलें, कोण आणून देऊन गेला-- तें तिला मुळींच माहित नव्हतें. मृणालचें घर कोणत्या बाजूला आहे, कोणत्या रस्त्यानें तिच्या घराकडे जायचें, कोणत्या बाजूनें तिच्या घरांत शिरायचें, - इतकी ती आसुसली होती कशासाठीं, कां एव्हढे त्याच्या वाटेकडे तिनें डोळे लावले होते, तें कळायचें कांहींच साधन नव्हतें. कोणत्या तरी एका परवांच्या दिवसापासून एकजण रस्त्याकडे डोळे लावून वाट पाहात होते. त्याचे डोळे फुटायला आले होते, पण भेट झाली नाहीं,—समोरच्या शाईच्या कांहीं रेघांवरून एव्हढाच पत्ता तिला लागला होता.

इकडे त्या कातरवेळीं त्या खोलींत सारखी टक लावून पाहातां पाहातांना तिच्या डोळ्यासमोर गांजलेलीं, पिडलेलीं अशीं काळीं काळीं अक्षरें पहिल्यानें अस्पष्ट आणि थोड्या वेळानें लहान लहान पांखरांसारखीं साऱ्या कागदभर उडया मारीत बागडूं लागलीं. अशाच प्रकारें उभी राहून कदाचित् ती आणखीही पुष्कळ वेळ पाहात राहिली असती. पण तिच्या नकळत एव्हढा वेळ तिच्या अंतरंगांतला जो निश्वास गोळा होऊन येत होता, तो फुटणाऱ्या बांधासारखा एकदम मोठा आवाज करून बाहेर आला—आणि त्याचवेळीं त्या आवाजानें दचकून ती पुन्हां भानावर आली.

दाराच्या बाहेर तिनें तोंड काढून पाहिलें, तों काळोख अंगणाखालीं उतरूं लागला होता. हरिकेन कंदील पेटवून यदू बाहेरच्या खोलींत ठेवण्यासाठीं घेऊन जात होता, त्याला हांक मारून ती म्हणाली, " बाबू आले का रे यदू ? "

यदू म्हणाला, " नाहीं बाईसाहेब, अजून नाहीं आले ते. "

एव्हढ्या वेळानंतर अचलेला आठवलें, कीं दुपारच्या त्या लाजिरवाण्या नाटकाचा पहिला अंक संपल्यावर तो जो बाहेर गेला होता तो अजून परत आला नव्हता. नवऱ्याच्या रोजच्या हालचालीसंबंधीं आज तिला तिळमात्र संशय राहिला नव्हता. सुरेश आल्यापासून जी एक कलहाची लाट त्या घरांत उसळली होती तिच्या सपाट्यांत अचला सारें कांहीं विसरून गेली होती. नवऱ्यावर तिचें प्रेम नव्हतें, चुकीनें हें लग्न झालें होतें—आयुष्यभर त्या चुकीची गुलामी पत्करण्याविरुद्ध तिचें असमाधानी मन बंडाची घोषणा करून रात्रंदिवस लढत होतें.

मृणालला ती एक प्रकारें विसरून गेली होती. पण आज संध्याकाळच्या कातर-वेळेला मृणालच्या त्या एक ओळीच्या पत्रामुळें तो सारा जुना भडका जेव्हां उलट्या दिशेनें फिरून पुन्हां दिसूं लागला, तेव्हां त्याच क्षणाला तिला पटलें, कीं तो तिचा चुकीनें झालेला नवरा दुसऱ्या स्त्रीवर आसक्त आहे. या संशयामुळें काळीज जाळून घेणें कांहीं कमी त्रासाचें नव्हतें.

तें पत्र पुन्हां एकदां वाचून पाहाण्यासाठीं तिनें उचलून डोळ्यासमोर धरलें; पण शिसारी आल्यामुळें तिच्या हातून तें आपोआप पडलें. तें त्याच जागीं तसेंच उघडें पडून राहिलें होतें. ती खोलीबाहेर आली आणि पडवीच्या भिंतीला टेकून स्तब्ध होऊन उभी राहिली.

एकदम तिला वाटलें, सारें खोटें ! हें घरदार, नवरा, हा संसार, जेवणें खाणें, उठणें बसणें कांहींच खरें नव्हे — यांतल्या कोणत्याही गोष्टीसाठीं माणसानें हातपाय हालविण्याची सुद्धां जरूरी नाहीं. नुसत्या मनाच्या भुलीमुळें माणूस तळमळ करीत असतो, नाहीं तर खेडें काय न शहर काय, झोपडी काय न राजवाडा काय, नवराबायको, आईबाप, भाऊबहीण हे संबंध आले आहेत कसले ? कशासाठीं हा रागरुसवा, रडणेंओरडणें, झगडातंटा करून मरताहेत ?

दुपारच्यावेळीं एव्हढें मोठें भांडण झाल्यावर देखील जो नवरा बायकोला एकटी टाकून तासचे तास निश्चिंतपणें घराबाहेर काढतो, त्याच्या मनःस्थितीची विचक्षणा करण्यासाठीं एव्हढी माथेफोड कशाला ? सारें खोटें ! सारें ढोंग ! मृगजळासारखें हें सारें असेंच ! पण एकदां जरी मृणालच्या त्या भाषेवर पूर्णपणें लक्ष न देतां खुद्द मृणालबद्दल विचार करण्याचा प्रयत्न तिनें केला असता, तर जग एव्हढें खोटें आहे, एव्हढें रिकामें झालें आहे असें तिला वाटलें नसतें. दुसऱ्या कुणाही स्त्रीबरोबर या खेडवळ पण सदा आनंदी स्त्रीचें आचरण तिनें ताडून पाहिलें असतें तर त्या दोन ओळींनीं मनाला तिनें जी काळोखी आणून घेतली ती परिस्थिती टळली असती.

यदू परत येऊन म्हणाला, “ बाबू विचारताहेत, चहाचं पाणी गरम झालं का ? ”

झोपेंतून जागी झाल्याप्रमाणें अचला म्हणाली, “ कुठले बाबू ? ”

यदू जोर देऊन म्हणाला, “ आपले बाबू, आत्तांच बाहेरून आले ना ते. चहाला आधण येऊन कितीतरी वेळ झाला. ”

“ थांब आलें. ” असें म्हणून अचला सैंपाकघराकडे वळली.

थोड्यावेळानें चहा आणि फराळाचें सामान नोकराच्या हातीं देऊन ती बाहेर आली तेव्हां तिला दिसून आलें, कीं महिम काळोखांत ओटीवर शतपावल्या घालीत होता आणि सुरेश माजघरांत कंदीलाकडे तोंड नेऊन वर्तमानपत्र वाचण्यांत गुंग झाला होता — जणूं काय एकाचा दुसऱ्याला पत्ता सुद्धां नव्हता.

या बंधूंच्यामध्यें आज स्वाभाविक शिष्टाचाराचा मार्ग देखील बन्द

होण्यापर्यंत जो अत्यंत लज्जास्पद संकोच निर्माण झाला होता, त्याची आठवण होतांच अचलेचे दोन्ही पाय तिथल्यातिथेंच थबकले.

अचलेला पाहातांच महिम थबकून उभा राहिला आणि म्हणाला, "सुरेशला चहा द्यायला एव्हढासा वेळ झाला?"

अचलेच्या तोंडून एक शब्दही बाहेर निघेना. ती कांहींवेळ मान खालीं घालून उभी होती. नंतर ती हळुहळू खोलींत आली.

चहाचा सरंजाम टेबलावर ठेवून यदू बाहेर निघून गेला. सुरेश वर्तमानपत्र बाजूला ठेवून मागें पाहून म्हणाला, "महिम कुठं आहे? अजून आला नाहीं का परत?"

त्याचवेळीं महिम आंत आला आणि एक खुर्ची ओढून बसला. गेलीं दहा मिनिटें तो बाहेर पडवींत शतपावली घालीत होता, ही गोष्ट मुद्दाम सुरेशला सांगायची त्याला जरूरी वाटली नाहीं.

त्यानंतर सर्व चुपचाप! अचलेनें मुकाट्यानें दोन पेले चहा तयार केला आणि एक पेला सुरेशला देऊन दुसरा नवऱ्यापुढें लोटून ती मुकाट्यानें जात होती, ती महिमच्या हांकेनें दचकून उभी राहिली.

महिम म्हणाला, "जरा थांब—" असें म्हणून तो चटकन् उठला आणि त्यानें दाराला खीळ घातली. झटकन् सुरेशला त्याच्या सहाबारी पिस्तुलाची आठवण झाली आणि त्याचा हात पेल्यासकट कांपूं लागल्यामुळें आंतला कांहीं चहा खालीं जमिनीवर सांडला. मुडद्यासारखा चेहरा करून तो म्हणाला, "दार बंदसं केलंस?"

त्याचा आवाज, त्याची मुद्रा आणि प्रश्न करण्याची त्याची धर्ती पाहून अचलेला सुद्धां तीच गोष्ट आठवून तिच्या अंगावर कांटा उभा राहिला. कदाचित् तिनें किंकाळी फोडायचा प्रयत्नही केला असेल, पण तो आवाज बाहेर निघाला नाहीं.

क्षणभर अचलेकडे नजर जातांच सारी परिस्थिती महिमच्या ध्यानीं आली. त्यानंतर सुरेशच्या तोंडाकडे पाहून तो म्हणाला, "नोकर आंत येईल म्हणून — माझं पिस्तुल आंत पेटींत बन्द असतं, अजूनही तें तिथंच आहे. तुम्हीं अशीं

घाबराल असं वाटलं असतं तर मी दार सुद्धां बंद केलं नसतं. ”

चहाचा पेला खालीं ठेवून सुरेश हंसल्यासारखें तोंड करून म्हणाला, “ वाः ! मी कशाला भिईन ? तूं मला गोळी घालशील म्हणून ? वाः ! मरायच्या भीतीनं ! मी ? कधीं तूं पाहिलं होतंस ? बरं, कसं कां असेना—”

त्याची ही असंबद्ध कैफियत पुरी व्हायच्या पूर्वींच महिम म्हणाला, “ खरो-खरच मी कधींही तुला घाबरतांना पाहिलं नाहीं. तुला जिवाची पर्वा नाहीं, तेंही मला माहित आहे. सुरेश, माझ्या स्वतःच्या दुःखापेक्षां तुझा हा अधःपात माझ्या जिवाला जास्त जाणवला. तुझ्यासारखा माणूस देखील ज्यामुळं असा क्षुद्र बनून जातो -- नाहीं सुरेश, उद्यां तूं खरोखरच आपल्या घरीं जा. कसलंही निमित्त करून आतां उशीर लावूं नकोस. ”

सुरेश तरी सुद्धां कांहीं उत्तर देणार होता पण त्यावेळीं त्याच्या तोंडून आवाज सुद्धां बाहेर फुटेना, इतकेंच नव्हे, तर त्याची मान सुद्धां ताठ होईना — जणूं ती त्याच्या नकळत झुकून पडली होती.

“ तूं आज जा अचला. ” असें म्हणून महिमनें दाराची कडी काढली आणि तो काळोखांतून बाहेर निघून गेला.

आतां मात्र सुरेशनें मान वर करून पाहिलें आणि हंसून म्हटलें, “ पाहा तर खरं, अशीं किती बंदूक, पिस्तुलं रात्रंदिवस या हातीं खेळवलींयत. मी म्हातारा होत आलों—तो मी याच्या एका मोडक्या रिव्हॉल्वरच्या भीतीनें घाबरणार होय ! ” असें म्हणून सुरेश उसळून उसळून हसूं लागला.

त्याच्या हंसण्याला जोर द्यायला अचलेखेरीज दुसरें कोणी तिथें नव्हतें. ती मात्र मान खालीं घालून जी एव्हढा वेळ उभी होती, ती तशीच आणखी कांहीं वेळ राहिल्यावर मुकाट्यानें पलिकडच्या दारानें आंत निघून गेली.

सुमारें एक तासानें महिम आंत येऊन पाहातो तों तिथें कुणी नव्हतें. शेजा-रच्या खोलींत जमिनीवर चटई टाकून मानेखालीं हात घेऊन अचला झोपली होती असें त्याला दिसून आलें. नवरा आंत आल्याचें पाहातांच ती उठून उभी राहिली जवळच एक चौपाई होती तिच्यावर बसून महिम म्हणाला, “ कसं ? उद्यां तूं माहेरी जायचं निश्चित केलंयस ना ? ”

अचला नुसती जमिनीकडे पाहात राहिली. तिनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. थोडा वेळ वाट पाहून महिम पुन्हां म्हणाला, " ज्याच्यावर तुझं प्रेम नाहीं त्याचा संसार चालवायची सक्ति मी नवरा असलों तरी तुझ्यावर करणार नाहीं."

तरीही अचला दगडाच्या मूर्तीसारखी स्तब्ध उभी राहिली आहे असें पाहून महिम बोलूं लागला, " पण तुझ्याविरुद्ध माझी तक्रार आहे ती वेगळीच. माझा स्वभाव तुला माहीत आहे—सुख असो कीं दुःख असो, स्वतःचं जें येणं असेल त्यापेक्षां एक कणभर सुद्धां अधिक मिळायची आशा मी कधीं केलेली नाहीं—कुणी दिलं तरीही तें मला नको आहे. प्रेमावर कांहीं सक्ति करतां येत नाहीं अचला. नाहीं मिळालं तर दुःख होईल, पण शरम वाटण्याजोगं कांहींच नाहीं त्यांत ! मग कां इतके दिवस त्रास करून घेतलास ? मी जबरदस्तीनें तुला इथं डांबून ठेवलंय असा समज मला न कळवतां कां करून घेतलास ? कधींही कोणत्याही बाबतींत मी सक्ति केली नाहीं. त्यानं तुला सोडवून नेलं तरच तुझा बचाव होईल—अन् मला कळवलं असतंस तर मी कांहींच का केलं नसतं ? तुझ्या प्राणाचं मोल काय नुसतं तोच जाणतो ?"

गहिंवरानें दाटलेल्या आवाजानें जितक्या स्वाभाविकपणें बोलणें शक्य होतें तितक्याच प्रकारें अचला हळूच म्हणाली, " तुमचं तर मुळीं प्रेमच नाहीं !"

महिम चकीत होऊन म्हणाला, " हें कुणी सांगितलं तुला ? मी कांहीं कधीं सांगितलं नाहीं !"

अचलेला चीड यायला आतां वेळ लागला नाहीं. ती म्हणाली, " नुसतं बोलूनच का दाखवलं पाहिजे ? तोंडानें बोललं म्हणजे तें खरं, बाकी सारं खोटं होय ? रागाच्या भरांत मनाच्या जाचणीनं माणसाच्या तोंडून जे चार शब्द बाहेर पडतात तेच तेवढे खरे धरून तुम्ही जोरा चालवायला पाहातां होय ? तुमच्यासारखं मला तोलून मापून बोलतां येत नाहीं, म्हणून माझ्या माथ्यावर पाय देऊन मला बुडवायचं का आहे ?" बोलतां बोलतां तिचा आवाज कोंडून गेला.

महिमला तिचें बोलणें नीटसें कळलें नाहीं म्हणून तो म्हणाला, " म्हणजे काय ?"

रडण्याची उकळी दाबून अचला म्हणाली, " तुमच्यासारखीं सावध माणसं

सुद्धां सदाच खोटं दाबून ठेवूं शकतील असं मात्र समजूं नका. तुम्ही सुद्धां घसरत असाल—पाहाना तिकडे, तुमच्या टेबलावर—काय आहे तें पाहा. नुसतीं आम्हींच तेव्हढीं —"

महिमनें हतबुद्ध होऊन विचारलें, "काय आहे माझ्या टेबलावर ?"

तोंडाला पदराचा बोळा देऊन अचला चटईवर पडली होती. तिच्याकडून कांहीं उत्तर येत नाहीं असें पाहून महिम आपल्या टेबलाजवळ गेला. त्या टेबलावर बरींचशीं पुस्तकें पडलीं होतीं. सुमारें दहा मिनिटेंपर्यंत त्यानें तीं उलटून पालटून पाहिलीं. त्यांच्याखालीं पाहिलें. आजूबाजूला अगदीं शोधशोधून पाहिलें. पण कांहींच सांपडलें नाहीं. बायकोनें केलेल्या आरोपाचें स्वरूप न कळल्यामुळें तो भांबावल्यासारखा परत फिरत होता, तोंच त्याची दृष्टि शेजघरांतल्या टेबलाकडे गेली. आंत पाऊल टाकतांच त्याची नजर मृणालच्या पत्राकडे गेली. तें पत्र हातीं उचलून घेऊन वाचतांच एकदम त्याच्या डोळ्यासमोर सारें कांहीं चक्क दिसून आलें. अचलेच्या बोलण्यांत कोणती खोंच होती ती कळायला त्याला वेळ लागला नाहीं.

तें पत्र हातीं घेऊन महिम बिछान्यावर बसून शून्य दृष्टीनें बाहेरच्या काळोखाकडे पाहात होता. पहिल्या दिवशीं ती ज्या रीतीनें आली होती, ज्या परीनें निघून गेली होती, सवत म्हणून अचलेची तिनें जी थट्टा केली होती,—एकेक गोष्ट त्याला आतां आठवूं लागली. या खेडेगांवीं विनोदाची जिला ओळख नाहीं तिला रोज तें कसें जाणवलें असेल, आणि स्वतः ती या थट्टामस्करींत जी कधींही भाग घेत नव्हती—तो स्वतःही भाग घेत नव्हता, उलट आपल्या बायकोच्या समोर शरमून तो वारंवार तिला मनाई करण्याचा प्रयत्न करीत होता--असें असतांनाही ही उच्च शिक्षण मिळालेली बुद्धिमती स्त्री आपल्या समजाप्रमाणें त्याच्या त्या शरमिंदेपणाला खरोखरीची शरमेची कबुली आहे असें समजून, तोच समज घट्ट धरून ठेवूं लागली, तर त्या मुळावर तो घाव घालणार होता कसा ?

बाहेरच्या काळोखांतून त्याला आज अनेक सत्यें दिसूं लागलीं होतीं. अचलेचें मन हळुहळू कसें सरकत गेलें, दिवसेंदिवस नवऱ्याबद्दल तिचें मन कसें

कलुषित होऊं लागलें, नवऱ्याचा आसरा तिला प्रत्येक क्षणाला तुरुंगासारखा कसा वाटूं लागला,—सारें कांहीं त्याला स्पष्टस्पष्ट दिसूं लागलें.

या प्राणांतींच्या अवरोधापासून सुटका होण्यासाठीं तिनें सुरेशजवळ जी कळवळून प्रार्थना केली, ती अंतरांतल्या कोणत्या तळाच्या भागांतून उत्पन्न झाली होती, तें सुद्धां आतां महिमच्या मनःचक्षूसमोर झांकून राहिलें नाहीं.

सर्वस्व देऊन सुद्धां अचलेवर प्रेम केलें होतें. त्याच अचलेच्या एवढ्या जवळ राहून सुद्धां तिच्या मनाच्या यातनांकडे आपली डोळेझांक झाली, हा आपल्या हातून केव्हढा तरी भयंकर गुन्हा झाला असें त्याला वाटलें पण आतां हें असेंच एक क्षणभर सुद्धां चालूं देतां नये. आपल्या पत्नीचें प्रेम पुन्हां मिळ-ण्याचा उपाय आहे कीं नाहीं, तें कितीसें दुरावलें आहे, याचा अंदाज करणेंही आज अशक्य होतें. पण अनेक प्रतिकूलतेशीं झगडून नवरा म्हणून ज्याचा तिनें एके दिवशीं आश्रय पत्करला होता, त्याच्याकरवीं आपला अपमान झाल्याची कल्पना करून घेऊन आज ती तो आश्रय झिडकारायला जी तयार झाली होती, ती भयंकर चूक तिला दाखवूत देणें अवश्य होतें.

महिम हळुहळू उठला आणि अचलेल्या दारासमोर येऊन उभा राहिला. पाहातो तों दार बंद होतें. ठोठावून पाहिल्यावर तें आंतून बंद असल्याचें त्याला दिसून आलें. एक दोन वेळ हांका मारून पाहिल्या तरी जेव्हां उत्तर मिळेना, तेव्हां जोर करून दरवाजा ठोठावावा असें त्याला वाटल. तरीही एका अतिशय कठीण प्रसंगांतून आपली आयतीच सुटका झाली असें वाटून तो तेथून निघाला.

महिम येऊन आंतल्या बिछान्यावर पडला. जिच्या अभावीं बाजूची जागा आज मोकळी होती ती खोलींत उपाशी जमिनीवर पडून आहे हें मनांत येतांच त्याला कांहीं केल्या झोंप येईना. उठून जावें आणि तिला जागी करून घेऊन यावें असा विचार करीत असतांना बरीच रात्र उलटून गेल्यावर त्याच्या डोळ्या-वर थोडा वेळ झांपड आली.

एकाएकीं चांगला प्रकाश पडलेला पाहून त्यानें डोळे उघडले. उशाकडच्या उघड्या खिडकींतून आणि छपराच्या फटींतून भयंकर प्रकाश आणि धुराचे लोट येऊन घर भरून गेलें होतें. अगदीं जवळच असा एक चमत्कारिक आवाज

झाला, कीं तो कानीं शिरतांच त्याचें सर्वांग सुन्न झालें. कुठें तरी आग लागली आहे असें त्याला खात्रीनें वाटलें तरीही क्षणभर त्याचे हातपाय हालतनासे झाले.

त्या थोड्याशा क्षणांमधें त्याच्या मस्तकांत जणुं सारें ब्रह्माण्ड खेळून गेलें. तो उडी मारून उठला आणि दार उघडून पाहातो तों सैंपाकघर आणि ज्या खोलींत अचला झोपली होती तिच्या पलिकडच्या पडवींतून एका कोपऱ्यामधून आगीचा लोळ वर गेला आणि त्यामुळें क्षणभर बाहेरचें जांब्राचें झाड लाल झालेलें दिसलें.

खेडेगांवांतल्या केंबळ्याच्या घराला आग लागली तर ती विझविण्याची कल्पना करणें म्हणजे शुद्ध वेडेपणा--कुणी तसा प्रयत्नही करीत नाहीं. गांवचे लोक नुसते धांवाधांव करीत मिळेल ती जिन्नस आणि गुरेंवासरें बाहेर काढायचा प्रयत्न करतात, तसेंच इतर कांहीं लोक एका बाजूला बायका आणि एका बाजूला पुरुष असे गोळा होऊन नुसते हाय हाय करीत बसतात, आग कशी लागली आणि किती सामानसुमान जळून गेलें याची चर्चा करीत सारें घर जळून जाई-पर्यंत वाट पाहात राहातात; त्यानंतर घरीं जाऊन बाकीच्या रात्रीं बिछान्यावर पडून खुशाल झोप घेऊन पुन्हां सकाळींच उठल्यावर नित्याप्रमाणें हातीं तांब्या घेऊन बाहेर निघतात. पुन्हां एकदां सकाळच्या पुरती चर्चा करून शेवटीं घरीं येऊन स्नानभोजन उरकून घेतात. पण एका माणसाचें घरदार सगळें भस्मसात होऊन तरी दुसऱ्या कुणाही माणसाच्या रोजच्या जीवनक्रमावर एव्हढा सुद्धां परिणाम होत नाहीं.

महिम स्वतः खेडेगांवचा माणूस असल्यामुळें त्याला ही सारी कल्पना होती, म्हणून उगीच आरडाओरडा करून अवेळीं गांवच्या लोकांची झोपमोड करायचा प्रयत्न त्यानें केला नाही. तशी जरुरीही नव्हती. कारण त्याच्या आंबे-फणसाच्या बागेला ओलांडून ही आग दुसऱ्या कुणाच्याही घरापर्यंत पोंचण्याचा संभव नव्हता. घराच्या ज्या मजबूत भागांत सुरेश आणि नोकरचाकर झोपले होते तेथें आगीचा लोळ जाऊन पोंचायला अजून विलंब होता. विलंब नव्हता काय तो अचलेच्या खोलीच्या बाबतींत. दार जोरानें ठोठावून त्यानें अचलेला हांक मारली.

जागी असल्याप्रमाणें अचलेनें उत्तर दिलें, " काय आहे ? "

महिम म्हणाला, " दरवाजा उघडून बाहेर ये. "

अचलेनें शांतपणें उत्तर दिलें, " कशाला ? मी बरी आहें इथं. "

महिम म्हणाला, " उशीर लावूं नकोस—बाहेर ये लवकर. घराला आग लागली आहे. "

अचलेनें एकदां मोठ्यानें किंकाळी फोडली आणि त्यानंतर सारें गप्प झालें. महिम पुन्हां पुन्हां हांका मारीत होता पण तिचें उत्तर आलें नाहीं.

महिमला भीति वाटत होती ती ही—घराला आग लागणें म्हणजे काय ह्याची नीटशी कल्पना अचलेला येणें शक्यच नव्हतें. यापूर्वी तिनें डोळे झांकूनच उत्तर दिलें असावें, पण डोळे उघडतांच जो देखावा दिसला त्यामुळें पहिल्यानें ती घाबरली असावी आणि शेवटीं भयंकर प्रकाश पाहून तिची शुद्धि गेली असावी, असें महिमला नक्की वाटलें.

पण असें कांहींतरी होईल याची महिमला कल्पना होती. त्यानें दाराची एक फळी एका बाजूनें उचलून कडी काढून आंत प्रवेश केला आणि मूर्च्छित झालेल्या आपल्या बायकोला उचलून घेऊन तो तसाच अंगणांत येऊन उभा राहिला.

आतां त्यानें घरांतल्या बाकीच्या माणसांना जागें करण्यासाठीं त्यांच्या नांवानें मोठमोठ्यानें हांका मारायला सुरवात केली. सुरेश पांढराफटक होऊन धांवत बाहेर आला. यदू वगैरे बाकीचे सारे लोक दारें उघडून भडाभड बाहेर आले. त्यानंतर जो एक प्रचंड आवाज झाला त्यासरशीं अचला शुद्धीवर आली आणि दोन्ही हातांनीं नवऱ्याला घट्ट कवटाळून फुलून फुलून रडूं लागली.

सर्वांना घेऊन महिम ज्यावेळीं मोकळ्या जागीं बाहेर आला त्यावेळीं घराच्या आढ्यानें पेट घेतला होता. अचलेचे दागदागिने आणि मोलाचे जिन्नस त्याच खोलींत होते, त्यांची आठवण येऊन तो एकदम आंत शिरण्यासाठीं धांवला.

अचला शुद्धीवर आली होती. तिनें जोरानें नवऱ्याचा हात धरून त्याला मागें खेचीत म्हटलें, " नाहीं-तें चालायचं नाहीं. सूड घ्यायला हीच का संधि

मिळाली तुम्हांला ? कांहीं झालं तरी मी तुम्हांला आंत जाऊं देणार नाहीं— जाऊं दे—सारं जळून जाऊं दे ! "

" गेल्याशिवाय गत्यंतर नाहीं अचला ! " असें म्हणून जोरानें आपला हात सोडवून घेऊन महिम त्या धुराच्या लोळांत बाणासारखा घुसला. यदू ओरडत ओरडत त्याच्या मागोमाग धांवला.

हा वेळपर्यंत सुरेश सुन्न झाल्याप्रमाणें पाहात जवळच उभा राहिला होता. एकदम तो भानावर आला आणि आंत जायला पाहूं लागला त्यावेळीं अचलेनें त्याला धरून मागें खेंचून दरडावून म्हटलें, " चाललांत कुठं ? "

हात सोडवायचा प्रयत्न करीत सुरेश म्हणाला, " महिम गेला आहे - "

अचला चिडून म्हणाली, " ते गेले आहेत आपली मालमत्ता वांचवायला. तुम्ही कोण ? तुम्हांला मी मुळींसुद्धां जाऊं द्यायची नाहीं. "

तिच्या आवाजांत स्नेहाचा लवलेश सुद्धां नव्हता—तिनें केवळ निष्कारण जीव धोक्यांत घालणाऱ्या व्यक्तीची कानउघाडणी केली होती.

एकदोन मिनिटांत दोन हातीं दोन पेट्या घेतलेला महिम आणि माथ्यावर भली मोठी ट्रंक घेतलेला यदू असे दोघे बाहेर आले. त्या वस्तू अचलेच्या समोर ठेवून महिम म्हणाला, " ही तुझी दागिन्यांची पेटी—हातसांड करूं नकोस. आम्ही बाहेरच्या खोलींतलं कांहीं काढता येतं का तें पाहातों. "

अचलेच्या तोंडून एक शब्दही बाहेर आला नाहीं. तिनें आपल्या मुठींत सुरेशच्या धोतराचा सोगा धरला होता तो तसाच धरलेला राहिला. महिमनें एक क्षणभरच तिकडे ओझरतें पाहिलें आणि यदूला घेऊन तो पुन्हां दृष्टीआड झाला.

## २०

प्रभातकाळच्या अंधुक प्रकाशांत नवऱ्याच्या चेहऱ्याकडे नजर जातांच अचलेच्या हृदयाचा थरकांप झाला. डोळ्यांतलें पाणी तिला आवरतां येईना. काय झालं हें ! माथ्यावरचे केस धुळीनें, वाळूनें आणि राखेनें विवर्ण झालेले. आगीची झळ लागल्यामुळें त्याचा चेहरा भाजून गेला होता आणि एका रात्रींत तिचा हा एवढा सुन्दर नवरा म्हातारा झाल्यासारखा दिसत होता.

गांवचे लोक चौफेर घिरट्या मारून उगीच गलका करीत होते. तांब्या-पितळेचीं भांडीं सारींच खलास झालीं होतीं. पण शालदुशाला, दागदागिने यांच्यापैकीं काय ती एकच ट्रंक बचावली गेली होती—याच गोष्टीवर सर्वांची कसून चर्चा चालली होती.

थोड्या अंतरावर महिम निवत चाललेल्या आगीकडे शून्य दृष्टीनें पाहात उभा होता. तो सारें कांहीं ऐकत होता, पण या लोकांचें समाधान करण्याइतकी हकिकत सांगण्याच्या मनःस्थितींत तो नव्हता. पलिकडल्या वाडींतील भिखू बांडूर्जा म्हणजे मोठी गण्यमान्य व्यक्ति—वाताच्या विकारामुळें हा वेळपर्यंत ते तिथें येऊन पोंचले नव्हते. काठी टेकीत टेकीत बरेंचसें टोळकें गोळा करून ते येत आहेत असें पाहून महिम त्यांना सामोरा गेला. बराच वेळ चुकचुकल्यावर बांडूर्जा महाशय शेवटीं म्हणाले, "महिम, तुझा बाप स्वर्गवासी झालाय खरा, पण तो अन् मी दोन नव्हतों. दोघे जसे कांहीं हरिहर आत्मे होतों—"

महिमनें त्यांच्या भाषणाला संमति जाणवली. तेव्हां ते म्हणाले, "असं कांहींतरी होईल असं मला काल्च वाटलं होतं." महिम चकीत होऊन जिज्ञासु मुद्रेनें पाहात राहिला होता. त्याच्याच मागें कुंपणाच्या आड अचला सामान-सुमान घेऊन स्तब्ध बसली होती, तिचेही कान तिकडे गेले.

अशा प्रकारें प्रस्तावना करून बांडूर्जा महाशय म्हणाले, "ब्रह्माचा कोप कांहीं उगीचच होत नाहीं बाबा! आम्हांला विचारलं सुद्धां नाहींस—एवढ्या महाब्राह्मणाचा मुलगा तूं, केवढं कुकर्म केलंस सांग पाहूं!" महिमला त्यांच्या भाषणाचा अर्थ कळला नाहीं.

आपल्या भाषणाची शक्य तितकी घालूनपाडून आडवी तिडवी व्याख्या करीत आजुबाजूच्या मंडळीकडे नजर फेंकून ते म्हणाले, "सारेच आम्ही म्हणत होतों, कीं असं कांहीं तरी होणारच. हेंच पाहा, दुसऱ्या कुणावर ब्रह्माची अवकृपा कां झाली नाहीं? बाबारे, हे ब्रह्मलोक म्हणजे किरीस्तांवच. साहेब असले म्हणजे त्यांना किरिस्तांव म्हणतात आणि बंगाली असले म्हणजे त्यांना ब्रह्म म्हणतात. ज्यांना कांहीं शास्त्र म्हणून कळतं त्या आमच्यासारख्या लोकांकडे असल्या गोष्टी छपून राहात नाहींत."

हजर असलेल्या सर्व लोकांनीं जेव्हां या सिद्धांताला अनुमोदन दिलें त्यावेळीं अधिकच उत्साह येऊन ते म्हणाले, “ कांहीं कर बाबा, आधीं प्रायश्चित घे अन् तिला टाकून दे—”

महिम हात वर करून म्हणाला, “ थांबा, मला तुमचा अपमान करायचा नाहीं—पण नसत्या गोष्टी उगीच बोलूं नका. मी जिला घरीं आणली आहे, तिच्या पुण्याईनं घर राहिलं तर फार उत्तम—नाहींतर तें पुन्हां पुन्हां जळलं तरी देखील तें मला पत्करेल. ” असें म्हणून तो तिथून दुसरीकडे गेला. बांडूर्जी महाशय हा असा धक्का मिळाल्यामुळें कांहीं वेळ आ वासून पाहात राहिले आणि नंतर काठी टेकीत टेकीत आपल्या घरीं गेले. जातां जातां मनांतल्या मनांत जें कांहीं ते बोलत होते तें उघड न बोलणेंच बरें.

हीं सारीं भाषणें अचलेल्या कानीं गेलीं होतीं. तिच्या दोन्ही डोळ्यांतून मोठमोठीं आसवें पाझरून खालीं पडत होतीं.

यदू येऊन म्हणाला, “ तुम्हांला विचारून मेणा आणि भोई आणायला मला सांगितलं आहे. आणूं का ? ”

पदरानें डोळे पुसून अचला म्हणाली, “ बाबूंना जरा इकडे बोलावून घे यदू. ”

“ मेणा ?—”

“ सध्यां राहूं दे. ”

महिम समोर येऊन उभा राहातांच तिच्या डोळ्यांना पुन्हां पाणी आलें. एकदम तिनें त्याच्या पायावर लोळण घेतली त्यावेळीं तो आश्चर्यचकित झाला. कदाचित तिनें नवऱ्याला दोन्ही हात धरून जवळ ओढलें असतें. कदाचित आणखी पुढें जाऊन थोडासा पोरकटपणाही केला असता—तिनें काय केलें असतें तें तिचा हृदयस्थ परमेश्वरच जाणे—पण उजाडलें होतें, चौकस माणसें चोहींकडे वावरत होतीं. मन आवरून धरून तिनें विचारलें, “ मेणा कशाला ?”

महिम म्हणाला, “ नवाची गाडी पकडली कीं ती सर्व दृष्टीनं सोईवार होईल. एकाच्या सुमाराला गाडी पोंचेल आणि स्नानभोजन करतां येईल. काल रात्रीं तूं कांहीं खाल्लं नव्हतंस. ”

" आणि तुम्ही ? "

" मी ? " महिम थोडावेळ विचार करून म्हणाला, " माझी होईल सोय इथं कांहीं तरी. "

" तर मग माझीही होईल. मी जाणार नाहीं. "

" न जाऊन काय करणार ? "

अचलेला या प्रश्नाचें उत्तर देतां आलें नाहीं. ' जंगलांत - झाडाखालीं ! ' असें कांहींतरी तिच्या तोंडीं आलें होतें आणि तें तर शक्य नव्हतें. गांवांतल्या कुणाही माणसाच्या घरीं घटकाभर आसरा घेणें हें किती अपमानजनक होतें, याचा चांगलाच अंदाज तिला आत्तांच आला होता. तिला मृणालची आठवण झाली नाहीं असें नाहीं, वारंवार ती आठवण येत होती, पण शरमिंदेपणामुळें मृणालचें नांव उच्चारण्याचा तिला धीर होत नव्हता.

थोडावेळ थांबून ती म्हणाली, " तुम्हींही चला बरोबर. "

महिम आश्चर्यचकीत होऊन म्हणाला, " मी बरोबर येऊं ? त्यांत काय फायदा ? "

अचला म्हणाली, " फायदा नुकसानी पाहायचा भार आजपासून मी घेतें. इथं कुणीच तुम्हांला आपुलकीचं नाहीं तें मला कळून चुकलंय. एका रात्रींत तुमची काय दुर्दशा झाली आहे तें तुम्हांला दिसत नसलं तरी मला दिसतंय. माझ्या गळ्यावर सुरी ठेवली तरी सुद्धां तुम्हाला एकटे टाकून मी इथून जाणार नाहीं. "

महिमच्या मनाची काल्वाकालव सुरू झाली. तरीही तो स्तब्ध राहिला होता.

अचला बोलूं लागली, " एवढी कसली काळजी वाटते तुम्हांला ? माझे दागिने तर आहेत ! ते विकून पश्चिमेकडे कुठंतरी एकादं लहानसं घर आपण सहज विकत घेऊं. आपण कुठंही असलों तरी मला कांहीं तुम्ही उपासपोटीं मारणार नाहीं. तुम्हांला कांहींतरी हातपाय हालवलेच पाहिजेत — म्हणूनच मी म्हटलं यापुढं तुमचा सारा भार माझ्यावर. "

यदू जवळ येऊन म्हणाला, " मेणा आणायला जाऊं का ? "

उत्तरासाठीं अचलेनें उत्सुक नजरेनें नवऱ्याच्या तोंडाकडे पाहिलें. उत्तर दिलें महिमनें. यदूला मेणा आणायचा हुकूम करून तो बायकोला म्हणाला, " इतक्यांत मला कांहीं तिकडे येतां यायचं नाहीं. " तें ऐकून तिला अतिशय आनंद झाला. हृदयांतला आवेग आवरून ती शांतपणें म्हणाली, " इतक्यांत तुम्हांला येतां यायचं नाहीं हें खरं आहे. पण संध्याकाळच्या गाडीनं निश्चित याल ना ? नाहींतर मी जेवण समोर घेऊन बसल्या बसल्या विचार करीन कीं,—"

पण महिमच्या तोंडून निघणाऱ्या मोठ्या सुस्काऱ्यासरशीं तिचें भाषण तिथेंच विरघळलें. ती घाबरली आणि ओशाळून म्हणाली, " त्यावेळींही नाहीं का येतां यायचं ? तर मग या काळोख्या रात्रीं कुणाच्या घरीं—"

बोलतां बोलतां ती मधेंच थांबली. जिच्या घरीं आपला नवरा या रात्रीपुरता राहाणें संभवनीय होतें तिची आठवण येतांच तिची मुद्रा गंभीर झाली. महिमला तिच्या मनाचा ठाव लागला नसावा.

महिमनें विचारलें, " कलकत्त्याला मला कुठं यायला सांगतेयस ? "

अचलेनें चटकन् उत्तर दिलें, " कां ? बाबांकडे ! "

महिमनें मान हलवून म्हटलें, " नाहीं. "

" नाहीं कां ? तें देखील तुमचंच घर नव्हे का ? "

महिम तशीच मान हलवून म्हणाला, " नाहीं. "

अचला म्हणाली, " नाहींतर दोन दिवसापुरते तिथं राहा. आणि मग आपण पश्चिमेला जाऊं. "

" नाहीं. "

एकदां केलेला बेत बदलणें त्याला शक्य नव्हतें हें अचलेला माहित होतें. क्षणभर विचार करून ती म्हणाली, " तर मग आपण इथूनच पश्चिमेकडच्या कुठल्यातरी गांवीं सरळ जाऊं. मी बरोबर असलें कीं आपल्याला त्रास व्हायचा नाहीं. पण हे दागिने विकायला हवे—तें कलकत्त्याशिवाय दुसऱ्या कुठं कसं जमेल ? "

महिम दुसरीकडेच पाहात मुकाट्यानें उभा राहिला होता. अचलेनें अस्वस्थ होऊन विचारलें, " पश्चिमेकडे सुद्धां मोठीं शहरं आहेत. तिथं नाहीं

विकतां यायचे ? माझ्या पेटींत उणेपुरे दोनशें रुपये आहेत. तेवढ्यांत आपला प्रवासखर्च वगैरे नाहीं का भागायचा ? उगीसे राहिलां आहांत ? बोला ना एकदां !”

महिमनें बायकोच्या नजरेला नजर देण्याचें टाळलें, पण उत्तर दिलें. तो म्हणाला, “ तुझे दागिने मला घेतां येत नाहींत अचला. ”

अकस्मात् एकादा धक्का बसल्याप्रमाणें अचला एकदम मागें हटली. ती म्हणाली, “ कां घेतां येत नाहींत तें सांगाल का ?

महिमनें तिच्या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. कांहीं वेळपर्यंत दोघेंही मुकाट्यानें उभीं होतीं.

एकाएकीं अचलेनें एकामागून एक प्रश्न करायला सुरवात केली, “ या जगांत तुम्ही काय एकटेच नवरे आहांत ? वेळप्रसंगीं नाहीं का कुणी घेत ? मग बायकोला दागिने करायचे ते कशासाठीं ? एव्हढी आगींत उडी घेऊन ते दागिने काढायला गेलां होतां कशाला ?—” असें म्हणून तिनें ती टीनची लहान पेटी हातानें उडवून दिली आणि म्हटलें, “ - संकटाच्या वेळीं जर हे कामीं लागायचे नाहींत तर मग हा बोजा उगीच वागवायचा कशाला ? आग अजूनही पेटते आहे. एका लाथेसरशी ही पेटी आगींत उडवून मी निश्चिंत होऊन जातें— तुमच्या काय मनांत असेल तें करा. ” असें म्हणून तिनें पदरानें डोळे झांकून घेतले.

एकदोन मिनिटें थांबून महिम म्हणाला, “ मी सारा विचार करून पाह्यला अचला. मी कुठलंही काम लहरीसरशी करीत नाहीं, तें तुला माहीत आहे. दुसऱ्या कुणी तसं केलं तर तेंही मला नको आहे. तूं आज जें द्यावं म्हणतेस तें स्वतःच्या बळानं दिलं असतंस तर माझ्या सुखाला सीमा राहिली नसती. पण हें मात्र मला घेतां येत नाहीं. मी प्रसंगांत आहें हें पाहून असाच तुझ्यासारखा एक माणूस यापेक्षां कितीतरी जास्त देत होता मला, पण ती जशी दया, हीही तशीच दया ! यामुळं तुझं असो कीं माझं असो, केव्हांही शेवटपर्यंत बरं व्हायचं नाहीं, ही माझी खात्री आहे. ”

अचलेला आतां तें सहन झालें नाहीं. रडें विसरून भांडण करण्यासाठीं ती चिडलेल्या नजरेनें दोन्ही डोळे वर करून पाहूं लागली. त्यावेळीं नवऱ्याच्या नजरेचें अनुकरण करतांना तिला असें दिसून आलें, कीं बऱ्याचशा अंतरावर जें

तळें होतें त्याच्या घाटावरील लिंबाच्या झाडाच्या चौथऱ्यावर सुरेश हातावर डोकें ठेवून आकाशाकडे पाहात आडवा पडून राहिला होता. अचलेच्या तोंडचे शब्द तोंडींच राहिले आणि वर केलेली मान आपोआप खालीं झाली.

पण महिम मात्र कांहींसा श्रमिष्टपणानें आपल्याशींच बोलल्यागत बोलत होता, " नुसतं समाधानच मिळायचं नाहीं एव्हढं नव्हे, तर वारंवार तुला वंचिता करतां येईल अशी कल्पना कधींच माझ्या डोक्यांत आली नव्हती अचला. स्वतः रिकामं होऊन दान करणं मोठं दुःखदायक असतं. लहर आल्याबरोबर एका क्षणांत तसं करतां येतं खरं, पण त्याचं फळ साऱ्या जन्मभर भोगावं लागतं. एकाच चुकीमुळं आज तुला अत्यंत त्रास होतो आहे तें मला माहित आहे. पुन्हां आणखी दुसरी चूक केलीस तर तूं स्वतःलाही क्षमा करणार नाहींस अन् मलाही क्षमा करणार नाहींस. हें नुकसान सहन करण्याचं साधन तुझ्यापाशीं नाहीं, हें तुला आज कळलं नाहीं तरी चार दिवसांनीं कळेल. म्हणूनच तुझ्याकडून मी कांहींही घेणार नाहीं."

तें भाषण अचलेच्या हृदयाला भेदून गेलें. नवऱ्याच्या दृष्टीनें आपण किती परकी झालों आहें तें तिला जेव्हढें आज कळलें तेव्हढें पूर्वी जाणवलें नव्हतें. त्याचवेळीं मृणालची आठवण झाल्यामुळें तिला रागाची उसळी आली. ती कठोर होऊन म्हणाली, " एव्हढा वेळपर्यंत तुम्हीं मला जें समजावूं पाहातां आहांत तें मी केव्हांच समजलें आहे. कदाचित् तुमचंच म्हणणं खरं असेल — कदाचित् तुमच्या तोंडाकडे पाहिल्यामुळं दया येऊन मला सर्वस्व द्यावं असं वाटलं असेल — कदाचित् दोन दिवसांनीं खरोखरच या गोष्टीचा मला पश्चात्ताप होईल. सारं खरं, पण असं पाहा, दुसऱ्याला काय वाटतं हें समजायची जेव्हढी बुद्धि तुम्हांला आहे, तितकीच तुम्हांला तें समजावून द्यायचीही अजून जरूरी आहे. बायकोच्या वस्तू जबरदस्तीनं हिसकावून घेणं तर दूरच राहो, हात पसरून घेण्याचं साधन तरी तुमच्याकडे आहे कुठं ? मी तुमच्याबरोबर वाद घालणार नाहीं. जेव्हढी विवेकबुद्धि तुमच्या ठायीं शिल्लक राहिली आहे तेव्हढंच माझं समाधानाचं साधन आहे. पण कुठंही असलें तरी एका ना एका दिवशीं तुम्हांला सारं कांहीं कळून येईल--येईलच येईल !" असें म्हणून तिनें दोन्ही हातांनीं तोंड दाबून धरून आपलें रडें आवरलें.

नवाच्या गाडीनें सुरेशही गांवीं जाणार होता. गेल्या रात्रीच्या आगीच्या प्रकरणामुळें त्याची वृत्ति चमत्कारिक होऊन गेली होती. कुणाबरोबर कांहीं बोलण्याइतकी ताकद सुद्धां त्याच्या ठायीं राहिली नव्हती. गाडी यायला तेव्हां थोडा वेळ होता. सुरेशनें महिमला स्टेशनच्या एका बाजूला बोलावून घेतलें आणि म्हटलें, " महिम, आगीच्या बाबतींत तुला माझा तर संशय आला नाहीं ? "

सुरेशचे दोन्ही हात घट्ट धरून महिम उद्गारला, " छेः ! "

सुरेशच्या दोन्ही डोळ्यांतून आंसवांच्या धारा लागल्या. गहिवरल्या आवाजानें तो म्हणाला, " कालपासून याच भीतीनं मी तळमळत होतों महिम ! "

कांहीं न बोलतां महिमनें त्याचा हात एकदां दाबला. तो म्हणाला, " सुरेश, एक खरोखरीचा अपराध घडलों, कीं तो अनेक खोट्या अपराधांचा बोजा घेऊन येतो. मनाच्या अस्वस्थपणामुळं तूं कांहीं जरी केलं असलंस, तरी ' क्राइम ' म्हणतात तसली गोष्ट तुझ्या हातून कधींही व्हायची नाहीं याची मलॉं खात्री आहे--" तो जरा थांबून म्हणाला, " तूं ईश्वर मानीत नाहींस सुरेश, पण जो मानतो तो रात्रंदिवस प्रार्थना करतोय, कीं ह्या तुझ्या वृत्तींत फरक न पडो. "

गाडी स्टेशनांत आली. बायकांच्या डब्यांत अचला अन् तिची मोलकरीण यांना बसवून महिम सुरेशकडे आला त्यावेळीं महिमचा हात धरून तो म्हणाला, " काल्चं तुझं नुकसान भरून काढीन म्हटलं, पण तूं माझं ऐकलं नाहींस. पण तुझा ईश्वर तुझी प्रार्थना मंजूर करो भाई ! मला यापेक्षां तो खालीं न ढकलो ! " असें म्हणून त्यानें हात सोडून तोंड फिरवलें.

इकडे खिडकीबाहेर तोंड काढून अचला एव्हढा वेळ यदूबरोबर हळूहळू कांहीं बोलत होती. महिम जवळ आला त्यावेळीं तिनें विचारलें, " मृणाल-आक्काचा नवरा वारला का आज ?

महिम म्हणाला, " एक तासापूर्वीं वारला असं मी ऐकलं. "

अचलेनें विचारलें, " आज दहा बारा दिवस त्याला निमोनिया झाला होता असं वाटतं--ही बातमी मला सुद्धां द्यावी असं कधींच नाहीं का वाटलं ? "

महिम उत्तर देणार होता, पण तो कांहीं वेळ घुटमळला आणि तितक्यांत शिटी फुंकून गाडी चालू झाली.

## २१

अजूनही केदारबाबूंची प्रकृति पूर्वीसारखी झाली नव्हती. जेवणखाण झाल्यावर बाहेरच्या ओटीवर हातीं वर्तमानपत्रें घेऊन वाचीत तें एका इझीचेअरवर पडले होते. तितक्यांत त्यांच्या डोळ्यावर झांपड आली. दारासमोर गाडीचा आवाज ऐकतांच त्यांनीं डोळे उघडून पाहिलें तों सुरेश आणि त्याच्याच बरोबर त्यांची मुलगी आणि मोलकरीण खालीं उतरली. त्यांच्या डोळ्यावरची झांपड एकदम उडून गेली. भलतीच शंका मनांत येऊन ते घाबऱ्याघुबऱ्या मोठ्यानें ओरडून म्हणाले, "अचला कीं काय ? सुरेश, तूं कुठून आलास ? काय भानगड आहे ही ? कांहींच समजत नाहीं मला !"

अचला आली आणि तिनें बापाला नमस्कार केला. सुरेश त्यांना नमस्कार करून म्हणाला, "महिमची तार मिळाली नाहीं ?"

केदारबाबू उद्विग्नपणें म्हणाले, "कां ? नाहीं !"

सुरेश एक खुर्ची ओढून घेऊन बसला आणि म्हणाला, "तर मग तो तार करायला विसरला तरी, किंवा तारच मुळीं पोंचली नाहीं अजून."

केदारबाबू म्हणाले, "तार सध्यां राहूं दे. हें काय प्रकरण आहे तें आधीं मला सांग. यांना कुठनं घेऊन आलास तूं ?"

सुरेश म्हणाला, "काल रात्रीं आग लागून महिमचं घर जळून गेलं."

"घर जळून गेलं ? सत्यानाश ! म्हणतोस काय--घर जळून गेलं ? कसं जळून गेलं ? महिम कुठं आहे ? ही कुठं भेटली तुला ?" एका दमांत एव्हढे प्रश्न केल्यामुळें केदारबाबू थकून धप्कन इझीचेअरवर बसले.

सुरेश म्हणाला, "तिथूनच घेऊन आलों मी यांना. मी तिथंच होतों ना !"

केदारबाबूंच्या मुद्रेवर त्यांची नाराजी दिसली. तरीही ते गंभीर होऊन म्हणाले, "तूं होतास तिथं ? कधीं गेला होतास ? मला तर कांहीं कळलं नाहीं ! अन् तो कुठं आहे ?"

सुरेश म्हणाला, "महिमला येणं शक्य नाहीं, म्हणून – "

त्यांच्या गंभीर मुद्रेवर एकदम काळोखी आली. माथें हलवून ते म्हणाले, "नाहीं, नाहीं. हें लक्षण बरं नव्हे. फारच वाईट गोष्ट झाली ही. अगदीं मोठ्यांतली मोठी चूक झाली ही. मी असलं कांहीं केव्हांही—" बोलतां बोलतां त्यांनीं वळून मुलीच्या तोंडाकडे पाहिलें.

अचला एव्हढा वेळ खुर्चीच्या पाठीवर हात ठेवून मुकाट्यानें उभी होती. बापाचा हा संशय तिच्या मर्माला झोंबला. तिच्या या आकस्मिक येण्याच्या कारणावर त्यांचा मुळींच विश्वास बसला नाहीं, हें अगदीं स्पष्टपणें दिसून आल्यामुळें शरमेनें तिचा चेहरा गोरामोरा झाला.

केदारबाबूंनीं इथेंच चूक केली. मुलीच्या मुद्रेकडे नजर गेल्यामुळेंच त्यांचा संशय जास्त दृढ झाला. आरामखुर्चीवर मागें पडून हातांतलें वर्तमानपत्र तोंडावर टाकून त्यांनीं एक भला मोठा निश्वास सोडला आणि म्हटलें, "तुम्हांला जें बरं वाटतं तें तुम्ही करा. मी उद्यां घर सोडून कुठं तरी काळ करतों."

सुरेश रागारागानें म्हणाला, "हें तुम्ही काय म्हणतां आहां केदारबाबू ? असं काय झालंय म्हणून तुम्ही घर सोडून जाणार आहांत ?" असें म्हणून त्यानें एका अचलेकडे आणि एकदां तिच्या बापाकडे पाहाण्याचा प्रयत्न केला पण कुणाचाच चेहरा त्याला दिसून आला नाहीं.

केदारबाबूंकडून कांहीं उत्तर येत नाहीं असें पाहून तो उठून उभा राहिला आणि म्हणाला, "चला—महिमनं जें काम सांगितलं होतं तें मी उरकलं. आतां तुम्हांला जें काय करायचं असेल तें करा. माझं जेवणखाण अजून व्हायचंय. मी घरीं चाललों."

तो दाराकडे वळला आणि कांहीं पावलें चालून जातो तोंच—केदारबाबू उठून बसून थकलेल्या आवाजानें म्हणाले. "छेः छेः ! आतां काय कपाळ ! काय झालं तें मला कळलं सुद्धां नाहीं. आग कशी लागली ?"

सुरेश रागारागानें म्हणाला, "मला नाहीं माहीत !"

"तूं गेलास केव्हां तिकडे ?"

"चार पांच दिवसांपूर्वीं ! मी अजून जेवलों नाहीं. आतां थांबतां येत

नाहीं मला—" असें म्हणून तो पुन्हां चालूं लागतांच केदारबाबू म्हणाले, " वा वा ! कुणाचींच न्हाणींजेवणीं झालीं नाहींशीं दिसतात. तुम्ही काय जंगलांत पडलां नाहीं सारे ! हेंही घर आहे. इथंही चाकरनोकर आहेत - अचला, त्या गड्याला हांक मार ना—उभी काय राहिली आहेस ! थांब थांब सुरेश, काय झालं तें एकदां मला सविस्तर सांग पाहूं ! "

सुरेश परत येऊन बसला. एक श्वास घेऊन तो म्हणाला, " रात्रीं झोंपलों होतों. महिमच्या आरडाओरडीमुळें खोलींतून बाहेर पडलों. पाहातों तों सारं धो धो करून जळत होतं. केंवळ्याचं घर—-विझवायची सोयच नव्हती—ती खटपटही कुणी केली नाहीं—सर्वस्व जळून भस्म झालं. "

केदारबाबू ताड्कन उठून म्हणाले, " म्हणतोस काय ! सर्वस्व जळून गेलं ? कांहीं सुद्धां निघालं नाहीं बाहेर ? अचलेचे दागिनेबिगिने ? "

" तेव्हढे मात्र बचावले ! "

" एव्हढं तरी एक बरं झालं ! " असें म्हणून एक मोठा सुस्कारा सोडून ते पुन्हां खुर्चीवर बसले.

कांहीं वेळ तसेंच स्तब्धपणें बसून घेतल्यावर त्यांनीं विचारलें. " तर मग ही आग लागली कशी ? "

सुरेश म्हणाला, " सांगितलं ना तुम्हांला, कीं ते कांहींच कळलं नाहीं अजून. तरी पण गांवांत त्याचे बरेमागते कुणीच नाहींत एवढं मात्र कळलंय मला. "

" कुणीच नाहींत का ? "

" नाहीं. "

केदारबाबू यावर कांहीं बोलले नाहींत. कितीतरी वेळ ते मुकाट्यानें बाहेर पाहात राहिले होते. शेवटीं आणखी एकदां एक मोठा सुस्कारा सोडून ते उठून उभे राहिले आणि म्हणाले, " जा आतां स्नान करून ये पाहूं सुरेश. उगीच उशीर लावूं नकोस. सैंपाकाची काय तजवीज होते तें आधीं पाहूं. " असें म्हणून ते त्याला बरोबर घेऊन बाहेर गेले.

जेवण झाल्यावर देखील त्यांनीं सुरेशला सोडलें नाहीं. तो एका आराम-खुर्चीत अर्धवट झोपेंत पडला होता. आंघोळ करून अचला जी आपल्या

खोलींत गेली ती बाहेर आली नाहीं. तिनें आंतून खीळ लावून घेतली होती. आंतून कसलाच आवाज येत नव्हता.

समाधान वाटत नव्हतें काय तें केवळ एका केदारबाबूंना. आतां तार आली किंवा न आली तरी तिचा कांहीं उपयोग नव्हता. तरीही तारेसाठीं उगीच इकडून तिकडे चौकशी करीत, संध्याकाळचें वेळींअवेळीं झोपणें बरें नव्हे वगैरे मुलीला सांगून पाठवून तिला हांक मारीत, ते उगीच गडबड करीत होते. पहिल्यानेंच ते म्हणाले, "तुम्हीं लोकांनीं सांगितलं कीं त्यानं तार केलीय—कां!—अजून तार कशी आली नाहीं? तुम्ही आगगाडींतून येऊन सुद्धां पोचलां आणि अजून तारेचा पत्ताच नाहीं. बरं, जरा थांब तर—"

तरीही मुलीच्या तोंडून आंतून कांहींच उत्तर येत नाहीं असें पाहून पायांतले चढाव फटफट करीत ते घाईनें बाहेर निघून गेले.

कांहीं वेळानें त्यांच्या बोलण्याचा चढा आवाज खालून ऐकूं येऊं लागला होता. अचलेच्या मोलकरणीला दटावून ते आडवेतिडवे प्रश्न वचारून तिला छेडीत होते. त्यांच्या प्रश्नाचें तिला आश्चर्य वाटत होतें. त्यांना पदोपदीं अडवून ती सांगत होती, "हें काय बाबू, आग लागून सारं घरदार जळून खाक झालं तें प्रत्यक्ष माझ्या डोळ्यांनीं मी पाहिलं, अन् तुम्हीं म्हणतां आग लागली नाहीं! अन् आग जर लागली नाहीं तर मग घर जळून खाक झालं कसं? एकदां तुम्हीच विचार करून पाहा ना!"

सुरेश सारें कांहीं ऐकत होता. वर मान करून त्यानें पाहिलें. अचला दाराला धरून उभी होती. तिचा चेहरा उतरला होता. प्रत्येक शब्द ती ऐकून घेत होती. तो तोंड वेंगाडून म्हणाला, "तुझ्या बाबांना झालंय तरी काय? सांग ना!"

अचलेनें दचकून मागें वळून पाहिलें आणि म्हटलें, "नाहीं. कांहीं नाहीं."

सुरेश म्हणाला, "अगदीं खात्रीनं सांगतों, त्यांना तें खरंच वाटत नाहीं. त्यांना वाटतंय आग लागायची गोष्ट अथपासून इतीपर्यंत बनावट. खरं खोटं एके दिवशीं त्यांना कळून येईलच. पण त्यांचा संशय एव्हढा बळकट आहे, कीं यापुढं मी इथं येणं अशक्य होऊन गेलंय."

अचलेचा चेहरा एकदम उतरला. तिनें विचारलें, "तुम्ही आतां येणारच नाहीं का ?"

सुरेश उठून उभा राहिला आणि म्हणाला, "शक्य नाहींसं वाटतं ! मला कांहींतरी स्वाभिमान म्हणून आहे ना ? कुणातरी माणसाकरवीं माझी बॅग तेव्हढी घरीं पोंचती करा."

अचलेनें म्हटलें, "बरं आहे—" पण त्याच्या येण्या न येण्यासंबंधीं ती अधिक कांहींच बोलली नाहीं.

"तर मग उद्यां सकाळींच पाठवा. माझ्या जरूरीच्या जिनसा त्यांत आहेत." असें म्हणून केदारबाबूंची वाट न पाहतां तो बाहेर निघून गेला.

केदारबाबू परत आले तेव्हां जरा आश्चर्यचकित झाले खरे, पण ते नाराज झाले असें कांहीं दिसून आलें नाहीं.

रात्रीं बराच वेळपर्यंत अचला बिछान्यावर तडफडत पडली होती ती उठली. बाहेर गच्चींत जाऊन उभें राहावें, समोरच्या राजरस्त्यावर चाललेली माणसांची रहदारी पाहात पाहात सारें कांहीं विसरून जावें, असें तिच्या मनांत आलें होतें.

आपल्या खोलीचें दुसऱ्या बाजूचें दार उघडून ती गच्चींत आली त्यावेळीं बैठकीच्या खोलींत अजूनही दिवा पेटत असल्याचें तिला दिसून आलें. पहिल्यानें तिला वाटलें, कीं गॅस बंद करायला नोकर विसरला असावा; पण कांहीं पावलें पुढें गेल्यावर तिला जेव्हां आपल्या बापाचा आवाज ऐकूं आला तेव्हां तिच्या आश्चर्याला सीमा राहिली नाहीं. रोज ते दहा वाजतात न वाजतात तोंच बिछान्यावर पडत असत. पण आज आतां साडेदहा वाजून गेले होते.

तितक्यांत तिला आपल्या बरोबर गेलेल्या बाईचा आवाज ऐकूं आला. ती सांगत होती, "—आतां तिचा नवरा वारला. यापुढं मृणालआक्का सासरीं राहील असं मला कांहीं वाटत नाहीं. आजोबा-नातीचं जें नातं जांवईबाबूंबरोबर ती लावते त्याचा अर्थ त्यांनाच माहीत !—"

केदारबाबू नुसते हूं म्हणून उगी राहिले. अचलेला कळून चुकलें, कीं यापूर्वींच पुष्कळसें बोलणें होऊन गेलेलें असावें. मृणालच्या बाबतींत, महिमच्या बाबतींत, खुद्द तिच्या बाबतींत सुद्धां बोलायचें कांहीं राहिलें नसावें. आपल्याच

बाबतींत अगदीं अप्रिय असलेल्या गोष्टी आपल्याला ऐकाव्या लागतील या भीतीनें, जशी ती मुकाट्यानें आली तशी ती चोरट्या पावलानें जायला निघाली होती, पण कांहीं केल्या तिचे पाय तिथून हालेनात. लोखंडी सांखळीनें बांधून टाकल्याप्रमाणें ते त्याच जागीं खिळून राहिले.

थोड्या वेळानें केदारबाबूंनी विचारलें, " तर मग दोघांचं एकंदरींत जमलं नाहीं म्हणायचं—होय ना ? "

ती बाई म्हणाली, " मुळींच नाहीं बाबू, मुळींच नाहीं !—एक दिवस सुद्धां नाहीं. "

आजवर ही बाई अगदींच भोळी आहे असें अचलेला वाटलें होतें. पण बुद्धीच्या दृष्टीनें ती कुणापेक्षांहि कमी नव्हती असें आज तिला दिसून आलें.

केदारबाबू विचारीत होते, " तर मग काल रात्रीं कुणाचींच जेवणें झालीं नाहींत होय ? सुरेश जाईपर्यंत सारा दिवस दोघांच्या झगड्यांतच दिवस गेला म्हणतेस ? "

तिचें उत्तर ऐकूं आलें नाहीं, तरीही बापाच्या तोंडच्या प्रश्नावरून तिनें मानेनेंच उत्तर दिलें असावें असा अचलेनें अंदाज केला. कारण लगेच केदारबाबूंनीं एक मोठा सुस्कारा सोडून म्हटलें, " एक दिवस असं कांहीं तरी होणार हें मी पूर्वीपासूनच म्हणत होतों. आजकालचीं मुलं आईबापांचं सांगणं मुळीं हिशेबांतच घेत नाहींत—नाहींतर मी सारं कांहीं एकप्रकारें आधींच ठरवून टाकलं होतं. तसं झालं असतं तर आज तिला कसली ददात उरणार होती ? —" असें म्हणून त्यांनीं जो एक मोठा सुस्कारा सोडला तोही तिला स्पष्टपणें ऐकूं आला.

मोलकरीण पूर्ण सहानुभूति दाखवून त्यांच्या बोलण्याला साथ देऊन म्हणाली, " तेंच म्हणतें मी बाबू, आज कसली ददात होती मग ? कुठल्यातरी एका खबदडीच्या गांवचं टीचभर उंचीचं कैंबळ्याचं घर ! तें तरी आतां कुठं राहिलंय ! आणि जांवईबाबू तर—" असें म्हणून वाक्य पुरें करण्याच्या ऐवजीं एक मोठा सुस्कारा सोडून तिनें आपल्या उद्गारांची कमाल करून सोडली.

" नशिब ! " असें म्हणून केदारबाबू उठून उभे राहिले आणि म्हणाले, " बरं, तूं जा आतां. "

तिला निरोप देऊन दिवा मालवण्यासाठीं ते गड्याला हांका मारूं लागले.

अचला चोरट्या पावलांनीं हळुहळू येऊन आपल्या खोलींत बिछान्यावर पडली. आपल्या बापाच्या सभ्यतेच्या घोरणाच्या बाबतींत यापूर्वीं सुद्धां तिला फारसा आदर नव्हता. पण घरच्या मोलकरणीला बोलावून तिच्याबरोबर अशा प्रकारची चर्चा करण्याइतकी क्षुद्र वृत्ति ते दाखवतील असें तिला केव्हांच वाटलें नव्हतें.

आज तिचें स्वतःचेंच अंतःकरण क्षुद्र बनून जमिनदोस्त झालें होतें. तिचा नवरा, तिचा बाप, तिची मोलकरीण, तिचा मित्र—सारेच ज्यावेळीं असे जमिनदोस्त झाले होते त्यावेळीं कुणाचा आधार धरून या धुळींत पडलेल्या जिवाला वर उचलून उभें करावें, हेंच तिला सुचेनासें झालें.

## २२

केदारबाबू म्हणजे जगाच्या व्यवहारांत वावरणाऱ्या इतर चार माणसांसारखा एक गृहस्थ होता. त्यांच्याचसारखे त्यांचे गुणदोष होते. मुलीचें लग्न करून द्यायचें म्हणजे चांगली परीक्षा दिलेला, सुखवस्तु असलेला असा मुलगा मिळाला कीं झालं, अशीच त्यांची कल्पना होती. महिम सुस्वभावी होता, एम्. ए. झालेला होता, गांवीं अन्नवस्त्र मिळण्याइतकी त्याची परिस्थिती होती, अर्थात् त्यांच्या दृष्टीनें हें स्थळ मुलीला योग्य असें होतें.

पण अकस्मात् एक घटना घडून आली—त्याचाच श्रीमन्त मित्र सुरेश गाडींत बसून त्यांच्या घरीं आला, महिमबद्दल त्यानें उलटी बातमी दिली आणि जांवईगिरीचा उमेदवार या नात्यानें तो स्वतःच जेव्हां उभा राहिला, त्यावेळीं त्या दोन्ही मित्रांच्या आर्थिक परिस्थितीची हिशेबी तुलना करून महिमला बाद द्यावें असें केदारबाबूंना वाटूं लागलें.

प्रेमाच्या सूक्ष्म तत्त्वांची त्यांना फारशी चाड नव्हती. बायकांच्या जातीला गाडीघोडा, मेणा बसायला मिळाला, भरपूर दागदागिने घालून चारचौघांत श्रीमंती मिरवतां आली कीं झालें—अशी परिस्थिती आणून देणारा नवरा मिळाला कीं झालें, एव्हढाच त्यांचा या बाबतींतला आराखडा होता. अर्थात्

मुलीला सुखी करणें हें जें बापाचें कर्तव्य त्या दृष्टीनें आलेला हा अयाचित सुयोग हातसांड करणें योग्य नव्हे हें ठरवायला त्यांना फारसा विचार करावा लागला नव्हता.

आणखी असेंही झालें होतें, कीं हा बडा माणूस आपला जावई होईल या अपेक्षेनें लग्नापूर्वींच त्याच्याकडून पांच हजार रुपयांचें कर्ज काढायलासुद्धां त्यांना कांहीं वाटलें नव्हतें. पुढें घरादाराचा मालक तो जावईच होणार असल्या- मुळें हें कर्ज फेडण्याची जबाबदारी देखील त्यांना फारशी जाणवत नव्हती.

पण या दळभद्र्या पोरीनें या साऱ्या योजनेवर पाणी ओतलें आणि आपलाच हट्ट चालवला. शेवटीं महिमलाच आपली मुलगी द्यावी लागल्यामुळें त्यांच्या अंगाचा जळफळाट झाला होता. शिवाय आतां सुरेशकडून काढलेल्या कर्जाची फेड करण्याची आवश्यकता उत्पन्न झाली होती ती वेगळीच. या बाबतींत कोणत्याही प्रकारचा लेखी दस्तऐवज झालेला नसल्यामुळें कर्जफेडीचा मार्ग तितकासा अडचणीचा नाहीं अशीही त्यांनीं आपल्या मनाची समजूत करून घेतली होती. तो प्रश्न मनांत आला तरीही त्याचें उत्तर तितकेंच अंधुक होतें असें त्यांना वाटलें.

अचला सासरीं निघून गेली. त्यानंतर सुरेशचें येणेंजाणें पूर्वीच्या इतकेंच चालू राहावें असें केदारबाबूंना वाटत नव्हतें. तो आला तर आपण घरीं नाहीं असें सांगून त्याला भेटायचें ते चुकवीत होते—तरीही त्याच्याबद्दल त्यांना जो ओढा वाटत होता तो कमी झाला नव्हता. मुलीच्या या अव्यवहारी वर्तनामुळें सुरेश आपल्याला दुरावला, हीच गोष्ट त्यांच्या मनाला फार लागून राहिली होती.

अशा प्रकारें कांहीं दिवस गेले. तितक्यांत ते एकदम फार आजारी पडले. सुरेश आला आणि त्या आजारांत त्यांची सेवाशुश्रुषा करूं लागला. पोटच्या पोरापेक्षांही जास्त कळकळीनें त्यांची काळजी घेऊन त्यानें त्यांना बरें केलें.

कर्जाबद्दल ज्यावेळीं त्यांनीं सुरेशकडे उल्लेख केला त्यावेळीं सुरेशनें मित्राला दिलेली ती भेट आहे असें म्हणून हंसवून उडवून नेलें. त्या दिवसापासून या तरुणावर त्यांचें मन दिवसेंदिवस अधिकाधिक आकर्षित होऊं लागलें होतें—तें इतकें, कीं त्यांना वाटे, कीं आपल्या मुलीनें हातीं आलेलें हें रत्न उपेक्षेनें

भिरकावून दिलें याचें फळ तिला एके दिवशीं भोगावें लागेल, असा प्रत्यक्ष मुलीला शाप द्यायलाही त्यांना संकोच वाटत नव्हता.

या सर्व परिस्थितीमुळें महिम त्यांना नकोसा झालाच होता. तरीही पत्नी धर्मावर पाणी सोडून पतित्यागाच्या भयंकर पापाचा बोजा माथीं घेऊन आपली मुलगी परत आपल्या घरीं येईल असें मात्र केव्हांही त्यांना वाटलें नव्हतें. या महापातकाला ज्या व्यक्तीनें मदत केली, ती व्यक्ति कितीही कां मोठी असेना, बापाच्या नात्यानें त्या व्यक्तीबद्दल कोणत्या प्रकारची भावना त्यांच्या मनांत उत्पन्न झाली असेल याचा अंदाज करणें कठीण नाहीं.

दुसऱ्या दृष्टीनें मुलीचें मन बापाच्या बाबतींत आतां बदलून गेलें होतें. केवळ पैशाच्या लोभानें महिमला दूर लोटून तिला सुरेशच्या हातीं द्यायला ते तयार झाले, फेड करण्याची कोणत्याही प्रकारची परिस्थिती नसतांना सुरेशकडून त्यांनीं कर्ज घेतलें, त्या दिवसापासून माणुसकीच्या हिशेबानें केदारबाबू हे अचलेच्या दृष्टीनें अगदीं खालावले गेले होते. ती अश्रद्धा शंभर पटीनें वाढली असेल तर ती गेल्या रात्रीं. आपल्या मुलीच्या बाबतींतल्या नाजुक गोष्टी बाहेर काढून घेण्यासाठीं मोलकरणीशीं कानगोष्टी करण्याइतका अधःपात झाल्याचें जेव्हां तिनें स्वतःच्या कानानें ऐकिलें तेव्हांपासून बापाबद्दलचा तिचा सर्व आदर पार नाहींसा झाला.

पण त्याच वेळीं अचलेची नजर स्वतःकडे गेली. ज्या क्षणाला ती स्वतःच्या तोंडानें नवऱ्याला बोलली, कीं त्याच्यावर आपलें प्रेम नाहीं, त्याच क्षणाला या जगांतील स्त्रीत्वाची सर्वोत्तम मर्यादा ओलांडली गेली आणि त्यामुळें आपलाही अधःपात झाला, हें ध्यानीं येऊन तिच्या अंगावर शहारे उभे राहिले.

नवऱ्याच्या दृष्टीनें आज तिची किंमत राहिली नव्हती — बापाच्या दृष्टीनेंही तेंच — मोलकरणीच्या दृष्टीनेंही तेंच, — एवढेंच काय, पण सुरेशसारख्या माणसाला सुद्धां आपण एक 'वैषयिकतेची सोबतीण' वाटण्याइतका आपला दर्जा कमी झाला, हेंही तिला जाणवूं लागलें.

पण खरोखर तें तसेंच का होतें ? इतकी का ती क्षुद्र होती ? आपलें प्रेम सर्वजयी व्हावें म्हणून सारा विरोध, सारी लालुच दूर सारून तिनें जी तत्त्वनिष्ठा दाखवली होती, खंबीरपणा दाखवला होता, आज तो कुणाच्याच का खिजगणतींत नव्हता ?

आपल्या नवऱ्यानें सुरेशबरोबर आपली पाठवणी केल्यानंतर कोणत्याही प्रकारें आपली चौकशी केली नाहीं, या त्याच्या औदासिन्यामुळें झालेल्या अपमानाच्या जाणीवेमुळें सारी रात्र ती सारखी धुमसत राहिली होती.

सकाळीं जेव्हां ती जागी झाली त्यावेळीं दिवस बराच वर आला होता. सूर्याचे कोवळे किरण उघड्या खिडकींतून येऊन जमिनीवर विखुरले होते. ती बिछान्यावर उठून बसली आणि उशाकडील खिडकी उघडून बाहेर रस्त्याकडे पाहात राहिली.

कलकत्त्याच्या राजरस्त्यावरील रहदारीला खळ नव्हता. कुणी कामाला जात होते, कुणी कामावरून घरीं परत येत होते, कुणी सकाळच्या हवेंत सहल करीत सूर्याचीं कोवळीं किरणें अंगावर घेत उगीच फिरायला निघाले होते— पाहातां पाहातां तिला एकदम वाटलें, कीं यावेळीं कुणीच आपल्या घरीं बसून राहिलेलें नव्हतें. मग आपणच असा कोणता भयंकर अपराध केला आहे, कीं बाहेर तोंड दाखवायची लाज वाटून स्वतःला असें घरांत कोंडून घ्यावें ? कांहीं अपराधच जर घडला असेल तर तो त्यांच्यापाशीं —त्याची शिक्षा त्यांनीं द्यावी, पण कोणत्याही प्रकारची चौकशी न करतां जर कुणी शिक्षा द्यायला सरसावला तर काय म्हणून आपण त्याच्यासमोर मान झुकवावी ?

अचला एकदम उठून उभी राहिली. आलेली ग्लानी तिनें झाडून झटकून फेकून दिली. हाततोंड धुवून, कपडे बदलून ती आपल्या बैठकखान्यांत आली.

केदारबाबू आपल्या आरामखुर्चींत पडून वर्तमानपत्र वाचीत होते. एकदांच वर नजर करून पाहून घेतल्यावर त्यांनीं पुन्हां वाचण्याकडे लक्ष दिलें.

थोड्या वेळानें घरचा गडी किटलींतून गरम पाणी, चहाचा सरंजाम आणून टेबलावर ठेवून गेला. केदारबाबूंनीं स्वतः उठून आपल्यासाठीं एक कप चहा तयार केला आणि तो पेला हातीं घेऊन ते पुन्हां आपल्या आरामखुर्चींत वर्तमानपत्र वाचीत बसले.

अचला खालच्या मानेनें आपल्या बापाची सारी हालचाल लक्षपूर्वक पाहात होती. त्यांच्या हातचा पेला काढून घेऊन स्वतः त्यांना चहा तयार करून द्यावा, किंवा त्यांनी तसें विचारावें म्हणून तिला धीर झाला नाहीं. तसेंच कांहीं विचारण्याची जिज्ञासाही तिला झाली नाहीं.

लाकडी पुतळीप्रमाणें तोंडाला कुलूप घालून त्या जागीं स्वस्थ बसून राहणें तिला अशक्य झालें. अशा परिस्थितींत ह्या घरांत फार दिवसपर्यंत आपण एकत्र राहाणें शक्य आहे काय, योग्य आहे काय, — आणि योग्य नसलें तर पुढें काय करावें, या तिच्यापुढें पडलेल्या पेंचाचा विचार करण्यासाठीं कुठेंतरी एकांतांत जाऊन बसावें अशा विचारानें ती उठत होती तोंच एकदम तिची नजर समोर गेली—तिला आश्चर्य वाटलें तितकेंच तें दुःसहही झालें—तिनें पाहिलें, सुरेश आंत येत होता.

सुरेशनें हात जोडून केदारबाबूंना नमस्कार केला. त्यांनीं क्षणभर वर पाहून नुसती मान हालवून पुन्हां वाचायला सुरवात केली.

स्वतःच एक खुर्ची ओढून घेऊन सुरेश बसला. चहाचा सरंजाम घेऊन जाण्यासाठीं गडी तितक्यांत आंत आला. त्याला उद्देशून तो म्हणाला, " माझी बॅग कुठं आहे ती पाहा आणि माझ्या गाडींत ठेवून दे पाहूं. शेव्ह करायचं सामान सुद्धां त्यांत आहे. जरा घाई कर, मला आत्तांच जायचं आहे. "

गडी निघून गेला तेव्हां त्या बैठकखान्यांत कांहीं वेळपर्यंत सर्वत्र स्तब्धता पसरली होती. थोड्या वेळानें सुरेशनें एकदम विचारलें, " महिमची कांहीं खबर कळली का ? "

केदारबाबूंनीं वर पाहिलें नाहीं, नुसतें ' नाहीं ' म्हणून म्हटलें.

सुरेश म्हणाला, " आश्चर्य आहे ! "

पुन्हां कांहीं वेळपर्यंत सर्वत्र चुपचाप झालें होतें. गड्यानें येऊन बॅग गाडींत नेऊन ठेवल्याची खबर दिली.

" तर मग मी आतां जातों. महिमचं पत्र आलं तर तेव्हढं मला कळवा. " असें म्हणून सुरेश जायला निघत होता तोंच केदारबाबू हातचें वर्तमानपत्र जमिनी-वर फेकून एकदम म्हणाले, " थोडा वेळ वाट पाहा सुरेश — मी आत्तांच येतों ! "

त्याच्या तोंडाकडे नजर सुद्धां न फेकतां ते तडतड घाईघाईनें आंत निघून गेले. हा वेळपर्यंत अचला मान खालीं घालून बसली होती. ते निघून गेल्या-बरोबर सुरेशची नजर एकदम अचलेकडे वळली. तिचा चेहरा उतरला होता,

डोळे काळवंडले होते, मुद्रा गांजल्यासारखी दिसत होती, तें पाहून त्यानें विचारलें, " काय भानगड आहे ? "

अचलेनें मान खालीं घालून नुसतें नकारार्थी मस्तक हालवलें.

सुरेश म्हणाला, " मला किती दुःख झालं आहे, किती शरम वाटतेय, तें मला बोलून सांगतां येत नाहीं. "

अचला मान खालीं घालून तशीच बसून राहिली होती.

तो पुन्हां म्हणाला, " तुझे बाबा मला एवढा हीन, एवढा मोठा दांभिक म्हणून समजतील, असं मला स्वप्नांत सुद्धां वाटलं नसतं. "

या तक्रारीचेंही अचलेनें कांहीं उत्तर दिलं नाहीं. ती तशीच स्तब्ध बसून राहिली होती.

सुरेश म्हणाला, " मला यावेळीं असं वाटतंय, अस्सं महिमकडे जावं अन् त्याला –"

त्याचें वाक्य पुरें झालें नाहीं. केदारबाबू परत आले. त्यांच्या हातीं एक लहानसा कागद होता. तो सुरेशच्या समोर टेबलावर ठेवून देऊन ते म्हणाले, " सही शिक्का करून तुमच्या त्या रकमेची पावती द्यायचं अजून राहिलं होतं. पांच हजार रुपयांची ही वचनचिठ्ठी लिहून दिली आहे. व्याज मला देतां येईलसं वाटत नाहीं. निदान हें घर तरी आहे, यांतून मुदलाची फेड सहज होईल. "

सुरेश स्तंभित होऊन क्षणभर उभा राहिला होता. तो म्हणाला, " मी तुमच्याकडून कांहीं वचनचिठ्ठी करून मागितली नव्हती केदारबाबू ! "

केदारबाबू म्हणाले, " तुम्ही मागितली नाहीं खरी, पण ती देणं माझं कर्तव्य आहे. इतके दिवस दिली नाहीं हीच माझी मोठ्यांतली मोठी चूक झाली आहे. तो कागद खिशांत ठेवून दे सुरेश. मी झालोंय म्हातारा, फट्कन मेलों तर पैशाच्या बाबतींत घोळ व्हायला नको.

सुरेश हृदय भरून येऊन म्हणाला, " सुरेश इतर कांहीं करो, पण पैशाच्या बाबतींत तो केव्हांही कुणाबरोबर घोळ घालीत बसणार नाहीं. शिवाय तें असं आहे, तुम्हांला चांगलंच माहीत आहे तें, हे पैसे मला परत नको आहेत—ती मित्राला दिलेली भेट आहे. "

केदारबाबू म्हणाले, " तर मग ती तुझ्या मित्रालाच दे—मला नको. मी जें घेतलं आहे तें कर्ज म्हणून घेतलं आहे. "

सुरेश म्हणाला, " ठीक आहे. माझ्या मित्रालाच देतों ! " असें म्हणून त्यानें टेबलावरचा कागद उचलून घेतला आणि दोन पावलें मागें हटून तो अचलेच्या समोर उभा राहात आहे तोंच केदारबाबू आग लागल्यासारखे भडकून ओरडून म्हणले, " खबदार सुरेश ! कालपासून मी झाले ते सारे अपमान मुकाट्यानं सहन केले, पण माझ्या नजरेसमोर माझ्या मुलीला तुम्हीं पैसे द्यावे हें मात्र मी कांहीं केल्या सहन करणार नाहीं ! " असें म्हणून थरथर कांपत ते आपल्या आरामखुर्चींत जाऊन धपकन् पडले.

पहिल्यानें सुरेश जरासा चमकला आणि कांहीं वेळ केदारबाबूंकडे सारखी टक लावून पाहात राहिला. ते अशा रीतीनें खुर्चींत पडले त्यावेळीं त्याचा चेहरा उतरला होता. त्यानें तोंड फिरवून अचलेकडे पाहिलें, तों ती एका क्षणांत दगडी पुतळीसारखी निश्चल झाली असल्याचें त्याला दिसून आलें.

कांहींतरी बोलावें म्हणून त्यानें शक्य तेव्हढा प्रयत्न करून पाहिला, पण त्याचा घसा इतका कोरडा पडला होता, कीं त्यांतून कसला तरी अस्पष्ट आवाज निघण्यापलिकडे दुसरा एकही शब्द बाहेर आला नाहीं.

त्यानें पुन्हां मागें वळून पाहिलें, केदारबाबू दोन्ही हातांनीं तोंड झांकून घेऊन तसेच पडून राहिले होते. यानंतर कोणत्याही प्रकारें बोलण्याचा त्यानें प्रयत्न केला नाहीं. भ्रमिष्ट झाल्याप्रमाणें तो क्षणभर ताठरून उभा राहिला होता, शेवटीं कांहींसुद्धां न बोलतां तो मुकाट्यानें बाहेर निघून गेला.

तो निघून गेला तरीही मुलगी आणि बाप तशींच बसून राहिलीं होतीं. भिंतीवरच्या घड्याळांत होणाऱ्या टकटक् आवाजाखेरीज त्या खोलींत सर्वत्र सामसूम झालें होतें.

खाली सुरेशची रबर टायरची गाडी फाटकाबाहेर निघून गेली तें केवळ घोड्यांच्या टापांचा शब्द झाल्यामुळेंच कळून आलें. दुसऱ्याच क्षणाला नोकर आंत येऊन म्हणाला, " बाबू ! "

केदारबाबूंनीं नजर वर करून पाहिलें—त्याच्या हातीं एक फाडलेला कागद होता.

जास्त बोलण्याची कांहीं जरूरीच नव्हती. ते ताड्कन उठले आणि उजवा हात झटकून ओरडून म्हणाले, " घेऊन जा हरामखोरा ! घेऊन जा तें माझ्या समोरून ! बाहेर हो म्हणतों ना—"

बिचारा नोकर धन्याचा तो अवतार पाहिल्यामुळेंच त्याच पावलीं बाहेर सटकला. त्यांनीं मुलीकडे नजर वळवली. त्यांच्या डोळ्यांवाटे ठिणग्या येत होत्या. आणखी एक स्वर आवाज चढवून ते म्हणाले, " हरामजादा—पाजी माणूस ! जर यापुढं कसलं तरी निमित्त करून माझ्या घरांत घुसायचा प्रयत्न करील तर पोलीसच्या ताब्यांत देईन त्याला – मी तुला बजावून सांगतोंय अचला. "

नांव कानीं येतांच अचलेनें वर पाहिलें. तिचा चेहरा पांढरा फटफटीत झाला होता. केविलवाण्या नजरेनें ती एक शब्द सुद्धां न बोलतां डोळे तारवटून बापाच्या तोंडाकडे पाहात राहिली होती.

बाप म्हणाला, " पैसे चारले म्हणजे बापाचे डोळे कांहीं बन्द व्हायचे नाहींत—हरामखोरानं हें मात्र नीट ध्यानांत धरावं ! "

तरीही मुलीनें यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. तिची केविलवाणी नजर हळुहळू बदलत जाऊन प्रखर होत होती, तें कांहीं तिच्या बापाच्या नजरेला आलें नाहीं. बाप मात्र मोठमोठ्यानें बोलत होता, " वचनचिठ्ठी फाडून टाकली म्हणून कांहीं बापाला लांच दिली असं होत नाहीं, ही गोष्ट त्याला पटवून देईन तेव्हांच स्वस्थ राहीन. आतां हें घर मी स्वतः विकून टाकीन आणि त्याचं कर्ज फेडून जिथं वाट फुटेल तिकडे निघून जाईन. कुणाची सुद्धां मला अडवायची छाती व्हायची नाहीं—हें सांगून ठेवतोंय मी ! "

एव्हढ्या वेळानंतर अचलेनं तोंड उघडलें. पहिल्यानें ती जरा कचरत होती. पण लगेच ती शांत आणि निश्चित वाणीनें म्हणाली, " कर्जाची फेड न करतां घर माझ्यासाठीं राखून ठेवा, असं मी कधीं म्हटलं होतं का बाबा ? तुम्ही हें काम केलं नसतं तर तें मलाच करावं लागलं असतं ! "

केदारबाबू अधिकच भडकून म्हणाले, " तूं जें कांहीं करून आली आहेस तेवढंच पुरेसं झालंय – आतां समाजांत मला तोंड दाखवायला सुद्धां जागा राहिली नाहीं याची जाणीव आहे का तुला ? "

अचला तितक्याच शांत आणि निश्चित वाणीनें म्हणाली, "नाहीं ! कां मला तसं वाटावं ? तुमच्या समोर तोंड दाखवतां येऊं नये असं जर मी कांहीं केलं असतं बाबा, तर माझं हें तोंड तुम्हांला केव्हांच दिसलं नसतं. त्या गांवीं इतर कसलीही जरी उणीव असली तरी जीव द्यायला पुरेसं पाणी मिळायला कांहीं कठीण गेलं नसतं—"

बोलत असतांना तिचा गळा दाटून आला. तशाच रडकुंड्या वाणीनें ती म्हणाली, "—कालपासून तुम्ही जो माझा पाणउतारा करतां आहां, तो खोटा आहे म्हणूनच मी सहन केला. नाहीं तर—"

बोलत असतांना तिचा आवाज तिथल्या तिथें खुंटला. पदरानें तोंड झांकून घेऊन आंतून येणारा रडण्याचा उमाळा बन्द करून घेत घेत ती तडकाफडकीं बाहेर निघून गेली.

केदारबाबू हतबुद्ध होऊन स्तब्ध राहिले होते. राग यायला म्हणा, फटकावण्याची बुद्धि व्हायला म्हणा, मनाला लागून दुःख करायला त्यांना जें कारण झालें होतें तें एकच. आपल्या मुलीच्या हातून कांहींतरी दुराचरण घडलेलें आहे असाच त्यांनीं स्वतःचा समज करून घेतला होता. पण ती मुलगी सुद्धां या समजाबद्दल उलट आपल्यालाच दोषी ठरवून तोंडावर आपला उपमर्द करील आणि रागारागानें रडत निघून जाईल असें त्यांना मुळीं सुद्धां वाटलें नव्हतें. म्हणूनच ते झपाटल्याप्रमाणें कांहीं वेळ उभे राहून दुसऱ्याच क्षणाला खुर्चींत मटकन बसले. डोक्यावरून हात फिरवीत फिरवीत ते आपल्याशींच पुटपुटूं लागले होते. "आतां घ्या !—हें आणखी एक नवं लचांड !"

यानंतर बापलेकीचे पुढले आठदहा दिवस कशाप्रकारें गेले हें त्यांचें त्यांनाच कळलें असेल. अचला कांहीं केल्या आपल्या खोलीबाहेर येत नव्हती. स्वतःच्या नोकराचाकरांसमोर सुद्धां तोंड दाखवणें तिला अशक्य होऊन गेलें होतें. गेले एकदोन दिवस ती जशी खिडकींत येऊन बसत असे तशीच आजही वेळ घालवण्यासाठीं उघड्या खिडकींतून रस्त्याकडे पहात बसली होती.

ते थंडीचे दिवस होते. मध्यान्हीच्या बरोबरच एक प्रकारची म्लान छाया

आकाशांतून खालीं जमिनीवर पडली होती. त्या छायेच्या मालिन्याबरोबरच आपल्या साऱ्या जीवनाचा एक प्रकारचा अज्ञात संबंध असल्याची जाणीव तिच्या अंतरंगाच्या तळाला उत्पन्न होत होती आणि त्यामुळें तिचें सारें मन मावळायला आलेल्या दिवसासारखें क्षीण होऊन थकून गेलें होतें. ती डोळे उघडून पहात होती खरी, पण समोरचें दृश्य कोणत्याही प्रकारें तिच्या नजरेंत येत नव्हतें. रोजच्या संवयीला अनुसरून तिची नजर वरखालीं किंवा आजुबाजूला कुठेंच वळत नव्हती.

अशाप्रकारें बसल्या बसल्या दिवस मावळायला आला. चट्कन तिची नजर समोर गेली—सुरेशची गाडी त्यांच्या घराच्या फाटकांतून आंत शिरत होती.

एकदम तिचा चेहरा पांढरा फटफटीत झाला. पोलीसला पाहिल्याबरोबर चोर जसा जीव घेऊन पळतो तशीच पळत येऊन ती खाटेवर आडवी पडली.

पंधरा वीस मिनीटांनीं तिच्या खोलीच्या झांकलेल्या दारावर कुणीतरी ठोठावलें. बाहेरून तिच्या बापाची नाजुकशी हांक ऐकूं आली, "अचला, जागी आहेस का पोरी ?"

तिच्याकडून कांहीं उत्तर न आल्यामुळें त्यांचा आवाज अधिकच नाजुक झाला. ते हळूच म्हणाले, "दिवस मावळला पोरी, आतां ऊठ. सुरेशची आत्या तुला न्यायला आली आहे. महिम भारीच आजारी आहे वाटतं !"

अचला बिछान्यावरून उठली आणि दार उघडतांच सुरेशची आत्या आंत आली. खालीं वांकून अचलेनें तिच्या पायाला हात लावून तिला प्रणाम केला.

सर्वांच्या मागून केदारबाबू आंत आले आणि बिछान्याच्या एका कोपऱ्याला बसून मुलीला उद्देशून म्हणाले, "तूं तिकडून आल्यापासून महिमला तापानं पछाडलंय. रात्रीची थंडी लागली—इकडे ही काळजी—एव्हढे श्रम झालेले—बहुधा त्याच कारणामुळें तो आजारी पडला असावा—" सुरेशच्या आत्याला उद्देशून ते पुन्हां म्हणाले, "—हिला पाठवून दिलं आणि तेव्हांपासून हिची खबर सुद्धां घेतली नाहीं म्हणून मी अगदीं कासावीस झालों होतों. सुरेशला देव उदंड आयुष्य देवो. तिकडे जाऊन महिमला घेऊन यायची बुद्धि त्याला झाली नसती तर काय झालं असतं तें एक देवच जाणे !"

पश्चात्ताप झाला असल्यामुळें म्हताऱ्याचा गळा गहिंवरानें दाटून आला.

अचला खालच्या मानेनें सारें कांहीं मुकाट्यानें ऐकत होती. तिनें कांहीं विचारलें नाहीं, कीं कोणत्याही प्रकारचा अस्वस्थपणाही दाखवला नाहीं.

अचलेच्या खांद्यावर हात ठेवून सुरेशची आत्त्या शांतपणें म्हणाली, " भिऊं नकोस मुली—दोनच दिवसांत त्याला आराम वाटेल. "

यावर अधिक कांहीं सुद्धां न बोलतां अचलेनें तिला पुन्हां खालीं वांकून प्रणाम केला आणि दांडीवरची शाल ओढून घेऊन बाहेर निघण्यासाठीं ती तयार झाली.

या संध्याकाळच्या वेळीं कडक थंडी पडली असतांना गरम कपडा अंगांत न घालतां नुसती एक पातळशी शाल ओढून घेऊन ती जायला निघाल्याचें पाहून म्हाताऱ्याच्या काळजाला बाण बसला—पण तिच्याच पुढें जात असलेल्या त्या वृद्ध विधवेचा पेहराव पाहिल्याबरोबर, अचलेला मागें बोलावून अंगांत गरम कपडे घालण्यास सांगायची त्यांना प्रवृत्ति झाली नाहीं.

" चल मुली, मीही बरोबर येतों. " एवढेंच नुसतें बोलून ते पायांत चढाव घालून सर्वांच्या आधीं जिना उतरून खालीं गेले.

## २३

प्रत्यक्ष लग्नाची बायको असून सुद्धां तिला नवऱ्याच्या सुखदुःखाच्या प्रसंगांत भागीदारी मिळूं दिली नाहीं, याबद्दलच अचलेचा महिमवर राग होता. मित्राच्या नात्यानें सुद्धां हीच तक्रार सुरेश लहानपणापासून करीत आला होता, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नव्हता. कृपणाच्या धनाप्रमाणें महिम स्वतःच्या सुखदुःखाची गोष्ट जगांतल्या कोणत्याही व्यक्तीपासून लपवून ठेवीत असे; त्यामुळें प्रसंगीं त्याला साहाय्य करण्याचें तर दूरच राहो, पण त्याला कोणत्या गोष्टीचा अभाव होता, कोणत्या गोष्टीमुळें त्रास होत होता, याचा पत्ता कुणालाच लागत नसे.

अर्थात् घर ज्यावेळीं जळून गेलें त्यावेळीं वडिलार्जित वास्तु भस्मसात झाल्यामुळें महिमला तें दुःख कोणत्या प्रमाणांत जाणवलें, याचा अंदाज त्यावेळची

त्याची मुद्रा पाहून अचलेला मुळींच करतां आला नाहीं. मृणालला वैधव्य प्राप्त झाल्याचा परिणामही महिमवर किती झाला हेंही कळणें तिला असाध्य झालें होतें. ज्या दिवशीं स्वतःच्या तोंडानें तिनें त्याला सुनावलें, कीं आपलें तुझ्यावर प्रेम नाहीं, त्या दिवशींही तो आघात त्याला किती जाणवला या बाबतींतही ती काळोखांत होती. त्याचप्रमाणें कोणत्याही प्रकारचें संकट आलें तरी आपला नवरा खरोखरच निर्विकार आणि उदासीन राहातो असा निश्चित समज करून घेण्याइतकी ती निर्बुद्ध नव्हती. म्हणूनच त्या दिवशीं स्टेशनवर ती आपल्या नवऱ्याच्या निर्विकार शांत मुद्रेकडे पुन्हां पुन्हां पाहात होती आणि सारा रस्ताभर एकच विचार करीत होती, कीं सहिष्णुतेच्या त्या खोट्या मुखवट्याखालीं त्याची खरी खरी मुद्रा आपल्या नजरेला कशी येत नाहीं ?

आज त्याच्या आजारीपणाच्या बातमीचें स्वरूप स्वाभाविक आणि सहनीय व्हावें म्हणून केदारबाबूंनी ज्यावेळीं बोलायला सुरवात केली, त्यावेळीं तेही म्हणाले होते, कीं या बाबतींत त्यांना कसलेंच आश्चर्य वाटलें नाहीं. उलट एव्हढी मोठी आपत्ति आल्यानंतर त्यांना अशीही शंका मनांत येत होती, कीं अचलेनें स्वतःच्या अंतरांतला जो भाव एक क्षणभर उघडकीस येऊं दिला होता, तो तिच्या निर्भेळ उत्कंठेचें लक्षण असल्याच्या स्वरूपाचा नव्हता.

सुरेशची रबर टायरची गाडी मोठ्या वेगानें चालली होती. सुरेशची आत्त्या एका बाजूचा गाडीचा दरवाजा ओढून घेऊन मुकाट्यानें बसली होती आणि त्याच्याच बाजूला अचलाही दगडाच्या पुतळीसारखी स्तब्ध होऊन बसली होती. कुणीच कांहीं बोलत नसल्यामुळें केदारबाबू निरुत्साह होऊन रस्त्याकडे पाहात भरमसाट बडबडत होते. सुरेशासारखा दयाळू, बुद्धिवान, विचक्षण मुलगा जगांत सांपडायचा नाहीं; महिमच्या मुर्दाडपणामुळें तो वारंवार चिरडीला येत होता; ज्या गांवांत माणूस नाहीं, डॉक्टर वैद्य नाहींत, नुसते चोर, डाकू, कोल्हे, कुत्रे जिथें राहात होते, अशा खेड्यांत जाऊन वस्ती करून येण्याबद्दल त्याला चांगलीच शिक्षा मिळाली पाहिजे होती; अशा प्रकारें केव्हां संबद्ध तर केव्हां असंबद्ध भाषण करून ते त्या मुकाट्यानें बसलेल्या दोघींनाही अविचारीपणानें सुनावित होते.

त्याला एक कारण होतें. केदारबाबू स्वभावतः क्षुद्र वृत्तीचे होते असें मुळींच

नव्हे, पण आज त्यांच्या हृदयांत जो एक प्रकारचा गुप्त आनंद निर्माण झाला होता तो आवरणें त्यांच्या संयमी शक्तीला अनावर होत होतें. आपला परममित्र सुरेश याच्याबरोबर आपण भांडण केलें, एकुलत्या एक मुलीशीं विद्रोह केला आणि सर्वांपेक्षां जास्त म्हणजे त्या दोघांबद्दल जी एक कुत्सित आणि आंधळेपणाची संशयाची भावना गेल्या कांहीं दिवसांत हृदयांत बाळगली, तिचें ओझें त्यांच्या हृदयावर शिळेसारखें दाबून बसलें होतें—आज आत्याबाईच्या अनपेक्षित आगमनामुळें तो भार एकाएकीं हलका झाला असें त्यांना वाटलें.

महिमच्या आजारीपणाच्या बातमीला त्यांनीं आपल्या मनांत मुळींच थारा दिला नव्हता. त्या रात्रींच्या तशा प्रकारच्या प्रसंगाच्या वेळीं थंडी लागून ताप आला तर त्यांच्या दृष्टीनें ती फारशी महत्त्वाची गोष्ट नव्हती. एकदोन दिवसांत तो बरा होईल असें आत्याबाईनीं तर आश्वासन दिलें होतेंच—कदाचित् उद्यां सकाळीं सुद्धां तो साफ बरा होईल—एवढीच त्याच्या आजारीपणाची कल्पना त्यांनीं करून घेतली होती.

पण वस्तुस्थिती अशी होती, कीं महिमला आपल्या घरीं आणण्यासाठीं सुरेश स्वतःच त्याच्या गांवीं गेला होता, याच निमित्तानें त्याच्या बायकोला त्याच्या शेजारीं आणून बसविण्यासाठीं आत्याबाईंना पाठविण्याचा घाटही त्यानेंच घडवून आणला होता. मुलगी आणि जांवई यांच्यामध्यें कांहींतरी मनोमालिन्य निर्माण झालें आहे याची कल्पना मोलकरणीच्या तोंडून कळलेल्या हकीकतीवरून केदारबाबूंना जी आली होती, तीही ते मुळींच विसरले नव्हते. हें सारें एका सामान्य दांपत्य कलहाचें स्वरूप होतें, ही वस्तुस्थिती आतां उघडकीस आल्यामुळें ते अशाप्रकारें सारखे बडबडूं लागले होते. त्या बडबडींत त्यांना स्वतःचा जो राग येत होता त्याचीच छटा स्पष्ट दिसून येत होती. सुरेशच्या घरीं गेल्यावर त्या पूर्णपणें निरपराध असलेल्या सभ्य तरुणाकडे कोणत्या तोंडानें पाहावें हाच त्यांना प्रश्न पडला होता.

त्यांच्या मुलीला मात्र एक प्रकारच्या कठोर वृत्तीनें पूर्णपणें ग्रासून टाकलें होतें. आजार तेव्हढासा भयंकर नाहीं असें तिला सुद्धां वाटत होतें—पण तिला कळत नव्हतें हेंच, कीं सुरेशनें त्याला घरून आणलें तें कोणत्या प्रकारें ? नवऱ्याचा

स्वभाव एव्हढ्यापुरता तरी तिच्या ओळखीचा होता.

काळोख पडला होता. रस्त्यावरच्या गॅसच्या बत्त्या पेटल्या होत्या. गाडी सुरेशच्या घराच्या फाटकांत शिरली आणि कांहीं अंतरावर उभी राहिली. केदारबाबूंनीं बाहेर डोकावून पाहिलें आणि उद्विग्न होऊन विचारलें, " इथं या दोन गाड्या उभ्या कां ? "

त्याच वेळीं अचलेची उत्कंठित नजरही तिकडेच गेली. कंदिलाच्या उजेडांत तिला स्पष्ट दिसून आलें, कीं सुरेश एका प्रौढ इंग्रजाला मोठ्या अदबीनें गाडींत बसवून देत होता आणि त्याच्याच शेजारीं साहेबी पोशाख केलेला एक बंगालीही उभा होता. हे दोघेही डॉक्टर असावे असें पाहातांक्षणींच तिनें ओळखलें.

ते निघून गेल्यावर यांचीही गाडी दारांत येऊन उभी राहिली. सुरेश तिथेंच उभा होता. केदारबाबूंनीं त्याला एकदम विचारलें, " महिम कसा आहे सुरेश ? काय झालंय ? "

सुरेश म्हणाला, " बरा आहे. आधीं आंत या. "

केदारबाबू अधिकच उत्कंठित होऊन विचारूं लागले, " काय झालंय तें आधीं सांग ना ? "

सुरेश म्हणाला, " आजाराचं नांव सांगितलं तर त्यावरून तुम्हांला बोध व्हायचा नाहीं. ताप आलाय आणि छातींत थोडीशी सर्दी झाली आहे. पण तुम्ही आधीं खालीं उतरा—त्यांना उतरूं द्या. "

केदारबाबू खालीं उतरण्याचें कोणतेंच लक्षण न दाखवतां म्हणाले, " थोडीशी सर्दी झाली असती तर तुलाच स्वतः औषध देतां आलं असतं ! मी कांहीं अगदींच पोर नव्हे सुरेश. दोघे डॉक्टर कां ? अन् हा साहेब डॉक्टर कां आणला ? "

बोलत असतांना त्यांचा आवाज कांपरा झाला होता. सुरेश गाडीजवळ आला आणि त्यांचा हात धरून त्यांना खालीं उतरून घेऊन म्हणाला, " आत्याबाई, अचलेला आंत घेऊन जा. मी येतोंच. "

अचलेनें कुणालाही कसलाही प्रश्न केला नाहीं. त्या जागीं काळोख असल्यामुळें तिच्या मुद्रेवर झालेला परिणाम कुणाला दिसला नाहीं. खालीं उतरतांना

तिचे पाय डळमळूं लागले होते तेंही कुणाच्या नजरेला आलें नाहीं. ती जशी मुकाट्यानें आली होती तशी तितक्याच मुकाट्यानें खाली उतरून आत्याबाईंच्या मागोमाग घरांत निघून गेली.

थोड्या वेळानें दारावरचा पडदा दूर करून ती ज्यावेळीं रोग्याच्या खोलींत आली त्यावेळीं महिम आपल्या घरासंबंधींच कांहींतरी बडबडत होता. त्याच्या तोंडचे चारदोन शब्द कानीं पडतांक्षणींच तिला कळून चुकलें, कीं तें असंबद्ध भाषण म्हणजे त्याची तापांतली बडबड होती. आजाराचें प्रमाण कोणत्या थरावर गेलें आहे याची तिला त्यावरून कल्पना आली. क्षणभर भिंतीचा आसरा घेऊन तिनें देहाबरोबरच आपलें मनही सांवरून घेतलें.

जी बाई रोग्याच्या उशाशीं बसून बर्फाची पिशवी त्याच्या माथ्यावर ठेवीत होती तिनें त्याचवेळीं मागें वळून पाहिलें. संथपणें पुढें येऊन खालीं वांकून तिनें अचलेला नमस्कार केला. ती उठून उभी राहिली त्यावेळीं तिचा वेष विधवेचा होता असें दिसून आलें. तिचे केस मानेपर्यंत कापले होते आणि तिच्या चेहऱ्यावर विधवेच्या वैराग्याची सार्वकालीन दुःखी छाया विराजमान झालेली होती.

दिव्याच्या अंधुक प्रकाशांत अचलेनें मृणालला एकदम ओळखलें नव्हतें. समोरासमोर येतांक्षणींच दोघीही क्षणभर स्तंभित होऊन उभ्या राहिल्या होत्या. अचलेचा देह नखशिखांत डळमळूं लागला-कांहींतरी बोलावें म्हणून तिचे ओठ क्षणभर थरथरले—तिच्या तोंडांतून शब्द बाहेर फुटला नाहीं—दुसऱ्याच क्षणाला तिचा संज्ञाहीन देह तोडलेल्या वेलीप्रमाणें मृणालच्या पायाजवळ कोसळून पडला.

शुद्धीवर येतांच अचलेला दिसून आलें, कीं ती बापाच्या मांडीवर डोकें टेकून एका कोचावर पडली होती. एक दासी तिच्या तोंडावर गुलाबपाणी शिडकावीत होती आणि तिच्याच मागें हातीं पंखा घेऊन उभा राहिलेला सुरेश हळुहळु तिला वारा घालीत होता.

परिस्थिती काय होती याची जाणीव व्हायला तिला थोडा वेळ लागला. भानावर येतांच ती अतिशय लाजली आणि घाईघाईनें उठायचा प्रयत्न करूं लागली, तेव्हां तिला तशीच दाबून धरून केदारबाबू म्हणाले, " विश्रांति घे पोरी. इतक्यांतच उठूं नकोस. "

अचला हळूच म्हणाली, " नाहीं बाबा, मी आतां चांगली बरी आहें ! "

ती पुन्हां उठून बसायचा प्रयत्न करूं लागली त्यावेळीं तिच्या बापानें बळें-बळेंच तिला आडवें पडून रहायला लावलें आणि रागारागानें म्हटलें, " कांहीं जरूर नाहीं ह्यावेळीं उठायची—समजलं अचला ? जरा अशीच पडून झोप घे. "

सुरेश देखील तोंडांतल्या तोंडांत अशाच अर्थाचें कांहीं बोलला असावा.

अचलेनें एकवार त्याच्या तोंडाकडे पाहून घेतलें आणि उत्तरादाखल बापाचा हात लोटून टाकून ती सरळ उठून उभी राहिली आणि म्हणाली, " मी इथं कांहीं झोंपण्यासाठीं आलें नाहीं बाबा. कांहीं सुद्धां झालं नाहीं मला ! मी त्या तिकडच्या खोलींत जाणार ! " असें म्हणून कुणाच्याही अडथळ्याला न जुमानतां ती बाहेर निघून गेली.

या घरांतल्या वाटा ती विसरली नव्हती. रोग्याची खोली ओळखून काढायला तिला वेळ लागला नाहीं. ती आंत येतांच मृणालनें एकदां तिच्याकडे पाहिलें आणि म्हटलें, " थोडा वेळ तूं इथं बैस वहिनी—मी माझं आन्हिक उरकून घेतें. बर्फाच्या पिशवीवर जरा नजर ठेव. खालीं पडूं देऊं नकोस—" असें म्हणून अचलेला आपल्या जागीं बसवून ती बाहेर निघून गेली.

# गृहदाह
## उत्तरार्ध

# गृहदाह

## [ उत्तरार्ध ]

### १

न्युमोनियासारख्या कठीण रोगांतून आराम पडायला वेळ लागणार होता. महिम हळुहळु बरा होत येत होता, आतां त्याला कसलीच धास्ती उरली नव्हती ही गोष्ट आतां सर्वांना पटून चुकली होती. त्याच्या तोंडची अर्थशून्य बडबड आणि नजरेंतली विचुक चमक आतां थंडावली होती—स्वाभाविक होत आली होती.

आठ दहा दिवसांनंतर एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं महिम शांतपणें झोंपी गेला होता. या वर्षी थंडीचा कडाका नित्यापेक्षां जरा अधिक होता. त्यांतच नुकतीच बाहेर पावसाची एक लहानशी सर पडून गेली होती. रोग्याच्या खाटेला एक मोठी चौकी जोडून बिछाना तयार करण्यांत आला होता. त्यावर सारेजण नीटनेटके कपडे करून बसले होते. सर्वांच्या मुद्रेवर एक प्रकारची निरुद्विग्न तृप्तीची छटा दिसत होती. आत्याबाईच काय ती घरकामांत गुंतली होती आणि केदारबाबू तेव्हांपर्यंत आपल्या घराकडून येऊन पोंचले नव्हते.

सुरेशकडे पाहून मृणाल एकाएकीं हात जोडून म्हणाली, " आतां माझा राजिनामा तुम्ही मंजूर केला पाहिजे सुरेशबाबू. मी आतां गांवीं जातें. या थंडीच्या कडाक्यांत माझी म्हातारी सासू इतक्यांत मरून सुद्धां गेली असेल. "

सुरेश म्हणाला, " अजूनही ती वांचावी असं कुणाला वाटतंय का ? नाहीं गेलीस तर त्यामुळं कांहीं अडून रहाणार आहे का ? कांहीं जरूरी नाहीं तिच्यासाठीं जायची ! "

एक क्षणभरच मृणालनें मान वळवली आणि तिनें एक दीर्घ निश्वास सोडल्याचा भास झाला. तिनें तो आवरून धरला. त्यानंतर सुरेशच्या तोंडाकडे पाहून थोडेंसें हंसून ती म्हणाली, " तुम्हीच नव्हे सुरेशबाबू, पण मीच हा प्रश्न

यापूर्वी हजारवेळ केला आहे आपल्याला. आतां तिनं जावं हेंच बरं असं मलाही वाटतं. पण जिण्यामरण्याचा प्रश्न ज्याच्या हातीं आहे तो लक्षच देत नाहीं इकडे. त्यानं वेळींच ही असली खबरदारी घेतली असती तर जगांतल्या अनेक हाल-अपेष्टांपासून माणूस बचावला असता. ”

हा वेळपर्यंत अचला उगीच राहिली होती. मृणालच्या उद्गारांमुळें बहुधा तिच्या मनांत आपल्या नवऱ्याच्या परिस्थितीचीही कल्पना आली असावी.' जो कोण असा अंतर्यामीं म्हणून आहे त्याला हें माहित असतें, कीं हजार हालअपेष्टा झाल्या तरी माणूस मरायला तयार नसतो.

मृणालच्या मुद्रेवर एक प्रकारची छपवलेली वेदनेची छटा दिसून आली. ती मान हलवून म्हणाली, “ नाहीं ग बाई नाहीं, माणसाला मरावंसं खरोखरच वाटावं असे प्रसंग त्याच्या अयुष्यांत केव्हां ना केव्हांतरी येतात. एक दिवस असं झालं, रात्रीं एकदम मला जाग आली. उठून पहातें तों सासूबाई बिछान्यावर नव्हत्या. घाबऱ्याघुबऱ्या बाहेर येऊन पाहिलं तों देवघराचा दरवाजा अर्धा उघडा होता. मी गुपचुप जवळ येऊन उभी राहिलें. पाहिलं तों त्या पदर पसरून, हात जोडून देवाजवळ मरणाची भिक्षा मागत होत्या—‘ देवा एक दिवस जरी मनापासून तुझी सेवा केली असेल तर आज माझी लाज राख. मला मुक्ति नको. स्वर्ग नको, एवढंच दे देवा, ही एवढी लज्जास्पद परिस्थिति मात्र येऊं देऊं नकोस. सूनबाईसमोर हें तोंड घेऊन जाणं मला कठीण जातंय’—” बोलत असतांना मृणालला एकदम रडें कोसळलें. त्या म्हातारीच्या या प्रार्थनेंत आईच्या हृदयांतल्या केवढ्या भयंकर वेदना सामावलेल्या होत्या याची कल्पना यायला वेळ लागला नाहीं. सुरेशचे दोन्हीं डोळे आंसवांनीं भरून आले. कुणाही माणसाच्या एवढ्याशा दुःखानें देखील तो कळवळत असे. आज या संतानहीन म्हाताऱ्या आईच्या मर्मांतिक दुःखाच्या कहाणीनें त्याच्या अंतःकरणांत कालवाकालव सुरू झाली.

बराचवेळपर्यंत तो जमिनीकडे नजर लावून बसला होता. त्यानें वर पाहिलें आणि एकदम गहिंवरून म्हटलें, “ बरं आहे. तूं जा बाई, म्हाताऱ्या सासूची सेवा करायचं तुझं कर्तव्य तूं पार पाड. यापुढं मीं तुला अडवून ठेवूं इच्छित नाहीं. या आमच्या दुर्भागी देशांत अजूनही कांहीं गौरव मानण्याजोगं असेल तर त्या या तुझ्यासारख्या बायका. दुसऱ्या कुठल्यासुद्धां देशांत दिसून

यायच्या नाहींत या !--" असें म्हणून त्यानें जिज्ञासू नजरेनें एकदा अचलेकडे पाहिलें, पण ती खिडकीबाहेर पहात होती. आकाशांतून जाणाऱ्या एका काळ्याकुट्ट ढगाकडे नजर लावून ती स्तब्धपणें बसून राहिली होती, त्यामुळें तिच्याकडून कोणतेंच उत्तर मिळालें नाहीं.

पण मृणाल मात्र शरमून गेली. आपला उल्लेख झाल्याचें तिला आवडलें नव्हतें. विषयांतर करण्याच्या उद्देशानें ती बळेंबळेंच हंसून म्हणाली, " हो! नाहींतर काय! सगळ्या देशांतल्या सगळ्या गोष्टी तुम्हांला माहित आहेत ना? बरं, या माझ्या दादापेक्षां तुम्हीं लहान कीं वडील? "

या विलक्षण प्रश्नामुळें सुरेश हंसला आणि म्हणाला, "असं कां विचारलंत-?"

मृणाल त्याला थांबवून म्हणाली, " नाहीं बरं, मला अहो जाहो करायचं नाहीं. नांवानं अक्का असलें तरी वयानं मी लहान आहें. म्हणून मोठा दादा—धाकटा दादा – बोला—बोला, काय म्हणूं बोला! "

आकाशाकडची दृष्टि वळवून आतां अचलेनें तिच्याकडे नजर वळवली. बऱ्याच दिवसांपूर्वी या तरुणीनें हातोहात हंसत खेळत आपल्याशीं वहिनीचें नातें कसें जोडून घेतलें होतें त्याची तिला आठवण झाली. मृणालच्या स्वभावांतली ही खुबी सुरेशला माहित नव्हती, त्यामुळें तो त्या विलक्षण स्त्रीच्या तोंडाकडे नुसता पहातच राहिला. तो कौतुकानें हंसला आणि म्हणाला, " मोठा दादा – छोटा दादा! तुझ्या दादापेक्षां मी जवळ जवळ दीड वर्षानं लहान आहें. "

मृणाल म्हणाली, " तर मग छोटेदादा, कुणीतरी माणूस माझ्याबरोबर द्यायची तजवीज कराल का? मला गाडींत घालून उद्यां एकदां घालवून द्यायला हवं १णीतरी. "

सुरेशनें तिच्या जाण्याला आतांच संमति दिली होती खरी, पण उद्यां सकाळींच ती जायला निघेल असें त्याला वाटलें नव्हतें. तेव्हां क्षणभर विचार करून तो थोडासा गंभीर होऊन म्हणाला. " आणखीं दोन दिवस तरी रहातां यायचं नाहीं का तुला अक्का? महिमचा सारा भार तुझ्यावर टाकून आम्हीं एक प्रकारें निश्चिंत होतों. रात्रंदिवस इतक्या तत्परतेनं, इतकी काळजीपूर्वक सेवा केल्याचं आम्ही कुठल्या इस्पितळांत सुद्धां पाहिल्याचं आठवत नाहीं मला!—नाहीं का अचला?"

उत्तरादाखल अचलेनें नुसती मान हालवली.

सुरेशला काळजी पडल्याचें पाहून मृणाल हंसतमुखानें म्हणाली, " त्याची

एवढीसुद्धां काळजी नको तुम्हांला. ज्याची वस्तु त्याच्या हातीं देऊन जातें आहें म्हणून, नाहींतर यावेळीं सुद्धां मला जातां आलं नसतं. कसं तडकाफडकी यावं लागलं होतं मला तें ध्यानांत असेल तुमच्या. कांहीं सुद्धां व्यवस्था लावतां आली नव्हती मला. उद्यां मला रजा द्या छोटेदादा. पुन्हां जेव्हां केव्हां हुकूम कराल त्याच क्षणीं येऊन हजर होईन."

सुरेश क्षणभर उगीच राहिला. नंतर एकदम मधेंच म्हणाला, "असं पहा मृणाल, त्या भकास खेड्यांत म्हाताऱ्या सासूची सेवा करीत अन् पूजाबिजा करीत तूं सारा वेळ कसा घालवतेस याचाच प्रश्न पडला आहे मला."

ते उद्गार मृणालच्या मनाला लागले असल्याचें तिच्या मुद्रेवरून दिसलें. तरीही ती हंसून म्हणाली, "वेळ घालवायची जबाबदारी कांहीं माझ्यावर नाहीं छोटेदादा. ज्यानं कुणी हा वेळ घडवला आहे त्यानंच सारी तरतूद करून ठेवली आहे."

सुरेश म्हणाला, "बरं, तें एक राहूं दे. पण तुझी ही सासू कांहीं फारा दिवसांची सोबतीण नाहीं. अन् महिमला सुद्धां डॉक्टरच्या हुकुमानुसार पश्चिमे-कडच्या कुठल्यातरी चांगल्या हवेच्या जागीं जाऊन राहाणं अवश्य आहे. मग तूं तिथं एकटी रहाणार आहेस कशी?"

मृणालनें एकदां वर नजर लावली आणि पुन्हां ती थोडीशी हंसली. ती म्हणाली, "तें त्याचं त्याला माहित!"

सुरेशच्या हृदयांतून अगदीं नकळत एक मोठा सुस्कारा बाहेर पडला.

मृणाल म्हणाली, "छोट्यादादाचा असल्या गोष्टींवर विश्वास नाहीं वाटतं?"

"कशावर?"

"म्हणजे हे देवबिव—"

"नाहीं!"

"म्हणूनच हा सुस्कारा सोडलात वाटतं? माझं भाषण पटलं नाहीं म्हणून?"

सुरेशनें या प्रश्नाचें एकाएकीं उत्तर दिलें नाहीं. विचुकपणें तो कांहींवेळ-पर्यंत तिच्या तोंडाकडे उगीच पहात बसला होता. एकदम मधेंच मान हलवून तो म्हणाला, "नाहीं मृणाल, तसं नव्हे. कुठल्यातरी अज्ञात भवितव्याचा भार तशाच कुठल्यातरी एका अज्ञात ईश्वरावर सोंपवून माझ्यापेक्षां दिमाखानं चालणारीं

पुष्कळ माणसं मीं पाहिलीं आहेत. पण आतां ही चर्चा इथंच थांबवूं या! कदाचित् एवढ्यामुळंच तुझा राग होईल माझ्यावर. ”

मृणाल चट्‌कन खालीं वांकली आणि सुरेशची पायधूळ घेऊन आपल्या मस्तकाला लावून म्हणाली, “ ठीक आहे. राहूं दे ! ”

सुरेश थक्क होऊन म्हणाला, “ हें आणखीन् काय केलंस मृणाल ? ”

“ काय केलं छोटेदादा ? ”

“ कुठंच कांहीं झालं नाहीं अन् उगीचच ही पायधूळ घेतलीस ती ? ”

मृणाल म्हणाली, “ वडील भावाची पायधूळ ध्यायला काय मुहूर्त पहावा लागतो वाटतं ? ” असें म्हणून ती हंसत सुटली.

“काय विलक्षण पोर तरी !” असें म्हणून मोठ्या ममताळूपणानें हंसत सुरेशनें अचलेकडे पाहिलें पण त्याच क्षणीं तो आश्चर्यानें थक्क होऊन गेला. श्रावणांतल्या काळ्याकुट्ट मेघांनीं तिचा चेहरा काळवंडून गेल्यासारखा त्याला भास झाला. हा आश्चर्याचा धक्का सांवरायला किंवा या बाबतींत कसलाही प्रश्न करायची एवढी-सुद्धां संधी मिळायच्या पूर्वीं—आकाशापासून पाताळापर्यंत वाटेल तेव्हढा अफाट विचार करायचा अवकाश सुरेशला देऊन—अचला मृणालच्या पाठोपाठ तिथून निघून बाहेर गेली.

सुरेश तिथेंच बसून राहिला होता. स्वतःच स्वतःला प्रश्न करीत होता, कीं काय करतांना काय झालें हें ! मृणालनें आपल्याला जो प्रणाम केला त्याचा या प्रकाराशीं कसला तरी गूढ संबंध असावा, असें स्वतःच्या मनाशीं अंदाजून पहात असतांना त्याला निश्चितपणें वाटूं लागलें. पण हा संबंध कोणत्या बाबतींत होता ? मृणालनें एकाएकीं आपली पायधूळ घेतली कां आणि ती निघून गेली कां ?—आणि तोच क्षण जातो न जातो तोंच अचला सुद्धां असा पांढराफटक चेहरा करून निघून गेली कां ? आपलें आतांपर्यंतचें बोलणें आणि वागणें कसें कसें झालें याचा तो छेडून छेडून विचार करून पाहूं लागला. पण त्याला कुठेंच थांग—पत्ता लागेना. या दोन घटना एकाच वेळीं उगीचच घडून आल्या नाहींत हेंही त्याला पटलें होतें. आपल्या वागण्यांत न कळत कुठेंतरी चूक झाली आणि तीच या सऱ्या अनर्थाच्या मुळाशीं असावी ही कल्पना वारंवार त्याच्या मनाला कांट्यासारखी टोंचूं लागली.

पण या बाबतींत कोणत्याही प्रकारें मृणालला प्रश्न करणें शक्य नव्हतें. या

विचारांत त्यानें रात्र कशीबशी घालवली. सकाळींच त्यानें अचलेला एका बाजूला गांठून विचारलें, “ माझ्या एका प्रश्नाचं उत्तर देशील का ? ”

अचलेची मुद्रा लाजेनें लालीलाल झाली. प्रश्न काय होता याची तिला कल्पना होती. गेल्या रात्रीं आपल्या हातून जें विलक्षण वर्तन झालें त्याची आतां कैफियत द्यावी लागणार याची कल्पना घेऊन ती हळूच म्हणाली, “ कोणता प्रश्न ? ”

सुरेश शांतपणें म्हणाला, “ काल मृणाल एकाएकीं माझी पायधूळ घेऊन निघून गेली—तूं सुद्धां एवढा लांब चेहरा करून निघून गेलीस, ती काय मी तिच्या सासूच्या मरणाची गोष्ट बोललों म्हणून ? ”

या अनपेक्षित प्रश्नामुळें उत्तर द्यायला एक प्रकारें सुलभ झालें असें अचलेला वाटलें आणि ती मनांतल्या मनांत खूष होऊन म्हणाली, “ असला विषय काढणं योग्य होतं का ? बिचारीचा नवरा गेलेला—सासू मेली तर तिची अवस्था किती भयंकर होईल याची कल्पना तर करून पहा. ! ”

सुरेश अत्यंत अस्वस्थ होऊन म्हणाला, “ माझी चूक झाली यांत शंका नाहीं. पण सासू आतां फारा दिवसांची सोबतीण नाहीं हें मृणालला सुद्धां कळलंय. तसं पाहिलं तर तिची अवस्था भयंकर व्हावी कां ? ”

अचलेनें उत्तर दिलें, “ या बाबतींत आपण केव्हांच तिच्याकडे एकदांसुद्धां बोललों नव्हतों. शिवाय त्या खेडेगांवांत एकटं रहाण्याच्या बाबतींत तुम्हीं सुद्धां तिला नानाप्रकारें विचारून घाबरवून सोडलं. ”

सुरेशला आतां पश्चात्ताप झाला होता. त्यानें विचारलें, “ तर मग जायच्या पूर्वीं मी तिला धीर देणं अवश्य आहे का ? तिनं कांहीं भ्यायला नको ही गोष्ट तिला—” बोलतां बोलतां त्याचा गळा गहिंवरानें भरून आला. त्याच्या चेहऱ्याकडे पाहून अचला हंसली. दुसऱ्याच्या दुःखानें कळवळणाऱ्या या सहृदय तरुणाच्या हातून घडलेल्या हजारों दयाभूत अंतःकरणाच्या गोष्टी एका क्षणांत तिच्या आठवणींत उभ्या राहिल्या. ती म्हणाली, “ कांहीं नको—तिला धीर द्यायलाही नको आणि भय दाखवायलाही नको. तशी वेळ येईल त्यावेळीं मी कांहीं स्वस्थ बसून रहाणार नाहीं. ”

आवेगाच्या भरांत सुरेश भान विसरला आणि चट्कन तिचा हात धरून कडकडून आवळून म्हणाला, “ अगदीं तुझ्या वृत्तीला शोभेसं उत्तर आहे हें.

तुझ्यापासून माझी अपेक्षा होती ती हीच अचला.” तो बोलून गेला खरा पण नंतर आपला आपणच लाजला आणि तिचा हात सोडून एकदम पळत सुटला.

एका क्षणापूर्वी परक्यासाठीं कळवळण्याच्या निर्मळ अशा आनंदांत ज्या आवेगाचा जन्म झाला होता, त्याच आवेगाला या त्याच्या शरमिंद्या पलायनामुळें एका क्षणांत ओंगळ आणि कलुषित स्वरूप आलें. अचलेच्या हृदयांतील रक्त विजेच्या जोरानें वाहूं लागलें. तिच्या मस्तकावर घामाचे मोठमोठे थेंब चमकूं लागले. सर्वांग सारखें थरथरूं लागल्यामुळें ती शेजारच्या एका खुर्चीवर निर्जीव होऊन बसून पडली.

थोडया वेळानें ती भानावर आली. तो आवेग निघून गेला. आजारी नवऱ्याच्या बिछान्याशेजारीं जाऊन बसायला आज सकाळपासून तिचें मन एक प्रकारें घाबरेंघुबरें झालें होतें.

जाईन जाईन म्हणतां म्हणतां मृणालचें जाणें दोन दिवसांनीं लांबलें. महिमचा निरोप घेण्यासाठीं ज्यावेळीं ती त्याच्या बिछान्यापाशीं गेली त्यावेळीं तो पाठ फिरवून आज भलत्याच वेळीं झोंपी गेला होता. ती निरोप घेण्यासाठीं आली होती पण त्यानें झोंपेचें हें ढोंग केल्याचा हेतू निश्चित ओळखून ती हळूच म्हणाली, “ आतां त्याला जागा करणं बरं नव्हे वहिनी ! कसं ? ”

उत्तरादाखल अचलेच्या जिवणीच्या कोंपऱ्याला वांकडया हंसण्याची लहानशी रेषा चमकून गेली. हें त्याचें ढोंग आपल्याखेरीज आणखींही एका स्त्रीला कळून चुकलें आहे, हें मनच्या मनांत मृणाल समजली. मृणालच्या मनांत आपल्याविरुद्ध मत्सराची भावना गुप्तपणें पोसली जात आहे, याच्याबद्दल महिमकडून केव्हांहि एवढासुद्धां आभास मिळाला नव्हता, तरीही अचलेला तें जाणवलें होतें. मृणाल-लाही त्याची जाणीव होती. या निष्कारण द्वेषाची जाणीव तिच्या मनाला चांगलीच जाणवून राहिली होती. तरीपण या दिवशीं या आजारी माणसाच्या पवित्र दुबळेपणाकडे आपल्या क्षुद्र वृत्तीला अनुसरून अचला अशाप्रकारें पाहील असें तिला मुळींच वाटलें नव्हतें. एक क्षणभरच तिच्या मनाचा भडका झाला. पण लगेच मन आंवरून ती अचलेच्या कानाला लागून म्हणाली, “ तुला सारं माहीत आहेच वहिनी. माझ्या वतीनं तूं त्याची क्षमा मागून घे. त्याला म्हणावं, बरा होऊन गांवीं आलास अन् त्यावेळीं मी हयात असलें तर भेट होईल ! ”

खालीं केदारबाबू बसले होते. मृणालनें येऊन त्यांना प्रणाम करतांच त्यांच्या

डोळ्यांचे कोपरे ओले झाले. या थोड्या दिवसांच्या अवधींत सर्वांप्रमाणेंच या विधवा मुलीचा त्यांना भारीच ळळा लागला होता. सदऱ्याच्या बाहीनें डोळे पुसून ते म्हणाले, "पोरी, तुझ्या कर्तबगारीनं यमाच्या दाढेंतून बाहेर निघून महिम आम्हांला मिळाला. जेव्हां केव्हां मनांत येईल, थोडा हवा बदल करावासा वाटेल, तेव्हां या म्हाताऱ्याची आठवण विसरूं नकोस मुली. माझ्या घराचं दार रात्रंदिवस तुझ्यासाठीं उघडं राहील मृणाल."

अचला जवळच मुकाट्यानें उभी होती. तिच्याकडे बोट करून मृणाल हंसत हंसत म्हणाली, "दादाला हिच्यापासून हिरावून घ्यायची यमाच्या बापाची तरी काय ताकद होती बाबा? ज्या दिवशीं मी माझ्या दादाला वहिनीच्या हातीं सोंपवला त्याच दिवशीं माझं काम संपलं."

केदारबाबूंची मुद्रा थोडीशी गंभीर झाली. पण यावर ते अधिक कांहीं बोलले नाहींत.

दोघे म्हातारे कारकून आणि एक मोलकरीण मृणालला गांवीं पोंचवण्यासाठीं तयार ठेवण्यांत आलीं होतीं. त्या सर्वांना घेऊन फैटण ज्यावेळीं फाटकांतून बाहेर निघून स्टेशनकडे चालती झाली त्यावेळीं केदारबाबूंच्या हृदयांतून एक मोठा सुस्कारा बाहेर पडला. ते आपल्याशींच बोलल्यागत म्हणाले, 'विलक्षण मोठी विलक्षण पोर!"

सुरेशच्या मनावरही अशाच प्रकारचा परिणाम झालेला असावा. कुणाकडेही लक्ष न देतां त्यांच्या उद्गाराला जोर देऊन तो मोठ्या आवेशानें म्हणाला, "आजपर्यंत अशी कुणी मी पाहिली नव्हती केदारबाबू. अशी मिठास वाणीही कधीं ऐकली नव्हती, कीं कामकाजांतली अशी निपुणताही कधीं पाहिली नव्हती. कसलंही काम द्या, इतक्या विलक्षण दक्षतेनं उरकून टाकते, कीं असं वाटतं, जन्मभर हेंच काम करीत राहिलेली असेल ही. अन् विशेष हें, कीं आजवर आपल्या खेड्याच्या सीमेबाहेर सुद्धां कधीं गेली नव्हती!"

केदारबाबूंना हें सारें माहित होतें तरीही आश्चर्य प्रदर्शित करून ते म्हणाले, "म्हणतोस काय सुरेश!"

सुरेश म्हणाला, "अगदीं अक्षरशः खरं आहे हें. तिच्याकडे पहातां पहातां मधून मधून मला असं वाटे, कीं जन्मांतरींचा संस्कार असं जें कांहीं कुणी म्हणतात तें खरं आहे कीं काय कोण जाणें!" असं म्हणून तो हंसू लागला.

इहपरलोकासंबंधीं गोष्ट निघाल्यामुळें केदारबाबू चिंतायुक्त मुद्रेनें क्षणभर

स्तब्ध राहिले होते. मग ते म्हणाले, " तें कांहीं कां असेना, गेल्या कांहीं दिवसांत बघतां बघतां माझा अगदीं ठाम समज होऊन गेलाय, कीं ही पोरगी म्हणजे स्त्रीजातींतलं एक बिनमोल रत्न आहे. अशा पोरीला सारा जन्मभर अशी जिवंत असून मेलेली करून ठेवणं म्हणजे नुसतं पाप नव्हे, महापाप ! ही माझी मुलगी असती तर मी कांहीं केल्या स्वस्थ बसून राहिलों नसतों. "

सुरेशने आश्चर्यचकित होऊन विचारलें, " काय केलं असतं तुम्ही ? "

म्हातारा उसळून उठून म्हणाला, " मी पुन्हां लग्न लावून दिलं असतं हिचं. एका म्हाताऱ्याबरोबर लग्न लावून दिलं आणि या एकोणीस वर्षांच्या वयांत तिला ज्यांनीं संन्यासी बनवलं ते हिचे मित्र नव्हेत—वैरी आहेत ! अशा वैऱ्यांनीं ज्या गोष्टी घडवून आणल्या, त्या न्यायाला धरून आहेत असं कधींच कबूल केलं नसतं मी. "

थोडा वेळ थांबून ते पुन्हां म्हणाले, " शिवाय असं पहा, तिच्या नवऱ्याची वागणूक देखील ध्यानांत घेऊन पहा सुरेश. या माणसाच्या दोन बायका मेल्या. अन् तो पन्नास वर्षांचं वय उलटून गेल्यावर असल्या या पोरीशीं लग्न करायला तयार झाला—स्वतःच्या सुखासमाधानापलिकडे या हरामखोरानं त्या बायकोच्या भवितव्याकडे कांहीं नजर दिली होती कीं नाहीं, तें आतां तूंच पहा ! "

सुरेश कांहीं बोलत नाहीं असें पाहून म्हातारा अधिकच उसळून उठला आणि म्हणाला, " नाहीं सुरेश, मला विधवाविवाहाच्या बरेवाईटपणाबद्दलचा वाद उकरून काढायचा नाहीं. पण या विशिष्ट बाबतींत तुमचा सारा हिंदू समाज बोंबलून मेला तरीसुद्धां मी ऐकून घेणार नाहीं. या कोंवळ्या पोरीच्या बाबतींत असंच कांहींतरी केलं पाहिजे अन् तेंच करणं योग्य आहे. कुणाच्या तरी तोंडाकडे पाहून दिवस काढीन म्हणायला कुणी सुद्धां नाहीं या पोरीला. आयुष्य म्हणजे काय तुम्हां लोकांना खेळणं वाटतं रे सुरेश ? कीं ब्रह्मचर्य ब्रह्मचर्य म्हणून कोकललं कीं सारी दुनिया रातोरात बदलून ऋषींचं तपोवन होऊन जाईल ? पोरीच्या अंगावरचीं नुस्तीं वस्त्रं पाहिलीं तरीसुद्धां काळीज फुटून गेल्यासारखं वाटतं मला ! "

सुरेशनें यावर उत्तर दिलें नाहीं कीं वर नजर करून पाहिलेंही नाहीं. डोळ्याच्या कोपऱ्यांतून पहातांना त्याला दिसून आलें, कीं हा वेळपर्यंत दाराच्या चौकटीला टेकून दगडाच्या मूर्तीसारखी ऐकत राहिलेली अचला आतां तिथें नव्हती. ती केव्हांच गुपचुप निघून गेली होती.

मृणाल निघून गेल्यानंतर अचला जेव्हां जेव्हां सुरेशच्या तोंडाकडे पाही तेव्हां तेव्हां तिला वाटे, कीं त्याचें चित्त थाऱ्यावर नाहीं. कसल्या तरी आंतरिक दुःखानें तो सारखा वाळत चालला होता.

एक दोन दिवसांनीं एके दिवशीं तिसऱ्या प्रहरीं सुरेश खालच्या ओटीवरील एका कोपऱ्यांत उन्हांत टाकलेल्या आरामखुर्चीवर एक पुस्तक वाचीत पडला होता. कुणाची तरी चाहूल लागल्यानें त्यानें वर पाहिलें, तों त्याच्यासाठीं अचला स्वतः चहा घेऊन आलेली त्याला दिसली. यापूर्वीं कधींच असें झालें नव्हतें. म्हणूनच तो अचंबून उठून बसला. त्यानें विचारलें, " नोकर कुठं गेला ? आज तूं कां ? "

अचलेनें या प्रश्नाचें उत्तर दिलें नाहीं. एक छोटें टीपॉय त्याच्या खुर्चीशेजारीं ओढून घेऊन तिनें चहाचा पेला त्यावर ठेवला आणि तशीच एक खुर्ची ओढून घेऊन ती स्वतः तिथें बसली.

तिचें हें विलक्षण वर्तन पाहून तिला पुन्हां दुसरा प्रश्न करण्याचा सुरेशला धीर झाला नाहीं. मुकाट्यानें चहाचा पेला उचलून त्यानें हातीं घेतला.

कांहीं वेळपर्यंत ती तशीच मुकाट्यानें बसून राहिली होती. नंतर ती हळूच म्हणाली, " असं पहा सुरेशबाबू, कोणत्याहि परिस्थितींत विधवाविवाह होणं तुम्हांला इष्ट वाटत नाहीं का ? "

हातांतला चहाचा पेला तोंडापासून दूर न धरतां सुरेशनें उत्तर दिलें, " वाटतं — अवश्य वाटतं ! त्याचं कारण असं आहे, कुसंस्काराचा पगडा अजून माझ्यापर्यंत येऊन पोंचलेला नाहीं. "

विचार करायला स्वतःला एक क्षणभरसुद्धां अवधी न देतां अचला म्हणाली, " तर मग मृणालसारख्या मुलीबरोबर लग्न करायला तुम्हांला एवढा संकोच वाटतां कामा नये. "

हातांतला पेला तसाच धरून सुरेश ताठरून म्हणाला, " याचा काय अर्थ ? "

अचलेच्या मुद्रेवर किंवा आवाजांत कोणत्याही प्रकारची उत्तेजना दिसून आली नाहीं. अगदीं साहजिकपणें ती म्हणाली, " नानाप्रकारें मी तुमच्या ऋणांत ऋणाईत आहें. शिवाय तुमचं बरं व्हावं असंच मला सदोदित वाटतं. तुम्ही नीट मार्गावर यावं, संसारी व्हावं, स्वाभाविक जीवन जगत असलेलं मी पहावं. पूर्वी आपण लग्नाला तयार झालां होतां — आज माझं आग्रहाचं मागणं आहे तें तुम्हीं दिलं पाहिजे. "

[library stamp]

एका दमांत एवढ्या सगळ्या गोष्टी एकदम बोलून टाकल्यामुळें अचलेला जणूं धाप लागली होती.

सुरेश दगडाच्या पुतळीसारखा कितीतरी वेळ स्वस्थ बसून राहिला होता. शेवटीं तो म्हणाला, " खरोखरच तुला यामुळं समाधान वाटेल का ? "

अचला म्हणाली, " हो ! "

" ती कबूल होईल का ? "

" असं मला वाटतं ! "

सुरेश चेहरा पाडून हंसत म्हणाला, " मला नाहीं असं वाटत ! सहगमनाच्या वेळीं कुणी कुणी सती हंसतमुखानं सरणावर चढून स्वतःला जाळून घेतल्याच्या गोष्टी आपण पुस्तकांत वाचल्या आहेत. त्या जातीची आहे ही मृणाल. तिच्या तोंडून अशी संमति मिळवणं तर दूरच राहो, पण एकेक हात पाय तोडून काढला तरी देखील पुन्हां लग्न करायला तिची संमति मिळणं अशक्य आहे. ही असाध्य गोष्ट साध्य करून दाखवायचा भार माझ्यावर टाकून मला जमीनदोस्त करायला पाहूं नकोस अचला ! ती मला ' दादा ' म्हणते. तिनं दिलेला हा मान मला कायम राखूं दे. "

पहातां पहातां अचलेचा चेहरा संतापानें काळवंडून गेला. सुरेशच्या तोंडचें वाक्य संपतें न संपतें तोंच ती दांतओंठ खाऊन पण खालच्या आवाजांत म्हणाली, " या जगांत एकटी मृणालच तेवढी सती नव्हे सुरेशबाबू. एकदां जिथं मन गेलं आणि नवरा म्हणून ज्याला पत्करलं, तर सहस्र कोटि आमिषं दाखविलीं तरी देखील ज्यांची वृत्ति तिथून ढळणार नाहीं अशाही सती आहेत. कदाचित् आपल्या छापलेल्या पुस्तकांत असल्या हकिकती वाचायला मिळाल्या नसतील तुम्हांला, तरी पण त्या खऱ्या आहेत हें तुम्हांला मी बजावून सांगतें सुरेशबाबू. "

तिचें तें भाषण ऐकून थक्क होऊन बावरून गेलेल्या सुरेशकडे एक कोरडी नजरसुद्धां न फेंकतां ती अभिमानी स्त्री शांतपणें पावलें टाकीत तिथून निघून गेली.

## २

एकानें मनाच्या उसळीसरशीं निष्कपट बुद्धीनें प्रशंसा करावी पण त्यांत दुसऱ्या एकाबद्दल अतिशय कठोर अशी अपमानाची जाणीव आणि निर्दयपणाचा आघात छपवलेला असावा—वक्ता आणि श्रोता या दोघांपैकीं एकालाही कांहीं वेळापूर्वीं याची जाणीवही नसावी. हातचा पेला तसाच हातांत धरून सुरेश

ताठरून बसला होता. अचला आपल्या खोलींत जाऊन दार बंद करून घेऊन उशींत तोंड खुपसून आंतून येणारी रडयाची अनिवार उसळी आवरण्याचा प्रयत्न करीत होती. शेजारींच महिमची खोली होती. एवढासुद्धां भलतासलता आवाज त्याच्या कानीं जाणें इष्ट नव्हतें. तसें पाहिलें तर या हृदयांतल्या क्रंदनाचा इतिहास तिच्या हृदयस्थाखेरीज दुसऱ्या कुणालाच कळून आला नसता.

पण यांतून एक गोष्ट निघाली—स्वतःच्या या आत्यंतिक दुःखांतून तिला एक नवीन तत्त्व सांपडलें. या नारी जीवनांत सतीत्त्व म्हणजे केवढें मोठें ऐश्वर्य होतें याची अचुक कल्पना आणि या सतीत्त्वाचा सर्वांगीण महिमा आज पहिल्यानेंच संपूर्ण स्वरूपांत तिच्या नजरेसमोर दिसून आला.

त्या दिवशीं सुरेशच्या अनुषंगानें बापाची संदिग्ध दृष्टि म्हणजे एक निष्कारण उपद्रवाची बुद्धि आहे असें वाटून ती जितकी बेफाम चिडली होती, तितकेंच तिला दुःखही झालें होतें. पण आज एकाएकीं या धर्महीन आणि परस्त्रीलुब्ध सुरेशला सतीत्त्वाच्या पदकमलावर अशा प्रकारें मस्तक नमवतांना जेव्हां तिनें पाहिलें तेव्हां आपलें खरेंखुरें स्थान कुठें आहे हें जाणण्याची दृष्टि तिला प्राप्त झाली.

आणखी एक गोष्ट—

उघड उघड बोललेल्या शब्दांत केवढें मोठें सामर्थ्य असतें याचा खरा खरा प्रत्यय आज तिला पहिल्यानेंच मिळाला. ती एक सुशिक्षित स्त्री होती. कायामनोनिष्ठेनें नवऱ्याला सर्वस्व अर्पण करणें म्हणजेच सतीत्त्व हें तिला माहित नव्हतें असें नाहीं. नुसता देह किंवा नुसतें मन हीं एक एक स्वयंपूर्ण नव्हेत, हेंही तिला चांगल्या प्रकारें कळत होतें. तिचें मन चळलें होतें—उडालें होतें—नवऱ्यावरचें प्रेम नाहींसें झालें होतें, ही गोष्ट उघड उघड मोठ्यानें बोलून दाखवायला तिच्या जिभेला जरी संकोच वाटला नसता, तरीही आजपर्यंत तिला स्वतःच्या या क्षुद्रपणाची जाणीव नव्हती. पण आज ज्यावेळीं सुरेशच्या तोंडच्या ह्या नकळत बाहेर आलेल्या पण उघड उघड शब्दांनीं तिच्या नांवाशीं 'अ–सती' शब्दाची जोड दिली गेली असें तिला दिसून आलें, त्यावेळीं तिचा अंतरात्मा काळिज फुटलेल्या वेदनेनें केविलवाणी हांक फोडून रडकुंडीला आला.

या एवढ्याच गोष्टीमुळें मृणालबद्दलचा तिचा आदर वाढला असें मात्र मुळींच नव्हे—पण या मुलीच्या बाबतींत निघालेल्या गोष्टीमुळें जी जाणीव जागी झाली होती, ती कांहीं केल्या विसरली जाणार नाहीं—विसरली जाऊं नये—अशी पुन्हां पुन्हां ती आपल्याशींच खूणगांठ बांधून घेत होती.

बाहेर बापाच्या हातच्या काठीचा आवाज आणि त्याच्या मागोमाग सुरेशच्या पावलांचा आवाज तिच्या कानीं आला. ते महिमला पहायला जात होते हें तिला कळलें होतें. थोड्याच वेळांत बापाच्या तोंडची हांक ऐकून तिनें आपल्या पदरानें डोळे नीट पुसून घेतले आणि दार उघडून बाहेर येऊन ती महिमच्या खोलींत येऊन हजर झाली.

केदार बाबू तिच्या तोंडाकडे पाहून रागारागानें म्हणाले, " हें आहे काय आज ? दोन वाजतां सुरवा द्यायचा — आतां चार वाजून गेले !—हें काय ! तुझे डोळे हे असे काय दिसताहेत ? झोंपली होतीस कीं काय ? "

अचलेनें यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. ती तशीच निघून गेली. रोग्याला सुरवा देण्याची व्यवस्था झाल्यापासून तें काम मृणाल करीत होती. सुरव्याचें भांडें नोकर चुलीवर चढवीत असे आणि योग्य वेळीं ती तें उतरून घेत असे. मृणाल गेल्यामुळें आतां तें काम अचलेवर येऊन पडलें होतें, पण तिला त्याची आठवणच नव्हती. ती धांवतच गेली आणि पहाते तों विस्तव केव्हांच निवून गेला होता आणि सारें कांहीं जळून सुकून गेलें होतें.

तें पहात ती बराच वेळ तशीच उभी राहिली होती. नंतर जेव्हां ती परत खोलींत आली आणि झालेली हकीकत तिनें केदारबाबूंना सांगितली त्यावेळीं केदारबाबू तिला कांहींच बोलले नाहींत. सुरेशला उद्देशून ते कठोरपणें म्हणाले, " तेव्हांच तुला सांगत होतों सुरेश, एकादी चांगलीशी नर्स आणून ठेवल्याशिवाय महिमला वांचवतां यायचं नाहीं. माझी मुलगी कशी आहे तें माझ्यापेक्षां तुम्हांला का अधिक चांगलं कळतं ? "

सुरेश कांहीं सुद्धां उत्तर न देतां स्वस्थ बसून राहिला होता, पण महिम मात्र हा वेळपर्यंत मुकाट्यानें आपल्या बायकोच्या शरमेनें दीन झालेल्या चेहऱ्याकडे सारखी टक लावून पहात होता तें कुणाच्याच लक्षांत आलें नव्हतें. तो आतां ओढलेल्या आवाजानें म्हणाला, " नर्सचं हातचं औषध घेणं सुद्धां मला पटत नाहीं सुरेश ! हिच्या हाताजवळ काम करायला कुणीतरी एखादं माणूस द्या. कालपरवां दोन रात्रीं तिला सारी रात्र जागावं लागलं होतं. दिवसाच्या वेळीं थोडासा आराम करण्यापुरता अवकाश नाहीं मिळाला तर माणसाला काय, पण कळसूत्री यंत्रालासुद्धां आपलं काम झेपायचं नाहीं रे बाबा ! "

हे त्याचे उद्गार अक्षरशः खरे नसले तरी मुळींच खोटे नव्हते. सुरेशनें खूष होऊन वर पाहिलें. आपण कठोर बोललों याची जाणीव होऊन केदारबाबू

ओशाळले होते. ते कांहींतरी गोडसें बोलून झालेला परिणाम घालवायचा प्रयत्न करायच्यापूर्वीच अचला खोलींतून निघून गेली होती.

आजारी असलेल्या नवऱ्यापाशीं बसावें आणि रडूनकढून आपल्या अपराधाचा पाढा त्याच्यापुढें वाचावा, त्याची क्षमा मागावी आणि एकदां विचारावें, कीं आपल्यासारख्या पापिणीचा बचाव करण्याची ही उठाठेव कां केली म्हणून— असें रात्रीं अनेकवार तिच्या मनांत येत होतें, पण शरमेची जाणीव इतकी तीव्र झाली होती, कीं ते शब्द तिच्या तोंडावाटे कांहीं बाहेर आले नाहींत.

सुरेशनें एक काम पत्करलें होतें. रोज भल्या मोठ्या रात्रीं तो एकदां महिमच्या खोलींत जाई आणि जरूर असलेली सारी व्यवस्था यथास्थित झाली आहे कीं नाहीं तें पाही, तेव्हांच झोंपायला जाई. मृणाल होती तोंपर्यंत तो बहुधा सारी रात्र ये जा करीत असे. त्यावेळीं तशी जरूरीही होती. पण अलीकडे कांहीं दिवस त्यानें महिमच्या खोलींत सहजासहजीं यायचें बंद केलें होतें. तशीच जरूर पडली तर मोलकरणीला पाठवून तो खबर काढीत असे. मात्र संध्याकाळ व्हायच्या पूर्वीं तो एकदांच स्वतः येऊन एक क्षणभरच थांबून त्याचा समाचार घेऊन जात असे.

त्याच्या पूर्वींच्या संवयींत हा नवा बदल झाल्याचें पहिल्यानें ध्यानीं आलें तें अचलेच्या. पण या बाबतींत सहज एकादा शब्द उघडपणें काढणें सुद्धां तिला रुचत नव्हतें, म्हणूनच ती कांहीं न बोलतां उगीच राहिली होती. पण ज्या दिवशीं स्वतः महिमनेंच या गोष्टीचा उल्लेख केला त्यावेळीं तिला बोलणें भाग पडलें. आजकाल तो बहुतेक सारा वेळ घरीं रहातच नव्हता. असें करण्याचा त्याचा काय उद्देश होता याची तिलाही कल्पना नव्हती.

महिमनें ते मुकाट्यानें ऐकून घेतलें. पण त्या बाबतींत आपलें मतामत त्यानें उघड केलें नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं अचला जिन्यावरून खालीं येत होती, त्याचवेळीं सुरेश जिना चढून वर जात होता. त्यानें वर नजर करून पाहिलें आणि अचला समोर दिसतांच तो एका बाजूला सरकला. प्रत्येक बाबतींत तो आपल्याला अशा-प्रकारें चुकवतो आहे, टाळतो आहे. या बाबतींत आतां तिला एवढासुद्धां संशय राहिला नव्हता. केव्हांतरी एका वेळीं सारें अंतःकरण ओतून तिनें जी कामना केली होती, आज त्याच तिच्या अंतःकरणाला सुरेशच्या या वागणुकीमुळें वेदना झाल्याची तीव्र जाणीव झाली.

## ३

सर्व प्रकारचें कामकाज करतांना आणि उठतांबसतांना सुद्धां अचलेच्या हृदयाच्या सांदिकोपऱ्यांत प्रत्येक क्षणाला एकाच विचाराचा जाळ सळसळत होता. सुरेशच्या अंतःकरणांत एक प्रकारचा अचाट बदल चालू होता; पण त्याच्याशीं आपला कांहीं संबंध नाहीं असें तिला वाटत होतें. एका काळीं जें एक उद्दाम प्रेम त्याच्या ठायीं निर्माण होऊन वाढत जात होतें तें आज लक्तरांप्रमाणें कुठेंतरी फेंकून दिलें गेलें होतें—कुठेंतरी निघून गेलें होतें. ती आपली आपल्यालाच हजारों प्रकारें दोष देत होती, हजारों प्रकारें स्वतःला बोल लावून घेऊन जिवाचा आटापिटा करीत होती, तरीही कांहीं केल्या ही तुटल्किीची वेदना स्वतःच्या अंतःकरणांतून दूर करणें तिला शक्य होत नव्हतें.

एवढेंच नव्हे, तर केव्हां केव्हां मधूनमधून तिच्या मनांत असा संशय डोकावत असे, कीं अगदीं नकळत, अगदीं चोरटेपणानें, आपण सुरेशवर प्रेम तर करीत नाहीं ? हा विचार मनांत येतांच ती विलक्षण भीतीनें शहारून जात असे. जेव्हां जेव्हां हा विचार तिच्या मनांत येई तेव्हां तेव्हां ती आपली आशंका असंगत आणि अमूलक आहे असा समज करून घेऊन उडवून देण्याचा प्रयत्न करीत असे. स्वतःला खोडून काढून ती म्हणे, कीं ही असली अशक्य गोष्ट शक्य होण्यापूर्वी आपण गळ्याला फांस लावून घेतला असता.

तरीही ही भावना भुताच्या छायेसारखी तिचा पाठपुरावा करीत होती. हिंडतां फिरतांनासुद्धां ती तिच्या डोळ्यांसमोर नाचत होती. या भयंकर भावनेपासून स्वतःचा बचाव करण्यासाठीं स्नानभोजनव्यतिरिक्त केव्हांही आपल्या नवऱ्यापासून दूर होऊन रहाण्याचें तिला धैर्य होत नसे. शेजारची खोली ही तिच्या स्वतःच्या रहाटीकरितां म्हणून दिलेली होती, पण कित्येक दिवसपर्यंत त्या खोलींत पाऊल टाकण्याची प्रवृत्ति तिला होत नव्हती.

अशाच प्रकारें कांहीं दिवस निघून गेले. महिमला आतां आरोग्याचा लाभ झाला होता. हवाबदलीसाठीं लौकरच त्याला जबलपूरला पाठवायच्या गोष्टी सुरू झाल्या होत्या.

त्या दिवशीं सकाळीं अचला जमिनीवर बसून एका स्टोव्हवर नवऱ्यासाठीं दूध गरम करीत होती. दूध पुन्हां पुन्हां उतास जात होतें, त्यामुळें इकडेतिकडे पहायला तिला एवढासुद्धां अवसर मिळत नव्हता. महिम सारखी नजर लावून तिच्याकडे पहात बसला होता याची तिला जाणीव नव्हती. नवऱ्याच्या तोंडून

अकस्मात् निघालेला एक मोठा सुस्कारा कानीं आल्यामुळें तिनें एकदां नजर वर करून त्याच्याकडे पाहिल्यासारखें केलें आणि पुन्हां ती आपल्या कामांत गुंग झाली.

वाजवीपेक्षां जास्त बोलणें हा महिमचा स्वभाव नव्हता. पण आज एक सुस्कारा सोडून तो म्हणाला, " असं पहा अचला, दुःखाचा मोठा प्रसंग आल्याशिवाय केव्हांही माणसाला मोठ्या वस्तूची प्राप्ति होत नाहीं. माझं घर पुन्हां उभं राहील, आजारही बरा होईल, पण या सर्वांतून जी एक बिनमोल वस्तु मी मिळवली आहे ती तूं. आजकाल मला असं वाटूं लागलं आहे, कीं तुला सोडून मला एक दिवससुद्धां जगतां यायचं नाहीं ! "

अचला मुकाट्यानें गरम दूध वाटींत ओतून थंड करीत होती. तिनें कांहीं उत्तर दिलें नाहीं ! "

महिम क्षणभर थांबला आणि पुन्हां म्हणाला, " मृणाल आणि सुरेश यांनीं माझी सेवा कांहीं थोडीथोडकी केली नाहीं. पण कां कोण जाणें, शुद्धीवर होतों त्यावेळीं त्यामुळं मला एक प्रकारची अस्वस्थता वाटत होती. सारखं मनाला वाटत असे, किती कष्ट पडताहेत यांना! किती गैरसोयी सोसाव्या लागताहेत माझ्यासाठीं! यांच्या दयेचं हें ऋण या जन्मांत मी कसं फेडणार आहें ? पण देवाच्या हातानं जोडलेला हा संबंध असा आहे, कीं तुझ्या या सेवेचं ऋण केव्हां फेडलं पाहिजे अशी कल्पना माझ्या मनांत केव्हांही आली नाहीं. मला जगवणं ही जशी कांहीं तुझी स्वतःचीच गरज होती !..." असें म्हणून महिम थोडासा हंसला.

अचला मान खालीं घालून दूध ढवळीत होती. ती कांहींच बोलली नाहीं.

महिम म्हणाला, " आणखी किती थंड करणार आहेस तें ? दे ना ! "

तरीही अचलेनें उत्तर दिलें नाहीं. तशीच मान खालीं घालून ती बसून राहिली होती. या गोष्टीचें महिमला पहिल्यानें थोडेंसें आश्चर्य वाटलें. पण नंतर लगेच त्याच्या ध्यानांत आलें—आपल्या डोळ्यांतलें पाणी आपल्या नवऱ्याला दिसूं नये म्हणूनच अचला अशी एकसारखी मान खालीं घालून बसली होती.

सुरेश अलिकडे फारसा कां येत नाहीं त्याचें निश्चित कारण महिमला कळत नव्हतें. तरीही त्याला थोडाबहुत अंदाज आला नव्हता असें नाहीं. त्यामुळें एक प्रकारचा क्षोभमिश्रित आनंद त्याच्या मनाला होत होता. अचला सावध झाली होती. इतर कुणी नसतांना अचानक त्याची आपली भेट होईल या भीतीनें

ती खोली सोडून सहसा कुठें बाहेर जात नव्हती, असेंही त्याच्या मनाला जाणवूं लागलें होतें. या साऱ्या कल्पना मनांत आल्यामुळें आज त्याचें मन एक प्रकारें स्वतःच्या वातावरणांत भिरभिरत राहिलें होतें. त्याच्या बिछान्याच्या शेजारीं थोड्या अंतरावर एक खुर्ची होती. त्या दिवशीं बऱ्याच रात्रींपर्यंत तिथें बसून अचला एक पुस्तक वाचीत होती आणि शेवटीं थकून जाऊन उरलेल्या रात्रीं तिथेंच झोंपी गेली होती. दुसऱ्या दिवशीं सकाळीं महिमनें हांक मारली त्यावेळीं ती घाबरून उठून बसली होती आणि खिडकी उघडून पहाते तों दिवस बराच वर आला होता असें तिला दिसलें.

महिम त्यावेळीं तिला कांहींतरी सांगणार होता. तोंच थांबून उगी राहिला आणि तिच्याकडे आपादमस्तक नजर टाकून आश्चर्य प्रदर्शित करीत म्हणाला, "तुझं स्वतःचं वस्त्र काय झालं ?"

अचलेनें त्याच्याहीपेक्षां आश्चर्यचकित होऊन नेसलेल्या वस्त्राकडे एकवार नजर टाकली. जाग आल्यावेळीं घाईघाईनें ती तें वस्त्र पांघरून आली होती. ती तिची स्वतःची शाल नव्हती, तें सुरेशचें धोतर होतें. नवऱ्याच्या या प्रश्नानें तिला फटका बसल्यासारखें वाटलें. शरमेनें तिचा चेहरा गोरामोरा झाला. पण ही गोष्ट कशी घडली हें कांहीं केल्या तिच्या ध्यानीं येईना.

तिला आठवलें, कीं गेल्या रात्रीं झोंप लागली त्यावेळीं आपली शाल घडी करून आपण आपल्या पायावर टाकली होती, आणि पदर तेवढा अंगावर गुंडाळून घेऊन आपण वाचायला बसलों होतों. झोपेंत मधून मधून कडक थंडी जाणवत होती असें आतां तिला वाटत होतें. जागे होऊन पाहिलें तों हें !

पत्नीच्या शरमिंद्या झालेल्या उतरलेल्या चेहऱ्याकडे पाहून महिम मोठ्या कौतुकानें हंसला. तो म्हणाला, "एवढं लाजायला कशाला हवं अचला ? ही गल्लत नोकरानं केली असेल. तुझं वस्त्र त्याच्या खोलींत आणि त्याचं वस्त्र तुझ्या खोलींत ठेवून दिलं असेल. कदाचित् सुरेशनंच काल चुकून तें असंच फेंकून दिलं असेल आणि रात्रीच्या वेळीं ओळखतां न आल्यामुळें तूं ते घेतलं असशील. नोकराला हांक मार आणि तें बदलून आणायला सांग."

"सांगतें हं !" असें म्हणून अचला खोलीबाहेर आली. शेजारच्या खोलींत येऊन ती थकल्यागत खालीं बसली त्यावेळीं काय झालें होतें तें तिच्या ध्यानीं आल्यावांचून राहिलें नाहीं. मध्यरात्र उलटून गेल्यावर सगळींजणें गाढ झोंपीं गेलीं असतां सुरेश मुकाट्यानें आंत आला असावा आणि एवढ्या थंडींत ती

अशा प्रकारें झोंपी गेलेली आहे असें पाहून आपल्या अंगावरील वस्त्रानें तिचें सर्वांग मोठ्या मायेनें झांकून घेऊन निघून गेला असावा. या बाबतींत आतां मुळींच संशय राहिला नव्हता.

तो त्यावेळीं आपल्याकडे कोणत्या प्रकारच्या आशाळभूत नजरेनें पहात राहिला असेल त्याचें चित्र डोळे झांकून तिनें नजरेसमोर आणलें त्यावेळीं तिच्या अंगावर रोमांच उभे राहिले. केवळ तिला पहाण्यासाठीं—नीट निरखून पहाण्यासाठींच तो अशा प्रकारें आला असावा—कदाचित रोज रात्रीं असाच येत असावा आणि तें कुणाच्याही नजरेला येत नसावें असेंच तिला वाटलें.

या त्याच्या विलक्षण वागणुकीमुळें ती लाजेनें चुरमार झाली. त्याचें हें वर्तन तिला असभ्य वाटलें—गर्हित वाटलें, अभद्रही वाटलें. ती हजारों प्रकारें त्याला दोष देऊं लागली आणि पाहुण्याच्या बाबतींत घरच्या मालकानें दाखविलेल्या या चोरट्या वृत्तीबद्दल यत्किंचितही क्षमा करावयाची नाहीं अशी आपल्या मनाशीं ती पुन्हा पुन्हां प्रतिज्ञा करूं लागली.

तरीही तिचें सारें अंतःकरण या तक्रारीला होकार देत नव्हतें, हेंहि तिला जाणवल्यावांचून रहात नव्हतें. आजपर्यंत उठतांबसतांना कोणती गोष्ट आपल्या मनाला सारखी डांचत राहिली आहे हेंहि तिला आतां उघड उघड दिसून येऊं लागलें होतें.

केदारबाबूंचा एक बालमित्र जबलपूरला रहात होता. त्याजकडून पत्राचें उत्तर आलें होतें. हवापाणी आणि नैसर्गिक सौन्दर्याच्या दृष्टीनें हें स्थान उत्कृष्ट होतें. त्याचें स्वतःचें घरही फार मोठें होतें. आणि महिम तिथें रहायला आला तर अगदीं आपलेपणाच्या भावनेनें त्यानें तिथें खुशाल रहावें असें त्यानें कळवलें होतें. एके दिवशीं सकाळीं केदारबाबूंनीं येऊन ही बातमी दिली. माघ महिना आतां संपत आला होता. प्रवासाचे अल्पस्वल्प श्रम सहन करण्याची शक्तिहि महिमच्या ठायीं आली होती. उगीच अधिक वेळ न घालवतां आतां जायला निघणें अवश्य होतें.

तारुण्याच्या कालांत केदारबाबू स्वतः एकदां जबलपूरला गेले होते त्याची अजून त्यांना आठवण होती. मोठ्या उत्साहानें त्यावेळचें तें वर्णन खुलवून खुलवून सांगत होते. त्यांचा मित्र जगदीश याची बायको अजूनही हयात होती, ती आईसारखी महिमची काळजी घेईल असें ते सांगत होते. योगायोगानें आपल्यालाही तो देश पुन्हां एकदां पहायला मिळेल असें ते म्हणाले.

महिम त्यांचें भाषण मुकाट्यानें ऐकत होता. पण कोणत्याही प्रकारें त्यानें कसलाच उत्साह दाखवला नाहीं. त्याची ही उदासीनता फक्त अचलेच्या ध्यानीं आली. बाप निघून गेल्यावर तिनें हळूच विचारलें, " कां ? जबलपूर छान गांव आहे. तिथं जावंसं वाटत नाहीं का तुम्हांला ? "

महिम म्हणाला, " तुम्ही लोक माझी प्रकृति जितकी बरी झाली आहे असं समजतां, तितकी शक्ति अजून मला आलेली नाहीं. पुन्हां केव्हां मी पूर्व-पदावर येईन याचीही मला फारशी खात्री नाहीं. "

अचला म्हणाली, " म्हणूनच तर डॉक्टर तुम्हांला हवाबदल करायला सांगताहेत. एकदां एक चक्कर मारून आलं कीं सारं कांहीं ठीक होईल. "

महिमनें नुसती मान हलवली. क्षणभर तो कांहीं बोलला नाहीं. नंतर तो म्हणाला, " कुणी सांगावं ! अशी ही प्रकृति असतांना, स्वतःवर म्हण कीं दुसऱ्या कोणावर म्हण, भार टाकून स्वर्गाला जायचीसुद्धां मला खात्री नाहीं. अचला, आंतल्या आंत मी भारीच दुबळा झालों आहें—भारीच अशक्त झालों आहें. तूं सारखी जवळ नसलीस तर मी फार दिवस जगणारसुद्धां नाहीं !—" बोलतां बोलतां त्याचा गळा दाटून आला.

ज्यानें कधीं तोंड उघडून कांहीं मागितलें नाहीं, कधीं आपल्याला होणारे क्लेश किंवा गरजा उघड करून सांगितल्या नाहींत, त्याच्याच तोंडून निघालेली ही काकुळतीची याचना अचलेच्या हृदयाला बाणासारखी भेदून गेली. तिच्या हृदयांतल्या आजवर तुंबून राहिलेल्या स्नेहाच्या आणि करुणेच्या – त्याचप्रमाणें साऱ्या माधुर्याच्या भावना एकाएकीं एकाच क्षणांत उफाळून आल्या. आपलें मन आपल्याला आतां आवरतां येणें अशक्य होईल आणि आपल्या हातून भलतेंच कांहींतरी होऊन बसेल या भीतीनें डोळ्यांतलीं आंसवें लपवीत लपवीत ती एकदम धांवतच बाहेर गेली. महिम हतबुद्ध झाल्याप्रमाणें कितीतरी वेळपर्यंत चकित होऊन त्या उघड्या दरवाज्याकडे सारखी टक लावून पहात राहिला होता. थोड्याच वेळांत तो बिछान्यावर आडवा झाला.

पुन्हां ज्यावेळीं उभयतांची भेट झाली त्यावेळीं या बाबतींत त्या पतिपत्नींत कोणतीच गोष्ट निघाली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं अचला एक तार हातीं घेऊन आली आणि हंसत हंसत म्हणाली, " जगदीशबाबूंनीं हें तारेचं उत्तर दिलं आहे. त्यांच्या घराच्या शेजारींच आमच्यासाठीं त्यांनीं एक छोटं घर ठरवून ठेवलं आहे. "

महिमला तिच्या म्हणण्याचा अर्थ नीटसा कळला नाहीं. त्यानें विचारलें, " म्हणजे काय ? "

अचला म्हणाली, " बाबांचा तो मित्र, तेव्हां आपल्या घरीं त्यांनीं तुम्हांला जागा दिली असती. पण आपणां दोघांचा भार त्यांच्यावर टाकणं कांहीं बरं दिसत नाहीं म्हणून काल मी दुसरं घर ठरवण्यासाठीं तार करायला बाबांना चिठ्ठी लिहून कळवलं होतं. त्या तारेचं हें उत्तर. " असें म्हणून तिनें एक पिवळें पाकीट नवऱ्याच्या बिछान्यावर फेकलें.

महिमनें ती तार हातीं घेऊन अथपासून इतिपर्यंत वाचली आणि म्हटलें, " ठीक आहे. "

अचला आपल्याबरोबर येऊं पहात आहे हें त्याला कळून चुकलें. पण कालच्या तिच्या वर्तनाचा आज या क्षणापर्यंतही त्याला उलगडा झाला नव्हता, याची आठवण होऊन त्यानें कोणत्याही प्रकारें अवास्तव उत्सुकता प्रदर्शित करण्याचें टाळलें.

पण अचला मात्र निघण्याची तयारी मोठ्या धूमधामीनें करीत होती. त्या दिवशीं दुपारीं ती ज्यावेळीं आपल्या घरीं आली आणि आपल्या सामानसुमानाची आवराआवर करूं लागली त्यावेळीं दाराबाहेर उभे राहून केदारबाबू तिच्या त्या धांवपळीकडे मुकाट्यानें पहात होते. ते म्हणाले, " तूं नाहीं गेलीस तर चालायचं नाहीं का पोरी ? "

अचला दचकली. त्यांच्याकडे पाहून म्हणाली, " कां बाबा ? "

स्वास्थ्य आणि उपचाराच्या दृष्टीनें त्याच्याबरोबर तिनें रहाणें अशा प्रकृतीच्या परिस्थितींत बरें नव्हे, हें बापानें मुलीला कसें सांगायचें ? उघडपणें तसें सांगायला केदारबाबूंना संकोच वाटला. म्हणून महिमच्या सध्यांच्या आर्थिक परिस्थितीचा उल्लेख करून ते म्हणाले, " फार दिवस कांहीं रहायचं नाहीं. शिवाय जगदीश तिथं आहे. तो कांहीं उणं पडूं द्यायचा नाहीं. एवढ्या थोड्या दिवसांसाठीं उगीच कमीअधिक खर्चांत कां पडायचं ? — "

त्यांचा मूळ उद्देश अचलेच्या ध्यानीं आला नाहीं. बापाच्या नजरेला नजर देऊन तिनें विचारलें, " ते असं म्हणाले वाटतं ? "

" नाहीं ! महिम कांहींच बोलला नाहीं. मीच म्हणत होतों.— "

" ती काळजी तुम्हांला नको बाबा ! मी सारं कांहीं पाहून घेईन. " असें म्हणून अचला पुन्हां आपल्या कामाला लागली. दुसऱ्याच दिवशीं तिनें कुणाला न कळत आपल्या अंगावरचे दोन दागिने विकले आणि रोकड हातीं घेऊन ठेवली.

फाल्गुन महिन्याच्या मध्यावर प्रवासाला निघायचा बेत होता. पण सुरेशच्या आत्याबाईंनीं भटजींना बोलावून पंचांग पाहिलें आणि त्या महिन्यांतल्या पहिल्या आडवड्यांतलाच एक दिवस नक्की केला. तिच्या इच्छेला मान देणं सर्वांनाच भाग होतें.

जायच्या पूर्वीं दोन दिवस अचलेचा जीव जसा कांहीं हवेवर तरंगत होता. कलकत्ता सोडल्यानंतर थोड्या दिवसांसाठीं नवऱ्याच्या घरीं ती जी राहिली होती, त्याखेरीज दुसऱ्या कुठेंही जायची संधी तिला मिळाली नव्हती. अजून तिनें पश्चिमेचें तोंडसुद्धां पाहिलें नव्हतें. तिकडच्या पुराणकाळच्या गोष्टींचीं वर्णनें, वनेंजंगलें, पहाडपर्वत, नदनदी, पाण्याचे धबधबे वगैरेंचीं पुष्कळ वर्णनें तिनें लोकांच्या तोंडून ऐकलीं होतीं. त्यापलीकडे तें सारें कांहीं स्वतः पहाण्याची कल्पना तिच्या मनांत कधींच आली नव्हती.

आज तीं सारीं आश्चर्यकारक दृश्यें स्वतःच्या डोळ्यांनीं पहाण्यासाठीं ती निघत होती. शिवाय तिथें गेल्यावर नवऱ्याची ढांसळलेली प्रकृति पुन्हां पूर्वपदावर येईल ही आशाही होती. आपणच तिथली एकटी गृहिणी—घरची मालक—सर्व बाबतींत नवऱ्याला सहाय्य करणारी आपण एकटीच! तिथलें हवापाणी मोठें स्वास्थ्यकर असलेलें, जीवनयात्रेचा तिथला रस्ता अगदीं सरळ आणि सोपा—त्याची प्रकृति बरी झाली म्हणजे कदाचित आपण तिथेंच घरसंसार थाटूं आणि लवकरच तिथें अपरिचित असे नवे पाव्हणे एकामागून एक येऊन आपलें घर भरून सोडतील!— त्यांचीं छोटीं छोटीं मुखकमलें अगदीं ओळखीच्या ठशासारखीं तिच्या नजरेसमोर स्पष्ट दिसूं लागलीं.

अशा प्रकारचीं नाहीं नाहीं तीं सुखस्वप्नें तिच्या मस्तकांत रात्रंदिवस इतकीं कांहीं भिरभिरत होतीं, कीं त्यांना सीमा नव्हती. विशेष हें, कीं आपल्याला सोडून आपला नवरा स्वर्गांत जायलासुद्धां तयार नाहीं ही गोष्ट तिच्या मनांत इतकी घोळूं लागली होती, कीं त्यामुळें आजपर्यंतच्या साऱ्या काळज्यांचा निरास होऊन तिचें जीवन मधुमय झालें होतें. आतां कुणाच्या विरुद्ध कोणतीही तक्रार तिच्या मनांत येत नव्हती. अंतःकरणांतील सारी ग्लानी धुऊन पुसून निघून तिचें हृदय गंगाजळासारखें निर्मळ आणि पवित्र होऊन गेलें होतें.

जायच्या पूर्वीं एकच गोष्ट व्हावी असें तिला वाटत होतें जायच्या पूर्वीं एकदां मृणालला भेटावें, तिला हृदयाशीं घट्ट कवटाळून धरावें आणि कळत न

कळत घडलेल्या साऱ्या अपराधांबद्दल तिची क्षमा मागावी, असें तिला राहून राहून वाटत होतें.

आज सुरेशसाठीं देखील तिचा जीव कासावीस होत होता. एवढा जिवाभावाचा मित्र, पण लाजेनें आणि संकोचानें तो भेटायचें टाळीत होता. त्याच्या या दुर्भाग्याची चोरटी वेदना या वेळीं तिला जितकी जाणवली तितकी पूर्वी कधींच जाणवली नव्हती. अगदीं अंतःकरणपूर्वक त्याचीसुद्धां क्षमा मागून निरोप घेणें अवश्य होतें, पण तिनें चौकशी केली त्यावेळीं तिला कळून आलें, कीं कालपासून तो घरींच आला नव्हता.

जायच्या दिवशीं सकाळपासूनच आकाश ढगाळलें होतें. पावसाची बुरबुर सुरू झाली होती. सामानसुमानाची बांधाबांध पुरी झाली होती आणि त्यापैकीं कांहीं सामान स्टेशनवर देखील रवाना झालें होतें. तिकिटेंसुद्धां काढून आणलीं होतीं. अचलेसाठीं सुद्धां सेकंड क्लासचें तिकीट काढायची गोष्ट निघाली त्यावेळीं त्या प्रस्तावाला विरोध करून ती महिमला म्हणाली, " उगीच पैसे खर्च करण्याची हौस असेल तर घ्या तें तिकीट, पण मी तर चांगली धडधाकट आहें.— शिवाय असं पहा, मोठ्यामोठ्या लोकांघरच्या बायका इंटरक्लासच्या बायकांच्या डब्यांतून जातात तर मलाच कां जातां येऊं नये ? दीडपट भाड्यापेक्षां जास्त भाडं मी मुळींच खर्ची घालायला देणार नाहीं. "

अर्थात् तिच्या म्हणण्याप्रमाणेंच व्यवस्था करण्यांत आली.

उभे दोन दिवस सुरेशचा पत्ता नव्हता. पण आज सकाळीं बाहेर पाऊस पडत असल्यामुळें म्हणा, किंवा दुसऱ्या कांहीं कारणासाठीं म्हणा तो आपल्या अभ्यासाच्या खोलींत बसून होता. त्या आनंदहीन जागेंत वसंतांतल्या मधुर हवेच्या झुळकीप्रमाणें अचला जाऊन हजर झाली. तिच्या आवाजांत आनंदाच्या लहरी आत्यंतिकपणें उचंबळून आलेल्या दिसत होत्या. ती म्हणाली, " सुरेशबाबू, या जन्मीं माझं तोंडसुद्धां पहायचं नाहीं असं ठरवलंयत का ? असा एवढा मोठा कोणता अपराध माझ्या हातून घडला आहे, सांगा ना ? "

सुरेश पत्र लिहीत होता. त्यानें वर नजर करून पाहिलें. त्यांचें घर ज्यावेळीं जळालें होतें त्यावेळीं आसपासच्या झाडापेडांचें जें स्वरूप तिथून निघतांना तिला दिसलें होतें, तशाच प्रकारची कळा सुरेशच्या चेहऱ्यावर त्यावेळीं दिसत असल्याचें पाहून ती मनांतल्या मनांत शहारली. वसंतवायु उधळून गेला. काय

बोलण्यासाठीं आपण आलों होतों तें आठवत नाहींसें झाल्यामुळें तिनें उद्विग्नपणें विचारलें, " तुम्हीं आजारी होतां का सुरेशबाबू ? कुठं मला कळवलं नाहीं तें !"

एक क्षणभरच सुरेशनें वर पाहिलें. लगेच मान खालीं घालून तो म्हणाला, " नाहीं, मी आजारी नव्हतों. तशी छान आहे माझी प्रकृति ! " बोलत असतांना पुस्तकाचीं पानें उलटीत उलटीत तो पुन्हां म्हणाला, " आज तुम्ही लोक जाणार--सारी व्यवस्था झाली आहे ना ? बरेच दिवस आतां भेट व्हायची नाहीं म्हणायची ! "

दुसऱ्या बाजूनें उत्तर येत नव्हतें. मिनिटभर वाट पाहून सुरेशनें आश्चर्यचकित होऊन वर पाहिलें. अचलेचे दोन्ही डोळे भरून आले होते. दोघांची नजरानजर होतांच आंसवांचे मोठमोठे थेंब टपाटप खालीं पडले.

सुरेशच्या धमन्यांतून गरम रक्त सळसळून उठलें, पण आज यावेळीं आपली सर्व शक्ति एकवटून त्यानें आपलें मन काबूत ठेवलें आणि पुन्हां मान खालीं घातली.

अचलेनें पदरानें आपले डोळे पुसले. भरल्या गळ्यानें ती म्हणाली, " तुमची प्रकृति केव्हांच बरी नव्हती सुरेशबाबू. तुम्ही चला आमच्याबरोबर. "

सुरेशने नुसती मान हलवली आणि म्हटलें, " नाहीं. "

" नाहीं कां ? तुमच्यासाठीं -- " तिचें वाक्य पुरें झालें नाहीं. दाराबाहेरून नोकरानें हांक मारून म्हटलें, " बाबू, आपला चहा -- " बोलत बोलत तो दाराचा पडदा दूर करून आंत आला आणि त्याच क्षणाला अचला तोंड फिरवून बाहेर चालती झाली.

घटकाभरानें ज्यावेळीं ती आपल्या नवऱ्याच्या खोलींत आली त्यावेळीं महिमनें विचारलें, " सुरेश इतके दिवस कुठं गेला आहे तें माहित आहे का तुला ? आत्याबाईलासुद्धां त्यानं कांहीं सांगितलं नाहीं का ? आजसुद्धां त्याची माझी भेट व्हायची नाहीं का ? "

अचला हळूच म्हणाली, " आज तर ते घरींच आहेत. "

महिम म्हणाला, " छे ! नाहीं. तो सकाळींच कुठं बाहेर गेला असं आतांच मला मोलकरणीनं येऊन सांगितलं. "

यावर अचला कांहीं बोलली नाहीं. थोड्या वेळापूर्वीं त्याची आपली भेट झाली होती, त्याची प्रकृति बरीच बिघडलेली आहे, लहानपणच्या त्या प्रसंगाप्रमाणेंच याही वेळीं त्यानें तुमचा जीव वांचवला आहे—केवळ एवढ्यासाठीं

तरी कृतज्ञतेच्या भावनेनें त्याला आपल्या तिकडे बोलावणें अवश्य आहे— आतां कांहीं त्याची भीति धरायला नको—आधींच शरमेनें मरून गेलेल्या जिवाला संशयाच्या नजरेनें पाहून अधिकच लाजवूं नका—असें पुष्कळसें कांहीं तरी सांगावें म्हणून ती आली होती. पण अंतरांतल्या या साऱ्या गोष्टी उघड बोलून दाखवायला तिची जिव्हा वाहिली नाहीं. नवऱ्याच्या तोंडाकडे नीटसें पहाण्याचेंसुद्धां तिला धैर्य झालें नाहीं. उगीच कांहींतरी काम काढून ती कांहीं न बोलतां त्या कामांत स्वतःला गुंतवून घेऊन राहिली.

स्टेशनवर जायची वेळ जवळ येत चालली होती. खालीं केदारबाबू हांकाहांकी करीत होते. हातीं पूर्णकुंभ घेऊन आत्याबाई इकडे तिकडे गडबड करीत होत्या. नोकरलोक सामानसुमान गाडीवर चढवीत होते, पण घरचा जो मालक त्याचाच कुठें पत्ता नव्हता.

असें होतें तरीही त्याच्या गैरहजेरीबद्दल उघड चर्चा करण्याचें कुणाला धैर्य होत नव्हतें. एकंदरींत या प्रकरणीं सर्वांचाच कोंडमारा झाला होता.

केदारबाबूंनीं आपल्या मुलीला एका बाजूला बोलावून घेतलें आणि तिच्या मस्तकावर हात ठेवून गहिंवरल्या शब्दांनीं ते म्हणाले, " सतीलक्ष्मी हो पोरी— आपल्या आईसारखी हो. म्हातारा झालेला मी — नकळत भलतं बोलून गेलों त्याचा राग धरूं नकोस पोरी ! " असें म्हणून ते एकदम बाजूला निघून गेले.

महिम गाडींत बसायला निघाल्यावेळीं खिन्नपणें अचलेला हळूच म्हणाला, " शेवटीं खरोखरच त्यानं माझी भेट घेतली नाहीं. एक गोष्ट सांगण्यासाठीं दोन दिवस मी सारखी त्याची वाट पहात होतों. "

बापाच्या उद्गारामुळें तिच्या डोळ्यांना पाझर लागला होता म्हणून तिनें नुसती मान हलवून नकार दिला.

दाराआड आत्याबाई उभ्या होत्या. अचलेनें जाऊन भक्तिभावानें तिला प्रणाम करून पायधूळ घेतली, त्यावेळीं गहिंवरलेल्या आवाजानें तिला असंख्य आशीर्वाद देत ती म्हणाली, " तुझ्या हातींचा चुडा अक्षय होवो मुली ! नवऱ्याला धडधाकट करून लवकर परत घेऊन ये, एवढंच सांगायचंय तुला ! "

" सर्वांपेक्षां हाच तुमचा मोठा आशीर्वाद आहे आत्याबाई ! " असें म्हणून डोळे पुशीत पुशीत ती जाऊन गाडींत बसली. ते तिचे उद्गार केदारबाबूंच्या कानीं गेले त्यावेळीं ते आपण केलेल्या अक्षम्य चुकीमुळें शरमेनें चूरमार होऊन गेले.

## ४

हावरा स्टेशनवरून पश्चिमेच्या बाजूला जायला गाडी निघायला आतां उण्यापुऱ्या दहा मिनिटांचा आवकाश होता. आकाशांत काळे ढग आले होते. पावसाची बुरबुर थांबत नव्हती. चिखलांनीं भरलेल्या उतारूंच्या पावलटीमुळें सारा प्लॅटफॉर्म भरून गेला होता. त्यांतून पाय चुकवीत गर्दीतून घुसत बोजे माथ्यावर घेतलेले उतारू जागा शोधीत इकडून तिकडे फेऱ्या घालीत होते—इतक्यांत अचलेनें सहज पाहिलें, तों हातांत एक भली मोठी बॅग घेऊन सुरेश येत असल्याचें तिला दिसून आलें. केदारबाबू आश्चर्यचकित झाले. भलत्याच दुश्चिंतेनें त्यांचा चेहरा काळवंडून गेला. तो जवळ येतो न येतो तोंच ते मोठ्यानें ओरडून म्हणाले, " काय भानगड आहे सुरेश ? कुणीकडे जायला निघाला आहेस ? "

सुरेशनें उत्तर दिलें तें अचलेला. तिच्याकडे पाहून कोरडें हंसूं हंसत तो म्हणाला, " छे ! तुझा उपदेश फेंटाळून जाणं मोठं कठीण झालं मला. सकाळीं असं डोळ्यांत बोट घालून तूं जर दाखवून दिलं नसतंस तर माझी प्रकृति किती बिघडली आहे तें माझ्या ध्यानीं आलं नसतं. आतां चार दिवस तुमचा पाहुणा म्हणून येतों आणि प्रकृति बरी होते कीं काय तें पहातों. वास्तविक म्हणायचं म्हणजे म – "

" ठीक आहे, ठीक आहे. सुरेश, परक्या जागीं जातों आहों आम्हीं—तुझी फार मदत होईल ! " असें म्हणून महिमनें झट्कन अचलेकडे नजर फेंकून पाहिलें. त्या दृष्टींतच त्याचे सारे प्रश्न सांठले होते. जणूं काय तो मोठ्यानें टाहो फोडून अचलेला विचारीत होता—कां मला सांगितलं नाहींस ? ज्याच्या प्रकृतीच्या बाबतींत माझा जीव इतका खालींवर होत होता, त्याला सकाळीं भेटलीस, दोघांचींही बोलणीं झालीं, पण मला थांगपत्ता सुद्धां कां लागूं दिला नाहींस ? या चोरटेपणाची काय जरुरी होती अचला ?

पण अचला दुसऱ्या बाजूला तोंड फिरवून बसली होती. सुरेश बावरल्यासारखा झाला. अंतःकरणांतली खळबळ एकदम बाहेर फेंकून देऊन उगीच गडबड करीत तो म्हणाला, " पण आतां वेळ नाहीं. चल, चल —गाडींत बसल्यावर मग काय तें बोलूं. चला केदारबाबू—" असें म्हणून तो समोर नजर राखीत एक प्रकारें सर्वांना लोटून देऊन निघाला.

केदारबाबू बराचवेळपर्यंत कांहीं बोलले नाहींत. महिमला त्याच्या बरोबर बसवून अचलेला नेऊन त्यानीं बायकांच्या डब्यांत बसवलें. गाडी सुटायच्या वेळेला

ज्यावेळीं सुरेशनें खालीं वांकून नमस्कार केला, त्यावेळीं तो महिमच्या बाजूला जाऊन बसत असतांना ते नुसते एवढेंच म्हणाले, "तूंही बरोबर आहेस, तेव्हां वाटेंत कांहीं गैरसोय होईल असं वाटायला नको. बायकांचा डबा बऱ्याच लांबीवर आहे. मधून मधून जाऊन तिची खबर घे बरं का सुरेश–" पुन्हां एकदां महिमला बजावून सांगून ते म्हणाले, "पोंचल्याबरोबर लगेच खबर द्यायला विसरूं नकोस, ध्यानांत ठेव, तोंपर्यंत माझा जीव थाऱ्यावर रहायचा नाहीं—" असें म्हणून डोळे पुशीत पुशीत ते चालते झाले. त्यावेळची त्यांची ती केविलवाणी मुद्रा आणि स्नेहानें ओलावलेला आवाज कितीतरी वेळपर्यंत त्या दोघांही मित्रांना सारखा जाणवत होता.

गाडी चालू होतांच थंडी लागेल म्हणून रग पांघरून महिम लगेच आडवा झाला. सुरेश मात्र तसाच बसून राहिला होता. त्याच्या चेहऱ्याकडे पहायला त्यावेळीं तिथें दुसरा कुणी नव्हता. कुणी असता तर त्याला त्यावेळच्या त्याच्या त्या नजरेंत कांहींतरी विलक्षण, अस्वाभाविक अशी चमक दिसून आली असती. आंत आगीचा लोळ चांगलाच पेटत असल्याशिवाय माणसाच्या डोळ्यांतून असा जळजळीत जाळ कधीं बाहेर येत नसतो.

ती स्लो-पॅसेंजर गाडी होती. लहान-मोठ्या प्रत्येक स्टेशनवर थांबत थांबत ती शांतपणें रस्ता काटीत होती. बाहेर थोडथोडा पाऊस सारखा ठिबकत होता. एका मोठ्या स्टेशनवर गाडी थांबूं लागली त्यावेळीं महिम पांघरुणाबाहेर तोंड काढून म्हणाला, "इथं कांहीं गर्दी नाहीं—कां झोपला नाहींस सुरेश ? अशी सोय मिळणं बहुधा कठिण असतं."

सुरेश चमकून म्हणाला, "हो. निजतोंच कीं आतां."

त्याची ती चमक इतकी विसंगत आणि निष्कारण वाटली, कीं ती पाहून महिम आश्चर्यानें थक्क होऊन गेला. जणूं काय महिमच्या नकळत तो कांहींतरी गुन्हा करायच्या बेतांत होता आणि चट्कन् पकडला जाण्याच्या भीतीनें तो घाबरून गेला होता ! अशीच भावना महिमच्या मनांत आली आणि कित्येक वेळपर्यंत ती भावना त्याच्या मनांतून गेली नाहीं.

गाडी स्टेशनवर थांबली.

आपल्या हातून कोणती तरी चूक झाली याची जाणीव झाल्यामुळें सुरेशनें चेहऱ्यावर हंसण्याचा आव आणून म्हटलें, "मला वाटलं होतं तुला झोंप लागली—म्हणून मी असा दचकलों तो !"

महिमनें 'हुं' म्हटलें खरें, पण अशा प्रकारें त्यानें निष्कारण कैफियत द्यावी हें कांहीं त्याला बरें वाटलें नाहीं.

सुरेश म्हणाला, "तिला कांहीं हवं कीं नाहीं त्याची एकदां चौकशी करतां आली—"

"पाऊस पडतोय ना?"

"तसा कांहीं विशेष नाहीं. मी चट्‌कन पाहून येतों." असें म्हणून सुरेश दरवाजा उघडून बाहेर गेला.

तो बायकांच्या डब्यासमोर आला त्यावेळीं त्याला असें दिसून आलें, कीं इतक्यांत अचलेला तिच्याच वयाची एक जोडीदारीण बाई भेटली होती आणि त्या दोघींच्या गप्पागोष्टी चालल्या होत्या. समोर सुरेशला पहातांच त्या नव्या सोबतिणीनें अचलेला डिंवचलें आणि लगेच ती तोंड फिरवून बसली. अचलेची नजर वळली तेव्हां सुरेशनें तिला कांहीं हवें नको का वगैरे विचारून घेतलें. अचला म्हणाली, "कांहीं नको! पावसांत असं भिजत रहाणं बरं नव्हे. जा पाहूं—" असें म्हणून ती खिडकीपाशीं आली आणि खालच्या आवाजांत म्हणाली, "माझ्याबद्दल कांहींसुद्धां काळजी करायला नको. ज्यांची काळजी वहायला हवी त्यांच्यावर नजर ठेवलीत कीं झालं."

सुरेश म्हणाला, "ती तर आहेच पण तुला कांहीं खायला किंवा—प्यायला पाणी—"

अचला हंसून म्हणाली, "नको हो नको, मला कांहींसुद्धां नको. पावसांत अशा रीतीनें भिजत राहून आजारी पडायचा विचार आहे का तुमचा?"

सुरेशनें एक क्षणभरच अचलेच्या नजरेला नजर भिडवली आणि लगेच खालीं पाहून म्हटलें, "किती दिवस हें मागणं मागतोंय—पण या आजार-दुखण्यांची कृपादृष्टि माझ्याकडे वळतच नाहीं!"

ते त्याचे उद्गार ऐकून अचलेचा चेहरा कानाच्या पाळीपर्यंत लाल-लाल झाला. सुरेशच्या तें नजरेला येईल म्हणून थट्टेवारी नेण्यासाठीं बळेंबळेंच हंसून ती म्हणाली, "बरं बरं! आतां येतांच आहां तिथं, चांगलं राबावं लागलं म्हणजे—"

पण तिचें तें वाक्य तिला पुरें करतां आलें नाहीं. छुप्या लाजेमुळें तिचें तें ढोंगी रहस्य बाहेर दिसून यायचें तसेंच राहिलें. तिच्या जाणीवेनें तिला अर्ध्यावरच थांबवून धरलें.

गाडी सुटायची घंटा झाली. सुरेश कांहींतरी बोलणार होता, पण तितक्यांत ओंठावरचे शब्द तसेच मागें घेऊन जायला निघाला होता-पण तसाच तो थांबला आणि मागें फिरून पहातो तों त्याच्या अंगावरच्या शालीचें टोंक अचलेच्या मुठींत होतें. ती तोंडांतल्या तोंडांत बोलत त्याला छेडून म्हणाली, " आमच्या बरोबर चला असं मी तुम्हांला म्हटलं, तें सर्वांच्या समोर असं डांगोरा पिटून कां उघड केलं तुम्ही ? कां मला असं अडचणींत टाकलंत ? "

ती गोष्ट सुरेशच्याही ध्यानीं आली होती. पुन्हां पुन्हां हजारवेळ त्या गोष्टीची आठवण येऊन झाल्या चुकीबद्दल तो पश्चात्तापानें पोळत होता. उत्तर देतांना तो रडकुंडीला येऊन म्हणाला, " नकळत माझ्या हातून ती चूक झाली अचला. "

त्या उत्तरानें अचलेचें समाधान झालें नाहीं. ती तशीच चिडून म्हणाली, " नकळत म्हणजे काय ? सर्वांच्या समोर मला मान खालीं घालायचा प्रसंग यावा एवढ्यासाठींच तुम्ही जाणूनबुजून बोललांत तसं. "

आगगाडी चालू झाली. यावर अधिक कांहीं बोलायला सुरेशला अवकाश मिळाला नाहीं. अचलेनें त्याच्या शालीचा हात सोडला तेव्हां तो धडधडत्या काळजानें पळत पळत निघाला. इकडे तिकडे न पहातां तो पळत होता खरा, पण त्याच्यावर नजर खिळलेल्या आणखीं एका व्यक्तीच्या हृदयाची धडधड एकदम थांबायला आली होती, खिडकींतून तोंड बाहेर काढून महिम त्यांच्याकडेसच पहात असल्याचें अचलेच्या नजरेला आलें.

ती पुन्हां येऊन आपल्या जागेवर बसली त्यावेळीं त्या दुसऱ्या बाईनें विचारलें, " हेच वाटतं तुमचे बाबू ? "

अचलेचें चित्त ठिकाणावर नव्हतें. तिनें नुसतें ' हुं ' म्हटलें आणि बाहेरच्या झाडझाडोऱ्याकडे आणि शेतवाडीकडे पहात ती खिडकीबाहेर तोंड करून राहिली. पूर्वीं जें बोलणें सुरू होतें आणि सुरेश आल्यामुळें अर्ध्यावर राहिलें होतें तें पुढें चालू ठेवण्याची प्रवृत्ति तिच्या ठायीं राहिली नव्हती.

गांवांमागून गांवें आणि शहरांमागून शहरें येऊन जात होतीं. पुन्हां तिच्या मनाची खळबळ हळुहळु थंडावत आली आणि तिची मुद्रा निर्मळ आणि प्रशांत होऊन गेली. पुन्हां आपल्या जोडीदारणीबरोबर मोकळ्या मनानें बोलायला चालायला ती तयार झाली. घटकाभरापूर्वीं जी शरमेची भावना तिला डांचून राहिली होती ती आतां पूर्णपणें नाहींशी झाली होती.

खानसम्याच्या हातीं चहा आणि खाण्याचे पदार्थ घेऊन एका मोठ्या स्टेशनवर सुरेश पुन्हां आला. अचलेनें ते घेतले आणि मोठ्या ममताळूपणाच्या वाणीनें ती म्हणाली, " तुम्हांला हा एवढा उपद्व्याप करायला कुणी सांगितलं आहे ? तुमच्या दोस्तानंच का ? "

असल्या बाबतींत कुणाच्या सांगण्याची वाट पहाण्याची वृत्ति सुरेशच्या ठायीं नव्हती. अचलेला तें चांगलें माहीत होतें. तरीही या अयाचित परामर्षाच्या बाबतींत एक नाजुकसा चिमटा घेतल्यावांचून तिच्यानें राहावलें नाहीं.

गालांतल्या गालांत हंसत सुरेश जायला निघाला होता. त्याला अचलेनें पुन्हां बोलावलें. त्या चोरट्या हंसण्याची छटा अजूनही त्याच्या जिवणीवर दिसत होती. उभयतांची नजरानजर होतांच अचला एकदम खुद्कन् हंसली. लाजेचा संकोच दरवळून उठला. त्या तिच्या चेहऱ्यावरील उमटलेल्या गुलाबांकडे सुरेश दोन्ही डोळे भरून पहातांना जणूं काय अधाशासारखें आकंठपान करीत होता.

अचलेनें त्याला हांक मारली होती ती नवऱ्याची खबर विचारण्यासाठीं. त्याला कांहीं त्रास होतोय कीं काय, अडचण होतेय की काय, किंवा त्याला कांहीं हवें नको आहे कीं काय,—एक वेळ त्याला इथपर्यंत येऊन जाववेल कीं काय, वगैरे एकेक प्रश्न ती विचारणार होती—पण त्यांतला एकही प्रश्न विचारायचें सामर्थ्य तिच्याठायीं राहिलें नव्हतें. त्या प्रसंगाला न शोभेसें गांभीर्य आणून तिनें विचारलें, " आपल्याला अलाहाबादला गाडी बदलायची आहे ना ? कितीशी रात्र असेल आपण तिथं पोंचू तेव्हां ? जरा चौकशी करून मला सांगतां का ? "

" बरं आहे ! " असें म्हणून सुरेश थोडासा अचंबूनच चालता झाला.

अचलेनें परत येऊन पाहिलें तेव्हां ती जोडीदारीण बाई आपली जागा सोडून दूर बसली होती. अचला मनांतल्या मनांत ओशाळली होती. तरीही जिज्ञासा आवरणें अशक्य झाल्यामुळें तिनें विचारलें, " तुमच्या घरीं कुणी चहा-रोटी खात नाहींत वाटतं ? "

ती बाई हंसली आणि म्हणाली, " अरे देवा ! आतांच्या दिवसांत कुठलं घर सुटलंय ? सारेच खातात की ! "

अचला म्हणाली, " तर मग अशा शिसारून कां दूर जाऊन बसलांत ? "

ती बाई ओशाळून म्हणाली, " नाहीं ग बाई, शिसारून नव्हे...सारे पुरुष तर खातातच माझ्या सासऱ्यांना हें असलं कांहीं आवडत नाहीं— आणि आपण बायकामाणसं तर—"

असल्या या खाण्यापिण्याच्या अन् शिवाशिवीच्या बाबतींत एके दिवशीं मृणालबरोबर तिचा खटका उडाला होता. त्या दिवशीं ज्या कारणामुळें तिला स्वतःला आळा घालतां आला नव्हता त्याचप्रमाणें आजही अंतरांतल्या आगीनें ती स्वतःला विसरून गेली होती. त्या बाईचें भाषण पुरें होऊं न देतां ती रुक्षपणानें म्हणाली, " तुम्हांस त्रास द्यायचा नाहीं मला. खुशाल येऊन आपल्या जागीं बसा. " असें म्हणून तिनें पहातां पहातां चहा आणि खाण्याचे जिन्नस खिडकीबाहेर फेंकून दिले.

ती बाई बराच वेळपर्यंत काष्ट होऊन तिच्याकडे पहात राहिली होती. नंतर तिनें तोंड फिरविलें आणि ती पदरानें डोळे पुसूं लागली. तरीपण तिला वाटत होतें, कीं एवढा वेळ इतक्या मोकळेपणानें बोलत बसलेली ही बाई अशी एकाएकीं मर्यादा सोडून वागली — आतां न जाणो, आपलें असलें वर्तन पाहून आणखी कांहींतरी भलतेंच करून बसायची.

मध्यें कांहीं वेळपर्यंत पाऊस जरी थांबला होता तरी आकाशांत ढग सारखे भरून येत होते तिसऱ्या प्रहराच्या सुमारास पुन्हां जोराचा पाऊस सुरू झाला. या अशा पावसांतून तिला उतरून जायचें असल्यामुळें ती त्या तयारीला लागली होती.

आतां अचलेला राहवेना. ती सरळ जाऊन तिच्याजवळ बसली. तिचा हात आपल्या हातीं ओढून घेऊन ती कळवळून म्हणाली, " मला फार लाज वाटते मी तसं वागलें त्याची. मला तुम्ही क्षमा करा. "

ती बाई हंसली पण तिनें सहसा उत्तर दिलें नाहीं. अचला पुन्हां म्हणाली, " माझं मन उद्विग्न झालं म्हणजे मी जें कांहीं करून बसतें त्याला ठिकाणाच नसतो. माझा नवरा आजारी आहे, त्याला घेऊन हवा बदलायला जातों आहोंत. बरं वाटलं तर ठीकच, नाहींतर या परदेशांत काय होईल आणि काय नाहीं तें एका देवालाच माहीत ! " बोलतां बोलतां तिचा गळा दाटून आला.

ती बाई आश्चर्यचकित झाली आणि म्हणाली, " पण आपले पति कांहीं आजारी असल्यासारखे दिसले नाहींत मला ! "

अचला म्हणाली, " माझे पति या गाडींतच आहेत. तुम्ही त्यांना पाहिलेलं नाहीं. हे आले होते ते त्यांचे मित्र. "

ती बाई अधिकच आश्चर्यचकित झाली; पण कांहीं बोलली नाहीं.

' हे तुमचे पतीच ना ' असें तिनें विचारलें तेव्हां आपण ' हूं ' म्हटलें होतें हें अचलेच्या ध्यानीं नव्हतें. पण ती बाई मात्र तें विसरली नव्हती. तिच्या

आश्चर्यचकित व्हायच्या वृत्तीबद्दल अचलेनें वेगळाच समज करून घेतला. सुरेशबरोबर आपण ज्या प्रकारें वागलों आणि बोलीभाषण केलें तें स्वतःच्या अंतरींच्या वृत्तीला अनुसरून हिंदू स्त्रीच्या दृष्टीनें कसें विसंगत दिसून आलें असेल याची कल्पना येऊन ती लाजेनें अर्धमेली झाली. अगदीं निष्कारण आणि आचरटपणें जबानी दिल्याप्रमाणें ती बोलून गेली. "आम्हीं हिंदू नाहीं—आम्हीं ब्राह्म !"

तरीही ती बाई कांहीं बोलत नाहीं असें पाहून अचलेनें संकोचानें तिचा हात सोडून दिला आणि म्हटलें, "आमच्या चालिरीति आपल्याला नीटशा कळत नसल्या तरीपण आपण त्या अद्भुत आहेत असं मानूं नका."

आतां मात्र ती बाई हंसली आणि म्हणाली, "आम्ही कांहीं त्या तशा मानीत नाहीं. कां कोण जाणे, पण आपण लोक मात्र आमच्यापासून दूर रहायचा प्रयत्न करतां, मला कसं कळलं माहीत आहे ? आमचे एकदोन नातेवाईक आहेत ते तुमच्याच समाजांतले आहेत. त्यांच्याकडून कळलंय मला तें कारण—" असें म्हणून ती हंसू लागली.

अचलेनें विचारलें, "असं कोणतं कारण तें ?"

ती बाई म्हणाली, "तुम्हांला माहीत असलंच पाहिजे तें. नसलं माहीत तर समाजांतल्या कुणाला तरी विचारून घ्या"—असें म्हणून तो हंसण्याचा प्रसंग टाळून ती म्हणाली, "बरं, इतक्या दूरवर जाण्यापेक्षां आपल्या नवऱ्याला घेऊन आमच्याच तिकडे या ना !"

"कुठं ? आऱ्याला ?"

"छे ग बाई ! तिथं काय माणसं राहातात ! आमचे हे तिकडे ठेकेदाराचं काम करतात म्हणून मधून मधून मला तिथं जाऊन रहावं लागतं ! मी डिहरीची गोष्ट बोलतें आहें. शोण नदीच्या कांठावर आमचं एक लहानसं घर आहे. तिथं चार दिवस जरी राहिलांत तरी तुमच्या नवऱ्याची प्रकृति साफ बरी होऊन जाईल. येतां तिकडे ?" असें म्हणून तिनें अचलेचे दोन्ही हात आपल्या हातीं धरले आणि उत्तराच्या अपेक्षेनें ती तिच्या तोंडाकडे पहात राहिली."

या अपरिचित स्त्रीची उत्सुकता आणि आंतरिक आग्रह करायची रीत पाहून अचला खूष झाली. ती म्हणाली, "पण तुम्हांला तुमच्या नवऱ्याची संमति मिळायला हवी ना ! त्यांनीं नाहीं म्हटलं तर कसं येतां येईल आम्हांला ?"

ती बाई मान वेळावून म्हणाली, " इश्श ! हें काय बोलणं झालं ? सेवेच्या बाबतींत आम्हीं दासी असलों तरी सर्वच बाबतींत काय दासी असतों आम्हीं ? कांहीं मनांत आणूं नका ! हुकूम द्यायच्या वेळीं आम्हींच असतों घरचे मालक. तो देश तुम्हांला पसंत वाटला नाहीं तर सरळ डिहरीला निघून या. एव्हढासुद्धां संकोच धरूं नका ! मी बजावून सांगतें आहें तुम्हांला. संमति घ्यायची असली तर ती मी घेईन. तुम्हांला काय करायचंय त्याच्याशीं ? "

स्वामीच्या सौभाग्यानें भूषित झालेल्या त्या स्त्रीच्या आनंदाचा अतिरेक पाहून अचला गारीगार होऊन गेली.

आरा स्टेशन जवळ येत होतें. गाडीचा वेग मंदावत येत होता. अचलेचे दोन्ही हात ओढून धरून ती मोठ्या उत्साहानें म्हणाली, " माझं स्टेशन आलं. मी जातें आतां. पण उगीच विचार करकरून मनाला त्रास करून घेऊं नका. सांगून ठेवतें. कांहीं भ्यायला नको. तुमचे पतिराज लवकर बरे होतील. परत जातांना एकदां आमच्या तिकडे येऊन पायधूळ झाडून जायचं वचन मात्र आतां द्या ! "

डोळ्यांत येत असलेलीं आंसवें आवरून अचला म्हणाली, " त्यावेळीं सवड झाली तर खात्रीनं एकदां तुम्हांला भेटून जाईन. "

ती बाई म्हणाली, " सवड झाली म्हणजे काय ! केलीच पाहिजे सवड. मी चांगलं ओळखलंय् तुम्हांला ! एवढ्या मोठ्या प्रेमाची अन् भक्तीची कदर ईश्वर कसा केल्याशिवाय राहील ? मी सांगून ठेवतें तुम्हाला, तसं व्हायचंच नाहीं कधीं. "

अचलेच्या तोंडून उत्तर बाहेर येईना. तोंड फिरवून ती आंतून येणारा उमाळा आवरायचा प्रयत्न करूं लागली.

पाऊस तसाच पडत होता — त्यांतच गाडी येऊन स्टेशनांत थांबली. त्या बाईचा धाकटा दीर दुसऱ्या डब्यांत होता. तो आला आणि दरवाजा उघडून उभा राहिला.

अचलेनें त्या बाईच्या कानाशीं तोंड नेलें आणि हळूच म्हटलें, " नवऱ्याचं नांव तुम्ही घेणार नाहीं हें मला माहीत आहे. पण तुमचं स्वतःचं नांव काय तें सांगा ना मला. पुन्हां कधीं इकडे आलें तर तुमची चौकशी करायची कशी ? "

ती बाई हळूच हंसून म्हणाली, " माझं नांव राक्षसी. डिहरीला कुठल्याही बंगाली बाईला विचारलंत तर ती माझा पत्ता सांगेल तुम्हांला. पण तुम्ही उभयतां

एकदां याच. माझ्या गळ्याची शपथ आहे. मी अगदीं वाट पहात राहिलें आहें! शोण नदीच्या कांठींच आमचं घर आहे—" असें बोलत बोलत तिनें दोन्ही हात जोडून अचानक एक नमस्कार केला आणि खालीं उतरून ती भिजत निघून गेली.

आगगाडी पुन्हां हळू हळू चालू झाली होती, नुकताच काळोख पडूं लागला होता. सारख्या पावसाच्या झोडींतच वावटळ सुरू झाल्यामुळें बाहेरचें वातावरण रात्रीच्या वेळीं शेंकडों पटीनें भयानक वाटूं लागलें होतें. खिडकीच्या बाहेर कांचेंतून पहातांना तिची नजर भिरभिरत गेली. त्या गर्द काळोखांत सारें जग जसें कांहीं ग्रासून गेलें आहे, आदिअंत नाहींसा झाला आहे, असें तिला वाटूं लागलें. प्रकाशाची रेषा, आनंदाची रेषा आतां यापुढें कधीं दिसायचीच नाहीं— या जन्मीं तरी आतां यांतून सुटका व्हायची नाहीं असें तिला वाटलें.

त्या डब्यांत तिला कोणाची सोबत नव्हती. डब्याच्या एका कोपऱ्यांत अंगावरचें पांघरूण माथ्यापर्यंत ओढून घेऊन ती डोळे मिटून झोंपी गेली. तिच्या दोन्ही डोळ्यांतून सारख्या पाण्याच्या धारा लागल्या होत्या. डोळ्यांवाटे अशी झरणी कां लागावी, असें कोणतें दुःख आपल्याला झालें आहे, याची तिला कल्पनाच्च होईना. पण तो रडण्याचा उमाळा कांहीं केल्या तिला आवरत नव्हता. उफाळलेल्या समुद्राच्या लाटांप्रमाणें अंतरंगांतला कण अन् कण भरडून टाकून पुन्हां पुन्हां गर्जना करीत उसळत होता.

तिला आपल्या बापाची आठवण झाली. बालपणच्या सख्यासोबत्यांची आठवण झाली. आत्याबाई आठवली. मृणालची आठवण झाली. आत्तांच जिनें राक्षसी या नांवानें आपला परिचय करून दिला तिचीसुद्धां आठवण झाली— घरच्या यदु गड्यापर्यंत सारीं माणसें तिच्या नजरेसमोर येरझाऱ्या घालूं लागलीं. त्या सर्वांचा कायमचा निरोप घेऊन जणू काय कोणत्या तरी अजाणत्या प्रदेशांत आपण जायला निघालों आहोंत असें वाटून तिच्या हृदयांत अनावर अशी जांचणी सुरू झाली.

अशा प्रकारें ती सारखी आंसवें गाळीत होती. गाडी जेव्हां दुसऱ्या स्टेशनवर येऊन थांबली त्यावेळीं तिच्या दुखावलेल्या हृदयांतल्या वेदना पुष्कळशा ओसरल्या होत्या. कुणीतरी बाईउतारू या वादळी रात्रीं सुदैवानें त्या डब्यांत येऊन बसते कीं काय तें पहाण्यासाठीं ती व्याकूळ होऊन उठून बसली. भिजत भिजत

कुणी उतरून जात होते, कुणीं कुणी वर चढतही होते, पण तिच्या डब्याच्या आजूबाजूला कुणीही फिरकलें नाहीं.

गाडी चालू झाली. एक मोठा सुस्कारा सोडून ती पुन्हां आपल्या जागीं येऊन पडली. तिनें पांघरुणानें आपलें सर्वांग झांकून घेतलें. यावेळीं एक चमत्कार झाला. दुःखानें ओथंबलेल्या तिच्या अंतःकरणांत कां कोण जाणे, एकदम सुखाची कल्पना थरारून उठली.

हा अनुभव कांहीं नवा नव्हता. हवा बदलण्याचा प्रश्न ज्या दिवशीं निघाला त्या दिवशीं देखील असेंच स्वप्न तिनें पाहिलें होतें. आजसुद्धां त्या दिवसाप्रमाणेंच तिनें आपल्या आजारी असलेल्या नवऱ्याचें स्मरण केलें. त्याला आरोग्य लाभावें, दीर्घायु मिळावें आणि ज्या अपरिचित जागीं आपण जात आहोंत त्या जागीं तें सर्व कांहीं व्हावें, अशा प्रकारें आनंदाचे आणि सुखशांतीचे धागे विणीत विणीत ती आपली आपल्याशींच मश्गुल होऊन गेली होती.

केव्हां आणि किती वेळ तिला झोंप लागली होती तें तिचें तिलाच आठवत नव्हतें. तितक्यांत कुणीतरी तिच्या नांवानें हांक मारल्याचें कानीं येतांच ती धडपडून उठून बसली. पहाते तों दाराशीं सुरेश उभा होता. उघड्या दरवाजांतून पावसाची भयंकर झड आंत येऊन सारा डबा भिजवून टाकीत होती.

सुरेश ओरडून म्हणाला, " लवकर उतर खालीं. स्टेशनांत गाडी उभी आहे. तुझी बॅग कुठं आहे ? "

अचलेच्या डोळ्यावरची झोंप अजून उडाली नव्हती. अलाहाबाद स्टेशनवर जबलपूरसाठीं गाडी बदलायची याची तिला आठवण झाली. तिनें बॅग दाखवून दिली आणि घाबऱ्याघुबऱ्या ती खालीं उतरली. काकुळतवाणीनें ती म्हणाली, " या अशा टोंब पावसांत त्यांना उतरवायचं कसं ? इथं डोलीबिली कांहीं मिळायची नाहीं का ? नाहींतर त्यांची प्रकृति अधिकच बिघडायची नाहीं का सुरेशबाबू ? "

सुरेशनें काय उत्तर दिलें तें वावटळीच्या आवाजांत तिला ऐकूं गेलें नाहीं. एका हातांत बॅग आणि दुसऱ्या हातानें अचलेचा हात घट्ट धरून तो तिला पलिकडच्या प्लॅटफॉर्मकडे ओढीत धांवत पळत नेत होता.

त्या प्लॅटफॉर्मवर गाडी निघायच्या तयारींत होती. फर्स्ट क्लासच्या एका रिकाम्या डब्यांत अचलेला लोटून घालून सुरेश घाईघाईनें निघत म्हणाला, " तूं आतां स्वस्थ बैस इथं. मी त्याला उतरवून घेतों. "

" तर मग जातांना ही माझी जाडी शाल घेऊन जा अन् नीट गुंडाळून घेऊन या त्यांना. " असें म्हणून अचलेनें अंगावरची शाल ओढून सुरेशच्या अंगावर फेंकून दिली तेव्हां तो पळतच निघून गेला.

काळोखांत जिथवर दृष्टि पोंचत होती तिथवर समोर पहायचा अचला प्रयत्न करीत होती. स्टेशनवरच्या दूर दूर असलेल्या खांबांवर कंदील मिणमिणत होते, पण या भयंकर पावसाच्या झडींत ते इतके अस्पष्ट दिसत होते, कीं कोणतीही वस्तु पहाण्याच्या कामीं त्यांचा उपयोग होत नव्हता. भिजून चिंब झालेले उतारू धांवाधांव करीत होते, सामानाचें ओझें माथीं घेऊन कूलींची धांवपळ चालू होती. रेल्वेचे नोकर उगीच इकडून तिकडे गडबड करीत होते,—आणि हीं सारीं दृश्यें पडद्यावरच्या छायेसारखीं तिला दिसत होतीं.

हळू हळू तीं दृश्यें विरळ झालीं. त्या वावटळीच्या आवाजांतून स्टेशनवरच्या घंटेचा तीक्ष्ण स्वर कानीं आला. ज्या गाडींतून अचला आतांच उतरली होती ती गाडी भल्या मोठ्या अजगरासारखी फुसफुसत आकाशपाताळ एक करीत प्लॅटफॉर्म सोडून गेली. एका अखंड अंधकाराखेरीज नजरेसमोर कसलाच आड-पडदा राहिला नव्हता.

पुन्हां घंटेवर टोला पडला. कुठच्या गाडीची ही घंटा होती तें अचलेला कळून आलें होतें—पण ते गाडींत चढले कीं नाहीं, कुठें चढले, सामानसुमान सारें वर घेतलें गेलें कीं कांहीं राहून गेलें, तें कांहींच न कळल्यामुळें तिचा जीव कासावीस होऊन गेला.

स्टेशनवरचा एक शिपाई घोंगडीनें सर्वांग झांकून कंदील हातीं घेऊन घाईघाईनें जात होता. तो समोर येतांच अचलेनें त्याला हांक मारून विचारलें, " सारे उतारू चढले का गाडींत ? "

फर्स्टक्लासमधून प्रश्न येतांच तो थांबला आणि म्हणाला, " होय मेमसाहेब ! "

अचलेचा जीव थोडासा खालीं पडला. किती वाजले म्हणून तिनें विचारलें, तेव्हां तो म्हणाला, " नऊ वाजून—"

" नऊ वाजून ? " अचला चमकली. अलाहाबादला पोहोंचायचें तें जवळ-जवळ रात्र संपायच्या सुमाराला. तिनें घाबरून विचारलें. " अलाहाबाद—"

पण तो माणूस पुढलें भाषण ऐकायला उभाच राहिला नव्हता.

वर छप्पर नव्हतें, आकाशांतूनही पाऊस पडत होता आणि गाडीच्या छप्परावरच्या पागोळ्यांचें पाणीही त्याच्या नाकातोंडांत शिरत होतें. सुया टोंचल्या-

सारखी पावसाची झड त्याला जाणवत असावी. हातांतला दिवा जोरजोरानें हलवीत ‘ मोगलसराई, मोगलसराई ’ असें म्हणत तो घाईघाईनें निघून गेला.

शिटी वाजली आणि गाडी सुटली. इतक्यांत सुरेश तिच्या खिडकीजवळून धांवत धांवत जातांना बोलत गेला, “ – कांहीं भिऊं नकोस. मी शेजारच्या डब्यांत आहें. ”

५

सुरेश शेजारच्या डब्यांत जाऊन बसला खरा, पण तो कुठें होता ? तो तर सारखे डोळे उघडून एकसारखा बाहेरच्या बाजूला पहात राहिला होता. त्याचा चेहरा कितीही कां अस्पष्ट दिसेना, तो एकदां तरी अचलेच्या नजरेला नव्हता का आला ?

आणि अलाहाबादच्याऐवजीं कुठल्या तरी एका भलत्याच स्टेशनवर गाडी-बदल केली. कशासाठीं ? पावसाच्या झडीनें तिच्या माथ्यावरचे केंस भिजत होते. तिच्या अंगावरचे कपडे सारेच भिजून गेले होते, तरीही ती उघड्या खिडकींतून पुन्हां पुन्हां तोंड बाहेर काढून, एकदां समोर आणि एकदां मागें, काळोखांतून कशी पाहायचा प्रयत्न करीत होती तें तिचें तिलाच माहीत.

या गाडींत आपला नवरा नाहीं—आतां सारा भरिभार केवळ सुरेशवरच पडलेला आहे. सुरेशबरोबर कोणत्यातरी भलत्याच दिशेला आपण निघालों आहोंत, ही गोष्ट कांहीं केल्या तिच्या मनाला पटत नव्हती. असें मुळीं व्हायचेंच नाहीं ! आपला नवरा या गाडींतच कुठें ना कुठें तरी असेलच असेल !

सुरेश कसाही कां असेना आणि कांहीं कां करीत असेना, एका स्त्रीला समाजापासून, धर्मापासून, स्त्रीजातीच्या साऱ्या गौरवापासून भुलावणी देऊन या अशा अनिवार्य मरणप्रसंगांत लोटून देईल एवढा तो वेडा नव्हता ! असें करण्या-पासून त्याचा काय फायदा होता ? अचलेच्या ज्या या देहावर त्याची एवढी नजर होती, त्या देहाचें एका गणिकेच्या देहांत परिवर्तन झालें तर अचला जीव धरून राहणार नाहीं, ही सरळ सरळ गोष्ट जर त्याला कळली नाहीं तर प्रेमाचें नांव त्यानें कोणत्या तोंडानें घ्यावें ! नाहीं नाहीं, असें व्हायचेंच नाहीं ! एंजि-नच्या बाजूला कुठल्यातरी डब्यांत तो चढून बसला असेल आणि आपल्याला तें दिसलें नसेल असाच समज ती करून घेत होती.

एकदम मोठी झड आली आणि त्या सरशीं भिजणारें तोंड चुकवून अंग आंकसून ती एका कोपऱ्यांत येऊन बसली, तेव्हां कुठें तिच्या ध्यानीं आलें, कीं

आपल्या अंगावरच्या कपड्यांतला एवढा सुद्धां धागा कुठें कोरडा राहिलेला नाहीं. पावसाच्या झडीनें ती इतकी भिजली होती, कीं तिच्या पदरावरून आणि पोलक्यावरून पाणी टपटप करीत निथळत होतें. त्या थंडीच्या वेळीं आपण ही झड सहन कशी केली तें तिचें तिलाच कळलें नव्हतें. अंगावरील कपडे थोडेसे बदलावे म्हणून कापऱ्या हातानें तिनें बॅग ओढून घेतली. किल्ली लावून आतां बॅग उघडणार तोंच गाडीची गति अगदीं मंद झाली आणि त्याच क्षणीं गाडी एका स्टेशनवर थांबली. पाऊस सारखा कोसळत असल्यामुळें स्टेशनचें नांव कळत नव्हतें. बॅग तशीच उघडी पडली होती. अंतरांत चाललेल्या अनावर खळबळीमुळें दार उघडून ती एकदम खाली उतरली आणि भिजत भिजत अंदाजानें काळोखांतून धांवत धांवत सुरेशच्या खिडकीसमोर येऊन थांबली.

तिनें मोठ्यानें हांक मारली " सुरेशबाबू ! "

या डब्यांत एक दोन बंगाली आणि एक इंग्रज होता. सुरेश एका कोपऱ्यांत हातपाय आवरून धरून फळीला टेकून डोळे झांकून बसला होता. आपल्या तोंडून सहजासहजीं आवाज निघावा तसा निघणार नाहीं असें अचलेला वाटत होतें. म्हणून जिवाचा आटापिटा करून तिनें आवाज एकाद्या फटका मारलेल्या प्राण्यासारखा असा कांहीं केविलवाणेपणानें काढला, कीं तो ऐकून नुसता सुरेशच नव्हे, तर त्या डब्यांतले सारेच लोक एकदम दचकले. घाबऱ्याघुबऱ्या सुरेशनें डोळे उघडून पाहिलें. दारावर अचला उभी होती. तिच्या उघड्या चेहऱ्यावर पावसाच्या अजस्र धारा आणि गाडीचा झगझगीत प्रकाश एकाच वेळीं पडल्यामुळें तिच्या स्वरूपाचें इंद्रजाल असें कांहीं खुलून उठलें होतें, कीं साऱ्या लोकांची दृष्टी तिच्यावर खिळून गेली. ते थक्क झाले.

तो धांवतच तिच्यापाशीं गेला त्यावेळीं अचलेनें विचारलें. " ते कुठं दिसत नाहींत ? कुठं आहेत ते ? कुठल्या डब्यांत चढवलंत त्यांना ? "

" चल दाखवतों. " असें म्हणून सुरेश त्या भर पावसांत खालीं उतरला आणि ज्या बाजूनें अचला आली होती त्याच बाजूला तिला ओढून नेऊं लागला.

डब्यांतील दोघेही बंगाली तोंड वेंगाडून थोडेसे हंसले. त्या इंग्रजाला मात्र कांहीं कळलें नाहीं. पण तिची ती केंविलवाणी हांक आणि काकुळतीनें विचारलेला प्रश्न त्याच्याही हृदयाला जाणवल्यावांचून राहिला नाहीं. खालीं पडलेला रग उचलून पायावर ओढून घेऊन त्यानें एक मोठा सुस्कारा सोडला आणि स्तब्ध मुद्रेनें बाहेरच्या काळोखाकडे तो निरखून पाहूं लागला.

अचलेच्या डब्यासमोर येतांच सुरेश थबकून उभा राहिला. आंत डोकावून पाहून त्यानें घाबरून विचारलें, " तुझी बॅग उघडी कां ? "— तिच्या प्रत्युत्तराची अपेक्षा न करतां धाड्‌कन् दरवाजा उघडून अचलेला बळेंबळेंच आंत लोटून त्यानें दरवाजा आंतून बंद करून घेतला.

बॅगेकडे बोट करून सुरेश म्हणाला, " ही उघडली कुणी ? "

अचला म्हणाली, " मी ! —पण तें राहूं दे. ते कुठं आहेत तें मला आधीं दाखवा—-निदान ते कोणत्या बाजूला आहेत तेवढं जरी मला सांगितलं तरी मी जाऊन त्यांना शोधून काढीन —" बोलत बोलत ती दरवाजाकडे वळली असें पाहून सुरेशनें तिचा हात धरला आणि म्हटलें, " एवढी घाबरलीस कशाला ? गाडी चालू झाली आहे हें दिसतं ना तुला ? "

अचलेनें बाहेरच्या काळोखांत नजर फेंकली तेव्हां तिला कळून आलें, कीं खरोखरच गाडी सुरू झाली होती. निराशेची मूर्तिमंत प्रतिमा तिच्या दोन्ही डोळ्यांत उभी राहिली होती. ती वळून उभी राहिली. एक क्षणभरच तिनें सुरेशच्या पांढऱ्याफटक पडलेल्या चेहऱ्याकडे नजर फेंकली आणि दुसऱ्याच क्षणाला ती उन्मळून पडलेल्या झाडाप्रमाणें धाड्‌कन् खालीं पडली. दोन्ही हातांनीं सुरेशचे पाय कवटाळून धरून ती भडभडून येऊन म्हणाली, " कुठं आहेत ते ? झोंपलेले असतांना गाडींतून फेंकून दिलं का त्यांना बाहेर ? आजारी माणसाचा खून करून तुम्हांला—"

एवढा मोठा भयंकर आरोप करीत असतांना तिची जीभ थांबली. तें वाक्य पुरें झालें नाहीं. ती काळीज फुटून रडूं लागली. तिच्या रडण्याच्या सोसाट्यानें सुरेश एकदम दगडासारखा स्तब्ध झाला.

त्या भयाण रात्रीच्या काळोखांत तें तिचें रडणें चौफेर वितळून गेलें— आणि त्याच वेळीं बाकावरच्या गुबगुबित गादीला टेकून सुरेश असह्य आश्चर्यानें स्तब्ध होऊन पाहात राहीला होता. आपल्या पायांपाशीं काय चाललें आहे याची कांहीं वेळपर्यंत त्याला जाणीवसुद्धां झाली नव्हती.

बऱ्याच वेळानें भानावर येऊन आपले दोन्ही पाय तिच्या कवेंतून ओढून घ्यायचा प्रयत्न करीत तो हळूच म्हणाला, " असलं काम मी करीन असं वाटतं का तुला ? "

अचलेनें रडत रडत उत्तर दिलें, " तुम्ही काय वाटेल तें कराल ! माझ्या घराला आग घालून तुम्हीं त्यांना जिवें मारायचा घाट घातला होता. तुमच्या

पाया पडतें, कुठं काय केलंयत त्यांना, तें आधीं मला सांगा—" असें म्हणून पुन्हां त्याचे पाय जोरानें कवटाळून धरून ती त्यांवर डोकें आपटून घेऊं लागली. त्या पायांचा मालक एकदम थंडा पडून अचेतनासारखा मुकाट्यानें डोळे उघडून पहात राहिला होता.

बाहेर बेफाम झालेली रात्र तशीच उफाळून उठली होती. आकाशांतली वीज तशीच पुन्हां पुन्हां काळोख चिरून त्याचे तुकडे तुकडे उधळून देत होती. उफाळलेली पावसाची झड साऱ्या पृथ्वीला तशीच नेस्तनाबूद करून टाकीत होती. पण या दोन अभिशप्त स्त्रीपुरुषांच्या आंधळ्या हृदयाच्या तळाला जो प्रळयकाळ गर्जना करून राहिला होता त्याच्याशीं तुलना करतांना तें बाहेरचें तुफान क्षुल्लक वाटूं लागून बाहेरचें बाहेर राहिलें होतें.

अचला एकदम पडलेल्या जागेवरून ताड्कन उठून उभी राहिली, त्यासरशीं सुरेश स्वप्नांतून जागा झाल्याप्रमाणें दचकला. पुढलें स्टेशन येत असल्यामुळें गाडीचा वेग कमी होत असल्याचें त्याला दिसून आलें. अचला अशी एकदम कां उभी राहिली तें त्याच्या ध्यानीं आलें. त्यानें मोठ्या जबरदस्तीनें स्वतःचें मन ताब्यांत घेऊन उजवा हात पुढें करून तिला अडवलें आणि म्हटलें, " थांब ! महिम या गाडींत नाहीं. "

" नाहीं ? मग कुठं आहेत ते ? " बोलतां बोलतां अचला समोरच्या बाकांवर पट्कन बसून गेली.

तिच्या चेहऱ्यावरच्या रक्ताचा बिंदू न् बिंदू एकदम नाहींसा झाल्याचें सुरेशला दिसून आलें. एवढावेळ इतकी रडारड आणि एवढी डोकेफोड करीत असतांना त्या प्रतिकूल परिस्थितींत देखील तिच्या हृदयांत एक प्रकारची अव्यक्त आशा कुठेंतरी दडपून राहिली होती. मनांत येणाऱ्या त्या साऱ्या आशंका खऱ्या नसाव्या, कदाचित् या भयंकर दुःस्वप्नाच्या दुस्सह वेदना झोंपमोड होतांक्षणींच एका सुस्काऱ्यासरशीं नाहींशा व्हाव्या आणि रोमांचित झालेलें सारें जग एकदम उजळून उठावें, असें तिला वाटत होतें. अशीच एकादी अचिंतनीय कल्पना कदाचित् त्या वेळपर्यंत देखील तिच्या हृदयांतून सर्वस्वी नाहींशी झाली नव्हती. त्या वेळपर्यंत संसारांतल्या तिच्या साऱ्या कांहीं कामना जशाच्या तशा राहिल्या होत्या—एक रात्रसुद्धां उलटली नव्हती—आतां त्यांतलें कांहींच राहिलें नाहीं का ?—एका डोळ्याच्या पातेलवणींतच आपलें सारें जीवन एकदम दुर्भाग्याच्या

शेवटच्या सीमेला ओलांडून बाहेर गेलें का ?—एवढी मोठी मोजमाप नसलेली आपत्ति आली असतांही आपण जिवंत आहों हें सुद्धां तिला खरें वाटेना.

दोघेंही स्तब्ध बसून राहिलीं होतीं. गाडी कुठल्यातरी स्टेशनवर येऊन उभी राहिली आणि थोड्याच वेळांत पुन्हां चालू झाली.

कांहींतरी बोलावें म्हणून सुरेश तोंड उघडीत होता पण लगेच तो गप्प झाला आणि उठून उभा राहिला. खिडकीजवळ जाऊन त्यानें कांचेचा दरवाजा उघडला. कांहीं वेळ त्या डब्यांतच येरझारा घालून तो एकदम अचलेच्या समोर येऊन थांबला आणि म्हणाला, " महिम खुशाल आहे. इतक्यांत तो अलाहाबादला पोहोंचला असेल. " जरा थांबून तो म्हणाला, "—तिथून त्याला जबलपूरला जातां येईल—वाटलं तर पुन्हां कलकत्त्यालाहि जातां येईल. "

अचलेनें हळूहळू वर पाहिलें आणि विचारलें, " अन् आपण कुठं चाललों आहोंत ? "

आंसवांनीं ओसंडलेल्या तिच्या चेहऱ्यावर दुःखाची आणि निराशेची उमटलेली छत्री पुन्हां एकदां सुरेशच्या नजरेला आली. आपण केवढी मोठी चूक केली हें आतां त्याला कळून चुकलें होतें. तेवढ्यासाठीं स्वतःची हत्त्या करून घ्यायलासुद्धां त्यानें मागेंपुढें पाहिलें नसतें. पण त्या हजार प्रकारच्या ढोंगीपणाखालीं सत्याची दृष्टि गुंडाळून ठेवून या चुकीच्या प्रसंगांतूनसुद्धां पुन्हां पुन्हां बोट दाखवणाऱ्या त्या छलनामयीच्या विरुद्ध त्याचें सारें अन्तःकरण एकदम चिडून उठलें होतें. म्हणूनच अचलेचा तो प्रश्न ऐकतांच तो तिरसटून म्हणाला, " आपण बहुधा सशरीर नरकांत चाललों आहों ! ज्या अधःपाताच्या मार्गावर डोळे उघडून एवढा वेळपर्यंत कुणीतरी आपल्याला ओढून आणलंय, तो मार्गच असा आहे, कीं उभं रहावं म्हटलं तरी उभं राहायला थारा मिळायचा नाहीं. आतां शेवटपर्यंत घसरल्याशिवाय गत्यंतर नाहीं ! "

त्याचें तें भाषण ऐकून अचलेला नखशिखान्त कांपरें भरलें. कांहींसुद्धां उत्तर न देतां ती मान खालीं घालून बसली होती. जो मिथ्याचारी कापुरुष परस्त्रीला अशाप्रकारें मार्गभ्रष्ट करून आणायला चुकला नाहीं, त्याबद्दल ज्याला कांहीं दिक्कत वाटली नाहीं, निर्लज्जपणें जो असा तोंड उघडून कारणें सांगायला समर्थ होतो, त्याला उत्तर द्यायचें तरी काय ?

सुरेश पुन्हां येरझाऱ्या घालूं लागला. त्या दगडी पुतळीसमोर उभें राहून बोलायची जणूं काय त्याला ताकद होत नव्हती. येरझारा घालीत असतांनाच तो

बोलत होता, " तूं असा कांहीं आव आणला आहेस, कीं जणूं कांहीं तुझा एकटी-चाच सर्वनाश होतोय. पण ज्याला सर्वनाश म्हणून म्हणायचं ती परिस्थिति माझ्या लेखीं कुठवर जाऊन पोंहोचली आहे त्याची कल्पना आहे का तुला ? तुम्हा लोकांसारखा मी ब्रह्मज्ञानी नाहीं. मी आहें नास्तिक. पापपुण्याचा फुसका आवाज मी काढीत नाहीं. मी अगदीं निर्भेळ खऱ्याखऱ्या सर्वनाशाचा हिशेब करतोंय. तुझ्यापाशीं सौंदर्य आहे, तुझ्या डोळ्यांत आसवं आहेत, बायकांच्या जातीला ज्या कांहीं अस्त्रशस्त्रांची जरूरी असते तीं सारीं तुझ्या भात्यांत हजर आहेत—जरूरीपेक्षां जास्त आहेत – कोणत्याही मार्गानं गेलं तरी तुला अडचण पडायची नाहीं. पण माझं काय होईल याची कल्पना केली आहेस का ? मी पुरुषमाणूस—तुरुंगाची वाट चुकवण्यासाठीं म्हणूनच मला स्वतःच्या हातानं स्वतःला गोळी घालून घ्यायला हवी—" असें म्हणून सुरेश थबकून उभा राहिला आणि त्यानें आपल्या छातीला हात लावून दाखवला.

कांहींतरी बोलावें म्हणून अचलेनें वर पाहिलें पण कांहींच न बोलतां तिनें तोंड फिरवलें. तिला आलेली शिसारी तिच्या डोळ्यांतून उथळून आलेली दिसून येतांच सुरेश रागानें भडकून उठून म्हणाला, " मोराचीं पिसं लावून डोमकावळा कांहीं मोर होत नसतो अचला. ही तुझी नजर मी ओळखतों—पण ती तुला शोभत नाहीं. ही असली नजर शोभते जिला, ती मृणाल – तूं नव्हेस ! सूर्याची झळ सुद्धां न लागलेली हिंदूच्या घरची कुलवधू तूं नव्हेस. एवढ्या तेवढ्यानं कांहीं आम्हीं बाटत नाहीं. तुला वाटेल त्या स्टेशनवर उतरून तूं चालती हो. मी एक पत्र लिहून देतों तें महिमला दाखव—तो तुला घरांत घेईल. पैसे देतों ते तुझ्या बापाला दे—त्याचं तोंड बंद होईल. एवढी कसली काळजी वाटते तुला अचला ? एवढा का मोठा गुन्हा आहे हा ? "

तो पुन्हां येरझारा घालूं लागला. त्यानें फेंकलेला जळता बाण कितपत लागला हें त्यानें पाहिलेंसुद्धां नाहीं—खाण्याच्या लोभानें हिंस्र पशू फांसांत सांपडला असतांना रागानें बेफाम होऊन जसा भडकतो, तो फांस दांतांनीं जसा तोडून फाडून टाकूं पाहतो, त्याचप्रमाणें सुरेश अचलेचे तुकडे तुकडे करून टाकीत होता.

तो एकदम मधेंच थांबला आणि म्हणाला, " हा एवढा का मोठा गुन्हा आहे ? नवऱ्याच्या घरांत त्याच्यासमोर तूं उघडउघड बोलली होतीस – पर-पुरुषावरचं प्रेम कबूल केलं होतंस – विसरलीस का तें ? ज्या माणसानं तुझ्या

घराला आग घालून तुझ्या नवऱ्याला जाळून मारायचा बेत केला होता असं तुला वाटतं, त्याला बरोबर ये म्हणून तूंच म्हटलंस – तो आलाही तसा—आठवतं का तुला ? त्याच्याच घरीं राहिली होतीस, त्याच्याच आश्रयाखालीं दिवस काढलेस – तिथंच चोरून रडत राहिलीस, आणि त्यालाच बरोबर ये म्हणून आग्रह केलास—आठवतं ना ? त्या गुन्ह्यापेक्षां हा गुन्हा मोठा का ? आणखी देखील अदलाबदलीच्या असंख्य बारीकसारीक गोष्टी आहेत. म्हणून ना आज मला एवढा धीर झाला ? मूळांतच तूं एक गणिका, म्हणूनच तुला मी फसवून आणलं. पहिल्यानं तूं थोडीशी नुसती चमकशील एवढंच मला वाटलं होतं—त्यापेक्षां तुझ्याकडून मी जास्त अपेक्षा केली नव्हती ! तुला पुन्हा पुन्हा सांगून ठेवतोंय अचला, तूं सतीसावित्री नाहींस. तें तेज, तो दर्प तुला शोभत नाहीं — जमतही नाहीं. ही वायफळ चर्चा आहे अगदीं !—" असें म्हणून दमछाट होऊन तो निर्जीव होऊन थांबला. अचलेनें एकदां त्याच्याकडे पाहिलें आणि फाटलेल्या आवाजांत ती बोलूं लागली, " आतां थांबू नका सुरेशबाबू, आणखीन् बोला. दोन्ही पायांखालीं मला तुडवून तुडवून जगांतल्या भाषेंत जेवढे कडवे कडवे बोल असतील, जेवढी कुत्सित थट्टा करायची असेल, जेवढा अपमान करायचा असेल तेवढं सारं करून घ्या—" असें म्हणून ती जमिनीवर डोकें टेकून पडली आणि येत असलेलें रडें आवरीत हुंदके देत म्हणाली, "–हेंच पाहिजे मला. याचीच जरूरी होती मला ! हाच आपला खरा खरा संबंध ! देवाकडून, धरणीकडून, आपल्याकडून मला मिळायला हवं आहे तें हेंच."

सुरेश पाठीमागें टेकून ताठ होऊन बघत राहिला होता. अचलेच्या मस्तकावरचे सारे अस्तव्यस्त झालेले केंस खालीं जमिनीवर रुळत होते. तिच्या अंगावरचे ओले कपडे धुळीनें आणि चिखलानें मळून गेले होते, पण सुरेशचें तिकडे लक्षसुद्धां गेलें नाहीं. नवा शिकारी आपण मारलेल्या पहिल्या पांखराच्या मृत्यूच्या यातना जसा थक्क होऊन पहात रहातो, त्याचप्रमाणें डोळ्याचें पातेंसुद्धां न हालवतां तो तिच्याकडे सारखी टक लावून पहात होता. जणूं काय मरायला घातलेल्या एकाद्या स्त्रीच्या शेवटच्या घटकेचाच तो आढावा घेत होता.

पुन्हां गाडीची गति मंद झाली आणि शेवटीं गाडी स्टेशनवर थांबली. सुरेश बसल्या जागेवरून समोर आला आणि शांत, स्वाभाविक आवाजानें म्हणाला, " कुणी तुला अशा दशेंत पाहिलं तर त्याला आश्चर्य वाटेल. आतां उठून बैस तूं. मी माझ्या डब्यांत जातों. सकाळीं तुला जिथं उतरायचं असेल

तिथं पाठवून देईन. तितक्यांत उगीच कांहीं तरी अवचटपणा करायचा प्रयत्न करूं नकोस. त्याचा कांहीं उपयोग व्हायचा नाहीं. ” असें म्हणून दरवाजा उघडून खालीं उतरतांच कांहीं तरी कल्पना मनांत येऊन बाहेरून दरवाजा बंद करून तो क्षणभर तिथेंच उभा राहिला. नंतर आंत डोकावून म्हणाला, “ मी काय सांगतों तें तुला कळायचं नाहीं— पण मी सांगतों तें ऐकून ठेव. हें कोडं उलगडायचा भार मी घेतोंय. कोणत्याही प्रकारें तुझं अकल्याण न होऊं द्यायची जबाबदारी माझ्यावर आहे—या साऱ्या ऋणाची मी कवडीकवडीनं फेड करून देईन. ” असें म्हणून तो संथपणें आपल्या डब्याकडे वळला.

आगगाडीच्या थांबण्याचा आणि पुन्हां चालू होण्याचा एकसुरी आवाज कानीं येत असल्यामुळें प्रत्येक खेपेला सुरेशाची झांपड मोडत होती खरी, पण डोळे उघडून पाहाण्याची ताकद त्याच्या ठायीं राहिली नव्हती. कपडे भिजलेले असल्या-मुळें त्याला अतिशय थंडी वाजत होती. प्रस्तुत परिस्थितींत आपण आजारी पडलों तर प्रसंग मोठा बिकट येईल याची त्याला जाणीव होती. पण बॅग उघडून कपडे बाहेर काढावे असें मनांत येत असतांही तो असमर्थ होऊन पडला होता.

अगदीं याच वेळीं त्याच्या कानीं ओळखीच्या आवाजांतली हांक आली. ‘— कुली ! कुली ! अर्धवट झोंपेतून उठून त्यानें डोळे उघडून पाहिलें त्यावेळीं गाडी कुठल्यातरी स्टेशनवर थांबली असल्याचें त्याला दिसून आलें. काळोख ओसरला होता आणि झिमझिम वर्षाव करणाऱ्या ढगाच्या सांवटींतून एक प्रकारचा धुरकट प्रकाश त्याला स्पष्ट दिसूं लागला होता. त्याला दिसून आलें, कीं अनेक लोक उतरत होते. अनेक चढत होते, आणि त्यांच्या मध्यभागीं उभी राहिलेली एक केविलवाणी स्त्री कुणाची तरी वाट पाहत उभी होती.

ती होती अचला. माथ्यावर एक मोठी चामड्याची बॅग घेऊन एक कुली गाडींतून उतरून खालीं आला. तो तिच्यापाशीं येऊन उभा राहतांच तिनें त्याला बाहेर जाण्याचा रस्ता विचारून ती तिकडे चालूं लागली.

एवढा वेळपर्यंत सुरेश निचेष्टपणें नुसता पहात राहिला होता. समोरचा देखावा जणूं काय त्याच्या नजरेंत शिरत नव्हता. गाडी सुटायच्या घंटेचा आवाज प्लॅटफॉर्मच्या पलिकडल्या कोपऱ्यांतून खालीं येतांच विजेचा झटका बसल्याप्रमाणें एका क्षणांत आंतून बाहेरून त्याची झांपड उडाली आणि स्वतःची बॅग स्वतःच ओढून घेऊन तो ताड्कन खालीं उतरला.

अचलेला तिकिटाची आठवणच नव्हती. दरवाजावर तिकीट-कलेक्टर दिसतांच ती थबकली असें पाहून सुरेशनें दुरूनच सांगितलें, " थांबू नकोस. चल पुढं – मी तिकिट देतों. "

तो उतरल्याचें अचलेला कळलें नव्हतें. क्षणभर ती कुंठित झाली. भीतीनें तिचें पाऊल उचलेना. पण हा तिचा संकोच इतरांच्या लक्षांत येण्यापूर्वीच ती दाराबाहेर निघून गेली.

बाहेर येतांच दोघांचीही बोलाचाली सुरू झाली.

सुरेश म्हणाला, " मला वाटलं होतं कीं तूं सरळ कलकत्त्याकडे परत जायला वळशील—पण इथं डिहरीला कां उतरलीस ? इथं कुणी तुझ्या ओळखीचं आहे का ? "

अचला दुसरीकडेच पहात होती. तिकडेच पहात तिनें उत्तर दिलें, " कल-कत्त्याला मी कुणाकडे जायचं ? "

" आणि इथं ? "

अचला उगीच राहिली. सुरेश म्हणाला, " माझ्या शब्दावर कदाचित् तुझा विश्वास बसणार नाहीं—त्याबद्दल माझी तक्रारही नाहीं—या शेवटच्या क्षणाला एक मागणं आहे माझं तुझ्याकडे.

अचला तशीच मुकाट्यानें उभी राहिली होती.

सुरेश म्हणाला, " मी काय म्हणतों तें कुणाला कळायचं नाहीं अन् तें मला समजावूनही घ्यायचं नाहीं. माझं माझ्यापाशींच राहूं दे. जिथं गेलं म्हणजे इथली आग तिकडे पोळायची नाहीं अशाच कुठल्यातरी ठिकाणीं जाण्यासाठीं मी आज निघालों आहें. पण माझी शेवटची शिदोरी मला दे. एवढीच हात जोडून तुझ्यापाशीं माझी प्रार्थना आहे. "

तरीही अचलेच्या तोंडून एक शब्दही बाहेर आला नाहीं. सुरेश बोलत होता,—" मी पुष्कळच टाकून बोललोंय तुला - पुष्कळसा त्रासही दिलाय. पण माझा चांगुलपणा प्रस्थापित करण्यासाठीं तुझ्यावर कलंकाचा कळिमा मी मेलों तरी लागूं देणार नाहीं. माझ्यापायीं यापुढं तरी तुला त्रास होऊं नये एवढंच मागणं तुझा निरोप घ्यायच्यापूर्वी मी करतोंय तुझ्यापाशीं. "

त्याच्या आवाजांतून कोणती भावना आविष्कृत होत आहे हें एक त्याच्या हृदयस्थ परमेश्वरालाच माहीत. अचलेच्या डोळ्यांत एकदम गरम गरम आसवें आलीं. तिचे डोळे उथळून भरून आले होते, पण त्या अंतरींच्या उमाळ्याचा

आपल्या आवाजावर परिणाम न होऊं देतां तिनें नुसतें विचारलें, " मी काय करायला हवं तें मला सांगा. "

सुरेशनें खिशांतून टाईमटेबल काढलें आणि गाड्या सुटण्याची वेळ पाहून घेऊन तो म्हणाला, " कांहींच करायला नको तूं! कोणत्याही बाजूला जायला संध्याकाळपर्यंत गाडी नाहीं. तेवढा वेळपर्यंत तरी माझ्यावर विश्वास ठेव एवढंच मला सांगायचं आहे. माझ्यापासून तुझं कोणतंही अकल्याण व्हायचं नाहीं हें मी शपथेवर सांगतोंय. "

तिनें यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं, पण या गोष्टीला तिची संमति होती हें त्याला आपोआप कळून चुकलें.

चौकस लोकांची नजर आपल्याकडे जाऊं नये म्हणून तीं दोघेंही परत स्टेशनांत आलीं. तरी पण तिथल्या छोट्याशा वेटिंगरूममधें बसून वाट पहात रहाणें त्या दोघांनाही कठिण गेलें. मोठ्या रस्त्यावर सम्राट् शेरसाहेब यांच्या नांवें प्रख्यात असलेल्या सराईचें अस्तित्व अजूनही नाहींसें न झाल्याचें चौकशीअन्तीं त्यांना कळून आलें. तिकडे जाण्यासाठीं क्षणभर स्वतःचें मर्मांतिक दुःख विसरून एक बैलगाडी करून तीं चालूं लागलीं.

वाटेंत एक दुसऱ्याशीं बोललें नाहीं कीं त्यांनीं एकमेकांच्या नजरेला नजरही दिली नाहीं. बैलगाडी येऊन सराईच्या दाराशीं थांबली त्यावेळीं अचलेची नजर सुरेशच्या चेहऱ्याकडे गेली, त्यावेळीं तिला नुसतें आश्चर्य वाटलें एकढेंच नव्हे, तर ती अत्यंत उद्विग्न झाली. त्याचे दोन्ही डोळे तांबडे लाल झाले होते आणि सारा चेहरा अतिशय काळवंडून गेला होता. संसाराच्या अनेक वारावावटळींत तिनें त्याला पाहिलें होतें, पण अशा प्रकारचा परिणाम त्याच्यावर झाल्याचें तिला दिसून आलें नव्हतें.

गाडीवाल्याला भाडें देऊन निरोप दिल्यावर सुरेशनें पैशाचें पाकीट तिथेंच ठेवून दिलें आणि म्हटलें, " आतां हें तुझ्याकडेच राहूं दे. जरूर लागली तर यांतले पैसे घ्यायला संकोच धरूं नकोस. "

कां तो असें बोलला, हें विचारावें असें अचलेच्या मनांत आलें होतें पण तसें कांहीं घडलें नाहीं.

सुरेश म्हणाला, " ही समोरची खोली बरी असावीशी वाटते. तूं थोडा वेळ विश्रांति घे. तोंवर मी शेजारच्या एकाद्या खोलींत जाऊन कपडे बदलून येतों. मला हें अवघडल्यासारखं वाटतंय तें या कपड्यांमुळंच असेल बहुतेक ! " असें

म्हणून अचलेच्या सोयी गैरसोयीची यत्किंचितही दखल न घेतां आपली बॅग हातीं घेऊन तो निघाला आणि एकाद्या दारुड्याप्रमाणें डळमळत डळमळत साऱ्या पडवींतून पलिकडे जाऊन अगदीं टोकावरच्या खोलींत शिरला.

तो निघून गेला, तरीही अचलेला रस्त्याच्या कडेला एकटेंच उभें रहाणें कठिण गेलें. आपली भली मोठी बॅग फरफटावीत ओढीत तिनें कशीबशी समोरच्या खोलींत आणून टाकली आणि तिच्यावर बसून ती रस्त्यावरून जाणाऱ्या लोकांकडे पहात राहिली.

## ६

त्या खोलीच्या समोर ती बॅगेवर बसली होती. आशेचीं आणि अपेक्षेचीं स्वप्नें पहात दोन तास केव्हां गेले तें तिचें तिलाच कळलें नाहीं. थोड्या वेळानें सूर्य चांगला वर आला. धुळीनें माखलेल्या झाडांना वादळांतल्या पावसानें स्नान घातल्यामुळें सूर्याच्या सकाळच्या किरणांत तीं झुळझुळित निर्मळ झालेलीं दिसत होतीं. पावसानें दबलेल्या राजरस्त्यावर निर्वेध झालेला पादचारी माणूस प्रफुल्ल मुद्रेनें चालूं लागला होता. मधून मधून एकाददुसरी एक्कागाडी छोट्या छोट्या घंटांच्या आवाजानें चारी दिशा जागवीत पळत जात होती. मधून मधून गुराख्यांचीं पोरें गाईम्हशींचे तांडे घेऊन अद्‌भुत आणि असंभव अशा आपुलकीच्या नात्याची मोठमोठ्या आवाजांत घोषणा करीत गांवाबाहेर जायला निघालीं होतीं. जवळच्याच कुठल्यातरी एकाद्या झोंपडींतून जात्यांच्या आवाजांत मिसळलेला हिंदुस्तानी गृहस्थवधूचा फुटका आणि क्वचितच स्पष्ट ऐकूं येणारा आवाज वाऱ्यासरशीं कानीं येत होता.

या साऱ्या गडबडीचा परिणाम तिच्या मनावर होत होता. नव्यानेंच उगवलेल्या या दिवशीं नजरेसमोर दिसणारी रहदारी हळूहळू तिला जाणवूं लागली होती. या दृश्याच्या विचित्र प्रवाहांत तिचें सारें दुःख, तिचें दुर्भाग्य, तिची सारी दुश्चिन्ता क्षणभर कुठल्याकुठें विरघळून गेली होती. काय म्हणून या जागीं आपण अशीं बसलें आहें याचीच तिला आठवण नव्हती. गांवचीं एकदोन पोरें चकित होऊन तिच्याकडे पाहूं लागलीं त्यावेळीं तिची नजर त्यांच्याकडे गेली. अंगणाच्या एका कोपऱ्यांत उभीं राहून तीं पोरें कांहींसुद्धां न बोलतां नुसतीं डोळे टवकारून तिच्याकडे पाहात होतीं. या मोडक्यातोडक्या धर्मशाळेच्या प्राचीन काळच्या गौरवाचा इतिहास त्या पोरांना माहित नव्हता, पण त्यांच्या या

विशिष्ट प्रकारें पाहण्याच्या पद्धतीमुळें अचलेला वाटलें, कीं त्यांच्या उभ्या हयातींत अशा प्रकारचा पाहुणा या जागीं आलेला त्यांच्या पाहण्यांत आलेला नसावा. झोंपेतून उठल्याबरोबर रोजच्या संवयीप्रमाणें खेळायला म्हणून तीं पोरें इथें आलीं आणि हा विलक्षण प्रकार पाहून चकित झालीं असावींत.

अचला दचकून उठून उभी राहिली आणि त्यांना कांहीं विचारणार तोंच तीं दोन्ही पोरें पाहतां पाहतां दृष्टीआड झालीं. त्याच वेळीं तिला आठवलें, कीं कपडे बदलण्यासाठीं सुरेश सुमारें दोन तासांपूर्वीं पलिकडल्या खोलींत गेला तो अजून परत आला नव्हता. एवढा वेळपर्यंत तो एकटाच तिकडे काय करतो आहे हें पाहण्यासाठीं ती हळूहळू त्या खोलीकडे जाऊन दाराशीं उभी राहिली. आंतून कोणत्याही प्रकारची चाहूल येकूं येत नाहीं असें पाहून एक क्षणभर थांबली. त्यानंतर तिनें हळूहळू दार उघडलें. तिला समोर जें दिसलें तें पाहिल्याबरोबर ती अत्यंत घाबरली. तिचा सारा जीव डोळ्यांत आला आणि क्षणभर ती इतकी सुन्न झाली कीं तिचें तिला कांहींच कळेना.

खोलींत काळोख होता. बाजूच्या एका मोडक्या खिडकींतून येणारा प्रकाश जमिनीवर पडला होता. तिथें उजेड अंधाराच्या त्या मिळणींत पाऊलभर सांचलेल्या धुळींत सुरेश चीत होऊन पडला असल्याचें तिला दिसून आलें. त्याच्या अंगावर पूर्वींचेच कपडे होते. मात्र उघडलेल्या बॅगेंतून काढलेले कांहीं जिन्नस इकडे तिकडे पडले होते.

विजेच्या झटक्यासरशी त्याचे जातांनाचे शब्द अचलेला आठवले. तो डॉक्टर होता. माणसाचे प्राण नुसते जगवायचीच विद्या तो शिकला होता असें नव्हे, तर ते बिनबोभाट बाहेर काढण्याचेंही कौशल्य त्याला अवगत होतें. तिला आठवलें, आपल्या हातून घडलेल्या भयंकर चुकीसाठींच त्याला हा विलक्षण पश्चात्ताप झाला असावा. तिला आठवलें, त्यानें एक प्रकारें तिचा निरोप घेतला होता—एक प्रकारें आश्वासन दिलें होतें—विशेषतः कृतकर्मांचें प्रायश्चित्त घेण्याचा तो निष्ठुरपणें पुन्हां पुन्हां उल्लेख करीत होता—जमिनीवर कोसळलेल्या त्याच्या देहाकडे पहातांक्षणींच एकाच वेळीं, एकाच निःश्वासासरशीं, अशा प्रकारचा हा एकच परिणाम व्हायचा, असें तिच्या कानाकानांतून ऐकूं येऊं लागलें. दारावर धरलेल्या हातासकट ती हळूहळू कोसळून खालीं बसली. खोलींत पाऊल टाकण्याचें तिला धैर्य झालें नाहीं.

त्याच्या त्या अचेतन देहाकडे पाहतांक्षणींच तिचे दोन्ही डोळे फाटून आसवें कोसळूं लागलीं. एवढ्या मोठ्या बदनामीचा भला मोठा बोजा माथीं घेऊन तो हतवीर्य होऊन या जगाची कायमची रजा घेऊन गेला तो आपल्यामुळें—त्याचा गुन्हा केवढाही मोठा असला तरी अशा वेळीं आणि अशा परिस्थितींत त्याला क्षमा करण्याची बुद्धि होणार नाहीं इतकें कठिण हृदय या जगांत विरळाच असेल—तिला वाटलें, आज पहिल्यानेंच आपल्या चुकीचें यथार्थ स्वरूप यावेळीं हें असें उघड झालें असावें.

सुरेशबरोबर त्या दिवशीं पहिला परिचय झाल्यापासून ज्या कांहीं कामना, वासना, ज्या भूलचुका, जो मोह, जीं ढोंगें, जे आग्रहआवेग उभयतांच्या मधें होऊन गेले होते, ते सारे एकेक पुन्हा तिच्यासमोर उभे राहिले. तिचें स्वतःचें आचरण, तिच्या बापाचें आचरण—एकदम तिच्या सर्वांगावर शहारे उठले आणि तिला आठवलें, कीं केवळ तिच्या स्वतःच्याच नव्हे तर अनेकांच्या अनेक पातकांचा भला मोठा बोजा वाहतांना आज सुरेश ज्या त्या न्यायाधीशाच्या पायापाशीं येऊन पोहोंचला होता, तिथें तोंड बंद करून दिली ती शिक्षा कबूल करायची त्याच्यावर पाळी आली होती – किंवा जें जें कांहीं दुःख आणि दैन्य दिलें होतें तें सारें कबूल करून एक त्याची क्षमा तरी मागणें त्याला भाग आलें होतें.

संसाराचा उपभोग घेण्यासाठीं अवश्य असलेला अनेक प्रकारचा साजसरंजाम या माणसानें संग्रह केला होता—असें असतांनासुद्धां कोणत्याही प्रकारचें अवडंबर न मांडतां मुकाट्यानें हा आतां तें सारें टाकून चालता होत असल्याचें पाहून अचलेच्या अंतःकरणाला आज पुन्हां पुन्हां अत्यंत यातना होत होत्या. मरणाच्या दारीं उभ्या असलेल्या त्या माणसाला पाहतांच अचलेला जाणवलें, कीं आपण जीव टाकून याच्यावर प्रेम केलें होतें—अविश्वास दाखवायला एवढीसुद्धां जागा ठेवली नव्हती.

तिच्या दोन्ही गालांवरून आसवांचे ओघळ लागले होते. गेल्या रात्रीं गाडींत झालेल्या झगड्याच्यावेळीं धर्मअधर्माबद्दल आणि न्याय अन्यायाबद्दल बरीचशी कडवी चर्चा होऊन गेली होती, पण ती सारी म्हणजे नुसती वायफळ बडबड होती हें अचलेला त्यावेळीं जाणवलें नव्हतें. प्रेमांत जात नाहीं, धर्म नाहीं, विचारविवेक, बऱ्यावाईटाची जाणीव नाहीं—जो अशा प्रकारें जीव द्यायला तयार होतो तो समाजानें घडवलेल्या कायदेकानूंच्या पलिकडचा असतो. ते सारे सामाजिक

विधिनिषेध त्याला स्पर्शसुद्धां करूं शकत नाहींत. प्रत्यक्ष मृत्यूच्या समोर उभें असतांना हें तिनें नाकबूल करायचें कसें ?

अचला पदरानें आपले डोळे पुशीत होती. एकदम तिच्या हृदयांत धडकी भरली. मृतदेह थोडासा चाळवला असें तिला वाटलें आणि त्याच वेळीं अस्पष्ट-पणें कण्हत कण्हत सुरेश या कुशीवरून त्या कुशीवर वळला. तो मेला नाहीं, जिवंत आहे, असें पाहतांच अचला एकदम कळवळून उठली आणि धांवत जाऊन त्याच्या जवळ बसली. भरल्या गळ्यानें तिनें हांक मारली, " सुरेशबाबू !"

तिची हांक ऐकून सुरेशनें आपले रसरसलेले डोळे उघडून तिच्याकडे नुसतें पाहिलें, पण त्याच्या तोंडून शब्द निघाला नाहीं.

अचलेच्याही तोंडांतून शब्द बाहेर निघत नव्हता. आंतून येणाऱ्या उसळीमुळें तिचा गळा दाटून येत होता आणि तो अंतःकरणांतील आवेग आसवांच्या रूपानें डोळ्यांवाटे पाझरत होता—पण कांहीं वेळांपूर्वी येणाऱ्या आसवांत आणि या आसवांत किती मोठा फरक होता !

चिंतेनें तिला ग्रासलें होतें, पण त्यांतल्यात्यांत तिला अत्यंत त्रास होत होता तो या प्रकाराच्या वास्तव बाजूमुळें. या परिचित जागीं सुरेशच्या मृतदेहाच्या बाबतींत काय करायचें, कुणाला बोलवायचें, कुणाला सांगायचें—कदाचित् या बाबतींत अत्यंत अप्रिय अशी चर्चा होईल, अनेक कुत्सित प्रश्न उत्पन्न होतील—त्या बाबतींत कुणाला काय जबाब देणार होती ती ? कदाचित् पोलिसांनीं तंबी दिली असती आणि मग सारी हकीकत बाहेर आली असती—त्या साऱ्या हकिकती उघडकीस येणार या भीतीनें तिचें सारें अंतःकरण इतकें गांजून गेलें होतें, तिला इतके क्लेश होत होते, कीं त्या सर्वांची जाणीव यथार्थ स्वरूपांत तिलासुद्धां झाली नव्हती. त्या साऱ्या विटंबनेपासून आतां आपला बचाव झाला असें दिसून आल्यावर तिचें रडणें थांबेनासें झालें. तो मेला नाहीं एवढें कळून आल्यामुळें अचलेचें सारें अंतःकरण कानाकोपऱ्यांतून कृतज्ञतेनें भरून गेलें.

अशाच प्रकारें कांहीं वेळ गेला. सुरेशनें कण्हत कण्हत विचारलें, " रडतेस कां अचला ?"

भरल्या गळ्यानें अचलेनें उत्तर दिलें, " तुम्हीं कां असे पडून राहिलां ? कां गेलां नाहींत ? कां मला एवढी भीति दाखवलीत ?"

तिचा आवाज स्नेहाच्या भावनेनें उसळून उठला होता, तो एवढा करुण, एवढा मधुर झाला होता, कीं नुसता सुरेशच नव्हे, तर स्वतः अचला देखील आपली आपल्यावरच खूष होऊन गेली होती. ती म्हणाली, " एवढी झोंप येत होती तर मला कां सांगितलं नाहींत ? मी पलिकडली खोली साफसूफ करून कसाबसा बिछाना नसता का अंथरून दिला ? गाडीची वेळ व्हायला खूप अवकाश होता. "

सुरेशनें यावर कांहीं उत्तर दिलें नाहीं. स्नेहाच्या भावनेनें विगलित होऊन तो तिच्याकडे पाहात राहिला होता. त्यानें तिचा उजवा हात आपल्या हातीं घेतला आणि तो आपल्या रसरसलेल्या मस्तकावर ठेवून घेऊन एक मोठा सुस्कारा सोडला.

अचला दचकली. तिला एकदम चटका बसला. त्याचें मस्तक भयंकर तापलें होतें. तिनें विचारलें, " ताप आला आहे का तुम्हांला ? "

सुरेश म्हणाला, " हो ! हा ताप सहजासहजीं निघेल असं कांहीं मला वाटत नाहीं ! मला वाटतं — "

अचलेनें हळूहळू आपला हात काढून घेतला. उत्तरादाखल तिनेंही एक मोठा सुस्कारा सोडला. तिच्या हृदयांतील उसळलेली स्नेहाची आणि ममतेची भावना एका क्षणांत आंकसून दगडासारखी कठिण होऊन गेली. सारें कांहीं सहन करून, असलीनसलेली सारी शक्ति एकवटून, उसनें अवसान आणून ती गाडीची वाट पाहात हा वेळपर्यंत राहिली होती. मनांतल्या मनांत तिनें जो निश्चय ठरवला होता तो फुकट गेला. या अनपेक्षित आणि अभावित संकटामुळें वर आलेल्या मेघाच्या कडेला जो थोडासा आशेचा प्रकाश हा वेळपर्यंत दिसत होता तोही आतां नाहींसा होऊन गेला. आतां मरणाखेरीच दुसरा मार्ग नाहीं, असेंच तिला वाटलें.

अशा परिस्थितींत त्याला तिथें टाकून जाण्याची कल्पना तिला दुःसह झाली. आज त्याच्यावर ओढवलेल्या या संकटाची सारी जबाबदारी आपल्या माथ्यावर येऊन पडली आहे हें तिला जाणवलें. या अपरिचित प्रदेशांत आतां काय करावें, कुठें कुणाची मदत कशी मिळवावी, काय सांगून कुठल्या कुणा माणसाची सहानुभूति कशी मागावी, सारखें कसलें ढोंग करीत रहावें, या साऱ्या अडचणींबद्दलचे विचार विजेच्या झटक्यासारखे तिच्या मस्तकांत सळसळून गेले. आतां कुठेंतरी पळून जावें, कीं टाहो फोडून रडावें, कीं जोरानें मस्तक आपटून

घ्यावें आणि या अभिशप्त जीवनाचा हातोहात शेवट करून निश्चिंत व्हावें, हें कांहींच तिला कळेनासें झालें होतें. कुठेंच कसलाहि आधार तिला दिसत नव्हता.

## ७

त्या दिवशीं स्टेशनवरून परत येतांना पावसांत भिजल्यामुळें केदारबाबू गेले सातआठ दिवस सांधे धरून सर्दीच्या तापानें बिछान्याला खिळून पडले होते. मुलगी आणि जांवई यांची खुशाली न कळल्यामुळें अत्यंत हवालदिल झाले असतांही, जबलपूरला आपल्या मित्राला एक कार्ड लिहून टाकण्यापलिकडे त्यांना अधिक कांहीं करतां आलें नव्हतें.

आज त्या पत्राचें उत्तर आलें होतें. कुणीच तिकडे आलें नाहीं किंवा कुणाचीच कांहीं खबर कळली नाहीं, एवढेंच त्या पत्रांत लिहिलें होतें. त्या चारदोन ओळी पुन्हा पुन्हा वाचीत केदारबाबू उतरलेल्या मुद्रेनें नुसते टक लावून बाहेर पाहात चष्म्याच्या कांचा जोरजोरानें पुशीत राहिले होते. हीं दोघें गेलीं कुठें, त्यांचें काय झालें, त्यांची खबर काढण्यासाठीं कुणाला हांक मारावी, कुणाला पत्र लिहावें, कुणापाशीं चौकशी करावी, हें कांहींच त्यांना सुचेनासें झालें होतें. अडीअडचणीच्या वेळीं जीव तोडून मदत करणारी एकच व्यक्ति होती—तो सुरेश देखील आज नव्हता. त्यांच्याचबरोबर गेला होता.

अगदीं याचवेळीं गड्यानें येऊन आणखीं एक पत्र त्यांच्या समोर ठेवलें. कसाबसा नाकावर चष्मा चढवून केदारबाबूंनीं थरथरत्या हातांनीं तें पत्र फोडून पाहिलें. पत्र अचलेच्या नांवें आलेलें होतें. बायकी अक्षरांत लिहिलेलें तें अत्यन्त सुवाच्य असें पत्र होतें. तें पत्र कुणी लिहिलें, कुठून पाठवलें, तें पत्र आपल्या नांवें होतें कीं दुसऱ्या कुणाच्या नांवें होतें, तेंही त्यांच्या ध्यानीं आलें नव्हतें. घाईघाईनें पाकीट फोडून पहिल्यानें त्यानीं पाठवणाऱ्याच्या नांवावर नजर फेंकली, तिथें लिहिलें होतें—' तुझी मृणाल. '

हें पत्र देखील त्यानीं पुन्हा पुन्हां आरंभापासून अखेरपर्यंत किती तरी वेळ वाचून पाहिलें आणि तशाच प्रकारें शून्य दृष्टीनें बाहेर पहात ते चष्मा पुसूं लागले. त्यांच्या मनांत कोणत्या प्रकारची खळबळ सुरू झाली होती तें त्या एका परमेश्वरालाच माहीत.

बराच वेळ चष्मा पुसून झाल्यावर तो डोळ्यांवर चढवून पुन्हां एकदां त्यानीं पत्र सुरवातीपासून शेवटपर्यंत वाचायला सुरवात केली. पत्राच्या आरंभीं

मृणालनें स्त्री जातीला अवश्य असलेल्या सहिष्णुता, क्षमा, धैर्य प्रभृति गुणांच्या-बद्दल नाना प्रकारचा उपदेश देऊन शेवटीं लिहिलें होतें—

‘दादा तुझ्या बाबतींत कांहीं बोलत नाहीं खरा, विचारलें तर एकदम अत्यंत गंभीर होऊन जातो हेंही खरें, पण मी आहें एक बायकोमाणूस - मला सारें कांहीं कळतें ! असें पहा वहिनी, झगडा भांडण कोण करीत नाहींत ग बाई ? म्हणून एवढा अभिमान तरी कशाला ? तुझ्या शरीरप्रकृतीची म्हण, कीं मनाची म्हण, परिस्थिति न कळल्यामुळें तुझा नवरा कदाचित रागावलाही असेल, पण तूं तर अजून पागल झालेली नाहींस ? तो एवढें कुठें बोलला तोंच तूं अगदीं स्वेच्छेनें होकार देऊन म्हणालीस,—‘ठीक आहे. होऊन जाऊं दे. तुम्ही जा वनवासाला !’ मला प्रश्न पडला आहे तो एवढाच वहिनी, कीं कसाबसा जीव धरून राहिलेल्या आपल्या मरणोन्मुख नवऱ्याला तूं एवढ्या सहजासहजीं जंगलांत एकटाच कसा सोडून दिलास ? तेवढेंच करून राहिली नाहींस, तर गेले सातआठ दिवस — दिवस कसचे, वर्षेंच, निश्चिंतपणें बापाच्या घरीं राहिलीस तरी कशी ? खरोखर तुला सांगतें, त्या दिवशीं सामानसुमान घेऊन तो त्यावेळीं माझ्याघरीं आला त्यावेळीं मी त्याला ओळखलेंसुद्धां नाहीं. तुमचें भांडण कां झालें, कधीं झालें, ठरल्याप्रमाणें पश्चिमेकडे जाण्याऐवजीं काय म्हणून तो पुन्हां परत आपल्या गांवीं आला, तें मला मुळींच कळलें नाहीं—कळून घ्यायची माझी इच्छाही नाहीं ! पण माझ्या गळ्याची शपथ आहे, हें पत्र वाचतांक्षणींच तूं एकदम निघून ये. माझ्या सासूला टाकून मला कुठेंच जातां येत नाहीं तें माहित आहे ना तुला ? मी तेंही केलें असतें—दादा एवढा आजारी झाला नसता तर स्वतः येऊन तुझ्या बखोटीला धरून तुला ओढीत आणलें असतें ! एकदां ये—एकदां स्वतःच्या डोळ्यांनीं पहा - खोट्या अभिमानाला बळी पडून केवढी मोठी चूक तूं केली आहेस तें त्याचवेळीं तुला पटेल ! हें घर तुझें आहे. मीही तुझीच आहें. या घरीं येण्यासाठीं मुळींच मागेंपुढें पाहूं नकोस. मी तुझ्या वाटेकडे डोळे लावून बसलें आहें. चरणीं शतकोटी प्रणाम ! आणखी एक गोष्ट—मीं हें पत्र लिहीत आहें हें दादाला कळविलें नाहीं. चोरून लिहिलें आहे. त्याला हें कळतां कामा नये,—कळावें ही विनंति—

तुझी मृणाल.’

पत्र पुरें झाल्यावर तिनें ताजाकलम लिहिला होता आणि म्हटलें होतें कीं, ‘नवरा हजर नसतां तूं सुरेशबाबूंच्या घरीं पाऊलसुद्धां टाकणार नाहींस हें

मला माहित आहे, म्हणून मी हें पत्र तुझ्या बापाच्या घरच्या पत्त्यावर लिहीत आहें. हें पत्र निश्चित तुझ्या हातीं पडेल अशी मला खात्री आहे. '

केदारबाबूंच्या हातून पत्र गळून खालीं पडलें. पुन्हां शून्य दृष्टीनें पहात ते चष्मा पुशीत राहिले होते. महिम जबलपूरला जाण्याच्याऐवजीं पुन्हां आपल्या गांवीं गेला आणि अचला तिथें नाहीं, एवढें आतां त्यांना कळून आलें. ती कुठें गेली, तिचें काय झालें, हें सारें महिमला कदाचित् माहित असलें तरी तें उघड करून सांगायाची त्याची इच्छाही नसेल.

चट्कन त्यांना आठवलें, मग सुरेश कुठें गेला ? त्याचाच पाहुणा म्हणून तो बरोबर गेला होता. तो घरीं परत आला नाहीं. आला असता तर खास भेटला असता.

त्यांच्या पितृहृदयांत जी एक शंका एकदम जागी झाली, ती त्यांच्या हृदयाला बाणासारखी वेधून गेली. तो आघात सोसणें त्यांना कठिण गेलें. ते आरामखुर्चींत एकदम मागें कोसळले आणि त्यानीं दोन्ही डोळे मिटून घेतले.

मोलकरीण दुपारीं सुरेशच्या घरीं जाऊन आली. त्याच्या आत्त्याला सुरेशची कांहींच खबर कळली नव्हती. त्याचें पत्र न आल्यामुळें तीही काळजींत पडली होती.

रात्रीं झोंपायच्या खोलींत एकटेच असल्यावेळीं केदारबाबूंनीं मृणालचें पत्र बाहेर काढून दिव्याजवळ बसून पुन्हां एकदां वाचून घेतलें. कुठें ना कुठें तरी धागादोरा सांपडेल या आशेनें त्यानीं अक्षर अन् अक्षर छानून छानून पाहिलें. कुठें जावें आणि कुठें तोंड लपवून रहावें हेंही त्यांना कळत नव्हतें. आज पिढ्यान् पिढ्या ते कलकत्त्यांत रहात होते. कलकत्त्याच्या बाहेर भल्या माणसांची वस्ती आहे असें त्यांना केव्हांही वाटलें नव्हतें. जन्मभर जो प्रदेश कधीं ओळखीचा झाला नाहीं त्या प्रदेशांत आणि समाजांत इष्टमित्रांशीं फारकत करून पुढचा सारा काळ अज्ञातवासांत कसा घालवायचा हाच प्रश्न त्यांना पडला होता. हे थोडे दिवस कसे काढायचे हेंच त्यांना मोठें दुःसह वाटत होतें. त्याची कांहीं कल्पनाही येत नव्हती. ज्या दुर्भागी मुलीनें एवढ्या मोठ्या शिक्षेचा बोजा आपल्या थकल्याभागलेल्या मस्तकावर चढवला, त्या मुलीला कोणत्या शब्दांनीं शाप द्यावा हें देखील त्यांना कळेनासें झालें होतें.

साऱ्या रात्रींत त्यांचा डोळ्याला डोळा लागला नव्हता. पहांटे जाग येतांच संधिवाताचें दुखणें पुन्हा चाळवलें आहे असें त्यांना दिसून आलें. या अशा

प्रसंगीं ज्याच्या तोंडाकडे आशेनें पहावें असें एकही माणूस या वेळीं त्यांना नजरेसमोर दिसत नव्हतें. निर्जीव होऊन बिछान्यावर पडून रहाणेंही त्यांच्या जिवावर आलें होतें.

हृदयाला होत असलेल्या या असह्य वेदना गिळून शांत मुद्रेनें नित्याच्या-प्रमाणें ते बाहेर आले आणि रेल्वे स्टेशनवर जाण्यासाठीं गाडी ठरवून आणायला मनुष्य पाठवून त्यानीं आपलें सामानसुमान बांधून तयार ठेवायला नोकराला सांगितलें.

## ८

तिसऱ्या प्रहरचा हिंवाळ्यांतला सूर्य दृष्टीआड व्हायची सुरवात झाली होती. शोण नदीच्या लांबलचक वाळवंटांतील वाळू त्या तसल्या किरणांतसुद्धां तापून निघाली होती. अशा वेळीं एका बंगल्याच्या ओटीचें रेलिंग धरुन अचला त्याच बाजूला मुकाट्यानें पाहत उभी होती. या तापलेल्या वाळवंटाशीं तिच्या जीवनाचा कांहीं निकटचा संबंध होता कीं नाहीं कोण जाणे; तरीपण त्या तिच्या निश्चल दृष्टीकडे एक क्षणभर पाहिलें तरी, जरी विशेष कांहीं कल्पना करतां आली नसती, तरीही तिच्या दृष्टीनें हें सारें जग म्हणजे एक विचित्र आणि अफाट मृगजला-सारखें तिला भासत असावें.

" आक्का ! "

अचलेनें दचकून मागें पाहिलें. ज्या बाईनें पूर्वी आपलें नांव ' राक्षसी ' असें सांगितलें होतें आणि जी आरा स्टेशनवरून गेली होती, तीच ती.

ती जवळ आली आणि अचलेच्या उतरून गेलेल्या आणि भांबावलेल्या निस्तेज चेहेऱ्याकडे क्षणभर पाहून घेऊनं रुसल्यासारखें करून म्हणाली, " हें पहा आक्का, सुरेशबाबू आतां बरे झाले आहेत. डॉक्टर म्हणतात, कीं आतां तिळा-एवढीसुद्धां भीति नाहीं. तरीसुद्धां रात्रंदिवस तुझी काळजी मिटत नाहीं. तोंडावर हंसू फुटत नाहीं तुझ्या. हा तुझा अतिप्रसंगच नव्हे का ? आमचेसुद्धां घरचे घरधनी आहेत, ते आजारीबिजारी झाले कीं आम्हीं काळजीनें अर्धमेलीं होऊन जातों, नाहीं असं नाहीं—पण तुझं हें वागणं मात्र बाई अगदीं जगावेगळं आहे ! तुझ्याशीं तोडच व्हायची नाहीं आमची कुणाची ! "

अचलेनें मान वळवून नुसता एक सुस्कारा सोडला. पण तिच्या प्रश्नाला उत्तर दिलें नाहीं.

ती रागाला येऊन म्हणाली, “ हें काय ग बाई ! फस्‌कन एक सुस्कारासा सोडलास ?—”

क्षणभर तिनें तिच्या उत्तराची वाट पाहिली पण अचला कांहींच बोलत नाहीं असें पाहून तिनें तिचा हात आपल्या हातीं धरून तिला जवळ ओढलें आणि अत्यंत काकुळतवाणीनें विचारलें, “ आतां खरं सांग सुरमाआक्का, आमच्या घरीं तुझं एक क्षण देखील मन लागत नाहीं—नाहीं ? फार गैरसोय होतेय तुझी —कष्ट वाटताहेत—खरं ना ? ”

अचला नदीकडे जशी पहात राहिली होती तशीच टक लावून राहिली होती, पण यावेळीं मात्र तिनें उत्तर दिलें. ती म्हणाली, “ तुझ्या सासऱ्यानं आमच्यावर जे उपकार केले आहेत ते या जन्मीं कधीं विसरले जातील का ग बाई? ”

ती हंसली आणि म्हणाली, “ ते विसरावे म्हणूनच तर मी एवढा जिवाचा आटापिटा करतें आहें !—” तितक्यांत रागाचा खोटा आव आणून ती म्हणाली, “ म्हणूनच वाटतं बाबा एवढ्या हांका मारीत असतां त्यांना उत्तर दिलं नाहींस ? तुला वाटलं, हा म्हातारा जेव्हां तेव्हां—”

अचला एकदम चकित झाली. मागें पाहून ती म्हणाली, “ छे ! छे ! असं कधीं व्हायचंच नाहीं—”

राक्षसी म्हणाली, “ व्हायचं नाहीं कसं ? मी स्वतःच ऐकतें आहें. केव्हां-पासून देवघरांतून आलेली हांक मीं ऐकली— सुरमा, अग ए सुरमा !— असं चारपांच वेळ ऐकूं आलं बाबांच्या तोंडून. पूजेची तयारी करीत होतें, ती बाजूला लोटली आणि धांवतच आलें ! ते जिना उतरून येत होते, अगदीं खरं खरं सांगतें आक्का, थट्टा करीत नाहीं ! ”

म्हाताऱ्यानें ‘ सुरमा ’ म्हणून पुन्हा पुन्हा हांक मारली तरी आपल्या बावरलेल्या मनापर्यंत ती कां पोंचली नाहीं तें अचलेला कळून चुकलें होतें. ती शरमली होती. तिच्या जिवाला तें लागलें होतें. ती म्हणाली, “ मला वाटतं, खोलींत . . ”

राक्षसी म्हणाली, “ खोलींत काय आहे ? खोली ज्यांच्यासाठीं, ते केव्हांच बाहेर फिरायला गेले आहेत ! पलिकडून अगदीं स्पष्ट दिसून आलं मला, तूं रेलिंग धरून अशीच उभी होतीस !—” असें म्हणून ती क्षणभर थांबली आणि थोडेसें हंसून म्हणाली, “ पण तुझं मन ठिकाणावर नव्हतं ग बाई ! म्हाताऱ्याची हांक कशी येणार तुला ऐकायला ? तूं कसला विचार करीत होतीस तें जर मी तुला सांगितलं—”

अचला मुकाट्यानें पूर्वीप्रमाणेंच नदीच्या पलिकडच्या किनाऱ्याकडे पहात राहिली होती. राक्षसीच्या या खोंचदार बोलण्याला उत्तर द्यायचा तिनें एवढासुद्धां प्रयत्न केला नाहीं.

तिचें नांव राक्षसी होतें खरें, पण तिच्या स्वभावाला तें यत्किंचितही अनुरूप नव्हतें. खरें पाहिलें तर तिचें नांव राक्षसी नव्हतें – तें होतें वीणापाणी. जन्मतःच तिची आई मेली, त्या वेळेपासून तिची आजी रागारागानें तिला या नांवानें हांक मारूं लागली, शेजारीपाजारीही तेंच नांव घेऊं लागले आणि शेवटीं तें नांव सासूसासऱ्यापर्यंत जाऊन पोंचायचें राहिलें नाहीं.

अचलेनें एकदम तोंड फिरवलें. ती मुकाट झाली असें पाहून राक्षसी मनांतल्या मनांत शरमली. ती ओशाळून म्हणाली, "तुझी एवढीसुद्धां थट्टा मी करायची नाहीं का आक्का? बाबांच्यावर तुझी केवढी भक्ति आहे तें मला माहित का नाहीं? आम्हांला सारं कांहीं कळलंय त्यांच्याकडून! सकाळींच ते फिरायला गेले होते. तूं रडतरडत डॉक्टरचा शोध करायला धांवत निघाली होतीस. तुझ्याबरोबर ते गेले आणि तुझ्या नवऱ्याला घेऊन घरीं आले. तें सारं घडवून आणलं त्या देवानं—नाहींतर या घरीं तुझी पायधूळ झडेल असं त्या दिवशीं गाडींत भेट झाल्यावेळीं कुणाला वाटलं असतं? पण तूं माझ्या प्रश्नाचं कांहीं उत्तर दिलं नाहींस! आमच्या या घरीं तुला एक क्षणसुद्धां बरं वाटत नाहीं का असं मी विचारीत होतें. मला तें कळून चुकलंय—पण कां? कसली अडचण आहे इथं? कसली गैरसोय होतेय? तेवढंच मला कळून घ्यायचं आहे!"

पूर्वीप्रमाणेंच ती उत्तरासाठीं वाट पाहात राहिली. एकदम तिला वाटलें, कोणत्याही कारणामुळें कां असेना, तिच्याकडून उत्तर मिळण्याची वाट आपण उगीच पहात आहोंत. तिच्या सासऱ्यानें मोठ्या सन्मानानें त्यांना आश्रय दिला. तीही तिला 'सुरमाआक्का' म्हणून आपुलकीनें वागवीत होती. मग हें असें कां?

तिनें बळेंबळेंच तिच्या हनुवटीखालीं हात घालून तिचें तोंड वळवून घेऊन पाहिलें, तों तिच्या दोन्हीं डोळ्यांवाटे आसवांचा पाझर लागला असल्याचें तिला दिसून आलें. ती स्तब्ध होऊन पहात राहिली, अचलेनें आपल्या पदरानें आपले डोळे पुसले आणि आपली शून्य दृष्टि दुसरीकडे वळवली.

दुसऱ्या दिवशीं तिसऱ्या प्रहरच्या सुमाराला नुकत्याच आलेल्या मासिक पुस्तकांतील एक लघुकथा, वीणापाणी अचलेला वाचून दाखवीत होती. एका वेताच्या खुर्चीवर पडल्या पडल्या अचला तिकडे मधून मधून कान देत होती.

मधून मधून त्यांतला कांहीं भाग तिच्या कानीं जात नव्हता. इतक्यांत वीणापाणीचा सासरा रामचरण लाहिरी " अग ए राक्षसी ! " म्हणत जिन्यावरून उतरून खालीं आला. दोघीही घाबऱ्या घाबऱ्या उठून उभ्या राहिल्या. वीणापाणीनें एक खुर्ची आणून म्हाताऱ्याला बसायला दिली आणि उत्सुक मुद्रेनें विचारलें, " काय बाबा ? "

हा म्हातारा एक अत्यंत निष्ठावान हिंदू होता. शांतपोक्तपणें तो येऊन खुर्चीवर बसला आणि मोठ्या वात्सल्यानें अचलेच्या तोंडाकडे पहात म्हणाला, " एक गोष्ट सांगायची आहे पोरी ! आतांच भटजी आले होते ! तुम्हां नवराबायकोच्या नांवानें संकल्प करून ते नारायणाला तुळशी वाहात होते. उद्यां तें काम पुरं होईल ! तेव्हां असं पहा पोरी, थोडी अडचण सोसून जरा उशीरांपर्यंत तुला उपाशीं रहायला हवं. ते इथंच ' नारायण ' घेऊन येणार आहेत. तुला दुसऱ्या कुठं कांहीं जायला नको ! "

त्यांचें तें भाषण ऐकून अचलेचा चेहरा एकदम काळवंडून गेला. त्या अस्पष्ट प्रकाशांत म्हाताऱ्याला जरी तें दिसून आलें नाहीं तरी वीणापाणीनें मात्र तिची मुद्रा अचुक हेरली. ती हिंदूच्या घरची मुलगी होती. जन्मादारभ्य ती त्याच संस्कारांत लहानाची मोठी झाली होती. आजारी असलेल्या नवऱ्याच्या कल्याणासाठीं केलेल्या नवसाच्या बाबतींत बायकोला किती उत्साह आणि आनंद वाटत असतो, याची कल्पना ती आपल्या संस्काराप्रमाणें करीत होती. म्हणूनच अचलेच्या मुद्रेवर एकदम झालेला तो अवचट बदल पाहून तिला अत्यंत आश्चर्य वाटलें.

तरीपण आपल्या मैत्रिणीची बाजू संभाळण्यासाठीं तिनें विचारलें, " असं पहा बाबा, ' नारायणा ' ला तुळशी वाहायला तुम्हीं सांगितलंत तें सुरेशबाबूंसाठीं—मग त्यांना उपास करायला सांगायच्या ऐवजीं आक्काला उपास करायला कां सांगतां ? "

म्हातारा हंसून म्हणाला, " अग ते आणि ही तुझी आक्का हीं दोन का आहेत पोरी ? सुरेशबाबूंची प्रकृति सध्यां उपास करण्याइतकी चांगली नाहीं, म्हणूनच तुझ्या सुरमाआक्कानंच आतां उपास केला पाहिजे. तो नुसता शास्त्रविधि आहे—कांहीं काळजी करूं नकोस पोरी. "

अचलेनें यावर हो—ना कांहींच उत्तर दिलें नाहीं. ती मुकाट्यानें राहिली असें जेव्हां त्या प्रेमळ म्हाताऱ्याला दिसून आलें तेव्हां त्यालाही विचार पडला. अचलेकडे सरळ पाहून त्यानें विचारलें, " याला तुझी कांहीं हरकत आहे का सुरमा ? "

तो तिच्याकडून कांहीं नको होय असें उत्तर येईल या आशेनें पहात राहिला होता.

अचलेला प्रश्न पडला, कीं याचें उत्तर काय द्यावें. थांबून ती हळूच तोंडांतल्या तोंडांत पुटपुटली, " त्यांना सांगितलंत तर मला वाटतं तेच उपास करतील ! "

तें तिचें उत्तर ऐकल्यावर सारींच चुपचाप राहिलीं. तिचें तें उत्तर त्यांना किती विसंगत, किती कडवट आणि निष्ठुर वाटलें ! तें बोलणारीला तर कळून चुकलेंच होतें—इतरांपेक्षां जास्त जाणवलें होतें तिलाच—त्यामुळें तिची मनः-स्थिति काय झाली तें त्या तिच्या अंतर्यामीं परमेश्वरालाच कळलें असेल !

म्हातारा उठून उभा राहिला आणि म्हणाला, " तर मग त्यांनाच सांगतों. "

तो शांतपणें उठून निघून गेला. नोकर दिवा लावून गेला तरीही त्या दोघी संकोचानें कुंठित होऊन शब्दसुद्धां न बोलतां बसून राहिल्या होत्या. मासिक पुस्तकांतील ती अत्यंत उत्तेजक आणि आकर्षक गोष्ट पुरी करण्याइतका उत्साह कुणाच्याच ठायीं राहिला नव्हता.

बाहेरचा काळोख दाट होत आला होता. पलिकडच्या किनाऱ्यावरचें धूसर वाळवंट त्या काळोखांतून देखील त्यांच्या नजरेसमोर दिसत होतें. त्या दोघीही अस्वस्थ झाल्या होत्या. बोलत नसल्या तरी ओशाळल्या होत्या. तें दृश्य म्हणूनच त्यांच्या नजरेला स्वप्नांतील दृश्यासारखें वाटूं लागलें.

कितीतरी वेळ त्या दोघीही तशाच बसून राहिल्या असत्या, पण वाणीपाणीच्या मनांत काय आलें कोण जाणें, तिनें आपली खुर्ची अचलेच्या बैठीकीपाशीं ओढून घेतली आणि आपला उजवा हात तिच्या मांडीवर ठेवून ती हळूच तिला म्हणाली, " त्या पलिकडल्या वाळवंटाकडे बघतां बघतां मला काय वाटतंय तें सांगूं का तुला आक्का ? असं वाटतंय, कीं जशी कांहीं तुझीच ती प्रतिमा ! अशीच थोडीशी काळोखाखालीं झांकळलेली—हें काय ! अशी शहारलीस कां ? काय झालं ? "

अचला कांहीं वेळ कांहीं न बोलतां बसली होती. नंतर तोंडांतल्या तोंडांत पुटपुटली, " अचानक कशी थंडी भरून आल्यासारखं वाटतंय. "

वीणापाणी चटकन उठून खोलींत गेली आणि एक गरम कापड घेऊन आली. तें अचलेच्या अंगावर घालून पुन्हां ती आपल्या जागीं बसली आणि म्हणाली, " एक गोष्ट तुला विचारावीशी वाटतेय आक्का, पण जरा लाज वाटते मला. तूं जर रागावणार नसशील तर—"

अज्ञात शंकेमुळें अचलेच्या काळजांत धडकी भरली. यापेक्षां अधिक बोलायला गेलें तर गळा कापला जाईल या भीतीनें यापुढें कांहीं बोलायचेंच नाहीं असें तिनें ठरवलें.

वीणापाणीनें मोठ्या लाडीगोडींत येऊन तिच्या हातावर आपला हात ठेवला आणि म्हटलें. "आतां तूं माझी आक्का. मी तुझी धाकठी बहीण झालेंय. त्या-दिवशीं गाडींत मी तुझी कुणी नव्हतें. त्या दिवशीं आपली ओळख द्यायचं कां चुकवलंस ? प्रत्यक्ष तुझा नवरा, तो माझा कुणी नव्हे म्हणून सांगितलंस— अन् म्हणालीस, माझा आजारी नवरा दुसऱ्या डब्यांत आहे. त्याला घेऊन जबलपूरला जायचं आहे !—पण त्यावेळीं देखील मी फसलें नव्हतें. ते तुझे कोण हें मी पक्कं ओळखलं होतं. अन् त्यावेळीं म्हटलंस, कीं आपण ब्राह्म म्हणून—" असें म्हणून ती खुद्कन् हंसली आणि म्हणाली, "पण आतां पाहिलें,—तुझ्या नवऱ्याच्या गळ्यांतलं भलंमोठं जानवं पाहिलं तर विष्णुपूरचे सैंपाकी भटजीसुद्धां लाजतील ! आतां सांग, उगीच इतकं खोटं कां बोललीस त्यावेळीं ?"

बळेंबळेंच हंसायचा प्रयत्न करीत अचला म्हणाली, "अन् नाहींच बोललें असतें तर ?"

वीणापाणी म्हणाली, "तर मग मी सांगतें—पण आधीं मला हें सांग, कीं मी जर बरोबर सांगितलं तर तूं मला काय देशील ?"

अचलेच्या हृदयांत वाहणारें रक्त जणूं काय थांबूं लागलें होतें. तिचा चेहरा प्रेतकळेसारखा पांढराफटक पडला होता. तिथल्या दिव्याचा प्रकाश मंद असल्या-मुळें वीणापाणीच्या नजरेला तो आला कीं नाहीं तें सांगतां आलें नसतें, पण ती ओठ दाबून हंसत म्हणाली, "बरं बरं. कांहीं दे किंवा देऊं नकोस—पण खरं काय तें मी तुला सांगितलं तर मला काय खायला घालशील अचलाअक्का ?"

स्वतःचें खरें नांव कानानें ऐकतांच कुणीतरी तापलेली सळई कानांत खुपसली असें तिला वाटलें. ती अर्धवट शुद्धींत, तर अर्धवट बेशुद्ध झाल्यासारखी ताठरून राहिली होती.

वीणापाणी बोलत होती, "—हा कांहीं आम्हां बहिणींचा दोष नव्हे. दोष आम्हां दोघींच्याही नवऱ्यांचा. एकानं तापाच्या गुंगींत तुझं खरं सांगून टाकलं अन् दुसऱ्यानं खरं खरं तें बाहेर फोडलं."

अचलेच्या हृदयांत खळबळ उडाली होती पण ती आवरण्यासाठीं जिवाचा धडा करून ती म्हणाली, "खरं खरं म्हणजे काय ग ?"

वीणापाणी म्हणाली, " खरं असो कीं खोटं असो, आमचे हे मोठे बुद्धिवान आहेत. एके दिवशीं रात्रीं अचानक येऊन ते मला म्हणाले, 'तुझ्या अचला-आक्काची ही भानगड काय आहे ती माहीत आहे तुला? ती घरांतून पळून आलीय,' मी रागाला येऊन म्हटलं, 'चला. भलतंच कांहीं बोलूं नका. हें आक्काच्या कानीं गेलं तर ती तुमचं तोंडसुद्धां पाहाणार नाहीं जन्मभर—' "

अचला खुर्चीचे हात घट्ट आवळून धरून बसली होती.

वीणापाणी बोलत होती, " ते मला म्हणाले, 'तोंड बघो कीं न बघो, पण मी शपथेवर सांगतों, कीं गोष्ट अगदीं खरी आहे. सासूसासऱ्याबरोबर बनत नाहीं म्हणून असो, कीं जावनणंदेबरोबर झगडा झाला आहे म्हणून असो, ती नवऱ्याला घेऊन घराबाहेर पडलीय. सुरेशबाबू तर मला वाटतं—तिनं म्हटलं तर समुद्रांत उडी घेईल असं लक्षण दिसतंय त्याचं. अन् मला असं वाटतंय, कीं म्हातारा म्हातारी तपास करकरून सुनेमुलाला घरीं परत घेऊन जाईपर्यंत बनावट नावानं राहायचं असं त्यांनीं ठरवलंयसं वाटतंय. हें जर खोटं ठरलं तर तूं मला—' मी म्हटलं, 'तसंही असेल. पण माझ्यासारख्या एका अपरिचित खुळ्याभोळ्या बायकोजवळ आक्का खोटं कां बोलेल?' ते हंसले अन् म्हणाले, 'तुझ्यासारखी तुझी आक्का चलाख असती तर तसं बोलली नसती. पण तशी नाहीं ना ती! तुझं घर डिहरीला आहे अन् तूं दोन दिवसांनीं डिहरीलाच जाणार असं जेव्हां तिनं ऐकलं तेव्हां तिनं अचलेच्या ऐवजीं सुरमा, डिहरीच्या-ऐवजीं जबलपूर अन् हिंदूच्या ऐवजीं ब्राह्म म्हणून दिलं तुला सांगून. जबलपूरचं तिकीट काढून प्रवासाला निघालेलीं माणसं अकस्मात् गाडी बदलून इकडे कां यावीं, अन् आजारी नवऱ्याला कुणा बंगाल्याच्या घरीं न नेतां इतक्या दूरच्या हिंदुस्तानी लत्त्यांत एका मोडक्या सराईंत जाऊन कां राहावीं, हें कसं तुझ्या डोक्यांत शिरलं नाहीं राक्षसी?' "

बोलतांबोलतां वीणापाणीनें एकदम मागें वळून तिच्या गळ्याभोंवतीं हात टाकला आणि मायेनें गहिंवरून येऊन ती तिच्या कानाशीं लागून म्हणाली, " काय झालं होतं तें मला सांग ना आक्का. मी कुणाजवळ केव्हांही कांहींही बोलायची नाहीं—तुझ्या गळ्याला हात लावून शपथ घेतें."

आपली खरीखरी हकिकत वीणापाणीच्या तोंडून अशा प्रकारें बाहेर पडलेली पाहून ती तिच्या कवेंत दगडासारखी होऊन पडली होती. या उभ्या जन्मांत एकेक पावलानें आपण कुठें घसरत चाललों आहों याचा ती अंदाज घेत होती.

तिच्या डोळ्यांतून सारख्या आसवांच्या धारा लागल्या होत्या. जीवनाचें कोणतेंही लक्षण त्यावेळीं तिच्या ठायीं दिसून येत नव्हतें.

असाच कितीतरी वेळ गेला. वीणापाणीनें आपल्या पदरानें तिचे डोळे पुन्हां पुन्हां पुसले आणि ती गहिंवरून म्हणाली, "सुरमादिदी, वयानं तूं माझ्यापेक्षां मोठी आहेस खरी, पण या छोट्या बहिणीचं सांगणं ऐक. अशीच परत आपल्या घरीं जा. मी सांगतें तुला, झालं हें कांहीं बरं झालं नाहीं. मोठ्या प्रयासानं निभावलीस, हातींचा चुडा कायम राहिला. यापुढं अभिमानाला बळी पडून वडील माणसांचं मन दुखवूं नकोस. पड खाऊन आपल्या सासरीं जायला लाज कसली धरायची ? त्यांत मुळींच कमीपणा नाहीं आक्का !"

क्षणभर ती उगीच राहिली होती. नंतर बोलूं लागली, "उगीशी राहिलीस ? नाहीं जायचं ? आईबापांवर रागावून सुरेशबाबू घर सोडून निघाले, पण त्यांना बरं वाटलं नाहीं हें तुझ्या तोंडून त्यांना कळलं तर तीं खूष होतील—मी अगदीं प्रतिज्ञेवर सांगतें तुला."

आतां अचला डोळे पुसून घेऊन सरळ होऊन बसली. वीणापाणी उत्सुक मुद्रेनें आपल्याकडे पाहाते आहे असें तिला दिसून आलें. तिच्या प्रश्नाचें उत्तर द्यायला पहिल्यानें तिला शरम वाटत होती, पण या प्रेमळ पोरीपुढें उत्तर न देऊन भागायचें नाहीं हें जेव्हां तिला निश्चित समजून चुकलें, तेव्हां सारा संकोच बाजूला सारून ती म्हणाली, "पुन्हां घरीं जायला आम्हांला मार्गच राहिला नाहीं वीणा."

वीणापाणीला तें पटलें नाहीं. ती म्हणाली, "कां मार्ग राहिला नाहीं ? तुझी-माझी ओळख कांहीं फार दिवसांची नव्हे, पण जेवढं कांहीं कळलंय, तेवढ्या-वरून मी साऱ्या जगासमोर उभं राहून शपथ करून म्हणेन, कीं घरीं जायचा मार्ग बंद होण्याजोगी कोणतीही गोष्ट कदापीही तुझ्या हातून व्हायची नाहीं. तुझ्या सासरचा पत्ता मला सांग पाहूं. परवां सकाळींच गाडीनं आम्हीं घरीं जातों आहोंत. मी माझ्या बाबांना बरोबर घेऊन तुझ्या सासूसासऱ्यांची भेट घेईन अन् मग पाहीन ते मला काय जबाब देतात ते. तुझे सासूसासरे म्हणजे माझेच नव्हेत का ? त्यांच्यासमोर जाऊन उभं राहायला मला कशाला लाज वाटेल ?"

अचला चकित होऊन म्हणाली, "परवां तुम्हीं गांवीं जाणार ? मी कसं कुठं ऐकलं नाहीं ? मग इथं कोणकोण राहाणार आहेत ?"

वीणापाणी म्हणाली, " कुणीसुद्धां नाहीं. नुसते नोकरचाकर तेवढे राहातील. माझी चुलतसासू बरेच दिवसपर्यंत आंथरूण धरून पडलीय. आतां तिची जगायची आशा नाहीं. तिनं भेटायला बोलावलंय आम्हां सर्वांना. "

अचलेनें विचारलें, " कुठंय तुझं सासर ? "

" कलकत्त्याला पटलडांग्याला. " वीणापाणी म्हणाली.

पटलडांग्याचें नांव ऐकतांच अचलेचा चेहेरा खाड्कन उतरला. ती क्षणभर स्तब्ध होऊन बसली होती. नंतर म्हणाली, " वीणा, तर मग आम्हांलासुद्धां उद्यांच जायला हवं इथून ! तुम्हीं सारीं गेल्यावर आम्हीं कसं राहायचं इथं ? "

वीणापाणी हंसत सुटली, ती म्हणाली, ' म्हणूनच मी तुला पुन्हां घरीं जायचा आग्रह करतेंय, असा का समज करून घेतलास तूं ? नाहीं आक्का, तूं दुसऱ्या कुठं जा असं केव्हांही म्हणायची नाहीं मी. मन मानेल तितके दिवस खुशाल या घरीं राहा. आमची कांहींसुद्धां अडचण व्हायची नाहीं. "

इतकें कळवळून तिनें सांगितलें तरीही अचलेला उत्तर देतां आलें नाहीं. उतरलेल्या मुद्रेनें ती तिला म्हणाली, " खरोखरच का तुमचं जायचं निश्चित झालंय ?"

वीणापाणी म्हणाली, " निश्चितच तर काय ! बर्थसुद्धां रिझर्व्ह केलेयत आज आमचे. बाबांच्या खोलींत डोकावून पाहिलंस, तर पंधरा आणे सामानाची बांधाबांध झालेली असल्याचं दिसून येईल तुला. "

इतक्यांत मोलकरीण दाराशीं येऊन म्हणाली, " आई तुम्हांला स्वयंपाकघरांत बोलावताहेत सूनबाई. "

" आलें हं ! " असें म्हणून ती थोडीशी हंसली आणि एकदम दोन्ही हात अचलेच्या गळ्याभोंवतीं टाकून ती तिच्या कानाला लागून म्हणाली, " आजवर इथं बरींच माणसं होतीं, त्यामुळं तुझी मोठी मुष्किल झाली होती. आतां घर खालीं झालंय—कुणीसुद्धां नाहीं इथं–अन् मीसुद्धां आतां जातेंय इथून–काय समजलीस आक्का ? हं ! " असें म्हणून तिच्या गालावर दोन बोटांनीं चापटी मारून ती घाईघाईनें मोलकरणीबरोबर निघून गेली.

ती सौभाग्यवती तरुणी दक्षिणेकडच्या वाऱ्याच्या झुळकीसारखी तिथून गेली, याचा क्षणभर तिला आनंद झाला खरा, पण जातां जातां तिनें जे चार शब्द अचलेच्या कानीं घातले, त्यामुळें ती दगडाच्या पुतळीसारखी निश्चल होऊन बसली होती. तिला वाटलें, यापुढं आतां कसलीच अडचण राहिली

नाहीं. या निर्जन आणि निःस्तब्ध गांवांत—जवळ किंवा दूर, जिथवर दृष्टि जाईल तिथवर—तिनें डोळे झांकून भविष्यकालाकडे नजर फेंकून पाहिलें, तेव्हां तिला दिसून आलें, कीं केवळ एक आणि एकाच सुरेशखेरीज दुसरें कुणीहि यापुढें तिच्या नजरेसमोर येणार नाहीं.

## ९

त्या जनहीन परिसरांत केवळ एका सुरेशच्या सहवासांत जीवनयापन केलें पाहिजे आणि तो प्रसंग प्रत्येक क्षणाला जवळ जवळ येतो आहे हें पाहून अचला अस्वस्थ झाली. विरोध नाहीं, अडचण नाहीं, कीं लाजलज्जा नाहीं. आज नाहीं तर उद्यां कांहीं ना कांहीं निमित्त शोधून काढायलाही अवधि राहिला नव्हता.

वीणापाणी म्हणाली होती, ‘ सुरमाआक्का, सासर म्हणजे आपलंच घर. तिथं पड खाऊन जायला बायकांच्या जातीला शरम वाटायला नको. ’

खुळी बिचारी ! तिचें म्हणायला कुणी होतें कीं नव्हतें, याचा हिशेब तिच्याखेरीज दुसऱ्या कुणाला माहीत होता ? अजूनही तिचा स्वतःचा नवरा कुठेंतरी होता—आपलें म्हणायला एक घरठाण कुठेंतरी होतें. अजून नाहींसें झालें नव्हतें. तिनें मनांत आणलें असतें तर याच क्षणाला तिला आपल्या घराच्या आढ्याखालीं जाऊन राहातां आलें असतें. दाराला बांधलेल्या वासराला जोंपर्यंत बाहेरची दिशा दिसत नाहीं, तोंपर्यंत तें सारखें एकाच जागीं कपाळ फोडून घेत असतें, अगदीं त्याचप्रमाणें तिचें अडकून पडलेलें मन हाहाःकार करीत होतें—बाहेर जाण्यासाठीं मार्ग शोधायला धडपडत डोकें फोडून घेत होतें. मागल्या खोलींत सुरेश निश्चिंतपणें झोंपला होता. मधला दरवाजा थोडासा उघडलेला होता. त्याच्याच एका बाजूला जमिनीवर चटई टाकून हिंदुस्तानी मोलकरीण निर्घोर झोंपी गेली होती. साऱ्या घरांत कुणीतरी जागें असल्याचा मागमूससुद्धां नव्हता—तीच काय ती आगीच्या खाईत पडल्यासारखी धगधगत होती.

कित्येक दिवसपर्यंत याच पलंगावर वीणापाणी तिच्या शेजारीं झोंपत होती. आज तिचा नवरा आल्यामुळें ती आपल्या खोलींत झोंपायला गेली होती. हाच धागादोरा घेऊन विक्षेप पावलेलें तिचें चित्त एकाएकीं त्या झांकलेल्या दरवाजापलीकडे असलेल्या पलंगाकडे वेधलें. तिथें झोंपलेली व्यक्ति तिला दिसली, त्यामुळें त्वेषानें, अपमानानें आणि लाजशरमेनें तिळातिळानें काळजाचे तुकडे

उडतील या भीतीनें तिनें देहांत असलेलें सारें बळ खर्ची घालून स्वतःला त्या ओढीपासून फिरवून घेतलें. त्या साऱ्या परिश्रमामुळें ती विजेनें हादरल्यासारखी थरथर कांपत होती.

शेजारच्या कुठल्यातरी खोलींतल्या घड्याळांत दोहोंचे ठोके पडले. अंगावरचें गरम पांघरूण तिनें फेंकून दिलें. ती उठून बसली. त्या थंडीच्या रात्रीं सुद्धां तिच्या कपाळावर सारखा घाम येत होता. ती बिछान्यावरून उठली. खिडकीपाशीं जाऊन तिनें दार उघडलें. कृष्णपक्षांतल्या अष्टमीचा अर्धचंद्र तिच्या समोरच्च दिसत होता. त्याच्या नाजुक प्रकाशामुळें शोण नदीचें निळें पाणी दूरवर उजळून उठलें होतें. ऐन मध्यरात्रींचा थंड वारा तिच्या तापलेल्या मस्तकावर मायेचा हात फिरवीत होता. आपल्या नशिबांतील शेवटची समस्या उकलण्याचा विचार करीत ती त्या खिडकींतच बसून राहिली.

आपल्या या अभिशप्त आणि हतभागी जीवनांत जें जें म्हणून कांहीं सत्य होतें, तें तें सारें लोकांच्या दृष्टीनें एखाद्या अद्भुत कादंबरींतील कल्पित प्रसंगासारखें ठरलें असतें, हें आतां अचलेला कळून चुकलें होतें. ज्या दिवसापासून या अद्भुत कथेची सुरवात झाली त्या दिवसापासून या खोट्या जीवनावर सत्याचा मुखवटा चढवून जें जें कांहीं दाखवलें जात होतें तें तें एकेक आठवून तिला राग येत होता, संतापानें आणि चिडीनें तिच्या डोळ्यांतून आसवांच्या धारा लागल्या होत्या. तिच्या यौवनांतल्या पहिल्या आनंदाला ज्या भाग्यविधात्यानें खोटें स्वरूप देऊन विकृत केलें होतें, जगाच्या समोर तिला उपहासाला पात्र ठरवायला ज्या विधात्यानें लेशभरही दया दाखवली नव्हती, त्या निष्ठूर आणि निर्दय विभूतीला लहानपणापासून ‘ ईश्वर ’ म्हणून मानायचें शिक्षण जरी तिला दिलें गेलें होतें, तरीही तें सारें शिक्षण या वेळीं पूर्णपणें व्यर्थ, पूर्णपणें निरर्थक ठरून गेलें होतें. पुन्हां पुन्हां डोळे पुशीत ती म्हणत होती, ‘ हे ईश्वरा, तुझ्या एवढ्या मोठ्या विश्वब्रह्माण्डाच्या पसाऱ्यांत या दुर्भागिनीच्या जीवनाखेरीज कौतुकानं खेळ करायला दुसरें कांहीं तुला मिळालेंच नाहीं का ? ’

ती विचार करीत होती,— कुठें होतें मी अन् कुठें होता सुरेश ! ब्राह्म म्हटलें कीं त्यांच्या सावलीलासुद्धां तो उभा राहात नव्हता—कमालीची चीड येत होती त्याला—नशिबाच्या खेळानें आज त्याच माणसाच्या आसक्तीला आदिअंतसुद्धां राहिला नाहीं कसा ? ज्याच्यावर केव्हांही आपलें प्रेम नव्हतें तोच आपला प्राणेश्वर ?—केवळ हीच खोटी गोष्ट सर्वांनीं निश्चित करून टाकली होती का ? कुठेंही

आणि कुणाहीजवळ खरें काय तें कळलेंच नाहीं का ? आणि जें खोटें होतें तें स्वतःच्या तोंडानें चोंहीकडे सांगायचें एवढें प्रयोजन तरी काय होतें ? अदृष्टाची एवढी मोठी विटंबना कुणाच्या भाग्यीं कधीं आली होती का ?

अनेक कष्ट सोसून तिला नवऱ्याचा लाभ झाला होता, पण तो नशिबाला पाहावला नाहीं. तिच्या आत्यंतिक दुर्दशेचा बोजा घेऊन अकस्मात एके दिवशीं सुरेश वावटळीसारखा गांवच्या घरीं येऊन हजर झाला. तिच्या सुखाचा उगवता कोंब जळून गेला आणि त्याचबरोबर तिचें भाग्यही जळून भस्म झालें, हें ज्यावेळी कळून आलें त्याचवेळीं तिच्या आजारी नवऱ्याला पुन्हां कां आणून तिच्या पदराला बांधलें ? एकदां जी त्याला हरपून बसली होती, तो पुन्हां तिला मिळावा अशी जर विधात्याची इच्छा होती, तर मग हा लांच्छनेचा आणि अपमानाचा प्रसंग कां कोसळला तिच्यावर ?

दोन्हीं हात जोडून अचला भरल्या गळ्यानें म्हणाली, ‘ जगदीश्वरा, रोगमुक्त झालेल्या नवऱ्याच्या स्नेहाळू आशिर्वादानें साऱ्या अपराधाचं प्रायश्चित्त मिळावं असं जर घडवून आणलं होतंस, तर पुन्हां या दुर्गतीच्या खाईत कां लोटलंस मला ? तेवढे सारे प्रकार झाल्यानंतर सुरेशला बरोबर यायचं आमंत्रण द्यायला कां मला संकोच वाटला नाहीं ? या अपराधाचं क्षालन केव्हांही व्हायचं नाहीं. हा कलंकाचा डाग केव्हांही पुसला जाणार नाहीं. हे अंतर्यामी ईश्वरा, माझ्या नशिबाचा लेख वाचतांना चूक केलीस का तूं ? या माझ्या हृदयांत चिरकाल काय राहिलं होतं तें तुझ्याही डोळ्याला दिसलं नाहीं का ?

बापाची काळजी आणि नवऱ्याची काळजी दोन्ही हातांनीं लोटून द्यायला ती एकदां तयार झाली होती. आजही त्या साऱ्या भावना तिनें तशाच धुडकावून लावल्या होत्या. पण आज तिला आठवण झाली ती मृणालची-आणखी आठवण झाली ती आत्याबाईची ! निघायच्या वेळीं तिनें मोठ्या मायेनें आणि प्रेमानें गहिंवरून तिला सती-साध्वी म्हणून जो आशीर्वाद दिला होता तेवढाच काय तो तिच्या पदरीं पडला होता. आज मनोभावानें त्या प्रसंगाची पुन्हां तिनें कल्पना केली त्यावेळीं एकदम मर्मांतिक आघातानें कांहींवेळपर्यंत तिची बोधशक्ति सुन्न होऊन गेली.

देहाच्या आणि मनाच्या त्या अशक्त आणि अभिभूत अवस्थेंत खिडकीवर डोकें टेकून ती अगदीं नकळत डोळ्यांतून आसवें गाळीत असतां मागून कुणाची

तरी चाहूल कानीं आल्यामुळें तिनें मागें वळून पाहिलें. ती दचकली. उघड्या अंगानें आणि अनवाणी पायानें आलेला सुरेश समोर उभा होता.

मनाच्या क्षणिक चांचल्यामुळें ती कांहींतरी बोलायला जात होती तोंच तिचा श्वास कुंठित झाला आणि तिच्या तोंडावाटे शब्द बाहेर पडेना. जिवाचा धडा करून त्याच्याशीं बोलायची तिला प्रवृत्ति होत नव्हती. तिनें पुन्हां तोंड फिरवलें आणि तसेंच खिडकीच्या गरादीवर डोकें टेकलें. हा वेळपर्यंत तिच्या डोळ्यांतून थेंबथेंब आसवें गळत होतीं, पण आतां त्यांचा बांध फुटून तीं तिच्या डोळ्यांवाटे जोरजोरानें वाहूं लागलीं.

सर्वत्र सामसूम होतें. आंतबाहेर निःस्तब्धता विराजमान झाली होती. तिच्या मागल्या बाजूला सुरेश दगडाच्या पुतळीसारखा स्तब्ध उभा राहिला होता. वावटळींत सांपडलेल्या वेळूच्या पानासारखा त्याचा देह एकाएकीं थरथर कांपूं लागला. पाहातां पाहातां त्यानें दोन्ही हात पुढें करून अचलेचें मस्तक धरून आपल्या हृदयाशीं कवटाळलें.

अचलेनें त्याच्या हातून स्वतःला सोडवून घेऊन पदरानें डोळे पुसले. पण आश्चर्याची गोष्ट ही, कीं तिच्या साऱ्या दुःखाला कारणीभूत झालेल्या या माणसाच्या त्या वर्तनामुळें तिला शिसारी आली नाहीं. उलट ती हळूच म्हणाली, " या खोलींत कां आलां तुम्ही ? "

सुरेश मुकाट राहिला होता. त्याची वाचाच फुटत नसावी.

अचलेनें हळूच खिडकीचा दरवाजा बंद करून घेतला आणि म्हटलें, " थंडीमुळं तुमचे हात कापताहेत. जा, उघड्या अंगानं असे उभे राहूं नका. आपल्या खोलींत जाऊन मुकाट्यानं झोंपा पाहूं. "

सुरेशच्या डोळ्यांचा जळफळाट झाला. त्याचा आवाज कांपत होता. अचलेचा हात आपल्या हातीं ओढून घेऊन तो पुटपुटत म्हणाला, " तर मग तूंही माझ्या खोलींत ये अचला. "

अचला क्षणभर थक्क होऊन त्याच्या तोंडाकडे पाहात राहिली होती. नंतर ती म्हणाली, " नको आज ! " असें म्हणून तिनें हळूच आपला हात त्याच्या हातांतून सोडवून घेतला.

तिच्या या शांत आणि संयमशील नकाराच्या मागें कोणती भावना होती तें न कळल्यामुळें सुरेश चूपचाप उभा राहिला होता. त्याच्याकडे न पाहातां तिनें

पुन्हां विचारलें, " मी जागी आहें असं कळल्यामुळंच का तुम्ही या खोलींत घुसलांत ? "

सुरेश फटकावल्यागत होऊन म्हणाला, " नाहीं तर काय ? तूं झोंपलेली आहेस असं पाहून मी आंत शिरलों असं का तुला वाटलं ? मी असं यावं अशी का तुझी इच्छा होती ? "

इच्छा ? अचला तोंड फिरवून थोडीशी हंसली. तिथल्या दिव्याचा प्रकाश अगदीं अंधुक होता तरीही तिचें तें तीक्ष्ण आणि कठिण हंसूं सुरेशच्या नजरेला आल्यावांचून राहिलें नाहीं. जणूं काय ती सरळसरळ म्हणत होती, ' अरे भेकडा ! झोंपलेल्या स्त्रीच्या खोलींत चोरासारखा प्रवेश करायचा नसतो, या पुरुषी वृत्तीचं महत्त्व अजूनही तुला उमगलं नाहीं का ? '—पण तोंडावाटे तिनें एकही शब्द बाहेर काढला नाहीं.

थोड्या वेळानें अचला खिडकीपासून दूर झाली आणि म्हणाली, " तुमची प्रकृति बरी नाहीं. उगीच जागूं नका. जा जाऊन निजा. " असें म्हणून ती हळूहळू आपल्या बिछान्यापाशीं गेली आणि बिछान्यावर आडवी होऊन तिनें घोंगडी डोक्यापर्यंत ओढून घेतली.

कांहीं वेळपर्यंत सुरेश त्याच ठिकाणीं ताठरून उभा होता. त्यानंतर पाऊल न वाजवतां मुकाट्यानें तो आपल्या खोलींत निघून गेला.

## १०

घरांतील सर्व मंडळी चारदोन नोकरचाकरखेरीज करून कलकत्त्याला गेली होती, त्याला पांचसहा दिवस होऊन गेले. केवळ घरच्या मालकांना मात्र जातां आलें नाहीं. कसलें तरी जरुरीचें काम एकदम निघाल्यामुळें अगदीं निघायच्या वेळीं त्यांनीं आपला बेत बदलला.

गेले कांहीं दिवस रामचरणबाबू आपल्या कामांत गुंतून पडले होते, त्यामुळें त्यांची फारशी भेट होत नव्हती. आज सकाळींच उठून ते अचानक सुरमेच्या नांवानें हांका मारीत व्हरांड्यावर येऊन हजर झाले. ते थंडीचे दिवस असल्यामुळें एवढ्या लवकर कुणी बिछाना सोडला नव्हता. त्यांची हांक ऐकून अचला घाईघाईनें दार उघडून बाहेर आली आणि तिच्या मागोमाग सुरेशही दुसरें एक दार उघडून डोळे पुशीत पुशीत बाहेर आला. झोंपेतून नुकत्याच उठलेल्या या दंपत्याला दोन वेगवेगळ्या खोल्यांतून बाहेर येतांना पाहातांच म्हाताऱ्याची प्रसन्न

दृष्टि एकाएकीं आश्चर्यानें स्तिमित झाली. सुरेशनें तें पाहिलें नसावें, पण त्यांची ती मुद्रा अचलेच्या दृष्टीला दिसल्यावांचून राहिली नाहीं.

रामबाबू सुरेशकडे पाहून जरासे ओशाळून म्हणाले, " बरं का सुरेशबाबू, अवेळीं हांकाहांक करून मी तुमची झोंप मोडली. माझी मोठी चूक झाली ही. "

सुरेश हंसला आणि म्हणाला, " चूक कसली त्यांत ? तसा मी जागाच होतों. हें दार बंद केलं तर नुसती हांकच काय, ढोल बडवला तरी माझ्या खोलींत ऐकूं यायचा नाहीं ! पण आज एवढे पहांटेचे कुठं ? "

म्हातारा अचलेला उद्देशून म्हणाला, " आज आमच्या सुरमामाईला थोडासा त्रास देणं भाग पडलंय— " असें म्हणून ते तिच्याकडे वळून हंसत हंसत म्हणाले, " माझा मेणा बाहेर तयार आहे. आत्तांच मला निघालं पाहिजे. मला वाटतं दोनतीन वाजायच्या पूर्वीं कांहीं मला परत येतां यायचं नाहीं. या म्हाताऱ्यासाठीं चार घांस डाळभात उकडून ठेव पोरी. इतक्या उशीरां आल्यानंतर मग चूल पेटवायचा त्रास नको. "

हा निष्ठावंत आणि मांसमच्छर न खाणारा कर्मठ ब्राह्मण आपली बायको किंवा सून यांच्या हातच्याखेरीज दुसरें अन्न कधींही सेवन करीत नसे. त्याच्यासाठीं वेगळेंच सैंपाकघर ठेवलेलें होतें एवढेंच नव्हे, तर सर्वांना त्या खोलींत जायला मनाई होती. मधून मधून स्वतःच सैंपाक करून जेवायची त्यांची संवय असल्यामुळें घरच्या बायकांना परगांवीं जातां येत होतें. यापूर्वी कांहीं दिवस अशीच व्यवस्था होती. पण आज अकस्मात या अनोळखी स्त्रीवर या कामाचा हा भार टाकलेला पाहून ती जितकी आश्चर्यचकित झाली, तितकीच ती भीतीनें गळाठून गेली.

तिची उतरलेली मुद्रा पाहून रामबाबू तिला मोठ्या वात्सल्यानें म्हणाले, " काय ग पोरी, या म्हाताऱ्याला आज झालंय काय असं का वाटतंय तुला ? सैंपाकाच्या बाबतींत एवढी चिकित्सा, एवढा आरडाओरडा करणाऱ्या या म्हाताऱ्याला आज खूळ लागलं असं तुला वाटलं होय ? अग हें चालायचंच. राक्षसीच्या हातचं जेवण जर मला चालतं, तर तुझ्या हातचे दोन घांस खायचा संकोच मला कां वाटावा ? बरं असो कीं वाईट असो, एवढ्या उशीरा आल्यानंतर चुलीवर हंडी चढवायचं माझ्याच्यानं व्हायचं नाहीं पोरी !–" असें म्हणून अचलेच्या निरुत्तर मुखाकडे क्षणभर पाहून, क्षणभर थांबून म्हातारा हंसत हंसत म्हणाला, " तुला कदाचित् असं वाटत असेल, कीं या म्हाताऱ्याला आज जर एवढा मोठा मायेचा उमाळा आलाय, तर मला त्रास द्यायच्याऐवजीं हा हिंदुस्तानी भटजीच्या

हातून कां जेवण करून घेत नाहीं? नाहीं ग पोरी, नाहीं–तें होणं नाहीं! आजसुद्धां हा थेरडा तेवढाच कर्मठ आहे, तेवढाच हट्टवादी आहे. मेला तरी संध्या गायत्री न म्हणणाऱ्या हिंदुस्तानी महाराजाच्या हातचं अन्न त्याच्या घशाखालीं उतरायचं नाहीं. अन् मी माझ्या राक्षसीला आणि तुला इतक्यांत एका पंक्तीला नेऊन जें बसवलं, तें सुद्धां खरें नव्हे. शिवाय मला असं वाटलं, ही आई अन्नपूर्णा जर एक दिवस सैंपाक करील तर तें 'अन्नपूर्णेचं अन्न' व्हायचं नाहीं असं मी मुळींसुद्धां मानायचा नाहीं. बरं बरं, आतां उशीर करून चालायचं नाहीं पोरी. आतां जें कांहीं बोलायचं राहिलंय तें जेवतांजेवतां बोलेन. अन् त्यावेळीं जें बोलेन तें मात्र अगदीं खरंखुरं बोलेन!" असें म्हणून म्हातारा जायला निघाला तेव्हां अचला अस्वस्थ झाली.

त्याला काय सांगावें तें तिला निश्चितपणें ठरवतां येत नव्हतें. अगदीं सहजासहजीं जें तोंडाशीं आलें तें ती बोलून गेली. ती म्हणाली, "पण मला चांगलासा सैंपाक करतां येत नाहीं. माझा सैंपाक तुम्हांला पसंत व्हायचा नाहीं."

म्हातारे रामबाबू मागें वळून थांबले आणि थोडेसे हंसून म्हणाले, "हें तुझं बोलणं मला खरं वाटेल असं का तुला वाटलं पोरी?"

अचला म्हणाली, "सर्वांनाच का सैंपाक करतां येतो?"

म्हातारा उत्तरला, "सर्वांनाच येतो, असं का मी म्हटलं?"

अचलेला याचें उत्तर चट्कन सुचेना. ती उगीच राहिली. सुरेश तिथेंच उभा होता. तिथें थांबून राहाणें त्याला अवघडल्यासारखें झालें होतें. अचलेचा उतरलेला चेहरा पाहातांच तिला होत असलेल्या वेदना त्याला जाणवल्या. या म्हाताऱ्याचे संस्कार–त्याचे हिंदु आचार, बरे होत कीं वाईट होत, सत्य होत कीं मिथ्या होत–कायम राखून त्याला जेवायला घालणें म्हणजे त्याच्याशीं प्रतारणा करणें होय, असें जें अचलेला जाणवत होतें आणि वस्तुस्थिति गुप्त ठेवून या प्रसंगांतून वाट काढणें त्या सभ्य स्त्रीला कठीण जात होतें, याचीही त्याला जाणीव झाली होती. तिच्या निस्तेज आणि पांढऱ्याफटक पडलेल्या चेहऱ्याकडे पाहातांच तिची अडचण त्याच्या ध्यानीं आली. आणि इकडेतिकडे नजर न देतां तोंड धुण्याचें निमित्त करून तो घाईघाईनें जिना उतरून खालीं गेला.

"तर मग मी आतां निघतों." असें म्हणून लगेच रामचरणबाबू सुरेशच्या मागोमाग निघाले. अचला हतबुद्ध होऊन कांहींवेळ स्तब्ध राहिली होती. ती चमकल्यागत भानावर आली आणि त्यांना हांक मारून म्हणाली, "जरा ऐकून घ्या—"

म्हाताऱ्यानें मागें वळून पाहिलें. कांहींतरी बोलायची सुरवात करून सुरमा एकदम थांबली आणि नजर खालीं टाकून मुकाट्यानें राहिली असल्याचें त्यांना दिसून आलें. चारदोन पावलें मागें येऊन ते म्हणाले, " आणखी एक तुला सांगायचय पोरी, हा तुझा संकोच कांहीं केल्या जात नाहींसा दिसतोय मला. तेव्हां – बरं का सुरमा, लहानपणीं मला या गांवांत काका म्हणत. मी कांहीं तुझ्या बापापेक्षां वयानं कमी नसेन खास ! तेव्हां यापुढं तूं मला ' काका ' म्हणून हांक मारीत जा बरं का पोरी ! "

त्या म्हाताऱ्याचा आपल्यावर अत्यंत लोभ आहे हें अचला जाणत होती. त्या लोभाचें प्रत्यक्ष प्रमाण अशा प्रकारें दिसल्यामुळें तिच्या डोळ्यांच्या कोपऱ्याला पाणी आलें. कांहींच न बोलतां तिनें नुसती मान हालवून संमति दिली.

म्हाताऱ्यानें विचारलें, " आणखी कांहीं सांगायचं आहे ? "

अगदीं एक क्षणभरच अचला मुकाट्याने जमिनीकडे पहात राहिली होती. अंगांतली सारी शक्ति एकवटून ती पुटपुटत एवढेंच म्हणाली, " पण माझे बाबा ब्राह्म होते ! "

रामचरणबाबू एकदम दचकले. ते म्हणाले, " खरेंच कीं ! कलकत्त्यांत चार जण गोळा झाले म्हणजे होऊन जातात तसे ! हे असले लोक ब्राह्मांच्या मेळाव्यांत बसून हिंदूंना शिवीगाळ करतात. अस्सल ब्राह्म असेल त्याच्या तोंडीं शिवी कधीं यायची नाहीं. त्यानंतर घरीं येऊन आपल्या गोतावळ्यांत ब्राह्मांना अशा शेलक्या शिव्या देत असतात, कीं तेवढी गोंडस भाषा हिंदूंच्या बेचाळीस पूर्वजांनींही कधीं वापरली नसेल. मी म्हणतों, असेच होते का ते ? असेच असले तर मग माझी कांहीं हरकत नाहीं. "

अचला लाजेशरमेनें गोरीमोरी झाली. ती एवढेंच म्हणाली, " नाहीं. ते अगदीं अस्सल ब्राह्म होते. "

तिचें तें उत्तर ऐकून म्हातारा क्षणभर खचल्यासारखा झाला, पण लगेच खुषींत येऊन म्हणाला, "तर मग असेनात कां बाबा ब्राह्म ! मुलगी म्हणजे कांहीं त्यांची वारस नव्हे ! शिवाय ज्याच्याबरोबर तूं धर्माच्या बंधनानं बांधली गेली आहेस, तो ज्याअर्थीं हिंदु आहे, त्याच्या गळ्यांत चांगलं झळझळीत जानवं दिसतंय जोंवर त्यानं त्या जानव्याच्या तीन सुतांना कधीं बट्टा लावला नाहीं, तोंवर बापाच्या कर्माचा बाध कांहीं तुला लागत नाहीं. आणखी असं पहा, तूं कितीही ढोंग केलींस सुरमा, तरी या तुझ्या म्हाताऱ्या काकाला कांहीं फसवतां

यायचं नाहीं तुला. आज माझा सैंपाक तूंच केला पाहिजेस." असें म्हणून ते पुन्हां जायला निघाले तेव्हां हा वेळपर्यंत आलेला सुन्नपणा क्षणभर झटकून टाकून अचला खणखणीत आवाजांत म्हणाली, "बरं काका, मी जर ब्राह्म महिला असतें, तर माझ्या हातचा सैंपाक तुम्हांला चालला असता का?"

म्हातारा म्हणाला, "मुळींच नाहीं! पण तूं ब्राह्म नाहींसच मुळीं—अन् तूं ब्राह्म होणंही शक्य नाहीं."

अचलेनें विचारलें, "पण समजा, तसंच असतं, तर केवळ धार्मिक मतं वेगळीं आहेत म्हणून तुमच्यालेखीं मी अस्पृश्य का ठरलें असतें?"

म्हातारा म्हणाला, "अस्पृश्य कां ठरशील पोरी? अस्पृश्य नव्हे, पण तुझ्या हातचा सैंपाक मला चालला नसता."

या संबंधींच्या बऱ्याच गोष्टी समजून घेण्याची तिची इच्छा होती. म्हणून तिच्याच्यानें स्वस्थ राहावलें नाहीं. ती म्हणाली, "कां चालला नसता? ओंगळ असतो का तो?"

म्हाताऱ्याला या प्रश्नाचें उत्तर चट्कन देतां आलें नाहीं. सारखी नजर लावून तो तिच्या तोंडाकडे पाहात राहिला.

अचलेनें आतां सारा संकोच झटकून टाकला होता. ती म्हणाली, "काका, आपली मायाममता केवढी मोठी आहे याची साक्ष इथं कितीतरी लोक देतील. पण त्या सर्वांपेक्षांही मोठी साक्षीदार आहे मीं. आपल्यासारख्या उदारहृदयी माणसाचं मन असं अनुदार कसं होतं तेंच मला कळत नाहीं. कुणाही माणसाची अशी शिसारी कशी येते तुम्हांला?"

म्हातारा एकदम काकुळतीला येऊन म्हणाला, "मला शिसारी आली? कुणाची पोरी? केव्हां?"

अचला म्हणाली. "ज्याच्या हातचं अन्न आपल्याला चालत नाहीं तोच आपल्या लेखीं अस्पृश्य—आपल्याला मनांतल्या मनांत त्याची शिसारी येते. पुष्कळ दिवस हें असंच चाललंय, म्हणून आपण विसरून गेलांय तें. आमच्या या हिंदुस्तानी नोकराची गोष्ट सोडून द्या, पण सैंपाक्याच्या हातचं अन्नसुद्धां कांहीं केल्या आपल्या गळ्याखालीं उतरत नाहीं असं आपण स्वतःच सांगितलं. या वृत्तीमुळं देशाचं किती नुक़सान होतंय, किती अवनति होतेय, ती तर—"

म्हातारा मुकाट्यानें ऐकत होता. अचला उत्तेजित होत होती हें त्याच्या ध्यानीं येत होतें. ती बोलतांबोलतां एकदम थांबली असें पाहून थोडेसें हंसून ते

म्हणाले, “ पोरी, मी कुठल्याच माणसाला त्याज्य मानीत नाहीं. जी तक्रार तूं आतां केलीस, ती तक्रार असते साहेबांची–त्या साहेबांपाशींच तुझे बाबा शिकले– अन् त्यांच्यापाशीं तूं शिकलीस! माणूस म्हणजे प्रत्यक्ष ईश्वर असं कांहीं तेच तेवढे म्हणत नाहींत–आम्हांला पूर्वींही तसं वाटत होतं अन् आजही वाटतंय. ”

तितक्यांत खालीं कसलीतरी गडबड झाल्याचा अस्पष्ट आवाज ऐकूं आला. म्हाताऱ्यानें कांहीं वेळ तिकडे कान दिला नाहीं. तो म्हणाला, “ सुरमा, ज्यांच्याकडे जेवणाचं फार मोठं प्रस्थ असतं, मोठं अवडंबर असतं, त्यांच्या दृष्टीनं माझ्याकडे बघूं नकोस. घांसभर डाळभात मिळाला, कीं मला पुरे असतो. तेवढा आज माझ्यासाठीं तयार करून ठेव. मग जेवतांजेवतांच मला कुणाची शिसारी येते, अन् त्यामुळं देशाची अवनति कशी होते, वगैरे गोष्टींचा आपण खल करूं—ही कसली गडबड चाललीय ?—आतां हें पुरे—मी आतां जातों. ” असें म्हणून ते घाईघाईनें निघून गेले.

## ११

तिसऱ्या प्रहरीं जेवण उरकून रामबाबू तृप्तीची ढेकर देऊन उठले आणि बैठकीकडे गेले त्यावेळीं उगीच थोडेसें हंसून अचला म्हणाली, “ असं पहा काकाबाबू, माझ्या हातचं खाऊन तुमची जात बुडालीय असं आज उद्यां तुम्हाला कळलं, तर माझ्यावर राग करायचा नाहीं. आजच सांगून ठेवतें. ”

म्हातारा मोठ्या वात्सल्यानें थोडेसें हंसून मान हालवीत म्हणाला, “ ठीक आहे पोरी, मला कबूल आहे. ” असें म्हणून रामबाबू जायला निघाले. त्यांच्या खडावांचा खटखट आवाज जोंपर्यंत ऐकूं येत होता तोंपर्यंत अचला कान देऊन तो ऐकत होती. तो आवाज थांबला केव्हां आणि बाहेरच्या जगाची संज्ञा तिला कळेनाशी झाली केव्हां, तें तिचें तिलाच कळलें नाहीं.

घरांत बरेच दिवसांपासून असलेली हिंदुस्तानी मोलकरीण बंगाली भाषेबरोबरच बंगाली आचारविचार आणि कायदेकानू कळून घ्यायला पात्र झाली होती. कसल्यातरी कामासाठीं ती तितक्यांत त्या जागीं आली आणि अचला अशा रीतीनें सुन्न होऊन बसलेली पाहून चकित झाली. त्यावेळीं झालेली वेळ आपल्या अर्धवट बंगाली भाषेंत अचलेला सांगून तिनें वडीलकीचा आव आणून विचारलें, “ आज कांहीं जेवायचंखायचं आहे कीं नाहीं ? असं चूपचाप बसून कसं होणार ? ”

अचला दचकली. तिनें डोळे उघडून पाहिलें, बराच उशीर झाला होता. संध्याकाळची थंडी पडूं लागली होती. साऱ्या आकाशावर थकव्याची, निस्तेजपणाची

छाया आलेली दिसूं लागली होती. ती शरमून उठून उभी राहिली आणि हंसून म्हणाली, “ हें पहा लालूची आई, मी संध्याकाळचंच जेवायचं ठरवलंय. यावेळीं एवढीसुद्धां भूकतहान नाहीं मला. ”

लालूची आई चकित होऊन म्हणाली, “ बडेबाबूंचं जेवण झालं, कीं मग मी जेवणार आहें असं आत्तांच तुम्ही सांगितलं होतं ना ? ”

“ नाहीं — नाहीं. मी आतां रात्रींच एकदां जेवीन. ” असें म्हणून अधिक वाद टाळण्यासाठीं अचला घाईघाईनें जिना चढून वर गेली.

केव्हांही थोडाबहुत वेळ मिळाला म्हणजे वरच्या गच्चीच्या रेलिंगजवळ स्टूल ठेवून ती नदीकडे पहात बसत असे. आज रात्रींसुद्धां ती तशीच बसली होती. तितक्यांत रामबाबूंच्या चपलांचा आवाज आल्यामुळें तिनें मागें वळून पाहिलें. म्हातारा तिथें येऊन मधेंच उभा राहिला होता. तिनें कांहीं बोलायच्या पूर्वींच त्यानी आपल्या हातांतली गुडगुडी एका कोपऱ्यांत ठेवून दिली आणि एक खुर्ची जवळ ओढून घेऊन ते बसले. थोडेसें हंसून ते म्हणाले, “ असं पहा सुरमा, तुझे ब्रह्मज्ञानी बाबा म्हणतात तें बरोबर, कीं हा तुझा म्हातारा काका म्हणतो तें बरोबर, याचा निकाल लावून घ्यायला मी आलोंय. हा निर्णय करून घेतल्याशिवाय खालीं जायचं नाहीं असं मी ठरवलंय. ”

हा जातिभेदाचा प्रश्न असावा हें अचलेनें ओळखलें. ती शांतपणें म्हणाली, “ मला असली चर्चा कुठं कळतेय काकाबाबू ? ”

मान हेलावून रामबाबू म्हणाले, “ अग जा ग, तूं काय अशातशा माणसाची मुलगी आहेस ! ती बाब खोटी ठरली तर माझी अब्रू बचावणार. नाहींतर या बाबतींत मी हरलोंच असं म्हणायचं ! ”

कोणत्याही विषयाच्या बाबतींत चर्चा करण्याइतकी यावेळीं अचलेची मनःस्थिति नव्हती. या वादविवादापासून दूर राहायला एक कारण तिला सुचलें. ती म्हणाली, “ आतां वादच कुठं राहिला काकाबाबू ? तुमचंच म्हणणं खरं झालंय–” थोडा वेळ थांबून ती म्हणाली, “ जें माणूस हरलंय, त्याला हार घ्यायला लावण्यांत कसला फायदा आहे आपला ? ”

रामबाबूंनीं लगोलग कांहीं उत्तर दिलें नाहीं. त्यांनीं पुष्कळ पावसाळे पाहिले होते. संसारांतले पुष्कळसे वेगवेगळे अनुभव घेतले होते. अर्थात् तिचा थकलाभागलेला आवाज त्यांना जाणवल्यावांचून राहिला नाहीं. ही मुलगी सुखी नाहीं, राखेखालीं झांकलेल्या अग्नीप्रमाणं कसलीतरी भयंकर वेदना हिच्या मनांत

धगधगते आहे आणि तिची छाया तिच्या उतरलेल्या चेहेऱ्यावर स्पष्ट दिसून येते आहे, हें त्यांच्या ध्यानीं आल्यावांचून राहिलें नाहीं. ते थोडावेळ थांबले. बळेंच हंसायचा प्रयत्न करीत ते मोठ्या ममतेनें तिला म्हणाले, "नाहीं ग, माझी शंका फिटली नाहीं पोरी. मी म्हातारा माणूस, बडबडीचा भोक्ता. संध्याकाळच्या वेळीं एकटा पडल्यामुळं जीव खालींवर होतो, म्हणून खोटंनाटं कांहींतरी बोलून पोरीला चिडवावं अन् घटकाभर बोलत बसावं, असं मी ठरवलं होतं. पण माझं ढोंग उघडकीला आलं." असें म्हणून त्यानीं गुडगुडी उचलून घेण्यासाठीं हात पुढें केला.

म्हाताऱ्याला एकटेंच घरांत राहिल्यामुळें घर खायला आलें आहे आणि म्हणूनच तो वेळ काढण्यासाठीं मुद्दाम आला आहे, याची कल्पना येऊन तिचें मन थोडेसें भारावलें. ती चट्कन उठली आणि गुडगुडी उचलून घेऊन म्हाताऱ्यानें पुढें केलेल्या हातांत देत म्हणाली, "आतां गुडगुडी ओढायची असली तर वाटेल तितका वेळ इथंच बसून ओढा, पण मी मात्र तुम्हांला कांहीं केल्या इथून उठून जाऊं द्यायची नाहीं."

म्हातारा गुडगुडी हातीं घेऊन हंसत म्हणाला, "अरे बापरे! एकदम एवढीं ढेकळं मारूं नकोस माझ्यावर पोरी! तें झेपायचं नाहीं मला! तोंड बंद ठेवून मी गुडगुडी ओढतों असं कांहीं तूं पाहिलेलं नाहींस. त्यापेक्षां चारदोन शब्द बोलायला अवकाश दिलास तर—"

"माणसाचा दम कोंडला जायचा नाहीं—होय ना काकाबाबू? बरंय. होऊन जाऊं दे. पण आतां कोणता विषय घेऊन बडबडायला सुरवात करूं? सांगा ना."

रामबाबूंनीं गुडगुडीचा एक मोठा दम मारून गाल भरून घेतलेला धूर वर पाहून सोडून दिला. ते म्हणाले, "मोठ्या अडचणींत टाकलंस तूं मला पोरी. पट्टीच्या वक्त्याला देखील असा प्रश्न टाकला तर त्याचंही तोंड बंद होतं ना?"

"बरं काका, पुढं केव्हां जर तुम्हांला कळलं, कीं आज आग्रह करून जिच्या हातचा स्वयंपाक तुम्हीं चाखला तिच्याइतकी नीच, तिच्याइतकी घृणित व्यक्ति या जगांत दुसरी कुणी नाहीं, तर तुम्हीं काय कराल? त्या पापाला शास्त्रांतसुद्धां प्रायश्चित्त मिळत नसलं—तर मग?"

म्हातारा म्हणाला, "तर मग वादच मिटला! मग प्रायश्चित्तच करायला नको!"

"पण त्यावेळीं माझ्याबद्दल कशा प्रकारची शिसारी येईल तुम्हांला?"

" केव्हां ? "

" मला जातसुद्धां नाहीं असं जेव्हां कळेल तेव्हां ! "

रामबाबूंनीं गुडगुडीची नळी तोंडांतून बाहेर काढून गुडगुडी बाजूला धरून त्या अस्पष्ट प्रकाशांत तिच्या चेहऱ्याकडे नीट पाहून घेतलें आणि म्हटलें, " तुम्हां लोकांचं म्हणणं मला मुळीं कळतच नाहीं. ' तुम्हां लोकांचं ' असं मी कां म्हणतों माहीत आहे सुरमा ? माझ्या मुलाच्या तोंडून देखील मी हीच तक्रार ऐकली होती. तो तर अगदीं उघड उघड म्हणतो, ' या शिवाशिवीच्या आचार-विचारापायींच हळूहळू सारा देश सर्वनाशाच्या मार्गावर जातो आहे. कारण या साऱ्या गोष्टींच्या मुळाशीं आहे घृणेची भावना. या घृणेच्या भावनेंतून शेवटीं कांहीं निष्पन्न व्हायचं नाहीं. "

अचला मनांतल्या मनांत अतिशय चकित झाली. या घरांतसुद्धां अशा प्रकारच्या चर्चेला ठाव मिळाला असेल असें तिला मुळींच वाटलें नव्हतें. ती म्हणाली, " तर मग ही गोष्ट खोटी आहे का ? "

रामबाबू थोडेसें हंसून म्हणाले, " खोटी कीं नाहीं तें मी सांगणार नाहीं पोरी — पण ती खरी नव्हे. मी शास्त्राचे विधीनिषेध मानतों आणि त्याप्रमाणें चालतों एवढंच. कित्येकजण याहीपेक्षां जास्त पुढं जातात — माझे गुरुजी आहेत तसे. ते स्वतः रांधून जेवतात. मुलीच्या हातचंसुद्धां जेवीत नाहींत — म्हणजे ते आपल्या एकुलत्या एक संतानाची सुद्धां घृणा करतात असं का ठरतं ? "

अचलेला कांहीं उत्तर सुचेना. ती उगीच राहिली.

गुडगुडीचे चारदोन दम मारून म्हातारा म्हणाला, " पोरी, तरुणपणीं मी देशोदेशीं खूप हिंडलोंय. किती वनंजगलं, पहाडपर्वत उलथलेयत. वेगवेगळ्या प्रकारचे लोक पाहिलेयत, त्यांचे वेगवेगळे आचारविचार पाहिलेयत — त्या साऱ्यांचीं नांवसुद्धां तुला माहित नसतील. कुठं कुठं खाणंपीणं, शिवाशिव, यांचीं बंधनं आहेत, तर कुठं कुठं त्यांची ओळखसुद्धां नसल्याचं पाहिलंय. तरीपण एकंदरींत ते लोक असभ्यच तितकेच हलकेसलके — " असें म्हणून त्यांनीं खलास झालेल्या गुडगुडीचे उगीच एकदोन दम मारले आणि शेवटीं गुडगुडी कोपऱ्यांत ठेवून दिली. अचला तशीच मुकाट्यानें ऐकत बसली होती.

रामबाबू देखील स्वतः क्षणभर स्तब्ध राहिले होते. नंतर बसल्याजागीं सरळ होऊन ते म्हणाले, " याचं मूळ कुठं आहे तें कळतं का तुला सुरमा ? तुम्हीं लोकांनीं साहेबांकडून धडे घेतले आहेत. ते सुसंस्कृत आहेत, ते राजे आहेत, ते

धनी आहेत पाय वर करून हातानं चालायची रीत जर त्यांच्यांत असती तर तुम्हीं देखील म्हटलं असतं, कीं अशा प्रकारें चालतां आलं नाहीं तर कांहीं केल्या आपली उन्नति व्हायची नाहीं. ”

अशा प्रकारचा युक्तिवाद अचलेनें बंगाली दैनिकांतून पुष्कळ वेळां वाचला होता. म्हणून कांहीं न बोलतां ती नुसती हंसली. तें तिचें हंसणें म्हाताऱ्याच्या नजरेला आलें. पण तें जणूं कांहीं आपण पाहिलें नाहीं, पूर्वीच्याच भाषणाचें सूत्र धरून बोलतों आहोंत अशा रीतीनें ते म्हणाले, “ आपण ज्या वेळीं एखाद्या तीर्थक्षेत्रीं जातों त्या वेळीं ओळखी अनोळखीच्या कितीतरी लोकांच्यामध्यें जाऊन मिसळतों. तिथं शिवाशिवीची फारशी तमा बाळगीत नाहीं.–तो विचारच मनांत नाहीं येत तिथं ! या भावनेचा जन्म जर घृणेंतून झाला असता तर इतक्या सहजासहजीं तिथं शिवाशिवीचा विचार नाहींसा झाला असता का ? सहसा मी भलत्याच्याच हातचं कांहीं खात नाहीं, पण रस्त्यावर पडलेल्या दीनदुबळ्या अन् अपंग माणसाचीसुद्धां मला शिसारी येते असं जर कुणी —”

अचला उतावीळपणें त्यांना थांबवून म्हणाली, “ मी तुम्हांला ओळखत नाहीं का काका ? दयेची एवढी मोठी भावना जगांत अशी दुसऱ्या कुणाच्या ठायीं आहे ? ”

“ दया नव्हे पोरी, दया नव्हे–तें प्रेम आहे ! अशाच लोकांवर माझं जास्त प्रेम जडतं. पण याचं मूळ कुठं आहे माहीत आहे तुला पोरी ? एकादी जात काय कीं एकादा माणूस काय, हळूहळू जसजसा तो हीन होत जातो तसतसा तो सर्वांपेक्षां अत्यंत तुच्छ असलेल्या वस्तूच्या माथीं साऱ्या दोषांचा बोजा चढवून स्वतःचें समाधान करून घेऊं लागतो. त्याला वाटतं, कीं ही साधीसिधी अडचण संभाळली, कीं एका रात्रींत आपण मोठा माणूस होऊन बसूं. आम्हां लोकांची अगदीं हीच भावना असते. पण जें अत्यंत कठिण आहे, जें अगदीं मुळाला गेलेलं आहे—”

त्यांचें वाक्य पुरें झालें नाहीं. जिन्यावर कुणाची चाहूल ऐकूं आल्यामुळें त्यांनीं मागें वळून पाहिलें. सुरेश आलेला दिसून येतांच त्यांनीं एकदम त्याला प्रश्न करून टाकला, “ हें पहा सुरेशबाबू, तुम्ही तर सनातनी हिंदू आहांत. तुम्ही जातिभेद मानतां कीं नाहीं ? ”

सुरेश भांबावून गेला. हा भलताच प्रश्न कां ? ज्या चोरवाटेतून त्यानें प्रवास सुरू केला होता ती नीटपणें पारखून न पहातां एकदम पुढें पाऊल टाकलें

तर एकदम त्या वाळूंत गडप होऊन जाण्याची भीति होती. सत्य हें खरोखरच सत्य आहे कीं काय याचा सावधपणें हिशेब करणें अवश्य असतें. म्हणून तो भीतभीत जवळ आला आणि अचलेच्या तोंडाकडे पाहून अंदाज घ्यायचा प्रयत्न करूं लागला, पण तिचा चेहरा त्याला सहज नीटसा दिसला नाहीं. तेव्हां उगीच हंसण्याचा आव आणून तो चाचरत म्हणाला, "आम्हीं कोण तें तुम्हांला माहितच आहे की रामबाबू."

रामबाबू म्हणाले, "माहित आहे असं मीही समजत होतों. पण या तुमच्या गृहिणीनं सारी कांहीं उलटापालट करून टाकण्याचा घाट घातला आहे. ती म्हणते, जातिभेदासारखं दुसरं मोठं पाप नाहीं. हा सर्वनाशाचा मार्ग आहे, म्हणून तिला तो मुळींच पटत नाहीं. म्लेंच्छाच्या हातचं अन्न घ्यायलासुद्धां तिला अडचण वाटत नाहीं. हें सारं शिक्षण आपल्या ब्राह्म बापापासून तिला मिळालंय! तिच्या हातचं जेवण जेवल्यामुळं मी बाटलों कीं काय अन् तेवढ्यासाठीं मी प्रायश्चित्त करणं अवश्य आहे कीं काय याचीच चर्चा आतांपर्यंत चालली होती. तुमचं काय म्हणणं आहे?"

सुरेशची वाचा अडली. अचलेची वृत्ति त्याच्या परिचयाची होती. बंडखोरीची आग तिथें सारखी धुमसत राहिली होती याचीही त्याला यापूर्वींच जाणीव झालेली होती. पण आज ती आग कशासाठीं आणि कुठवर भडकून उठली आहे याचा निश्चित अंदाज न आल्यामुळें तो शंकेनें आणि उद्वेगानें शुष्क होऊन गेला. एका क्षणभरांतच त्यानें स्वतःला सांवरून घेतलें आणि पूर्वींप्रमाणेंच पुन्हां एकदां हंसायचा प्रयत्न केला. पण त्या त्याच्या प्रयत्नामुळें त्याचें हंसणें दृष्टीआड जाऊन त्याचा चेहरा मात्र विकृत झाला.

सुरेश म्हणाला, "ती थट्टा करतेय तुमची!"

रामबाबू गंभीरपणें मान हलवून म्हणाले, "तितकंच उचित नसतं तर मी तुमचं म्हणणं खरं मानलं असतं. पण हिंदूच्या घरची मुलगी नवऱ्याच्या कल्याणा-साठींसुद्धां ज्यावेळीं आपलं कर्तव्यपालन करीत नाहीं, तुलसी वहायच्या दिवशीं कांहीं केल्या उपास करीत नाहीं—ठीक आहे, याला जर थट्टा म्हणायचं असेल तर ही थट्टा जरा कठोर आहे खरी. बरं सुरेशबाबू, तुमचं लग्न लागलं तें हिंदू पद्धतीनंच ना?"

सुरेश म्हणाला, "हो!"

म्हातारा गालांतल्या गालांत हंसू लागला. तो म्हणाला, "तें माहितच होतं मला--"

अचलेकडे पाहून तो म्हणाला, "असं पहा, पुष्कळच गोष्टी तुला सांगायच्या आहेत मला. तुझा बाप ब्राह्म आहे याचं मला कांहीं वाईट वाटत नाहीं. मी पुष्कळ ब्राह्म पाहिले आहेत. ते ब्राह्मसमाजांत जाऊन डोळे मिटून प्रार्थनाही करतात, अल्पस्वल्प अनाचारही करतात. पण मुलीच्या लग्नाचा प्रश्न आला, कीं त्यावेळीं आग्रह धरून फारसा गोंधळ घालीत नाहींत. जाऊं दे! माझी एक काळजी दूर झाली!"

पण त्याहीपेक्षां विशेष प्रकारें काळजी दूर झाली ती सुरेशची. तो लगेच म्हाताऱ्याच्या सुराला सूर मिळवून म्हणाला, "आपलं म्हणणं अगदीं बरोबर आहे रामबाबू! आजकाल हीं असलींच माणसं दिसून येतात जिकडेतिकडे. हे लोक—"

दोघेही एकदम चमकले. त्याचें बोलणें थांबवून अचला मध्येंच कडकडत्या आवाजानें बोलूं लागली. दोन्हीं डोळे सुरेशकडे रोखून ती म्हणाली, "एवढे अपराध झाल्यावरही अपराध वाढवायची लाज वाटत नाहीं तुम्हांला? आणि ती सुद्धां माझ्या तोंडासमोर? हें सारं खोटं आहे. तुम्हांला माहित आहे! तुम्हांला माहित आहे–बाबा भोंदू नाहींत. ते मनःपूर्वक खरे खरे ब्राह्मसमाजी आहेत. तुम्हांला माहित आहे, ते –" बोलतां बोलतां ती खुर्चीवरून उठून उभी राहिली.

सुरेश पहिल्यानें बावरला होता खरा, पण ज्यावेळीं त्यानें मान वळवून पाहिलें त्यावेळीं म्हाताऱ्याच्या आश्चर्यचकित मुद्रेकडे त्याची नजर गेली आणि तोही एक प्रकारें भडकला. तो म्हणाला, "खोटं कसं? तुझे बाबा हिंदूच्या घरीं आपली मुलगी द्यायला राजी नव्हते का? तूंच खरं खरं सांग!"

अचला यावर कांहीं बोलली नाहीं. ती क्षणभर थांबली आणि आपलें मन सांवरून घेऊन संथपणें म्हणाली, "ही गोष्ट मला आज विचारतां आहां कशाला? त्यांचा उद्देश काय होता तें इतर कुणाहीपेक्षां तुम्हांलाच नाहीं का माहीत होतं? तुम्हांला माहित आहे, मी कोण, माझे बाबा कोण,–पण या बाबतींत तुमच्याबरोबर वाद घालीत बसायला माझं मन घेत नाहीं; एवढंच नव्हे, तर मला शरम वाटते त्याची. तुमच्या मनाला मानेल तसं त्यांना बनवून सांगा, पण मला तें ऐकायचं नाहीं. बोलां आतां, मी जातें." असें म्हणून ती एक प्रकारें घाईघाईनें पलिकडल्या खोलींत निघून गेली.

ती निघून गेली खरी पण ते दोघेही कांहीं वेळपर्यंत दगडासारखे ताठून राहिले होते.

म्हाताऱ्यानें संवयीच्या जोरावर गुडगुडीसाठीं हात पुढें केला, पण लगेच तो हात मागें घेऊन बसल्या जागीं त्यानें थोडीशी चुळबुळ केली आणि एकदां खांकरून गळा साफ करून घेऊन तो म्हणाला, " आजकाल तुमची प्रकृति कशी काय आहे सुरेशबाबू ? "

सुरेशचें चित्त थाऱ्यावर नव्हतें. तो एकदम दचकला आणि म्हणाला, " बरी आहे आतां !—"

तो असें बोलला खरा पण लगेच आठवण होऊन म्हणाला, " छातींत या इथं थोडंसं दुखतं—कालपासून कोण जाणे, दुःखी फारशी वाढली नाहीं—"

रामबाबू म्हणाले, " असं आहे सुरेशबाबू, तर मग या थंडींत एवढ्या रात्रीपर्यंत बाहेर हिंडत रहाणं बरं का ? "

' नुसता बाहेर हिंडत राहिलों नव्हतों रामबाबू. त्या एका घरासाठीं आज दोन हजार रुपये बयाणा देऊन आलों. "

रामबाबूंना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, " नदीवरचं तें घर बरं आहे, पण मला जर विचारलं असतं तर मी मात्र नको म्हटलं असतं. त्या दिवशीं बोलतांबोलतां गोष्ट निघाली होती. सुरमा तिथं रहायला अगदींच नाराज आहे–" त्यानीं हंसून विचारलें, " तिचं मत घेतलंय, कीं स्वतःला वाटलं म्हणून विकत घेऊन बसलां ? "

सुरेशनें त्या प्रश्नाचें सरळ उत्तर दिलें नाहीं. तो नुसतें एवढेंच म्हणाला, " नाराज व्हायला तसं कांहीं विशेष कारण दिसत नाहीं मला. शिवाय जरूर तें सामानसुमान कलकत्त्याहून मागवलं आहे. बहुधा उद्यांपरवां तें इथं येऊन पडेल."

रामबाबू कांहीं वेळपर्यंत स्तब्ध राहिले होते. थोडा वेळ विचार करून त्यानीं हांक मारली, " सुरमा ! "

सुरमेनें ' ओ ' दिली नाहीं. मुकाट्यानें ती खोलींतून बाहेर आली आणि आपल्या खुर्चीवर बसली. म्हाताऱ्यानें मोठ्या ममताळूपणानें विचारलें, " मुली, तुझ्या नवऱ्यानं आमच्या या गांवीं एक भलं मोठं घर घेऊन टाकलंय. या तुझ्या म्हाताऱ्या काकाला टाकून तूं जाणार आहेस का पोरी ? "

अचला कांहीं बोलली नाहीं.

म्हातारा म्हणाला, “ – नुसतं घर अन् सामानसुमानच नव्हे, मला माहित आहे, गाडीघोडा देखील येतो आहे अन् तें सारं केवळ तुझ्यासाठीं, हेंही पण मला कळलंय. ” असें म्हणून म्हाताऱ्यानें हंसतहंसत एकदां सुरेशकडे आणि एकदां अचलेकडे पाहिलें. तिच्या गंभीर आणि विषण्ण चेहऱ्यावर आनंदाचें एवढेंसुद्धां लक्षण दिसून आलें नाहीं. त्या अंधुक प्रकाशांत कदाचित् तें कुणाच्या लक्षांत आलें नसतें पण त्या तीक्ष्णदृष्टी म्हाताऱ्याच्या नजरेंतून तें सुटलें नाहीं. म्हणूनच त्यानें विचारलें, “ पण पोरी, तुझी संमति --”

अचलेनें आतां बोलायला सुरवात केली. ती म्हणाली, “ माझ्या संमतीची जरूर नाहीं काका. ”

म्हातारा एकदम म्हणाला, “ हें काय बोलणं झालं ग ? सारं कांहीं तुझ्यासाठीं. तुझ्याच आवडीसाठीं तर - ”

अचला उठून उभी राहिली आणि म्हणाली, “ नाहीं काका, नाहीं. माझ्या संमतीवर कांहीं अडून राहिलेलं नाहीं. सारं कांहीं तुम्हांला कळायचं नाहीं. तुम्हांला समजावून देणंही मला जमायचं नाहीं. तशी माझी जरूर नसेल तर मी जातें—”

म्हाताऱ्याच्या तोंडून यावर कांहीं उत्तर आलें नाहीं—तसें उत्तर यायची जरुरीही नव्हती.

इतक्यांत हिंदुस्तानी दासी तव्यावर निखारे घेऊन आली त्यावेळीं तिकडे त्यांची नजर गेली. रामबाबूंनीं आश्चर्यचकित होऊन विचारलें त्यावेळीं सुरेश ओशाळून म्हणाला, “ मी गड्याला आणायला सांगितलं होतं. त्यानं दुसऱ्याच कुणाला सांगितलं वाटतं ? माझी ही दुःखी जरा—”

विस्तवाची जरूर काय होती तें अधिक स्पष्ट करून सांगावें लागलें नाहीं. पण शेकायचें म्हटलें तर दुसऱ्या माणसाची जरुरी होती. रामबाबूंनीं अचलेकडे पाहिलें पण त्याचवेळीं एकदम मान वळवून ती थकल्यागत म्हणाली, “ मला भारी झोंप येतेय काका ! मी आतां जातें. ”

उत्तराची अपेक्षा न करतां ती एकदम निघून गेली आणि त्याचवेळीं तिनें आपला दरवाजा लावून घेतल्याचा आवाज ऐकूं आला.

म्हातारा खुर्चीवरून उठून उभा राहिला आणि मोलकरणीच्या हातचा निखाऱ्याचा तवा हातीं घेऊन म्हणाला, “ तर मग चला सुरेशबाबू—”

“ आपण ? ”

" हो ! मीच. मला हें कांहीं नवीन नाहीं. कितीतरी वेळ हें काम करावं लागलं आहे मला. "

एकप्रकारें बळेंबळेंच त्याचा हात धरून त्यानीं त्याला खोलींत ओढून नेलें आणि निखाऱ्याचा तवा जमिनीवर ठेवून ते त्याच्या उतरलेल्या चेहऱ्याकडे कांहीं वेळ टक लावून पहात राहिले. त्याचा एक हात दाबून धरून ते गहिंवरून म्हणाले, " नाहीं सुरेशबाबू, नाहीं ! हें असलं कांहीं बिलकुल चालायचं नाहीं — मुळींच नाहीं ! माझी खात्री आहे, कांहींतरी बिघडलंय !—मी आपलाच आहे !—पण जाऊं दे तें. जरूर पडली तर या म्हाताऱ्याला आणखी एकदां—" असें म्हणून ते एकदम थांबले.

सुरेशला यावर एक शब्दही बोलतां येईना. त्याचे ओंठ रडकुंडीला आलेल्या लहान मुलासारखे थरथर कापूं लागले. डोळ्यांत येणारीं आसवें लपवण्यासाठीं त्यानें तोंड फिरविलें.

## १२

सुरेश डोळे झांकून एका कोचावर पडला होता आणि जवळच एका खुर्चीवर बसून म्हातारे रामबाबू त्याची छाती शेकीत होते. इतक्यांत दार वाजल्याचा आवाज ऐकूं आल्यामुळें दोघांनींही वळून पाहिलें तोंच अचला आंत आली. फारशी प्रस्तावना न करतां ती म्हणाली, " रात्र फार झाली आहे काका, आपण जाऊन झोंपा. "

" मी तीच वाट पहातोंय ग पोरी ! " असें म्हणून म्हातारा चट्कन उठला आणि सुरेशकडे पाहून म्हणाला, " आतांपर्यंत आम्हां दोघांनाही विटंबना भोगावी लागत होती—हीं कामं आमचीं का आहेत ?—" असें म्हणून अचलेला बसण्यासाठीं एक खुर्ची पुढें लोटून ते म्हणाले, " ज्याचं काम त्यालाच शोभतं. हें घे ! बैस ! मी आतां जरा हातपाय मोकळे करतों. "

म्हातारा बराच थकला होता. एक मोठी जांभई देऊन त्यानें एकदोन चुटक्या वाजवल्या आणि गुडगुडी उचलून हातीं घेतली. खोलीच्या बाहेर जातांना हळूच दरवाजा बंद करीत करीत ते हंसून म्हणाले, " पेंगतां पेंगतां मी हातपाय पोळून घेतले नाहींत हेंच भाग्य म्हणायचं ! काय सुरेशबाबू ? "

सुरेश कांहीं बोलला नाहीं. झांकलेल्या डोळ्यांसमोर दोन्ही हात जोडून त्यानें नुसता एक नमस्कार केला.

अचला मुकाट्यानें त्यांच्या खुर्चीवर बसली आणि शेक द्यायचा फ्लॅनेलचा बोळा गरम करीत करीत म्हणाली, " पुन्हां कां दुखूं लागलं ? कुठं दुखतंय ? "

सुरेशनें डोळे उघडले नाहींत कीं उत्तरही दिलें नाहीं. नुसत्या हाताच्या खुणेनें छातीची डावी बाजू त्यानें दाखवली.

त्यानंतर सारें सामसूम—तें इतकें, कीं असें वाटूं लागलें, या मूक अभिनयाचा शेवटचा अंक देखील असाच मुकाट्यानें समाप्त होईल.

पण तसें कांहीं झालें नाहीं. सुरेशनें एकदम फ्लॅनेलच्या बोळ्यासकट अचलेचा हात आपल्या हातीं धरून आपल्या छातीवर दाबून धरला. अचलेल्या मुद्रेवर उद्वेगाचें कोणतेंही लक्षण दिसून आलें नाहीं—कारण ही गोष्ट तिच्या अपेक्षेप्रमाणेंच घडून आली होती. ती नुसती म्हणाली, " सोडा हात. आणखी थोडा शेक देतें. "

सुरेशनें हात सोडला—पण पहातां पहातां तो झट्‌कन उठून बसला. आणि दोन्ही हात पसरून त्यानें अचलेला तिच्या खुर्चीसकट पकडून ओढून आपल्या हृदयापाशीं कवटाळून धरलें आणि बेफामपणें तो तिचीं इतकीं चुंबनें घेऊं लागला, कीं तीही भांबाहून सुन्न होऊन गेली.

एक क्षणापूर्वीं तिला वाटलें होतें, कीं या आवेग-उच्छ्‌वासहीन नाट्काचा शेवट असाच निर्जीव मौनानें होणार—पण एक क्षणसुद्धां गेला नाहीं आणि तिला वाटूं लागलें,—या उन्मत्त निर्लज्जतेला सीमा नाहीं, शेवट नाहीं, साऱ्या बाजूंनीं सर्वकाळ हा त्याचा उन्मत्तपणा जणूं कांहीं असाच अनंत आणि अक्षय होऊन राहाणार !—कोणत्याही क्षणाला, कोणत्याही युगांत हा थांबणारच नाहीं——याचा विच्छेद होणार नाहीं.

अचलेनें अडथळा केला नाहीं, कीं जोरही केला नाहीं. जणूं काय असें कांहीं होण्याची ती वाटच पहात होती—मात्र तिचा शांत, आणि गंभीर चेहेरा दगडासारखा थंडगार आणि कठोर झाला होता.

सुरेशला भान राहिलें नव्हतें—साऱ्या जगांतल्या अंधाराची मोट बांधून ती त्याच्या डोळ्यांवर ठेवल्यामुळें जणूं काय तो आंधळा होऊन गेला होता. नाहीं तर अशा रीतीनें बेफाम चुंबनें घेण्याच्या कृतीबद्दल त्याची त्यालाच लाज वाटली असती, ओशाळगत वाटली असती.

ज्यावेळीं त्याला ही जाणीव झाली, नुसता थकवा आल्यामुळें ज्यावेळीं त्याचा तो उन्माद ओसरला, त्यावेळीं अचलेनें त्याच्या मिठींतून स्वतःला सोडवून घेतलें आणि ती आपल्या जागीं येऊन बसली.

आणखी कांहीं वेळपर्यंत दोघेही तसेंच गप्प बसून राहिले होते. तितक्यांत सुरेशनें एकदम एक मोठा सुस्कारा सोडला आणि म्हटलें, " अचला, अशाच प्रकारें आपण आणखी किती दिवस काढणार ?—" तिच्या उत्तराची अपेक्षा न करतां तो पुढें म्हणाला, " तुझ्या ह्या क्लेशांची मला कल्पना आहे. माझ्याही दुःखाचा थोडासा विचार करून पहा ना !—मी साफ खचून गेलोंय ! "

त्या प्रश्नाचें उत्तर न देतां अचलेनें विचारलें, " इथं तुम्ही घर कां विकत घेतलं ? "

सुरेश उसळून येऊन म्हणाला, " तें केवळ तुझ्यासाठींच अचला. "

याही उद्गाराला सरळ उत्तर न देतां तिनें विचारलें, " सामानसुमान, गाडी-घोडा, खरोखरच का खरेदी केलंय ? "

सुरेशनें पुन्हां तसेंच उत्तर दिलें, " सारं कांहीं तुझ्यासाठीं ! "

अचला यावर कांहीं बोलली नाहीं. या साऱ्या वस्तूंची आपल्याला काय जरुरी, त्या घ्यायची आपली इच्छा आहे कीं नाहीं—हा प्रश्न या माणसाला करायचा म्हणजे स्वतःचीच फसवणूक करून घेणें नव्हे का !

त्या बाबतींत विशेष कांहीं न बोलतां ती क्षणभर स्तब्ध राहिली होती. नंतर तिनें विचारलें, " रामबाबूंकडे तुम्ही माझ्या बाबांची हकिगत सांगितली का ? घर कुठं आहे म्हणून सांगितलंत ? "

सुरेश म्हणाला, " नाहीं ! "

" आणखी शेक हवा आहे का ? "

" नको. "

" तर मग मी आतां जातें. भारी झोंप येतेय मला. " असें म्हणून ती खुर्चीवरून उठून उभी राहिली आणि विस्तवाचें भांडें दूर ठेवून देऊन खोलीच्या बाहेर जातांना दरवाजा बंद करूं लागली असें पाहून सुरेश धडपडत उठून बसला आणि म्हणाला, " आज आणखी एक गोष्ट सांगून जा अचला— तुला दुसऱ्या कुठं जायचंय का ? खरं सांग. "

अचला म्हणाली, " कुठं जायचं ? "

सुरेश म्हणाला, " कुठं तरी ! जिथं आपल्याला कुणी ओळखत नाहीं, कुणाला माहीत नाहीं अशा कोणत्यातरी गांवीं ! तें गांव जितकं— "

आवेशानें आणि उत्सुकतेनें सुरेशचा आवाज कापूं लागला होता. अचलेच्या तें ध्यानीं आलें, पण तिनें आपल्या नित्याच्या स्वाभाविक आणि सरळ

बोलीनें उत्तर दिलें, "या गांवींसुद्धां आमच्या कुणीं ओळखीचीं नव्हतीं. आज-सुद्धां कुणी आम्हांला ओळखत नाहीं !"

सुरेशला उत्साह वाटला. तो म्हणाला, "पण हळूहळू—"

अचला मध्येंच म्हणाली, "हळूहळू ओळखतील, असंच ना ? तसा बराच संभव आहे खरा ! पण इतर कुठं ही गेलों तरी तिथं देखील असंच व्हायचं !"

सुरेश तितक्याच उत्साहानें चंचल होऊन बोलूं लागला, "तर मग इथंच राहूं. इथंच रहायला तुझी संमति आहे, असंच ना अचला ? एकदां सरळ सरळ सांगून टाक !"

बोलतां बोलतां तो थांबला—जणूं काय त्याला कुणीतरी लोटून घातलें होतें. त्याचीं वळवळणारीं पावलें जमिनीवरच होतीं. तो एकदम स्तब्ध झाला. दार बंद करून अचला निघून गेली होती असें त्याला दिसून आलें.

गेल्या कांहीं दिवसांत आकाशांत ढग येऊं लागले होते. पावसाची एकादी सर येईल असें वाटूं लागलें होतें. सुरेशच्या नवीन घरांत कलकत्त्याहून भरपूर आणि भरगच्च सामान येऊन रास करून पडलें होतें. तें व्यवस्थित स्वरूपांत लावण्यासाठीं त्या दोघांपैकीं कुणालाच स्फूर्ति होत नव्हती. एक भलीमोठी घोड्याची जोडी आणि एक भारी किंमतीची गाडी परवांच येऊन पडली होती. ती तबेल्यांत कोचमनच्या ताब्यांत पडून राहिली होती, तिचीही खबर कुणी घेत नव्हतें.

दिवस कसेबसे निघून जात होते. एके दिवशीं दुपारच्या वेळीं म्हातारे रामबाबू एका हातांत गुडगुडी आणि दुसऱ्या हातांत एक निळ्या कागदाची चिठी घेऊन हजर झाले. अचला एका वेताच्या कोचावर रेलींगच्या मागच्या बाजूला अर्धवट झोंपल्यागत बसून एका बंगाली मासिकांतील जाहिराती वाचीत होती. काका आलेले पहातांच ती उठून बसली. तिच्या हातीं पत्र देऊन रामबाबू म्हणाले, "हें घे सुरमा तुझ्या राक्षसीचं पत्र. इतक्या दिवसांत तुला पत्र लिहिलं नाहीं म्हणून माझ्या पत्रांतून तिनं असंख्य वेळां तुझी माफी मागितली आहे—आणि असंख्य प्रणामही सांगितले आहेत. आतां तिला तूं क्षमा कर." असें म्हणून हंसत हंसत त्यांनीं तो कागद तिच्या हातीं दिला आणि पलिकडच्या एका खुर्चीवर बसून नदीकडे पहात पहात मन लावून हुक्का ओढीत त्यांनीं ती सारी जागा धुरानें भरून सोडली.

अचलेनें तें पत्र आरंभापासून अखेरपर्यंत चांगलें दोन वेळ वाचून घेतलें आणि वर पाहून म्हटलें, "तर मग ही सारी मंडळी परवां सकाळच्या गाडीनं

येणार आहेत होय ? अन् ही आत्याबाई कोण काका ? अन् तिचा राजपुत्र अन् वधू—अन् राजपुत्राचा गार्डियन ट्यूटर—"

रामबाबू हंसून म्हणाले, "ही बेटी राक्षसी थट्टा करायची एव्हढीसुद्धां संधि हातची दवडीत नाहीं ! आत्याबाई म्हणजे माझी धाकटी विधवा बहीण अन् राजपुत्रवधू म्हणजे तिची मुलगी—भांडारपूरच्या भवानी चौधरीची बायको.—कांहीं का म्हणेना ती, तें घराणं राजेरजवाड्यांतलंच आहे खरं. राजपुत्र म्हणजे तिचा दहा वर्षांचा मुलगा—अन् शेवटची व्यक्ति कोण तें प्रत्यक्ष पाहिल्याशिवाय कांहीं मला सांगतां यायचं नाहीं—असेल कुणी भल्यामोठ्या पगाराचा एकादा नोकर. मोठ्या माणसांच्या बाबालोकांबरोबर फिरायचं, इकडे-तिकडे आडउघड गप्पा मारून सज्ञान आणि अज्ञान व्यक्तींची खुशामत करायची--असा असेल कुणीतरी एकादा. त्याचं मला कांहीं वाटत नाहीं सुरमा.--येऊं देत ते--खातीलपीतील, पश्चिमेच्या हवापाण्याच्या जोरावर घसान् काळीज थंड करून घेतील,—तेव्हढंच झालं तरी मला समाधान वाटेल. पण मला काळजी वाटतेय ती ही, कीं त्यांचं घर आहे लहान, राजेरजवाडे येऊन रहायचा हिशेब न धरतां बांधलेलं, एकंदर घरादाराची व्यवस्था त्यांना साजेशी नसलेली. शिवाय त्यांच्याबरोबर जरुरीपेक्षां तिप्पट जास्त दासदासी, चाकरनोकर येतील-तेव्हां मी म्हटलं, या तुमच्या घरीं जर—"

अचला व्यग्र होऊन म्हणाली, "पण त्याला आतां वेळ कुठंय काका ? शिवाय एव्हढ्या दूर राहाणं त्यांना सोयीचं होईल का ?"

रामबाबू म्हणाले, "एव्हांपासून तयारीला लागलों तर वेळ आहेच तर काय ! अन् जागा मिळण्याजोगी असली तर कुठं, कुणाची कशी सोय होईल त्याचं निराकरण सहज करतां येईल. सुरेशबाबू तर ऐकल्याबरोबर भाड्याची टमटम करून निघून गेले—तुमचीही गाडी तयार झालीय म्हणाले. तूं जर लौकरलौकर तयारी करशील पोरी, तर मी तीच संधि साधून जुतं जोडा पायांत घालायच्याऐवजीं खांद्यावर पंचा टाकून येईन, तुझ्या घरसंसाराची आम्हांला व्यवस्था करतां यायची नाहीं असं खरोखरच का तुला वाटतं ?"

क्षणभर विचार करून अचला उठून उभी राहिली, "बरं तर मी कपडे बदलून येतें." असें म्हणून ती निघून गेली.

रामबाबूंचा प्रस्ताव असंगत नव्हता कीं अस्पष्टही नव्हता. त्यांच्या नात्यांतील

राजकुमार आणि राजमाता यांना जागा देण्यासाठीं हें घर सोडून दुसरीकडे जाऊन राहिलें पाहिजे हें अचलेला आतां सहज कळून चुकलें.

सहज कळलें खरें, तरीपण आपल्यावरचा बोजा हलका झाला आहे असं तिला वाटेना. मनाची धांव जिथवर जात होती तिथवर जाऊन विचार करतांना या भाराच्या स्टीमरोलरखालीं आपण चुरडून जात आहों असें तिला वाटलें.

इतक्या दिवसांत तिला एक दिवससुद्धां घराबाहेर पाडायला कुणीच समर्थ झालें नव्हतें. दहापंधरा मिनिटांनीं आपला नित्याचा साजसरंजाम करून ज्यावेळीं ती पहिल्यानेंच खालीं आली त्यावेळीं चोंहीकडे नजर फेकतांना तिला सारें जग नवें वाटलें —बदलल्यासारखें वाटलें—एव्हढेंच नव्हे, तर आपल्यांत देखील एक प्रकारें बदल झाला आहे असें तिचें तिलाच वाटूं लागलें.

फाटकाच्या बाहेर ती भलेमोठे घोडे जोडलेली गाडी उभी होती. नवा पोषाख करून कोचमन वर बसला होता. त्यानें धनिणीला ओळखून तिथूनच सलाम केला. सईस दार उघडून बाजूला सरून अदबीनें उभा राहिला. तिच्या मागोमाग म्हातारे रामबाबू येऊन समोरच्या बैठकीवर बसले त्यावेळीं आपण कांहींतरी अद्‌भुत स्वप्न पहात आहों असें तिला वाटूं लागलें. तिची भारावलेली नजर गाडीच्या ज्या ज्या भागाकडे जात होती तो तो भाग नुसता बहुमोलच नव्हे, नुसता श्रीमंताच्या सांपत्तिक दंभानें घडवलेलाच नव्हे, तर प्रत्येक बिंदून् बिंदू जणू काय कुणाच्या तरी निस्सीम प्रेमांतून घडवला गेला होता असें तिला वाटलें.

कडक दगडी रस्त्यावरून चार जोड्या टापांचा आवाज करीत गाडी निघाली, पण तो आवाज अचलेच्या कानांत अगदीं अस्पष्ट स्वरूपांत ध्वनित होत होता. तिची सारीं अंतरेंद्रियें आणि बहिरेंद्रियें शेवटपर्यंत अशींच सुन्न होऊन राहिली असतीं, पण रामबाबूंचा आवाज एकाएकीं कानीं आल्यामुळें ती दचकून भानावर आली. समोरच्या बाजूला बोट दाखवून ते तिला म्हणाले, "बरं का पोरी, तें दिसतंय तें तुझं घर. गडीमाणसं, चाकरनोकर सारे ठरवून टाकलेयत. रंगरोगण करायचं कामही इतक्यांत बरंच पुरं झालंय. फक्त तुझ्या झोंपायच्या खोलीला तेव्हढा अजून मी कुणाला हात लावूं दिला नाहीं. ते जायला निघाले त्यावेळीं मी म्हणालों होतों, कीं सुरेशबाबू, या घराची रचना तुम्हांला वाटेल तशी करा, मी अडथळा करणार नाहीं, फक्त माझ्या पोरीच्या खोलीला तुमच्या मताप्रमाणं सजवून तिला दुप्पट त्रास द्यायला कारणीभूत होऊं नका म्हणजे झालं." असें म्हणून म्हाताऱ्यानें तिच्याकडे

पाहिलें. ती लाजून गाल भरून हंसलेली दिसेल या आशेनें तिच्याकडे वळलेली नजर फुकट गेली. तिच्याकडे पहातांच ते एकदम चूपचाप झाले.

बोलतांबोलतां ते एकदम असे कां थांबले त्याचें कारण अचलेच्या तेव्हांच ध्यानीं आलें होतें. म्हणूनच नव्या बंगल्याच्या दरवाजापाशीं गाडी येऊन पोंचेपर्यंत आपला गोरामोरा झालेला चेहरा म्हाताऱ्याच्या नजरेला येऊं नये म्हणून ती गाडीबाहेर तोंड वळवून पहात राहिली होती.

गाडीचा आवाज ऐकतांच सुरेश बाहेर आला. घरवाली आल्याचें कळतांच घरांतले नोकरचाकर हातचें काम टाकून तिला पहाण्यासाठीं बाहेर आले, पण तिच्या चेहेऱ्याकडे नजर टाकतांच कुणालाच फारसा उत्साह वाटला नाहीं.

रामबाबूंच्याबरोबर अचला मुकाट्यानें खालीं आली. सुरेशकडे तिनें ढुंकूनसुद्धां पाहिलें नाहीं. तशीच मुकट्यानें तीं तिघेंही त्या नव्या घरांत प्रवेश करतीं झालीं. आंतबाहेर, वरखालीं, कुठेंहि आनंदाचा आभास असल्याचें एवढेंसुद्धां लक्षण चोंहीकडे नजर फेकल्यावेळीं कुणाच्याही नजरेला दिसून आलें नाहीं.

## १३

पण या बाबतींत केव्हढी चूक होत होती, तीही उघडकीला यायला वेळ लागला नाहीं. घर सजवायच्या कामांत गुंतून गेल्यावेळीं या साऱ्या अत्यंत महाग आणि दुर्मिळ सामानाच्या राशींत वावरत असतांना जी एक काळजी सर्वांच्या मनावर परिणाम करीत होती ती इतर सर्व काळज्यांचें स्वरूप दडपून टाकीत होती. ज्याच्याकडे पैसा आहे तो खर्च करील, ही म्हण जुनीपुराणीच आहे. पण तें एव्हढेंच कांहीं नव्हतें. एका व्यक्तीला आराम आणि आनंद देण्यासाठीं दुसऱ्या एका व्यक्तीला अनिवार तळमळ लागली होती. कामाच्या गर्दीत, सामानसुमानाची हालवाहालव करतांना साधारणपणें बरेंच बोलीभाषण होत होतें. अनेकवार नजरेला नजर भीडत होती. हें सर्व होत असतांना एकादें न बोललेलें भाषण, उघड न केलेलें इंगित राहून राहून केवळ या एकाच बाजूकडे अंगुलीनिर्देश करीत होतें.

घर धुऊनपुसून साफ करण्याचें काम पुरें झालें नव्हतें. जागा राहाण्याजोगी करून घेईपर्यंत सारा वेळ गेला. थकूनभागून गेलेलीं तीं तिन्हीं माणसें घरीं जाण्यासाठीं ज्यावेळीं गाडींत बसलीं त्यावेळीं प्रहररात्र झाली होती. थोडीशी वावटळ उठल्यामुळें आकाश खुलें झालें होतें. मधूनमधून एकादा धुरकट ढगाचा

तुकडा आकाशाच्या या टोंकापासून त्या टोंकापर्यंत जातांना नदीपार होत नाहींसा होत होता आणि त्याचा हा प्रवास सुरू असतांना सप्तमीच्या अर्धचंद्राच्या किरणांवर मधूनमधून येणाऱ्या आडपडद्याची छाया झाडाझुडपांवर पडत होती.

म्हातारे रामबाबू खिडकीबाहेर तोंड काढून उजळत्या डोळ्यांनीं निसर्गाचें हें सौन्दर्य दोन्ही डोळे भरून पहात होते. पण जीं वृद्ध नव्हतीं, निसर्गाचें सारें सौन्दर्य, सारें माधुर्य अनुभवायचें ज्यांचें वय, तींच तेव्हढीं गाडींतल्या गादी लावलेल्या दोन्हीं कोपऱ्यांवर डोळे मिटून मस्तक टेकून पडलीं होतीं.

फार दिवसांपूर्वीची एक आठवण अचलेच्या अंतःकरणांत अस्पष्ट होऊन राहिली होती, ती आज फारां दिवसांनीं तिच्या मनांत पुन्हां जागी झाली—एके दिवशीं कलकत्त्याला सुरेशच्या घराकडून ती अशीच गाडींतून संध्याकाळच्या वेळीं घरीं परत यायला निघाली होती. त्या दिवशीं त्याच्या संपत्तीचा आणि ऐश्वर्याचा बडेजाव तिच्या मनाला महिमपासून दूर खेंचून न्यायला कारणीभूत झाला होता. त्या दिवशीं सुरेशच्या हातीं आपल्या जीवनाचा भार सोपवणें तिला असंगत किंवा असंभाव्य वाटलें नव्हतें. एव्हढा कालावधि गेल्यावर या गोष्टीचें स्मरण याचवेळीं अचानक कां व्हावें याचा ती विचार करूं लागली, त्यावेळीं अंतरंगांतल्या अगदीं खालच्या तळाला दडून राहिलेलें वास्तवचित्र चटकन् नजरेला आल्यामुळें तिच्या सर्वांगावर शरमेचीं वावटळ झळाळून गेली.

लाज! लाज! लाज! ही गाडी, हें घर आणि हा साजसरंजाम सारें कांहीं आपल्या पतीच्या प्रेमाचें लक्षण आहे असें आज सारीं समजताहेत – एक दिवस असा येईल, कीं त्या दिवशीं सगळ्या सरंजामावर आपला यत्किंचितही खरा अधिकार नाहीं—हे नखशिखांत खोट्याचें बाहुलें आहे असें कळेल, तेव्हां जी शरमिंदी परिस्थिति येईल तिचें काय करायचें? आज हें सारें कांहीं केवळ तिच्याच पूजेसाठीं मोठ्या परिश्रमानें आणलेलें होतें—हें सारें अथपासून इती-पर्यंत स्नेहानें भरलेलें, प्रेमानें ओथंबलेलें आणि आदरानें मंडीत झालेलें होतें, यांत आजच्या प्रसंगापुरती तरी यत्किंचितही शंका नव्हती. ही जी घोड्याची जोडी सारा रस्ता दणाणून टाकीत त्यांना घेऊन जात होती, त्या गाडींतल्या मऊ आणि गुबगुबीत गाद्यांच्या स्पर्शानें होणारा आनंद—निरंतर आणि अबाधित गतीनें मिळत असणारा आनंद - आज केवळ तिच्या मालकीचा होता. तो एव्हढा नोकरचाकरांचा तांडा जो उत्कंठेनें तिची वाट पहात राहिला होता, तोही केवळ तिच्यासाठींच होता!

पहातांपहातां तिच्या मनांत लोभ आणि त्याग, लज्जा आणि गौरव हीं

दोन्हींही गंगायमुनेच्या ओघाप्रमाणें जोडजोडीनें वाहूं लागलीं होतीं; पण त्यांतल्या कुणाचा स्वीकार करावा हें क्षणभर तिला कळेनासें झालें होतें.

घरीं पोंचतांच म्हातारे रामबाबू सायंसंध्या, पूजा उरकण्यासाठीं निघून गेले, त्यावेळीं एकदम ती घाबरल्यासारखी झाली. थकून गेल्यामुळें डोकें दुखत असल्याचें ढोंग करून ती खोलीचें कवाड बंद करून जाऊन बिछान्यावर पडली. शरमेच्या आणि अपमानाच्या खाईंत ती यावेळीं आकंठ बुडून गेली होती. बाप काय म्हणेल, नवरा काय म्हणेल, नात्यागोत्याचीं माणसें आणि मित्रांचा परिवार काय म्हणेल, या विचारानें उत्पन्न होणारी शरमेची भावना डोंगरासारखी अभ्रभेदी स्वरूपांत तिच्या नजरेसमोर उभी राहिली होती. त्याखालीं बाकीच्या साऱ्या दुःखाच्या कल्पना दडपून गेल्या होत्या. हें ढोंग ज्या दिवशीं उघडकीस येईल त्या दिवशीं तोंड लपवायला सुद्धां जागा सांपडणार नाहीं ही एकच कल्पना तिला त्यावेळीं भेडसावीत होती.

ती ज्या समाजांत आणि ज्या संस्कृतींत लहानपणापासून वाढली होती, तिथें तपस्व्याला शोभणाऱ्या कृष्णाजिनाची शय्या आणि तरुतलावरचा निवास कुणालाही केव्हांही आवडता म्हणून रुचला नव्हता. तिथल्या प्रत्येक हालचालींत, आचारविचारांत आणि आहारविहारांत विलासितेबद्दल कुणालाच तिटकारा वाटत नव्हता. अनुरागाचेंच प्रचंड प्रस्थ उत्तरोत्तर माजत असल्याचें ती पहात आली होती हिंदुधर्मातल्या कोणत्याही आदर्श भावनेचा तिच्यावर मुळींच संस्कार झाला नव्हता. परलोकाच्या आशेनें इहलोकच्या साऱ्या सुखांपासून स्वतःला सक्तीनें वंचित करून घेण्याची कठोर निष्ठा तिच्या कधींच नजरेला आली नव्हती. वैराग्य तिला अपरिचित होतें. परक्याच्या अनुकरणानें घडवलेला समाज ती जन्मादारभ्य पहात आली होती. त्या समाजांतील प्रत्येक स्त्रीपुरुष संसाराच्या तहानेनें व्याकुळ होऊन दिवसेंदिवस शुष्क होऊन जात असल्याचें तिनें पाहिलें होतें.

म्हणूनच या एकांत स्थानांतील बिछान्यावर डोळे झांकून पडल्यावेळीं, ऐश्वर्य म्हणजे एक तुच्छ वस्तु आहे अशा भावनेनं तें लोटून देण्याचें सामर्थ्य आपल्या ठायीं नाहीं, तसें करायची जरुरीही नाहीं, हा विचार जो तिच्या मनांत जागा होत होता, तोही तिला तितकासा पटत नव्हता. हें ऐश्वर्य तुच्छ मानण्याइतकें शिक्षण आणि संस्कार उभ्या जन्मांत तिला कधींच जाणवले नव्हते. तिच्या हृदयावर ग्लानीची काळी छाया पसरली होती. ही एव्हढी संपत्ति, हें एव्हढें वैभव, देहाला सर्व प्रकारच्या सुखसमृद्धींत लोळत ठेवायला साधनीभूत होणारा

हा सारा साजसरंजाम, आज न मागतां तिच्या पायांपाशीं येऊन पडला होता. अनिवार मोहाची भावना बळावल्यामुळें ती तें सारें ऐश्वर्य एका हातानें कवटाळीत होती, तर दुसऱ्या हातानें लोटून टाकीत होती.

दुःखाच्या स्वप्नांत ज्याप्रमाणें एकादी अंधुकशी मुक्तीची चेतना जागूं लागल्याचा भास होतो, त्याचप्रमाणें त्यावेळीं तिच्या मनांत आणखी एक कल्पना येत होती. नशिबाच्या खेळामुळें आज हा खोट्याचा बाजार उभारला गेला होता. कुणी सांगावें, एक दिवशीं हाच खरा ठरेल. असा तो खरा ठरायला कदाचित कसला अडथळाही येणार नाहीं असा जो विचार तिच्या मनांत जागा झाला होता, तो कांहीं केल्या एकदम नाहींसा होत नव्हता. हा सुरेशच कदाचित आपला पति झाला असता—भविष्यकालीं ही गोष्ट असंभवनीय कां ठरावी? असें होणार नाहीं असेंही कुणाला निश्चयानें सांगतां आलें नसतें.

तिच्या ओळखीच्या साऱ्या समाजांत विधवांचे विवाह होत होते. हिंदु स्त्रीप्रमाणें एकाच माणसाशीं पतीत्वाच्या नात्यानें जडलेलें बंधन या लोकीं आणि परलोकींसुद्धां घट्ट धरून ठेवण्याचें अलंघ्य अनुशासन प्रमाण म्हणून मानायची जबाबदारी तिच्यावर नव्हती. अनन्यगतिक होऊन जीवनमरणाच्या प्रसंगांत केवळ एकाच मनुष्याशीं जखडून पडायची आवश्यकता तिच्या समाजाच्या दृष्टीनें तिला बंधनकारक नव्हती. एक नवरा जिवंत असतांना दुसऱ्याला नवरा म्हणून कबूल करण्याचा गुन्हा घडल्यामुळें तिला कितीही लाज वाटली, यातना झाल्या, मन पोळून गेलें, तरीही धर्म आणि परलोकाच्या भीतीची गदा माथीं बसण्याची भीति तिला जाणवत नव्हती.

बंद असलेल्या दरवाजावर थाप मारून तिला हांक मारून रामबाबू म्हणाले, "तोंडांत पाणीसुद्धां न घेतां अशी कां येऊन पडलीस ग पोरी? प्रकृति बरीच का बिघलीय?"

अचलेच्या विचाराचा धागा तुटला. तिला वाटलें, हा आपल्या बापाचाच आवाज. रागारागानें ती भलत्याच वेळीं अशीच येऊन झोंपत असे त्यावेळीं अशाच उद्विग्नतेनें दाराबाहेर उभे राहून ते हांकांहांकी करीत असत.

पूर्वींचे विचारांचे धागे आधींच तुटले होते. हा नवा भासही नाहींसा झाला होता. त्या प्रेमाच्या हांकेचा अनादर करणें तिला कठीण गेलें. तिचे दोन्हीं डोळे एकदम पाण्यानें भरून आले. घाईघाईनें डोळे पुसून, भरलेला गळा

खांकरून साफ करून तिनें रामबाबूंच्या सादेला उत्तर दिलें आणि दार उघडून ती त्यांच्यासमोर येऊन उभी राहिली.

इतक्या दिवसांत इतका लोभ जडला होता तरीही हा म्हातारा गृहस्थ दुराव्याची भावना राखूनच वागत होता. या घरांतला हा तिचा शेवटचा दिवस होता ही जाणीव झाल्यामुळें तो दुरावा आज नाहींसा झाला होता. त्यानें एक हात तिच्या खांद्यावर ठेवला आणि दुसऱ्या हातानें तिचें मस्तक गरम झालें आहे कीं काय तें पाहून घेतलें. तो हंसत हंसत म्हणाला, "म्हाताऱ्या काकाला अशी फसवतेस का पोरी ? कांहींसुद्धां झालेलं नाहीं. चल ये." असें म्हणून त्यानें तिला हात धरून गच्चींत ओढून आणलें आणि एका खुर्चीवर बसवलें.

समोरच पलीकडे सुरेश एका खुर्चीवर बसला होता. एक क्षणभरच त्यानें नजर वर करून त्यांच्याकडे पाहिलें आणि पुन्हां मान खालीं घातली. रात्रीं सारी उरकाउरक झाल्यावर साऱ्या दिवसांत काय काय काम केलें याचा एकदां आढावा घ्यायचा असें आधीं ठरलें होतें, म्हणूनच तो एकटाच बसून रामबाबू येण्याची वाट पहात होता. त्याच्याकडे पाहून म्हातारा थोडासा हंसून म्हणाला, "सुरेशबाबू, तुमची ही गृहलक्ष्मी आहे एका विलायती बापाची मुलगी. तिथी, वार, नक्षत्र, पंचांग, पोथीवर तिचा विश्वास नाहीं. तुमचा विश्वास असो कीं नसो, त्यांतही कांहीं बिघडत नाहीं. पण माझ्या या साठ वर्षांच्या वयांत जे कुसंस्कार मला जडले आहेत ते कांहीं जाणं शक्य नाहीं. उद्यां प्रहर दीड प्रहराच्या आंतच शुभवेळा आहे—"

त्याचा उद्देश चटकन् ध्यानीं न आल्यामुळें सुरेशनें आश्चर्यचकित होऊन विचारलें, ' कसली शुभवेळा ?"

रामबाबूंनीं त्याला सरळ भाषेंत उत्तर दिलें नाहीं. जरा घोटाळल्यासारखें करून ते म्हणाले, "पंचांगांत पाह्यलं तों आणखी एक आठवडाभर तरी चांगलासा दिवस दिसून आला नाहीं.—म्हणून म्हटल—"

आतां सुरेशला त्यांच्या बोलण्याचा उद्देश कळला. होय किंवा नाहीं—कशा प्रकारें उत्तर द्यावें तें ठरवतां न आल्यामुळें भीतभीत हळूच त्यानें चोरट्या नजरेनें अचलेकडे पाहिलें. ती सारखी त्याच्या नजरेला नजर भिडवून मुकाट्यानें पहात राहिली होती असें दिसून आल्यामुळें आतां त्यानें पूर्वीच्यासारखी मान खालीं घातली नाहीं.

अचला शांतपणानें म्हणाली, "तर मग उद्यां सकाळीं त्या घरीं जातां येईल का आम्हांला ?"

सुरेश चकित झाला होता. या प्रश्नाचें सरळ सरळ उत्तर त्याच्या तोंडून बाहेर आलें नाहीं. तो कसाबसा घाबरत घाबरत, कांचरत कांचरत म्हणाला, " अजून त्या घराचं रंगरोगण पुरं झालेलं नाहीं. जमीन देखील अजून ओलसर आहे. नव्या भिंती अजून कच्च्या आहेत. तिथं राहिल्यानं कदाचित अचलेची प्रकृति बिघडेल, किंवा कदाचित् तिला—"

त्यानें सांगितलेली अडचणींची यादी अचलेनं पुरी होऊं दिली नाहीं. उगीच्च थोडेसें हंसून ती म्हणाली, " असेना का ? आठवतं ना, कोल्हीं कुत्रीं सुद्धां ज्या ठिकाणीं जायला भीत होतीं त्या जागीं त्या दिवशीं आपण त्या भयंकर प्रसंगीं पडून होतों. त्या दिवशीं कुठंतरी अनोळखी जागीं झाडापेडाखालीं कुणीतरी ओढून आणून टाकलं तरी कांहीं झालं नाहीं, मग आतां ओल्या जमिनीची आणि कच्च्या भिंतीची भीति बाळगून माझ्यासाठीं एव्हढं घाबरून जायला नको कांहीं. त्या दिवशीं ज्यांना मरण आलं नाहीं तीं आज आतां अगदीं ठणठणीत जगून राहातील. "

रामबाबूंकडे वळून ती म्हणाली, " तुम्ही मुळींच काळजी करूं नका काका, उद्यां सकाळीं सहज जातां येईल आम्हांला. तुमच्या उपकाराची फेड जन्मजन्मांतरीं सुद्धां व्हायची नाहीं ! उद्यांच आम्हांला जायची परवानगी द्या काका. "

बोलतांबोलतां तिला रडें कोसळलें. धांवतपळत ती आपल्या खोलींत गेली. तिनें दार बंद करून घेतलें.

म्हातारे रामबाबू धक्का बसल्याप्रमाणें सुन्न होऊन बसून राहिले होते. केविलवाण्या नजरेनें त्यांनीं सुरेशकडे पाहिलें. तो मान खालीं घालून बसला होता. पुन्हां एकदां बंद केलेल्या दाराकडे त्यांची नजर गेली. त्यांच्या मनांत प्रश्नांचें काहूर उठलें होतें. काय झालें हें ? हें काय झालें ? असें कां झालें हें ?

या मर्मभेदक रागरुसव्याच्या कारणाचा उलगडा त्यांच्या अंतर्यामी परमेश्वराखेरीज दुसऱ्या कुणाला करतां आला असता ?

## १४

दुसऱ्या दिवशीं पहांटेपासून आकाश ढगाळलेलें होतें. त्या कोंदट आकाशाच्या खालीं सारें जग केविलवाणें झाल्यासारखें दिसत होतें. सजवलेली गाडी दारांत उभी होती. कांहीं ट्रंका, बिछाने वगैरे सामान गाडींत नेऊन ठेवलें होतें. पंचांगांतल्या मुहूर्ताप्रमाणें अचला घरांतून बाहेर पडली. गाडींत बसण्यापूर्वीं

तिनें रामबाबूंची पायधूळ घेतली त्यावेळीं बळेंबळेंच चेहऱ्यावर हंसूं आणून ते म्हणाले, "पोरी, म्हाताऱ्या माणसाची आई होणं फार कठीण असतं बरं. पायधूळ घेऊन जायला निघालीस अन् दूर मैलभर जाऊन राहण्यासाठीं इथून पळालीस तरी तुझी सुटका होईल असं समजूं नकोस."

अचलेचे दोन्ही डोळे भरून आले होते. ती म्हणाली, "तसं मला तरी कुठं वाटतंय काका?"

तिचे हे करूण उद्गार ऐकून म्हाताऱ्याचे डोळेही पाण्यानें भरून आले. त्यावेळीं त्याला वाटलें, ही अपरिचित मुलगी पुन्हा एकदां परिचयाच्या सीमेपलीकडे दूर जाते आहे. गहिंवरल्या आवाजानें ते म्हणाले, "तें काय मला कळत नाहीं का पोरी? नाहींतर नवऱ्याच्या घरीं संसार थाटायला जायला निघायच्या वेळीं कां तुझ्या डोळ्याला पाणी आलं असतं? तरीपण तुला कांहीं अडवून ठेवतां आलं नाहीं मला—" असें म्हणून त्यानीं मनगटांनीं आपल्या डोळ्यांतले आसूं पुसले आणि ते हंसून म्हणाले, "जवळ होतीस तेव्हां रात्रंदिवस तुला त्रास देत होतों, आतां तसा त्रास देतां यायचा नाहीं खरा, पण या उणीवेची व्याजमुदलासकट मी फेड केल्याशिवाय रहायचा नाहीं, हें देखील तूं पाहशील."

सुरेश तिच्या मागेंच होता. आज खऱ्या भक्तिभावानें पहिल्यानेंच त्यानें म्हाताऱ्याची पायधूळ घेऊन प्रणाम केला. म्हातारा हळूच म्हणाला, "आमच्या या घरीं तुम्ही सुखासमाधानानं राहिलां नव्हतां हें मी जाणतों सुरेशबाबू. आतां स्वतःच्या घरीं जातांहां, तेव्हां ही उणीव भरून निघो एवढाच मनापासूनचा आशीर्वाद."

सुरेश यावर कांहीं बोलला नाहीं. पुन्हां एकदां खाली वांकून नमस्कार करून तो गाडींत जाऊन बसला.

रामबाबूंनीं पुन्हां एकदां आशीर्वाद दिला आणि मोठ्यानें हटकून सांगितलें, "मीही एक एक्का आणायला सांगितलाय. बहुधा काळोख पडायच्या सुमाराला मीही तिथं हजर होईन. त्यावेळीं मात्र माझ्यावर रागवायचं नाहीं हो."

थट्टा करायचा आव आणतांना म्हाताऱ्याच्या तोंडून एक मोठा सुस्कारा बाहेर पडला. नंतर ते कांहीं बोलले नाहींत.

गाडी निघून गेल्यावर ते आपल्याशींच विचार करीत होते. त्यांना वाटलें, वेळींच ही मंडळी निघून गेली तें बरें झालें. घरांत पुरेशी जागा नसल्यामुळें अडचण झाली असती. एव्हढेंच नव्हे, तर त्यांना आपल्या विधवा बहिणीचा

स्वभावही चांगलाच माहीत होता. कुणाच्याही नाडीवर हात ठेवून निदान करायची त्यांना संवय होती. ती त्यांची बहीण आली म्हणजे सुरमेला सारखी छेडल्याशिवाय राहिली नसती. त्याचा परिणाम कांहीं होवो, पण त्यापासून कुणालाच आल्हाद वाटला नसता. या मुलीबद्दल त्यांना तशी कांहीच माहिती नव्हती, पण ती एक सच्ची कुलीन मुलगी होती असें त्यांना वाटत होतें. कशीतरी वेळ मारून नेण्यासाठीं ती केव्हांही खोटें बोलत नव्हती. आपला बाप ब्राह्म आहे, आपण शिवाशीव मानीत नाहीं, देवदेवतार्चन मानीत नाहीं वगैरे गोष्टी तिनें मोकळेपणानें सांगून टाकल्या होत्या. यापुढें या गोष्टी कळल्या तर घरांत केव्हढा अनर्थ माजेल याची कल्पना करतांना त्यांच्या हृदयाला थरकांप सुटत होता.

ही झाली त्यांच्या स्वतःच्या सोय गैरसोयीची गोष्ट. आणखीही अशी एक बाब होती ती ते स्वतःच्या मनाशींसुद्धां स्पष्टपणें उकलूं शकत नव्हते. त्यांना मुलगी नव्हती -तरीपण त्यांचें पहिलें अपत्य एक मुलगीच होती. आज ती जिवंत असती तर ती अचलेची आई शोभली असती म्हणजे तिच्या वयांत किंवा चेहऱ्यांत तिच्याशीं काहीं साम्य होतें असें मुळींच नाहीं—पण ही मुलगी असायची भूक केव्हढी विलक्षण होती याचा खरा प्रत्यय, ती अपरिचित मुलगी डॉक्टर वैद्याला शोधीत रस्तोरस्तीं फिरत असतांना त्यानीं जेव्हां पाहिली, तेव्हांच आला. पुष्कळ दिवस हरवलेलें अपत्य अचानक सांपडलें असें त्या दिवशीं त्यांना वाटलें होतें. त्या दिवसापासून पहिल्या क्षणाला उत्पन्न झालेली ती ममता दिवसें-दिवस सारखी वाढत जात असल्याचेंही त्यांना जाणवत होतें. तरीपण या मुलीच्या सभोंवती कसल्यातरी अज्ञात रहस्याचा पडदा गुंडाळला गेला आहे आणि हें रहस्य आपल्याला अगोचर आहे—असेना कां—जें नजरेआड आहे तें नजरेआडच राहूं दे, मुद्दाम तो पडदा दूर करायचा प्रयत्न करण्यांत कांहीं अर्थ नाहीं, असेंही त्यांना वाटत होतें.

या प्रकरणीं कांहींतरी कौटुंबिक विवाद असावा असें राक्षसीनें एकदां सुचवलें होतें. कदाचित भांडण करून सुरेशबाबू बायकोला घेऊन घर टाकून निघाले असावे. अचलेनें एके दिवशीं आपण ब्राह्ममहिला असल्याचें अचानक सांगितलें. सुरेशबाबूच्या गळ्यांत जानवें असल्याचें पूर्वींपासूनच पाहिलेलें असल्यामुळें म्हातारा त्या दिवशीं चमकला होता. त्याला धक्काही बसला होता. पण त्यावेळीं त्यानें या रहस्याबद्दल आपल्या परीनें एक अंदाज बांधला होता. ब्राह्म कुटुंबांतील मुलीशीं सुरेशनें लग्न केल्यामुळेंच ही आपत्ति निस्संशय ओढवली

असावी असें त्या दिवशीं त्यांना निश्चितपणें वाटलें होतें आणि हळूहळू तोच विश्वास त्यांच्या अंतःकरणांत दृढमूल होऊन गेला होता.

हा म्हातारा माणूस खराखरा हिंदू होता. हिंदूधर्मांतली निष्ठा त्यांनीं ग्रहण केली होती—निष्ठुरता घेतली नव्हती. सुरेश हा ब्राह्मणाचा मुलगा, त्यानें असें कांहीं केलें नसतें तर त्यांना बरें वाटलें असतें – पण हा होता प्रेमविवाह !—ही नात्यागोत्याच्या माणसांपासूनची ताटातूट, हा चोरटा व्यवहार, त्या प्रकारांतलें सौंदर्य आणि माधुर्य अंदाजतांना त्यांच्या मनाला गुदगुल्या होत होत्या. तें सारें कांहीं त्यांना पटत नव्हतें खरें; पण त्यांचें सारें अंतःकरण या प्रकारामागच्या रसिकतेच्या प्रवाहांत बुडी मारून बसलें होतें.

म्हणूनच या बंडखोर प्रणयी युगुलाचा प्रणयाचा खेळ आणि रागरुसवा पाहून मधूनमधून त्यांचें मन दुश्चित होत असे. परक्याच्या घरीं अत्यंत संकोचाच्या परिस्थितींत आणि कोंडलेल्या वातावरणांत जें हें मीलन नुसत्या ठोकरा खात होतें, तेंच स्वतःच्या घरीं स्वतंत्र आणि प्रशस्त अशा वातावरणांत संसारांतल्या असंख्य कार्यांच्या आणि अकार्यांच्या प्रसंगांत शांतीचा आणि सलोख्याचा लाभ मिळवायला समर्थ झालें असतें, असेंही त्यांना वाटत होतें.

त्यांची स्नानाची वेळ झाली होती. खांद्यावर पंचा टाकून नदीकडे जातांना चालतांचालतां आपल्याशींच हंसत ते म्हणत होते, ‘ पोरी, जातांना या म्हाताऱ्यावर दोष ठेवून रागानं गेलीस. आपल्या नात्यागोत्याच्या लोकांच्या सोयीसाठीं काकानं आपल्याला घरीं थारा दिला नाहीं असंही तुला वाटलं असेल. पण चारदोन दिवसांनीं जेव्हां येईन आणि गालभर हंसू फुटतांना सारा चेहरा फुलून गेलेला पाहीन, त्याचवेळीं या गोष्टीचं उट्टं फेडीन अन् मग त्यावेळीं म्हणेन, या म्हाताऱ्याचं म्हणणं खरं झालं कीं नाहीं पोरी ? आतां तो तेव्हांचा राग कितीसा शिल्लक राहिलाय तें खरंखरं सांग पाहूं ! मग ती बेटी काय उत्तरं देते तें पाहीन ! ’

प्रशांत आणि निर्मल हास्यानें त्यांचा चेहरा उजळून उठला होता. त्यावेळचें चित्र डोळ्यांसमोर स्पष्ट दिसत होतें -कसलेंतरी कामाचें निमित्त करून सुरमा गालांतल्या गालांत हंसत निघून गेली होती—पण लगेच थाळीभर संदेश हातीं घेऊन मुद्रा अतिशय गंभीर करून म्हणाली होती, ‘ माझ्या स्वतःच्या हातानं तयार केलेली ही मिठाई जर नाहीं खाल्लीत काका, तर खरो-खरच तुमचं माझं भांडण होईल ! ”

स्नान उरकल्यावर पाण्यांत उभें राहून गंगास्तोत्र म्हणत असतांनासुद्धां असेंच कांहींतरी त्यांच्या मनांत येत होतें. तें तिचें हंसणें म्हणजे भाजीखालीं मासे झांकून ठेवण्यासारखेंच होतें, अशी कल्पना मनांत येऊन म्हातारा आपल्याशींच हंसत होता. गेल्या रात्रींच्या प्रकारामुळें उत्पन्न झालेला जो क्षोभ सारखा वाढत होता, तो सायंसंध्या करून परत घरीं जाईपर्यंत या काल्पनिक मायाममतेच्या गोडव्यामुळें पार विरघळून गेला होता.

उद्यां सकाळींच सारी मंडळी येऊन पोंचतील अशी तार आली होती. बरोबर राजकुमार आणि राजवधू येणार होती. अर्थात् त्यांच्याबरोबर बरीचशी मंडळी असण्याचा संभव होता. त्यांची सरबराई करण्यासाठीं तयारी करण्याचें काम कांहीं कमी नव्हतें. विशेषतः त्या दिवशीं आभाळांतलें लक्षण ठीक दिसत नव्हतें. पाऊस सुरू होईल आणि जायची अडचण होईल या भीतीनें रामबाबूंनीं काळोख पडायच्यापूर्वीं भाड्याचा एक्का बोलावून आणला आणि गाडीवाल्याला बक्षिसाची लालूच दाखवून शक्य तितक्या जोरानें गाडी हांकायला लावली.

पण वाटेंतच पावसानें गांठलें, आणि ते त्या घरीं जाऊन पोंचले त्यावेळीं जोराचा पाऊस सुरू झाला होता.

अचला बाहेर येऊन म्हणाली, “या वादळ वावटळींतून आज कशाला आलांत काका ? आणखी थोडा वेळ गेला असता तर भिजून चिंब झालां असतां.”

अपेक्षित आनंदाचें कोणतेंही लक्षण तिच्याठायीं न दिसल्यामुळें म्हाताऱ्याचा विरस झाला. असें कांहीं होईल असें त्याला वाटलें नव्हतें. कल्पनेची गुंफलेली फुलांची माळ एकदम तुटून पडली होती. तरी पण मुद्रेवरचा उत्साह तसाच कायम राखून ते म्हणाले, “अग जा ग, तसं झालं असतं तर मग कठीणच होतं ! पावसानं भिजलों तर तें निस्तारतां येईल, पण वारसाहक्क तोडून टाकला तर पुढं काय व्हायचं पोरी ?”

या दुर्बोध मुलीच्या स्वभावाचा अंत म्हाताऱ्याला केव्हांच लागत नव्हता. विशेषतः गेल्या रात्रींच्या वर्तनानें तो आश्चर्यानें हतबुद्ध होऊन गेला होता. पण आजची तिची वागणूक पाहून तर त्याला कांहींच समजेनासें झालें होतें. केव्हांही आणि कोणत्याही कारणानें ती असें कांहीं करील असें त्याला स्वप्नांतसुद्धां वाटलें नसतें. एवढीशी गोष्ट ती काय, आणि तिच्यासाठीं ही मुलगी पागल होऊन धांवत येऊन त्याच्या हृदयावर मान टाकून हो हो करून रडूं लागली. ती म्हणाली, “माझ्यावर तुमची एवढी कां ही माया काका ? लाजेनं मी मेल्याहून मेली होऊन गेलेंय !”

बराचवेळपर्यंत म्हाताऱ्याच्या तोंडून शब्द बाहेर आला नाहीं. एका हातानें तिला हृदयाशीं कवटाळून धरून तो आपला दुसरा हात तिच्या माथ्यावर फिरवीत होता. सामाजिक बंधनांना झुगारून केलेल्या लग्नाची कथा, नात्यागोत्याच्या माणसांबरोबर, कदाचित् आईबापांबरोबरही वितुष्ट आल्याची कथा, भांडून घर सोडल्याची कथा, या साऱ्या जुन्या गोष्टी त्या म्हाताऱ्याच्या स्नेहाळ अंतःकरणाला जाणवल्या; पण याखेरीज़ दुसरें कांहींतरी कारण उकरून काढण्याची कल्पनासुद्धां त्याच्या मनांत आली नाहीं.

तो मुकाट झालेला म्हातारा आणि ती रडत असलेली तरुणी—कितीतरी वेळ दोघेंही तशींच उभीं राहिलीं होतीं. तो हळूहळू बोलूं लागला, " यांत लाज कसली ग पोरी ? तूं माझी मुलगी, तूंच माझी सती लक्ष्मीसारखी पोर; केव्हांतरी पूर्वीच्या काळांत दोन दिवसांपुरती माझ्यापाशीं आली अन् लगेच निघून गेली—मायेचा पाश तोडणं कठीण गेल्यामुळं पुन्हां आली बापाच्या कुशीला–तुला पाहिल्याबरोबरच मी ओळखलं होतं सुरमा !—" असें म्हणून तो शेजारच्या एका खुर्चीवर बसला. पुन्हां पुन्हां तो तिला तेंच समजावून सांगत होता, यांत लाजशरम बाळगायचं कांहीं कारण नाहीं. अनादिकालापासून हें असंच चालत आलं आहे. प्रत्यक्ष सति—एवढी मोठी आदिशक्ति—तिनंसुद्धां नवऱ्याचं घर गांठण्यासाठीं आईबाप नात्या-गोत्याचे सर्व लोक यांच्याबरोबर झगडा करून ती निघून गेली होती ! सारं कांहीं पुन्हां ठाकठीक होईल, सारे पुन्हां बदलतील, आज ज्यांनीं तोंड फिरवलंय, ते पुन्हां समोर येऊन बघतील — पुन्हां मुलगा अन् सुनेला प्रेमानं जवळ करतील. म्हातारा म्हणाला, " असं पहा मुली, माझा आशीर्वाद केव्हांही फुकट जायचा नाहीं. "

तो म्हातारा मनाच्या आवेगानें सारखा असेंच कांहींतरी बोलत राहिला होता. त्याच्या बोलण्याचा इत्यर्थ कांहींही असो, पण तें ऐकत असतांना ऐकणारी मात्र अगदीं जमीनदोस्त होत येत होती.

जोराचा पाऊस सुरू झाला होता. इतक्यांत नखशिखान्त भिजलेला आणि चिखलानें माखलेला सुरेश तणतणत आंत आला. तो आलेला पाहातांच अचलेनें घाईघाईनें आपले डोळे पुसून घेतले. ती तिथून उठली आणि पावसाचें गळत असलेलें पाणी हातीं घेऊन तिनें तोंड पुसून घेतलें. रामबाबूंना वाटलें, कीं कोणत्याही कारणानें का असेना, आपल्या डोळ्यांतलीं आसवें नवऱ्याच्या दृष्टीला येऊं नयेत म्हणून ती खबरदारी घेत असावी.

सुरेश वर आला आणि तिथें रामबाबू असल्याचें पाहून आश्चर्यचकित झाला. तो कांहींतरी बोलणार होता, पण म्हातारा त्याला म्हणाला, "काय बोलायचं तें मग बोला. मी कांहीं कुठं पळून जात नाहीं. आधीं तुम्ही कपडे बदलून या."

सुरेश हंसला आणि म्हणाला, "असं काय होतंय यानं ?–" असें म्हणून तो खुर्ची ओढून घेऊन बसत होता तोंच अचलेनें त्याच्याकडे पाहून म्हटलें, "काकांनीं सांगितलं तें ऐकायचं नाहीं वाटतं ? जिवावरच्या दुखण्यांतून उठलां, त्याला अजून महिनाही झाला नाहीं — पुन्हां पुन्हां मला असं किती सतावणार आहां ?"

तिच्या त्या बोलण्यांत आणि पाहाण्यांत अशी कांहीं खोंच होती, कीं तें पाहून ते दोघेही चकित झाले. पण या आश्चर्याचा ओघ वाहिला तो अगदीं उलट्या दिशेनें. कांहींसुद्धां न बोलतां सुरेश मुकाट्यानें सांगितलेलें ऐकण्यासाठीं निघून गेला आणि रामबाबू बाहेर पाहात उगीच बसून राहिले.

बाहेर कोसळणाऱ्या धो धो पावसाला खंड पडत नव्हता. रात्र जसजशी वाढत होती, तसतसा पावसाचा जोरही तितकाच वाढत होता. बऱ्याच दिवसांच्या अवर्षणामुळें जमीन कोरडी ठणठणीत झाली होती. तिच्या साऱ्या मागण्या पुऱ्या करण्यासाठींच जणूं काय विधाता कंबर कसून कामाला लागला होता.

रामबाबूंना झालेला उद्वेग लक्षांत आल्यामुळें अचला हळूच म्हणाली, "परत जायला तुम्हांला उगीच कष्ट पडतील काका. आज रात्रीं नाहीं गेलांत तिकडे, तर नाहीं का चालायचं ?"

ते हंसले. मनाची खळबळ आवरून घेऊन ते म्हणाले, "कष्ट होतील म्हणून नव्हे, पण या असल्या वादळवावटळींत या नवीन जागीं तुम्हांला एकटंच टाकून मी गेलों नसतों ! पण ते लोक येणार आहेत उद्यां सकाळींच, म्हणून रात्रींच जाऊन पोंचल्याशिवाय भागायचं नाहीं सुरमा. मला वाटतं, ही वावटळ आतां तासभऱ्यांत थांबेल, ती थांबायचीच वाट पाहातोंय मी—"

बोलतां बोलतां उद्यां येणाऱ्या माणसांच्या गोष्टी निघाल्या. त्यांतूनच समाज, धर्माधर्म, पापपुण्य आणि जगाची रहाटी यांच्याबद्दलचीही चर्चा सुरू झाली. त्या चर्चेंत तीं दोघेंही इतकीं रंगून गेलीं होती, कीं वेळ किती गेला, रात्र किती झाली, तें कुणाच्याही ध्यानीं आलें नाहीं. बाहेर मेघांचा गडगडाट आणि पावसाचा वर्षाव किती जोरांत आला होता, बाहेरचा काळोख किती दुर्भेद्य झाला होता, या गोष्टींकडे त्यांचें मुळींच लक्ष गेलें नव्हतें. आपल्याला जें कांहीं

ज्ञान झालें आहे, जो कांहीं अनुभव मिळाला आहे, जी भक्ति संचित झाली आहे, तिचा पुरा पुरा वांटा आपल्या प्रेमाला पात्र झालेल्या त्या मुलीच्या पदरांत टाकण्यावरच म्हाताऱ्याचें सारें लक्ष केंद्रित झालें होतें. वक्ता आणि श्रोता दोघेंही तन्मय होऊन गेलीं होतीं. एका निष्पाप हृदयांतील स्नेह, प्रीति आणि श्रद्धा यांचा सर्व सांठा आपल्या पदरांत पडत आहे, एवढीच जाणीव त्यावेळीं अचलेच्या ठायीं राहिली होती.

मागून कुणाचें तरी पाऊल वाजल्याचें ऐकून दोघांनींही मागें वळून पाहिलें, तों नोकर तिथें उभा होता. तो म्हणाला, " रात्र फार झालीय—बारा वाजायला झालेयत. तुम्हांला फराळाला काय देऊं ? "

अचला दचकली आणि म्हणाली, " बारा वाजायला झाले ? अन् बाबू ? "

" आत्तांच ते फराळ करून झोंपायला गेले. " नोकर म्हणाला.

सुरेश जो कपडे बदलायला गेला तो पुन्हा परत आला नाहीं, हें आतां कुठें त्यांच्या ध्यानीं आलें. अचलेनें डोकावून पाहिलें, झोंपायच्या खोलींत पडद्याच्या फटींतून दिव्याचा प्रकाश दिसत होता.

रामबाबू ओशाळून म्हणाले, " अगदीं भूल झाली माझी पोरी, अगदीं भूल झाली. मी तुला इथं बोलत ठेवलं अन् तिकडे त्याचं खाणं पीणं झालं कीं नाहीं तें तुला स्वतःला कांहीं पाह्यला मिळालं नाहीं ! आतां तूं जा पाहूं, स्वतः थोडं खाऊन घे "

अचलेनें त्यांचें तें बोलणें मुळीं कानींच घेतलें नाहीं. ती नोकराला म्हणाली, " वेळींच गाडी जोडून कोचमन आला नाहीं का ? "

" नोकर म्हणाला, " घोडा आहे नवा. या वाऱ्यावावटळींत गाडी बाहेर काढण्याची त्याला छाती झाली नाहीं ? "

" तर मग दुसरी कुठली तरी गाडी कां आणली नाहीं ? "

यावर तो नोकर कांही बोलला नाही. म्हणजे त्यानें आपली चूक कबूल केली होती असें नव्हे, उलट आपल्याला तसा हुकूम झाला नव्हता अशीच त्याची तक्रार असावी.

रामबाबू अधिकच ओशाळून म्हणाले, " गाडीची कांहीं जरूरी नाहीं. आतां नाहीं गेलं तरी हरकत नाहीं. भल्या पहाटे उठून स्टेशनवर हजर राहिलों म्हणजे झालं. मी रात्रीं कांहीं खात नाहीं—तेव्हां तोही झंझाट नाहीं. दोन घांस खाऊन घेऊन तूं झोंपायला जा पाहूं पोरी. बोलतां बोलतां बरीच रात्र झाली.

भारी मोठी चूक झाली माझी ! ” असें म्हणून त्यांनीं बळेंबळेंच तिला तिथून लोटून घातलें.

सुमारें पंधरा मिनिटांनीं ती परत आली त्यावेळीं ते अतिशय अस्वस्थ होऊन म्हणाले, “ आतां एक मिनिटसुद्धां विलंब लावूं नकोस पोरी. झोंपायला जा पाहूं. मी इथं या बैठकखान्यांतल्या कोचावर आडवा होतों. मोठ्या आरामांत झोंप येईल मला. मुलींच त्रास व्हायचा नाहीं मला—अन् अडचणही व्हायची नाहीं ! पण आधीं तूं झोंपायला जा. ”

म्हाताऱ्याची ती जिवाभावाची कळकळ पाहून अचला अगदीं सुन्न होऊन गेली. तो म्हातारा तिला मान देत होता, लोभानें आणि श्रद्धेनें वागवीत होता, पण ती मात्र त्या स्नेहाळ वडील माणसाशीं सारखी प्रतारणा करीत होती—ही जाणीव होऊन तिचे गळा दाटून आला होता. तिचा पाय तिला नकळत सुरेशच्या शेजघराकडे ओढून नेत होते.

तिची जुनी आठवण जागी झाली. अशाच एका वारावावटळीच्या दिवशीं तिची आणि तिच्या पतीची ताटातूट झाली होती. आज तशाच एका दुर्दिनाच्या वेळीं सीमाहीन अंधकारांत कायमचें बुडून जाण्याचा प्रसंग तिच्यावर आला होता. अशा कोणत्या न टळणाऱ्या अभिशापाचा परिणाम होता हा ? आज उद्यां असह्य अपमान होईल, शरमेच्या खोल खड्डयांत आकंठ बुडून जावें लागेल – तो प्रसंग तिच्या नजरेसमोर उघड उघड दिसत होता—तरीपण हा खोट्याचा बुरखा झुगारून देऊन खरेंखरें सांगून टाकण्याचा धीर तिला आज तरी झाला नाहीं. या आणीबाणीच्या वेळीं मोहानें आणि अभिमानानें तिच्यावर मात केली. तिनें नकार दिला नाहीं, ती कांहीं बोलली नाहीं, कीं तिनें एकदां मागें वळूनसुद्धां पाहिलें नाहीं—ती मुकाट्यानें सुरेशच्या शेजघरांत जाऊन हजर झाली.

बाहेर निसर्गदेवता खवळली होती. मिट्ट काळोखांत आकाशींची बिजली चकचकत हंसत होती. निसर्गाच्या त्या दंगलीला उभ्या रात्रींत खंड पडला नाहीं.

नव्या जागीं रामबाबूंना निश्चिन्त झोंप येत नसे. विशेषतः लौकर उठून जायच्या काळजीमुळें त्यांना नीट झोंप लागली नाहीं. ते पहांटेपूर्वींच जागे झाले. त्यांनीं बाहेर येऊन पाहिलें. पाऊस थांबला होता, पण वादळाचा जोर कमी झाला नव्हता. कुणी नोकर उठले आहेत कीं नाहींत तें पाहाण्यासाठीं ते व्हरांड्याच्या एका बाजूला आले आणि दचकून थांबले. खुर्चीवर बसलेली कुणी-तरी व्यक्ति टेबलावर डोकें टेकून राहिली होती. त्यांनीं जवळ येऊन पाहिलें.

त्यांना आश्चर्य वाटलें. ते म्हणाले, " तूं का ती सुरमा ? एवढ्या लौकर कां उठलीस ग पोरी ? "

सुरमेनें एकदां त्यांच्याकडे पाहिलें आणि पुन्हां टेबलावर तसेंच डोकें टेकलें. तिचा चेहेरा प्रेतवत पांढराफटक झाला होता. दोन्हीं डोळ्यांच्या सभोंवार काजळी आली होती. काळ्या पथ्थरांतून पाण्याचा झरा वहावा त्याप्रमाणें तिच्या दोन्हीं डोळ्यांतून सारखीं आसवें पाझरत होतीं.

त्या अर्धमेल्या झालेल्या तरुणीकडे म्हातारा सुन्न होऊन एक शब्दसुद्धां न बोलतां पाहात राहिला होता. त्याच्या तोंडावाटे एक शब्दही बाहेर पडणें अशक्य झालें होतें.

## १५

सकाळींच उठून थोडेसे गरम पोहे आणि चहा घेऊन केदारबाबूंनीं तृप्तीची ढेकर दिली. उष्टीं भांडीं घेऊन जाण्यासाठीं मृणाल आंत आली त्यावेळीं ते म्हणाले, " पोरी, तुझे हे गरम पोहे आणि दगडी वाटींतला चहा यांच्यांत कसलं अमृत सांठवलं आहे कोण जाणे, पण त्यामुळं माझा पाय इथून हालेनासा झाला आहे. "

अचलेचें नातें जोडून मृणालनें त्यांना ' बाबा ' म्हणायला सुरवात केली होती. ती म्हणाली, " अशी इथून जायची कसली घाई आली आहे बाबा ? तुमची ती– मला काय तुमची सेवा कशी करावी तें कळत नाहीं ? "

' तुमची ती मुलगी—' असा उल्लेख करून मृणाल बेसावधपणें बोलणार होती. पण लगेच जीभ चावून तिनें वेगळ्याच प्रकारें उद्गार काढला, त्यामुळें तिचा उद्देश केदारबाबूंच्या ध्यानीं गेला नसावा असें वाटलें.

तरी पण त्यांचा गळा दाटून आला. ते म्हणाले, " जायची घाई कुठं करतोंय पोरी ! तुझ्या हातचा चहा, तुझ्या हातचं जेवण आणि तुझं हें छोटसं मातीचं घर सोडून मी स्वर्गांतसुद्धां जायचा नाहीं. या छोट्याशा खिडकीशीं बसून मी रोज आपल्याशीं म्हणत असतों मृणाल, कीं आणखी दोन वर्षं देवदयेनं जगलों वाचलों, तर सारं आयुष्य कलकत्त्यांत घालवून जें फुकट गेलंय त्याची भरपाई इथं राहून करून घेईन, अन् याच मुद्दलाच्या जोरावर देवाच्यासमोर उभा राहून हिशेब देईन. "

या त्यांच्या भाषणांत अंःतकरणाची मोठी वेदना होती. जन्मभर कलकत्त्या-

सारख्या शहरांत दिवस काढून तिथल्या प्रतिष्ठित समाजाला टाकून या जंगलांतल्या पर्णकुटींत आयुष्याचे शेवटचे दिवस काढावे असें त्यांना वाटत असल्याचें मृणालच्या ध्यानीं आलें. म्हणूनच कांहींच उत्तर न देतां चहाची रिकामी वाटी हातांत घेऊन ती निघून गेली.

एक महिन्यापूर्वी केदारबाबू जे मृणालकडे आले ते अजून परत गेले नव्हते. महिम आजारी असतांना सुरेशच्या कलकत्त्याच्या घरीं या विधवा मुलीशीं त्यांचा पहिला परिचय झाला होता खरा; पण आतां प्रत्यक्ष तिच्या घरीं आल्यावर तिची जी ओळख पटली, त्यामुळें तिच्या लोभाच्या सोनेरी सांखळींत ते सर्वस्वीं गुंतून पडले. या गोड बंधनांतून स्वतःची सुटका करून घेणें त्यांना अशक्य झालें. त्यांचीं शहरांतलीं कामें त्यामुळें पडून राहिलीं होतीं.

महिमची आणि त्यांची भेट झाली नव्हती. ते येणार असें कळल्यामुळें महिम घाईघाईनें निघून गेला होता. लहानपणापासून महिमदादाच्या संयम आणि सहिष्णुतेवर, त्याचप्रमाणें त्याच्या विवेचक बुद्धीवर मृणालचा विश्वास असल्यामुळें तिनें त्याला रहायचा आग्रह केला नव्हता. अचलेशीं अचानक भेट होऊं नये म्हणूनच महिमनें असा पळ काढला होता. तिचें पत्र मिळाल्यानंतर केदारबाबू मुलगी आणि जांवई यांचें समेट करण्यासाठीं तिला बरोबर घेऊन येत असावे असा मृणालप्रमाणें महिमचाही समज झाला होता आणि म्हणूनच तो निघून गेला. पण केदारबाबू आले ते एकटेच.

अजूनपर्यंत कोणत्याच गोष्टीचा उलगडा झाला नव्हता. संशयाच्या बोजाखालीं चिरडून जात कसेबसे दिवस कंठिले जात होते. आकाशांत येणाऱ्या दुर्भेद्य मेघांचे थर कदाचित् एकाद्या दिवशीं दूर होतील, पण मागल्या बाजूनें जो अंधःकार जमाट होत होता, तिथें चांदणें पडायची आशा नव्हती.

नापत्ता झालेल्या भाच्यासाठीं सुरेशची आत्या तळमळत होती. तिनें मृणालला लिहिलेलें पत्र केदारबाबूंच्या हातीं पडलें. कुठल्यातरी एका बड्या जमीदाराच्या घरीं महिमला गृहशिक्षकाची नोकरी लागल्याबद्दल जें पत्र आलें होतें तेंही त्यांनीं वाचलें होतें: या कुठल्याही पत्रांत त्यांच्या मुलीच्या नांवाचा उल्लेख नव्हता. या अनुल्लेखामुळें ते फार अस्वस्थ झाले होते.

अचला त्यांची एकुलती एक मुलगी—एवढेंच नव्हे, तर लहानपणीं तिची आई स्वर्गवासी झाल्यापासून आईची जागा पत्करून त्यांनीं तिला उराशीं कवटाळून धरलें होतें. त्या मुलीचें कांहींतरी भयंकर स्वरूपाचें अमंगल झालें

असावें या शंकेनें दिवसेंदिवस ते थकत चालले होते आणि ज्या मार्गानें हें अमंगल झालें अशी शंका होती, तो मार्ग या बापाच्या दृष्टीनें पूर्णपणें बंद होऊन पडला होता.

गांवचे चारदोन म्हातारे शेजारी त्यांच्याशीं गप्पागोष्टी करण्यासाठीं मधून मधून येत असत, पण त्या कुणाच्या घरीं जायला त्यांना संकोच वाटत असे. मृणालनें आग्रह केला तर ते म्हणत, "कशाला कुणाकडे जायचं पोरी ? माझ्यासारख्या म्लेंच्छानं कुणाच्या घरीं न जावं हेंच बरं. '

"मग त्यांनीं तरी इथं कां यावं ?" असें मृणाल म्हणे तेव्हां तिला कांहीं उत्तर न देतां हातांत छत्री घेऊन म्हातारा सरळ घराबाहेर पडे. कुठल्यातरी शेतावर जाऊन तिथल्या शेतकऱ्यांशीं गप्पा मारीत बसे. त्यांच्या सुखदुःखाच्या, घरघरट्याच्या, न्यायअन्याय आणि पाप-पुण्याच्या गोष्टी बोलत असतांना दिवस खूप वर आला म्हणजे ते घरीं परत येत असत. रोज सकाळीं चहा घेतल्यावर हाच त्यांचा नित्यक्रम होता.

जन्मापासून ते कलकत्त्यांतच राहिले होते. शहराच्या बाहेर असलेल्या खेड्यापाड्यांशीं वाडवडिलांपासूनच त्यांचा सारा संबंध तुटला होता. धर्मान्तर केल्यापासून बाहेरच्या नात्यागोत्याच्या माणसांशींही त्यांचा संबंध सुटला होता. बहुसंख्य शहरी लोकांप्रमाणेंच खेडेगांवच्या लोकांबद्दल केदारबाबूंचेही कांहींतरी अवचट समज झालेले असले तर त्यांत नवल नव्हतें. जे बरेचसे अशिक्षित कृषिजीवि लोक दूरदूरच्या खेड्यांतून सारें आयुष्य कंठीत होते, शहरचें तोंड पहायचें भाग्य ज्यांच्या पदरीं क्वचितच पडत होतें; ते एक प्रकारचे पशू आहेत, असाच त्यांचा समज झालेला होता. हे लोक जंगली असतात, असेंच त्यांना वाटलें होतें.

पण आज दुर्दैवाच्या तीक्ष्ण विषारी दातांनीं त्यांच्या मर्मस्थानाचा चावा घेतला, स्वतःच्या समाजापासून त्यामुळें ते दुरावले गेले, तेव्हांपासून या अक्षरशत्रू, अशिक्षित, खेडुत, दरिद्री शेतकऱ्यांशीं त्यांचा परिचय अधिकाधिक घनिष्ट होऊं लागला. त्या परिचयाबरोबरच त्यांचा लोभ जडला आणि त्यांच्याविषयीं त्यांची श्रद्धाही वाढूं लागली. त्याचवेळीं ज्या आपल्या समाजाबद्दल त्यांना अभिमान वाटत होता, त्या समाजाचे आचारविचार, शिक्षण आणि संस्कार, त्यांचे धर्म, त्यांची सभ्यता आणि त्यांची चालचलणूक यांच्याबद्दल त्यांच्या अंतःकरणांत तिटकाऱ्याची भावना उत्पन्न होऊं लागली.

लिहितांवाचतां येत नसलें, तरी ते खेडूत अशिक्षित नव्हते हें त्यांना स्पष्ट दिसून आलें. अनादि कालापासून चालत असलेली पुराणी संस्कृति आजसुद्धां या लोकांच्या हाडामांसांतून खिळून बसली होती. नीतीचीं सामान्य तत्त्वें त्यांना कळत होतीं. कुठल्याही धर्मांबद्दल त्यांच्या मनांत द्वेषबुद्धि नव्हती. जगांतल्या सर्व धर्मांचें मूळ एकच—तेहेतीस कोटी देवदेवता हिशेबांत न घेतांसुद्धां एकाच ईश्वराची भक्ति करतां येते-हेंही ते जाणत होते आणि ही त्यांची जाणीव कोणत्याही प्रकारें एकेश्वरवादी म्हणवणारापेक्षां कमी नव्हती.

काय म्हणून त्यांना आमच्यापेक्षां लहान म्हणायचें, हा प्रश्न मनांत आला म्हणजे त्यांना अत्यंत शरम वाटे. यांच्यापेक्षां आम्हांला जास्त असें काय कळतें आहे? या लोकांचा लोभ न धरतां त्यांचा संबंध सोडून आपण दूर गेलों आहों तें काय म्हणून? आपण इतके दूर गेलों आहों, कीं या सर्वस्वी आपल्याच असलेल्या माणसांच्या लेखीं आपण म्लेंच्छ ठरलों आहों!

अशा प्रकारें विचार करीत केदारबाबू घरीं परत आले त्यावेळीं सुमारें दहा वाजले होते. ते आले असें पाहातांच मृणाल आली आणि म्हणाली, "काल तुमची प्रकृति बरी नव्हती बाबा, आज आंघोळ करायला तळ्यावर जाऊं नका. तुमच्यासाठीं मी गरम पाणी तापवून तयार ठेवलंय."

"एकदम तयार ठेवलंयस ना?" असें म्हणून केदारबाबू तिच्या तोंडाकडे पहातच राहिले.

स्नान उरकल्यावर मृणाल पूजेला बसली होती ती त्यांची हांक ऐकतांच उठून बाहेर आली होती. ती रेशमी मुकटा नेसली होती. ओले केंस तिच्या पाठीवर रुळत होते. तिची मुद्रा मोठी प्रसन्न होती. तिच्या सर्वांगासभोंवार अत्यंत निर्मळ अशा शुचिर्भूतपणाचें जें एक वलय विखुरलें होतें, तें पाहून म्हातारा स्तंभित झाला आणि म्हणाला, "एवढा त्रास कशाला घेतलास पोरी? कांहीं जरूरी नव्हती याची. मी कलकत्त्याचा माणूस—रोज नळाखालीं आंघोळ करायची संवय—पण तूं माझे एवढे कांहीं चोचले चालवले आहेस मृणाल, कीं तुझं थंड पाण्याचं तळंसुद्धां माझी काळजी घेतंय. त्या पाण्यानं माझी प्रकृति कांहीं बिघडायची नाहीं. मी आंघोळीसाठीं तळ्यावरच जाणार आहें पोरी."

मृणाल म्हणाली, "नाहीं बाबा, चालायचं नाहीं. काल तुम्हांला बरं वाटत नव्हतं—मला पक्कं ठाऊक आहे—मी पाणी घेऊन येतें तोंवर तुम्ही तेल माखून घ्या—" असें म्हणून ती जायला निघाली तेव्हां केदारबाबू तिला थांबवून

म्हणाले, "बरं बरं. होऊन जाऊं दे. पण आधीं मला असं सांग, या एवढ्या लहानशा वयांत परक्यांची अशी सेवा करायला कुणापाशीं अन् कुठं शिकलीस तूं? उभ्या आयुष्यांत मी कुठंच असं कांहीं पाहिलं नव्हतं ग पोरी!"

लाजेनें मृणाल गोरीमोरी झाली. बळेंच हंसून ती म्हणाली, "तुम्ही परके आहांत का बाबा?"

केदारबाबू म्हणाले, "नाहीं ग बाई, मी परका नाहीं. मी तुझं लाडकं पोर! पण असं विषयांतर करूं नकोस. आधीं माझ्या प्रश्नाचं उत्तर दे अन् मग तुला मी जाऊं देईन."

मृणाल मागें वळून उभी राहिली आणि तशीच लाजतलाजत हंसतमुखानें म्हणाली, "मुद्दाम प्रयत्न करून शिकायला इतकं कठीण का काम आहे हें? जन्मापासून आम्हांला हें शिक्षण मिळतंय!—पण आतां तुमचं पाणी थंड होत आलंय बाबा—"

होऊं दे!" असें म्हणून केदारबाबू गंभीर होऊन म्हणाले, "याच विषयाचा आज मी कित्येक दिवस विचार करतोंय मृणाल. माणसाला शिकल्या-शिवाय पोहोतां येत नाहीं, पण पशुपक्षी आणि मासे जन्मतःच पोहूं लागतात. हें शिक्षण कुणाच्या नजरेला येत नाहीं खरं, पण कार्याला बगल देऊन त्याचं फळ पदरांत पाडून घेणं शक्य नसतं पोरी! हा तर देवाघरचा नियम आहे. कुठं ना कुठं, कोणत्या ना कोणत्या प्रकारानं शिकण्याचं दुःख त्याला सोसावंच लागतं. पाण्यांतल्या माशाप्रमाणें तूं जन्मापासूनच अनायासें ही विद्या हस्तगत केलीस कशी याचाच मी रात्रंदिवस विचार करीत असतों. मला असं वाटत असतं—"

"पण तुमचं आंघोळीचं पाणी अगदीं—"

"राहूं दे ग तें पाणी. अजून तळं तर आटलं नाहीं? मी असं म्हणत होतों, कीं हें तुझं म्हातारं पोर कुठल्याही छोट्या बाळासारखं आपल्या आईजवळ गुपचुप किती गोष्टी शिकलंय, त्याचा हिशेब करतां यायचा नाहीं. देवदेवता, मंत्रतंत्र असल्या गोष्टींवर आजसुद्धां माझा काडीभरही विश्वास बसत नाहीं, तरी पण स्नान करून रेशमी मुकटा नेसून पूजा करायला निघालेल्या माझ्या या आईला पाहिलं, कीं आपणसुद्धां गळ्यांत जानवं घालून संध्यापूजा करायला बसावं असं मला वाटूं लागतं."

मृणाल म्हणाली, "असं कां म्हणतां बाबा? आपला समाज सोडून तुम्हीं

दुसरे कुठले तरी आचार का पाळणार आहांत? कुणी दोष द्यायचा नाहीं का तुम्हांला त्याबद्दल?"

केदारबाबू म्हणाले, "दोषाची गोष्ट राहूं दे. मी त्याची उठाठेव करीत बसणार नाहीं. बरं असो कीं वाईट असो, एकदां जें पत्करलं तें या वयांत तरी टाकतां येत नाहीं, कीं बदलावंसं वाटत नाहीं. याच मळलेल्या वाटेंतून आयुष्याच्या शेवटापर्यंत जायलाच हवं. पण ज्यावेळीं तुला मी पाहातों—एवढ्याशा वयांत एवढा मोझा आत्मत्याग केलेला मला दिसतो, स्वर्गवासी झालेल्यावरची ती निष्ठा, त्याच्या आईला आई मानून बरं बरं राहूं दे. आतां अधिक बोलत नाहीं!—आजवर ज्या लोकांत वावरून माणसांत येऊन म्हातारा झालों, त्यांच्याशीं एकदां तुलना करून पाहायचा मोह मला आवरत नाहीं ग पोरी. समाजावेगळा जो धर्म, या धर्मावर असलेली आस्था टिकवून धरणं मला कठीण जातंय मृणाल."

मृणाल मनांतल्या मनांत फार खिन्न झाली. त्यांच्या स्वतःच्या शिक्षादीक्षेवर आपल्या व्यक्तिगत जीवनाच्या दुर्भाग्याचा त्यानीं आरोप करावा हें तिला पटलें नाहीं. तो अविचार होतो आहे असें तिला वाटलें. ती म्हणाली, "तुम्हीं अशीच बारकाईनं आमच्या समाजाची पारख करूं लागाल तर तुमच्या दृष्टीला अनेक उणीवा आणि अनेक दोष दिसून येतील. स्वतःच्या दोषांचा बोजा आम्हीं समाजाच्या माथीं लादीत असतों असंही तुम्हांला दिसून येईल. आम्हीं देखील—"

तिला तें वाक्य पुरें न करूं देतां केदारबाबू मधेंच म्हणाले, "मला ती उठाठेव नकोय पोरी. तुमच्या समाजांत दोष असो कीं उणीवा असोत, तूं तर आहेस? डोकं फोडून घ…लं तरी अ…ला …तु कुठंसुद्धां सांपडायची नाहीं."

मृणाल पुन्हां लाजेनं गोरामोरी झाली. ती म्हणाली, "मी तुम्हांला अगदीं बजावून सांगतें, अशा प्रकारें जर तुम्ही मला पुन्हां पुन्हां लाजवाल तर मी अशी पळून जाईन, कीं कांहीं केल्या तुम्हांला सांपडायची नाहीं."

यावर म्हातारा लगेच कांहीं बोलला नाहीं. मुकाट्यानें नुसता तिच्या तोंडाकडे पाहात राहिला. नंतर तो हळूच म्हणाला, "अन् मीही तुला बजावून सांगतों पोरी, कीं मीही तुला असं कांहीं करूं द्यायचा नाहीं. तूं आहेस माझ्या डोळ्यांतली बाहुली! तूं माझी आई तूं माझा एकुलता एक आधार! या अनाथ अन् कर्तृत्वशून्य म्हाताऱ्याचा निरोप घ्यायची वेळ येईल पोरी—अन् त्यालाही

फार दिवस राहिलेले नाहींत—ती वेळ आली तर ती पाहायला माझे डोळे उघडे असणार नाहींत हेंही मी जाणतों —" बोलत असतांना त्यांच्या डोळ्यांच्या कोपऱ्याला चटकन् पाणी आलें. तें अस्तनीनें पुसून घेऊन म्हातारा म्हणाला, " आतां एकच काम शिल्लक राहिलंय—महिमची गांठ घेणं! तो असा कां पळ काढतोय तें त्याला सरळसरळ विचारायचंय मला. कदाचित असंही असेल, तो हयात तरी असेल ना?"

" असं कां म्हणतां बाबा? अशी कां भीति वाटते तुम्हांला?"

" भीति?" म्हाताऱ्याच्या तोंडून एक मोठा सुस्कारा बाहेर पडला. तो म्हणाला " पोराबाळांचं मरण स्वतःच्या नजरेनं पाहाणं हें बापाच्या लेखीं मोठ्यांतलं मोठं दुःख नाहीं का पोरी?"

## १६

एकुलत्या एका मुलीच्या मृत्यूपेक्षांही बापाच्या दृष्टीनें जी दुर्गति मोठी वाटत होती तिचा नुसता आभास दिसून आल्यामुळें मृणाल कुंठित झाली, लाजली आणि मुकाट्यानें निघून गेली. त्या साध्वी, विधवा मुलीच्या मनावर झालेला हा परिणाम केदारबाबूंच्या हृदयावर वज्रासारखा आदळला, कितीतरी वेळ एकटेच मुकाट बसून ते आपली पिकली दाढी हाताळीत होते. थोड्या वेळानें त्यानीं एक मोठा सुस्कारा सोडला आणि तेलाची वाटी घेण्यासाठीं हात पुढें केला.

आज सकाळीं हवा अगदीं कोरडी होती, पण दुपारपासून वर ढग जमा होऊं लागले होते. केदारबाबू बिछान्यांतून उठले आणि पश्चिमेकडची खिडकी उघडून बाहेर पाहूं लागले. समोरच्या पेरूच्या झाडावर मोहोराचा बहर आला होता आणि मधमाशांचा थवा त्याच्यावर सारखा घोंगावत होता. मृणालनें आपल्या हातांनीं धुवूनपुसून साफ केलेली गुबगुबीत गाय पलीकडे लांब दोरीनें बांधली होती आणि ती इकडे तिकडे फिरत असतांना तिच्या पलीकडून खेड्यांतली पायवाट स्पष्ट दिसत होती.

" तुमचा चहा घेऊन येऊं का बाबा?"

केदारबाबूंनीं मागें वळून पाहिलें आणि म्हटलें, " इतक्यांतच घेऊन येणार आहेस होय?"

" वा! अजून चहाची वेळ झाली नाहीं कां?"

ते थोडेसे हंसले आणि उशीखालचें घड्याळ पाहून घेऊन म्हणाले, " अजून तीन वाजले नाहींत ग पोरी. "

मृणाल म्हणाली, " तीन कशाला वाजायला हवेत? दुपारीं तुम्ही नीटसं जेवलां नव्हतां. "

केदारबाबूंना वाटलें, आतां इथें कांहीं चालायचें नाहीं. ते म्हणाले, " मग आण तर. "

क्षणभर थांबून मृणाल म्हणाली, " बरं का बाबा, तुम्ही सारखे म्हणत असतां, कीं मला गरमगरम चिंगळा फार आवडतात—खरं ना ? "

" मी उगीच खोटं कां बोलेन पोरी ? "

" तर मग थोड्या चिंगळा घेऊन येऊं का ? "

" त्याही आणणार आहेस होय ? बरं बरं, आण तर ! " असें म्हणून तिच्या तोंडाकडे पाहून ते बळेंबळेंच थोडेसे हंसले.

मृणाल निघून गेल्यावर ते खिडकीबाहेर पहात होते. बाहेर काळोखी येत होती. पाहातां पाहातां चारदोन गरमगरम आसवें टप्कन त्यांच्या छातीवर पडलीं. हाताच्या बाहीनें तीं पुसून घेऊन मुद्रेवरचा परिणाम दिसूं नये म्हणून शेजारीं पडलेलें इमर्सनचें पुस्तक त्यानीं समोर धरलें.

त्या पुस्तकांत काय होतें कोण जाणे, त्यांच्या मनांत मात्र वेगळेंच विचारचक्र फिरत होतें. किती विलक्षण आणि अज्ञेय आहे ही सृष्टीची हालचाल ! संसारांतल्या दिवसांचा हिशेब घ्यायचा प्रसंग आला त्यावेळीं एवढ्या मोठ्या आयुष्यांतले सारे अनुभव, सारें ज्ञान, सारी कमाई फुकट गेली, आतां नवी कमाई करायची आवश्यकता भासत आहे असें त्यांना वाटलें. आपल्या या मनुष्यजन्मांतला सारा भूतकाल एक प्रकारें फुकट गेला आणि हा एवढा मोठा खड्डा या एकाच महिन्यांत भरून आला असेंही त्यांना वाटलें.

दारांत कुणाचेंतरी पाऊल वाजल्यामुळें त्यांनीं वर पाहिलें. दगडी वाटींत चहा आणि थाळींत भाजलेल्या चिंगळा घेऊन मृणाल आंत येत होती. दोन्हीं हात पुढें करून ते जिन्नस तिच्या हातून घेतांना ते म्हणाले, " आज माझं जेवण नीटसं झालं नव्हतं याचा पत्ता मला आतां लागला. आतां असं पाहा मुली — "

" नाहीं बाबा. तुम्ही बोलूं लागलांत तर हें सारं थंड होऊन जाईल. "

केदारबाबूंनीं चहाची वाटी घेऊन तोंडाला लावली, ती मोकळी करून

खालीं ठेवली. एक सुस्कारा सोडून ते म्हणाले, " माझी एकच इच्छा आहे मृणाल, पुढल्या जन्मीं तूं माझी मुलगी होऊन ये. लहान मूल उराशीं घेऊन मोठं करायची विद्या मी शिकलोंय, तिची जन्मभर एकदां उजळणी तरी करतां येईल ! " बोलत असतांना त्यांचा आवाज कापूं लागला होता. असें कांहींतरी बोलणें निघालें म्हणजे मृणाल अगदीं घाबरून जात असे. त्यांच्या त्या बाहेर न फुटणाऱ्या मनःस्थितीकडे दुर्लक्ष करून ती हंसतहंसत म्हणाली, " अगदीं छान होईल बाबा, तुमच्या बऱ्याचशा मुलांमुलींतली मी एक झालें तर ! "

म्हातारा जोरजोरानें मान हालवून म्हणाला, " नाहीं-नाहीं, बऱ्याचशा नव्हे पोरी, बऱ्याशा नव्हे मुळींच ! अगदीं तूं एकच – माझी एकुलती एक मुलगी— एकटी तूंच—माझं सर्वस्व आवरून घेऊन बसलेली. आज जें कांहीं तुझ्यापाशीं टिकलंय तें सारं पुन्हां त्या मुलीला शिकवीन अन् मग पुन्हां एकदां म्हातारपणीं सारं कांहीं तिच्याकडून वसूल करून घेऊन परलोकाच्या वाटेला लागेन ! " बोलत असतांना तिच्या नकळत त्यानीं आपल्या डोळ्यांच्या कोपऱ्यांना हात लावला.

मृणाल ओशाळून म्हणाली, " तुम्ही नुसते मला लाजवतां बाबा. असं काय मला कळतंय ! "

" आत्तांच हें पाहा—मी पोटभर जेवलों नाहीं हें मला कळलं नव्हतं, पण तुला कळलं ! "

" त्यांत काय असं कळायचं ? ज्याला डोळे आहेत, त्याला दिसतं ना समोरासमोर ! "

" पण असले डोळे सर्वांनाच नसतात मृणाल ! " असें म्हणून ते क्षणभर थांबले आणि नंतर म्हणाले, " पण मला सर्वांपेक्षां आश्चर्य वाटतं तें हें, कीं भगवान कुठून कशा प्रकारें आपल्या जिव्हाळ्याच्या माणसाची गांठ घालून देतो तें कांहीं कळत नाहीं. त्यांत नसतं कांहीं अवडंबर, नसते कांहीं लग्याबांध्याची ओढ, तसाच नसतो वेळेचा हिशेब ! एका निमिषांत कांहींच्याबाहींच होऊन जातं— काळीज मरून गेल्यावर जेव्हां एकादं माणूस सांपडतं, तेव्हां मग असं वाटतं, कीं ही उणीव इतके दिवसांत सहन झाली होती कशी ? "

मृणाल म्हणाली, " अगदीं खरं आहे बाबा. नाहींतर इतके दिवसांत या जंगलांत असलेल्या तुमच्या या मुलीची खबर घेतल्याशिवाय तुम्ही राहिलां नसतां. "

केदारबाबू म्हणाले, “ पण त्याचा हुकूम झाल्याशिवाय खबर घेणार कशी ? तो हुकूम झाल्याबरोबर धडकावून खेंचून आणलंच कीं नाहीं त्यानं ? एवढीसुद्धां अडचण आली नाहीं. लोकांना वाटतंय, कीं नुसती एक महिन्याची ओळख, पण हा कांहीं पंचागाचीं पानं उलटून करायचा भाड्याचा हिशेब नव्हे हें मी जाणतों. कित्येक युगायुगांतून तुझ्या छायेला बसून राहात आलोंय, तिथं दिवस आणि महिन्यांचा कसला हिशेब करायचा ? ” असें म्हणून ते थोडेसे थांबले.

मृणाल यावर कांहींतरी बोलणार होती. पण त्यांच्या चेहेऱ्याकडे नजर जातांच एकदम गप्प राहिली. तिला वाटलें, या म्हाताऱ्याच्या अंतःकरणांत जी दुःखाची चिता मुकाट्यानें धगधगत होती ती आतां ओसरत विझत जाऊं लागल्यामुळें तिची छाया त्यांच्या चेहेऱ्यावर उमटली आहे. तो ओझरता प्रकाश निस्सीम अशा करुणेच्या आणि स्नेहाच्या तेजानें त्यांच्या मुद्रेवर उमटलेला दिसत आहे.

कांहीं वेळपर्यंत कुणीच कांहीं बोललें नाहीं. मृणाल तशीच जमिनीकडे नजर लावून स्तब्ध राहिली होती. त्या स्तब्धतेचा भंग केला केदारबाबूंनीं. ते म्हणाले, “ मृणाल, एक धर्म टाकून मी दुसऱ्या धर्माची दीक्षा ज्यावेळीं ग्रहण करतोंय, त्यावेळीं बाहिरच्यासाठीं नव्हे, स्वतःच्या अंतरंगाशीं कांहींतरी कैफियत देणं जरूर वाटतंय मला. आजपर्यंत कांहीं ना कांहीं कारण काढून मी हें टाळीत होतों, पण आतां कांहीं तें टाळतां येत नाहीं. धर्माच्या बाबतींत हीच एक गोष्ट मला कळून आलीय—”

एक क्षणभरच त्यांची नजर मृणालकडे गेली त्यावेळीं ते म्हणाले, “ भिऊं नकोस पोरी, भिऊं नकोस. वारंवार तुझं नांव घेऊन तुला मी संकोच वाटूं देणार नाहीं. एवढं खरं, कीं एवढा काळ गेल्यानंतर मला आतां निश्चितपणें कळून चुकलंय, कीं लढाईझगडा आणि वादावादी करून दुसरं कांहीं मिळत असेल तें असो, पण धर्म ही वस्तु कांहीं त्या उपायानं मिळायची नाहीं. ”

त्यांच्या अंतरंगांतल्या उद्गारांची बरोबर कल्पना आल्यामुळें मृणाल म्हणाली, “ असंही खरं असेल बाबा ! पण मी म्हणतें, धर्म म्हणून जी कांहीं वस्तु मी नीट ओळखतेंय, तिचं ग्रहण करण्यासाठीं लढाईझगडा आणि वादावादी करायची जरुरी आहे असं निदान मला तरी वाटत नाहीं. ”

केदारबाबू म्हणाले, “ म्हणजे मी असं कांहीं केलं होतं असं मुळींच नव्हे. पण जरूर पडली तर तसंही झगडावं लागतं मृणाल. कोणत्याही वस्तूचा त्याग करायचा म्हणजे तो आम्हीं प्रीतीच्या किंवा प्रेमाच्या जोरावर करीत नाहीं. ज्या

कोणत्या वस्तूचा त्याग करायचा असतो, त्याच्या बाबतींत मनावर जो हलकेपणाचा परिणाम होतो तो कांहीं जात नाहीं. अन् त्यासाठींच आज कडक कैफियत करायची मला जरूरी वाटतेय पोरी. तुम्हां लोकांची गोष्ट वेगळी आहे. तुम्हांला जन्मापासूनच जें कांहीं मिळायचं तें आपोआप मिळालंय. तें बरं असो कीं वाईट असो, तेंच हातीं धरून तुम्हीं चालतांहां ! यांत काय फरक आहे तेवढाच एकदां विचार करून पाहा. "

मृणाल उगीच राहिली. त्यांच्या प्रश्नाला प्रत्युत्तर द्यायला तिला कांहीं आधार सांपडला नाहीं. क्षणभर तिच्या उत्तराची वाट पाहिल्यावर केदारबाबू म्हणाले, " असं पहा पोरी, आज बरेच दिवस विसरून गेलेल्या गोष्टी हळूहळू आठवताहेत. इतके दिवस त्या कुठं दृष्टीआड झाल्या होत्या कोण जाणे ! "

एकदम नजर वर करून मृणालनें विचारलें, " कुठल्या गोष्टी बाबा ? "

" माझीच गोष्ट म्हणेनास ! " केदारबाबू म्हणाले, " मोठा माणूस होण्याइतकी बुद्धी देवानं कांहीं मला दिली नाहीं अन् मी कधीं मोठा माणूस झालोंही नाहीं. मी एक साधारण माणूस, साधारण माणसांतच मिसळून वावरत होतों. आमच्यांतले जे मोठे माणूस होते, जे समाजाचे अग्रणी होते, समाजाचे जे आचार्य होऊन राहिले होते, त्यांचाच उपदेश सदोदित श्रद्धाभक्तीनं पाळीत आलों होतों. त्यांचीं तीं त्या वेळचीं कांहीं कांहीं विसरलेलीं वाक्यं आज मला आठवताहेत. तूं म्हणाली होतीस मृणाल, धर्मांतराच्या किंवा धर्मग्रहणाच्या बाबतींत चांगलं तेवढं निवडून काढतांना बारीकसारीक भेद पाहायचे नसतात— अन् ते पाहायची जरुरी तरी काय ? मला देखील आजपर्यंत तसंच वाटत होतं नी मी तसंच म्हणत आलों होतों. पण आज मला वाटूं लागलंय, कीं ती जरुरी आहे ! आज मला दिसून आलंय, कीं हिंदूंतले कांहीं लोक जे आमच्याविरुद्ध तक्रार करीत होते, कीं देशांत आणि परदेशांत आमच्यामुळं मान खालीं घालायचा प्रसंग जितक्या प्रमाणांत आला आहे तितका ख्रिस्ती पाद्र्यांच्या पायीं देखील आला नाहीं; त्यांचा हा आरोप खोटा आहे म्हणून उडवून द्यायची आज तरी मला छाती होत नाहीं पोरी. खरं पाहिलं तर विदेशी आणि विधर्मी लोकांच्या हातीं आम्हीं बिभीषण होऊन बसलों आहों खास ! "

मृणाल अत्यंत अस्वस्थ झाली होती. पण तिच्या त्या अस्वस्थतेकडे नजर न देतां ते म्हणाले, " असं पाहा मृणाल, बारीकसारीक भेद पाहायची गोष्ट राहूं दे; पण आमच्यांतले जे कुणी प्रत्येक विषयाच्या बाबतींत आदर्श

म्हणून समजले जातात, नुसत्या आमच्यांतच नव्हेत तर साऱ्या मानवजातींत जे आदर्श आणि पदवाच्य आहेत, त्यांच्या तोंडून धर्माच्या मंदिरांत, धर्माच्या वेदीवर उभं राहून रामाला राम्या, हरीला हऱ्या अन् नारायणाला नाऱ्या असे शब्द निघतात तरी कसे? सर्वांना आव्हान देऊन उच्च कंठानं हे लोक कां अशी घोषणा करतात, कीं अभाग्यानों, या-या पुरांत बुडून मरायचं नसलं तर आम्हीं बांधलेल्या या घांटावर या. मुली, धर्मोपदेशाच्या या तालठोक्यांत आमच्या समाजांतल्या यच्चयावत व्यक्तीचं रक्त भक्तीनं जेवढं गरम, श्रद्धेनं जेवढं रुक्ष होऊन उठतं—चर्चा करतांना रोमांचित होण्यांत एक तिळभर सुद्धां जिथं कमतरता पडत नाहीं, तिथं आज असं वाटूं लागलंय,—जीवनाच्या या शेवटच्या सीमेवर पोंचत असतांना स्पष्टपणें जाणीव झालीय, कीं त्यांच्या त्या उपदेशांत काय विशेष असेल तें असो, पण अस्सल धर्मभावनेचा लवलेशसुद्धां तिथं नव्हता."

मृणाल कळवळून म्हणाली, "या साऱ्या गोष्टी मला कां सांगतांहां बाबा? ते सारेच आमच्या दृष्टीनं पूजनीय आहेत, वंदनीय आहेत!" असें म्हणून तिनें दोन्ही हात जोडून मस्तकापाशीं नेले. त्या भक्तिमति तरुणीच्या नम्रतेनें वांकलेल्या चेहेऱ्याकडे पाहातांना म्हातारा बेभान होऊन गेला. त्याच वेळीं बाहेरून कुणीतरी हांक मारल्यामुळें मृणाल तिथून निघून गेली तरीही ते तसेच स्तब्ध होऊन बसून राहिले होते.

सासूनें कां बोलावलें होतें तें ऐकून घेतल्यावर मृणाल थोड्या वेळानें पुन्हां परत आली. ती आलेली पाहातांच केदारबाबू दोन्ही हात पसरून अंतःकरण दाटून येऊन म्हणाले, "मृणाल, दुसऱ्याचे दोष आणि उणीवा शोधून काढून तक्रार करीत बसण्यांतच का माझं सारं आयुष्य जाणार आहे? यांतून कधीं सुटका होणारच नाहीं का माझी?"

मृणाल म्हणाली, "तुमची मच्छरदाणी एका टोंकाला फाटलीय बाबा. जरा सरकून बाजूला बसा, मी तेवढी शिवून टाकतें." असें म्हणून तिनें संबळींतून सुईदोऱ्याची डबी काढली तेव्हां म्हातारा बिछान्यावरून उठून एका बाजूला बसला. खालच्या मानेनें ती शिवीत बसलेली असतांना ते तिच्या चेहेऱ्याकडे सारखे पाहात राहिले होते. इकडे तिकडे मुळींच नजर न देतां ती लक्ष लावून आपलें काम करीत होती. तिच्याकडे सारखी टक लावून पाहात असतांना केदारबाबूंचे

डोळे अगदीं नकळत आसवांनीं भरून आले, आणि ते पुन्हां पुन्हां ते धोतराच्या सोग्यानें पुशीत होते.

शिवणकाम पुरें झाल्यावर मृणालनें शिलाईचें सामान जागच्या जागीं ठेवून दिलें. नंतर ती पुन्हां त्यांच्याकडे आली आणि म्हणाली, "आतां संध्याकाळीं काय हवंय तुमच्यासाठीं बाबा ?"

तिचा तो प्रश्न ऐकून केदारबाबूंनीं सहसा एक सुस्कारा सोडला आणि रडकुंडीला आलेल्या जिवणीवर बळेंबळेंच हंसू आणून ते म्हणाले, "संध्याकाळीं काय करायचं याची उठाठेव करीत आतां तळमळतेयस कशाला ? योग्य वेळीं व्हायचं तें होऊन जाईल. आधीं इथं स्वस्थपणें येऊन बैस पाहूं !—" क्षणभर थांबून ते म्हणाले, "आज ही चूक शेवटचींच. यापुढं माझ्या तोंडून कुणालाही नांव ठेवल्याचं तुला ऐकूं येणार नाहीं मृणाल !—" ते पुन्हां थोडा वेळ थांबून म्हणाले, "पण तूं माझ्यावर राग धरूं नकोस पोरी. एवढ्यासाठीं मी ही गोष्ट तुझ्यासमोर काढली नाहीं."

त्यांची ती केविलवाणी भाषा ऐकून मृणालला आश्चर्य वाटलें. ती म्हणाली, "असं कां म्हणतां बाबा ? आजवर कधींतरी मी तुमच्यावर राग धरला आहे का ?"

"नाहीं ग पोरी, केव्हांच नाहीं !" केदारबाबू जोरजोरानें मान हलवीत पुन्हां पुन्हां सांगू लागले, "तूं माझी आई ?ीं नाहीं, तेव्हां या म्हाताऱ्या पोराचे अत्याचार हंसतमुखानं सहन करीत आलीयस. आजवर काळजाचं रक्त देऊन जें सत्य मी पैदा केलं आहे तेंच तुझ्यापुढं मांडून दाखवणार होतों मृणाल. दुसऱ्याची निंदा करायची इच्छा नव्हती माझी. धर्म नांवाची जी वस्तु आहे ती इतके दिवसपर्यंत आम्हीं गट करून मतलबानं धरून ठेवूं पाहात होतों, पण ती तशी धरून ठेवतां येत नाहीं हें आतां मला निश्चित कळून चुकलंय. हा धर्म म्हणजे मोठा विलक्षण प्राणी आहे. तो आपण होऊन कुणाच्या हातीं पडला नाहीं, तर कुणाला तो पकडतां यायचा नाहीं. ज्या दिवशीं माणसाच्या आत्यंतिक वेदनेवर पाय देऊन परमदुःखाच्या मूर्तींत तो एकटाच येऊन उभा राहील, तेव्हांच त्याची ओळख पटेल. तिथं एवढीसुद्धां चुकभूल पचायची नाहीं – तोंड फिरवून निघून जाईल तो. पण असलं हें दुर्भाग्य माझ्या मोठ्यांतल्या मोठ्या वैऱ्याच्या नशिबींसुद्धां न येवो एवढंच मी मागतोंय मृणाल."

मृणाल ज्या प्रसंगाची चर्चा करायचें चुकवून बगल द्यायला पाहात होती त्यांतलेंच हें इंगित होतें, हें पटल्यामुळेंच तिला संकोच वाटला. तिला

अतिशय दुःख झालें. पण यावेळीं कांहींतरी निमित्त करून तिनें तिथून पळ काढला नाहीं. ती निरुत्तर होऊन स्वस्थ बसली.

आजपर्यंत झालेल्या विरोधामुळें केदारबाबूंची दृष्टि सुद्धां आतां तीक्ष्ण झाली होती. त्यांनीं यावेळीं तिच्याकडे लक्षच दिलें नाहीं. ते म्हणत होते, "बरं का पोरी, तुझ्याखेरीज या एवढ्या मोठ्या जगांत मला केव्हांच कुणी नव्हतं, हें पुन्हां पुन्हां सांगितल्याशिवाय माझं समाधान नाहीं होत. म्हणूनच माझ्या उरल्या-सुरल्या आयुष्याचा सारा बोजा, बऱ्यावाईटाचा सारा भार—कां कोण जाणे—तुझ्यावर येऊन पडला आहे असं मला वाटूं लागलंय. साऱ्या जगाचीं सूत्रं जो चालवतो आहे, त्यानंच हें ठरवून टाकलंय असा निर्धार झालाय माझ्या मनाचा अन् म्हणूनच मला आतां लाज वाटत नाहीं, कीं संकोच वाटत नाहीं. पहिल्या-पहिल्यानं मी तुझ्या गळ्यांतलं एक लोढणं होऊन बसलों आहें असं वाटून माझ्या जिवाला लागे, पण आतां तें सारं साफसाफ मोकळं होऊन गेलंय."

मृणाल वर पाहून थोडीशी हंसली. केदारबाबू थोडा वेळ मागेंपुढें करीत पुन्हां म्हणाले, "असं आहे तरी कां माघार घेतों मृणाल? तोंडावाटे स्पष्टपणें कां उद्‌गार निघत नाहींत?"

"तर मग राहूं दे ना बाबा. नाहीं बोलून दाखवलंत तरी चालेल."

केदारबाबू मान हालवून म्हणाले, "नाहीं नाहीं—आज मी ऐकणार नाहीं. आतां बोलल्याखेरीज राहावतच नाहीं माझ्यानं. मला खात्रीनं वाटतंय, कीं सुरेशबरोबर –"

हाच संशय मृणालच्या मनाला सारखा जाणवत होता, म्हणूनच ती मान खालीं घालून उगीच राहिली. कांहीं वेळ असाच गेल्यावर केदारबाबूंनीं आपल्या मनोवृत्तीवर जबरदस्ती केली आणि म्हटलें, "एकदां महिमला भेटावंसं वाटतंय मृणाल. एकदां त्याच्या तोंडून काय तें ऐकायचं आहे मला. एवढ्यासाठींच सारखं माझं काळीज पेटतंय ग पोरी! पण मी एकटा जाऊन त्याच्यासमोर कसं हें तोंड दाखवूं?"

त्या अभागी वृद्धाच्या शरमिंद्या आणि भेदरलेल्या मुद्रेकडे निश्चल दृष्टीनें पाहात मृणाल म्हणाली, "तुम्ही एकटेच कशाला जायला हवं बाबा? जायचं असलं तर आपण दोघंही बरोबर जाऊं!"

"खरोखरच तूं येशील पोरी?"

"येईन तर काय बाबा! अन् शिवाय तुम्हांला मी एकटी कशी जाऊं

देईन ? तुम्हांला कुठंही जायचं असलं, तरी मी बरोबर असल्याशिवाय कुठंही जाऊं द्यायची नाहीं हें बजावून ठेवतेंय. कुणीच मला आपल्याबरोबर नेत नाहींत बाबा–जावं म्हटलं तरी कुठंच जातां येत नाहीं मला. ”

यावर म्हाताऱ्यानें कांहीं उत्तर दिलें नाहीं. दोन्हीं हात तोंडावर दाबून गुडघ्यांत मान घालून ते पडले होते. त्यांचा जर्जर झालेला देह अंतरांतल्या अव्यक्त वेदनेनें थरथर कांपत असल्याचें दिसून येत होतें.

मृणाल एक शब्दसुद्धां न बोलतां त्यांच्या उशाशीं बसली होती. सांत्वनाचा एक शब्दसुद्धां उच्चारायला ती असमर्थ झाली होती. एकुलत्या एका मुलीच्या अधोगतीमुळें बापाच्या हृदयाचे जिथें तुकडे उडाले होते, तिथें ती बिचारी सांत्वन तरी कशी करणार होती ?

बराच वेळ असाच गेला. नंतर तो म्हातारा आपलें मन आवरून घेऊन उठून बसला. त्यानें हांक मारली, “ मुली ! ”

त्यांच्या चेहेऱ्याकडे पाहातांच मृणालचें काळीज फाटून गेलें. सारी शक्ति खर्ची घालून डोळ्यांत येणारीं आसवें आवरीत तिनें साद दिली, ‘ काय बाबा ? ”

“ या जगांत माणसाच्या यातनेचं परिमाण एवढं मोठं होत असेल असं मला कधीं वाटलं नव्हतं मृणाल. यांतून सुटका व्हयचा कांहीं मार्गच नाहीं का ? कुणालाच माहीत नाहीं का तो ? ”

“ पण बाबा, माणूस मेलं तर तो शोक सहन करतां येतो ना ? ”

केदारबाबू म्हणाले, “ माझ्यालेखीं ती मेली आहे असंच म्हणतेयस का तूं मुली ? एका अर्थी तेंही खरं आहे. पुष्कळ वेळ मला असं वाटतं, कीं मृत्यूमुळं होणारा शोक जेवढा मोठा, त्यापासून मिळणारी शांति आणि माधुर्यही तेवढंच मोठं, पण तसं समाधान मानायला इथं जागा कुठं आहे मृणाल ? या असह्य ग्लानीमुळं, असह्य लज्जेमुळं माझ्या हृदयांतली वाट इतकी जखडून गेलीय, कीं थोडीशी हालचाल करायला देखील तिथं फट राहिलेली नाहीं—” असें म्हणून त्यानीं डोळे मिटले आणि दोन्हीं हातांनीं छाती दाबून धरून ते म्हणाले, “ मुली, जो पोटच्या गोळ्याला हिरावून नेतो त्याचा उद्देश काय असेल तें आम्हांला कळत नाहीं. म्हणूनच आम्हीं त्याला क्षमा करून स्वस्थ बसतों. आम्हीं – ”

त्यांना थांबवून मृणाल मधेंच म्हणाली, “ आतां तेंच करतां येईल आपल्याला बाबा. असा जो कोण, तो कुणी कां असेना, ज्याचा कार्यकारणभाव

तुम्हां-आम्हांला कळत नाहीं, त्याला क्षमा करतां आली नाही तरीही त्याला न्यायासनासमोर उभा करून दोषी ठरवणं तरी टाळलं पाहिजे आपण. ”

तें ऐकतांच म्हातारा दचकल्यासारखा झाला. तिच्या चेहऱ्याकडे आपल्या दोन्ही डोळ्यांतली तिखट नजर लावून तो दगडासारखा ताठ होऊन बसला.

मृणाल जरा लाजवटपणें म्हणाली, “बाबा, मनांत असलं तरी ज्या अपराधांची क्षमा करतां येत नाहीं असे अपराध या जगांत फार थोडे आहेत असं मी माझ्या दादाच्या तोंडून ऐकलं होतं—

केदारबाबू एकदम उसळून उठून बसले आणि म्हणाले, “ या गुन्ह्यालाही केव्हां कुणी क्षमा करील असं तुला वाटतं का मृणाल ? ” मृणाल उगीच राहिली असें पाहून ते तशाच तिडिकीनें म्हणाले, “मुळींच नाहीं ! मुळींच नाहीं ! मी प्रत्यक्ष तिचा बाप, या दुष्कृत्याची मी तिला केव्हांही क्षमा करणार नाहीं. मी तुला ठांसून सांगतों मृणाल, असली क्षमा योग्य नव्हे—क्षमा करणं उचित नव्हे !”

मृणाल हळूच म्हणाली, “ योग्य आणि अयोग्य यांचा प्रश्न येतो तो विवेक करतांना. त्याला क्षमा म्हणतां यायचं नाहीं अन् क्षमेचं फळ काय नुसतं अपराध्यालाच मिळतं ? जो क्षमा करतो त्याला कांहींच का लाभ होत नाहीं बाबा ? ”

तिच्या या उद्गारांनीं म्हातारा एकदम थंड पडला. तिचा या शांत आणि सोज्वळ उद्गारांमुळें तो अगदीं थक्क होऊन गेला. कांहीं वेळ अगदीं सुन्न होऊन बसल्यावर तो एकदम म्हणाला, “या दृष्टीनं मी कधींच विचार केला नव्हता मृणाल. आज तूं मला एक नवं तत्त्व शिकवलंस. खरं आहे तुझं म्हणणं ! जो ग्रहण करतो, त्याच्या लाभाच्या खातीं केवळ सोळा आणे जमा करून दात्याच्या हिशेबीं शून्य का टाकायला हवं ? असं होणं शक्यच नाहीं मुळीं ! ठीक ठीक ! कुणाचा अपराध केवढा मोठा आहे याची चर्चा ज्याला वाटेल त्यानं करावी, मी नुसती स्वतःकडे पाहून क्षमा करावी – असाच ना हा तुझा उपदेश आहे ? ”

“ असं कांहींतरी बोलून उगीच कां मला सतावतांहां बाबा ? कां माझा अपराध मोठा करून दाखवतांहां ? ”

“ तुझा अपराध ? या जगांत असं कांहीं आहे का पोरी ? ”

मृणाल एकदम उठून उभी राहिली. ती म्हणाली, “मला आई हांक मारताहेत वाटतं—मी आतां जातें बाबा. ” असें म्हणून ती एकदम तिथून बाहेर गेली.

## १७

मृणाल निघून गेली पण तें केदारबाबूंच्या ध्यानांतच आलें नसावें. आपल्या बोलण्याचें सूत्र तसेंच कायम ठेवून मृणाल तिथेंच आहे अशी कल्पना करून ते म्हणत होते, "मी बचावलों पोरी, मी बचावलों! तूं मला बचावलंस. दुर्गतीच्या दुर्गम अरण्यांत दोन डोळे बांधून पडलों होतों, मृत्यूखेरीज सुटकेचा दुसरा मार्ग नव्हता, अशावेळीं हाताशीं सुटणुकीचा एवढा मोठा राजमार्ग मोकळा होता ही खबर तुझ्याखेरीज दुसरं कोण देणार होतं मला? क्षमेची कल्पना तर कधीं माझ्या मनांत सुद्धा आली नाहीं. कधीं तशी कल्पना मनांत आलीच तर ती दोन हातांनीं धुडकावून लावून अभिमानानें म्हणत होतों, नाहीं—मुळींच नाहीं! पोटच्या पोरीनं एवढा मोठा गुन्हा केल्यावर मी तिचा बाप तिला एवढं मोठं दान केव्हांही देणार नाहीं! अरे पण आंधळ्या, अरे मूर्खा, अरे कृपणा, बाप असून तुला जर एवढं देतां येत नाहीं तर दुसरा कोण कसा देईल? अन् त्यांतलं तिच्या पदरीं तरी कितीसं पडेल? दिलेली सारी क्षमा उलटून परत येईल ना? तुझ्या मृणालमाईचं हें तत्त्वज्ञान दोन डोळे उघडून पहा कीं—" असें म्हणून त्यानीं डोळे तारवटून ढगाळलेल्या आकाशाकडे पहात आपल्याशींच जीव तोडून बोलायला सुरवात केली, "मी क्षमा केली—मी क्षमा केली! सुरेश, मी तुला क्षमा केली! अचला, मी तुलाही क्षमा केली! पशुपक्षी, किडेमुंगी जे जिथं आहेत त्या सर्वांना मी आज क्षमा केली. आजपासून कुणावर माझा राग नाहीं, कुणाविरुद्ध माझी तक्रार नाहीं. आज मी मुक्त, आज मी स्वतन्त्र, आज मी परमानंदमय झालोंय!—" बोलत असतांना अनिर्वचनीय करुणेच्या भावनेनें त्यांचे दोन्ही डोळे मिटले गेले. दोन्ही हात एकत्र करून त्यानीं हृदयावर ठेवले तेव्हां त्यांच्या झांकलेल्या डोळ्यांतून पितृस्नेहाच्या पाझराच्या अजस्र अश्रुधारा दरदरून वाहूं लागल्या; त्यांचे ओंठ थरथरा कापूं लागले. सद्गदित स्वरानें ते म्हणाले, "पोरी! पोरी! कुठंयस तूं? एकदां ये ना फिरून! मी तुला या जगांत आणलं, उराशीं कवटाळून मीच तुला लहानाचं मोठं केलं—पोरी, तुझे सारे अपराध, सारा अपमान, सारी विटंबना घेऊन एकदां बापाच्या कुशीला ये ग अचला! मी काळीज तोडून तुझीं सारीं क्षतं, सारा उद्वेगजंजाळ धुवून टाकून तुला पुन्हां उराशीं कवटाळून मोठी करीन! आम्ही चारचौघांत मिसळणार नाहीं, घराच्या बाहेर पडणार नाहीं, केवळ तूं आणि मी—"

"बाबा?"

म्हाताऱ्यानें मान वळवून मृणालकडे पाहिलें-क्षणभर आपलें मन आवरायचा त्यानीं प्रयत्न केला असावा असें वाटलें—पण लगेच धरणीवर आंग टाकून एखाद्या लहान मुलाप्रमाणें ओक्साबोक्शी रडत ते म्हणाले, " पोरी ! पोरी ! माझं काळीज फुटून गेलंय ग ! सर्वांनींच तुला दुःख दिलं-किती गांजणूक केली ! आतां नाहीं माझ्यानं सोसवत ! ! "

मृणाल कांहीं बोलली नाहीं. ती त्यांच्या जवळ गेली आणि जमिनीवर पडलेलें त्यांचें मस्तक आपल्या मांडीवर घेऊन त्यावर हळूहळू हात फिरवूं लागली. तिच्याही डोळ्यांवाटे आसवांचा पाझर सुटला होता.

हा ढगाळलेला फाल्गुनाचा दिवस पहिल्यानें तसाच मावळला असता, पण तितक्यांत केदारबाबू एकदम उठून डोळे उघडून बसले आणि म्हणाले, " मृणाल, महिमला पत्र लिहिलं तर उत्तर मिळायचं नाहीं का त्याच्याकडून ? "

" कां मिळायचं नाहीं बाबा ? मला तर वाटतंय, कीं उद्यांपरवांपर्यंत त्याचं, उत्तर येईल. "

" तूं त्याला पत्र लिहिलंयस का ? "

मृणालनें मानेनेंच होकार दिला.

पत्रांत काय लिहिलें होतेंस, असें तिला विचारायला त्यांना संकोच वाटला.

त्यानीं बाहेर डोकावून पाहिलें आणि म्हटलें, " बरीच वेळ झालेली दिसतेय. जरा बाहेर फिरून येतों. " असें म्हणून चादर अंगावर टाकून हातीं काठी घेऊन ते निघाले. एकदोन पावलें टाकल्यावर ते एकदम थबकून उभे राहिले आणि म्हणाले, " असं पहा मुली—"

" काय बाबा ? "

" मला भीति वाटतेय--नाहीं. भीति वाटतेय असंच कांहीं नव्हे !--मला असं वाटतंय- "

" काय वाटतंय बाबा ? "

" काय वाटतंय कोण जाणे ! मला वाटतंय--बरं बरं, आम्हीं येतों म्हटलं तर महिम नको म्हणेल, असं तुला वाटतंय का मृणाल ? "

ते असें कांहींतरी विचारतील अशी मृणालचीही कल्पना होती आणि तिनें त्या प्रश्नाचें उत्तरही एक प्रकारें ठरवून ठेवलें होतें. ती लगेच म्हणाली, " सध्यां ही चौकशी करायची जरूर काय बाबा ? त्याचा पत्ता कळला कीं आपण तिकडे जाऊं. दादानं जर आम्हांला तिथून धुडकावून लावलं तर आपण

असं समजू, कीं जगांतले पुष्कळसे व्यवहार आपल्याला कळले नव्हते, ते आतां कळले म्हणून ! या बाबतींत कुणापाशीं विचारपूस करायची कांहीं जरुरी नाहीं."

केदारबाबू क्षणभर थांबून म्हणाले, " तर मग खरोखरच तूं माझ्याबरोबर येशील ? "

मृणाल म्हणाली, " खरोखरच ! पण तुमच्याबरोबर मी यायची नाहीं बाबा—तुम्ही येणार आहां माझ्याबरोबर. "

म्हातारा यावर तिला कांहींतरी उत्तर देणार होता, पण क्षणभर नुसतें तिच्याकडे पाहून त्यानें मान फिरवली आणि तो मुकाट्यानें बाहेर निघाला.

अगदीं याच वेळीं फाल्गुन महिन्याच्या तिसऱ्या प्रहरीं बंगालदेशच्या बाहेर असेंच एका स्त्री आणि पुरुषाच्या डोळ्यांतलें पाणी त्या दिवशीं अनावर होऊन वाहूं लागलें होतें. शीलमोहोर केलेला एक भलामोठा लखोटा अचलेच्या हातीं देऊन सुरेश म्हणाला, " इतके दिवस हा लखोटा तुला देईन देईन म्हणत होतों, पण तो तुझ्या हातीं द्यायचं माझ्याच्यानं होत नव्हतं. आज मात्र तो दिल्यावांचून गत्यंतर नाहीं.

तो लखोटा हातीं घेऊन अचला थोडीशी बावरून म्हणाली, " म्हणजे काय ?"

सुरेश उगीच थोडासा हंसला आणि म्हणाला, " मला हात घालायला संकोच वाटेल अशी ही कोणती भयंकर गोष्ट या जगांत आहे असा तुला प्रश्न पडला असेल—होय ना ? विचार कर--मीही बराचसा विचार केलाय. यांत कांहीं अर्थ असला तर एक दिवस तो उघडकीलाही येईल. आजवर अनेक अपमान, अनेक दुःखांचा बोजा सहन करून कसलाच अर्थ कळला नाहीं तरीही तूं माझं म्हणणं जसं ऐकलंयस, तसंच हेंही ऐक अचला. "

अचलेनें शांतपणें विचारलें, " यांत काय आहे ? "

सुरेशनें हात जोडून म्हटलें, " आजवर तुझ्यापासून मी जें कांहीं मिळवलंय तें एकाद्या डाकूप्रमाणें जोर जबरदस्तीनं मिळवलं, पण आज तुझ्याकडे मी एक भिक्षा मागतोंय—हा प्रश्न मला विचारूं नको. "

अचला उगीच राहिली. यावर काय उत्तर द्यावें तें तिला सुचलें नाहीं.

बाहेर पडद्यापलीकडून नोकरानें हांक मारून म्हटलें, " बाबूजी, एक्कावाला म्हणतोय, कीं उशीर लावलात तर पोंचायला रात्र होईल. वाटेंत वादळी पाऊस यायची भीति आहे. "

अचलेनें चकित होऊन विचारलें, "आज कुठं जायला पुन्हां निघालां आहां तुम्ही ? अन् या अशा वेळीं ?"

सुरेशनें हंसत हंसत तिचें वाक्य दुरुस्त करून म्हटलें, "अर्थात् अशा अवेळीं ! मी जातोंय माझुलीला. तिथं प्लेगचा डॉक्टर कुणी मिळत नाहीं अन् गांवाचं स्मशान व्हायला आलंय. यावेळीं तिथं पांचसात दिवस राहावं लागेल— अन् कोण जाणे, कदाचित् कायमचंच राहावं लागेल तिथं." असें म्हणून तो थोडासा हंसला.

अचला स्तब्ध होऊन त्याच्या तोंडाकडे पाहात होती. अशी कांहींतरी बातमी तिच्याही कानीं आली होती. सातआठ कोस दूर असलेल्या कांहीं गांवांत या वर्षी खरोखरच प्लेगचें थैमान सुरू होऊन गांवाचें स्मशान व्हायची वेळ आली होती असें तिनें ऐकलें होतें. शहरापासून दूर असलेल्या या गांवांत या भयानक सांथीच्या वेळीं गरिबगुरिबांना औषध द्यायला कुणी डॉक्टर वैद्य मिळूं नये यांत कांहीं आश्चर्य नव्हतें. बरीचशीं औषधें आणि पथ्यपाण्याचे जिन्नस खरेदी करून सुरेश गुपचुप ते या गांवाला पाठवून देत असल्याचीही तिला दाद लागली होती. भल्या पहांटे उठून तो स्वतः कुठेंतरी जात असे. परत यायला त्याला केव्हां संध्याकाळ, तर केव्हां रात्रही होत असे—परवां तर तो मुळीं घरीं आलाच नव्हता हें ती पाहात होती, पण आतां घर टाकून, तिलाही टाकून कांहीं दिवसांसाठीं तो सरळ मरणाच्या खाईत जाऊन राहायला तयार झाला असेल याची तिला कल्पनाही नव्हती. म्हणूनच त्याचा हा संकल्प ऐकून ती मुकाट्यानें त्याच्या तोंडाकडे क्षणभर पाहात राहिली.

देवदेवता न मानणारा, पाप-पुण्याची पर्वा न करणारा हा महापापी माणूस— एकुलता एक मित्र आणि त्याची निरपराध स्त्री यांच्या जन्माचा हातोहात सत्यानाश करायला ज्यानें मागेंपुढें पाहिलें नाहीं,-ज्याच्याकडे नुसतें पाहिलें तरी निर्मळ मनांतसुद्धां विषारी भावना या पूर्वी उत्पन्न होई, त्याच्याकडे या क्षणाला पाहातांना पूर्वीप्रमाणें विषारी भावना निर्माण व्हायच्याऐवजीं अकस्मात विस्मयाची भावना जागी झाली. त्या माणसाच्या जिवणीच्या कोपऱ्याला अजूनही थोडीशी हास्याची रेषा झळकत होती. ती रेषा अत्यंत क्षीण होती. पण त्या इवल्याशा हास्याच्या रेषेंत अचलेला साऱ्या जगांतल्या वैराग्याची ज्योति दिसून आली. त्याच्या मुद्रेवर उद्वेग नव्हता, उत्तेजना नव्हती; प्रत्यक्ष मरणाच्या खाईत उडी घ्यायला तो निघाला होता, पण शंकेचें एवढेंसुद्धां लक्षण त्याच्या मुद्रेवर दिसत नव्हतें.

या निरीश्वरवादी, स्वार्थपर माणसाच्या हिशेबीं स्वतःच्या प्राणाचें मोल इतकें का क्षुल्लक होतें ? संसारांत भोगाखेरीज दुसऱ्या कोणत्याही भावनेची ज्वाला ओळख नव्हती, भोगाच्या साऱ्या आयोजनेंत मग्न होऊन राहाणें म्हणजे ज्याचा खेळ होता, त्या सर्व भोगांना लाथाडून एका निमिषांत एवढा मोठा त्याग करायला हा कसा सरसावला ? कदाचित् तो परत आलासुद्धां नसता ! कांहींही असो, पण ही वृत्ति म्हणजे कांहीं थट्टा नव्हती. ही गोष्ट इतक्या सहजासहजीं बोलून उडवण्या-जोगी होती का ?

अंतरंगांतून एकदम धक्का मिळाल्यामुळें ती घाबरी घुबरी झाली. हातांतला लखोटा त्याच्यापुढें करून ती म्हणाली, " म्हणजे हें तुमचं मृत्युपत्र का ? "

सुरेशनें विचारलें, " आत्तांच तूं मला एक भीक घातलीस—अन् आत्तांच ती पुन्हां परत घ्यायचीय का तुला ? "

अचला जराशी थांबली आणि नंतर म्हणाली, " बरं आहे ! नका सांगू ! पण मी मात्र तुम्हांला जाऊं देणार नाहीं. "

" कां ? "

उत्तरादाखल अचलेनें तो लखोटा हातांत खेळवीत क्षणभर इकडे तिकडे पाहिलें आणि म्हटलें, " माझ्यासाठीं तुम्हांला जें काय करायचं असेल तें करा, पण माझ्यापायीं मी तुम्हांला मरूं देणार नाहीं. "

यावर सुरेशनें कांहीं उत्तर दिलें नाहीं. आपण काढलेल्या उद्गारांबद्दल स्वतःच्याच मनाशीं शरमून बोललेले शब्द मवाळ करून घेण्यासाठीं ती म्हणाली, " कुठल्या दुःखापायीं मी तुझ्यासाठीं मरायला जातोंय, असं तुम्ही म्हणालां—गरिबांसाठीं जीव धोक्यांत घालतोंय असंही म्हणालां--ठीक आहे—मी तुम्हांला तेंही करूं देणार नाहीं. "

तिचे हे उद्गार ऐकतांना सुरेशला एकदम महिमची आठवण आली. त्याच्या हृदयांतून एक भलामोठा सुस्कारा बाहेर पडला आणि त्यामुळें त्या जागची स्तब्धता भंग पावली. जीवनाची ममता किती तुच्छ आहे आणि किती सहज तिच्यावर पाणी सोडतां येतें याची एकुलती एक साक्ष आजही त्याच्यासमोर होती

तो महिम ! आजची ही यात्रा जर महायात्रा ठरली तर त्या मित्रहीन, एकाकी, अबोल माणसाला कळून येईल, कीं सुरेशनें लोभानें नव्हे, क्षोभानें नव्हे, घृणेनेंही नव्हे—इहकाल आणि परकालच्या कोणत्या तरी आशेपायीं जीव दिला नाहीं, तर मृत्यु चालून आला म्हणूनच तो मेला.

त्याचे दोन्ही डोळे पाण्यानें भरून येऊं लागले होते पण त्यानें तो पाझर आवरला. उलट नजर वर करून हंसायचा थोडा प्रयत्न करीत तो म्हणाला, " मी मरतोंय तो कुणासाठीं नव्हे अचला. उगीच निरर्थक गप्प बसून राहणं मला बरं वाटत नाहीं म्हणून चक्कर मारायला जातोंय. मरतोंय कसला अचला ? मी मरायचा नाहीं. "

" मग हें मृत्युपत्र कां केलं ? "

" पण हें मृत्युपत्रच आहे याला पुरावा काय ? "

" नसेना कां पुरावा – पण मला एकटी टाकून तुम्ही निघून जाणार आहां कां ? "

" इथून निघून जायचं, पुन्हां परत यायचं नाहीं, असंही कांहीं ठरलेलं नाहीं. "

" ठरलेलं नाहीं कसं ? या परदेशांत मला एकटीच निराधार टाकून तुम्हीं.—" बोलतां बोलतां अचलेला एकदम रडें कोसळलें.

तिथून जायाला निघालेला सुरेश पुन्हां खालीं बसला. आज पहिल्यानेंच मनांत आलेला आवेग त्यानें बळेंबळेंच आवरला होता. क्षणभर स्तब्ध राहून तो शांतपणें म्हणाला, " अचला, मी कांहीं तुझा सांगाती नाहीं. आजसुद्धां तूं एकटीच आहेस, आणि खरोखरच तशी वेळ आली तर त्यावेळींही आजच्यापेक्षां निराश्रित व्हायचं तुझ्या नशिबीं येणार नाहीं. "

" अचलेच्या डोळ्यांवाटे पाण्याच्या धारा लागल्या होत्या. त्या आसवांनीं भरलेले डोळे तिनें क्षणभर सुरेशच्या चेहेऱ्याकडे लावले. तिचे ओंठ थरथर कापूं लागले होते म्हणून तिनें दातांनीं ओंठ दाबून धरले. अकस्मात ती फुटल्या कंठानें रडत म्हणाली, " माझ्याकडून तुम्हांला काय हवंय ? अन् माझ्याकडे असं आहे तरी काय ?–" असें बोलत बोलत ती तोंडांत पदराचा बोळा धरून धांवतच बाहेर निघून गेली.

नोकर पुन्हां येऊन म्हणाला, " एक्कावाला—"

" बरं बरं —त्याला जरा सबूर करायला सांग. "

थोड्याच वेळांत सईस आला आणि म्हणाला, " गाडी तयार होऊन केव्हांची वाट पाहातेय. "

" गाडी कशाला ? "

सईसच्या सांगण्याकरून असें कळून आलें, कीं त्या घरीं जाण्यासाठीं

माईजींनी गाडी तयार ठेवायला सांगितली होती; पण दासी म्हणतेय, कीं त्यांच्या खोलीचा दरवाजा बंद आहे आणि कितीही हांका मारल्या तरी कुणी हांका देत नाहीं, म्हणून घोडा सोडूं कीं काय असें विचारायला तो आला होता.

" बरं आहे. जरा सबूर कर. "

त्या खोलीच्या आंतल्या बाजूचा दरवाजा उघडा होता. दरवाजावरचा पडदा सरकवून सुरेश कांहीं न बोलतां तिच्या झोंपण्याच्या खोलींत गेला आणि तसाच जवळच्या एका खुर्चींत मुकाट्यानें जाऊन बसला.

त्या खोलींत तीं दोघेंच होतीं. तो आंत आला तो कांहीं अधिकार नसतांना नव्हे; तरीही त्या प्रशस्त, सुंदर आणि शुभ्र बिछान्यावर ती सुंदरी उपडी पडून रडत होती याजबद्दल त्याच्या मनावर कांहीं परिणाम झाला नाहीं कीं तिच्याबद्दल त्याला कसली ओढही वाटली नाहीं. उलट कुणीतरी जोरानें आपल्याला मागें खेंचत आहे, असें त्याला वाटलें.

तो आल्याचा पत्ता अचलेला लागला नव्हता. ती तशीच रडत होती आणि सारखी तिच्याकडे नजर लावून सुरेश मुकाट्यानें बसून विचार करीत होता.

कांहीं दिवसांपासून स्वतःची चूक त्याच्या नजरेला आली होती. ती कोसळून पडलेली देहलता आणि तिच्या वेदना यांच्या संमेलनानें उत्पन्न झालेल्या माधुर्या-मुळें त्याच्या डोळ्यांवरचा पडदा एका निमिषांत दूर झाला. तो नास्तिक होता. तो आत्मा मानीत नव्हता. ज्या प्रवाहांतून अनंत सौन्दर्य निरंतर पाझरत होतें ती निस्सीम भावना त्याच्यालेखीं खोटी होती. त्या स्थूल सृष्टीवर सारी दृष्टि एकाग्र करून त्याला निस्संशय वाटत होतें, कीं या सुंदर देहाचा ताबा मिळवण्यांतच आपल्या सर्व इच्छांची पूर्ति आहे—पण आज त्याच्या त्या हिमालयतुल्य चुकीचा प्रसाद एका क्षणांत कोसळून जमीनदोस्त झाला. ही प्राप्तीची भावना म्हणजे केवढा मोठा बोजा होता, ती केवढी मोठी भ्रांति होती, हें आज त्याला नसा-नसांतून जाणवूं लागलें. शिशिर ऋतूंतला दवाचा थेंब मुठींत धरून ठेवाल तर पाहातां पाहातां तो नाहींसा होतो-अचलेकडे पाहात असतांना त्याला तसेंच कांहींसें वाटलें.

अगदीं नकळत त्याच्या डोळ्याच्या कोपऱ्याला पाणी पाझरलें. तें पुसून घेऊन त्यानें हांक मारली, " अचला ! "

अचला दचकली, पण तशीच मुकाट्यानें पडून राहिली. सुरेश म्हणाला, " तुझी गाडी तयार आहे. आज तूं रामबाबूंच्या तिकडे जाणार आहेस ना ?–"

तिच्याकडून कांहीं उत्तर येत नाहीं असें पाहून तो म्हणाला, " तुला जावंसं वाटत नसेल तर आज घोडा सोडून टाकायला सांगतों. मला वाटतं, माझंही आज जाणं होत नाहीं. मीही एक्का घालवून द्यायला सांगतों. " असें म्हणून तो पुन्हां बैठकीच्या खोलींत निघून गेला.

दहा पंधरा मिनिटेंपर्यंत तो कसला विचार करीत बसला होता तें त्याचें त्यालाच कळत नव्हतें. रेशमी साडीचा खस्खस् आवाज झाला, तेव्हां भानावर येऊन त्यानें पाहिलें तों समोर अचला उभी होती. रडत असतांना लाल झालेले डोळे तिनें शक्य तितके धुऊन घेतले होते आणि थोरामोठ्याच्या घरीं जायला शोभेसा पोषाख करून ती आली होती. ती म्हणाली, " आज त्यांच्या तिकडे जायलाच हवं. "

ती आज जी एवढी सजली होती ती स्वतःसाठीं नव्हे--तिकडे येणाऱ्या रजवाड्या पाहुण्यांसाठींच तिनें हा पोषाख केला होता हें सुरेशच्या ध्यानीं आलें. तरीपण रत्नजडित अलंकार घालून सुंदरसा पोषाख करून सजलेल्या त्या सुंदरी-कडे पाहून क्षणभर तो मुग्ध होऊन गेला. आश्चर्यचकित होऊन त्यानें विचारलें, " गेलंच पाहिजे काय म्हणून ? "

" कलकत्त्याचा ताप घेऊन राक्षसी परत आली आहे—कालपासून काकाबाबू देखील तापानं पडलेयत असं कुणी तरी मला सांगितलं. "

" इथं आल्यापासून तू कधींच का त्यांच्या घरीं गेली नाहींस ? "

" नाहीं. "

" तेही कुणी आले नाहींत का इकडे ? "

अचला मान हालवून म्हणाली, " नाहीं. "

" स्वतः रामबाबूही आले नाहींत ? "

" नाहीं. "

या घरीं आल्यापासून खेड्यांतल्या प्लेगच्या भानगडीपायीं सुरेश इतका गुंतून पडला होता, कीं घरची व्यवस्था किंवा लग्याबांध्यांच्या माणसांच्या जाण्यायेण्या-कडे त्याचें लक्षच गेलें नव्हतें. आतां तिच्या तोंडून तें ऐकून तो म्हणाला, " आश्चर्य आहे ! बरं तर. जा. "

अचला म्हणाली, "आश्चर्य त्यांच्या बाबतींत नव्हे, आश्चर्य आहे तें आमच्याच वागणुकीचं. एकजण तापानं पडलेलं अन् एकजण स्वतः आजारी पडलेलं नसलं तरी आपल्या माणसांची उठाठेव करीत राहिलेलं ! आम्हींच तिथं गेलं पाहिजे होतं. "

" ठीक आहे. जा. पण जरा लौकरच परत ये. "

क्षणभर थांबून अचला म्हणाली, " तुम्हीही चला बरोबर. "

" मी कशाला ? "

अचला रागाला येऊन म्हणाली, " स्वतः आजारी पडल्याच्या वेळची आठवण नसेल तर निदान डॉक्टर म्हणून तरी चला ना. "

" बरंय, चल. " असें म्हणून सुरेश कपडे बदलण्यासाठीं शेजारच्या खोलींत गेला.

बिचारा एक्कावाला अजूनपर्यंत कांहीं हुकूम मिळत नाहीं म्हणून तोंपर्यंत वाट पाहात राहिला होता. खालीं आल्यावर अचलेनें तो अजून वाट पाहात असल्याचें पाहिलें त्यावेळीं आपल्या नोकराची हजेरी घेतली आणि भाडें देऊन त्याची रवानगी करायला सांगितलें. सुरेशच्या तोंडाकडे पाहात तिनें भीतभीत विचारलें, " उद्यां—" तीच पुन्हां म्हणाली, " नाहीं—नाहीं. बाबू उद्यां जाणार नाहींत. एक्का नकोय म्हणावं. "

गाडींत चढल्यावर सुरेश समोरच्या बैठकीवर बसत होता, पण अचलेनें आज त्याच्या कोटाचें टोंक धरून त्याला आपल्याजवळ बसायला सांगितलें. गाडी चालू झाली. कुणीच कुणाशीं बोलत नव्हतें. जवळजवळ बसून दोघेंही दोन्हीं बाजूच्या उघड्या खिडक्यांतून दोन बाजूंकडे पाहात राहिलीं होतीं.

बागेंतलें फाटक ओलांडून गाडी जेव्हां रस्त्यावर आली तेव्हां सुरेशनें हळूच हांक मारली, " अचला ! "

" काय ? "

" आजकाल माझ्या मनांत काय घोळतंय माहित आहे ? "

" नाहीं. "

" आजपर्यंत जें कांहीं माझ्या मनांत घोळत होतं, त्याच्या अगदीं उलट आहे हें. त्यावेळीं वाटत होतं, कशी तुला मिळवीन—आज रात्रंदिवस एकच विचार आहे, कशी तुझी सोडवणुक करीन ! आतां तुझा हा भार घेणं मला कठीण जातंय. "

या अगदीं अनपेक्षित आणि अत्यंत निर्दय अशा आघातामुळें क्षणभर अचलेचा सारा देह आणि मन एकदम सुन्न होऊन गेलीं. तिला तें सर्वस्वीं खरें वाटलें होतें असें नव्हे, तरीपण भ्रमिष्ट झाल्याप्रमाणें बसून ती पुटपुटत म्हणाली, " मला अंदाज आलाय तो. पण हें तर—"

" हो. ती माझीच चूक. " सुरेश म्हणाला,—" तुम्ही ज्याला पापाचं फळ म्हणतां तसं ! तरीपण तें एकंदरींत खरं आहे. मन वगळलं तर देहाचा बोजा भारीच असह्य होतो असं स्वप्नांतसुद्धां मला वाटलं नव्हतं. "

अचला वर पाहून म्हणाली, " तुम्ही मला टाकून का निघून जाणार आहांत ? "

यत्किंचितही मागेंपुढें न करतां सुरेश उत्तरला, " तसंच का म्हणेनास ! "

हें त्याचें निःसंकोच उत्तर ऐकून अचला एकदम गप् बसली. तिच्या जखमी झालेल्या हृदयाचें मंथन करून केवळ ही एकच गोष्ट चोंहोकडून डोकें वर करून फिरफिरून सांगत होती, ' हाच तो सुरेश ! हाच तो सुरेश ! आज याच माणसाला तो बोजा दुःसह वाटतोय नी म्हणूनच तो फेंकून देऊन तो पळून जाऊं पहातोय ! सरळ सरळ हें सांगायला देखील आज त्याला संकोच वाटत नाहींसा झालाय. '

आणि विशेष आश्चर्याची गोष्ट ही, कीं हाच माणूस तिच्या अमर्याद दुःखाला कारणीभूत झाला होता. कालपर्यंत याच्या सहवासानें सारा देह विषमय होऊन गेला होता !

तिसऱ्या प्रहरची वेळ, वर ढग आलेले,—त्या निर्जन राजरस्त्यावरून पडसाद देत गाडी वेगानें चालू झाली होती. त्या गाडींत बसलेलीं तीं दोघें—स्त्री आणि पुरुष—एक शब्दही बोलत नव्हतीं. सुरेश कसला विचार करीत होता तें त्याचें त्यालाच माहित ! पण त्यानें उच्चारलेल्या वाक्याच्या कल्पनातीत निष्ठुरतेचा अतिक्रम करून देखील आज नव्या भीतीनें अचलेचें मन हादरून गेलें होतें.

सुरेश नाहीं—ती एकटीच ! हा एकलेपणा केवढा भयानक होता, केवढा विलक्षण होता, याची कल्पना विजेच्या वेगानें तिच्या मनांत खेळूं लागली. अदृष्टाच्या विडंबनामुळें जी होडी या संसारसमुद्रांत भडकून वहावली होती ती तिळातिळानें बुडूं लागली होती, आतां मृत्यु अनिवार्य होता याची तिला पुरेपूर जाणीव झाली. त्याचा तो पक्क्या ओळखीचा, पण भयंकर आसरा सोडून आज ती वाहून जात होती, कुठें वहात होती तें तिला कळत नव्हतें—या कल्पनेनें तिचें सर्वांग गोठून गेलें. आतां आपलें म्हणायला तिला कुणी नव्हतें. तिच्यावर प्रेम करायला, तिचा तिटकारा करायला, तिचें रक्षण करायला किंवा तिची हत्त्या करायला, कुठेंच कुणी नव्हतें. या जगांत ती एकदम निस्संग झाली होती ! ती कल्पना मनांत येतांच तिचा श्वास कोंडून जाऊं लागला.

तिचा अशक्त आणि लुला पडलेला हात धप्‌कन सुरेशच्या अंगावर पडतांच त्यानें चमकून तिच्याकडे पाहिलें. अगदीं निरुद्वेग वृत्तीनें घसा साफ करून ती म्हणाली, " आतां तुम्ही माझ्यावर प्रेम करीत नाहींच का ? "

सुरेशनें हळूच तिचा हात आपल्या हातीं घेतला. तो म्हणाला, " या तुझ्या प्रश्नाचं उत्तर मला निस्संशयपणें देतां येत नाहीं अचला. असं वाटतं, कसं का असेना, एवढं खरं, कीं हा भुताचा बोजा माथीं घेऊन वावरणं आतां मला अशक्य झालंय. "

अचला पुन्हां कांहीं वेळ स्तब्ध राहिली. नंतर अतिशय नाजुक पण केविलवाण्या आवाजांत म्हणाली, " तुम्ही मला आतां दुसऱ्या कुठंतरी घेऊन चला—"

" जिथं कुणी बंगाली नाहीं —अशा जागीं होय ? "

" हो. जिथं हरघडीला लाजेनं मान खालीं घालायचा प्रसंग यायचा नाहीं—"

" तिथं माझ्यावर तुला प्रेम करतां येईल का अचला ? खरं आहे का हें ? " बोलतां बोलतां मनाच्या आकस्मिक आवेगाच्या भरांत त्यानें तिचें मस्तक आपल्या हृदयाशीं ओढून घेतलें आणि तिच्या ओठांचें चुंबन घेतलें.

त्या अपमानाच्या जाणिवेनें अचला हिरवीपिवळी झाली. तिच्या ओंठांना विंचू डसल्यासारख्या वेदना होऊं लागल्या. तरीपण ती मान हालवून पुटपुटली, " हो. पूर्वी एकदा माझं तुमच्यावर प्रेम होतं. नाहीं नाहीं—छीः छीः—कुणी पाहील ना ! —" असें म्हणून त्याच्या हातांतून मान सोडवून घेऊन ती बाजूला होऊन सरळ बसली; पण तिचा हात मात्र त्याच्याच हातांत राहिला होता. त्या हातावर मोठ्या लाडिकपणानें हळूच एक चापटी मारून त्यानें एक मोठा सुस्कारा सोडला.

मोठा रस्ता सोडून गाडी रामबाबूंच्या बंगल्यासमोर बागेच्या फाटकांत शिरली. वेलर घोड्यांच्या जोडीकडून ओढली जाणारी ती जड गाडी आंत जात असतांना सारें घर दणदणलें. पाहातां पाहातां गाडी व्हरांड्यांत येऊन उभी राहिली.

नवाच गणवेश केलेल्या सईसांनीं गाडीचा दरवाजा उघडला तेव्हां सुरेश खालीं उतरला आणि त्यानें हात धरून अचलेला खालीं उतरून घेतलें. अचलेची दृष्टि वरच्या गच्चीकडे होती. तिथें इतर बायकांबरोबरच राक्षसीही बिछाना सोडून धांवत येऊन उभी राहिली होती. फारा दिवसांनीं दृष्टादृष्ट झाल्यामुळें दोघीही

मैत्रिणींच्या चेहऱ्यावर हंसू फुलून आलें होतें. रामबाबू खालींच होते. अंगावरची रजई फेंकून देऊन वात्सल्ययुक्त आनंदानें तिचें स्वागत करून ते म्हणाले, " ये, ये माझ्या मुली, ये. "

त्यांचा आवाज बदलला होता. त्यानीं उत्कंठेनें तिला अशी हांक मारल्यामुळें तिची हास्यानें माखलेली दृष्टि खालीं म्हाताऱ्याकडे वळली—

—त्यांच्या मागल्याच बाजूला महिम उभा होता—

त्याला पाहातांक्षणींच ती एकदम दगडासारखी ताठरून गेली. डोळ्याला डोळे भेटले पण त्या डोळ्यांतली बाहुली हालली नाहीं. अचलेच्या अंगावरचे हिऱ्यामोत्याचे दागिने तसेच झळकत होते, हिऱ्यामाणकांची दीप्ति यत्किंचितही कमी झाली नव्हती. पण साऱ्या हिऱ्यामाणकांच्या आंत असलेलें फुललेलें कमळ एका निमिषांत कोमेजून गेलें होतें.

त्यावेळीं संध्याकाळ झाला होता. त्या वेळच्या अंधुक उजेडांत म्हाताऱ्याची भूल झाली. अपरिचित पुरुष एकाएकीं समोर दिसल्यामुळें ती लाजली असावी, ओशाळली असावी अशी कल्पना करून म्हाताऱ्यानें ती वांकत असतांना तिला वर उचललें आणि म्हटलें, " राहूं दे पोरी, आज माझी पायधूळ घ्यायला नको कांहीं. तूं वर जा—"

अचला कांहीं बोलली नाहीं. डळमळत डळमळत ती आंत निघून गेली.

रामबाबू म्हणाले, " सुरेशबाबू, हे—"

सुरेश म्हणाला, " विलक्षण ! आम्हीं तर एका वेळचे शाळासोबती— लहानपणापासून आम्हीं दोघेही—" असें म्हणत हंसायचा प्रयत्न करीत असतांना चेहेरा विकृत होऊन तो म्हणाला, " काय महिम, अचानक तूं हा—"

पण त्याचें वाक्य पुरें झालें नाहीं. महिम पाठ फिरवून एकदम आंत निघून गेला.

थक्क झालेला म्हातारा सुरेशच्या तोंडाकडे पाहातच राहिला. सुरेश त्यांच्याकडे पाहून हंसायचा प्रयत्न करीत होता, पण त्याचा तो प्रयत्न पूर्णपणें यशस्वी झाला नाहीं.

माडीवर जायच्या लाकडी जिन्यावर अकस्मात कसला तरी मोठा आवाज झाल्यामुळें ते दोघेही स्तब्ध झाले. आंत गडबड उडाली होती. रामबाबू धांवतच आंत गेले. पाहातात तों अचला जिन्याच्या पायथ्याशीं उपडी पडली होती. दोन तीनच पायऱ्या वर गेली असेल नसेल तोंच ती मूर्च्छित होऊन खालीं पडली होती.

## १८

परत येतांना गाडीच्या कोपऱ्यांत माथें खुपसून अचला सारखी विचार करीत होती, ‘ आजच्या मूर्च्छेतून मुळींच जागी झालें नसतें तर ? ’ आत्महत्या करण्याची भयानक कल्पना मनांत आणणेंही तिला अशक्य होतें. अशाच कोणत्यातरी स्वाभाविक कारणानें शांतपणें मृत्यु आला असता तर ! चटकन् शुद्धि जावी, झोंप यावी आणि त्यानंतर जागें होऊं नये—असला कांहीं तरी सोपा सहज मरणाचा उपाय नाहींच का ? कुणालाच माहित नाहीं का तो ?

तिचें लक्ष वेधण्यासाठीं तिला हात लावून सुरेश म्हणाला, “ कुठंतरी निघून जावं असं तूं म्हणत होतीस—येतेस ? ”

“ चला ! ”

“ यानंतर उद्यां इथं तोंड दाखवणं शक्य नाहीं. ”

“ पण ते तर कुणाकडे कांहीं बोलायचे नाहींत ना ? ”

सुरेशनें एक मोठा सुस्कारा सोडला. क्षणभर विचार करून तो म्हणाला, “ नाहीं. मी महिमला ओळखतों. आमच्याबद्दल आलेल्या शिसारीमुळं तो आमचं नांवसुद्धां उच्चारणार नाहीं. ”

सुरेश हें अगदीं सहज बोलून गेला होता. पण तें ऐकतांच अचलेच्या सर्वांगावर शहारे आले. त्यानंतर गाडी घरीं येऊन पोंचेपर्यंत दोघेंही काहींच बोललीं नव्हतीं. सुरेशनें तिला काळजीपूर्वक गाडींतून खालीं उतरून घेतलें आणि म्हटलें, “ आतां जरा झोंप घ्यायचा प्रयत्न कर अचला. मला थोड्या जरूरीच्या चिठ्याचपाट्या लिहायच्या आहेत. ” असें म्हणून तो आपल्या खोलींत निघून गेला.

बिछान्यावर पडून अचला विचार करीत होती. आत्तांच कुठें तिला हें एकविसावें वर्ष - एवढें काय पाप केलें होतें, कीं एवढ्या अवधींत अशी दुर्दशा व्हायचें तिच्या कपाळीं यावें ? हें कांहीं नवें नव्हतें. पुन्हां पुन्हां ती आपल्या मनाला हा प्रश्न करी. लहानपणची जेवढी आठवण होती त्या वेळेपासूनचा आपल्या आयुष्याचा आढावा घेई.

आज अकस्मात तिला मृणालबरोबर एक दिवशीं झालेल्या चर्चेची आठवण आली. तें सूत्र धरून ती पुन्हां पुन्हां त्या चर्चेची मनांतल्या मनांत उजळणी करूं लागली. तिचें विवाहित जीवन तिच्या नवऱ्याच्या सहवासांत गेलें तें एक प्रकारें विरोधाच्या वातावरणांतच. केवळ शेवटचे कांहीं दिवस तिचा नवरा आजारी

होऊन पडला होता त्यावेळीं त्याच्याठायीं पुष्कळशी आपुलकीची भावना निर्माण करून घ्यायला ती समर्थ झाली होती. त्यांच्या जीवनांत ज्यावेळीं कोणत्याही प्रकारची शंका नव्हती, ज्यावेळीं मन निश्चित आणि निर्भय झालें होतें, त्यावेळच्या त्या स्निग्ध, सहज आणि निर्मळ आनंदांत दुसऱ्याचें दुर्भाग्य आणि हालअपेष्टा तिला जास्तच जाणवत होत्या. त्या काळांत एके दिवशीं मृणालच्या गळ्याला मिठी मारून ती सद्गदित होऊन म्हणाली होती, " वन्सं, तुम्ही जर आमच्या समाजांतल्या असतां. आमच्या मताच्या असतां तर तुमचं सारं आयुष्य मी फुकट जाऊं दिलं नसतं. "

मृणालनें हंसून विचारलें होतें, " काय केलं असतंस वहिनी? पुन्हां माझं लग्न करून दिलं असतंस? "

अचला म्हणाली होती, " कां देऊं नये? पण थांबा वन्स, तुमच्या पायां पडतें, शास्त्राच्या गोष्टी काढूं नका. तीं मल्लयुद्ध इतकीं होऊन गेलींयत, कीं कुणी त्यांचा नुसता उल्लेख केला तरीसुद्धां मला भीति वाटते. "

तशीच हंसत मृणाल म्हणाली होती, " ती भीति वाटण्याजोगी गोष्ट आहे खरी. कारण त्यांत असल्या लोकांचा मोर्चा कुठल्या बाजूनं येऊन कसा दाबून टाकील तें सांगतां यायचं काहीं. पण ते लोक जी लढाई करतात ती त्यांचा धंदा लढाईचाच आहे म्हणून—मनगटांत जोर आणि हातांत शस्त्र आहे म्हणून, हें तूं ध्यानीं घेत नाहींस वहिनी. त्यांची ती हारजित त्यांची त्यांच्यापुरतीच. त्यांत आमचं कांहींच नफानुकसान नाहीं. आम्हीं कोणत्याच बाजूच्या कोणत्याही गोष्टी विचारीतच नाहीं मुळीं. "

अचलेनं प्रश्न केला होता, " पण विचारलं असतं तर काय झालं असतं? "

मृणाल म्हणाली होती, " तें कांहीं नीट सांगतां येत नाहीं ग बाई! कदाचित् माझीं मतं तुझ्यासारखींच झालीं असतीं. कदाचित् तुझ्या प्रस्तावाला मी कबुलीही दिली असती. एकादं स्थळही इतक्यांत कुठंतरी आढळलं असतं —" असें म्हणून ती हंसू लागली होती.

त्या तिच्या हंसण्यामुळें चिडून अचलेनें उत्तर दिलें होतें, " आमच्या समाजाच्या बाबतींतली गोष्ट निघाली, कीं तूं ती थट्टेवारी उडवून देतेस हें मला माहित आहे. माझी गोष्ट तूं सोडून दे, पण जे ही लढाई लढतात ते सारेच का धंदेवाईक आहेत? त्यांतला अंतःकरणाच्या जिव्हाळ्यानं कुणी लढतच नसेल का? "

मृणालनें जीभ चावून म्हटलें होतें, " असं कांहीं नुसतं मनांत आणलं तरीसुद्धां पाप लागेल वहिनी. पण तें तसं नव्हे ग बाई ! उद्यां सकाळीं मी जाणार आहें, पुन्हां केव्हां भेट होईल त्याची खात्री नाहीं, पण जायच्यापूर्वी थोडीशी थट्टामस्करी सुद्धां करूं नये का मी ? " बोलतां बोलतां तिचे डोळे पाणावले होते. लगेच आवंढा गिळून गंभीर होऊन ती म्हणाली होती, "—पण मी जें कांहीं म्हणतेंय तें सारंच कांहीं तुला नीटसं कळायचं नाहीं. लग्न म्हणजे तुमच्या दृष्टीनं एक नुसती सामाजिक बाब आहे, म्हणून तुम्ही त्या बाबतींत बऱ्यावाइटाची चर्चा करतां, बुद्धिवाद करून मतामत बदलतां, पण आमच्यालेखीं तो धर्म आहे. लहानपणापासून आम्हीं धर्म म्हणूनच पतीची भावना ग्रहण करीत आलों अहों. हा विषय तर्ककुतर्कांच्या अगदीं पलीकडला आहे ! "

चकित झालेल्या अचलेनें विचारलें होतें, " ठीक आहे—आपण असंच समजूं. पण माणसं धर्म बदलीत नाहींत का वन्सं ? "

मृणाल म्हणाली होती, " बदलीत असतात तीं धर्माबद्दलचीं मतं-पण मूळ अस्सल वस्तु म्हणून जी आहे, ती कधीं बदलतां येतेय का वहिनी ? म्हणूनच या साऱ्या लढाईझगड्याला तोंड देऊन साऱ्या जातींत ती मूळ वस्तु एकच होऊन राहिलीय. पतीच्या गुणदोषांची आम्हीं चर्चा करतों, त्याच्याबद्दलचीं आमचीं मतंही बदलतात, – आम्हीं देखील माणसंच आहोंत ना ? – पण पति म्हणजे आमच्यालेखीं धर्म – धर्म म्हणूनच तो नित्य !—जीवनांतही नित्य, मृत्यूंतही नित्य ! त्यांत आपल्याला बदल करतां येत नाहीं. "

क्षणभर विचार करून अचलेनें विचारलें होतें, " हें जर खरं आहे, तर मग हे अनाचार कां माजतात ? "

मृणाल म्हणाली होती, " धर्म आहे म्हणूनच अनाचार आहे. धर्म गेला कीं अनाचारही जाईल. कुत्रींमांजरं तर अनाचार करीत नाहींत ना ? "

अचलेला यावर काय बोलावें तें सुचेना. ती पुन्हां काहींवेळ विचार करून म्हणाली होती, " हेंच जर तुमच्या समाजाचं धोरण असेल तर या धोरणाचं शिक्षण जे देतात त्यांच्याठायीं एवढा संदेह कां ? एवढा सावधपणा ते दाखवतात तो कशासाठीं ? हे पडदे, बुरखे, बंधनं,–साऱ्या दुनियेपासून लपवूनछपवून ठेवण्यासाठीं हे जिवाचा जो आटापीटा धरतात, तो कशासाठीं ? कसोटीला जागा असती, तर या जबरदस्तीच्या सतीत्वाची किंमत ठरवतां आली असती. "

अचलेचा हा उद्वेग पाहून मृणाल हंसून म्हणाली होती, " ज्यांनीं हे नियम आणि बंधनं घातलीं आहेत, त्यांनाच जाऊन विचार या प्रश्नाचं उत्तर. आमच्या आई–बापांपाशीं आम्हीं जें कांहीं शिकलों आहों, तेंच आम्हीं आचरणांत आणीत आहों. पण एक गोष्ट मात्र तुला मी ठासून सांगतें वहिनी, कीं पति म्हणजे धर्माची बाब, परकालाची बाब म्हणून जे मनःपूर्वक पत्करतात त्यांच्या पायांत बेडी घाला कीं तोडून टाका, त्यांच्या सतीत्वाची कसोटी आपोआपच ठरत असते. " असें म्हणून ती क्षणभर थांबली होती आणि पुन्हां बोलूं लागली होती, "माझ्या पतीला तूं पाहिलं होतंस ना? तो होता म्हातारा माणूस, संसारांत दरिद्री. रूपागुणाच्या बाबतींत चारचौघांपेक्षां तो कांहीं अधिक नव्हता. पण तोच होता माझा इहकाल आणि तोच होता माझा परकाल !–" असें म्हणून तिनें डोळे मिटले होते. जणू काय एक क्षणभर ती आपलें अंतरंग पारखून घेत होती. त्यानंतर डोळे उघडून तिच्याकडे पाहून ती खिन्नपणें हंसून म्हणाली होती,–"एकादा बाप आपल्या आंधळ्यापांगळ्या मुलावर जीव टाकून प्रेम करतो तें कांहीं खोटं नसतं. ही उपमा कदाचित् तुला पटायची नाहीं वहिनी, पण दुसऱ्याचं सुंदर मूल पाहिलं तर क्षणभर त्या बापाच्या मनांत चीड उत्पन्न होते, पण त्यामुळं त्याच्या पितृधर्माला तिळभरसुद्धां बट्टा लागत नाहीं. जायच्यावेळीं तो सर्वस्व कुठं ठेवून जातो तें तर तुला माहित आहे ना ? पण स्वतःच्या पितृत्त्वाचा संशय उत्पन्न होऊन जर त्याचा पितृधर्म भंग झाला तर मग मात्र तिथं मायाममतेचा एक बिंदूसुद्धां शोधून सांपडायचा नाहीं ! पण आमचं हें शिक्षण आणि चिंतन आहे वेगळं. त्याची पद्धतही आहे वेगळीच. माझं हें बोलणं आणि या माझ्या उपमा कदाचित् तुला कळायच्यासुद्धां नाहींत, पण चुकूनसुद्धां तूं या एका गोष्टीवर विश्वास ठेवूं नकोस– स्त्रीधर्माच्या बुद्धीनं जी स्त्री आपल्या पतीला अंतरांत पाहायला शिकली नाहीं, तिच्या पायांतली बेडी कायमची जखडलेली असो कीं सुटलेली असो, स्वतःच्या सतीत्त्वाचं जहाज भलंमोठं आहे अशी ती खुशाल कल्पना करो, कसोटीच्या चोर वाळूंत सांपडल्यावर तिला बुडावंच लागेल !—मग ती बुरख्याच्या आंत असली तरीही बुडेल, बाहेर असली तरीही बुडेल ! " –

तसेंच तर झालें ! अचलेला हें सत्य त्यावेळीं जाणवलें नव्हतें पण आज मृणालनें म्हटलेली ती चोर वाळू जेव्हां तिला आंत ओढून रसातळाला नेऊं लागली तेव्हां तिचे डोळे उघडले. त्या दिवशीं तिनें पुष्कळपरीनें ही गोष्ट तीला समजावून

सांगायचा प्रयत्न केला होता. अबोल आणि अवरुद्ध समाजाच्या स्वातंत्र्यामुळें कानडोळे बंद करून ती आजवर मोठी झाली होती. आपल्या जीवनाची दिशा तिची तिनेंच ठरवली होती, असा तिला अभिमान होता. पण कसोटीच्या वेळीं त्या समाजाचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तिच्यावर संकट आलें तें अगदीं स्नेह-लोभाच्या नात्यानें—काकाबाबूंच्या वात्सल्याचा छद्मवेष धारण करून या अत्यंत वत्सल आणि स्नेहशील म्हाताऱ्याच्या सनातनी वृत्तीचा चरितार्थ करण्यासाठीं त्या रात्रीं तिनें सुरेशच्या शय्येवर आत्महत्त्या करायचा जो घाट घातला होता, त्या दिवशीं तिचें कुणी रक्षण केलें असतें तर तें तिच्या एका सतीधर्मानें ! जीवनांत किंवा मरणांत हा सतीधर्मच चिरस्थायी आहे असें मृणाल तिला सांगू इच्छित होती, पण त्या दिवशीं तिचें बाहेरचें आवरण मोठें वाढून त्यानें तिच्या धर्माचें दिवाळें वाजवलें. जन्मादारभ्य मिळालेलें शिक्षण आणि संस्कार तुच्छ करून तिनें बाह्यजगत् म्हणजेच सर्वस्व असें मानून तें सर्वांपेक्षां श्रेष्ठ ठरवलें. गुप्त आणि गुहाशायी असलेला अंतरांतला अव्यक्त धर्म तिच्या लेखीं केव्हांही सजीव होऊन जाणवला नाहीं. या बाह्यजगाशीं मेळ घालण्याच्या मोहानें तिनें सभ्य स्त्रीची प्रतिष्ठा बाहेरच्या आवरणानें झांकून घेण्याचा प्रयत्न केला आणि शेवटीं तो मोहही तोडून टाकून उजळ माथ्यानें असें म्हणण्याचा तिला धीर झाला नाहीं, कीं काका, आजवर जें मी पर्वतप्राय खोटें सांगत आलें आहें, त्यानंतर मी खरें सांगू गेलें तर कुणी तें खरें मानणार नाहीं. उद्यां तुम्हांला माझें तोंड पहावेंसें देखील वाटणार नाहीं. तुमच्या सतीसाध्वी सुनेच्या घरांत मला प्रवेश मिळणार नाहीं. साऱ्या जगांत माझी विटंबना होईल, तें सारें कांहीं मी सहन करीन, पण तुमचा हा आतांचा भयंकर स्नेह मला सहन करणें शक्य व्हायचें नाही. आजवर तुम्ही मला सती म्हणून म्हटलें, पण आतां हा कलंकच माझ्यालेखीं अक्षय होईल. अशा वेळीं मला तुमचा आशीर्वाद हवा आहे काका ! पण काय झालें ? हे शब्द कांहीं तिच्या तोंडावाटे बाहेर आले नाहींत.

निष्फळ अभिमानामुळें आज तिचा गळा पुन्हां पुन्हां दाटून येत होता. तिच्या हृदयाला होत असलेल्या प्रचंड वेदनेच्या जखमेवर महिमच्या त्या दृष्टीच्या सुरीचा आघात होऊन ती जखम अधिक चिरली जात होती.

अशा रीतीनें विचार करीत असतां अर्धी रात्र उलटली. दुःखाला देखील कुठेंतरी शेवट असतोच, तसेंच झालें आणि तिचा आसवांचा झरा एकदम कोरडा पडला. झोंपेच्या भारानें तिचे डोळे मिटूं लागले.

ती जागी झाली तेव्हां दिवस वर आला होता. सुरेश येईल या अपेक्षेनें दार उघडें ठेवलें गेलें होतें, पण तो आला कीं नाहीं हें तिला कळलें नव्हतें. ती बाहेर आली त्यावेळीं नोकरानें तिला सांगितलें, कीं बाबूजी भल्या पहांटेला उठून एक्का करून माझुलीला गेले.

" कुणी बरोबर गेलं का त्यांच्या ? "

" नाहीं. मी येतों म्हणत होतों, पण मला त्यांनीं नको म्हटलं. ते म्हणाले, प्लेगनं मरायचं असलं तर ये माझ्याबरोबर. "

" म्हणून तूं गेला नाहींस होय ? नुसता एक्का बोलावून आणलास त्यांच्यासाठीं ? मला कां नाहीं उठवलंस ? "

यावर नोकरानें कांहीं उत्तर दिलें नाहीं.

अचलेनें त्याला विचारलें, " एक्का कुणी बोलावून आणला ? तूं का ? "

नोकरानें खालच्या मानेनें उत्तर दिलें, " एक्का बोलावून आणायची जरुरीच पडली नाहीं. काल त्याला घालवून द्यायच्या वेळीं बाबूंनीं ' आज पहांटे ये ' म्हणून त्याला गुपचुप सांगितलं होतं. "

तें ऐकून अचला स्तब्ध झाली. तिचा अंदाज चुकला होता. आज तो सकाळींच उठून निघून जाण्याशीं काल घडलेल्या प्रसंगाचा कांहीं संबंध नव्हता. तसें कांहीं झालें नसतें तरीही तो जाणारच होता. त्याचा तो जायचा बेत त्यानें रद्द केला नव्हता. केवळ तिच्या भीतीनें त्यानें तो कांहीं वेळ तहकूब केला होता एवढेंच.

तिनें विचारलें, " परत केव्हां येणार तें सांगितलं होतं का त्यांनीं ? "

तो म्हणाला, " अगदीं लवकर येतों म्हणाले-परवां किंवा तेरवां—नाहींतर त्याच्या दुसऱ्या दिवशीं खास ! "

अचलेनें त्यानंतर त्याला कांहीं विचारलें नाहीं. काल जिन्यावरून पडल्यावेळीं किती लागलें याची तिला कल्पना आली नव्हती. आज तिचें सारें आंग ठणकूं लागलें होतें. त्याशिवाय रामबाबू आपली चौकशी करायला येतील या भीतीनें तिच्या मनावर जबरदस्त परिणाम झाला होता. महिम कांहीं सांगणार नाहीं असें तिला वाटत होतें. तरीही काय होईल कोण जाणे या शंकेनें प्रतिक्षणाला सावध राहाण्याची ती खबरदारी घेत होती. तिचें सारें लक्ष यावेळीं दरवाजाकडे लागलें होतें.

अशा प्रकारें सकाळ गेली, दुपार गेली, संध्याकाळ गेली. रात्रीं ते येणार

नाहींत असें वाटल्यामुळें ती निर्धास्तपणें बिछान्यावर आडवी झाली. शेजारच्या तिपायीवर एक भलें मोठें औषधाच्या यादीचें पुस्तक पडलें होतें, त्याचीं पानें चाळींत असतांना ती झोंपी गेली.

## १९

बाबू परवां, तेरवां किंवा त्याच्या दुसऱ्या दिवशीं खात्रीनें येतील असें नोकर म्हणाला होता. पण त्यापेक्षांही आणखी एकादा दिवस वाट पहायचा अचलेला धीर झाला नाहीं. त्या तीन दिवसांत रामबाबू इकडे आले नव्हते. ते येतील म्हणूनच ती मनापासून घाबरून गेली होती. ते आले नाहींत याच्या कारणाची निश्चित कल्पना आल्यामुळें ती अगदीं ताठरून गेली होती. रामबाबू आजारी होते, त्यांचा आजार इतक्यांत वाढला असणें शक्य होतें हें तिच्या ध्यानांतसुद्धां आलें नाहीं. सकाळीं त्या घरचा दरवान आला होता पण तो घरांत न येतां बाहेरच्या बाहेर पांडेजींना भेटून गेला होता. तो कां आला होता आणि कसली खबर घेऊन गेला हें विचारायची अचलेला छाती झाली नाहीं. हें घर, इथलीं सारीं माणसें इथून एकदांची निघून जातील तर फार बरें होईल असें तिला तेव्हांपासून वाटूं लागलें होतें.

नोकराला हांक मारून तिनें विचारलें, " रघुवीर, तुझं घर याच बाजूला आहे ना ? तुला माझुली गांव माहित आहे का ? "

तो म्हणाला, " बऱ्याच वर्षांपूर्वी एकदां मी तिकडे गेलों होतों माईजी. "

" इथून किती दूर असेल तें ? "

रघुवीर हा याच प्रदेशांतला माणूस असला तरी बंगाली लोकांच्या सहवासानें बराचसा हिशेबी बनला होता. मनांतल्या मनांत अंदाज करून तो म्हणाला, " सहासात कोसांपेक्षां कमी व्हायचं नाहीं माईजी. "

" आज माझ्याबरोबर येशील का तूं तिकडे ? "

रघुवीर भेदरून जाऊन म्हणाला, " तुम्ही जाणार तिकडे ? तिकडे भारी पिलेगाची बीमारी आहे म्हणे ! "

अचला म्हणाली, " तुला येतां येत नसेल तर दुसऱ्या कुणा नोकराला तयार करशील का माझ्या बरोबर यायला ? तो मागेल तें बक्षीस देईन मी त्याला. "

रघुवीर म्हणाला, " तुम्ही जाणार माईजी, अन् मी काय जाणार नाहीं ? तिथला रस्ता नीटसा नाहीं. आपली मोठी गाडी त्या रस्त्यानं जायची नाहीं. एक्का किंवा डोली केल्याशिवाय तुम्हांला जातां यायचं नाहीं माईजी. "

अचला म्हणाली, “ जें वाहन मिळेल त्यांतून जाईन मी. आतां वेळ घालवून चालायचं नाहीं रघुवीर. कुठलं तरी एक वाहन घेऊन ये.

फारशी हुज्जत न घालतां रघुवीर एक डोली ठरवून घेऊन आला आणि आपला लोटा आणि कांबळें लाठीला अडकवून ती खांद्याला लटकवून तिच्याबरोबर चालत यायला तयार झाला. घरचा दरवान आणि इतर नोकर यांना घरावर नजर ठेवायला सांगून अचला कुठल्यातरी एका अपरिचित माझ्लीला जायला निघाली. एका सुरेशवर नजर ठेवून ती घराबाहेर पडली होती. हा सारा प्रकार तिला एकाद्या अद्भुत स्वप्नासारखा वाटत होता. या विचित्र जगांत अशी कांहींतरी घटना एकाद्या दिवशीं घडून येईल असें तिला केव्हांच वाटलें नव्हतें.

त्या रस्त्यावर सारी धूळ आणि वाळू सांचली होती. क्वचित् पठारावर गेल्यावर तो रस्ता रुंद होत असे, तर एखाद्या लहानशा गांवांत गेल्यावर अरुंद होत असे, तर क्वचित् दिसतही नसे. तिथल्या घरवाल्यांच्या सोयीप्रमाणें आणि मर्जीप्रमाणें केव्हां नदीच्या कांठानें तर केव्हां कुणाच्या घराच्या अंगणांतूनही जावें लागत असे.

जात असतांना तिची जिज्ञासा जागी होत होती. एका मोठ्या कळकीला एक मुडदा टांगून कांहीं लोक तो खांद्यावर घेऊन जात होते, तें पाहून ती घाबरून गेली. मरणारा कोण, त्याचें वय किती, त्याचें कोणकोण आहे आणि तो कशानें मेला, असें तिच्या मनांत येई. संसर्गजन्य रोगाची भीति होती ना ? रस्ता जसजसा काटला जात होता, तसतसा दिवसही ओसरत येत होता. वाटेनें जात असतांना आजूबाजूच्या घरांतून आणि गांवांतून रडारड सुरू असल्याचें ऐकूं येत होतें. त्यामुळें ती एक प्रकारें सुन्न होऊन पेंगू लागली होती.

कांहीं वेळानें तिला फार तहान लागली. तो रस्ता नदीच्या कांठानें जात होता. घाटाजवळ येतांच तिनें डोली थांबवली आणि खालीं उतरून हातपाय धुतले. पाणी पिण्यासाठीं ती खालीं वांकत होती तोंच तिची नजर समोर गेली. एकदोन अर्धवट सडलेलीं प्रेतें पलीकडे नदींत अडकून पडलीं होतीं. त्या बीभत्स दृश्याचा तिच्या मनावर त्यावेळीं फारसा परिणाम झाला नाहीं. अगदीं साहाजीकपणें हातपाय धुवून, पाणी पिऊन ती पुन्हां येऊन डोलींत बसली.

यापुढचीं रस्त्यावरचीं गांवें ओसाड पडलीं होतीं. एकादाच निधड्या छातीचा माणूस खेरीजकरून बाकीचे लोक गांव सोडून पळून गेले होते. घरेंदारें बंद, उकिरडा सांचलेला, कुठें कसला आवाज नाहीं कीं हालचाल नाहीं—

आतां मरण अनिवार्य आहे असें वाटून घरें सुद्धां डोळे मिटून जणूं पुढल्या प्रसंगाची वाट पहात होतीं.

मरणाच्या छायेनें काळवंडून निर्जन झालेल्या या खेडयांतल्या रस्त्यांतून जातांना रघुवीर नी डोलीवाले घाबरून जाऊन खालच्या आवाजांत बोलत होते आणि अचलेला पुढल्या संकटाची जाणीव देत होते, पण तिला यत्किंचितही भीति वाटत नव्हती. अशा भयंकर परिस्थितींत जन्मभर वावरत असल्याप्रमाणें ती निर्विकार मनानें राहिली होती.

शेवटीं एकदांची माझुली आली तेव्हां संध्याकाळ व्हायला आली होती. मुक्कामावर पोंचल्यावर आपल्या साऱ्या दुःखाचा शेवट होईल अशी अचलेची खात्री होती. ती त्या गांवांत पोंचल्यावर गांवच्या कृतज्ञ नरनारी धांवत येतील, तिचें स्वागत करतील, तिला डॉक्टरच्या दवाखान्यांत घेऊन जातील, तिथें रोगी आणि त्यांच्या नात्यागोत्याचे लोक यांची गडबड, औषधपथ्य देण्याची धांदल चाललेली असतांना आपलें स्थान तिथें काय असेल याचें एक कल्पनाचित्र तिनें आपल्या नजरेसमोर उभें केलें होतें. पण ती तिथें जाऊन पोंचली तेव्हां ती कल्पना म्हणजे निव्वळ कल्पनाच होती असें तिला कळून चुकलें. प्रत्यक्ष वस्तुस्थितींत त्या कल्पनाचित्राचें कुठेंच साम्य नव्हतें. वाटेनें येत असतांना रस्त्याच्या दोन्हीं बाजूंनीं जें दृश्य ती पहात आली होती, तसेंच इथेंही चाललें होतें. इथेंही रस्त्यांत माणसें नव्हतीं. घरेंदारें बंद होतीं. इथें कुठें आणि कोणत्या वाडींत सुरेश राहात होता तो पत्ता लावणेंही कठीण होतें.

या गांवांतून रोज बाजार भरत असे, रोज संध्याकाळपर्यंत त्या बाजारांत लोकांची पूर्वी रहदारी चालू असे, पण आतां साथीचे दिवस असल्यामुळें सारी देवघेव उरकून तिसऱ्या प्रहराच्या पूर्वींच लोक पळ काढीत होते. अशा प्रकारचीं बाजार उठल्याचीं लक्षणें ठिकठिकाणीं दिसत होतीं.

बराच तपास केल्यावर रघुवीरनें एक दुकान शोधून काढलें. म्हातारा दुकानदार फाटक बंद करीत होता तो म्हणाला, कीं त्याचीं मुलेंबाळें गांव सोडून दुसरीकडे गेलीं. तरीही त्या म्हाताराम्हातारीला दुकानाची माया तोडून परगांवीं जाणें अशक्य झालें होतें. सुरेशबद्दल पत्ता लागला तो एवढाच—नंद पांडेच्या निमतोल्याच्या घरांत डॉक्टर इतके दिवस राहिले होते. पण ते अजूनही तिथेंच आहेत कीं मामुदपूरला निघून गेले तें त्याला माहीत नव्हतें.

“ मामुदपूर कुठं आहे ? ”

" अगदीं सरळ गेलं, कीं दक्षिणेच्या बाजूला दोन कोस आहे. "

" नंद पांडेचं घर कुठल्या बाजूला आहे ? "

म्हातारा दुकानाबाहेर आला आणि पलीकडल्या एका लिंबाच्या झाडाकडे बोट दाखवून म्हणाला, " या वाटेनं गेलांत, कीं तें सांपडेल तुम्हांला. "

प्रवासानें थकलेले आणि सांथीच्या भीतीनें घाबरलेले डोलीवाले निमतोल्याला येऊन पोंचले तेव्हां सूर्य अस्ताला गेला होता. तें घर बरेंच मोठें होतें. त्याच्या मागच्या बाजूला एकदोन विटांचीं घरें दिसत होतीं. बराचसा भाग उघडा पडलेला होता. घरासभोंवार गडगा नव्हता. घरवाला दरिद्री असावा असें वाटलें नाहीं तरी घरांतला एकही माणूस कुणी बाहेर आला नाहीं. अंगणाच्या एका कोपऱ्याला बांधलेला तट्टू भुकेतहानेनें व्याकुळ होऊन खिंकाळत पाहुण्यांचें स्वागत करूं लागला.

सदर दरवाजा उघडा होता. रघुवीरनें धीर करून आंत डोकावून पाहिलें. पलीकडल्या पडवींत चारपायीवर सुरेश निजला होता आणि त्याच्या जवळच्च खांबाला टेकून एक अतिशय वृद्ध अशी बाई पेंगत बसली होती.

" बाबूजी ! "

सुरेशनें डोळे उघडून पाहिलें. कोपरावर भार देऊन त्यानें मान वर करून पाहून त्याला विचारलें, " कोण रे तो ? रघुवीर ? "

रघुवीर मुजरा करून त्याच्या जवळ जाऊन उभा राहिला. धन्याचे लाली-लाल झालेले डोळे पाहून त्याच्या तोंडून शब्द बाहेर फुटेना.

" तू इथं कसा आलास ? "

रघुवीरनें पुन्हां मुजरा केला आणि बाहेर बोट दाखवून तो नुसतेंच म्हणाला, " माईजी —"

अचंबित होऊन सुरेश उठून बसला आणि म्हणाला, " तिनं पाठवलं का तुला ? "

रघुवीर मान हालवून म्हणाला, " नाहीं. त्या स्वतःच आल्यायत. "

त्याचें उत्तर ऐकून सुरेश त्याच्याकडे नुसता टकमक पहात राहिला. त्यानें काय उत्तर दिलें तें त्याला जणू काय कळलें नसावें. नंतर तो डोळे झांकून हळूहळू बिछान्यावर आडवा झाला, पण कांहींच बोलला नाहीं.

अचला मुकाट्यानें आंत आली आणि त्याच्या खाटेच्या एका कोपऱ्याला

त्याच्या शेजारीं येऊन बसली त्यावेळीं कांहीं काळपर्यंत तो डोळे झांकून स्वस्थ पडला होता. ' ये, बैस. ' एवढें म्हणण्याइतकेंही गृहस्थपण त्यानें दाखवलें नाहीं.

लहानपणापासून सदोदित त्याला अत्यंत लाडावून वाढवलेलें असल्यामुळें तो मनाच्या तात्कालिक प्रवृत्तीला अनुसरून बेछूट वागत आला होता. मन ताब्यांत ठेवण्याची कला त्याला कुणीं शिकवलीच नव्हती. केवळ त्याच दिवशीं— ज्या दिवशीं त्याच्या हंसतमुखावर लाथ मारून तोंड फिरवून महिम घरांत गेला होता त्याच दिवशीं—त्याला पहिल्यानें हा धडा मिळाला. त्याच दिवशीं एका निमिषांत त्याच्या अंतःकरणांत केवढें मोठें वादळ उठलें होतें, तें एक त्याच्या अंतरात्म्यालाच कळलें असेल ! आज तो हतबल होऊन पडला होता खरा, पण त्याचा सर्व देह व्यापून केवढीतरी मोठी वावटळ उठलेली होती. त्या दिवशीं महिमकडून मिळालेला फटका त्यानें जसा सहन केला होता, तसाच आजही तो आंतून उसळणाऱ्या आवेगाशीं मुकाट्यानें लढाई खेळत होता बाहेर कांहीं दिसूं न देण्याची खबरदारी घेत होता.

अशा प्रकारें किती वेळ गेला तें सांगतां आलें नसतें, पण डोलीवाल्यांनीं हांक मारल्यामुळें रघुवीर जेव्हां बाहेर गेला, तेव्हां तो आवाज ऐकून सुरेशनें हळूहळू डोळे उघडले. त्यानें विचारलें, " माझं पत्र मिळालं का तुला ? "

वर नजर करून न पाहातां अचलेनें उत्तर दिलें, " नाहीं. "

सुरेशनें आश्चर्य प्रदर्शित करून विचारलें, " पत्र न मिळतांच आलीस ? आश्चर्य आहे ! कसं का असेना, आलीस तें बरं झालं. एकदां दृष्टभेट तरी झाली–" असें म्हणून तिच्या उत्तरासाठीं क्षणभर तिच्या तोंडाकडे पाहिल्यावर तो स्वतःच म्हणाला, "–माझ्यापायीं तुला अनेक दुखं भोगावीं लागलीं. जन्मभर त्याची आठवण बुजणार नाहीं खास ! पण माझी फार मोठी भूल झाली ती ही, कीं महिमवर तुझं एवढं गाढ प्रेम आहे हें मला केव्हांच कळलं नाहीं मला वाटतं, तुला देखील कदाचित् तें कळलं नसावं !—होय ना ? "

अचला तशीच मान खालीं घालून मुकाट्यानें बसली होती असें पाहून ती म्हणाला, " माणसाचं मन म्हणून कांहीं स्वतंत्र वस्तु नाहीं असा माझा ठाम समज होता. जो कांहीं आहे तो या देहाचा स्वाभाविक धर्म. प्रेम देखील तसंच ! मला वाटलं होतं, कीं कशाही रीतीनं तुझा देह मिळाला कीं तुझं मनही मला मिळेल—तुझं प्रेमही दुष्प्राप्य व्हायचं नाहीं—कोण जाणे, कदाचित् भाग्याची रेषा उमटली असती—कदाचित् सर्वस्व देऊन अशी कांहीं

भीक मागितली असती तर एके दिवशीं तूंही स्वेच्छेनें मला ती भीक घातली असतीस !—पण आतां ती वेळ संपली. वाट पहायला आतां अवसर राहिला नाहीं "—असें म्हणून तो पुन्हां कोपरावर भार देऊन वर उठला आणि संध्याकाळच्या त्या अंधुक प्रकाशांत त्यानें खालीं मान घातलेल्या अचलेच्या तोंडाकडे तीक्ष्ण नजरेनें पाहायला सुरवात केली. तो स्तब्ध राहिला होता.

एकाच्या एकाग्र दृष्टीची दुसऱ्या एकाच्या खालीं घातलेल्या दृष्टीला ओढ लागली असावी–पण ती एक निमिषभरच. अचलेनें पुन्हा झट्कन नजर खालीं घातली आणि ओशाळून हळूच विचारलें, "या भागांतून सारे लोक पळून जाताहेत. इथलं काम उरकलं असेल, तर घर म्हणा किंवा आणखी कुठलातरी देश म्हणा—तिकडे चला आतां यापुढं डिहरीला एक क्षणभरसुद्धां राहाणं मुष्किल झालंय्. "

"तें माझ्यापेक्षां कुणाला अधिक कळतंय ? " असें म्हणून एक मोठा सुस्कारा सोडून सुरेशनें उशीवर डोकें टेकलें.

थोडावेळ तो तसाच पडून राहिला होता. नंतर तो म्हणाला, "आज कसाबसा जिवाचा आटापीटा करून दोन पत्रं लिहून पाठवलीं. एक महिमला अन् एक तुला. इतक्यांत तो निघून गेला नसला, तर माझी खात्री आहे, तो आल्याशिवाय राहायचा नाहीं. "

तें ऐकून अचला घाबरली, दचकली आणि म्हणाली, "त्यांना कशाला ? "

सुरेश तसाच शांतपणं म्हणाला, "आतां मला जरूरी आहे ती एक त्याचीच. लहानपणापासून या जगांत कित्येक दिवस मी कित्येक गुंतवळ केले होते. अन् त्या त्या वेळीं ते उकलण्यासाठीं केव्हांही मला त्याचीच गरज लागत होती. म्हणून आजच्या या प्रसंगीं मला त्यालाच हांक मारावी लागली. त्याच्याएवढं धैर्य या जगांत दुसऱ्या कुणाच्याही ठायीं नाहीं—"

अचलेच्या हृदयांत कालवाकालव सुरू झाली होती. खालीं मान घालून ती शांतपणें त्याचें भाषण ऐकत होती. सुरेश म्हणाला, "माझ्या पत्रांत मी सारं कांहीं साफसाफ लिहून टाकलंय—वाचलंस कीं कळेल तुला. त्या दिवशीं माझ्या इस्टेटीचं पक्कं मृत्युपत्र करून तें मी तुझ्या हातीं सोपवलं आहेच. इच्छा असली तर त्यांतले पुष्कळसे जिन्नस तुला घेतां येतील, पण मी म्हणतों, तसं कांहीं घेऊं नकोस. मी जिवंत असतों तरीही तें सारं गरीबगुरिबांनाच देणार होतों, आतां मी मेल्यावरसुद्धां तें त्यांनाच मिळूं दे. माझं म्हणून जेवढं कांहीं आहे, त्याच्याशीं कुठलाही संपर्क येऊं देऊं नकोस अचला ! तूं निश्चिंत हो—निर्विघ्न हो. माझ्याशीं

असलेले सारे कांहीं लागेबांधे सर्वतोपरी तोडून फेंकून दे. माणसानं प्रयत्न केला तर या जगांतलीं अनेक दुःखं त्याला सहन करतां येतात. मी दिलेलं दुःख देखील तूं एके दिवशीं अनायासें सहन करायला समर्थ होशील."

त्याची त्यावेळची वागणूक आणि त्यावेळचें धोरण पाहून अचला एक प्रकारें घाबरली होती. हें शेवटचें भाषण ऐकून तर तिचा थरकांप उडाला. ती म्हणाली, "कशाला या गोष्टी काढतांहां ? उठून बसा ना. एकदां इथून कसं बाहेर पडायचं या उद्योगाला लागूं या आतां."

तिची ती साशंक आणि घाबरलेली वृत्ति पाहून सुरेशनें तिला कांहीं उत्तर दिलें नाहीं. खांबाला टेकून जी म्हातारी पेंगत होती ती आतां जागी झाली. तिनें विचारलें, "आतां घरांत जाणार, कीं दिवा इथं घेऊन येऊं ?" तिलाही कांहीं उत्तर मिळालें नाहीं तेव्हां अचलेला वाटलें, कीं त्याला गुंगी आली असावी. उद्विग्न होऊन अचला त्याला पुन्हां तोच प्रश्न विचारणार होती तोंच सुरेशनें डोळे उघडले आणि अगदीं स्वाभाविकपणें म्हटलें, "महत्त्वाची गोष्ट मी अजून तुला सांगितलीच नाहीं. अचला, मी आतां मरणाच्या दारीं उभा आहें. आतां मला जगायची मुळींच आशा नाहीं."

अचलेच्या तोंडून एक अस्फुट आणि अव्यक्त उद्‌गार बाहेर आला. लगेच ती दगडाच्या पुतळीसारखी ताठरून बसली.

सुरेश बोलत होता, "मी पूर्वींच वुईल करून ठेवलं होतं, त्यामुळं मी जाणूनबुजून मरणाच्या खाईत उडी घेतली असा कुणाचा समज झाला असेल तर तो खोटा आहे. ती बदनामी होईल माझी. मी शक्य तेवढी खबरदारी घेतली होती, पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. जर कधीं तुला कुणी विचारलं तर त्याला सांग, जशीं इतर चार माणसं मरतात तसाच मी मेलों—मरण चुकवणं अशक्य झालं म्हणून मेलों—नाहींतर माझी मरायची इच्छा नव्हती. हें मुद्दाम ओढवून आणलेलं मरण आहे, त्यांत कांहीं विशेषत्त्व आहे, असा अपवाद माझ्या मागं कुणी करूं नये."

अचला उगीच राहिली होती. तिची बोलण्याची शक्तीच नष्ट झाली होती हें त्या कातरवेळच्या अंधुक प्रदेशांत तिच्या भयभीत झालेल्या मुद्रेकडे पाहूनही सुरेशला कळलें नाहीं.

त्यानें क्षणभर आपलें मन सांवरून घेतलें आणि म्हटलें, "मला इथं आल्याशिवाय राहावेना म्हणून मी तुला न कळवतां पळून आलों. इथं येऊन

पाहिलं तो सारा गांव ओस पडला होता. या घरांतला एक नोकर मेला होता आणि त्यांची कांहींच व्यवस्था न करतां घरांतलीं सारीं माणसं पळून गेलीं होतीं. तीं आधींच गेल्यामुळं मला त्यांना धरून ठेवतां आलं नाहीं, पण त्या प्रेताची मी वासलात लावली. नंतर आपणही घरीं जावं असं मी ठरवलं, पण दुपारींच एक पोरगा रडत रडत आला. त्याची आई आजारी पडली होती. तिला वांचवायला जातांना शेवटीं मीच सांपडला गेलों. मी पुष्कळांची अशी व्यवस्था केली होती, चांगली सावधगिरी घेतली होती, पण दुर्दैवानं एक्याच्या चाकाला करंगळी केव्हां घासली गेली तें मला कळलें नाहीं. हात धुतांना जखम पाहिली. तसाच परतलों अन् जें कांहीं करायचं तें केलं. घरीं यायची सोय झाली असती तर लगेच आलों असतों—मुळींच थांबलों नसतों!—काल रात्रीं आंग गरम झालं. तो ताप कसला हें मला तेव्हांच कळलं होतं. तेव्हांच मी कशीबशी तुम्हां दोघांना दोन पत्रं लिहिलीं आणि एक माणूस गांठून तीं त्याच्याबरोबर पाठवून दिलीं."

अचला सद्गदित होऊन म्हणाली, "अजून उपाय आहे. तुम्हांला डोलींत घालून आत्तांच आपण बाहेर पडूं. एक क्षणभरसुद्धां थांबायचं नाहीं इथं."

"आणि तूं?"

"मी चालत येईन. माझी काळजी करूं नका तुम्ही."

"चालत येशील? इतक्या लांब?"

"तुमच्या पायां पडतें, आतां तुम्ही नाहीं म्हणूं नका." बोलतां बोलतां तिला रडें कोसळलें.

एक निमिषभरच तो गप्प राहिला होता. नंतर एक मोठा सुस्कारा सोडून म्हणाला, "ठीक आहे. चल तर. पण मला वाटतं, आतां त्याची कांहीं जरुरी नाहीं."

अचलेनें बाहेर येऊन पाहिलें. झाडाखालीं बसून रघुवीर भाजलेले फुटाणे खात होता. ती त्याला म्हणाली, "बाबूंची प्रकृति भारीच बिघडलीय. त्यांना आत्तांच इथून नेलं पाहिजे. डोलीवाल्यांना म्हणावं, ते मागतील त्याच्यापेक्षांही मी जास्त देईन, पण आतां इथं एक क्षणभरसुद्धां थांबायचं नाहीं."

मालकिणीची काकुळतीची भाषा ऐकून रघुवीर दचकून उठून उभा राहिला नी म्हणाला, "दोघांना उचलून नेतां यायचं नाहीं त्या डोलीवाल्यांना माईजी."

"नाहीं नाहीं—दोघांना नव्हे! दोघांना नव्हे! मी चालत जाईन. आतां एक मिनिटसुद्धां लावूं नकोस रघुवीर. आतां लौकर निघूं. कुठं आहेत ते?"

रघुवीर म्हणाला, " मजुरीचे पैसे घेऊन ते दुकानावर कांहींतरी खायला घेण्यासाठीं गेलेयत. आतांच बोलवून आणतों त्यांना माईजी. " असें म्हणून शिलकी चणे धोतराच्या गांठीला बांधीत बांधीत तो पळतच निघाला.

अचला परत आली आणि सुरेशच्या उशाशीं बसली. त्याच्या कपाळावर हात ठेवून तिनें पाहिलें तेव्हां तापाचें प्रमाण पाहून ती घाबरून गेली. मुनियाची आई केरोसीनचा डबा पेटवून पलीकडे जमिनीवर ठेवून गेली होती, त्याच्या धुरानें सारी खोली भरून गेल्यामुळें तो डबा बाजूला करायला अचला गेली असतांना तिला औषधाची बाटली दिसली. तिनें विचारलें, " हें तुमचंच का औषध ? "

सुरेश म्हणाला, " हो, माझंच. काल मीच तयार करून ठेवलं होतं, पण घेतलं नाहीं. इकडे दे तें—"

अचलेला तें बोलणें फार लागलें, पण औषध न घेण्याच्या बाततींत तिनें अधिक चर्चा केली नाहीं. त्याला औषध देऊन ती तशीच त्याच्या उशाशीं मुकाट्यानें बसली. बराच वेळपर्यंत सुरेश कांहीं बोलत नव्हता, पण तो मुकाट्यानें किती यातना सहन करीत होता याची कल्पना येऊन अचलेचें ऊर फाटून गेलें.

उशीर होत होता, पण रघुवीरचा पत्ता नव्हता. मधूनमधून ती पाऊल न वाजवतां जाऊन दाराबाहेर डोकावून पाही. काळोखांत जोंवर नजर पोंचत होती तोंवर पाहिलें तरी कुठें कुणाची चाहूल लागली नव्हती. आपली ही उत्कंठा सुरेशच्या नजरेला येईल म्हणून ती अगदीं घाबरून गेली होती.

रात्र वाढत होती. खांबाशीं बसलेल्या मुनियाच्या आईचें घोरणें ऐकूं येत होतें. इतक्यांत भुकेनें व्याकुळ झालेला आणि रस्ता चुकलेला रघुवीर निराश होऊन आला आणि म्हणाला, कीं बऱ्याच वेळापूर्वी डोली घेऊन डोलीवाले निघून गेले. त्यांचा कुठेंच पत्ता लागला नाहीं.

सारें कांहीं विसरून जाऊन अचला पुन्हां विचारीत होती, " केव्हां गेले ते ? कुठल्या वाटेनं गेले ? ते कां गेले ? माझ्याकडे कांहीं असेल नसेल तें सारं देतें, पण एकादी डोली मिळायची नाहीं का आतां ? "

रघुवीर मान खालीं घालून उगीच राहिला होता. त्याच्याच हलगर्जीपणामुळें हा प्रसंग आला याची त्याला कल्पना आली होती, म्हणूनच जीव टाकून सारे प्रयत्न करून पाहिल्यावरच तो परत आला होता.

तिकडे खाटेवर एकजण तसाच मुकाट्यानें पडून राहिला होता. अचलेच्या या

अस्वस्थतेचा त्याच्यावर कांहींच परिणाम होत नव्हता. रघुवीर निघून गेल्यावर तो म्हणाला, " असं घाबरून काय होणार अचला ? ते मिळाले असते तरीही कांहीं उपयोग झाला नसता. हेंच बरं—माझ्या दृष्टीनं हेंच बरं. "

अचला कांहीं बोलली नाहीं. अनंताच्या मार्गावर प्रवास करायला निघालेल्या त्या माणसाच्या माथ्यावर हात ठेवून ती दगडाच्या पुतळीसारखी ताठरून बसली होती.

तिच्या चोहों बाजूला स्मशानशांतता पसरली होती. बाहेर रात्र अधिकाधिक काळोखी होत चालली होती. डोळ्यांसमोर काळें आकाश अधिकाधिक काळवंडत होतें. तिकडे पहात असतांना तिला वाटत होतें—कां हें असें होतेंय—कां हें असें होतेंय ?

तिच्या जीवनाच्या कुरुक्षेत्रांत जी एवढी मोठी लढाई सुरू झाली होती, तिची कांहीं जरूरी होती का ? दुनियेंतला जंजाळ, सारा हीनपणा, सारा स्वार्थ मिटवून आजच्या रात्रींत तिचा शेवट व्हायचा आहे का ? त्यानंतर हें सारें जीवन कुरुक्षेत्रासारखेंच स्मशान बनून अनंतकाळ उजाड होऊन रहाणार आहे का ? चिता जळल्याचा मागमूससुद्धां इथें कुठें कुणाला सांपडणार नाहीं का ? जगाच्या उलाढालींत काय होती याची जरूरी ?

पण हें कुरुक्षेत्र कां माजलें ? कुणी माजवलें ? सारें ऐश्वर्य, सारी संपत्ति आणि आप्तगणगोतांपासून तुटलिक करून घेऊन हा माणूस जो अगदीं निरुपाय होऊन आज मरणाच्या दारीं उभा आहे, त्यानें एकट्यानेंच हा अनर्थ घडवून आणला होता का ? आणखी कुणाच्याच मनांत कसलाही लोभ, कसलाही मोह छपून राहिलेला नाहीं का ? कुठें कुणी कसलेंच पाप कधीं केलें नाहीं का ?

असा विचार करीत असतांना ती एकदम धक्का लागल्यासारखी भानावर येऊन चळवळ करूं लागली. कुणीतरी दोन हातांनीं आपला गळा दाबतें आहे असें तिला वाटलें. तितक्यांत सुरेशनें पाणी मागितलें. खालीं वांकून पाणी घेऊन त्याच्या तोंडांत घालून ती पुन्हां तशीच स्वस्थ बसली. ती थकली नव्हती, खचली नव्हती, तिच्या डोळ्यांवर झोंपेचा आभाससुद्धां येत नव्हता. कोरड्या नजरेनें डोळे ताठरून ती आकाशाकडे टक लावून बसली होती.

बऱ्याच दिवसांपूर्वीं तिनें ' महाभारत ' काळजीपूर्वक वाजून पुरें केलें होतें. त्यांतल्या शेवटींच्या सर्वनाशाचा इतिहास त्यावेळीं तिच्या नजरेसमोरून जाऊं लागला होता. तिथें रक्ताचे कितीतरी पाट वाहिले होते. कितीतरी अजाणते लोक मारामारी, कापाकापी होऊन मरून गेले होते. हजारों हजार चिता धगधगल्या

होत्या आणि निवूनही गेल्या होत्या. त्यांच्या धुराच्या लोळांनीं स्वर्ग—लोका-प्रमाणेंच मृत्युलोकही झांकळून एकाकार झाला होता.

कांहीं वेळपर्यंत सुरेश गुंगींत असावा —त्याची कांहीं हालचाल होत नव्हती. अशा प्रकारें किती वेळ गेला, कसा गेला, रात्र संपून पहांट केव्हां आणि कशी झाली याचा अचलेला पत्ता लागला नाहीं. तिच्या मिटलेल्या डोळ्यांच्या कोपऱ्यांतून पाणी पाझरत होतें. तिचे थकलेले हात सुरेशच्या उशीवर पडले होते. मनाची सारी शक्ति एकवटून ती म्हणत होती, ‘ हे ईश्वरा, मी अनेक दुःखं भोगलीं, अनेक यातना अनुभवल्या, आज माझ्या साऱ्या दुःखांच्या आणि यातनांच्या बदल्यांत मला क्षमा करून तूं आपल्यापाशीं घेऊन जा. मला आई नाहीं, बाप नाहीं, नवरा नाहीं—या अत्यंत मोठ्या लज्जास्पद परिस्थितींत उभं राहायला कुठं जागा नाहीं. मी किती सहन केलंय तें तुलासुद्धां माहित नसेल. आतां मला जिवंत ठेवूं नकोस प्रभो ! मला सुद्धां तुझ्या पायापाशीं ओढून ने.’

किती किती प्रकारें पुन्हां पुन्हां ती अशा प्रकारें देवाला आळवीत होती त्याला सुमारच नव्हता—डोळ्यांवाटे किती आसवें पाझरलीं त्याला सीमाच नव्हती.

“ माईजी ? ”

नुकतीच पहांट झाली होती. अचलेनें दचकून पाहिलें. कुणाला तरी आंत येण्यासाठीं दरवाजा उघडून धरून रघुवीर तिथें उभा होता.

‘ काय आहे रघुवीर ? ’ असें ती म्हणत होती तोंच तिची नजर समोर गेली महिम आला होता. ती थरथर कांपू लागली. तिची नजर खालीं गेली. दारापाशीं एक क्षणभर महिमचा पाय अडला. या जागीं अशा प्रकारें तिची भेट होईल अशी त्याची अपेक्षा नव्हती.

पण लगेच तो संथपणें जवळ येऊन उभा राहिला. त्यानें हळूच विचारलें, “ सुरेशचं कसं काय आहे आतां ? ”

अचलेनें वर पाहिलें नाहीं. तोंडावाटे शब्द बाहेर काढला नाहीं. नुसती मान हालवून “ आपल्याला कांहीं कळत नाहीं ” असें तिनें सुचवलें.

एक मिनीटभर पाहून घेऊन महिमनें सुरेशच्या मस्तकावर हात ठेवला तेव्हां त्यानें डोळे उघडून पाहिलें त्याचे लालीलाल झालेले ज्योतिहीन डोळे पाहतांच महिमच्या तोंडून सहसा शब्द बाहेर फुटला नाहीं. नंतर तो म्हणाला, “ कसं काय वाटतं सुरेश ? ”

"ठीक नाहीं!—मी चाललों! तूं येशील असं मला वाटलंच होतं—माझ्यासमोर येऊन बैस."

महिम त्याच्या बिछान्याच्या एका कोपऱ्याला त्याच्या पायांशीं बसला. तो म्हणाला, "डिहरीला डॉक्टर आहे. माझ्या एक्क्यांत बसून कसाबसा—"

सुरेश मान हालवून म्हणाला, "नाहीं. आतां ही ओढाताण नको. फुकट जाईल मेहनत. आतां मला Quietly जाऊं दे."

"पण अजून तर—"

"हो—अजून शुद्धीवर आहें—पण मधूनमधून बेशुद्ध होतों. माझं हें जीवन गरीबगुरीब, दुःखी, दरिद्री लोकांच्या कामाला लावायचं राहून गेलंय्—, पण माझी एस्टेट तरी त्यांच्या कामीं लागूं दे महिम! एवढ्यासाठींच तुला एवढा त्रास देऊन बोलावून आणलं—नाहींतर मरायच्या क्षणाला क्षमा मागण्याचं काव्य करायची प्रवृत्ति मला नाहीं."

महिम स्तब्ध राहिला होता. सुरेश बोलत होता. "तसलं कांहीं मला पटत नाहीं—मला तें आवडतही नाहीं. एक दिवसापुरती क्षमा मागायचा मला लोभही नाहीं. जाऊं दे!—मी मृत्युपत्र केलंय. अचलेला मी कांहीं दिलेलं नाहीं. तिचा आणखी अपमान करायला माझा हात वाहिला नाहीं—तरीपण तशीच जरूर पडली तर तिला कांहींतरी दे."

महिम अगदीं गहिंवरून आला होता. तो म्हणाला, "मला यांत कां गुंतवतोस सुरेश?"

सुरेश म्हणाला, "तुला गुंतवणं कठीण आहे म्हणूनच गुंतवतों. ज्याला लोभलाभ नाहीं, न्यायअन्यायाची दृष्टि आहे--" एकदम त्यानें वर पाहिलें आणि म्हटलें, "सारी रात्र तूं बसून राहिली आहेत अचला. जा, जरा तोंडबींड धुऊन ये. मुनियाची आई तुला दाखवून देईल."

ती निघून गेल्यावर तो म्हणाला, "एकाच गोष्टीचं मला भारी दुःख होतंय—अचलेचं तुझ्यावर किती प्रेम आहे तें मला कळलं नव्हतं, तुला कळलं नव्हतं अन् तिला स्वतःलाही कळलं नव्हतं. तुझ्या दारिद्र्याच्यापायीं ती इतकी सतावली गेली होती,—जाऊं दे. एवढ्या सुंदर वस्तूची मी माती करून टाकली. ती नाहीं मिळाली मला स्वतःला अन् दुसऱ्यालाही मी मिळूं दिली नाहीं. पण आतां काय त्याचं? आत्याबाईवर लक्ष ठेव—हें दुःख तिला असह्य होईल."

म्हातारी मुनियाची आई औषधाची बाटली घेऊन समोर आली तेव्हां तो

चिडून म्हणाला, " नको नको—आतां औषध नको. थोडं पाणी दे.–एक नाटक लिहायला घेतलं होतं मी महिम, माझ्या ड्रावरांत आहे तें—वाटलं तर वाचून पाहा. "

महिमला त्याच्या तोंडाकडे पाहावत नव्हतें. खालीं मान घालून तो ऐकत होता. वर नजर करून तो आतां कांहीं बोलणार होता तोंच त्याला थांबवून सुरेश म्हणाला, " आतां नको महिम, जरा झोंपतों. जेवणखाणाची सारी तयारी आहे इथं, पण तें तुला रुचायचं नाहीं—" असें म्हणून त्यानें डोळे मिटून घेतले.

एक क्षणभर थांबून महिम म्हणाला, " माझी एक शेवटची विनंति ऐकशील सुरेश ? "

" काय ? "

" तूं अजून केव्हां ईश्वराबद्दल विचार केला नव्हतास, आतां तरी—"

" तसलं कांहीं आवडत नाहीं मला ! " असें म्हणून तोंड वांकडें करून सुरेश कुशीवर वळून झोंपी गेला.

हृदयांतून निघणारा एक मोठा सुस्कारा मोठ्या कष्टानें आवरून महिम स्तब्ध उभा राहिला होता.

## २०

रामबाबू घरीं नव्हते. दुसरे दिवशीं ते बक्सारहून आले तेव्हां त्यानीं महिमचें पत्र वाचलें. लगेच ते यायला निघाले. सारा रस्ताभर घोड्याला निर्दयपणें हांकलीत अर्धमेला करून ते जेव्हां माझुलीला येऊन पोंचले तेव्हां दिवस खालीं गेला होता. ते कुणीतरी पोलीसचे दरोगे असतील असें वाटून दुकानदारानें स्वतः त्यांना नंद पांड्यांच्या घरीं आणून पोंचवलें. त्याच्याकडूनच त्यांना अचला तिथें आल्याची बातमी कळली.

सदरदरवाजा उघडा होता. आंत पाऊल टाकतांच रामबाबूंना जें काय कळायचें तें कळून चुकलें. दोन घटकांपूर्वी सुरेश स्वर्गवासी झाला होता. खाटेवर त्याचा मृतदेह आपादमस्तक झांकून ठेवलेला होता आणि त्याच्या पायाशीं अचला बसून राहिली होती.

अचानक हें दृश्य नजरेसमोर आल्याचा म्हाताऱ्याच्या मनावर परिणाम झाला. ' आई ग ! ' म्हणून ते मोठमोठ्यानें हुंदके देऊन रडूं लागले. अचलेनें नजर वर करून त्यांच्याकडे पाहिलें आणि लगेच मान खालीं घालून ती स्तब्ध

होऊन बसून राहिली. त्यांचा तो हंबर्डा तिच्या कानीं गेला, पण अंतरांत पोंचला नाहीं.

महिम परसवांत लांकडें शोधीत होता. रडण्याचा आवाज ऐकतांच तो धांवतच आला. तो रामबाबूंना म्हणाला, " थोड्या वेळापूर्वीच सुरेश गेला रामबाबू. तुम्ही आलांत, फार चांगलं झालं, नाहींतर मला एकट्याला फार कठीण गेलं असतं ! "

रामबाबू कांहीं न बोलतां डोळे पुसूं लागले. काय बोलावें, काय करावें, या मुलीच्या नजरेसमोर या भयंकर कामांत मदत करायला कसें पुढें सरावें तें त्यांना कळत नव्हतें.

महिम म्हणाला, " नदी फारशी दूर नाहीं. रघुवीर थोडीं लांकडं घेऊन तिकडे गेलाय. तो आणखीही कांहीं लांकडं मिळवतोय—तीं पुढं पाठवून देऊन आपण तिघेजण त्याला घेऊन जाऊं. गांवांत दुसरीं कुणीं माणसं नाहींत. अन् असतीं तरी तीं बंगाल्याच्या मढ्याला शिवलीं नसतीं. "

रामबाबूंना त्याची कल्पना होती. अचलेला न कळूं देतां त्यानीं हळूच विचारलें, " आपण दोघे जाऊं—तिसरा कोण ? "

महिम म्हणाला, " रघुवीरही जरा हात लावील. "

तें ऐकून म्हातारा अस्वस्थ झाला आणि म्हणाला, " नाहीं नाहीं—तें मुळींच नाहीं चालायचं. ब्राह्मणाच्या प्रेताला मी दुसऱ्या कुणाला शिवूं द्यायचा नाहीं. नदी फारशी दूर नाहीं, आपण दोघेच कसेबसे तिथवर घेऊन जाऊं. "

" बरं तर. " असें म्हणून महिम पुन्हां आंत जाऊन लांकडें गोळा करायच्या तयारीला लागला. रामबाबू पडवीच्या एका टोंकाला खांबाला टेंकून तोंड फिरवून गुपचुप बसले होते.

आतां त्यांचें वय झालें होतें. या उभ्या आयुष्यांत त्यानीं मृत्यूचे अनेक प्रसंग पाहिले होते. अनेक मोठ्या शोकप्रसंगांतून त्यानीं हळूहळू मार्ग काढला होता. दुःसह दुःखाच्या त्या करुण सुराची एकेक तार जी त्यांच्या हृदयवीणेला जोडली गेली होती, आज ती छेडली जातांच बेसूर वाजूं लागली. एके दिवशीं ' काका ' म्हणून हीच सुरमा त्यांचें हृदय कवटाळून बसली होती तें चित्र ते विसरले नव्हते. आज देखील तें पितृवात्सल्य त्याच लोभानें आंतल्या आंत गिरक्या घेत त्यांना गुदमरून टाकीत होतें. तिचें सांत्वन कसें करावें तें त्यांना कळत नव्हतें. तिला धीर द्यायला कुठें कसला आधार आहे हेंही त्यांना माहित नव्हतें. तरीही

त्यांच्या शोकाकुल मनांतून अशी उर्मि येत होती, कीं या मुलीला हृदयाशीं कवटाळून धरावें आणि म्हणावें, ‘ भीतेस काय मुली, मी आहें ना इथं हयात ! ’

पण तो सूर वाजला कुठें ? त्यांची ती तहान भागविण्यासाठीं त्यांचें पाऊल कांहीं पुढें पडत नव्हतें. सुरमा मुकाट्यानें तशीच बसली होती. दूरच्या नात्यानें परकीपणाची भिंत मधें उभारून तिनें स्वतःला त्यांच्यापासून दुरावून घेतलें होतें.

दुःखाच्या आणि विपत्तीच्या काळांत अनेक दुर्ज्ञेय वेदना ती मुकाट्यानें सहन करीत आली होती. तिच्या जीवनांतील प्रच्छन्न रहस्य तिला मधून मधून डिवचीत होतें, पण तिनें केव्हांच त्याच्यापुढें मान वांकवली नव्हती. सारा संशय स्नेहाच्या आवरणाखालीं दडपून टाकून बाहेरचें आकाश तिनें निर्मळ ठेवलें होतें. पण आजच्या प्रसंगामुळें मात्र तिचें आजवरचें निष्ठुर धैर्य, इतके दिवसपर्यंत आड केलेल्या स्नेहाला चिरून टाकून, तिचें अंतःकरण कलुषित वृत्तीनें जणू काय भरून टाकित होतें.

सूर्य अस्ताला गेला. तिकडची सर्व तयारी कशीबशी करून महिम रामबाबूंना म्हणाला, “ आतां त्याला घेऊन गेलं पाहिजे !–” तो अचलेकडे वळून म्हणाला, “ मी दिवा लावून ठेवला आहे, तूं मुनियाच्या आईजवळ बसून राहा. आम्हांला परत यायला फारसा उशीर लागायचा नाहीं. ”

अचला कांहीं बोलली नाहीं. रामबाबू जिवाचा धडा करून उभे राहिले आणि अचलेकडे पाहून म्हणाले, “ मुली, बोलतांना माझं काळीज फाटून जातंय्, पण स्त्रीचं शेवटचं कर्तव्य तुला करायला हवं. तुलाच मुखाग्नि द्यायला —” बोलतां बोलतां ते एकदम होहो करून रडूं लागले.

अचलेचें तोंड सुकून गेलें होतें. तिचे डोळे कोरडे झाले होते. त्या तशाच कोरड्या नजरेनें ती क्षणभर त्यांच्याकडे पाहात राहिली होती. ती अत्यंत शांतपणें म्हणाली, “ मुखाग्नि द्यायची जरूरी असली तर मी अवश्य देईन. हिंदुधर्माच्या दृष्टीनं त्यांत जर कांहीं श्रेय असलं तर तें मी फुकट घालवणार नाहीं. मी त्यांची स्त्री नाहीं ! ”

रामबाबूंना जबरदस्त धक्का बसला. तारवटलेल्या डोळ्यांनीं ते तिच्याकडे पाहात राहिले होते. नंतर ते हळूच म्हणाले, “ तूं सुरेशची बायको नव्हेस ? ”

अचला तितक्याच खंबीरपणें म्हणाली, “ ते माझे पति नव्हेत. ”

एका झटक्यासरशीं साऱ्या घटना रामबाबूंच्या नजरेसमोर दिसून गेल्या. त्यांच्या घरीं ती आश्रयाला आल्यापासून सुरवात करून त्या दिवशी ती जिन्यावरून पडे-

पर्यंतचे सर्व प्रसंग विजेच्या वेगानें त्यांच्या मनांत पुन्हां पुन्हां जागे झाले. आतां या बाबतींत संशयाचा मागमूसही राहिला नव्हता. ही कोण, कोणाची मुलगी, हिची जात कोणती — कदाचित् ही वेश्याही असेल — हिला आपण 'मुली' म्हटलें, हिच्या हातचें अन्न खाल्लें, हिच्या हातच्या अन्नाचा नैवेद्य देखील देवाला दाखविला, या सर्व गोष्टी आठवून त्यांचें सर्वांग शहारून उठलें. ते घामाघूम झाले. श्रद्धा, माधुर्य आणि करुणेनें आजवर जें वात्सल्य अभिषिक्त होऊन राहिलें होतें तें वाळवंटांतल्या पाण्याच्या थेंबासारखें पाहातां पाहातां नाहींसें झालें. त्याचा मागमूससुद्धां राहिला नाहीं.

केवळ तेच नव्हेत, तर महिमसुद्धां स्तंभित होऊन उभा राहिला होता. तो म्हणाला, " तें आतां होणं नाहीं रामबाबू. चला आपण त्याला घेऊन जाऊं. "

" चला. " असें म्हणून रामबाबू झोंपेंत चालल्याप्रमाणें त्याच्याबरोबर निघाले. स्वतःवर आलेल्या प्रसंगाच्यापुढें बाकीच्या साऱ्या दुर्घटना सावलीसारख्या मावळून गेल्या होत्या. त्यांच्या दोन्ही कानांत सारखा आवाज होत होता, 'जात गेली ! धर्म गेला ! हा मानवजन्म व्यर्थ व्यर्थ होऊन गेला !'

सुरेशची उत्तरक्रिया कशीबशी पुरी करायला फारसा वेळ लागला नाहीं. त्या मुदतींत रामबाबूंच्या तोंडून एक शब्दही बाहेर पडला नाहीं. परत आल्याबरोबर त्यांनीं सरळ एक्का जोडायला हुकूम दिला.

महिमनें विचारलें, " आत्तांच निघालां का आपण ? "

रामबाबू म्हणाले, " हो. काशीला जाण्यासाठीं मला सकाळची गाडी पकडली पाहिजे. आत्तांच निघालों नाहीं तर वेळींच पोंचतां यायचं नाहीं. "

त्यांचा उद्देश महिमच्या ध्यानीं आला—प्रायश्चित्त घेण्यासाठीं ते काशीला जायला निघणार होते. शक्य तितक्या संकोचानें त्यानें रामबाबूंना विचारलें, " आम्ही विदेशी लोक, इकडची आम्हांला कांहीं माहिती नाहीं. दया करून हिच्या जाण्याची कांहीं व्यवस्था—"

त्याचें वाक्य पुरें झालें नाहीं. अचलेला बरोबर नेण्याचा प्रस्ताव कानीं पडतांच म्हातारा एकदम भडकून उठला आणि म्हणाला, " दया ? तुम्हांला वेड लागलं का महिमबाबू ? "

त्यांच्या या प्रश्नाला सरळ उत्तर न देतां महिम भीतभीत अदबीनें म्हणाला, " मला वाटतं दोनतीन दिवसांत तिनं कांहीं खाल्लंसुद्धां नाहीं. या मृत्युपुरींत अशा भयानक अवस्थेंत तिला टाकून जायचं—"

त्याचें हेंही वाक्य त्यानीं पुरें होऊं दिलें नाहीं. त्या आचारनिष्ठ ब्राह्मणाच्या जन्मगत संस्कारावर आघात झाल्यामुळें प्रतिहिंसेनें ते क्रूर झाले होते. त्यामुळें चिडून तोंड वेंगाडून ते म्हणाले, "अं: ! तुम्हीसुद्धां ब्राह्म आहां हें मी विसरलों होतों. तुम्ही कितीही मोठे ब्रह्मज्ञानी असलांत, तरी माझ्या सर्वनाशाची तुम्हांला कल्पना आली असती तर या कुलटेच्या बाबतींत दयामाया हा शब्द-देखील तुमच्या तोंडीं आला नसता." असें म्हणून ते गाडींत चढून बसले आणि म्हणाले, "आतां राहूं दे तें तुमचं ब्रह्मज्ञान ! जीव वांचवायचा असला तर गाडींत बसा. इथं जागा आहे."

कांहीं न बोलतां महिमनें त्यांना नमस्कार केला. त्यांच्या सर्वनाशाची कल्पना आली होती तरीही त्यानें त्यांना विरोध केला नाहीं कीं जीव वांचवायचें आमंत्रणही स्वीकारलें नाहीं. ते निघून गेल्यावर काळीज फाटून एक दीर्घ निःश्वास सोडून तो स्वस्थ राहिला.

सर्वनाशाचे परिणाम होते खरे !

आंत बसलेल्या अचलेनें गाडी निघून गेल्याचें ऐकलें तेव्हां तिलाही तें जाणवलें. ते आंत आले नाहींत, एक शब्दसुद्धां कां बोलले नाहींत, तें आतां अगदीं उघड दिसून आलें होतें.

हा वेळपर्यंत सुरेशच्या अनिवार्य मृत्यूमुळें जी भयंकर दुश्चिन्ता उत्पन्न झाली होती, तिचा पडदाही आतां दूर झाला होता. आतां महिम अगदीं समोर आला होता—अगदीं जवळ उभा राहिला होता, तरीही त्याचें मन कांहीं केल्या साद द्यायला तयार होत नव्हतें. स्वतःची स्वतःलाच लाज वाटत होती तरीही तो अत्यंत थकून गेल्यामुळें सुन्न झाला होता.

त्यानें आंत येऊन पाहिलें तों केरोसीनच्या दिव्यासमोर ती गुपचुप बसली होती. त्यानें विचारलें, "आतां तूं काय करणार ?

"मी ?" असें म्हणून अचला त्याच्या तोंडाकडे पहात विचार करूं लागली. शेवटीं ती म्हणाली, "मला कांहीं सुचत नाहीं. तुम्ही हुकूम कराल तो मी ऐकेन."

हें अनपेक्षित उत्तर मिळाल्यामुळें महिमला आश्चर्य वाटलें. तो साशंक झाला. आतांपर्यंत तिनें अशा रीतीनें त्याच्याकडे एकदांही पाहिलें नव्हतें. तिची ती दृष्टि अगदीं सरळ, अगदीं स्वच्छ होती. त्या तिच्या नजरेंतून त्याला तिचें अंतःकरण अगदीं स्पष्ट दिसून गेलें. तिथें भय नव्हतें, भावना नव्हती, कामना

नव्हती, कल्पना नव्हती-नजर जाई तिथवर पाहिलें तर भविष्यकालचें आकाश ढगाळून गेलें होतें. तियें रंग नव्हता, मूर्ति नव्हती, गति नव्हती, प्रकृति नव्हती—एकदम निर्विकार ! सर्वस्वी एकांतशून्य !

छळणुकीनें आणि अपमानानें क्षतविक्षत झालेल्या स्त्रीहृदयांतलें तें सर्वोच्च वैराग्य त्याला ओळखतां आलें नाहीं. एकाच्या अभावामुळें दुसऱ्याच्या हृदयाचें दिवाळें वाजलें आहे अशी कल्पना करून त्याचं सारें मन कडवट होऊन गेलें होतें. स्वतःच्या दुःखाच्यापायीं जगांतल्या दुःखाचा भार वाढवणें त्याला पटत नसे, म्हणून स्वतःला स्वतःमधेंच गुंतवून ठेवायचा अभ्यास त्यानें केला होता. हृदयांत उत्पन्न झालेला हा कडवटपणा आवाजांतून बाहेर दिसून येईल या भीतीनें तो दुसरीकडेच नजर फिरवून पाहात क्षणभर स्वस्थ राहिला. नंतर तो स्वाभाविक आवाजांत म्हणाला, " मी तुला कां हुकूम करूं अचला ? अन् तो ऐकायची जबाबदारी तरी तुझ्यावर कां म्हणून ? "

" पण तुमच्याखेरीज मला दुसरं कुणी नाहीं ! कुणी माझ्याबरोबर बोलत सुद्धां नाहीं !–" असें म्हणून अचला तशीच महिमच्या तोंडाकडे टक लावून पाहात राहिली.

महिम म्हणाला, " हीच का तुझी अपेक्षा आहे माझ्याकडून ? "

तो प्रश्न अचलेच्या कानीं गेला नसावा. पूर्वीच्या भाषणाचें सूत्र धरून ती आपल्याशींच बोलल्यागत म्हणाली, " तुम्ही माझ्यापासून दुरावेपर्यंत देवाला मी सारखी आळवीत होतें, हे देवा, आतां मला तुझ्या पायांपाशीं ने ! पण त्यानंही ऐकलं नाहीं अन् तुम्हीही ऐकून घेत नाहीं. आतां मी काय करूं ? "

तिला कांहींच उत्तर न देतां महिम बाहेर निघून गेला. तिचा तो निराशेचा कंठस्वर, ते निरभिमान, निस्संकोच आणि लाजभीड सोडून काढलेले उद्गार त्याच्या मनाची कालवाकालव करायला कारणीभूत झाले होते.तो तिचा आवाज कानांत गुणगुणत असतां तो बाहेर येऊन अंगणांत येरझाऱ्या घालीत विचार करूं लागला—आतां काय करायचें ? स्वतःच्याच बोजाखालीं तो चिरडला गेला होता. आतां सुरेश आपल्या सत्कृत्याचा आणि दुष्कृत्याचा भलामोठा बोजा त्याच्या माथीं मारून याच क्षणाला बाजूला सरला होता. आतां हा बोजा कसा आणि कुठें नेऊन उतरायचा ?

बरीच खटपट करून रघुवीरनें येऊन खबर दिली, कीं डिहरीच्या रस्त्यावर सुमारें तीन कोसांवर दुसऱ्या दिवशीं सकाळीं बाजार भरणार होता. खटपट केली तर तिथें बैलगाडी मिळण्याची शक्यता होती.

महिम अतिशय अस्वस्थ होऊन गेला आहे असें पाहून तो संकोचपूर्वक म्हणाला, " मी स्वतः तिकडे जाईन, पण लोक इथं यायला घाबरतात. या गांवांत कुणी यायचा नाहीं. तरीपण माईजो जर एवढ्या रस्त्याची मजल—

तें ऐकतांच अचला म्हणाली, " चल ! " ती एकदम उठली होती पण पाय लटपटून खालीं पडली. महिमनें हात पुढें करतांच तो घट्ट पकडून ती कशीबशी उठून उभी राहिली. त्यावेळच्या मनःस्थितीमुळें महिम अगदीं आंकसून गेला होता. तिच्या हातांतला हात सोडवून घ्यायचा प्रयत्न करीत तो म्हणाला, " तर मग आज राहूं दे ! "

" कां ? इथं राहाणं बरं नव्हे असं आत्तांच तुम्ही म्हणालां ! अन् डिहरीहून गाडी आणायची म्हटली तर उद्यांचा दिवस नाहीं का काढावा लागणार ? "

" पण तूं अगदीं दुबळी झालीयूस—"

अचलेनें हात सोडला नाहीं, त्यानेंही हात सोडला नाहीं. ती मान हालवून म्हणाली, " नाहीं, चला. मी तशी दुबळी झालेली नाहीं. तुमचा हात धरून जिथवर जायला सांगाल तितकं दूर जायची माझी तयारी आहे. "

" चल तर ! " असें म्हणून रघुवीरला पुढें घालून तो तिला घेऊन चालूं लागला. मनांतल्या मनांत तो हजारवेळ स्वतःलाच प्रश्न करीत होता,—कुठें याचा शेवट होणार ? केव्हां हा प्रवास थांबणार ? आणि कसा ?

## २१

डिहरीच्या घरीं येतांच अचलेनें तो मोठा लखोटा काढून महिमच्या हातीं दिला आणि म्हटलें, " हें त्यांचं मृत्युपत्र ! "

महिमनें तो लखोटा हातीं घेतला. त्या लखोट्यांत सुरेशनें त्याला लिहिलेलें पत्र होतें याची त्याला आठवण झाली. त्या पत्रांत कोणती हकिकत लिहिलेली असेल, कोणतें दुर्गम रहस्य उकलून दाखवलें असेल, तें त्याच क्षणाला कळून घ्यायला तो अत्यंत उत्सुक झाला होता. पण ती प्रचंड इच्छा शांतपणें दाबून टाकून त्यानें तो लखोटा घेऊन खिशांत ठेवला.

अचलेनें विचारलें, " आजच तुम्ही डिहरी सोडून जाणार आहां का ?"

" हो, आतां इथं राहायची मला सवड नाहीं. "

" मला आतां जन्मभर इथंच राहायला हवं का ?"

क्षणभर थांबून महिमनें विचारलें, " तुला दुसऱ्या कुठं जायचं आहे का ? "

अचला म्हणाली, " कालपासून मी हाच विचार करतेंय. विलायतेंत माझ्या-

सारख्या हतभागी जिवांच्यासाठीं आश्रम आहेत असं मी ऐकलं होतं. तिथं काय होतं तें मला माहित नाहीं, पण या देशांत जर असेच कांहीं आश्रम--" बोलतांना तिच्या टपोऱ्या डोळ्यांतून टपाटप आसवें वाहूं लागलीं. आज प्रथमच तिच्या डोळ्यांत हीं आसवें दिसलीं होतीं.

महिमच्या हृदयांत बाण बसला. त्याला तिची दया आली. त्यानें उत्तर दिलें, " मलासुद्धां माहित नाहीं. मी चौकशी करून पाहातों. "

" कधीं तुम्हांला पत्र लिहिलं तर तुम्ही उत्तर द्याल ना ? "

" तशीच जरूर पडली तर उत्तर देईन. आतां सामानसुमानाची बांधाबांध करून बाहेर निघायला मला उशीर होईल. मी चाललों. "

आपल्या शेवटच्या दुःखाची ओंजळ आपल्या नवऱ्याच्या पायांशीं वाहण्यासाठीं तिथल्या तिथेंच जमिनीवर डोकें टेकून तिनें त्याला प्रणाम केला. तो बाहेर निघून गेला त्यावेळीं दाराच्या चौकटीला धरून ती उभी राहिली होती.

वाटेनें जात असतांना महिम सारखा विचार करीत होता. आतां रामबाबूंच्या घरीं एक क्षणभरही राहाणें इष्ट नव्हतें. शहरांत कुठेंतरी एक दिवसासाठीं मुक्काम करायलाही जागा नव्हती. काय वाटेल तें करून इथून आजच्या आज बाहेर जाणें अवश्य होतें. शिवाय त्याला स्वतःलाही थोडासा एकान्त पाहिजे होता. घटकाभर बसून लखोट्यांतल्या पत्रांत काय आहे तें एकदां जसें वाचून घ्यायला हवें होतें, तसेंच एकदां डोळे झांकून स्वतःचें अंतःकरण पारखून घ्यायलाही थोडा अवसर मिळायला पाहिजे होता.

अचलेवरचें प्रेम तिळातिळानें वाढत गेल्याचा पहिला इतिहास आतां त्याच्या नजरेसमोर अस्पष्ट झाला होता. या स्त्रीच्यापायीं त्याच्या जीवनांत जी भयंकर वावटळ वेळोवेळीं उठून गेली होती, ती प्रळयासारखी प्रचंड होती. तिला उपमा नव्हती. तें सारें मुकाट्यानें सहन करण्याइतकी शक्ति विधात्यानें त्याच्या नशिबीं लिहिली नव्हती. त्याचें घर जेव्हां आंतूनबाहेरून पेटून उठलें, त्याच्या नजरेसमोर भस्मसात् झालें, त्यांतली एक ठिणगीसुद्धां आतां कुठें शिल्लक राहिली नव्हती. आज त्याच्याठायीं असलेली सारी शक्ति जी जागी झाली होती ती नुसती सहन करण्यासाठींच नव्हे, तोंडमिळवणी करण्यासाठीं होती. आज त्याच्या साऱ्या जमाखर्चाचा ताळमेळ जुळवून घेतल्याशिवाय त्याला राहावत नव्हतें. कुठेंतरी एकान्त जागीं तेवढ्याचसाठीं जाणें भाग होतें.

मुक्कामावर जाऊन त्यानें आपलें सामानसुमान घाईघाईनें बांधून घेतलें. पांचाच्या गाडीला आतां एक घटकाभर वेळ होता. रामबाबू काशीहून परत

यायला वेळ लागणार होता. प्रायश्चित घेईपर्यंत तोंडांत पाणीसुद्धां घालायचें नाहीं असें सांगून ते काशीला गेले होते. अर्थात् त्यांची भेट घेऊन त्यांचा निरोप घेणें शक्य झालें नसतें.

तें कर्तव्य पार पाडण्यासाठीं एक छोटेसें पत्र लिहिण्याकरतां तो कागद कलम घेऊन बसला. एकदोन ओळी लिहून झाल्या तेव्हां त्यांचा तो भडकलेला उग्र चेहरा त्याला आठवला. त्याजबरोबर दुसऱ्या एका व्यक्तीच्या डोळ्यांतील आसवें आणि गहिंवरल्या आवाजांतली काकुळतीची प्रार्थनाही त्याच्या कानीं येऊन पोंचली. त्या तंद्रींत एकाद्या जखमेच्या वेदनेप्रमाणें हा वेळपर्यंत त्याची जाणीव त्याला पुरेसा जागा राहूं देत नव्हती, कीं झोंपी जाऊंही देत नव्हती. पण रामबाबूंचे ते शब्द आठवतांच जोरानें धक्का दिल्याप्रमाणें त्याची गुंगी एकदम उतरली.

त्या पुराण्या व्यक्तीशीं त्याचा झालेला परिचय फारा दिवसांचा नव्हता. पण त्याच्या दयादाक्षिण्याची, गृहस्थपणाची आणि निष्कपट भगवद्भक्ति आणि धर्मनिष्ठेची सारी हकिकत त्यानें ऐकली होती. तें सारें आठवून त्याचे झांकले गेलेले डोळे एकदम उघडले गेले आणि त्याची नजर कुठल्यातरी एका न पाहिलेल्या दिशेकडे खिळून राहिली.

हा म्हातारा अचलेला आपली सुरमा पोर—आपली मुलगी म्हणून म्हणत होता. तिच्याखेरीज दुसऱ्या कोणत्याही परगोत्री व्यक्तीच्या हातच्या अन्नाला त्यानें स्पर्शही केला नव्हता असें त्यानें मोठ्या वात्सल्यानें बोलत असतांना महिमला सांगितलें होतें. अर्थात् यामुळें त्याच्या आतांच्या सर्वनाशाची कल्पना कोणत्या कडोविकडीला गेली होती याचा अंदाज करणें महिमला कठीण गेलें नाहीं.

तरीपण पुन्हा पुन्हा महिमच्या मनांत एकच प्रश्न उभा राहात होता—अचलेच्या अपराधाचा निर्णय पुन्हां केव्हांतरी करतां येईल, पण या आचारपरायण ब्राह्मणाचा हा धर्म—हा कुठला खराखुरा धर्म?—एका मुलीच्या प्रतारणेमुळें धुळीला मिळून जाणारा हा धर्म अत्याचारी आघातापासून स्वतःला अगर दुसऱ्यालाही बचावूं शकत नाहीं असा हा धर्म—हा कसला धर्म? मानवाच्या जीवनांत असल्या धर्माची आवश्यकता कशासाठीं म्हणून? जो धर्म स्नेहाची मर्यादा राखूं देत नाहीं; निःसहाय, दुबळ्या स्त्रीला मृत्युच्या तोंडीं टाकून जायला एवढासुद्धां मागें पुढें पाहात नाहीं, एवढ्या मोठ्या प्रेमळ म्हाताऱ्याला नुसत्या आघातामुळें जो धर्म असा चंचल आणि सूडाच्या बुद्धीनें निष्ठुर बनवतो,

दा. क्र. ८२५६ चो ८

तो कसला हा धर्म ? या धर्माचा ज्यानें स्वीकार केला आहे त्यानें अशी कोणती सत्य वस्तु मिळवलीय असं म्हणायचं ? धर्मावर होणारा आघात सहन करण्या-साठींच धर्माची जरूरी ! हीच तर धर्माची शेवटची कसोटी !

एकाएकीं त्याच्या मनांत आलें, तर मग आपण जो हा पळून जातों आहों – हे सारे उसळलेले विचार दोन्हीं हातांनीं लोटून देऊन त्यानें लेखणी उचलली आणि एक छोटेसें पत्र लिहून स्टेशनचा रस्ता धरला.

गाडी आली त्यावेळीं डब्याचा दरवाजा उघडून महिम आंत प्रवेश करणार होता तोंच त्याच दारांतून एक म्हातारा एका विधवा मुलीचा हात धरून खालीं उतरला.

म्हातारा म्हणाला, " अरे कोण ? महिम कीं काय ? "

मृणाल एकदम पुढें झाली आणि त्याच्या पायापाशीं प्रणाम करून म्हणाली, " कुठं चाललायस दादा ? "

दोघेंही आश्चर्यचकित होऊन पाहात असतांना महिम वर चढून आंत बसला.

महिम म्हणाला, " मी कलकत्त्याला जातोंय. सुरेशबाबूंचं घर म्हणून तुम्ही सांगितलंत, कीं गांवांतला कुणीही तुम्हांला तिथं घेऊन जाईल. अचला तिथंच आहे. "

केदारबाबू भांबावल्यासारखे होऊन नजर लावून त्याच्याकडे पाहात उभे राहिले होते.

महिम म्हणाला, " सुरेश वारला !–अचला मला कुठल्यातरी आश्रमाबद्दल विचारीत होती मृणाल, पण तिला उत्तर देणं कांहीं जमलं नाहीं मला. तिच्या प्रश्नाचं उत्तर तुझ्याकडून मिळेल कदाचित्. "

महिमच्या डोळ्याला डोळा देऊन मृणाल म्हणाली, " मिळेल तर काय दादा ! माझं सारं शिक्षण तुझ्याच हाताखालीं झालंय ना ? तिच्यासाठीं आश्रम म्हण कीं आश्रय म्हण, कुठं आहे तें मी वहिनीला सांगेन; पण तो द्यायला हवा आहेस तूंच ! "

महिम कांहीं बोलला नाहीं. त्या तिखट नजरेच्या मुलीची दृष्टि चुकविण्यासाठीं त्यानें दुसरीकडे तोंड वळवलें.

गाडीची शीटी वाजली. म्हाताऱ्याचा ढळलेला हात आपल्या हातांत ओढून घेऊन मृणाल म्हणाली, " [illegible] आतां जाऊं या आपण. "

अनुक्रम: २८९.१८८
विभाग: का ०७३:४१
क्रमांक १९७८
नों. दि. ३/२/५१
IRBK-0106286
IRBK-0106286